आंतरवर्ग प्रशिक्षण
(सुधारित अभ्यासक्रमानुसार)

विषय क्रमांक : ४

# स्थानिक व विशेष कायदे

## (Local & Special Laws)

## भाग – २

(तृतीय आवृत्ती : सन २०१५)

महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,
नाशिक

# प्रस्तावना

समाजाला काळानुसार वेळोवेळी विविध अपराधांशी झुंजावे लागते. अशा विविध सामाजिक गुन्ह्यांसाठी प्रमुख फौजदारी कायदे पुरेसे नसल्याने केंद्र व राज्य सरकार अशा अपराधांना आळा घालण्यासाठी वेळोवेळी विशेष किंवा स्थानिक कायदे (Local & Special Laws) अंमलात आणतात.

भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४१ नुसार ''विशेष कायदा'' म्हणजे विशिष्ट विषयाला लागू असलेला कायदा व कलम ४२ नुसार ''स्थानिक कायदा'' म्हणजे भारतातील केवळ विशिष्ट भागालाच लागू असलेला कायदा.

विशेष व स्थानिक कायदे हे विविध विषयांवरील राज्याचे अथवा केंद्राचे कायदे आहेत. या कायद्यांमध्ये कलमांची संख्या लहान असली तरी ते आशयाने मोठे आहेत. त्यामुळे त्यांची उपयुक्तता आणि आवश्यकता मोठी आहे. अशा कायद्यांबद्दल असे म्हणता येईल की, ''कायदा लहान तरी उपयुक्तता महान'' या कायद्यांची संख्या सततचे सामाजिक बदलांमुळे आणि त्यामधून उत्पन्न होणारे  प्रश्नांमुळे वाढत आहे.

प्रशिक्षणार्थी व इतर पोलीस अधिकाऱ्यांना दैनंदिन कामकाजात उपयुक्त ठरणारे दारुबंदी कायदा १९४९, जुगार प्रतिबंध कायदा १८८७, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९, मुंबई सावकार अधिनियम १९४६ इ. सारखे एकूण ३७ कायद्यांचा समावेश या पुस्तकात करण्यात आलेला आहे.

सदरील पुस्तिका ही प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना कायद्याचे सखोल, तंत्रशुद्ध ज्ञान व्हावे याकरिता महाराष्ट्र पोलीस अकादमीचे संचालक श्री. संजय बर्वे, भा.पो.से. यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासक्रम सुधारणा समितीच्या सुचनांनुसार बनविण्यात आली असून, उपसंचालक, डॉ. निखिल गुप्ता, भा.पो.से., पोलीस अधीक्षक (प्रशि.) श्री. सुनिल फुलारी व पोलीस अधीक्षक (प्रशा.) श्री. संजय पाटील यांनी या कार्यात सहभाग घेतला. विशेष व स्थानिक कायदेविषयक क्रमांक–४ पुस्तिकेचे कामामध्ये विधी निदेशक ॲड. पल्लवी सुपेकर, ॲड. भारती काळे, ॲड. पौर्णिमा नाईक,  ॲड. चैताली सुर्वे, ॲड. विजय सुभेदार व ॲड. संजय पाटील यांनी सतत परिश्रम घेऊन संकलन केले आहे.

सदर पुस्तिकेत काही त्रुटी राहिल्यास व त्याबाबतच्या सुचना आल्यास निश्चितच विचार केला जाईल.

दिनांक: १५/१०/२०१२

संजय बर्वे
संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

# मनोगत

**''स्थानिक व विशेष कायदे''** या पुस्तकाची प्रस्तुत तृतीय आवृत्ती तयार करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे संशोधन व विश्लेषण प्रकल्प हाती घेण्यात आला होता. मूलभूत प्रशिक्षण आढावा कार्यक्रम "Training Needs Analysis" हा प्रकल्प सन २०१४–१५ दरम्यान पूर्ण करण्यात आला. या अंतर्गत पोलीस दलातील कार्यकारी शाखा, विविध विशेष शाखा यामध्ये कार्यरत विविध दर्जाचे अधिकारी व कर्मचारी, समाजातील सर्व घटकांतील नागरिकांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील प्रशिक्षणार्थी, मागील साधारणतः १० वर्षांच्या कालावधीत सर्वोत्कृष्ट ठरलेले प्रशिक्षणार्थी अधिकारी यांना आमंत्रित करून विविध चर्चासत्रे व मंथन बैठकी आयोजित करण्यात आल्या होत्या. या चर्चासत्रात महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील मूलभूत प्रशिक्षण पद्धती व अभ्यासक्रम यात बदल करण्याची आवश्यकता आहे का? बदल करायचा असल्यास कशाप्रकारे? याबाबत सर्वांचे अभिप्राय नोंदवून घेण्यात आले होते. त्याअनुषंगाने अभ्यासक्रमात बदल करण्यात येऊन संबंधित विषयांचे पुस्तकांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. अशाप्रकारे आवश्यक बदल अंतर्भूत करून ही आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे.

**''स्थानिक व विशेष कायदे''** हे पुस्तक प्रशिक्षणार्थी यांना त्यांच्या विषयाचे सुलभ भाषेत ज्ञान मिळावे, यादृष्टीने संचालक श्री. नवल बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली सहसंचालक श्री. निरंजन वायंगणकर, उपसंचालक (प्रशिक्षण) व Training Needs Analysis समन्वयक श्री. सुनील ब. फुलारी, उपसंचालक व अभ्यासक्रम पुस्तक समिती अध्यक्ष श्रीमती उज्वला वनकर, सहाय्यक संचालक श्रीमती अपर्णा गीते व विधी निदेशक श्री. संजय पाटील, श्री. विजय सुभेदार, श्री. राजेश सचदेव, श्रीमती बी. ए. काळे, श्रीमती पौर्णिमा नाईक, श्रीमती पी. के. सुपेकर यांनी सतत परिश्रम घेऊन परिपूर्ण केले.

या पुस्तकात काही त्रुटी आढळल्यास किंवा काही सुधारणा वाचकांना सुचवायच्या असल्यास तसे कळवावे, त्यावर पुढील आवृत्तीच्या वेळी निश्चितच विचार केला जाईल.

नाशिक

दि. १ एप्रिल, २०१५

**नवल बजाज**

संचालक,

महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

# स्थानिक व विशेष कायदे : भाग – २

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषयाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| २४. | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ | ७–४२ |
| २५. | अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ | ४३–५६ |
| २६. | पोलीस दल (हक्क निर्बंधन) अधिनियम, १९६६ | ५७–५९ |
| २७. | पोलीस (अप्रीतीची भावना चेतावणे) अधिनियम, १९२२ | ६०–६२ |
| २८. | अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ | ६३–१०३ |
| २९. | शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ | १०४–११४ |
| ३०. | लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ | ११५–१२० |
| ३१. | खाजगी सुरक्षा एजन्सीज (विनियमन) अधिनियम, २००५ आणि नियम | १२१–१३१ |
| ३२. | माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० | १३२–१४८ |
| ३३. | राष्ट्रीय सन्मानांच्या अप्रतिष्ठेस प्रतिबंध अधिनियम, १९७१ | १४९–१५० |
| ३४. | महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७ | १५१–१५६ |
| ३५. | महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ | १५७–१७८ |
| ३६. | महाराष्ट्राचा छळवणूक (रॅगिंग) प्रतिबंधक कायदा, १९९९ | १७९–१८० |
| ३७. | महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ | १८१–१९७ |
| ३८. | महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स ) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१. | १९८–२०६ |

| अ. क्र. | विषयाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| ३९. | ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २००० | २०७–२०९ |
| ४०. | महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनामधील) हितसंबंधाचे रक्षण करण्याबाबत अधिनियम, १९९९ | २१०–२१७ |
| ४१. | महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ | २१८–२४२ |
| ४२. | महाराष्ट्र लॉटऱ्या (नियंत्रण व कर आकारणी) आणि बक्षीस स्पर्धा (कर आकारणी) अधिनियम | २४३–२५५ |
| ४३. | महाराष्ट्र वैद्यकीय सेवा–व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा–संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० | २५६–२५९ |
| ४४. | महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ | २६०–२६६ |
| ४५. | लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ | २६७–२८८ |
| ४६. | विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६ | २८९–२९७ |
| ४७. | भारतीय पारपत्र अधिनियम, १९६७ | २९८–३०८ |
| ४८. | कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक करण्यास (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ | ३०९–३२३ |
| ४९. | भारतीय ध्वज संहिता | ३२४–३३६ |
| ५०. | **THE REGISTRATION OF FOREIGNERS ACT, 1939** | ३३७–३३९ |

# २४. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८

**(सन १९८८ चा अधिनियम क्रमांक ४९)**

**(९ सप्टेंबर १९८८)**

भ्रष्टाचार प्रतिबंध आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींविषयीचा कायदा एकत्रित करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**प्रास्ताविक टिप्पणी–उद्देश व कारणे यांचे निवेदन –**

(१) भ्रष्टाचारविरोधी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या कार्यकक्षा वाढवून आणि त्यातील तरतुदी अधिक मजबूत करून हा कायदा अधिक परिणामकारक करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

(२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ यात १९६४ साली सुधारणा करण्यात आली. संथानम समितीच्या शिफारशी हा त्यामागील आधार होता. भारतीय दंडसंहितेच्या प्रकरण नऊमध्ये लोकसेवक आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या गैरव्यवहाराद्वारे त्यांना साहाय्य करणाऱ्या व्यक्ती यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यासंबंधीच्या तरतुदी आहेत. तसेच भ्रष्टाचाराच्या मार्गाने मिळविलेली संपत्ती व ती ज्याच्या स्वाधीन करण्यात आली त्या हस्तांतरितीकडील अशी कु–प्राप्त संपत्ती जप्त करता यावी यासाठी गुन्हेगारी कायदा विशोधन अध्यादेश, १९४४ यातही तरतुदी करण्यात आल्या आहेत. लोकसेवकामधील भ्रष्टाचाराविरुद्ध अधिक परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी, तरतुदी करण्यासाठी या सर्व तरतुदीमध्ये फेरफार करून त्यांचा अंतर्भाव करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

(३) या विधेयकाचे, इतर गोष्टीबरोबरच ''लोकसेवक'' या संज्ञेच्या व्याख्येची व्याप्ती वाढविणे, भारतीय दंड संहितेच्या कलम १६१ ते १६५–A खालील अपराधांचा त्यात, म्हणजेच शिक्षामध्ये अंतर्भाव करणे, या अपराधासाठी तरतूद केलेल्या शास्तीमध्ये वाढ करणे आणि अन्वीक्षा न्यायालयाचा खटला भरण्यास मंजुरी देणारा आदेश, जर अशा आदेशास त्यापूर्वीच न्यायालयात आव्हान देण्यात आले नसेल आणि खटल्यास प्रारंभ झालेला असेल तर, अंतिम असेल अशी तरतूद समाविष्ट करणे, हे उद्दिष्ट आहे. कारवाई त्वरेने करण्याच्या दृष्टीने व खटले दैनंदिन तत्त्वावर चालविण्यासाठी या अधिनियमात तरतुदी केल्या आहेत आणि स्थगनादेश (Stay Order) मिळविणे आणि अंतर्वादिक आदेशाचे (Interlocutory orders) पुनरीक्षण करण्याच्या अधिकाराचा वापर, यासारख्या प्रतिबंधात्मक तरतुदींचाही समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रस्तावित विधिविधानामध्ये (Proposed Legislation) कलमे १६१ ते १६५–A च्या तरतुदींचा, तसेच वाढीव शिक्षेसाठी तरतुदींचाही समावेश करण्यात आला असल्यामुळे भारतीय दंड संहितेमधील ती कलमे येथे पुन्हा देण्याची आवश्यकता नाही. म्हणून आवश्यक त्या व्यावृत्तीच्या (saving) तरतुदींसह ती कलमे वगळण्याचेही प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) खंडासोबतच्या टिप्पण्यामुळे विधेयकातील तरतुदी तपशीलवार स्पष्टपणे होतील. म्हणून भारतीय गणराज्याच्या एकोणचाळीसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येवो.–

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव व विस्तार :–**

(१) या अधिनियमास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ असे म्हणता येईल.

(२) जम्मू व काश्मीर राज्याव्यतिरिक्त संपूर्ण भारतभर याचा विस्तार असेल, तसेच तो भारताबाहेरील सर्व भारतीय नागरिकांनाही लागू असेल.

**२. व्याख्या :–**

संदर्भानुसार इतर प्रकारे आवश्यक नसल्यास या अधिनियमात– (a) ''निवडणूक'' या संज्ञेचा अर्थ, संसद किंवा कोणतेही विधानमंडळ, स्थानिक प्राधिकरण किंवा अन्य सार्वजनिक प्राधिकरण यातील सदस्यांची निवड करण्यासाठी कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही प्रकारे घेतलेली निवडणूक असा असेल.

**निवडणूक या संज्ञेचे विवेचन –** या अधिनियमाच्या कलम २ (a) मध्ये निवडणूक या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. निवडणूक याचा अर्थ, कोणत्याही कायद्यानुसार, संसद, विधानमंडळ, स्थानिक प्राधिकरण यातील सदस्यांना निवडून देण्यासाठी घेतलेली निवडणूक असा आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम ३ खालील स्पष्टीकरणानुसार कोणतेही विधानमंडळ, नगरपालिका किंवा कोणत्याही स्वरूपाचे स्थानिक प्राधिकरण यांतील सदस्यांना निवडून देण्यासाठी कोणत्याही कायद्याद्वारे विहित केलेली निवडपद्धती असा याचा अर्थ होतो. या शब्दांच्या व्युत्पत्तीच्या अर्थानुसार, मतदारांद्वारे निवडून देण्याची कार्यवाही असा होतो. ''बिनविरोध निवड'' (Uncontested Election) या संज्ञेचा वापर जेव्हा एखादी व्यक्ती तिच्या विरोधात कोणतीही व्यक्ती उभी नसल्याने निवडून येते त्या संबंधात वापरण्यात येतो. निवडणूक या शब्दाचा व्यापक व संकुचित अर्थाने वापर होतो. निवडणूक शब्दाचा संकुचित अर्थ, निवडणूक निकालानंतर झालेली ''उमेदवाराची अंतिम निवड'' असा आहे. थोडक्यात निवडणूक या संज्ञेचा अर्थ, प्रत्यक्षात निवडणूक घेण्यात येवो किंवा न येवो, उमेदवाराला निर्वाचित करण्याची प्रक्रिया असा आहे.

**(b) ''सार्वजनिक कर्तव्य'' याचा अर्थ, जे कर्तव्य पार पाडण्याची राज्याला, समाजाला किंवा सर्व जनतेला आस्था आहे असे कर्तव्य, असा असेल.**

**स्पष्टीकरण –** या खंडामधील ''राज्य'' या संज्ञेमध्ये केंद्रीय, प्रांतिक किंवा राज्य अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले कोणतेही महामंडळ किंवा शासनाच्या किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कंपनीच्या मालकीचे किंवा तिने नियंत्रित केलेले किंवा तिने अर्थासहाय्य दिलेले कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था यांचा अंतर्भाव असेल.

सार्वजनिक कर्तव्य या संज्ञेचे विवेचन : ही नवीन व्याख्या आहे. भारतीय दंड संहिता किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम यामध्ये यापूर्वी कुठेही या संज्ञेची व्याख्या दिलेली नाही. पोट–कलम (b) मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार, ज्यामध्ये राज्य, जनता किंवा सर्वसाधारण समाज यांचा ज्यात हितसंबंध असेल असे कर्तव्य पार पाडणे असा आहे. यामध्ये राज्य हा शब्द व्यापक असून त्यामध्ये केंद्र व राज्य शासन, शासकीय कंपनीच्या मालकीचे किंवा तिने नियंत्रित केलेले प्राधिकरण किंवा संस्था किंवा कंपनी अधिनियम, १९५६ यामध्ये व्याख्या केलेली शासकीय कंपनी यांचा अंतर्भाव होतो.

**दत्तात्रय नारायण पाटील विरुद्ध महाराष्ट्र राज्य** या प्रकरणामध्ये (ऑल इंडिया रिपोर्टर १९७५ स. न्या १६८५) सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की,

''कोणत्याही लोकसेवकाला त्याच्या मालकाने संविधीद्वारे (Statute) किंवा कार्यकारी आदेशाद्वारे सोपवलेले काम, ते जर अवैध किंवा सार्वजनिक धोरणाच्या विरुद्ध नसेल तर सार्वजनिक कर्तव्य ठरते''

**(c) लोकसेवक याचा अर्थ –**

(i) शासनाच्या सेवेत असलेली किंवा शासनाकडून वेतन घेणारी किंवा कोणतेही सार्वजनिक कर्तव्य पार पाडण्यासाठी शासनाकडून फीच्या किंवा कमिशनच्या स्वरूपात परिश्रमिक (Remuneration) घेणारी कोणतीही व्यक्ती;

**टीप –** या खंडातील महत्त्वाची बाब ही आहे की, एखादी व्यक्ती 'लोकसेवक' ठरण्यासाठी तिला केवळ शासनाकडून वेतन किंवा पारिश्रमिकच मिळत असले पाहिजे असे नाही तर तिने शासनाच्या सेवेत कोणते तरी पददेखील धारण करावयास पाहिजे. हे पद अधिकारी श्रेणीचेच असले पाहिजे असे नाही तर त्या पदाकडे म्हणजेच ते पद धारण करणाऱ्या व्यक्तीकडे कोणते तरी शासकीय काम सोपवलेले असले पाहिजे. याच कारणास्तव भारतीय प्रशासकीय सेवेतील म्हणजेच आय. ए. एस. व्यक्ती, मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ याखाली स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्थेकडे (सुपर बाजार) प्रतिनियुक्तीवर गेली असेल तर ती दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक ठरत नाही. कारण या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तो शासनाच्या सेवेत असत नाही व शासनाकडून वेतन घेत नाही तसेच स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा महापालिका इत्यादींच्याही सेवेत असत नाही **(एस. एस. धना वि. दिल्ली नगरपालिका १९८१ क्रिमि. लॉ जर्नल ८७१ एस. सी : ए. आय. आर. १९८१ एस. सी. १९९५)**

**(ii) स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेत असलेली किंवा त्याच्याकडून वेतन घेणारी कोणतीही व्यक्ती;**

**स्थानिक प्राधिकरण –** ''स्थानिक प्राधिकरण'' या संज्ञेची भारतीय दंड संहिता किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ किंवा १९८८ यामध्ये व्याख्या देण्यात आलेली नाही. मात्र सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८९७ (१८९७ चा दहा) याच्या कलम ३ (३१) यामध्ये पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. ''स्थानिक प्राधिकरण याचा अर्थ, नगरपालिकेच्या किंवा स्थानिक निधीवर नियंत्रण ठेवण्याचा किंवा त्याची व्यवस्था पाहण्याचा जिला कायद्याने अधिकार मिळाला आहे किंवा जिच्याकडे शासनाने असा अधिकार सोपविला आहे अशी नगरपालिका समिती, जिल्हा मंडळ, बंदर आयुक्ताचे मंडळ (Body of Port Commissiioners) किंवा इतर प्राधिकरणे असा असेल. '' या व्याख्येनुसार, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद ग्रामपंचायती, इ. यांचा स्थानिक प्राधिकरणामध्ये समावेश होतो व अशा प्राधिकरणातील कर्मचारी 'लोकसेवक' ठरतात.

महानगरपालिका किंवा नगरपालिका यामध्ये काम करणारे कर्मचारी हे लोकसेवक या संज्ञेस पात्र असले तरीही 'नगरसेवक' हे मात्र लोकसेवक असत नाहीत, कारण नगरसेवक हे कोणत्याही लोकसेवकाच्या कामामध्ये साहाय्यभूत ठरत नसल्याने भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक या संज्ञेस पात्र नाहीत. त्यामुळे, अशा नगरसेवकाने केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाबद्दल त्याच्यावर खटला भरला जाण्यास परवानगी देण्यात आली तरीही भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याखाली खटला भरता येत नाही. वस्तुतः 'लोकसेवक' ही संकल्पना 'नगरसेवक' या संकल्पनेपेक्षा अगदी भिन्न आहे. शासनाने किंवा निमशासकीय प्राधिकरणाने नेमलेली व त्याच्याकडून वेतन घेणारी व्यक्ती ही लोकसेवक असते. असा लोकसेवक शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या चौकटीत राहून आपले कर्तव्य बजावतो, तर 'नगरसेवक' हे जनतेने निवडून दिलेले असतात व ते आपले कर्तव्य बजावण्याच्या बाबतीत, कर्मचाऱ्यांना लागू असलेले सेवा नियम त्यांना लागू नसतात. **(रमेश बाळकृष्ण कुळकर्णी वि. महाराष्ट्र राज्य, १९८६ क्रिमि. लॉ जर्नल १४: ए. आय. आर. १९८५, स. न्या. १६५५).**

**(iii) केंद्रीय प्रांतिक किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली स्थापन करण्यात आलेल्या महापालिकांच्या किंवा शासनाच्या किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या दिल्यानुसार असलेल्या कोणत्याही शासकीय कंपनीच्या मालकीच्या किंवा अर्थसाहाय्य दिलेल्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या सेवेत असलेली किंवा त्याच्याकडून वेतन घेणारी कोणतीही व्यक्ती ;**

**टीप –** कलम २ खंड क (iii) याचा संबंध भारतीय दंड संहिता कलम २१, खंड १२ (b) याच्याशी आहे. ''शासनाच्या मालकीचे, त्याने नियंत्रित केलेले किंवा सहाय्य दिलेले प्राधिकरण किंवा संस्था'' असा जो शब्दप्रयोग या खंडामध्ये केलेला आहे त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ मध्ये ज्यांचा समावेश झालेला नाही अशा संस्था नोंदणी अधिनियम, केंद्रीय विद्यालय संघटना आदी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांचा समावेश 'लोकसेवकांमध्ये' झालेला आहे.

**शासकीय कंपनी म्हणजे काय?** या खंडामध्ये 'सरकारी किंवा शासकीय कंपनी' या संज्ञेचा वापर करण्यात आला आहे. सरकारी कंपनी म्हणजे ज्या कंपनीतील किमान ५१ टक्के प्रदत्त भागभांडवल (Paid up Share Capital) हे केंद्र सरकारचे किंवा राज्य शासनाचे किंवा अंशतः केंद्र सरकारचे व अंशतः राज्य शासनाचे असते अशी कंपनी व या संज्ञेत शासकीय कंपनीला दुय्यम असलेल्या कंपनीचाही समावेश होतो. अशा शासकीय कंपन्यांच्या संबंधात कंपनी अधिनियमातील तरतुदीमध्येही अधिसूचनेद्वारे फेरबदल करण्याचे केंद्र सरकारला अधिकार आहेत. अधिनियमामध्ये १९५८ व १९६४ साली केलेल्या सुधारणांच्या फलस्वरूप हेवी इलेक्ट्रिकल्स (इंडिया) खासगी मर्यादित यासारखी कंपनीदेखील भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या कक्षेत आली. तसेच, राष्ट्रीयकृत (Nationalised) जनरल इन्शुरन्स कंपनीचा शाखा अधिकारीदेखील लोकसेवक ठरला. तसेच इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया चा व्यवस्थापकीय संचालक (Managing Director) हा कलम २१ च्या कक्षेत आला.

१९६६ च्या अधिनियम क्रमांक ९५ अन्वये बँक विनियम, १९४९ यामध्ये सुधारणा करण्यात आली. त्यामुळे, बँक कंपन्यांचा प्रत्येक अध्यक्ष, संचालक, लेखापरीक्षक परीसमापक (Liquidator), व्यवस्थापक व इतर कर्मचारी यांचा भारतीय दंड संहिता १८६० च्या प्रकरण नऊ अन्वये लोकसेवकांच्या संज्ञेत समावेश झाला. प्रत्येक राष्ट्रीयकृत बँक ही शासकीय कंपनी ठरण्यास पात्र झाली. मुख्यत्वेकरून, अशा राष्ट्रीयकृत बँकेतील कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचारांच्या प्रकरणांबाबत व्यवहार करण्याबाबत व त्यांना प्रतिबंध अधिनियमाच्या कक्षेत आणण्याच्या हेतूने सदर अधिनियमाच्या कलम २ खंड (c) (iii) ची निर्मिती झाली आहे.

**लोकनियुक्त आमदार** (M.L.A.) **हा लोकसेवक आहे काय ?**

हा प्रश्न **रामदास नायक वि. ए. आर. अंतुले (१९८४ क्रिमि. लॉ जर्नल ६१३: ए. आय. आर. १९८४, स. न्या. ६८४)** या खटल्याच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या विचारार्थ आला. सर्वोच्च न्यायालयाने, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या कोणत्याही खंडात आमदारांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण येते काय हे पाहण्यासाठी या कलमांचा वैधानिक इतिहास (Legislative History) पडताळून पाहिला, खरे तर, ज्या काळात भारतीय दंड संहिता तयार झाली त्या मागच्या शतकामध्ये असे लोकनियुक्त एम. एल. ए. हे पद अस्तित्वातच नव्हते व दंड संहिताकर्त्यांनी आणखी १०० वर्षांनी अशी परिस्थिती निर्माण होऊ शकेल असा दूरगामी विचारही केला नाही. त्यामुळे कलम २१ चा इतिहास व त्यात होत गेलेले बदल यांचा विचार करता १९६४ सालापर्यंत आमदारांचा लोकसेवकांचा संज्ञेत समावेश करण्यात आलेला नाही आणि त्यानंतर या विषयीच्या कायद्यात कोणताही बदल झालेला नाही. उलटपक्षी, संथानम समितीच्या शिफारशीनुसार मंत्रीवर्ग व संसद सचिवांचा या संज्ञेत अंतर्भाव करण्यात आला, मात्र आमदारांचा अंतर्भाव करण्यात आला नाही समितीने आमदारासाठी स्वतंत्र आचार संहिता (Code of Conduct) ठरवून दिली. त्यामुळे असे खात्रीपूर्वक म्हणण्यास हरकत नाही की, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार आमदार हा लोकसेवक नाही.

परंतु, आमदाराला त्याचे आमदार या नात्याने कार्य पार पाडण्यासाठी वेतन मिळते या गोष्टीचाही सर्वोच्च न्यायालयाने **एम. करुणानिधी वि. युनियन ऑफ इंडिया (१९७९) ३ एस. सी. आर. २५४: १९७९** स. न्या. ८९८ या खटल्यासंदर्भात विचार केला व 'वेतन' या शब्दाच्या अर्थाबाबत चर्चा केली. सर्वसाधारणपणे, वेतन घेणारी व्यक्ती व असे वेतन देणारी व्यक्ती यांच्यात नोकर–मालकाचा संबंध असतो. वेतन देणारी व्यक्ती कामाचा मोबदला म्हणून पारिश्रमिक किंवा वेतन देते पण त्याचबरोबर त्या व्यक्तीवर नियम किंवा अटीदेखील लादते. आमदाराला मिळणाऱ्या वेतनामुळे त्यांचा शासनाशी नोकर–मालक संबंध प्रस्थापित होत नाही.

किंबहुना, शासनाकडून असे वेतन घेतल्यानंतरदेखील शासनाच्या धोरणाबाबत टीका करण्याचे त्याचे स्वातंत्र्य अबाधितच राहते. त्यामुळे शासनाच्या सेवेत नसलेली शासनाच्या कोणत्याही कृतीला किंवा धोरणाला जबाबदार असणे आवश्यक नसलेली व शासनाबरोबर नोकर–मालक संबंध नसलेली अशी शासनाकडून वेतन किंवा पारिश्रमिक घेणारी व्यक्ती अशी आमदारांची सर्वसाधारण व्याख्या करता येईल. तो कार्यकारी शासनाचे (Executive Government) कोणतेही काम पार पाडत नाही, तर संविधानाने लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून त्याच्यावर सोपवलेली कामे पार पाडतो व अशा अधिकाराचा वापर करतो.

**(iv)** **कोणतीही न्यायविषयक कर्तव्ये, एकतर स्वत: किंवा कोणत्याही व्यक्तीच्या गटाचा सदस्य म्हणून पार पाडण्यासाठी कायद्याने अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तींसह कोणताही न्यायाधीश;**

**(v)** **न्यायदानाच्या संबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी, न्यायालयाने प्राधिकृत केलेली व अशा न्यायालयाने नेमलेली, समापक** (Liquidator) **प्रापक** (Receiver) **किंवा आयुक्त यांचा समावेश असलेली कोणतीही व्यक्ती;**

**(vi)** **न्यायालयाने किंवा सक्षम सार्वजनिक प्राधिकरणाने निर्णयासाठी किंवा ज्याच्याकडे कोणताही वाद किंवा प्रकरण संदर्भित केले असेल असा कोणताही लवाद** (Arbitrator) **किंवा कोणतीही व्यक्ती;**

**(vii)** **आपल्या पदाच्या नात्याने ज्या कोणत्याही व्यक्तीला मतदार याद्या तयार करणे, त्या प्रकाशित करणे, त्या बाळगणे किंवा त्यात सुधारणा करणे किंवा निवडणूक किंवा आंशिक निवडणूक घेणे यासंबंधीचे अधिकार देण्यात आले असतील अशी कोणतीही व्यक्ती;**

**(viii)** **आपल्या पदाच्या नात्याने जिला कोणतेही सार्वजनिक कर्तव्य पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले असेल किंवा त्यासाठी भाग पाडण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती;**

**(ix)** **केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा केंद्रीय, प्रांतिक किंवा राज्य अधिनियमाखाली किंवा त्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही महामंडळाकडून किंवा शासनाच्या मालकीचे किंवा शासनाचे नियंत्रण असलेले किंवा त्याकडून अर्थसहाय्य मिळणारे कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था यांच्याकडून किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ६१७ मध्ये व्याख्या दिलेल्या शासकीय कंपनीकडून कोणतेही अर्थसहाय्य प्राप्त करणाऱ्या किंवा प्राप्त केलेल्या अशा शेतकी, औद्योगिक, व्यापारी किंवा बँक व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत सहकारी संस्थेचा अध्यक्ष, सचिव किंवा पदाधिकारी असलेली कोणतीही व्यक्ती;**

**(x)** **कोणत्याही नावाने परिचित असलेल्या कोणत्याही सेवा आयोगाचा (Service Commission) किंवा मंडळाचा अध्यक्ष, सदस्य किंवा कर्मचारी असलेली कोणतीही व्यक्ती, किंवा कोणत्याही अशा आयोगाने किंवा मंडळाने कोणतीही परीक्षा घेण्यासाठी किंवा असा आयोग किंवा मंडळ यांच्या वतीने कोणतीही निवड करण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही निवड समितीचा सदस्य;**

**(xi)** **कुलगुरू किंवा विद्यापीठाच्या नियामक मंडळाचा (Governing Body) सदस्य असलेली किंवा कोणत्याही विद्यापीठाचा प्राध्यापक, प्रपाठक (Reader), अधिव्याख्याता (Lecturer) किंवा कोणताही इतर शिक्षक किंवा कोणत्याही पदावर काम करणारा कर्मचारी किंवा विद्यापीठाने किंवा कोणत्याही इतर सार्वजनिक प्राधिकरणाने परीक्षा घेण्यासाठी किंवा त्या पार पाडण्यासाठी यासंबंधात ज्याच्या सेवा घेतल्या असतील अशा व्यक्ती;**

**(xi)** **कोणत्याही प्रकारे स्थापन केलेल्या, केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा स्थानिक किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतीही आर्थिक मदत घेणाऱ्या किंवा घेत असलेल्या शैक्षणिक, वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा इतर संस्थेचा पदाधिकारी किंवा कर्मचारी असलेली कोणतीही व्यक्ती;**

**स्पष्टीकरण (१)–** उपरोक्त कोणत्याही उपखंडाखाली येणाऱ्या कोणत्याही व्यक्ती – मग त्यांना शासनाने नेमलेले असो किंवा नसो, लोकसेवक आहेत.

**स्पष्टीकरण (२)–** ''लोकसेवक'' या शब्दाचा वापर करण्यात येईल, अशा प्रत्येक ठिकाणी त्याचा अर्थ, लोकसेवकाचे पद प्रत्यक्षपणे धारण करत असेल अशी प्रत्येक व्यक्ती मग असे पद धारण करण्याच्या अधिकारात कोणतेही कायदेशीर दोष असोत असा असेल.

## टिप्पणी

या खंडामध्ये विधेयकामध्ये वापरण्यात आलेल्या संज्ञांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. खंड २ (c) मध्ये ''लोकसेवक'' याची व्याख्या देण्यात आली आहे. सध्या प्रचलित असलेल्या व्याख्येमध्ये अशा लोकसेवकाची नेमणूक करणाऱ्या व त्यास पारिश्रमिक देणाऱ्या प्राधिकरणावर भर देण्यात आला आहे. ''निवडणूक'' या शब्दाची व्याख्या, भारतीय दंड संहितेमध्ये या संज्ञेची व्याख्या जी देण्यात आली आहे, त्यावर आधारित आहे.

**कोणतीही व्यक्ती शासकीय अधिकारी आहे हे ओळखण्याची खरी कसोटी म्हणजे :** (१) ती शासनाच्या सेवेत आहे काय किंवा त्याच्याकडून वेतन घेते काय, हे पाहणे, आणि (२) कोणतेही सार्वजनिक कर्तव्य पार पाडण्याचे काम तिच्यावर सोपवले आहे काय, हे पाहणे, या दोन्हीबाबत खात्री झाली की, मग अशी व्यक्ती कोणत्या पदावर काम करते आहे, त्याचे स्वरूप काय आहे, ती पार पाडत असलेले काम फार मोलाचे आहे की किरकोळ स्वरूपाचे आहे, या गोष्टींना फारसे महत्त्व राहत नाही **(जी. ए. मॉंटेरिओ विरुद्ध अजमेर राज्य, ऑल इंडिया रिपोर्टर १९५७, सर्वोच्च न्यायालय १३).**

**लोकसेवक या संज्ञेचे विवेचन :** या अधिनियमाच्या कलम २ (c) मध्ये लोकसेवकाची व्याख्या दिलेली आहे. ही व्याख्या भारतीय दंड संहितेच्या कलम २१ मध्ये दिलेल्या व्याख्येप्रमाणे आहे. सर्वच सुसंस्कृत देशामध्ये लोकसेवकांचा एक विशेष वर्ग असतो. या वर्गास क्वचित कठोर अशी ही कर्तव्ये पार पाडावी लागतात व त्यासाठी त्यास विशेष असे अधिकार दिलेले असतात. साहजिकच अशा अधिकारांचा दुरुपयोग करणाऱ्या व्यक्तीसाठी तेवढ्याच कठोर शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे. सार्वजनिक कर्तव्य पार पाडतेवेळी अधिकारांचा दुरुपयोग करणाऱ्या व्यक्तींना कायद्याच्या कक्षेत आणून त्यांच्यासाठी या अधिनियमामध्ये निरनिराळ्या शिक्षांची तरतूद केली आहे.

कोणतीही व्यक्ती लोकसेवक असण्यासाठी प्रथम सेवक असणे आवश्यक आहे. म्हणजेच ती कोणत्यातरी पदावर नेमली गेली असली पाहिजे. अशा पदावर काम करण्यासाठी तिला पारिश्रमिक किंवा वेतन मिळत असो किंवा ती ते त्या पदाचे कर्तव्य मानार्थ (Honorary) पार पाडत असो, त्या कर्तव्यासाठी ती जबाबदार असते. याच कारणास्तव न्यायालयाने तहसील कार्यालयामध्ये विना–वेतन काम करणाऱ्या शिकाऊ उमेदवाराला लोकसेवक असल्याचे घोषित केले. **(सुब्रमनिया वि. सोमसुंदर इंडि. लॉ. रिपोर्टर २१ मद्रास ४२८)** मात्र एखाद्याच्या विनंतीवरून कोणत्याही पारिश्रमिकाशिवाय केवळ मदत करणारी व्यक्ती लोकसेवक असणार नाही. कायद्याच्या अर्थानुसार कोणतीही व्यक्ती, मग ती पारिश्रमिक घेत असो किंवा नसो, तिने कोणतेतरी पद भूषविले पाहिजे. **(हरविलास वि. क्राऊन ए. आय. आर. १९५० ई.पी. १६७ : ५ टी.एल.आर. (सिमला) १०४)** अशा नेमलेल्या व्यक्तींची नियुक्ती स्पष्टीकरण १ मध्ये दिल्याप्रमाणे शासनानेच केली असली पाहिजे असे नाही.

शासनाच्या सेवेत असलेल्या किंवा शासनाकडून वेतन किंवा पारिश्रमिक घेणाऱ्या व्यक्ती पोट–कलम (c) (i) च्या कक्षेत येतात. शासनाच्या सेवेत असणाऱ्या व्यक्तींना, त्या पार पाडत असलेल्या कामाचा मोबदला म्हणून वेतन किंवा पारिश्रमिक मिळू शकते. परंतु शासनाकडून वेतन किंवा पारिश्रमिक घेणाऱ्या व्यक्ती शासनाच्या सेवेत असल्याचे पाहिजेत असे नाही. त्यामुळे शासनाकडून वेतन घेणाऱ्यांचा एक स्वतंत्र वर्ग तयार होतो. शासनाच्या सेवेत असलेल्या व्यक्तीचे जसे शासनाशी मालक–सेवक

असे नाते असते त्याप्रमाणे मालक–सेवकाचे नाते केवळ शासनाकडून वेतन घेणाऱ्या व्यक्तींच्या संबंधात निर्माण होत नाही. **(रामदास नायक विरुद्ध ए. आर. अंतुले., ए. आय. आर. १९८४ स. न्या. ६८४ इ.)** करुणानिधी विरुद्ध भारतीय महासंघ (Union of India) या खटल्यामध्ये ही **(ए. आय. आर. १९७९ स. न्या. ८९८ इ.)** मान्यवर न्यायमूर्तींनी असा अभिप्राय दिला की, ''शासनाकडून वेतन घेणे'' या संज्ञेचा अर्थ असा पैसा स्वीकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत तिचे शासनाशी नोकर–मालकाचे संबंध असलेच पाहिजेत असे नाही.

या पोट–कलमामध्ये शासन या संज्ञेचा जो वापर केला आहे, त्याचा अर्थ, सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९३७ च्या कलम ३ (२३) प्रमाणे केंद्र तसेच राज्य शासन असा आहे. तसेच या कलमातील शासन ही संज्ञा कार्यकारी शासन (Executive Government) या अर्थी आहे; विधानमंडळ या अर्थी नाही. त्यामुळे कोणताही आमदार हा कार्यकारी शासनकडून कोणतेही वेतन घेत नसल्यामुळे तो ''लोकसेवक'' ठरणार नाही. तसेच नगरपालिकेचे नगरसेवकदेखील या खंडाच्या अर्थांतर्गत लोकसेवक असणार नाहीत, परंतु मुख्यमंत्री किंवा मंत्रिमंडळातील सदस्यमंत्री यांना हे लागू नाही. करुणानिधी विरुद्ध भारतीय महासंघ या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा **(ए. आय. आर. १९७९ स. न्या. ८७८)** दिला की,

(१) मुख्यमंत्री हा संविधानाच्या अनुच्छेद १६६७ (a) ते (c) च्या कक्षेत येणारे सार्वजनिक कर्तव्य पार पाडतो;

(२) मुख्यमंत्री किंवा मंत्रीवर्ग, ते पार पाडत असलेल्या सेवेचा मोबदला म्हणून वेतन किंवा भत्ते मिळविण्यास हक्कदार असतात; आणि

(३) मुख्यमंत्री किंवा मंत्रीवर्गाला देण्यात येणारे वेतन शासनाच्या निधीमधून देण्यात येते म्हणून मुख्यमंत्री किंवा इतर मंत्रीवर्ग यांचा भारतीय दंडसंहिता, कलम २१ (१२) (a) अन्वये ''शासनाकडून वेतन प्राप्त करणारे'' ठरतात. याच अर्थाने ते अन्य लोकसेवकांप्रमाणे लोकसेवक आहेत.

अशाच प्रकारे स्थानिक प्राधिकरण, शासकीय कंपनी यांच्याकडून पारिश्रमिक किंवा वेतन घेणाऱ्या व त्यांच्या सेवेत असलेल्या व्यक्ती या लोकसेवक ठरतात. याच अर्थाने, हेवी इलेक्ट्रिक्स (इंडिया) लिमिटेड या शासकीय कंपनीतील कर्मचारी हे लोकसेवक ठरतात.

या कलमाच्या अर्थांतर्गत सर्व न्यायाधीश हे लोकसेवक ठरतात व पंचायतीचे सरपंच हे मर्यादित अर्थाने न्यायदानाचे काम करीत असल्याने, ते न्यायाधीश या संज्ञेत येतात व लोकसेवक ठरतात. तसेच न्यायदानाशी संबंधित असलेल्या नाझीर किंवा मुकादम यासारख्या व्यक्तीही लोकसेवक ठरवतात.

कलम २ (c) जोडलेल्या स्पष्टीकरणानुसार जेव्हा एखादा नियुक्ती प्राधिकारी लोकसेवकाला सेवेतून कमी करत असेल अशा वेळी तो लोकसेवक राहत नाही, परंतु, निलंबित लोकसेवक हा मात्र लोकसेवक राहतो. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर कोणतेही काम पार पाडण्याचे दायित्व नसल्यामुळे तो सेवानिवृत्तीनंतर लोकसेवक असण्याचे बंद होते. मात्र, पश्चिम बंगाल राज्य वि. मनमल (क्रिमि. लॉ जर्नल ११६४) मात्र या प्रकरणाच्या संबंधात सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की, जर अशा लोकसेवकाने तो निवृत्त होण्यापूर्वी कोणतेही भ्रष्टाचाराचे कृत्य केले असेल तर त्याच्यावर या अधिनियमांच्या कलम ५ खाली खटला भरला जाण्यास, त्याची सेवानिवृत्ती, राजीनामा किंवा बडतर्फी यामुळे कोणतीही आडकाठी येत नाही.

## प्रकरण दोन

## विशेष न्यायाधीशांची नियुक्ती

### ३. विशेष न्यायाधीश नियुक्त करण्याचा अधिकार :–

(१) केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला राजपत्रामध्ये अधिसूचना प्रसिद्ध करून, पुढे दिलेल्या अपराधांबाबतचे खटले चालवण्यासाठी अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी किंवा यथास्थिती, अशा प्रकरणासाठी किंवा एकत्र प्रकरणांसाठी, आवश्यक तेवढ्या न्यायाधीशांची नियुक्ती करता येईल, ते अपराध म्हणजेच––

(a) या अधिनियमाखाली शिक्षायोग्य असा कोणताही अपराध, आणि

(b) खंड (a) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांपैकी कोणताही अपराध करण्याचा कोणताही कट कोणताही प्रयत्न किंवा अपराधास कोणतेही प्रोत्साहन.

(२) कोणतीही व्यक्ती, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) या अन्वये, सत्र न्यायाधीश किंवा सहाय्यक सत्र न्यायाधीश असल्याखेरीज या अधिनियमान्वये विशेष न्यायाधीश म्हणून नेमली जाण्यास पात्र असणार नाही.

**टीप**

या खंडामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासन या दोन्हींद्वारे विशेष न्यायाधीशांच्या नियुक्तीची तरतूद केलेली आहे. विशेष न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या संबंधात केंद्र शासनाकडे निहित असलेल्या अधिकाराचा भाग सोडला तर, हा खंड फौजदारी विधी (सुधारणा) अधिनियम, १९५२ यावर आधारित आहे.

**कलम ३ चे विवेचन**

या कलमाने राज्य तसेच केंद्र शासनाला विशिष्ट क्षेत्रासाठी किंवा विशिष्ट खटल्यांसाठी किंवा खटल्यांसाठी आवश्यक त्या संख्येत न्यायाधीश नियुक्त करण्याचे अधिकार दिले आहेत. निरसित केलेल्या फौजदारी विधी (सुधारणा) अधिनियम, १९५२ अनुसार विशिष्ट क्षेत्रासाठी न्यायाधीश नियुक्त करता येत होते. विशिष्ट खटल्यासाठी मात्र नियुक्त करता येत नव्हते. मात्र या अधिनियमात तशी जाणीवपूर्वक तरतूद केली आहे. कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराधांचा त्वरेने न्यायनिवाडा करता यावा या हेतूने ही तरतूद केलेली आहे.

या अधिनियमाच्या कलम ३ (१) मध्ये केंद्र किंवा शासनाला नियुक्त करता येतील (may appoint special judges) असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. याबाबत निर्णय देताना न्यायमूर्तींनी ''करता येईल'' या शब्दप्रयोगाचा अर्थ ''करावा'' किंवा'' करणे विधीसंमत असेल'' असा असल्याचे प्रतिपादन केले . **स्टेट विरुद्ध सुरज देव** या प्रकरणात न्यायालयाने **(एआयआर १९५४ पाटना ८० १५४ क्रिमि. जर्नल १३९)** '' करता येईल'' या शब्दप्रयोगाचा अर्थ ''केले पाहिजे'' असा असल्याचा निर्णय दिला.

विशेष न्यायाधीशाची नियुक्ती करताना, अधिसूचनेद्वारे कोणत्या क्षेत्रासाठी अशा न्यायाधीशाची नियुक्ती करण्यात आली आहे ही बाब निर्दिष्ट करावी लागते. विशेष न्यायाधीशाची अधिकारिता निश्चित झाली की विशिष्ट क्षेत्रासाठी असलेला खटला त्याच न्यायाधीशाच्या अधिकारितेत चालवावा. लागतो., हा खटला त्या क्षेत्राच्या अधिकारितेबाहेर स्थानांतरित करता येत नाही.

विशेष न्यायाधीशांच्या अधिकारिता केवळ लोकसेवकांविरुद्धचे खटले चालवण्यापुरती मर्यादित असते. ज्याच्याविरुद्ध खटला चालवण्यात येत असेल अशी व्यक्ती लोकसेवक नाही हे ज्या क्षणी सिद्ध होईल त्या क्षणी अशा विशेष न्यायाधीशाची असा खटला चालवण्याच्या संबंधातली अधिकारिता संपुष्टात येते. लोकसेवक नसलेल्या व्यक्तींनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या अपराधासंबंधीचे खटले भारतीय दंड संहितेच्या कलम १६२ व १६५–A याखाली चालवण्यात येतात.

विशेष न्यायाधीशाला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९० खालील खटले चालवण्याचा अधिकार आहे काय?

हा प्रश्न **ए. आर. अंतुले, वि. रामदास नायक (एआयआर १९८४ स. न्या. ७१८ : क्रिमि. लॉ जर्नल ६४७ : १९८४ एससीसी (क्रमि) २७७),** या मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात केलेल्या विनंतीअर्जाच्या संदर्भात निर्माण झाला. या प्रश्नासंबंधात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, विशेष न्यायाधीशाचे न्यायालय हे मूळ फौजदारी अधिकारिता असलेले न्यायालय आहे. त्यामुळे अशा न्यायालयाचे कार्य हेतूप्रधान असल्यामुळे अशा न्यायालयांची ज्या संविधींनुसार (statute) स्थापना करण्यात येते, त्याद्वारे त्यांना काही अधिकार देण्यात आलेले आहेत. असे विशेषरीत्या देण्यात आलेले व विशेषरीत्या नाकारण्यात आलेले अधिकार सोडले तर, हे न्यायालय केवळ मूळ फौजदारी अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून काम पार पाडते. त्यामुळे अशा न्यायालयाला जे अधिकार विशेषरीत्या नाकारण्यात आले आहेत ते वगळता फौजदारी स्वरूपाचे खटले चालवण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे लोकसेवकाविरुद्ध खासगी व्यक्तीने केलेल्या तक्रारीची अशा न्यायालयांनी दखल घेणे कायदेशीर आहे.

**४. विशेष न्यायाधीशांकडून खटले चालवण्याजोगी प्रकरणे :–**

(१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २ ) यामध्ये किंवा त्या–त्या वेळी अंमलात असलेला कोणताही इतर कायदा यामध्ये अंतर्भूत असले तरीही, कलम (३) च्या पोट–कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांबाबतचे खटले केवळ विशेष न्यायाधीशांकडून चालवण्यात येतील.

(२) कलम (३) च्या पोट–कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला प्रत्येक अपराध, असा अपराध ज्या क्षेत्रामध्ये घडला त्या क्षेत्रासाठी नेमलेल्या विशेष न्यायाधीशाद्वारे किंवा या प्रकरणासाठी नेमलेल्या विशेष न्यायाधीशाद्वारे किंवा अशा क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक विशेष न्यायाधीश नेमले असतील अशा बाबतीत, केंद्र शासनाच्या वतीने नियुक्त करण्यात येईल अशा विशेष न्यायाधीशाकडून चालवण्यात येतील.

(३) कोणताही असा खटला चालवत असताना, विशेष न्यायाधीशास, आरोपीवर, फौजदारी प्रक्रिया संहिता. १९७३ (१९७४ चा २) अन्वये त्याच खटल्यामध्ये आरोप करता येईल अशा, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाखेरीजच्या इतर अपराधांबद्दल खटला चालवता येईल.

**(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असलेले तरीही, विशेष न्यायाधीश, शक्य तेथवर, अपराधांबाबतचे खटले दैनंदिन तत्त्वावर चालवतील.**

### टिप्पणी

या खंडामध्ये विशेष न्यायाधीशांकडून चालवण्याजोग्या खटल्यांच्या संबंधात विवरण दिले आहे. या खंडाच्या उपखंड (४) मध्ये त्वरित निकालात निघण्याच्या दृष्टीने विशेष न्यायाधीशांनी दैनंदिन तत्त्वावर खटले चालवण्याची तरतूद केली आहे. या खंडातील इतर तरतुदी, फौजदारी विधी सुधारणा अधिनियम, १९५२ यांच्या कलम (७) वर आधारित आहेत.

### कलम ४ चे विवेचन

काही विवक्षित प्रकरणे शक्य तेवढ्या त्वरेने निकालात काढण्याचा हेतू कलम ४ मधील तरतुदीमागे आहे. विशेष न्यायाधीशांच्या नियुक्त्यादेखील त्याच हेतूने करण्यात आलेल्या आहेत. कलम ३ च्या पोट–कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपराधासंबंधीचे खटले केवळ विशेष न्यायाधीशापुढेच चालवले जाऊ शकतात, दंडाधिकाऱ्याचे न्यायालय त्याची कोणतीही दखल घेऊ शकत नाही, अशी या कलम ४ (१) मध्ये तरतूद केलेली आहे.

एखाद्या विवक्षित क्षेत्रासाठी जर एकापेक्षा अधिक विशेष न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली असेल तर अधिसूचनेमध्ये,

कोणता खटला कोणत्या न्यायाधीशापुढे चालवण्यात येईल हे विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशी कलम ४ (२) मध्ये तरतूद केली आहे. म्हणजेच कोणत्याही न्यायाधीशाला, जर विशिष्ट क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक विशेष न्यायाधीश नियुक्त करण्यात आलेले असतील तर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या खटल्याखेरीज अन्य खटला चालवण्याची अधिकारिता असणार नाही.

मात्र, विशेष न्यायालयापुढे चालू असलेला खटला उच्च न्यायालयाकडे सोपविण्याचा सर्वोच्च न्यायालयाला अधिकार आहे. **रामदास नायक विरुद्ध भूतपूर्व मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, श्री. अंतुले,** या प्रकरणात पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने या प्रकरणातील दोन विशेष खटले उच्च न्यायालयाकडे सोपविले या ठिकाणी, या अधिनियमांन्वये केवळ विशेष न्यायाधीशांद्वारेच चालविता येतील असे खटले उच्च न्यायालयाकडे सोपविता येतात का, असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला, न्यायमूर्ती सव्यसाची मुखर्जी यांनी ''विशेष न्यायालयाकडील प्रकरण उच्च न्यायालयाकडे सोपविण्यासाठी कायद्याची संमती नाही, कारण असा खटला चालविण्यासाठी उच्च न्यायालयाला अधिकारिता नाही'' असा अभिप्राय व्यक्त केला. यावर न्यायमूर्ती व्यंकटाचलय्या यांनी असे भाष्य केले की, ''खटला अशाप्रकारे उच्च न्यायालयाकडे हस्तांतरित करणे कायद्याच्या विरुद्ध नाही. त्यामुळे संविधानाच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन होत नाही, उलटपक्षी अशा प्रकारे खटला हस्तांतरित करण्यामुळे आरोपी व्यक्तीस उचित न्याय मिळण्याची शक्यता अधिक वाढते,''

मात्र, एका विशेष न्यायाधीशांपुढे प्रलंबित असलेला विशेष खटला दुसऱ्या न्यायाधीशांकडे सोपविण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला नाही. तसेच विशेष न्यायाधीशाची एखाद्या विशिष्ट क्षेत्रासाठी नेमणूक करता येते, विशेष खटल्यासाठी नाही.

कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधासंबंधीचा खटला चालवते वेळी अनुषंगिक अपराधांसंबंधीचाही खटला चालवण्याचा अधिकार कलम ४ (३) द्वारे विशेष न्यायाधीशास दिलेला आहे. मात्र, एखाद्या आरोपीविरुद्ध कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाखेरीजचा खटला चालवते वेळी न्यायाधीशाकडे प्रथम कलम (३) खालील खटला असावयास पाहिजे, कोणत्याही विशेष न्यायाधीशास कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट न केलेल्या अपराधांच्या संबंधातील कोणताही स्वतंत्र खटला चालवण्याची अधिकारिता नाही.

फौजदारी प्रक्रिया संहिता याच्या कलम ५४९ खालील नियमांचे पालन झाले नाही या कारणांवरून एखादा विशेष न्यायाधीश विशिष्ट खटला चालविण्यासाठी सक्षम नाही असा आक्षेप अन्वीक्षा न्यायालयांमध्ये (trial Court) घेणे आवश्यक आहे, न्यायाधीशाच्या अधिकारितेसंबंधीचा आक्षेप तात्काळ नोंदविणे आवश्यक असते, एखाद्या क्षेत्रासाठी एकापेक्षा अधिक न्यायाधीश नियुक्त केले असतील आणि विशेष न्यायाधीशाच्या अधिकारितेसंबंधी आक्षेप असेल तर जर असा आक्षेप खटला चालू असताना घेण्यात आला नाही तर तो अपिलाच्या वेळी घेता येत नाही **(राजस्थान राज्य वि. (डॉ.) जे. पी. शर्मा, १९८३ क्रिमि. लॉ. जर्नल ७५८. : १९८२ राजस्थान फौजदारी खटला २५२ इ.)**

**५. विशेष न्यायाधीशांची कार्यपद्धती आणि अधिकार :–**

(१) विशेष न्यायाधीशाला, आरोपीला त्याच्यापुढे खटल्यासाठी दाखल केले जाण्यापूर्वीच अपराधांची दखल घेता येईल आणि आरोपी व्यक्तीवरील खटला चालवतेवेळी तो, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) या अन्वये दंडाधिकाऱ्यांना अधिपत्राचे खटले चालविण्यासाठी जी कार्यपद्धती नेमून दिली आहे त्या कार्यपद्धतीचे अनुसरण करील.

(२) विशेष न्यायाधीशाला, अपराधाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंध असलेल्या किंवा त्यात सहभागी असल्याचे मानलेल्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष मिळविण्यासाठी, अशा व्यक्ती, अपराधासंबंधी तिला माहीत असलेली संपूर्ण परिस्थिती संपूर्णपणे व खरेपणाने ती उघड करील या शर्तीवर त्या व्यक्तीला आणि अपराधाशी संबंधित अशा प्रत्येक व्यक्तीला मग ती व्यक्ती प्रत्यक्ष अपराध करणारी असो, की चिथावणी देणारी असो, त्यापासून माफी देता येईल आणि अशाप्रकारे दिलेली कोणतीही माफी

ही, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम ३०८, पोट–कलम (१) ते (५) याच्या प्रयोजनासाठी, त्या संहितेच्या कलम ३०७ अन्वये देण्यात आलेली माफी असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट–कलम (१) किंवा पोट–कलम (२) यामध्ये केलेल्या तरतुदीव्यतिरिक्त, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यातील तरतुदी या, त्या जेथवर अधिनियमाशी विसंगत नसतील तेथवर, विशेष न्यायाधीशापुढील कार्यवाहीस लागू होतील आणि उक्त तरतुदींच्या प्रयोजनासाठी, विशेष न्यायाधीशांचे न्यायालय हे सत्र न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि विशेष न्यायाधीशांपुढे खटला चालवणारी व्यक्ती ही सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल.

(४) विशेषतः आणि पोट–कलम (३) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलमे ३२६ व ४७५ यांतील तरतुदी या जेथवर त्या विशेष न्यायाधीशांपुढील कार्यवाहीस व उक्त तरतुदींना लागू होत असतील तेथवर, विशेष न्यायाधीश हे दंडाधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(५) विशेष न्यायाधीश, त्याने ज्यास सिद्धापराधी ठरवले असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या अपराधासाठी ती व्यक्ती दोषी ठरविण्यात आली आहे त्या अपराधासाठी कायद्याद्वारे प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

(६) या अधिनियमान्वये शिक्षा देण्याजोग्या अपराधाबाबतचा खटला चालवताना, विशेष न्यायाधीश, फौजदारी विधी सुधारणा अध्यादेश, १९४४ (१९४४ चा अध्यादेश क्रमांक ३८) याखालील जिल्हा न्यायाधीशाने वापरण्यायोग्य सर्व अधिकारांचा वापर करील व त्याची सर्व कामे पार पाडील.

## टिप्पणी

या खंडामध्ये विशेष न्यायाधीशाची कार्यपद्धती व अधिकार यांचे विवरण दिले आहे, या खंडाच्या उपखंड (६) द्वारे संपत्ती जप्त करण्याच्या प्रयोजनासाठी, फौजदारी विधी सुधारणा अध्यादेश, १९४४ याखालील जिल्हा न्यायाधीशाद्वारे वापरण्यात येणारे अधिकार विशेष न्यायाधीशाकडे सोपवले आहेत. या खंडातील उरलेल्या तरतुदी या फौजदारी विधी सुधारणा अधिनियम, १९५२ याच्या कलम ८ च्या तरतुदींवर आधारित आहेत.

## कलम ५ चे विवेचन

या अधिनियमामध्ये ''विशेष न्यायाधीश'' असा ज्यांचा उल्लेख करण्यात येतो ते विशेष न्यायाधीश, सत्र न्यायाधीशांच्याच दर्जाचे असतात. फक्त ते वेगळ्या प्रकारचे खटले चालवतात, एवढेच, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या इतर तरतुदी या दोघांनाही लागू आहेत. कोणताही विशेष न्यायाधीश हा सत्र न्यायाधीश किंवा अपर (additional) सत्र न्यायाधीश किंवा सहायक सत्र न्यायाधीश असल्याखेरीज त्याची विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात येत नाही, हे खरे असले तरी तो सत्र न्यायाधीश असत नाही, कारण कोणत्याही आरोपीला त्याच्यापुढे दाखल करण्यापूर्वी त्याला कलम ५ (१) अन्वये त्याच्या अपराधांची दखल घेता येते, तर सत्र न्यायाधीश, त्याच्यापुढे आरोपी दाखल झाल्यानंतरच आरोपांची दखल घेऊ शकतो.

कलम ५ (१) मध्ये विशेष न्यायाधीशाला, आरोपीला त्याच्यापुढे दाखल करण्यात येण्यापूर्वी अपराधांची दखल घेण्याचे अधिकार दिले आहेत, परंतु या पोट–कलमामध्ये, अपरांधाची दखल घेण्यासाठी केवळ पोलिसांद्वारे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १७३ (२) अन्वये सादर करण्यात आलेल्या अहवालाचाच आधार घ्यावा, असे म्हटले नाही. फौजदारी प्रक्रिया संहितेप्रमाणे, अपराधाची चार प्रकारे दखल घेता येते, १. तक्रार केल्यावरून, २, पोलीस अधिकाऱ्याच्या अहवालावरून, ३, दंडाधिकाऱ्याला स्वतःलाच अपराध घडल्यासंबंधीच्या माहिती कळल्यावरून, आणि ४. अपराध्याला त्याच्यापुढे दाखल केल्यावरून, फौजदारी प्रक्रिया संहितेतील या तरतुदी, विशेष न्यायालयांचा दर्जा लक्षात ठेवून त्यास लागू कराव्या लागतील, कलम ५ (३) अनुसार विशेष न्यायालयाला फौजदारी न्यायालयाचा दर्जा असतो व कलम दोन अनुसार ते उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असते. त्यामुळे खटला चालवण्यासाठी त्यास अपराधांची दखल घ्यावीच लागते.

कलम ५ (२) अनुसार विशेष न्यायाधीशांना विशिष्ट परिस्थितीत माफी देण्याचे अधिकार दिले आहेत. खटला सुरू झाल्यापासून तो संपेपर्यंत केव्हाही अशी माफी देता येते, माफी मिळवण्यासाठी अभियोगी पक्षाने न्यायालयाला विनंती केली पाहिजे असेही नाही. आरोपीने आरोपाच्या संबंधातील सर्व तथ्ये उघड करण्याचे मान्य केल्यास तशी माफी देण्याचे अधिकार विशेष न्यायालयास असतात.

**६. खटला संक्षिप्त रीतीने चालवण्याचा अधिकार :–**

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ३, पोट–कलम (१) यामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही विशेष आदेशाचे किंवा त्या कलमाचे पोट–कलमाचे पोट–कलम (२), खंड (a) यामध्ये उल्लेख केलेल्या आदेशाचे उल्लंघन करण्याच्या संबंधात, कलम ३, पोट–कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, लोकसेवकाने केला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल विशेष न्यायाधीश खटला चालवत असेल तेव्हा या अधिनियमाच्या कलम ५, पोट–कलम (१) यामध्ये किंवा भारतीय दंड संहिता, १९७३ (१९७४ चा २) कलम २६० यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, विशेष न्यायाधीश हा खटला संक्षिप्तपणे चालवील आणि उक्त संहितेच्या कलमे २६१ ते २६५ (दोन्हीही समाविष्ट) यांतील तरतुदी शक्य तेथवर, अशा खटल्यास लागू होतील :

परंतु या कलमाखालील संक्षिप्त खटल्यामध्ये कोणताही अपराध सिद्ध झाल्यास, त्या बाबतीत, विशेष न्यायाधीशाने एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही एवढ्या मुदतीची शिक्षा देणे कायदेशीर असेल :

आणखी असे की, कलमाखालील संक्षिप्त खटला सुरू होण्याच्या वेळी किंवा तो चालू असताना, विशेष न्यायाधीशास असे वाटले की, या खटल्याचे स्वरूप असे आहे की, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीची कारावासाची शिक्षा द्यावी लागेल किंवा इतर कोणत्याही कारणासाठी हा खटला संक्षिप्तपणे चालवणे हिताचे नाही तर, विशेष न्यायाधीश, दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, तशा आशयाचा आदेश नोंदवील आणि त्यानंतर, ज्यांची तपासणी झाली आहे अशा कोणत्याही साक्षीदारांना बोलवील आणि उक्त संहितेद्वारे, दंडाधिकाऱ्यांनी अधिपत्र खटले चालवण्यासाठी विहित केलेल्या कार्यपद्धती अनुसार खटल्याची सुनावणी किंवा फेरसुनावणी सुरू करील.

(२) या अधिनियमामध्ये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये कोणतीही विरुद्ध बाब अंतर्भूत असली तरीही, एक महिन्यापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दोन हजार रुपयांपासून अधिक नसेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा विशेष न्यायाधीशाने या कलमाखाली संक्षिप्तरीत्या खटला चालवून दिली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, अशा शिक्षेच्या आदेशाखेरीज, उक्त संहितेच्या कलम ४५२ अन्वये आदेश काढला असेल किंवा नसेल तरीही, गुन्हा शाबीत झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अपील करता येणार नाही. परंतु, विशेष न्यायाधीशाने पूर्वोत्व मर्यादेपेक्षा अधिक होणारी शिक्षा दिली असता अपील करता येईल.

**टीप**

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम १२–A च्या पोट–कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही विशेष आदेशांच्या किंवा त्या आदेशाच्या पोट–कलम (२), खंड (a) मध्ये निर्दिष्ट केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याच्या संबंधात, कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही अपराध लोकसेवकांनी केला असता विशेष न्यायाधीशाला अशा अपराधाचा खटला संक्षिप्त रीतीने चालविण्यासंबंधीचे अधिकार या खंडाद्वारे देण्यात आले आहेत. हा खंड फौजदारी विधी संशोधन अधिनियम, १९५२ याच्या कलम ८–A वर आधारित आहे.

## प्रकरण तीन

## अपराध आणि शास्ती

### ७. लोकसेवकाने, त्याच्या पदाच्या नात्याने आवश्यक असलेले काम पार पाडण्यासंबंधात कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज (Legal Remuneration) इतर परितोषण (gratification) घेणे :–

जी कोणतीही व्यक्ती लोकसेवक असेल किंवा लोकसेवक होण्याची जिची अपेक्षा असेल अशी व्यक्ती, केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण, महामंडळ किंवा कलम २ च्या खंड (c) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शासकीय कंपनी यांच्या संबंधात किंवा कोणताही लोकसेवक – मग तो नामप्राप्त असो किंवा इतर प्रकारचा असो – याच्या संबंधात, तिच्या पदाच्या नात्याने करणे आवश्यक असलेले काम करण्याबद्दल किंवा ते करण्यापासून परावृत्त होण्याबद्दल किंवा ती आपल्या पदाचे काम पार पाडत असताना कोणत्याही व्यक्तीवर कोणताही अनुग्रह करण्याबद्दल किंवा अनुग्रह करण्यापासून परावृत्त होण्याबद्दल किंवा अवकृपा दाखवण्याबद्दल किंवा अवकृपा दाखवण्यापासून परावृत्त होण्याबद्दल किंवा कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही काम पार पाडण्याबद्दल किंवा पार पाडण्याचा प्रयत्न करण्याबद्दल किंवा तिला अपाय पोचवण्याबद्दल किंवा अपाय पोचवण्याचा प्रयत्न करण्याबद्दल प्रलोभन म्हणून किंवा बक्षीस म्हणून, कोणत्याही व्यक्तीकडून कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज इतर कोणत्याही प्रकारचे परितोषण, स्वत:साठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी स्वीकारील, प्राप्त करील ती सहा महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या परंतु ज्यात पाच वर्षांपर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल, तसेच द्रव्यदंडासही पात्र असेल.

**स्पष्टीकरणे :–** (a) ''लोकसेवक होण्याची अपेक्षा असलेली व्यक्ती.''

अधिकाराच्या पदावर येणे अपेक्षित नसलेल्या व्यक्तीने जर, ती अशा अधिकाराच्या पदावर येण्याची शक्यता आहे, व त्यानंतर ती त्यांचे काम करू शकेल, असे इतरांस भासवून परितोषण मिळवले तर, ती व्यक्ती फसवणूक केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरू शकेल, परंतु ती या कलमामध्ये व्याख्या केलेल्या अपराधासाठी दोषी असणार नाही.

(b) **''परितोषण.'':–** ''परितोषण'' हा शब्द पैशाच्या स्वरूपातील परितोषणापुरता किंवा ज्याचे पैशात मूल्य करता येईल अशा परितोषणापुरता मर्यादित नाही.

(c) **कायदेशीर पारिश्रमिक :–** ''कायदेशीर पारिश्रमिक'' हे शब्द, ज्यांसाठी लोकसेवक कायद्याने मागणी करू शकतो अशा पारिश्रमिकापुरता मर्यादित नाही तर, तो ज्या ठिकाणी सेवा करीत असेल अशा शासनाने किंवा संघटेनेने जे स्वीकारण्याची त्यास परवानगी दिली असेल अशा सर्व प्रकारच्या पारिश्रमिकाचा त्यात समावेश असेल.

(d) **काम पार पाडण्यासाठी प्रलोभन किंवा बक्षीस :–** या संज्ञेमध्ये, जे काम करण्याचा त्याचा उद्देश नाही, किंवा ते काम करण्याच्या तो स्थितीत नाही किंवा जे काम त्याने केलेले नाही अशा कामाबद्दल प्रलोभन किंवा बक्षीस स्वीकारणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो.

(e) जेव्हा एखादा लोकसेवक, शासनाकडे त्याचे वजन असल्यामुळे त्या व्यक्तीवर त्याला हक्क प्राप्त झाला आहे यावर विश्वास ठेवण्यासाठी तिला चुकीने प्रवृत्त करत असेल, आणि त्या सेवेसाठी बक्षीस म्हणून पैशाच्या स्वरूपातील किंवा इतर कोणतेही परितोषण देण्यासाठी भाग पाडत असेल तेव्हा त्याची ही कृती या कलमाखाली अपराध ठरते.

### कलम ७ चे विवेचन

या कलमान्वये पैसे स्वीकारणे हा गुन्हा नाही, तर बेकायदेशीर काम पार पाडण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षीस म्हणून पैसे स्वीकारणे हा गुन्हा आहे. (बछेलाल वि. रेक्स, १९५० ए.एल.जे.५७). तसेच, या कलमामध्ये लोकसेवकाने परितोषणे किंवा लाच

स्वीकारणे याविरुद्ध शिक्षेची तरतूद केली आहे. लाच देणारी व्यक्ती या कलमाखाली शिक्षेस पात्र नव्हती. लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल तिच्या विरुद्ध भारतीय दंड प्रक्रिया संहिता, कलम १०९ खाली खटला भरता येत होता. आता कलम १२ अन्वये अशा शिक्षेची तरतूद केली आहे.

या कलमाखाली अपराधी ठरण्यासाठी लोकसेवकाने प्रत्यक्षपणे लाच स्वीकारली पाहिजे असे नाही, किंवा ज्यासाठी लाच मागण्यात आली आहे तो गुन्हा प्रत्यक्षपणे केलाच पाहिजे असे नाही, किंवा जे काम करण्यासाठी त्याने लाच मागितली असेल ते काम करण्याचा त्याला अधिकार असला पाहिजे असेही नाही. केवळ तोंडी सौदा केला असेल किंवा लोकसेवकाने एखादे अवैध काम करण्याचे मान्य केले असेल तरीही तो अपराधी ठरू शकतो. रामदास नायक वि. ए. आर. अंतुले या प्रकरणात (ए.आय.आर. १९८६ स.न्या. २०४५) न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा यांनी असे प्रतिपादन केले की,

(१) अपराधी व्यक्ती लोकसेवक असेल;

(२) तिने वैध पारिश्रमिकाखेरीज कोणतेही अन्य परितोषण कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारले असेल; आणि

(३) हे परितोषण कोणतेही कार्यालयीन काम पार पाडण्याच्या फलस्वरूप किंवा कोणत्याही व्यक्तीवर कोणताही अनुग्रह दाखवण्यासाठी किंवा अवकृपा दाखवण्यासाठी प्राप्त केले असेल, तर तो या कलमाखाली अपराधी ठरू शकतो.

या कलमांमध्ये लोकसेवकांचे दोन प्रवर्ग दाखवले आहे.

(१) अशा व्यक्ती ज्या लोकसेवक आहेत, आणि २ अशा व्यक्ती ज्यांना लोकसेवक होण्याची अपेक्षा आहे. पहिल्या प्रवर्गातल्या व्यक्ती कलम २ मध्ये विशद केल्या आहेत. ज्यांना लोकसेवक होण्याची अपेक्षा आहे किंवा तसे त्या होऊ शकतात असे भासवून जर त्यांनी, त्या लोकसेवक झाल्यानंतर कोणतेही काम पार पाडण्यासाठी लाच स्वीकारली आणि त्या व्यक्ती लोकसेवक झाल्या नाहीत तर त्या या कलमाखाली गुन्हेगार ठरत नाहीत; मात्र त्यांच्यावर भारतीय दंड प्रक्रिया संहिता कलम ४२० खाली फसवणुकीच्या आरोपावरुन खटला भरता येईल. परंतु, ज्यांना लोकसेवक होण्याची अपेक्षा असते अशा व्यक्ती लोकसेवकाच्या पदावर नेमल्या गेल्यानंतर अशा कोणत्याही व्यवहारासाठी प्रत्यक्ष लोकसेवक जेवढा अपराधी ठरतो, तेवढ्याच अपराधी ठरतात.

या कलमामध्ये ''परितोषण'' ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरली आहे. परितोषण हे पैशाच्या स्वरूपातीलच असावयास पाहिजे असे नाही. ज्यामुळे परितोषण स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे शारीरिक किंवा मानसिक समाधान होईल अशी कोणतीही गोष्ट 'परितोषण'' या संज्ञेच्या अर्थांतर्गत येऊ शकते. जर 'अ' या व्यक्तीने एखादे काम करण्यासाठी 'ब' या व्यक्तीच्या मुलीशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली तर तेही परितोषणच होय. याखेरीज भोजनाचे निमंत्रण स्वीकारणे, फळांच्या करंड्या स्वीकारणे, एवढेच काय औषधांची एखादी गोळी मागणे हेदेखील परितोषण समजले पाहिजे. केवळ एखाद्या गोष्टीची मागणी करणे हाही या कलमांतर्गत अपराध आहे. **(मुबारक अली विरुद्ध मध्यप्रदेश राज्य, ए.आय.आर. १९५८ म.प्र. १५७)**

या कलमामध्ये वापरलेली 'परितोषण' ही संज्ञा अत्यंत महत्त्वाची व सार्थ आहे. परितोषण केवळ पैशाच्या स्वरूपातच असते असे नाही, ही बाब वर स्पष्ट केली आहे. कारण परितोषण म्हणजे द्रव्याच्या स्वरूपात लाच स्वीकारणे एवढेच अपेक्षित असते, तर उंची व महागड्या वस्तूंच्या स्वरूपात लाच स्वीकारणारा लोकसेवक त्याने 'एक पैसाही कुणाकडून घेतला नाही' असे म्हणून मोकळा होईल. विधिकारांनादेखील परितोषण म्हणजे द्रव्ये असे अपेक्षित असते तर त्यांनी परितोषण ही व्यापक संज्ञा वापरण्याऐवजी द्रव्ये या संज्ञेचा उपयोग केला असता. **(राजस्थान राज्य वि. अभेय सिंग, ए.आय.आर. १९४७ राज. १३८ : १९४७ क्रिमि. लॉ जर्नल ५४१).**

केवळ ''कोणतेही परितोषण'' स्वीकारणे हाच अपराध नाही तर एखादी गोष्ट बक्षीस म्हणून घेणे हाही या कलमाखाली अपराध

आहे. भारतीय दंड प्रक्रिया संहितेनुसार पूर्वी केलेल्या कामाबद्दलचे प्रदान म्हणजेच बक्षीस होय, कोणतेही काम करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल लोकसेवकाने कोणत्याही स्वरूपात बक्षीस स्वीकारणे हा अपराध आहे. कारण कोणत्याही स्वरूपात लोकसेवकाला देण्यात येणारे बक्षीस हे वैध पारिश्रमिक असत नाही.

या ठिकाणी परितोषण किंवा लाच (gratification of bribery) आणि जुलुमाने पैसे उकळणे (extortion) या दोन गोष्टींमध्ये फरक करावयास पाहिजे कारण परितोषण किंवा लाच या बाबतीत समोरची व्यक्ती स्वखुषीने पैसे देते तर, जुलुमाने पैसे उकळणे या बाबतीत ती भीतीपोटी पैसे देते किंवा पैसे देण्यासाठी तिला भाग पाडण्यात येते.

कलम ७ मध्ये वैध पारिश्रमिक कोणते असू शकते याचे स्पष्टीकरण दिले आहे. शासनाने किंवा कायद्याने जे परितोषण किंवा पारिश्रमिक स्वीकारण्यास मनाई केली आहे. ते परितोषण किंवा पारिश्रमिक अवैध आहे. लोकसेवक असलेल्या वैद्यक व्यवसायींना, काही शर्तीच्या अधीन खासगी व्यवसाय करण्यास शासनाने परवानगी दिली असल्यास अशा वैद्यक व्यवसायींना मिळणारे पारिश्रमिक ही लाच ठरणार नाही, किंवा एखाद्या रुग्णाचा जीव वाचवल्याबद्दल अशा वैद्यक व्यक्तीला संबंधितांनी एखादी भेटवस्तू दिल्यास ती परितोषण ठरणार नाही. मात्र एखादा लोकसेवक एखाद्याचे काम करण्यासाठी त्या व्यक्तीने वॉर बॉडमध्ये १०० रु. गुंतवले पाहिजेत अशी अट टाकत असेल तरी ते अन्य प्रयोजनार्थ परितोषण ठरेल. **(श्री. के. सेन वि. बाबु राजेश्वरी प्रसाद, एआयआर–१९४५ पाटणा–२५८.).**

सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादी देणगी देणे किंवा देणगी देण्याचे वचन देणे हे परितोषण ठरेल काय हे ओळखण्याचे दोन मार्ग आहेत. जर अशी देणगी त्या व्यक्तींचा हेतू, उद्दिष्ट किंवा इच्छा पूर्ण करण्यासाठी देण्यात आली असेल किंवा ती मूल्यवान असेल तर परितोषण ठरू शकते. परंतु एखाद्या उमेदवाराने त्याच्या निर्वाचन क्षेत्रामध्ये धर्मशाळा बांधण्यासाठी किंवा विहीर खोदण्यासाठी देणगी दिली किंवा देणगी देण्याचे आश्वासन दिले तरी अशी देणगी किंवा देणगीचे आश्वासन त्याने उमेदवाराच्या नात्याने न देता वैयक्तिक क्षमतेत दिले असा निर्णय न्यायालय घेऊ शकते **(त्रिलोचन सिंग वि. कर्नल सिंग १९६८ क्रिमि ११९९ : एआयआर १९६८ पंजाब ४१६).**

काम करण्यापूर्वी किंवा काम केल्यानंतर सांगितलेले बक्षीस हेही परितोषणच आहे. कलम ७ हे केवळ लोकसेवकाने परितोषण किंवा लाच स्वीकारण्याच्या संबंधातील अपराधाविषयी शिक्षा करण्याशी संबंधित आहे. लाच देणाऱ्या व्यक्तीला शिक्षा देण्याची तरतूद कलम १२ मध्ये केलेली आहे. लाच देणाऱ्या व्यक्तीने स्वखुषीने लाच दिली तरच तो गुन्हा ठरतो. जर त्याच्याकडून जुलूम जबरदस्तीने पैसे उकळण्यात आले तर तो त्या कलमाखाली गुन्हा ठरत नाही. तथापि, लाच घेणाऱ्याइतका लाच देणाराही अपराधी असतो हे निर्विवाद आहे.

**८. लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने परितोषण घेणे :–**

एखाद्या लोकसेवकाला, त्याच्या पदाच्या नात्याने त्याला नेमून दिलेले काम करण्यासाठी किंवा ते काम करण्यापासून त्याने परावृत्त व्हावे यासाठी किंवा लोकसेवक या नात्याने तो आपल्या पदाचे काम पार पाडताना कोणत्याही व्यक्तीवर अनुग्रह दाखवण्यासाठी किंवा तिच्यावर अवकृपा दाखवण्यासाठी किंवा केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ यांच्या संबंधातील किंवा कलम २ च्या खंड (a) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, महामंडळ किंवा सरकारी कंपनी यांच्या संबंधातील किंवा कोणताही लोकसेवक – मग तो नामप्राप्त असो किंवा अन्य प्रकारचा असो – त्याच्या संबंधातील कोणत्याही व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचा उपकार करण्याबद्दल किंवा त्यास अपाय करण्यासाठी भ्रष्ट किंवा बेकायदेशीर मार्गाने प्रवृत्त करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षीस म्हणून, जी व्यक्ती स्वत:साठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारचे परितोषण स्वीकारतील किंवा प्राप्त करील किंवा स्वीकारण्याचे मान्य करील किंवा मिळवण्याचा

प्रयत्न करील, ती सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही, परंतु ज्यात पाच वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस व तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

**कलम ८ चे विवेचन**

कलम ८ व ९ हे त्रयस्थ व्यक्तीने दिलेल्या किंवा देण्याचे वचन दिलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात लोकसेवकावर अनुचित रीतीने प्रभाव टाकण्याशी संबंधित आहे. कलम ८ भ्रष्ट व अवैध मार्गाने प्रभाव टाकण्याशी, तर कलम ९ हे व्यक्तिगत प्रभाव टाकण्याशी संबंधित आहे. एवढी बाब वगळता ही दोन्ही कलमे सारखीच आहेत. कोणत्याही प्राप्तीच्या आशेने किंवा इतरांच्या वैयक्तिक प्रभावाखाली लोकसेवकाने आपल्या कर्तव्यात कसूर करणे हा या दोन्ही कलमांचा उद्देश आहे.

कोणतीही कृती कलम ८ खाली अपराध ठरवण्याठी तीन गोष्टींची आवश्यकता असते : १) परितोषण देण्याचे किंवा घेण्याचे ठरले पाहिजे. असे परितोषण अन्य कोण्या व्यक्तीला भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने कोणतेही कृत्य करण्यासाठी परितोषण म्हणून मागितले पाहिजे किंवा दिले पाहिजे; २) या सर्व व्यवहारात एक व्यक्ती लोकसेवक असली पाहिजे; आणि ३) या कलमामध्ये नमूद केल्याप्रमाणे असे अनुग्रहाचे कृत्य करणारी व्यक्ती लोकसेवक असली पाहिजे.

कलम ७ मध्ये वैध परिश्रमिकाखेरीज अन्य परितोषण स्वीकारणे हा अपराध ठरवला आहे. शब्दरचनेतील हा फरक हेतूपूर्ण व मार्मिक आहे. मिळालेले परितोषण हे पार पाडलेल्या कामाचा रास्त मोबदला आहे, असा बचाव करण्याची अपराध्यास संधी मिळू नये या हेतूने ही शब्दयोजना केली आहे. उदाहरणाच्या साहाय्याने ते आणखी स्पष्ट होईल. कोणताही वकील न्यायालयामध्ये खटला चालवण्यासाठी आपल्या अशिलाकडून फीच्या रूपाने रक्कम घेतो, तो स्वीकारत असलेले पारिश्रमिक हे परितोषण आहे. परंतु ते वैध आहे. कारण तो त्याच्या परिश्रमाचा मोबदला आहे. परंतु, तो जर असे परितोषण युक्तिवादाच्या मार्गाने न्यायाधीशावर प्रभाव टाकण्यासाठी घेत नसेल तर, भ्रष्ट व अवैध मार्गाने खटला जिंकून देण्यासाठी न्यायाधीशावर प्रभाव टाकण्यासाठी घेत असेल तर, तो या कलमाखाली अपराध ठरेल.

लोकसेवकावर प्रभाव टाकण्यासाठी परितोषण स्वीकारणे हा या कलमाचा मथितार्थ आहे. म्हणून जर एखादी व्यक्ती अशा देवाण–घेवाणीच्या व्यवहारात केवळ मध्यस्थ म्हणून काम करत असेल, व त्याबाबत स्वतःसाठी काहीही परितोषण घेत नसेल तर ती कलमाखाली अपराधी ठरणार नाही. दुसऱ्यावर प्रभाव टाकण्यासाठी परितोषण स्वीकारणे हा या कलमातील महत्त्वाचा भाग आहे.

कलम ८ खालील अपराध दखली आहे व अशा अपराध्यास सहजासहजी जामीन मिळत नाही. या कलमाखालील आरोपपत्रामध्ये ज्या व्यक्तीकडून परितोषण स्वीकारले त्या व्यक्तीचे नाव, इत्यादी तपशील द्यावा लागतो.

**९. लोकसेवकावर वैयक्तिक प्रभाव पाडण्यासाठी परितोषण घेणे :–**

कोणत्याही लोकसेवकाला त्याच्या पदाच्या नात्याने त्याला नेमून दिलेले काम करण्यासाठी किंवा ते काम करण्यापासून त्याने परावृत्त व्हावे यासाठी किंवा लोकसेवकाने मग तो नामप्राप्त असो किंवा अन्य प्रकारचा असो – आपल्या पदाचे नेमून दिलेले काम पार पाडत असताना कोणत्याही व्यक्तीवर अनुग्रह किंवा अवकृपा करण्यासाठी किंवा केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे कोणतेही विधानमंडळ याच्या संबंधातील किंवा स्थानिक प्राधिकरण, महामंडळ किंवा कलम २ च्या खंड (a) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शासकीय कंपनी याच्या संबंधातील किंवा कोणताही लोकसेवक – मग तो नामप्राप्त असो किंवा इतर प्रकारचा असो याच्या संबंधातील कोणत्याही व्यक्तीवर कोणताही उपकार करण्यासाठी किंवा अपाय करण्यासाठी किंवा तसे करण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रवृत्त करण्याबद्दल प्रलोभने किंवा बक्षीस म्हणून जी व्यक्ती, स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारचे परितोषण स्वीकारील किंवा प्राप्त करील किंवा स्वीकारण्याचे मान्य करील किंवा स्वीकारण्याचा प्रयत्न करील ती, सहा महिन्यापेक्षा कमी असणार नाही, परंतु ज्यात ५ वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

### कलम ९ चे विवेचन

कलम ९ हे लोकसेवकावर व्यक्तिगत प्रभाव टाकण्यासाठी खाजगी व्यक्तीशी परितोषण स्वीकारण्याशी संबंधित आहे. लोकसेवकावर व्यक्तिगत प्रभाव टाकणे हे कितीही निंदनीय कृत्य असले तरी संहितेखाली तो अपराध समजला जात नाही. मात्र, त्रयस्थ व्यक्तीकडून परितोषण मिळविण्याच्या हेतूने लोकसेवकावर अनुचित प्रभाव टाकणे हा या कलमाखाली अपराध मानण्यात आला आहे. व्यक्तिगत प्रभाव या संज्ञेची कुठेही व्याख्या देण्यात आलेली नाही. परंतु ही संज्ञा दिवाणी कायद्यातील ''गैरवाजवी प्रभाव'' या संज्ञेप्रमाणेच आहे, ज्यामुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडून गैरवाजवी लाभ मिळवू शकेल अशाप्रकारे लोकसेवकांवर गैरवाजवी प्रभाव टाकणे हा अर्थ या संज्ञेत अंतर्भूत आहे.

**१०. कलम ८ किंवा ९ मध्ये व्याख्या दिलेले अपराध करण्यासाठी लोकसेवकाने प्रोत्साहन दिल्याबद्दल शिक्षा :––**

ज्याच्या संबंधात कलम ८ किंवा कलम ९ यामध्ये व्याख्या केलेल्या अपराधांपैकी कोणताही अपराध करण्यात आला असून अशी व्यक्ती लोकसेवक असून जी त्या अपराधास प्रोत्साहन देईल मग असा अपराध अशा प्रोत्साहनाच्या परिणामस्वरुप घडलेला असो अथवा नसो – ती सहा महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या; परंतु ज्यात पाच वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

### कलम १० चे विवेचन

कलम १० मध्ये, कलम ८ व ९ खालील अपराधांना प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षेची तरतूद केली आहे. या कलमाखालील अपराधांचे व त्याच्या शिक्षेचे पुढीलप्रमाणे उदाहरण देता येईल : समजा क्ष हा लोकसेवक आहे व य ही त्याची पत्नी आहे. एखाद्या व्यक्तीला नोकरीवर लावण्याच्या हेतूने य अशा व्यक्तीकडून बक्षीस स्वीकारत असेल आणि त्या व्यक्तीला नोकरीवर लावण्यासाठी क्ष ला उद्युक्त करत असेल अशा परिस्थितीत दोघेही अपराधी ठरतात. य ला एक वर्षापर्यंत शिक्षा किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही होऊ शकते.

**११. लोकसेवकाने केलेल्या कार्यवाहीशी किंवा व्यवहाराशी संबंधित असलेल्या व्यक्तीकडून अशा लोकसेवकाने कोणताही मोबदला न देता मूल्यवान वस्तू प्राप्त करणे :–**

लोकसेवक असलेली जी कोणतीही व्यक्ती, जिने कोणतीही कार्यवाही किंवा व्यवहार केला आहे किंवा करण्याच्या स्थितीत आहे अशा कार्यवाहीशी किंवा व्यवहाराशी ज्या कोणत्याही व्यक्तीचा संबंध होता किंवा आहे किंवा असण्याची शक्यता आहे हे तिला माहीत असेल किंवा तिच्या स्वतःच्या किंवा ती ज्यास दुय्यम आहे अशा कोणत्याही लोकसेवकाच्या पदाच्या नात्याने पार पाडावयाच्या कामाशी जिचा कोणत्याही प्रकारचा संबंध असेल किंवा अशा संबंधित व्यक्तीशी जिचा कोणताही हितसंबंध असल्याचे किंवा नातेसंबंध असल्याचे तिला माहीत असेल, अशा कोणत्याही व्यक्तीकडून, कोणत्याही मोबदल्याशिवाय किंवा जो पुरेसा नाही हे माहीत असूनही अशा प्रकारच्या मोबदल्याप्रीत्यर्थ, स्वतःसाठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीसाठी कोणतीही मूल्यवान वस्तू स्वीकारील, प्राप्त करील, स्वीकारण्याचे मान्य करील किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील तर ती सहा महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या, परंतु ज्यात पाच वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

### कलम ११ चे विवेचन

कलम ११ मागील उद्देश उघड आहे. लोकसेवकाने पैशाच्या स्वरूपात परितोषण स्वरूपात स्वीकारणे हा अपराध ठरवण्यात आला व शिक्षेची तरतूद करण्यात आली तर तो भेटवस्तूंच्या स्वरूपातील परितोषण स्वीकारील. पूर्वीच्या कलमान्वये बक्षीस म्हणून देणगी स्वीकारणे हा अपराध ठरत होता. या कलमामध्ये बक्षिसाचा भाग संपूर्णपणे गैरवाजवी आहे. या कलमाखाली कोणत्याही प्रतिफलाशिवायचे परितोषण स्वीकारण्यास प्रतिबंध केला आहे. कारण कोणत्याही कारणांशिवाय एकदा भेटवस्तू स्वीकारली तर त्यानंतर त्या व्यक्तीवर अनुग्रह न दाखवणे जवळजवळ अशक्यच असते.

या कलमामध्ये ''मूल्यवान वस्तू'' असा उल्लेख करण्यात आला आहे. तसे पाहता, सर्वच वस्तूंना काही ना काही मूल्य हे असतेच. परंतु, केवळ उपचार म्हणून दिलेल्या पान किंवा पुष्पगुच्छ या मूल्यवान वस्तू ठरत नाहीत. तसेच रक्ताच्या नात्यातील व्यक्तीकडून किंवा निकटच्या मित्राकडून सामाजिक कर्तव्याचा भाग म्हणून भेटवस्तू स्वीकारणे हाही अपराध ठरत नाही. ज्या व्यक्तींची अन्यथा कोणतेही संबंध नाहीत अशा व्यक्तींकडून भ्रष्ट हेतूने देण्यात आलेल्या मूल्यवान वस्तू स्वीकारणे हा मात्र या कलमाखाली गुन्हा ठरू शकेल. या ठिकाणी एखाद्या वस्तूचे मूल्य म्हणजे तिची बाजार–किंमत असली पाहिजे असे नाही. या कलमाखालील अपराध हा, अशी भेटवस्तू कुणी दिली, देण्यामागे अशा व्यक्तीचा उद्देश काय होता, हे सिद्ध करण्यावर अवलंबून आहे.

वरील बाब उदाहरणाच्या साहाय्याने देखील स्पष्ट करता येईल : समजा अ ही व्यक्ती जिल्हाधिकारी म्हणून काम करते. तिच्याकडे ब या व्यक्तीचे एक निवाड्याचे प्रकरण प्रलंबित आहे. अ हा ब कडून ५० रु. भाड्याने घर घेतो. ते घर अशा स्थितीतील आहे की त्याचे अन्य कोणत्याही व्यक्तीने २०० रुपये भाडे सहज दिले असते. या प्रकरणात 'अ' या व्यक्तीने योग्य मोबदला दिल्याशिवाय 'ब' या व्यक्तीकडून मूल्यवान वस्तू स्वीकारली असे होईल.

या कलमाखालील आरोपपत्र पुढील नमुन्यात देता येईल :

''तुम्ही, श्री. ...................... लोकसेवक या नात्याने ....................... या कार्यालयातील ............... या पदावर काम करीत असता दि. ........................ रोजी ......................... या ठिकाणी तुमच्या स्वतःसाठी (किंवा ........................ यांच्यासाठी), तुम्ही पार पाडत असलेल्या कार्यवाहीशी (किंवा पार पाडत असलेल्या व्यवहाराशी म्हणजेच ...................... या बाबींशी ज्यांचा संबंध आहे (किंवा ज्यांचा अशा बाबींशी संबंध पोहोचतो अशा व्यक्तींच्या हितसंबंधात किंवा नात्यात असलेल्या) श्री. .................... यांच्याकडून मोबदला दिल्याशिवाय (किंवा जो मोबदला पुरेसा नाही हे तुम्हास माहीत आहे एवढ्या कमी रकमेचा मोबदला देऊन) मूल्यवान वस्तू स्वीकारली आहे (किंवा प्राप्त केली आहे) आणि त्याद्वारे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याच्या कलम ११ अन्वये शिक्षा करण्याजोगा व ज्याची मी दखल घ्यावी असा अपराध केला आहे.''

**१२. कलम ७ किंवा ११ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांना प्रोत्साहन देण्याबद्दल शिक्षा :–**

कलम ७ किंवा कलम ११ या अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधास, जी कोणतीही व्यक्ती प्रोत्साहन देईल ती मग असा अपराध अशा प्रोत्साहनाच्या परिणामस्वरूप घडलेला असो अथवा नसो – सहा महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या, परंतु ज्यात पाच वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

**टिप्पणी**

लोकसेवकाने केलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या अपराधांबद्दलच्या भारतीय दंड संहितेच्या १६१ ते १६५–अ या कलमातील तरतुदी, किरकोळ फेरफारांसह या कलमांमध्ये (७ ते १२) अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. या फेरफारांच्या परिणामी, किमान शिक्षेची तरतूद केलेली आहे. भारतीय दंड संहितेमध्ये तरतूद केलेल्या पर्यायी शिक्षेचा भाग यातून वगळण्यात आला आहे. तसेच, सध्या देण्यात येत असलेल्या शिक्षेमध्ये वाढ करण्यात आली असून, तपशिलाचा भाग वगळण्यात आला आहे.

**कलम १२ चे विवेचन**

या कलमामध्ये कलम ७ किंवा कलम ११ या खाली शिक्षायोग्य असलेल्या अपराधांना प्रोत्साहन देणाऱ्याविरुद्ध शिक्षेची तरतूद केली आहे. एखादे काम करण्यासाठी लोकसेवकाला लाच देणे हा या कलमाखाली गुन्हा ठरू शकतो. उदा. शिधापत्रिका रीतसर प्रमाणित असल्याखेरीज त्यावर कोणते धान्य देण्यात येऊ नये असा आदेश असता, जर एखादी व्यक्ती अन्न निरीक्षकाला लाच देऊन शिधापत्रिका प्रमाणित करवून घेत असेल तर त्या व्यक्तीला कलम ७ खाली शिक्षायोग्य असलेल्या गन्ह्याला प्रोत्साहन दिल्याच्या कारणासाठी शिक्षा होऊ शकते.

कोणतीही शिक्षा देतेवेळी आरोपीने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप पाहणे हे आवश्यक आहे. प्रामाणिक लोकसेवकाला भ्रष्ट करणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा म्हटला पाहिजे. खुनाच्या प्रकरणात न्यायचौकशी चालू असताना आरोपीने सत्र न्यायाधीशाला, त्याला निर्दोष शाबीत करण्यासाठी बेकायदेशीर मदत देऊ करणे हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे व अशा गुन्ह्यासाठी दीर्घ मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली गेली पाहिजे. कलमात तरतूद केलेली ६ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा अगदीच क्षुल्लक ठरेल. (महमूद बेग वि. राजस्थान राज्य, ए.आय.आर. १९७३ स.न्या. ८०६ राजस्थान). तसेच, स्वत:ला होत असलेला त्रास कमी करण्यासाठी लाच दिली ही बाबदेखील शिक्षेची मुदत कमी करण्यासाठी पुरेशी ठरत नाही. (किशन नारायण वि. महाराष्ट्र राज्य, ए.आय.आर. १९७३ स.न्या. २७५१ : १९७३ क्रिमि. लॉ जर्नल १८३९).

कलम १२ खालील अपराधासाठी पुढीलप्रमाणे आरोपपत्र देता येईल :

''तुम्ही, दि. ..................... च्या सुमारास ...................... या ठिकाणी, .............. या पदावर काम करीत असलेले लोकसेवक दि. ....................... यांना ........................ या रकमेची लाच देऊ करून, कलम ७ खाली (किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम ११ खाली शिक्षायोग्य अपराध करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले आहे आणि त्यामुळे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याच्या कलम १२ खाली शिक्षायोग्य व मी दखल घ्यावी असा अपराध केला आहे.''

कलम १२ खाली केलेले अपराध हे दखली (Cognizable) असतात व जमानत मिळण्यास पात्र नसतात. कलम ३ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या विशेष न्यायाधीशांद्वारे त्यांची न्यायपरीक्षा करण्यात येते.

**१३. लोकसेवकाचे गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन :–**

(१) लोकसेवकाने केलेले पुढील प्रकारचे वर्तन, हे गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन समजण्यात येईल.–

(a) जर तो कोणत्याही व्यक्तीकडून स्वत:साठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीसाठी, कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेले, कायदेशीर पारिश्रमिकाशिवायचे कोणतेही परितोषण, प्रलोभन किंवा बक्षीस म्हणून नित्यनेमाने म्हणजेच नेहमी सवयीने स्वीकारील किंवा प्राप्त करील किंवा स्वीकारण्याचे मान्य करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील : किंवा

(b) त्याने जी कोणती कार्यवाही किंवा व्यवहार केला आहे किंवा करण्याच्या स्थितीत आहे, त्या कार्यवाहीत किंवा व्यवहारात जिचा संबंध होता किंवा आहे किंवा होण्याची शक्यता आहे हे त्याला माहीत असेल किंवा त्याच्या स्वत:च्या किंवा तो ज्यास दुय्यम आहे अशा कोणत्याही लोकसेवकाच्या पदाच्या नात्याने पार पाडावयाच्या कामाशी जिचा कोणत्याही प्रकारचा संबंध असेल, किंवा अशा संबंधित व्यक्तीशी जिचा कोणताही हितसंबंध असल्याचे किंवा नातेसंबंध असल्याचे त्यास माहीत असेल तिच्याकडून कोणत्याही मोबदल्याशिवाय किंवा जो पुरेसा नाही हे माहीत असूनही अशा प्रकारच्या मोबदल्याप्रीत्यर्थ स्वत:साठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीसाठी कोणतीही मूल्यवान वस्तू स्वीकारील, प्राप्त करील, स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील; किंवा

(c) लोकसेवक म्हणून त्याच्याकडे सोपवण्यात आलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही मालमत्तेची अप्रामाणिकपणे किंवा कपटाने अफरातफर करील किंवा अन्यथा त्यात स्वत:च्या उपयोगासाठी बदल करील किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस तसे करू देईल;

(d) त्याने जर –

(i) भ्रष्ट किंवा बेकायदेशीर मार्गाने, स्वत:साठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी कोणतीही मूल्यवान वस्तू मिळवली किंवा पैशाच्या स्वरूपातील लाभ मिळवला; किंवा

(ii) लोकसेवक या पदाच्या नात्याने आपल्या पदाचा गैरवापर करून आपल्या स्वत:साठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी कोणतीही मूल्यवान वस्तू मिळवली किंवा पैशाच्या स्वरूपातील लाभ मिळवला; किंवा

(iii) लोकसेवक या नात्याने पद धारण केलेले असताना, कोणत्याही सार्वजनिक हिताकडे लक्ष न देता, कोणत्याही व्यक्तींसाठी कोणतीही मूल्यवान वस्तू मिळवली किंवा पैशाच्या स्वरूपातील लाभ मिळवला; किंवा

(e) जर त्याच्याकडे किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने, त्याने ज्या कालावधीसाठी पद धारण केले असेल अशा त्याच्या पदाच्या अवधीमध्ये कोणत्याही वेळी, ज्याबाबत लोकसेवक समाधानकारकरीत्या हिशेब देऊ शकणार नाही अशा आर्थिक, साधनसंपत्तीच्या किंवा माहीत असलेल्या त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत एवढी मालमत्ता असेल.

**स्पष्टीकरण :–** या कलमाच्या प्रयोजनाकरिता, 'उत्पन्नाची माहीत असलेली साधने' या शब्दप्रयोगाचा अर्थ, कोणत्याही कायदेशीर मार्गाने मिळालेले उत्पन्न, असा आहे आणि लोकसेवकाला त्या काळी लागू असलेला कोणताही कायदा, नियम किंवा आदेश यातील तरतुदींनुसार अशी मिळकत कळवण्यात आलेली असते.

(२) गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन करील असा कोणताही लोकसेवक, सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही, परंतु ज्यात सात वर्षांपर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

## टिप्पणी

या खंडामध्ये लोकसेवकाकडून होणाऱ्या गुन्हेगारी स्वरूपाच्या गैरवर्तनाचे विवेचन केले असून, ते भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याचे कलम ५, पोट कलम (१) व (२) यांच्याशी संबंधित आहे. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याचे कलम ५ (१) (d) हे, लोकसेवकाने भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने किंवा अन्यप्रकारे गैरवर्तन करणे आणि स्वत:साठी आणि इतरांसाठी आर्थिक लाभ मिळवणे याच्याशी संबंधित आहे. न्यायालयाच्या अधिघोषणेमुळे (Pronouncement) या तरतुदीतील परिणामकारकता काहीशी कमी झालेली आहे. विधिविधानामधील मूळ हेतू अधिक स्पष्ट करण्यासाठी खंड १३ (१) (d) चे तीन भागांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. तसेच, कोणतीही संदिग्धता दूर करण्यासाठी 'उत्पन्नाचे माहीत असलेले मार्ग' या संज्ञेच्या व्याख्येची त्यात भर घालण्यात आली आहे.

पुरावा अधिनियमाच्या कलम ५ मध्ये दिल्याप्रमाणे, आरोपीने आपली बाजू सिद्ध करण्यासाठी एखाद्या घटनेतील संभाव्य तत्त्वांचा परिपोष करणे पुरेसे आहे. यामुळे, त्याने आपली बाजू पूर्णपणे न मांडताही, विरुद्ध पक्षाने पुढे केलेल्या पुराव्याविषयी शंका निर्माण करूनही खटला जिंकता येतो. कारण यामुळे सर्व रास्त शंकांचे निराकरण करून आरोप सिद्ध करता येत नाही. (रवींद्र कुमार डे विरुद्ध ओरिसा राज्य, (१९७६) ४ स.न्या.प्र. २३३ : १९७६ स. न्या. प्र. (फौजदारी) ५६६.)

''पैशाच्या स्वरूपातील किंवा आर्थिक लाभ'' या शब्दांची व्याप्ती अधिक आहे. असे असतानाही, १९४७ च्या भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम ५ (१) (३) नवीन अधिनियमांचे कलम १३ (३) याच्या संदर्भात, वस्तू उधारीवर प्राप्त करणे म्हणजे आर्थिक लाभ मिळवणे असे होत नाही. जर व्यापारी आणि अधिकारी यांच्यामध्ये, अधिकाऱ्याने घेतलेल्या मालासाठी त्याला पैसे द्यावे लागणार नाहीत, असा करार झाला असेल तर नि:संशयपणे ही बाब आर्थिक लाभ घेणे ठरते, परंतु असा कोणताही करार झाला नसेल तर अधिकाऱ्याने घेतलेल्या मालाचे पैसे दिले नाहीत यावरून त्याने आर्थिक लाभ मिळवला असे म्हणता येणार नाही **(दिल्ली प्रशासन विरुद्ध एस. एन. खोसला, (१९७१), १ स.न्या.प्र. ८७२, १९७१ स.न्या.प्र.(फौज) ३७०).**

एखाद्या अधिकाऱ्याने उधारीवर माल मिळवला असेल आणि त्या मालाची किंमत देण्याचा त्याचा उद्देश नसेल तरी देखील त्याने कोणताही मोबदला दिल्याशिवाय मूल्यवान वस्तू मिळवली असे म्हणता येणार नाही. परंतु अधिकारी व व्यापारी यांच्यात

करार झाला होता की व्यापारी पैशांची मागणी करणार नाही आणि अधिकारी पैसे देणार नाही आणि पैशाच्या पावत्या व पैसे देण्यासाठी व्यापाऱ्याने लावलेला तगादा हा केवळ दिखाऊ भाग होता, हे जर सिद्ध करता आले तर मात्र गोष्ट वेगळी **(दिल्ली प्रशासन विरुद्ध एस. एन. खोसला, (१९७१), १ स.न्या.प्र. ८७२, १९७१ स.न्या.प्र.(फौज) ३७०).**

एखाद्या लोकसेवकाकडे, त्याच्या उत्पन्नाच्या माहीत असलेल्या मार्गाशी विसंगत अशी उत्पन्नाची आर्थिक साधने व मालमत्ता आहे हे सिद्ध करण्यासाठी, गणना काळ अशा लोकसेवकाच्या संपूर्ण सेवाकाळाएवढा धरण्याची आवश्यकता नाही. गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन सिद्ध करण्यासाठी, किती कालावधीचे हिशेब विचारात घ्यावेत तो कालावधी निवडण्यासाठी सर्व प्रकरणांना लागू होतील असा कोणताही सर्वसाधारण नियम किंवा निकष अस्तित्वात नाही.

लोकसेवक किती काळापासून संपत्ती जमा करतो आहे ते विचारात घेऊन अभियोगपक्षाने स्वत:च्या निर्णयानुसार कालावधी निश्चित करावयाचा असतो, आणि असा कालावधी निश्चित केल्यानंतर त्या कालावधीमध्ये जमा केलेल्या मालमत्तेबद्दल विशेष छाननी करावयाची असते. **(परि.१८) (महाराष्ट्र राज्य वि. पोलनजी दारावशा दारूवाला, १९८७ सप्लि. स.न्या.प्र. ३७९, ३८४, ३८५).**

एकदा अभियोगपक्षाने, फौजदारी पुराव्याच्या मानकानुसार अपराधासंबंधीच्या आवश्यक त्या बाबी प्रस्थापित केल्या की, मालमत्ता आणि उत्पन्नाची साधने याविषयी समाधानकारक हिशेब देण्याचे दायित्व बचाव पक्षावर येते याखेरीज अभियोग पक्षाला आरोपीच्या उत्पन्नाची संभाव्य साधने अस्तित्वात असण्याची बाब खोडून काढण्याची गरज असत नाही.

आर्थिक साधने – बँक खाते – संयुक्त ठेव – यांतील पहिल्या क्रमांकाचा जमाकर्ता हा सर्वस्वी लाभधारक असणे आवश्यक नाही. ही बाब मुख्यत: कराराच्या अटींवर अवलंबून असते. **(महाराष्ट्र राज्य विरुद्ध पोलनजी दारावशा दारूवाला, १९८७ सप्लि. १९८७ स.न्या.प्र. ३७९, ३८६.)**

### कलम १३ चे विवेचन

कलम १३ (१) मधील काही गोष्टी अत्यंत लक्षणीय आहेत. या कलमाच्या खंड (c) व (d) मध्ये विशिष्ट व व्यक्तिगत कृती शिक्षापात्र ठरवल्या आहेत, तर खंड (a) व (b) द्वारे लोकसेवकाने अशा कृती सवयीने किंवा नित्यनेमाने वारंवार करणे आवश्यक केले आहे. दुसरी महत्त्वाची बाब अशी की, लोकसेवकाचे गैरवर्तन हे खंड (a) व (b) अन्वये सवयीने घडले आहे हे सिद्ध करता आले नाही तर त्याच्यासाठी खंड (c) व (d) खाली शिक्षेची तरतूद केली आहे. तिसरी महत्त्वाची बाब ही की, खंड (a) व (b) मध्ये कोणत्याही नवीन अपराधांचे विवेचन केलेले नाही. कलम ७ व ११ मध्ये एकदा केलेले गैरकृत्यही अपराध मानले आहे तर, खंड १३ (१) (a) व (b) मध्ये गैरकृत्य नित्यनेमाने करण्यावर भर दिलेला आहे.

भ्रष्टाचार अंगी बाणलेला असल्याने वारंवार गैरकृत्य करणे या अर्थी खंड (a) व (b) मध्ये सवय किंवा नित्यनेम ह्या शब्दांचा वापर केला आहे. सवय म्हणजे तेच ते कृत्य वारंवार करण्याची प्रवृत्ती किंवा क्षमता. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ११० मध्येही या शब्दाचा वापर करण्यात आला आहे. न्यायालयामध्ये एखाद्याच्या मनाची गुन्हेगारी प्रवृत्ती सिद्ध करणे कठीण असले तरी गैरकृत्य वारंवार व सतत करण्याची क्षमता दर्शविता येते. साक्षीदार जेंव्हा एखादी व्यक्ती सराईत अपराधी असल्याबद्दलची साक्ष देत असेल तेव्हा अपराधी व्यक्तीने असा अपराध या पूर्वी किती वेळा आहे याविषयी त्याच्याजवळ सबळ पुरावा पाहिजे; केवळ ऐकीव माहिती असून भागणार नाही. '' क्वीन एम्प्रेस वि. बाबूराव कंसारी (इंडियन लॉ रिपोर्ट १९ कलकत्ता १९०) या प्रकरणात नोटीस व बिव्हरले यांनी असा निर्णय दिला की, '' एखादी व्यक्ती एकाच दिवशी अनेकांकडून चोरीचा माल विकत घेत असेल तर ती सवयीने चोरीचा माल विकत घेते असे म्हणता येणार नाही. एखादी व्यक्ती सवयीने अपराधी तेव्हाच होऊ शकते जेव्हा तिला त्याच स्वरूपाच्या अपराधाबद्दल यापूर्वी किमान तीन वेळा सिद्धदोषी ठरवण्यात आले असेल.'' एखादी व्यक्ती सराईत लाचखोर आहे हे सिद्ध

करण्यासाठी विवक्षित कालावधीमध्ये असे गैरकृत्य तिच्या हातून कितीवेळा घडले आहे हे पाहणे आवश्यक ठरेल. अर्थातच, केवळ यापूर्वी तिच्या हातून गैरकृत्य घडले आहे एवढ्याच कारणावरून न्यायालय तिला सिद्धदोषी ठरवणार नाही, तर अन्य व स्वतंत्र पुराव्यासोबत ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावी लागेल.

कलम १३(१) (c) मध्ये एखादी व्यक्ती पैशाच्या बाबतीत अप्रामाणिकपणे गैरव्यवहार करत असल्यास ती अपराधी असल्याचे ठरवले आहे. याठिकाणी केवळ एखाद्या व्यक्तीने सार्वजनिक निधी केवळ स्वत:जवळ ठेवला आहे. एवढ्याच कारणावरून ती अप्रामाणिक असल्याचे सिद्ध होणार नाही. तर तो अप्रामाणिकपणाचा केवळ प्रयत्न ठरेल. परंतु जर तिने तो निधी ज्या कारणासाठी स्वत:जवळ ठेवला त्या कारणासाठी वापरला नाही किंवा वाजवीपेक्षा अधिक काळ स्वत:जवळ बाळगला तर ते अपराधीपणाचे कृत्य ठरू शकते. एखाद्या व्यक्तीचा हेतू आप्रमाणिक होता हे सिद्ध करण्यासाठी न्यायालयाला अत्यंत सावधगिरी बाळगावी लागते. कारण अप्रामाणिक हेतू हे गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन असते व केवळ एखाद्या व्यक्तीचा निष्काळजीपणा, कामातील चालढकल एवढ्यावरून अप्रामाणिक हेतू सिद्ध होत नाही. एखाद्याचा हेतू काय आहे हे जाणून घेण्यासाठी कोणताही प्रमाण निकष नाही. त्यासाठी न्यायालयाला तथ्यांचा बारकाईने अभ्यास करावा लागेल. बंगीराम वि. हिमाचल प्रदेश या प्रकरणात (१९५७ फौ. १३१). पोलीस अधीक्षकाच्या कार्यालयातील लिपिकाने विवक्षित कार्यालयीन प्रयोजनासाठी बँकेतून काही रक्कम काढली व तिचा विनियोग न करता ती रक्कम ४ महिनेपर्यंत स्वत:जवळ बाळगली व त्यानंतर त्या रकमेतील काही भाग शासनाला परत केला. या प्रकरणात न्यायालयाने त्याचा अप्रामाणिक हेतू मान्य केल्याने तो कलम १३(२) अन्वये दोषी ठरतो.

कलम १३(१) (d) मध्ये, ''लोकसेवक त्याचे कर्तव्य बजावत असता'' असा शब्दप्रयोग केला आहे. या शब्दप्रयोगात अंतर्भूत असलेले महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे आहेत : (१) आरोपी हा लोकसेवक आहे, (२) त्याने भ्रष्ट किंवा अवैध मार्गाचा वापर केला आहे किंवा लोकसेवक या नात्याने आपल्या पदाचा गैरवापर केला आहे, (३) त्यासाठी त्याला कोणताही आर्थिक लाभ झाला आहे किंवा त्याने मूल्यवान वस्तू मिळवली आहे, आणि (४) ही वस्तू त्याने स्वत:साठी किंवा इतरांसाठी मिळवली आहे हे सिद्ध झाले की, अभियोग पक्षाला आरोपीने गैरकृत्य आपले पदीय कार्य पार पाडताना केले आहे हे वेगळे सिद्ध करण्याची गरज नाही. (मनशंकर वि. गुजरात राज्य १९७९ क्रिमि. लॉ. जर्नल ६७९ : एआयआर १९७० गुज. ९७). जेव्हा आरोपींवर कलम १३ (१) (३) खाली आरोप ठेवण्यात येतो, तेव्हा त्याने पदीय कार्य करताना अवैध परितोषण मिळवले ही बाब गृहीत धरण्यात येते. असे गैरकृत्य करण्याची त्याच्यात क्षमता होती किंवा नाही, म्हणजेच असे लाभाचे पद तो सांभाळत होता किंवा नाही, ही बाब न्यायालय विचारात घेत नाही **(शिवराज सिंग वि. दिल्ली प्रशासन १९६९ क्रिमि लॉ. जर्नल १,३: एआयआर १९६८ स.न्या. १४१९).** थोडक्यात कलम १३(१) (d) च्या अर्थानुसार लोकसेवकाने त्याच्या पदाचा गैरवापर करणे तसेच त्याचा हेतू अप्रामाणिक असणे हा त्याला आरोपी सिद्ध करण्यासाठी महत्त्वाचा भाग आहे.

कलम १३ (१) (e) अन्वये, एखाद्या व्यक्तीकडे उत्पन्नाच्या माहीत असलेल्या साधनांशी विसंगत ठरेल एवढी मालमत्ता आढळली तर तो अपराध ठरतो. कलम १३ (१) (e) खाली आरोप ठेवतेवेळी अभियोग पक्षाला आरोपपत्र पुढील गोष्टी दर्शवाव्या लागतात. (१) आरोपी लोकसेवक आहे, (२) त्याने स्वत:कडे किंवा त्याच्या वतीने अन्य व्यक्तीने त्याच्या सेवावधीत, तो ज्याविषयी समाधानकारक हिशेब देऊ शकणार नाही एवढी त्याच्या उत्पन्नाच्या माहीत असलेल्या साधनांशी विसंगत एवढी मालमत्ता बाळगली आहे. याचा अर्थ असा आहे की, स्वत:कडे अमर्याद मालमत्ता बाळगणे हा गुन्हा नाही तर अशी मालमत्ता कशी मिळवली तसेच सर्व मार्गानी त्याला होत असलेल्या उत्पन्नाशी विसंगत एवढी मालमत्ता त्याने कोणत्या मार्गाने मिळवली याविषयी समाधानकारक स्पष्टीकरण देता न येणे हा अपराध आहे (श्रीमती नंदिनी सत्पथी वि. दाणी १९७८ कटक लॉ रिपोर्ट ६१) या ठिकाणी ''माहीत असलेल्या'' किंवा ''ज्ञात'' या संज्ञेचा अर्थ ''कसून तपासणी केल्यानंतर अभियोग पक्षाला माहीत असलेल्या'' असा आहे. याखेरीज आरोपी व्यक्तीकडे जर उत्पन्नाची ज्ञात साधने असतील तर ती जाहीर व सिद्ध करणे ही त्याची जबाबदारी आहे. मात्र ही मालमत्ता आरोपीने किती कालावधीमध्ये जमा केली तो कालावधी निश्चित करणे ही अभियोगपक्षाची जबाबदारी आहे.

कलम १३ (२) मध्ये लोकसेवकावरील आरोप सिद्ध झाल्यानंतर त्याच्या गुन्हेगारी स्वरूपाच्या गैरवर्तनाबद्दल कारावासाच्या, द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही प्रकारच्या शिक्षांची तरतूद केली आहे.

### १४. कलमे ८, ९ व १२ याखाली नित्यनेमाने अपराध करणे :–

जी कोणतीही व्यक्ती नित्यनेमाने,

(a) कलम ८ किंवा कलम ९ याखाली शिक्षायोग्य असलेला अपराध करील; किंवा

(b) कलम १२ खाली शिक्षायोग्य असलेला अपराध करील ती, दोन वर्षांपेक्षा कमी असणार नाही, परंतु ज्यात सात वर्षांपर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासास तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

#### टिप्पणी

या खंडामध्ये, खंड ८, ९, व १२ याखालील अपराधांसंबंधी विवेचन केले असून हा खंड भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ५(३) प्रमाणेच आहे. शिक्षेची किमान तरतूद दोन वर्षांची असणे एवढाच या दोन खंडामध्ये फरक आहे.

### १५. प्रयत्नासाठी शिक्षा

जी कोणतीही व्यक्ती, कलम १३ चे पोटकलम (१), खंड (c) किंवा खंड (३) यामध्ये निर्देशिलेला अपराध करण्याचा प्रयत्न करील ती, ज्यात तीन वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस तसेच द्रव्यदंडास पात्र ठरेल.

#### टिप्पणी

या खंडामध्ये, खंड १३ (१) (c) किंवा (d) यामध्ये निर्देशिलेला अपराध करण्यासाठी असलेल्या शिक्षेचे विवेचन केले असून हा खंड भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ५(३–अ) प्रमाणेच आहे.

### १६. द्रव्यदंड निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या बाबी :––

कलम १३ चे पोटकलम (२) याखाली किंवा कलम १४ खाली दंडाची शिक्षा लादण्यात आली असल्यास, न्यायालय, दंड निश्चित करतेवेळी, आरोपीने अपराधाद्वारे कोणतीही मालमत्ता प्राप्त केली असल्यास अशा मालमत्तेचे मूल्य किंवा दोषसिद्ध ही कलम १३ चे पोट कलम (१), खंड (e) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधासाठी असेल अशा बाबतीत, ज्याबाबत आरोपी व्यक्ती समाधानकारक हिशेब देण्यास असमर्थ आहे असे त्या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेली आर्थिक साधने किंवा मालमत्ता विचारात घेईल.

#### टिप्पणी

या खंडामध्ये, द्रव्यदंड निश्चित करतेवेळी न्यायालयाने विचारात घ्यावयाच्या बाबींच्या संबंधात विवेचन केले असून हा खंड भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याचे कलम ५, पोट–कलम (३–B) व (४) याप्रमाणेच आहे.

#### कलमे १४–१५–१६ यांचे विवेचन

कलम १४ मध्ये सवयीने कलम ८,९ व १२ खालील अपराध करणाऱ्यांसाठी अधिक कडक शिक्षेची तरतूद केली आहे. कलम १५ मध्ये कलम १३(१), खंड (c) व (३) खालील अपराधाचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षेची तरतूद केली आहे. कलम १६ मध्ये द्रव्यदंड निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या बाबींची तरतूद केली आहे.

## प्रकरण चार

## या अधिनियमाखालील प्रकरणांचे अन्वेषण

**१७. अन्वेषण करण्यास प्राधिकृत व्यक्ती :–**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,

(a) दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेच्या बाबतीत, पोलीस निरीक्षक;

(b) मुंबई, कलकत्ता, मद्रास, अहमदाबाद यांच्या महानगर क्षेत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ८, पोट–कलम (१) याखाली अधिसूचित केलेल्या कोणत्याही इतर महानगर क्षेत्राच्या बाबतीत, सहायक पोलीस आयुक्त;

(c) इतर ठिकाणी, पोलीस उपअधीक्षक किंवा समान दर्जाचा पोलीस अधिकारी यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी, महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थिती, प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या आदेशाशिवाय अन्वेषण करणार नाही किंवा त्यासाठी अधिपत्राशिवाय अटक करणार नाही;

परंतु, राज्य शासनाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पोलीस, निरीक्षकाहून कमी दर्जाच्या नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यास प्राधिकृत केल्यास, त्याला महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थिती, प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या आदेशाशिवाय अशा कोणत्याही अपराधाबाबत अन्वेषण करता येईल किंवा अधिपत्राशिवाय त्यासाठी अटकही करता येईल;

परंतु, आणखी असे की, कलम १३ चे पोट–कलम (१), खंड (e)यामध्ये निर्देशिलेल्या अपराधाबाबत, पोलीस अधीक्षकाच्या दर्जाहून खालच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यास आदेशाशिवाय अन्वेषण करता येणार नाही.

### टिप्पणी

या खंडामध्ये अधिनियमाखालील प्रकरणांचे अन्वेषण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीविषयी विवेचन केले असून हा खंड भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ५–A (१) प्रमाणेच आहे.

### कलम १७ चे विवेचन

कलम १७ मध्ये पोलीस उपअधीक्षकाच्या दर्जाची व्यक्ती प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय व पोलीस उपअधीक्षकापेक्षा कमी दर्जाची व्यक्ती दंडाधिकाऱ्याच्या आदेशावरून चौकशी करू शकते अशी तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच पोलीस उपअधीक्षकाने किंवा दंडाधिकाऱ्याच्या आदेशावरून कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने केलेल्या चौकशीचा दर्जा एकच असेल.

या कलमाची सुरुवात ''फौजदारी प्रक्रिया संहितेत काहीही अंतर्भूत असले तरीही'' या वाक्याने झाली आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ याच्या कलम १५६ (२) मध्ये १) पोलीस ठाण्याचा प्रभार असलेला कोणताही पोलीस अधिकारी, दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय, त्याच्या पोलीस ठाण्याच्या अधिकारितेत असलेल्या कोणत्याही प्रकरणांच्या बाबतीत चौकशी करू शकतो, आणि अशा २) पोलीस अधिकाऱ्यास अशा प्रकरणांच्या बाबतीत चौकशी करण्याचा कोणताही अधिकार नव्हता या कारणास्तव त्याने केलेल्या कोणत्याही कारवाईविरुद्ध कोणत्याही वेळी प्रश्न उपस्थित केला जाणार नाही, अशी तरतूद केली आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेतील ही अनियमितता दूर करण्यासाठी तसेच लोकसेवकाचा निष्कारण छळ होऊ नये या हेतूने कलम १७ मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे. परंतु, अपवादात्मक परिस्थितीत प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय पोलीस उपअधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने चौकशी केली तर ते या कलमाचे उल्लंघन ठरेल. परंतु त्यामुळे चौकशीचा निष्कर्ष अवैध ठरणार नाही असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे **(मध्यप्रदेश राज्य वि. वीरेश्वरराव अग्निहोत्री ए. आय. आर. १९५७ स. न्या.**

**५९२).** परंतु, खटला चालू असता न्यायालय अशा अवैध चौकशींकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करते असे नाही. या कलमातील ही तरतूद अनिवार्य (Mandatory) असल्याने, ती खटल्याच्या प्रारंभी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यास न्यायालय चौकशीचा निष्कर्ष मान्य करूनही रीतसर चौकशीचे आदेश देऊ शकते.

कलम १७ च्या अर्थांतर्गत पोलीस उपअधीक्षकापेक्षा कमी दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याला चौकशीचे आदेश देणाऱ्या दंडाधिकाऱ्याला स्वत: खटला चालवण्याचे अधिकार असावयास पाहिजेत, असे कुठेही म्हटले नाही. केवळ तो प्रथम श्रेणी दंडाधिकारी असला पाहिजे एवढीच तरतूद कलमामध्ये केली आहे.

विधिकारांनी (Legislator) हा अधिनियम तयार करते वेळी जसे भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यासाठी अधिनियमात तरतुदी केल्या. तसेच, प्रामाणिक व कर्तव्यदक्ष लोकसेवकास निष्कारण त्रास होऊ नये यासाठीही तरतुदी केल्या व म्हणून त्यांनी पोलीस उपनिरीक्षकाच्या दर्जाच्या अधिकाऱ्यावर संपूर्णपणे विश्वास व्यक्त केला, तसेच चौकशीचे काम अधिक प्रभावीपणे व्हावे यासाठी दुय्यम अधिकाऱ्याकडे दंडाधिकाऱ्याचे चौकशी आदेश असण्याची बाब विहित केली. यामागे, असा आदेश देण्यापूर्वी, विशिष्ट व्यक्तीच्या बाबतीत तशी चौकशी करण्याची आवश्यकता आहे काय, हे पडताळून पाहण्याचे दंडाधिकाऱ्यास अधिकार दिले. चौकशी आदेश देण्यापूर्वी दंडाधिकाऱ्यांनी त्या प्रकरणातील सर्व तथ्ये समजावून घेतली पाहिजेत व त्याची खात्री झाल्यानंतरच चौकशी आदेश दिले पाहिजेत, ही जबाबदारी दंडाधिकाऱ्यावर सोपवली. मात्र एकदा दंडाधिकाऱ्याने चौकशी आदेश दिले आणि चौकशीच्या वेळी अनेक नवीन तथ्ये उघडकीस आली तर अशा प्रत्येक वेळी दंडाधिकाऱ्याच्या नवीन आदेशासाठी त्याच्याकडे धाव घेण्याची गरज नाही. कारण या अधिनियमाखालील अपराध हे दखली अपराध असतात. एकदा चौकशीचे चक्र सुरू झाले की, नवनवीन बाबी उघडकीस येण्याची शक्यता असते. एकदा आदेश मिळाले व पोलीस अधिकाऱ्याच्या दर्जाचे बंधन दूर झाले की, त्या पोलीस अधिकाऱ्याचे चौकशीचे स्वातंत्र्य निर्बंधित राहते. एक आदेश हा संपूर्ण चौकशीसाठी पुरेसा आहे.

या कलमान्वये ज्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याकडे चौकशीचे काम सोपवण्यासंबंधी तरतूद आहे त्यापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे अपवादात्मक परिस्थितीत चौकशीचे काम सोपवण्याचा दंडाधिकाऱ्याला अधिकार आहे. विशिष्ट दर्जाचा अधिकारी उपलब्ध आहे किंवा नाही हा गैरलागू भाग आहे. ज्याविषयी चौकशी व्हावयास पाहिजे असे प्रकरण अस्तित्वात असल्याबद्दल दंडाधिकाऱ्यांची खात्री होणे ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. दंडाधिकाऱ्याच्या नेमणुकीच्या अधिकारावर निर्बंध घालण्याचा विधिकाराचा हेतू असता तर या कलमामध्ये दंडाधिकाऱ्याच्या आदेशाची अट टाकली नसती. **(बानी गोपाळ मित्रा वि. बिहार राज्य, ए. आय. आर. १९७० स. न्या. १६३६: १९७० क्रि.मि. लॉ. जर्नल १३९६).**

**१८. बँकर्सच्या वह्यांचे निरीक्षण करण्याचे अधिकार :–**

मिळालेल्या माहितीवरून किंवा अन्यथा, कलम १७ अन्वये अन्वेषण करण्याचा अधिकार ज्या पोलीस अधिकाऱ्यास देण्यात आला असेल अशा पोलीस अधिकाऱ्यास संशय घेण्यास कारण असेल आणि अपराधाचे अन्वेषण किंवा चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही बँकर्सच्या वह्या तपासणे त्यास आवश्यक वाटल्यास, त्यास त्या काळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही तो अपराध ज्याने केल्याचा संशय असेल त्या व्यक्तीच्या खात्याशी किंवा अशा व्यक्तीच्या वतीने जिने पैसा आपल्या ताब्यात ठेवला असल्याचा संशय असेल अशा अन्य व्यक्तीच्या खात्याशी संबंधित असेल तेथवर कोणत्याही बँकर्सच्या वह्यांचे अन्वेषण करता येईल आणि त्यातील संबंध नोंदीच्या प्रमाणित प्रती घेता येतील किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल आणि या कलमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास सहाय्य करणे संबंधित बँकेस बंधनकारक असेल :

परंतु, पोलीस अधीक्षकापेक्षा कमी दर्जाच्या असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, पोलीस अधीक्षकाच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याने याबाबतीत विशेषरीत्या प्राधिकृत केले असल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीच्या खात्याच्या संबंधात या कलमांखालील कोणत्याही अधिकाराचा वापर करता येणार नाही.

**स्पष्टीकरण :–** या कलमामध्ये ''बँक'' आणि ''बँकर्सच्या वह्या'' या शब्दप्रयोगांना, बँकर्सची पुस्तके पुरावा अधिनियम, १८९१ (१८९१ चा ८) यामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

**कलम १८ चे विवेचन**

कलम १७ अनुसार चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास त्या कलमाखाली अपराध घडला आहे असा वाजवी संशय आल्यास, कलम १७ खाली अपराध केलेल्या व्यक्तीच्या लेख्यांशी संबंधित असेल तेथवर त्याच्या खातेपुस्तिका तपासण्याचे अधिकार कलम १८ द्वारे चौकशी अधिकाऱ्यास दिले आहेत.

## प्रकरण पाच

## खटल्यासाठी मंजुरी आणि इतर संकीर्ण तरतुदी

### १९. खटल्यासाठी पूर्वमंजुरी आवश्यक असणे :–

(१) लोकसेवकाने, कलमे ७, १०, ११, १३ आणि १५ याखाली शिक्षापात्र अपराध केले असल्याचे अभिकथित असेल तर, कोणतेही न्यायालय, पुढीलप्रमाणे पूर्वमंजुरी घेतली असल्याखेरीज अपराधाची दखल घेणार नाही.

(a) संघराज्याच्या व्यवहाराशी संबंधित सेवेमध्ये असलेल्या आणि केंद्र शासनाच्या मंजुरीखेरीज सेवेतून काढता न येणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत, त्या शासनाची;

(b) राज्याच्या व्यवहाराशी संबंधित सेवेमध्ये असलेल्या व राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय सेवेतून काढून टाकता न येणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत, त्या शासनाची ;

(c) इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्याला त्याच्या पदावरुन काढून टाकण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाची.

(२) पोट–कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, ही पूर्वमंजुरी केंद्र शासन, किंवा राज्य शासन किंवा कोणतेही इतर प्राधिकरण यापैकी कुणी द्यावयाची याविषयी कोणत्याही कारणास्तव शंका निर्माण झाल्यास, जेव्हा अभिकथित अपराध घडला त्यावेळी लोकसेवकाला त्याच्या पदावरून काढून टाकण्यासाठी सक्षम असलेल्या शासनाकडून किंवा प्राधिकरणाकडून अशी मंजुरी देण्यात येईल.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही ––

(a) विशेष न्यायालयाने काढलेला कोणताही निष्कर्ष, दिलेली कोणतीही शिक्षा किंवा काढलेला कोणताही आदेश, पोट–कलम (१) अन्वये आवश्यक मंजुरी मिळालेली नसणे किंवा त्यात कोणतीही चूक असणे, वगळणूक किंवा अनियमितता असणे या कारणासाठी, न्यायालयाच्या मते त्यामुळे वस्तुत: न्याय निष्फळ होण्याचा प्रसंग निर्माण झाला असल्याखेरीज, एखाद्या न्यायालयाकडून, अपिलात, कायम करण्यात किंवा पुनरीक्षणात उलटवण्यात येणार नाही किंवा त्यात फेरबदल करण्यात येणार नाही;

(b) प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरीमधील कोणतीही चूक, वगळणूक किंवा अनियमितता या आधारे, तशी चूक, वगळणूक किंवा अनियमितता यामुळे न्याय निष्फळ (Failure of Justice) झाला आहे अशी न्यायालयाची खात्री झाल्याखेरीज, कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखालील कार्यवाही स्थगित करणार नाही;

(c) कोणतेही न्यायालय, कोणत्याही इतर कारणास्तव या अधिनियमाखालील कार्यवाही स्थगित करणार नाही. आणि कोणतेही न्यायालयात, कोणतीही चौकशी, खटला, अपील किंवा इतर कार्यवाही यामध्ये दिलेल्या कोणत्याही अंतर्वादिक (Interlocutory) आदेशाच्या संबंधात पुनरीक्षणाच्या अधिकाराचा वापर करणार नाही.

(४) अशा मंजुरीच्या अभावामुळे किंवा त्यातील कोणतीही चूक, वगळणूक किंवा अनियमितता यामुळे किंवा याच्या परिणामी कोणताही न्याय निष्फळ झाला आहे हे पोट–कलम (३) अन्वये ठरवताना, न्यायालय हा आक्षेप कार्यवाहीच्या यापूर्वीच्या कोणत्याही टप्प्यावर घेता आला असता किंवा घ्यावयास हवा होता, या बाबीकडे लक्ष देईल.

**स्पष्टीकरण :–** या कलमाच्या प्रयोजनाकरिता,––

(a) चूक यामध्ये मंजुरी देण्यातील प्राधिकरणाची सक्षमता अंतर्भूत असेल;

(b) खटल्यासाठी 'आवश्यक असलेली मंजुरी, यामध्ये खटला एखाद्या विनिर्दिष्ट प्राधिकरणाच्या सांगण्यावरून किंवा एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीच्या मंजुरीने चालवण्यात येईल या प्रकारच्या कोणत्याही आवश्यक गोष्टींचा, तसेच तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही आवश्यक गोष्टींचा समावेश असेल.

टीप

**वैध मंजुरी कशास म्हणावे :**

(१) कोणतीही मंजुरी वैध ठरण्यासाठी मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्यापुढे सर्व तथ्ये आली पाहिजेत. कायद्याने आवश्यक नसले तरी या तथ्यांचा मंजुरी आदेशात निर्देश केलेला असावा. कायद्याने आवश्यक नसल्याने तथ्यांचा मंजुरी आदेशात अंतर्भाव केलेला नसला तरीदेखील अशी तथ्ये मंजुरी अधिकाऱ्याने विचारात घेतली होती ही बाब अभियोग पक्षाला सिद्ध करावी लागते. लोकसेवकाविरुद्ध अभियोग चालवण्यासाठी मंजुरी ही अत्यावश्यक व महत्त्वाची बाब आहे. गोकुलचंद द्वारकादास मोराका वि. किंग **(ए. आय. आर. १९४८ पी.सी. ९२ : ४९ क्रिमि. लॉ. जर्नल २६१)** या प्रकरणांमध्ये मंजुरी अधिकाऱ्याला केवळ आरोपीचे नावच माहीत होते. अन्य कोणताही पुरावा त्याच्यासमोर नव्हता. या कारणामुळे न्यायालयाने ही मंजुरी अवैध ठरवली. मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याला प्रकरणाची तथ्ये पूर्णपणे माहीत असणे व विशेषत: त्या तथ्याशी तो सहमत असणे आवश्यक असते.

(२) याखेरीज आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे जेव्हा मंजुरी आदेशामध्ये तथ्यांचा निर्देश केला नसेल व अभियोग पक्षाची मदार ज्या पुराव्यावर आहे तो पुरावा मंजुरी अधिकाऱ्यापुढे ठेवण्यात आला होता हे सिद्ध करणारा पुरावा अभियोग पक्ष सादर करू शकला तरच मंजुरी वैध आदेश ठरतो, अन्यथा तो अवैध ठरतो **(सौराष्ट्र राज्य वि. विप्रा छगनलाल कालिदास, ए. आय. आर. १९५३, सौ. १३९: क्रिमि. लॉ. जर्नल १२६८).**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ याच्या कलम ७९ अन्वये नियुक्त केलेल्या व रुपये १,२०० पेक्षा कमी मूळ वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यावर अभियोग चालवण्यासाठी महापालिका आयुक्तांनी दिलेली मंजुरी, अशी मंजुरी स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय देण्यात आल्याने अवैध ठरवण्यात आली **(किशनचंद खूबचंद जोगीत यांनी वि. राज्य, १९९२, क्रिमि. लॉ. जर्नल १०७१).**

या खंडात, जो व्यक्ती संघराज्यक्षेत्र, राज्य शासन किंवा इतर प्राधिकरण यांच्या व्यवहाराच्या संबंधात सेवेमध्ये आहे अशा व्यक्तीवर खटला चालवण्यासाठी पूर्वमंजुरीची तरतूद करण्यात आली असून हा खंड, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ६ प्रमाणे आहे. फक्त याच्या खंड १९ (३) मध्ये, मंजुरीच्या अनियमिततेच्या आधारावर कोर्टाचा कोणताही निष्कर्ष उलटवता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच, मंजुरीमधील अनियमिततेच्या किंवा अन्य कोणत्याही आधारावर या खटल्यातील कार्यवाही कोणतेही न्यायालय स्थगित करू शकणार नाही.

मंजुरी कायदेशीर आहे हे पुराव्याने सिद्ध करण्याचा भार अभियोग पक्षावर आहे. यामध्ये प्रस्तावित खटला ज्यावर आधारीत आहे अशा तथ्यांच्या संदर्भात मंजुरी प्राधिकरणाकडून मंजुरी मिळालेली आहे याविषयीच्या पुराव्याचा अंतर्भाव होतो. ही तथ्ये एकतर मंजुरी आदेशामध्ये नोंदवली असतील किंवा ही तथ्ये मंजुरी प्राधिकरणासमोर मांडल्यानंतर खटल्यासाठी मंजुरी देण्यात आली हे स्वतंत्र पुराव्याने सिद्ध करता येईल. मंजुरी प्राधिकाऱ्याने खटल्यास मंजुरी, न्यायालयासमोर सादर करण्यात येणाऱ्या मंजुरी

आदेशाद्वारे देण्याऐवजी फाईलवर सही करून दिली यामुळे फारसा फरक पडत नाही. **(राजस्थान राज्य विरुद्ध ताराचंद जैन, (१९७४) ३ स. न्या. प्र. २८० (१९७४) १ स. न्या. प्र. १४६: १९७३ स. न्या. प्र. (फौज) ७७४).**

न्यायालय अपराधाची दखल घेते; अपराधी व्यक्तीची नव्हे **(पश्चिम बंगाल राज्य विरुद्ध मनमल भुटोरिया, (१९७७) ३ स. न्या. प्र. ४४०; १९७७ स. न्या. प्र. (फौज) ५२०).**

मंजुरी सबळ पुराव्यावर आधारित नसेल तर अभियोगपक्षापुढील खटला विधिबाह्य होतो. **(रघुबीसिंग विरुद्ध हरयाना राज्य (१९७४) ४ स. न्या. प्र. ५६० (परि. ६) : १९७४) स. न्या. प्र. (फौज) ५९६).**

कलम ६ आणि तत्सम इतर कलमे यामागचे धोरण असे आहे की, लोकसेवकांना निष्कारण त्रास होऊ नये. क्षुल्लक व ज्यास पुष्टी मिळत नाही अशा आरोपांमुळे होणाऱ्या त्रासापासून लोकसेवकांना वाचवणे हा यामागील उद्देश आहे, म्हणून आरोपांची दखल घेतली जाण्याकरिता कायदेशीर मंजुरी असणे ही पूर्वावश्यक बाब आहे, कलम ६ अन्वये आवश्यक असलेल्या कायदेशीर मंजुरीखेरीज भरलेला खटला हा न्यायालयाच्या अधिकारतेबाहेरील खटला होय. **(आर. एस. नायक विरुद्ध ए. आर. अंतुले, (१९८४) २. एस. न्या. प्र. (फौज) १७२).**

## कलम १९ चे विवेचन

राज्य किंवा केंद्र शासन किंवा अन्य सक्षम प्राधिकरण यांच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध विनाकारण, तिला त्रास देण्याच्या हेतूने कार्यवाही केली जाऊ नये या हेतूने या कलमामध्ये लोकसेवकाच्या वाजवी सुरक्षेसाठी, त्याच्यावर कार्यवाही करण्यापूर्वी मंजुरीची तरतूद केली आहे. मात्र अपराधी लोकसेवक कायद्याच्या कक्षेतून सुटावा हा या कलमामागचा हेतू नाही. ज्यावेळी लोकसेवकाविरुद्ध खटला भरण्यासाठी मंजुरी मागण्यात येते, त्यावेळी अशी मंजुरी द्यावयाची किंवा नाही, ही बाब संपूर्णपणे मंजुरी प्राधिकरणाच्या स्वेच्छा निर्णयावर अवलंबून असते. मंजुरी प्राधिकरण त्यास इष्ट वाटेल अशा कोणत्याही कारणास्तव मंजुरी नाकारू शकते. ही मंजुरी लोकसेवकाला सुरक्षा प्रदान करण्यासाठी आवश्यक आहे. लोकसेवकाने त्याच्या पदाचे कर्तव्य बजावीत असताना, अनेकांचा रोष ओढवून घेणे स्वाभाविक आहे, तो त्याच्या कर्तव्यकठोरतेमुळे अनेक शत्रूही निर्माण करीत असेल. अशा असामाजिक तत्त्वांपासून त्याचे रक्षण व्हावे हा या कलमामागील हेतू आहे. इंदूभूषण चौधरी वि. प. बंगाल राज्य **(एआरआर १९५५ कलकत्ता ४३० : १९५५ क्रिमि. लॉ. जर्नल १०६९)** या प्रकरणात कलकत्ता उच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले की, मंजुरी प्राधिकरण हे फौजदारी न्यायालयाच्या दरवाज्यावर उभ्या असलेल्या पहारेकऱ्यासारखे आहे. न्यायालयाच्या आत कोणतेही असामाजिक तत्त्व शिरू नये, याकडे लक्ष पुरवणे हे त्याचे काम आहे. म्हणून, अशी मंजुरी देण्यापूर्वी निर्दोष लोकसेवकाची प्रतिष्ठा धोक्यात येत नाही याकडे लक्ष पुरवणे हे त्याचे काम आहे.

खटला दाखल करण्यापूर्वी मंजुरी न मिळवणे हा केवळ तांत्रिक दोष नाही. कारण निरपराध लोकसेवकांना संरक्षण देणे हाच या कलमाचा हेतू आहे, म्हणून, मंजुरी मिळवणे ही केवळ औपचारिक बाब आहे असे पोलीस किंवा अन्य अधिकाऱ्यांनी समजण्याचे कारण नाही. अशी मंजुरी असलेली कागदपत्रे दाखल केली की न्यायाधीश त्याची दखल घेते. म्हणजे त्याचा न्यायदृष्ट्या विचार (Judicial Notice) करते व त्यावर कार्यवाही सुरू करावयाची की नाही हे ठरवते.

**न्यायालयाची, मंजुरीची चार प्रकारात विभागणी करते :**

(१) मंजुरी नसणे.

(२) अवैध मंजुरी.

(३) सदोष मंजुरी.

(४) उचित मंजुरी.

यापैकी पहिल्या प्रकारामध्ये कोणत्याही प्रकारची न्यायिक कार्यवाही सुरू करता येत नाही. मंजुरी देण्यासाठी सक्षम नसलेल्या प्राधिकरणाने दिलेली मंजुरी ही अवैध मंजुरी असते. याबाबतीत न्यायिक कार्यवाही करता येत नाही. खटला चालू झाल्यानंतरही ही बाब निदर्शनास आणून दिल्यास खटला रद्दबातल होतो. विशिष्ट प्रकरणाचा कोणताही विचार न घेता चाकोरीवजा दिलेली मंजुरी ही सदोष मंजुरी असते. याबाबत निर्णय देताना अनेक अडचणी निर्माण होतात. कारण सदोष मंजुरीच्या बाबतीत, अभियोगी पक्षाला, मंजुरी प्राधिकरणाकडे प्रकरणाचा सर्व तपशील पुरवण्यात आला, आणि मंजुरी प्राधिकरणाने, यांत्रिकपणे मंजुरी न देता प्रकरणाची छाननी केल्यानंतर मंजुरी दिली हे सिद्ध करावे लागते. उचित मंजुरी ही सर्वच बाबतीत उचित असल्याने त्याबाबत कोणतीही अडचण उद्‌भवत नाही. या मंजुरीसाठी कोणताही नमुना विहित करण्यात आलेला नाही. (मात्र, अशा मंजुरी आदेशाचा नमुना खाली दिलेला आहे.) परंतु मंजुरी आदेशात, मंजुरी अधिकाऱ्यापुढे सर्व तथ्ये ठेवण्यात आली होती व त्याचा सारासार विचार करूनच मंजुरी देण्यात आली ही बाब नमूद करावी लागते. या मंजुरीची गरज फक्त न्यायालयाने त्या प्रकरणांची दखल घेण्यापुरतीच मर्यादित असते हे या ठिकाणी लक्षात ठेवले पाहिजे.

**मंजुरी आदेश पुढील नमुन्यात काढता येतील :––**

**आदेश**

दिनांक

ज्याअर्थी, ............ या पदावर काम करीत असलेल्या श्री. ................................ यांनी दिनांक ................... रोजी किंवा त्या सुमारास खालील अपराध केला आहे (आरोपीने केलेल्या अपराधाचा तपशील देण्यात यावा).

आणि ज्याअर्थी, त्याने केलेल्या या कृती, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० अधिनियम ४५/ कलम ५ (२) याचे कलम / कलमे, तसेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ (१९४७ चा अधिनियम (२), कलम ५ (१) (समुचित खंड दाखल करावा) या अन्वये शिक्षायोग्य अपराध ठरतो/ठरतात.

आणि ज्याअर्थी, मी .................... (मंजुरी प्राधिकाऱ्याचे नाव व हुद्दा नमूद करावा), उक्त श्री. ................ यांना सेवेतून कमी करण्यासाठी समुचित प्राधिकारी असून, त्याच्यावरील आरोपाच्या संबंधात माझ्यापुढे ठेवण्यात आलेल्या तथ्यांची तसेच एकूण परिस्थितीची संपूर्णपणे व काळजीपूर्वक तपासणी केल्यानंतर उक्त श्री. ........................... यांच्याविरुद्ध उक्त अपराधासाठी न्यायालयात अभियोग चालवावा अशा निर्णयाप्रत आलो आहे.

त्याअर्थी, आता मी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ (१९४७ चा अधिनियम (२) याच्या कलम ६ (१) (c) अन्वये उक्त श्री. ........................... यांच्या विरुद्ध उक्त अपराधाबद्दल / अपराधांबद्दल तसेच वरील अधिनियमाच्या संबंधातील कायद्यातील इतर तरतुदी अन्वये शिक्षायोग्य कोणत्याही इतर अपराधाबद्दल अभियोग चालवला जाण्यासाठी आणि सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाद्वारे उक्त अपराधांची दखल घेतली जाण्यासाठी, याद्वारे मंजुरी देत आहे.

प्राधिकाऱ्याचे नाव व हुद्दा

कार्यालयाची मोहर किंवा शिक्का

**२०. लोकसेवक कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज इतर परितोषण स्वीकारीत असेल अशा वेळेचे गृहितत्त्व :–**

(१) कलम ७ किंवा कलम ११ किंवा कलम १३ चे पोट–कलम (१), खंड (a) किंवा खंड (b) याखाली शिक्षापात्र असलेल्या खटल्याच्या वेळी, आरोपी व्यक्तीने स्वत:साठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीसाठी कोणत्याही व्यक्तीकडून (कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज इतर) कोणतेही परितोषण किंवा कोणतीही मूल्यवान वस्तू स्वीकारली असल्याचे, प्राप्त केली असल्याचे किंवा

स्वीकारण्यास मान्यता दिल्याचे किंवा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे सिद्ध झाल्यास, त्याविरुद्ध सिद्ध होईपर्यंत, त्या व्यक्तीने, कलम ७ मध्ये निर्देशलेल्या प्रलोभन किंवा बक्षीस, मोबदला दिल्याशिवाय किंवा जो पुरेसा नाही हे माहीत असताना असा मोबदला देऊन तसे परितोषण किंवा यथास्थिती, मूल्यवान वस्तू स्वीकारली, प्राप्त केली, स्वीकारण्यास मान्यता दिली किंवा मिळवण्याचा प्रयत्न केला, असे गृहीत धरण्यात येईल.

(२) कलम १२ किंवा कलम १४ च्या खंड (b) अन्वये शिक्षापात्र अपराधाविषयीचा कोणताही खटला चालू असता, आरोपी व्यक्तीने (कायदेशीर पारिश्रमिकाव्यतिरिक्त) कोणतेही परितोषण किंवा मूल्यवान वस्तू दिली असल्याचे किंवा देण्याचे कबूल केले असल्याचे किंवा देण्याचा प्रयत्न केला असल्याचे सिद्ध झाल्यास, त्या विरुद्धचे सिद्ध होईपर्यंत, त्या व्यक्तीने, कलम ७ मध्ये निर्देशिलेले प्रलोभन किंवा बक्षीस, कोणत्याही मोबदल्याशिवाय किंवा यथास्थिती, जो पुरेसा नाही असे माहीत असताना असा मोबदला देऊन, ते परितोषण किंवा ती मूल्यवान वस्तू दिली किंवा देण्याचे कबूल केले किंवा देण्याचा प्रयत्न केला असे गृहीत धरण्यात येईल.

(३) पोट–कलमे (१) व (२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जर असे परितोषण किंवा वर वर्णन केलेली वस्तू न्यायालयाच्या मते, ज्यावरून भ्रष्टाचार घडला असे अनुमान काढणे अनुचित ठरेल एवढ्या क्षुद्र स्वरूपाची असल्यास, न्यायालय, उक्त पोट–कलमांपैकी कोणत्याही पोट–कलमात निर्देशिलेले गृहीतक काढण्यास नकार देऊ शकेल.

**टीप**

या खंडामध्ये, आरोपी लोकसेवकाने कायदेशीर पारिश्रमिकाव्यतिरिक्त परितोषण स्वीकारले असेल त्या बाबतीत खंड ७ किंवा खंड ११ किंवा खंड १३ (१) (a) किंवा (b) या अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या कोणत्याही खटल्यातील गृहीतत्वांची तरतूद केली असून हा खंड भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ४ प्रमाणेच आहे.

आरोपी शासकीय कर्मचाऱ्याने, या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिस्थितीत मूल्यवान वस्तू स्वीकारली किंवा प्राप्त केली ही बाब एकदा सिद्ध झाली की, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १८४७ या अन्वये उपस्थित केलेले गृहीतत्त्व हे कायद्याने मान्य केलेले गृहीतत्त्व असल्याने बंधनकारक असते. (परि. ५४) **(आर. एस. नायक विरुद्ध ए. आर. अंतुले, (१९८६) २ स. न्या. प्र. ७१६, ७६१. १९८६ स. न्या. प्र. (फौज) २५६).**

आरोपीवर आरोप ठेवावयाचा की नाही हे न्यायालय ठरवते त्या वेळी, तसेच आरोप ठेवण्यात आलेला असतो अशा वेळी, या दोन्ही वेळेस भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७, कलम ४ (नवीन अधिनियमाचे कलम २०) या खालील गृहीतत्त्वे विचारात घ्यावयाची असतात **(आर. एस. नायक विरुद्ध ए. आर. अंतुले, (१९८६) २ स. न्या. प्र. ७१६, ७२२, ७२३ : १९८६ स. न्या. प्र. (फौज) २५६).**

कलम ४ खालील गृहीतत्त्व, कलम ५ (२) तसेच कलम ५ (१) (३) याखालील आरोपांना लागू होत नाही, परंतु ते भारतीय दंड संहिता, कलम १६१ याखालील आरोपांना लागू होते. **(निरंजन पटनाईक वि. शशीभूषण कार, (१९८६) २ स. न्या. प्र. ५६९, ५७३: १९८६ स. न्या. प्र. (फौज) १९६).**

कलम ४ (१) मधील ''परितोषण'' या शब्दासाठी, शब्दकोशात त्यासाठी जो ''गरजा किंवा इच्छा शमवणे'' (Satisfaction of appetite or desire) असा अर्थ दिलेला आहे तोच अर्थ घेणे उचित ठरेल. या शब्दाचा, लाच देऊन त्याद्वारे पैसा प्रदान करणे असा शब्दच्छल करणे उचित ठरणार नाही. आरोपी व्यक्तीने कायदेशीर पारिश्रमिकाव्यतिरिक्त इतर परितोषण घेतले एवढेच सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. आणि अशा आरोपी व्यक्तीने कायदेशीर पारिश्रमिक नाही अशी विशिष्ट रक्कम स्वीकारली आहे एवढे पुराव्यानिशी दाखवले की, या कलमान्वये विहित केलेल्या अटींचे पालन होते आणि त्याखालील गृहीतत्व काढणे आवश्यक ठरते **(आसाम राज्य वि. कृष्ण राव, (१९७३) ३ स. न्या. प्र. २२७).**

## कलम २० चे विवेचन

गृहीतत्त्वे ही विवक्षित तथ्यांवरून न्यायाधीशांनी काढलेली अनुमाने असतात. आरोपीने परितोषणाची रक्कम स्वीकारली असे जर अभियोग पक्षाने सिद्ध केले तर, ही परितोषणाची रक्कम कलम ७ खाली आरोपीने बक्षीस म्हणून स्वीकारली असे गृहीतत्त्व काढता येते. सर्वसामान्यपणे आरोपीने बक्षीस म्हणून परितोषण स्वीकारले हे सिद्ध करण्याचे दायित्व अभियोगपक्षावर असते, परंतु, कलम २० अनुसार अभियोग पक्षाने, आरोपीने कोणतेही परितोषण किंवा मूल्यवान वस्तू स्वीकारली, किंवा स्वीकारण्याचे मान्य केले ही बाब सिद्ध करताच आरोपीविरुद्ध गृहीतत्त्व काढता येते. एकदा गृहीतत्त्व काढण्यात आले की, ते चुकीचे आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर असते. त्याला मिळालेले पारिश्रमिक त्याला वैधरीत्या देय होते आणि त्याने ते वैधरीतीने मिळवले आहे हे आरोपीला निर्विवादपणे सिद्ध करावे लागते. कलम १३ (१) व १३ (२) याखालील तथ्ये सिद्ध करण्याच्या भारातून अभियोगपक्षाला मुक्त करणे हा गृहीत–तत्त्वामागचा एकमेव उद्देश आहे. याच उद्देशाने ''गृहीत धरण्यात येईल''(shall be presumed) या शब्दाचा वापर करण्यात आला आहे. याचा अर्थ एवढाच की, विरुद्ध सिद्ध होईपर्यंत न्यायालय अभियोगपक्षाची तथ्ये सिद्ध आहेत असे मानील. तरी देखील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे **(ए. आय. आर. १९६४ स. न्या. ५७५)**, एखाद्याने केवळ पैसे स्वीकारले एवढ्यावरून गृहीतत्त्व काढता येत नाही तर या कलमाच्या पूर्तीसाठी स्वीकारलेली रक्कम ही वैध पारिश्रमिकाखेरीजची होती हे सिद्ध केले पहिजे.

**२१. आरोपी व्यक्ती सक्षम साक्षीदार असणे –**

या कलमाखाली शिक्षापात्र अपराधाचा जिच्यावर आरोप ठेवण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस बचाव पक्षासाठी सक्षम साक्षीदार होता येईल आणि त्याच खटल्यात, तिच्याविरुद्ध किंवा तिच्याबरोबरच आरोपी ठेवण्यात आलेल्या व्यक्तीविरुद्ध करण्यात आलेले आरोप खोडून काढण्यासाठी शपथेवर साक्ष देता येईल :

परंतु –

(a) त्याला, त्याने स्वत: विनंती केली असल्याखेरीज साक्षीदार म्हणून बोलावण्यात येणार नाही;

(b) त्या व्यक्तीने साक्ष न दिल्यास त्याबाबत अभियोगपक्ष कोणतीही टीकाटिप्पणी करणार नाही किंवा तिच्याविरुद्ध किंवा त्याच खटल्यात तिच्याबरोबर आरोप करण्यात आलेल्या इतर व्यक्तींविरुद्ध कोणत्याही गृहीतकास कारणीभूत होणार नाही.

(c) ज्याविषयी तिच्याविरुद्ध आरोप करण्यात आला आहे अशा अपराधाखेरीज तिने कोणताही अपराध केलेला आहे किंवा अशा अपराधासाठी ती सिद्धदोषी ठरली आहे किंवा वाईट चारित्र्याची आहे असे दर्शविण्याकडे कल असलेला कोणताही प्रश्न विचारण्यात येणार नाही आणि विचारण्यात आल्यास अशा प्रश्नाचे उत्तर देणे तिला आवश्यक असणार नाही; मात्र ––

(१) तिने अपराध केलेला आहे किंवा अशा अपराधासाठी ती सिद्धदोषी ठरली आहे याविषयीचा पुरावा, अशी व्यक्ती ज्या अपराधाविषयीचा तिच्यावर आरोप ठेवण्यात आला असेल त्या अपराधासाठी दोषी असल्यासंबंधीचा ग्राह्य पुरावा असेल, किंवा

(२) तिने व्यक्तिश: किंवा आपल्या वकिलामार्फत आपले स्वत:चे चांगले चारित्र्य प्रस्थापित करण्याच्या हेतूने अभियोग पक्षाच्या कोणत्याही साक्षीदाराला कोणताही प्रश्न विचारला असेल किंवा बचावाचे स्वरूप किंवा कामाची पद्धती अशी असेल की, अभियोगी व्यक्तीच्या किंवा तिच्या कोणत्याही साक्षीदाराच्या चारित्र्याचे हनन करणे अंतर्भूत असेल, किंवा

(३) त्याच अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीविरुद्ध तिने साक्ष दिली असेल, तर तिला त्याबाबत प्रश्न विचारता येतील व त्या प्रश्नांची उत्तरे देणे तिला आवश्यक राहील.

### टिप्पणी

फौजदारी प्रकरणातील नेहमीच्या कार्यपद्धतीपेक्षा ही वेगळी कार्यपद्धती आहे. या खंडामध्ये आरोपी व्यक्ती तिच्या बचावासाठी सक्षम साक्षीदार म्हणून साक्ष देऊ शकते अशी तरतूद केली असून हा खंड भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ७ सारखाच आहे.

### कलम २१ चे विवेचन

फौजदारी प्रक्रिया संहितेअन्वये आरोपीला शपथ देण्यात येत नाही व त्याला स्वत:चा साक्षीदार म्हणून उभेही राहता येत नाही. परंतु, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ अन्वये दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १६१ किंवा १६५ (किंवा १६५–A) अन्वये शिक्षायोग्य असलेल्या आरोपीस स्वत:चा साक्षीदार होण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

परंतु, अधिनियमामध्ये कुठेही अशी तरतूद करण्यात आलेली नाही की, आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप नाशाबित करण्यासाठी स्वत:च साक्ष देण्याच्या त्याच्या अधिकारासंबंधी त्यास जाणीव करून देण्याचे दायित्व न्यायाधीशावर आहे.

अधिनियमाच्या कलम ७ मधील तरतुदी फौजदारी पुरावा अधिनियम, १८९८ याच्यावरून घेतल्या आहेत. या अधिनियमाचे कलम एक पुढीलप्रमाणे आहे :––

''ज्याच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे अशी व्यक्ती या अधिनियमानुसार कार्यवाहीच्या प्रत्येक टप्प्यावर बचाव पक्षाचा सक्षम साक्षीदार होऊ शकतो; परंतु ––

(a) ज्याच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे अशा व्यक्तीने स्वत: अर्ज केल्याखेरीज त्याला साक्षीदार म्हणून बोलावण्यात येणार नाही,

(b) ज्याच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे अशा व्यक्तीने साक्ष देण्यास कसूर केल्यास ती बाब अभियोग पक्षाच्या कोणत्याही भाष्याचा (Comment) विषय होऊ शकणार नाही;

थोडक्यात, या कलमान्वये आरोपीला स्वत:च स्वत:चा साक्षीदार होण्याचा विकल्प दिला आहे तसे त्याने न केल्यास त्यावर टीका–टिप्पणी करण्याची अभियोग पक्षाला परवानगी देण्यात आली नाही. ज्यावेळी अशाप्रकारे आरोपी स्वत:च साक्षीदार होत असेल, त्यावेळी त्याच्या पूर्वीच्या अपराधांबद्दल किंवा वाईट चारित्र्याबद्दल उलटतपासणी करण्याचा अभियोग पक्षाला कोणताही अधिकार असत नाही. स्वत:चे चारित्र्य चांगले आहे हे सिद्ध करण्यासाठी स्वत:चा साक्षीदार म्हणून उभा असलेल्या आरोपीने अभियोगपक्षाच्या साक्षीदारांना काही प्रश्न विचारले किंवा सहआरोपीच्या संबंधात त्याने काही पुरावा सादर केला तरच हा उलटतपासणीचा अधिकार अभियोग पक्षाला असतो.

### २२. विवक्षित फेरबदलांच्या अधीनतेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ लागू होणे :–

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यातील तरतुदी या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या संबंधातील कोणत्याही तरतुदींना लागू असताना त्या जणू काही;

(a) कलम २४३ च्या पोट–कलम (१) मध्ये ''आरोपीला त्यानंतर बोलावण्यात येईल'' या मजकुराऐवजी, ''आरोपीने त्यानंतर तत्काळ किंवा न्यायालय परवानगी देईल अशा वेळेच्या आत, आपले साक्षीदार म्हणून ज्यांची तपासणी करण्याचे त्याने योजिले आहे अशा (कोणत्याही असल्यास) व्यक्तीची आणि ज्यांवर तो विसंबून राहणार असेल अशा

(कोणत्याही असल्यास) दस्तऐवजांची लेखी स्वरूपातील सूची देणे आवश्यक करण्यात येईल'' हा मजकूर घालण्यात आला असावा त्याप्रमाणे,

(b) कलम ३०९ च्या पोट–कलम (२) मध्ये तिसऱ्या परंतुकानंतर पुढील परंतुक घालण्यात आले असावे त्याप्रमाणे; ते असे :––

''परंतु तसेच की, कार्यवाहीतील पक्षकार असलेल्या व्यक्तीने कलम ३९७ अन्वये अर्ज दाखल केला आहे केवळ या सबबीवर कार्यवाही स्थगित केली जाणार नाही किंवा पुढे ढकलली जाणार नाही;''

(c) कलम ३९७ च्या पोट–कलम (२) नंतर पुढील पोट–कलम दाखल करण्यात आले असावे त्याप्रमाणे ––

''(३) पोट–कलम (१) किंवा पोट–कलम (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही न्यायाधीशास, त्याने नोंद करावयाच्या कारणास्तव त्याला योग्य वाटल्यास, आरोपी किंवा त्याचा वकील यांच्या अनुपस्थितीत चौकशी खटला पुढे सुरू ठेवता येईल आणि उलटतपासणीसाठी साक्षीदाराला पुन: बोलावण्याच्या आरोपीच्या अधिकाराच्या अधीनतेने कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवता येईल'';

(d) कलम ३९७ च्या पोट–कलम (१) मध्ये, स्पष्टीकरणापूर्वी पुढील परंतुक घालण्यात आले असावे त्याप्रमाणे :––

''परंतु अशा कार्यवाहीतील पक्षकाराने केलेल्या अर्जावरून न्यायालय या कलमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करत असेल अशा बाबतीत न्यायालय,––

(a) अभिलेख का मागण्यात येऊ नयेत याविषयीचे कारण दाखवण्याची इतर पक्षकाराला संधी दिल्याखेरीज, किंवा

(b) कार्यवाहीखालील अभिलेखांची तपासणी प्रमाणित प्रतीवरून करता येईल अशी त्याची खात्री झाल्यास,

सर्वसाधारणपणे अभिलेख मागवणार नाही.''

**टिप्पणी**

या खंडामध्ये विशिष्ट फेरबदलांच्या अधीनतेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या प्रयुक्ततेविषयाची तरतूद केली असून हा खंड, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ७–A प्रमाणेच आहे.

**२३. कलम १३ (१) (c) याखालील, अपराधांच्या संबंधातील आरोपांचा तपशील :–**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जेव्हा कलम १३ च्या पोट–कलम, (१) खंड (c) अन्वये आरोपीवर अपराधविषयक आरोप ठेवण्यात येत असेल तेव्हा, अशा आरोपपत्रामध्ये, ज्या मालमत्तेसंबंधी अपराध केल्याचे अभिकथित असेल अशा मालमत्तेचे आणि ज्या तारखांच्या दरम्यान अपराध घडला असण्याचे अभिकथित असेल अशा मालमत्तेच्या विशिष्ट बाबी किंवा उक्त संहितेच्या कलम २१९ च्या अर्थांतर्गत, अशाप्रकारे ठेवण्यात आलेला आरोप ही एकाच अपराधाचा आरोप असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, अशा तारखांपैकी पहिली व शेवटची तारीख यामध्ये एक वर्षापेक्षा अधिक कालावधी असणार नाही.

**टिप्पणी**

या खंडामध्ये खंड १३ (१) (c) याखालील अपराधाच्या संबंधित आरोपाच्या तपशिलाची तरतूद केली असून हा खंड भ्रष्टाचार अधिनियम, १९४७ याच्या कलम ६–A प्रमाणेच आहे.

**२४. लाच देणाऱ्या व्यक्तीच्या निवेदनावरून तिच्यावर खटला भरता येणार नाही :–**

त्या–त्या काळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कलम ७ ते ११ किंवा कलम

१३ आणि कलम १५ याखालील अपराधांसाठी लोकसेवकाविरुद्ध चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये एखाद्या व्यक्तीने लोकसेवकाला (कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज इतर) कोणतेही परितोषण दिले किंवा देण्याचे मान्य केले याविषयीचे कोणतेही निवेदन दिल्यास ते कलम १२ अन्वये अशा व्यक्तीविरुद्ध अभियोग लावला जाण्यास कारणीभूत ठरणार नाही.

**टिप्पणी**

या खंडामध्ये, लाच देणाऱ्या व्यक्तीने निवेदन दिल्यास त्यासाठी अशा व्यक्तीविरुद्ध कलम १२ अन्वये कोणत्याही प्रकारचा अभियोग लावला जाणार नाही अशी तरतूद केली असून हा खंड, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या कलम ८ प्रमाणेच आहे.

**२५. भू–सैनिकी, नौ–सैनिकी आणि वायु–सैनिकी किंवा इतर कायदे बाधित होणे :–**

(१) या अधिनियमातील कोणत्याही बाबीमुळे, भूसैनिकी, अधिनियम, १९५० (१९५० चा ४५), वायुसैनिकी अधिनियम, १९५० (१९५० चा ४६), नौसैनिकी अधिनियम, १९४५ (१९४५ चा ६२), सीमा सुरक्षाबल अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४७), तटरक्षक अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३०), आणि राष्ट्रीय रक्षक अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४७) याखाली कोणतेही न्यायालय किंवा प्राधिकरण यांनी वापरावयाची अधिकारता किंवा त्यास लागू असणारी कार्यपद्धती यास कोणतीही बाधा येणार नाही.

(२) शंकांचे निरसन करण्यासाठी याद्वारे हे जाहीर करण्यात येत आहे की, पोट–कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही अशा कायद्याच्या प्रयोजनासाठी विशेष न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**टीप**

या खंडामध्ये, या विधेयकातील तरतुदीमुळे भू–सैनिकी, वायुसैनिकी किंवा इतर कायदा बाधित होणार नाही अशी तरतूद केली असून तो भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९५२ याच्या कलम ११ प्रमाणेच आहे.

**२६. १९५२ च्या अधिनियम क्रमांक ४६ अन्वये नियुक्त करण्यात आलेले विशेष न्यायाधीश हे या अधिनियमाखाली नियुक्त केलेले विशेष न्यायाधीश असणे :–**

फौजदारी विधी सुधारणा अधिनियम, १९५२ या अन्वये कोणत्याही क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी नियुक्त करण्यात आलेला व या अधिनियमाच्या प्रारंभी पद धारण करणारा प्रत्येक विशेष न्यायाधीश, या अधिनियमाच्या कलम ३ खाली त्या क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी नियुक्त करण्यात आलेला विशेष न्यायाधीश असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, अशा प्रारंभाच्या तारखेस व तारखेपासून असा प्रत्येक न्यायाधीश, या अधिनियमातील तरतुदींनुसार अशा प्रारंभाच्या तारखेस त्याच्यापुढे प्रलंबित असलेल्या सर्व कार्यवायांबाबतचा व्यवहार पुढे चालू ठेवील.

**टिप्पणी**

या खंडामध्ये, फौजदारी विधी सुधारणा अधिनियम, १९५२ या अन्वये नियुक्त करण्यात आलेले प्रस्तावित विधिविधानाच्या प्रारंभाच्या तारखेस पद धारण करणारे विशेष न्यायाधीश हे खंड, ३ अन्वये नियुक्त करण्यात आलेले विशेष न्यायाधीश मानण्यात येतील.

**२७. अपील व पुनरीक्षण :–**

या अधिनियमातील तरतुदीच्या अधीनतेने, जणू काही विशेष न्यायालय हे उच्च न्यायालयाच्या स्थानिक सीमांमध्ये खटले चालवणारे सत्र न्यायालय असल्याप्रमाणे, उच्च न्यायालयास, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) द्वारे विहित केलेले अपील व पुनरीक्षणाचे सर्व अधिकार, ते लागू होतील तेथवर वापरता येतील.

**टिप्पणी**

या खंडामध्ये, उच्च न्यायालयाकडे अपील व पुनरीक्षणाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याची तरतूद केली असून तो फौजदारी विधी, सुधारणा अधिनियम, १९५२ याच्या कलम ९ प्रमाणेच आहे.

**२८. हा अधिनियम इतर कायद्यांच्या अतिरिक्त असणे :–**

या अधिनियमातील तरतुदी, त्या–त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या अतिरिक्त असतील; त्या न्यूनकारी (Derogatory) असणार नाही, आणि यामध्ये अंतर्भूत असलेल्या बाबीमुळे कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध या कायाद्याखेरीज इतर कायद्यान्वये दाखल केल्या जाऊ शकतील अशा कोणत्याही कार्यवाहीमधून त्याला सूट मिळणार नाही.

**टीप**

या खंडामध्ये, या अधिनियमातील तरतूदी त्या–त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या अतिरिक्त असतील; न्यूनकारी असणार नाहीत, अशी तरतूद केलेली आहे.

**२९. १९४४ च्या अध्यादेश ३८ ची सुधारणा :–**

फौजदारी विधी सुधारणा अध्यादेश, १९४४ यामध्ये

(a) कलम ३ चे पोट–कलम (१), कलम ९ चे पोट–कलम (१), कलम १० चा खंड (a), कलम ११ चे पोट–कलम (१), कलम १३ चे पोट–कलम (१) यामध्ये ज्या–ज्या ठिकाणी ''राज्य शासन'' हे शब्द येत असतील त्या ठिकाणी ''राज्य शासन किंवा, यथास्थिती, केंद्र शासन'' हे शब्द दाखल करण्यात येतील.

(b) कलम १० चा खंड (a) मध्ये ''तीन महिने'' या शब्दाऐवजी ''एक वर्ष'' हे शब्द दाखल करण्यात येतील.

(c) अनुसूचीमध्ये;

(i) परिच्छेद १ वगळण्यात येईल;

(ii) परिच्छेद २ व ४ मध्ये ––

(a) ''स्थानिक प्राधिकरण'' या शब्दानंतर, ''केंद्रीय, प्रांतिक किंवा राज्य अधिनियमान्वये स्थापन केलेले महामंडळ किंवा शासनाच्या मालकीचे, त्याच्या नियंत्रणाखाली असलेले किंवा त्याद्वारे अर्थसहाय्य देण्यात येणारे प्राधिकरण किंवा संस्था, किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केलेली शासकीय कंपनी किंवा असे महामंडळ, प्राधिकरण, निकाय (Body) किंवा शासकीय संस्था यांच्याद्वारे अर्थसाहाय्य देण्यात आलेली संस्था'' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(b) ''किंवा प्राधिकरण'' या शब्दानंतर ''किंवा महामंडळ किंवा निकाय किंवा शासकीय कंपनी किंवा संस्था'' हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(iii) ४–A या परिच्छेदाऐवजी पुढील परिच्छेद समाविष्ट करण्यात येईल.

''४–A. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याखाली शिक्षापात्र असलेला अपराध'';

(iv) परिच्छेद ५ मध्ये ''बाबी २, ३ व ४'' या मजकुराऐवजी ''बाबी'' २, ३, ४ आणि ४ अ'' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**टिप्पणी**

फौजदारी विधी सुधारणा अध्यादेश, १९४४ यामध्ये सुधारणा करणे, हा या खंडाचा हेतू आहे. सध्या, मालमत्ता जप्त

करण्यासाठी जिल्हा न्यायाधीशाकडे दाद मागण्याचा अधिकार केवळ राज्य शासनांना आहे. या खंडाद्वारे केंद्र शासनाकडे अधिकार देण्याचे प्रस्तावित केले आहे. सध्या जी केवळ तीन महिन्यांसाठीच वैध ठरते अशी अंतरिम जप्तीची मुदतही प्रथमतः एक वर्षासाठी वैध करण्याचे प्रस्तावित केले आहे. या अध्यादेशाच्या अनुसूचीमध्येही सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले असून, त्यात केवळ केंद्र व राज्य शासनाच्याच मालमत्तेविरुद्धचे अपराध समाविष्ट केले आहेत असे नव्हे तर, त्यात, केंद्रीय, प्रांतिक व राज्य शासनांद्वारे स्थापन करण्यात आलेले महामंडळ किंवा शासनाच्या मालकीचे किंवा त्याने नियंत्रित केलेले किंवा त्याने अर्थसहाय्य दिलेले प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी याद्वारे अर्थसहाय्य मिळणारी संस्था यांचाही समावेश करण्यात आला आहे.

**३०. निरसन व व्यावृत्ती :–**

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ (१९४७ चा २) आणि फौजदारी विधी सुधारणा अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४६) यांचे याद्वारे निरसन करता येत आहे.

(२) या निरसनामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, परंतु, सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९८७ (१९८७ चा १०) याचे कलम ६ लागू करण्यात कोणतीही बाधा न आणता, अशाप्रकारे निरसित केलेल्या अधिनियमाच्या अन्वये किंवा अनुषंगाने केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही किंवा केल्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमातील तरतुदीशी विसंगत नसतील तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीखाली त्याच्या अनुषंगाने केली असल्याचे मानण्यात येईल.

**टिप्पणी**

या खंडामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ व फौजदारी विधी सुधारणा अधिनियम, १९५२ यांच्या निरसनाची तरतूद करण्यात आली आहे.

**३१. १८६० चा अधिनियम ४५ याच्या विवक्षित कलमांची वगळणूक :–**

भारतीय दंड संहितेची कलम १६१ ते १६५–A (दोन्हीही समाविष्ट) वगळण्यात येतील, आणि सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याचे कलम ६ हे उक्त कलम जणू काही केंद्रीय अधिनियमान्वये निरसित झाले असल्याप्रमाणे अशा वगळणुकीस लागू होईल.

**टिप्पणी**

या खंडामध्ये, आवश्यक त्या व्यावृत्तीच्या (Saving) तरतुदीसह, भारतीय दंड संहितेच्या कलम १६१ ते १६५–A च्या वगळणुकीची, तरतूद केली आहे.

––––––

# २५. अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४

**(सन १९५४ चा अधिनियम क्रमांक ३७)**

**(२९ सप्टेंबर १९५४)**

## अन्नभेसळीस प्रतिबंध करण्यासाठी तरतुदी करण्याबाबत अधिनियम

भारतीय गणराज्याच्या पाचव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो.

**प्रारंभिक**

**१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ :–**

(१) या अधिनियमास अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ असे म्हणता येईल

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) हा अधिनियम केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अमलात येईल.

**२. व्याख्या :–**

(i) 'भेसळकारी पदार्थ '' याचा अर्थ भेसळ करण्याच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येणारा किंवा वापरात येईल असा कोणताही पदार्थ असा आहे.

(i-a) ''भेसळयुक्त'' एखादा अन्नपदार्थ पुढील बाबतीत भेसळयुक्त असल्याचे मानले जाईल.

(a) जर विक्रेत्याने विकलेल्या अन्नपदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची प्रत खरेदीदाराच्या मागणीनुसार नसून, त्यामुळे त्याचा तोटा होण्यासारखा असेल अथवा तो जसा दिसतो किंवा जसा आहे असे अभिवेदन करण्यात आले आहे तशा गुणधर्माचा किंवा तशा मुख्य द्रव्याचा किंवा तशा प्रतीचा बनवलेला नसला तर;

(b) यामुळे त्या पदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची प्रत यांच्यावर अपायकारक परिणाम होईल असे इतर कोणतेही द्रव्य त्यात असेल किंवा अशा प्रकारे त्या पदार्थावर प्रक्रिया करण्यात आली असल्यास;

(c) यामुळे त्या पदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा अशा तऱ्हेने जर त्या पदार्थात निकृष्ट दर्जाचे किंवा सवंग असे द्रव्य संपूर्णत: घालण्यात आले असल्यास.

(d) यामुळे त्या पदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची गुणवत्ता यांच्यावर अपायकारक परिणाम होईल अशा प्रकारे जर त्या पदार्थातील एखादा घटक संपूर्णत: किंवा अंशत: काढून घेण्यात आला असल्यास;

(e) तो पदार्थ अस्वच्छ वातावरणात तयार करण्यात आल्यामुळे किंवा तशा वातावरणात आवेष्टित करण्यात आल्यामुळे किंवा तशा वातावरणात ठेवण्यात आल्यामुळे जर दूषित झाला असेल किंवा आरोग्यास अपायकारक झाला असल्यास;

(f) जर त्या पदार्थात संपूर्णत: किंवा अंशत: कोणतेही घाणेरडे, नासके, कुजके, सडलेले किंवा रोगग्रस्त अशा

प्राण्यापासून किंवा वनस्पतीपासून बनलेले द्रव्य असेल, किंवा त्या पदार्थावर कीड पडलेली असेल किंवा तो मनुष्य प्राण्याने सेवन करण्यास अयोग्य असल्यास;

(g) जर तो पदार्थ रोगग्रस्त प्राण्यापासून मिळवलेला असल्यास;

(h) यामुळे तो पदार्थ आरोग्यास अपायकारक होईल असे कोणतेही विषारी द्रव्य किंवा अन्य घटकद्रव्य त्यात असल्यास;

(i) जर त्या पदार्थाचे पात्र, यामुळे त्यात ठेवलेला पदार्थ आरोग्यास अपायकारक होतो अशा कोणत्याही विषारी किंवा हानिकारक द्रव्यापासून संपूर्णत: किंवा अंशत: बनवलेले असल्यास;

(j) जर त्याच्या संबंधात विहित केलेल्या रंजक द्रव्याव्यतिरिक्त इतर कोणतेही रंजक द्रव्य त्या पदार्थात वापरलेले असेल, किंवा पदार्थामध्ये वापरलेल्या विहित रंजक द्रव्याचे प्रमाण कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसल्यास;

(k) जर त्या पदार्थात कोणतेही मनाई केलेले रक्षकद्रव्य असेल किंवा अनुज्ञात रक्षकद्रव्य विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात असल्यास;

(l) जर त्या पदार्थाची प्रत किंवा शुद्धता विहित दर्जापेक्षा कमी असेल किंवा त्यामधील घटकद्रव्यांचे परिमाण कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसून, त्यामुळे तो पदार्थ आरोग्यास अपायकारक झाला नसल्यास;

परंतु मूलान्न असलेल्या एखाद्या अन्नपदार्थाची गुणवत्ता किंवा शुद्धता विहित मानकापेक्षा कमी झाली असेल किंवा त्यामधील घटकांचे परिमाण हे कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसून, दोन्ही बाबतीत केवळ नैसर्गिक कारणांमुळे तसे घडले असल्यास, असा पदार्थ या उपखंडाच्या अर्थानुसार भेसळयुक्त असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण :–** जर एक किंवा त्याहून अधिक मूलान्नपदार्थ एकत्र मिसळले असतील आणि अशा प्रकारे तयार झालेला अन्नपदार्थ साठवण्यात, विकण्यात किंवा वाटण्यात आला असेल; आणि

(b) तो आरोग्यास अपायकारक नसल्यास;

असा तयार पदार्थ या खंडाच्या अर्थानुसार भेसळयुक्त असल्याचे मानण्यात येणार नाही.

(ii) ''केंद्रीय अन्न प्रयोगशाळा'' याचा अर्थ, कलम ४ खाली स्थापन केलेली किंवा विनिर्दिष्ट केलेली प्रयोगशाळा किंवा संस्था, असा आहे;

(iii) ''समिती'' याचा अर्थ, कलम ३ खाली घटित केलेली केंद्रीय अन्न मानक समिती असा आहे;

(iv) ''संचालक केंद्रीय अन्न प्रयोगशाळा'' याचा अर्थ, केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे 'संचालक, केंद्रीय अन्न प्रयोगशाळा' म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे व यामध्ये संचालकांची या अधिनियमाखालील सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कामे करण्यासाठी केंद्र शासनाने तशाच तऱ्हेने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे

परंतु, कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती, आयात किंवा विक्री यामध्ये या कोणत्याही व्यक्तीचा आर्थिक हितसंबंध असेल अशा व्यक्तीची या खंडाखाली संचालकपदी नियुक्ती करण्यात येणार नाही.

(v) ''अन्न '' याचा अर्थ, औषधीद्रव्ये व पाणी वगळता मनुष्य प्राण्याने सेवन करावयाचे अन्न किंवा पेय म्हणून वापरण्यात येणारा कोणताही पदार्थ असा आहे व त्यात पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो.

(a) सर्वसाधारणपणे जो पदार्थ मानवी अन्नाच्या घटनेत किंवा तो तयार केले जात असताना त्यात उतरतो किंवा वापरला जातो असा कोणताही पदार्थ.

(b) कोणताही स्वादकारी पदार्थ किंवा मसाल्याचे पदार्थ आणि

(c) जो पदार्थ, त्याचा वापर, स्वरूप, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्याची प्रत लक्षात घेऊन, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अन्न म्हणून घोषित करीतल असा इतर कोणताही पदार्थ.

(vi) ''अन्न (आरोग्य) प्राधिकरण'' याचा अर्थ, संचालक, वैद्यकीय व आरोग्य सेवा किंवा राज्यामधील आरोग्य प्रशासनाचा प्रभारी मुख्य अधिकारी असा आहे, – मग तो कोणत्याही पदनामाने ओळखला जात असो आणि यात, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्र शासन किंवा राज्य शासन याने, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्राच्या संबंधात या अधिनियमाखाली अन्न (आरोग्य) प्राधिकरणाच्या यास शक्ती प्रदान केली असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो.

(vii) ''स्थानिक क्षेत्र'' याचा अर्थ, केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी स्थानिक क्षेत्र म्हणून घोषित केलेले कोणतेही नागरी किंवा ग्रामीण क्षेत्र, असा आहे;

(viii) ''स्थानिक प्राधिकरण'' याचा अर्थ; –

(१) जे स्थानिक क्षेत्र –

(a) नगरपालिका क्षेत्र म्हणून असेल त्याच्या बाबतीत, नगरपालिका मंडळ किंवा महानगरपालिका;

(b) कटक म्हणून असेल त्याच्या बाबतीत, कटक प्राधिकरण,

(c) अधिसूचित क्षेत्र म्हणून असेल त्याच्या बाबतीत, अधिसूचित क्षेत्र समिती, असा आहे.

(२) अन्य कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या बाबतीत, या अधिनियमान्वये केंद्र शासन किंवा राज्य शासन विहित करील असे प्राधिकरण असा आहे;

**महाराष्ट्र सुधारणा**

परंतु, महाराष्ट्र राज्यातील स्थानिक क्षेत्राच्या बाबतीत 'स्थानिक प्राधिकरण' याचा अर्थ, राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्रासाठी नियुक्त करता येईल असे राज्य शासनाचे प्राधिकरण किंवा अधिकारी असा आहे. (१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५० अन्वये सुधारणा करण्यात आली.)

(viii-a) ''स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण'' याचा स्थानिक क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, केंद्र शासन किंवा राज्य शासन याने, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पदनामाचा जो अधिकारी अशा क्षेत्रातील आरोग्य प्रशासनाचा प्रभारी म्हणून नियुक्त केला असेल तो अधिकारी, असा आहे;

(viii-b) ''निर्मिती'' यामध्ये, एखाद्या अन्नपदार्थाच्या निर्मितीला आनुषंगिक किंवा साह्यकारी असलेल्या कोणत्याही क्रियेचा समावेश आहे;

(ix) ''गैरछापाचा'' म्हणजे –

(a) एखादा दुसरा अन्नपदार्थ या नावाखाली विकला जात असेल त्या दुसऱ्या अन्नपदार्थाची तो नक्कल असेल किंवा त्याची प्रतिवस्तू म्हणून असेल किंवा यामुळे फसवणूक होण्यासारखी आहे इतके त्या दुसऱ्या पदार्थाशी त्याचे

साम्य असेल आणि त्याचे खरे स्वरूप व्यक्त होईल अशा प्रकारे स्पष्टपणे व ठळकपणे त्यावर लेबल लावलेले नसल्यास,

(b) तो एखाद्या ठिकाणाचे किंवा देशाचे उत्पादन आहे असे खोटे निवेदन केलेले असल्यास;

(c) दुसऱ्या अन्नपदार्थाच्या नावाखाली तो विकला जात असल्यास;

(d) तो पदार्थ खराब झाला आहे ही गोष्ट लपवण्यासाठी त्याला रंग किंवा स्वाद देण्यात आला असेल अथवा त्यावर पूट चढवण्यात आले असेल, त्याला पावडर लावली असेल किंवा त्याला पॉलिश केले असेल अथवा तो पदार्थ वस्तुत: आहे त्यापेक्षा अधिक चांगला किंवा अधिक किमती दिसेल अशा प्रकारे तयार केला असल्यास;

(e) लेबलवर किंवा अन्यत्र त्याच्याबाबत खोटे दावे सांगणारी विधाने केलेली असतील तर;

(f) निर्माणकाने किंवा उत्पादकाने किंवा त्याच्या सूचनेवरून तयार किंवा सीलबंद केलेल्या आणि त्याचे नाव व पत्ता असलेल्या आवेष्टनांमध्ये तो विकला जात असताना, प्रत्येक आवेष्टनाच्या बाहेरील बाजूवर, त्यातील पदार्थाचा तपशील, या अधिनियमान्वये कमीजास्तपणाबाबत विहित केलेल्या मर्यादेनुसार ठळकपणे व अचूकपणे नमूद केलेला नसल्यास;

(g) एखाद्या महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे किंवा दिशाभूल करणारे असे त्या पदार्थाच्या घटकद्रव्यांसंबंधीचे किंवा त्यात समाविष्ट असलेल्या द्रव्यांसंबंधीचे कोणतेही विधान, आकृती किंवा चिन्ह त्याच्या आवेष्टनावर किंवा आवेष्टनावरील लेबलवर असेल; किंवा ते आवेष्टन त्यातील वस्तूबाबत अन्य प्रकारे फसवणूक करणारे असल्यास;

(h) त्या पदार्थाच्या आवेष्टनावर किंवा आवेष्टनावरील लेबलवर त्या पदार्थाचा निर्माणक किंवा उत्पादक म्हणून कपोलकल्पित इसमाचे किंवा कंपनीचे नाव असल्यास;

(i) तो विशेष पथ्याच्या स्वरूपातील खाद्य म्हणून उपयोगाचा असल्याचे अभिप्रेत असेल किंवा तसे दर्शविण्यात आले असेल, परंतु, अशा कामी तो कसा उपयुक्त आहे यासंबंधी त्याच्या खरेदीदाराला पुरेशी माहिती व्हावी म्हणून त्यामधील जीवनसत्त्वे, खनिजे किंवा इतर पथ्यकर गुणधर्म याविषयी विहित केली जाईल अशी माहिती त्याच्या लेबलवर नसल्यास;

(j) वस्तुस्थिती जाहीर करणारे लेबल न लावता अथवा या अधिनियमाने किंवा त्याखाली केलेल्या नियमांनी आवश्यक केलेल्या गोष्टींचा भंग करून जर कोणताही कृत्रिम स्वाद, कृत्रिम रंग किंवा मालाचे रक्षण करणारे रासायनिक द्रव्य त्यात घातलेले असल्यास;

(k) सदर अधिनियम किंवा त्याअन्वये केलेले नियम यांनी आवश्यक केल्यानुसार त्यावर लेबल लावलेले नसल्यास. तो अन्नपदार्थ ''गैरछापाचा'' असल्याचे मानले जाईल;

(x) ''आवेष्टन'' याचा अर्थ, यामध्ये अन्नपदार्थ ठेवलेला असेल किंवा आवेष्टिलेला असेल अशी पेटी, बाटली, करंडक डबा, पिंप, खोका, पात्र, गोणी, पिशवी, वेष्टन किंवा अशी वस्तू, असा आहे;

(xi) ''वास्तू'' याचा अर्थ, जेथे कोणताही अन्नपदार्थ विकला जाईल, विक्रीसाठी त्याची निर्मिती केली जाईल किंवा विक्रीसाठी साठवला जाईल असे कोणतेही दुकान, ठेला किंवा ठिकाण, असा आहे;

(xii) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(xii-A)''मूलान्न'' याचा अर्थ निसर्गावस्थेतील शेतकी किंवा बागायती मालाच्या स्वरूपातील कोणताही अन्नपदार्थ, असा आहे;

(xiii) ''विक्री व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांचा अंतर्भाव करून त्याचा अर्थ, मनुष्यप्राण्याने सेवन करण्यासाठी किंवा वापरण्यासाठी अथवा विश्लेषणाच्या कामासाठी केलेली कोणत्याही अन्नपदार्थाची विक्री, असा आहे – मग ती रोख असो, उधारीवर असो व कशाच्या तरी बदल्यात असो, तसेच घाऊक असो वा किरकोळ असो, आणि त्यामध्ये विक्रीचा करार करणे, विक्रीचा प्रस्ताव मांडणे, असा कोणताही पदार्थ विक्रीकरिता मांडणे किंवा तो विक्रीसाठी जवळ बाळगणे यांचा समावेश आहे, आणि त्याचप्रमाणे त्यामध्ये असा कोणताही पदार्थ विकण्याच्या प्रयत्नाचाही समावेश आहे;

(xiv) 'नमुना'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधान्वये कोणत्याही अन्नपदार्थाचा घेतलेला नमुना, असा आहे;

(xv) एखाद्या अन्नपदार्थ संबंधात जेव्हा ''अपथ्यकर किंवा ''अपायकारक'' हे शब्द वापरले जातील तेव्हा त्यांचा अर्थ, तो पदार्थ अनुक्रमे आरोग्याला घातक किंवा मानवी उपयोगाला प्रतिकूल आहे, असा होतो.

**शीर्षसूची**

१. गैर छापाची विक्री :
३. पदार्थाचा प्रकार सिद्ध करणे :
२. विक्रीचा उद्देश नसणे :

**विवेचन**

**१. गैर छापाची विक्री :–**

एखादा पदार्थ गैरछापाने विकला जात असेल तर तो कलम २ (नऊ) (l) च्या तरतुदी अंतर्गत येतो. उदा. गाईचे म्हणून म्हशीच्या दुधाची विक्री करणे. **(किसन त्रिंबक कोथुला वि. महाराष्ट्र राज्य, (१९७७) १एस.एस.सी३०० ; १९७७ एस.सी.सी. (क्रिमी) ९७.)**

**२. विक्रीचा उद्देश नसणे :–**

मंदिरातील पूजा तथा अभिषेक करण्यासाठी राज्यातून तथा परराज्यातून मागविलेले तूप हे प्रसाद म्हणून वाटले. सदर तूप हे विक्री करण्याच्या तथा त्याचे पदार्थ तयार करून विकण्याचा उद्देश नसल्याने अशा तुपाचा नमुना घेण्याचा अधिकार नाही तथा अशा तुपाच्या मोबदल्यात दिलेल्या रकमेमुळेही ते तूप विक्री या सदरात येत नाही. **(व्हि.जां.के. मेनन विरुद्ध केरळ राज्य, १९९८ (४) क्राईम २१७ (केरळ)**

**३. पदार्थाचा प्रकार सिद्ध करणे :–**

आरोपीकडून अन्न निरीक्षकाने घेतलेले दूध हे कशाचे आहे हे सिद्ध झाले नाही. आरोपीने सदर दूध उंटाचे असल्याचा बचाव घेतला. निरीक्षकाने घेतलेले दूध कशाचे होते हे सिद्ध न झाल्याने आरोपीचा बचाव विचारात घेतला. **(रामालाल वि. राजस्थान राज्य, २००० क्रिमि. लॉ जर्नल ४७८३)**

**२–A. अर्थ लावण्याचा नियम :–**

जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अमलात नसलेल्या कायद्यांचा या अधिनियमामध्ये जो कोणताही उल्लेख असेल त्याचा त्या राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यात कोणताही त्याच्याशी समान कायदा अमलात असल्यास त्याचा उल्लेख म्हणून लावण्यात येईल.

## अन्नविषयक सर्वसाधारण तरतुदी

### ५. विवक्षित आयातीस बंदी :–

कोणत्याही व्यक्तीला

(i) कोणतेही भेसळयुक्त अन्न;

(ii) कोणतेही गैरछापाचे अन्न;

(iii) या कोणत्याही अन्नपदार्थाच्या आयातीसाठी लायसन विहित करण्यात आले असेल त्याच्या बाबतीत, लायसन्सच्या शर्तीचे अनुसरण केल्याखेरीज, कोणताही खाद्यपदार्थ; आणि

(iv) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करून कोणताही अन्नपदार्थ; भारतात आयात करता येणार नाही.

### ६. सागरी सीमाशुल्क कायदा लागू करणे आणि सीमाशुल्क अधिकाऱ्यांचे अधिकार :–

(१) सागरी सीमाशुल्काच्या संबंधात आणि तसेच सागरी सीमाशुल्क अधिनियम १८७८, कलम १८ अन्वये याच्या आयातीवर बंदी घातली आहे त्या मालाच्या संबंधात त्या त्या काळी अमलात असलेला कायदा, या अधिनियमाच्या बाबतीत या अधिनियमाच्या कलम १६ च्या उपबंधाच्या अधीनतेने लागू होईल, आणि सीमाशुल्क अधिकारी आणि त्या अधिनियमाद्वारे सीमाशुल्क समाहारकाला व इतर सीमाशुल्क अधिकाऱ्यांना नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्या अधिनियमान्वये शक्ती प्रदान झालेले अधिकारी यांना पूर्वोक्त अशा मालाच्या बाबतीत त्या–त्या काळी या शक्ती असतील त्याच त्यांना तशा अन्नपदार्थाच्या बाबतीत असतील.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांना बाध न येता, सीमाशुल्क समाहारकाला किंवा केंद्र शासनाने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला आयात केलेल्या एखाद्या पुडक्यात या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये आयात करण्यास बंदी असलेला कोणताही अन्नपदार्थ आहे असा संशय आल्यास, त्याला ते पुडके अडकवून ठेवता येईल, आणि ते अडकवून ठेवल्याचे वृत्त तो तात्काळ संचालक, केंद्रीय अन्न प्रयोगशाळा याला कळविल आणि त्याने आवश्यक केल्यास ते पुडके किंवा त्यातील कोणत्याही संशयित अन्नपदार्थाचे नमुने उक्त प्रयोगशाळेकडे पाठवील.

### ७. विविक्षित अन्नपदार्थाची निर्मिती, विक्री इत्यादीस बंदी :–

कोणत्याही व्यक्तीला स्वत:ला

(i) कोणत्याही भेसळयुक्त अन्नाची

(ii) कोणत्याही गैरछापाच्या अन्नाची

(iii) ज्या अन्नपदार्थाच्या विक्रीसाठी लायसन विहित केले असेल त्याच्या बाबतीत लायसनाच्या शर्तीचे अनुसरून केल्याखेरीज त्या अन्नपदार्थाची,

(iv) सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने ज्या अन्नपदार्थाच्या विक्रीला अन्न (आरोग्य) प्राधिकरणाने त्या–त्या काळी बंदी केली असेल अशा कोणत्याही अन्नपदार्थाची

(v) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करून कोणत्याही अन्नपदार्थांची किंवा

(vi) कोणत्याही भेसळकारी पदार्थांची विक्रीसाठी निर्मिती करता येणार नाही. त्याची साठवण करता येणार नाही किंवा तो विकता येणार नाही. किंवा वितरित करता येणार नाही. अथवा स्वत:च्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी तसे करवता येणार नाही.

**स्पष्टीकरण :**एखाद्या व्यक्तीने कोणतेही भेसळयुक्त अन्न अथवा गैरछापाचे अन्न अथवा खंड (iii) किंवा खंड (iv) किंवा खंड (v) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारचा कोणताही अन्नपदार्थ यांचा, त्यापासून कोणत्याही अन्नपदार्थांची विक्रीसाठी निर्मिती करण्याकरिता साठा केला तर ती व्यक्ती तशा प्रकारच्या अन्नाचा साठा करीत आहे असे या कलमांच्या प्रयोजनार्थ समजण्यात येईल.

**१०. अन्न निरीक्षकांचे अधिकार :–**

(१) अन्न निरीक्षकाला पुढील गोष्टी करण्याची सक्ती असेल –

(a) कोणत्याही अन्नपदार्थांचे नमुने

(i) असा पदार्थ विकणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून घेणे.

(ii) असा पदार्थ खरेदीदाराकडे किंवा मालप्रेषितीकडे घेऊन जात असलेल्या, सुपूर्द करीत असलेल्या किंवा सुपूर्द करण्याची तयारी करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून घेणे.

(iii) असा कोणताही पदार्थ मालप्रेषितीकडे स्वाधीन केल्यानंतर त्याच्याकडून घेणे आणि

(b) ज्या स्थानिक क्षेत्रातून असा नमुना घेतला असेल त्याच्या शासकीय विश्लेषकाकडे असा नमुना विश्लेषणाकरिता पाठविणे.

(c) संबंधित स्थानिक क्षेत्रात अधिकारिता असणाऱ्या स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने किंवा अन्न (आरोग्य) प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी एखाद्या अन्नपदार्थाच्या विक्रीस बंदी करणे.

**स्पष्टीकरण –** खंड (a) चा उपखंड (iii) याच्या प्रयोजनार्थ मालप्रेषिती यामध्ये जी व्यक्ती कोणताही अन्नपदार्थ तिच्या स्वत:च्या उपयोगासाठी खरेदी करील किंवा मिळविल अशा व्यक्तीचा समावेश होत नाही.

(२) कोणत्याही अन्न निरीक्षकास, जेथे कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती केली जाते किंवा तो विक्रीसाठी साठवण्यात येतो किंवा विक्रीसाठी ठेवावयाच्या इतर कोणत्याही अन्नपदार्थांची निर्मिती करण्यासाठी साठवण्यात येतो किंवा विक्रीसाठी ठेवण्यात येतो, किंवा मांडण्यात येतो किंवा जेथे कोणत्याही भेसळकारी पदार्थांची निर्मिती करण्यात येते किंवा तो ठेवण्यात येतो, अशा कोणत्याही ठिकाणी प्रवेश करून पाहणी करता येईल व विश्लेषणाकरिता अशा अन्नपदार्थाचे किंवा भेसळकारी पदार्थांचे नमुने घेता येतील.

परंतु मूलान्नाच्या स्वरूपातील कोणताही अन्नपदार्थ जर असे अन्न म्हणून विकण्याचा उद्देश नसेल तर या कलमान्वये त्याचा कोणताही नमुना घेण्यात येणार नाही.

(३) पोटकलम (१) चा खंड (a) किंवा पोटकलम (२) खाली कोणताही नमुना घेण्यात आला असेल त्या बाबतीत तो पदार्थ लोकांना नेहमी या दराने विकला जातो त्या दराने काढलेली त्याची किंमत तो या व्यक्तीकडून घेण्यात आला असेल तिला देण्यात येईल.

(४) अन्न म्हणून वापरण्यासाठी उद्देशित असलेला कोणताही पदार्थ भेसळयुक्त किंवा गैरछापाचा आहे असे कोणत्याही अन्न निरीक्षकास आढळून आले तर यात पुढे दिलेली कार्यवाही करता यावी म्हणून त्यास असा पदार्थ जप्त करून घेऊन जाता येईल किंवा विक्रेत्याच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवता येईल. आणि दोन्ही बाबतीत, तो अशा पदार्थांचा नमुना घेऊन तो विश्लेषणाकरिता शासकीय विश्लेषकांकडे सादर करतील.

परंतु अन्ननिरीक्षक असा पदार्थ विक्रेत्याच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवील तेव्हा, विक्रेत्याला तो अशा पदार्थाच्या किमतीइतक्या रकमेचे बंधपत्र अन्न निरीक्षकाला योग्य वाटेल त्याप्रमाणे एका किंवा अधिक जामीनदारांसह निष्पादित करून देण्यास फर्मावू शकेल व तदनुसार विक्रेत्याला तसे बंधपत्र निष्पादित करून द्यावे लागेल.

(४–A) पोटकलम (४) खाली जप्त केलेला अन्नपदार्थ नाशवंत स्वरूपाचा असेल आणि असा अन्नपदार्थ इतका खराब झाला आहे की माणसांनी खाण्यासाठी तो वापरण्यास अयोग्य आहे अशी स्थानिक (आरोग्य ) प्राधिकरणाची खात्री पटल्यास, विक्रेत्याला लेखी नोटीस देऊन नंतर उक्त प्राधिकरणास तो पदार्थ नष्ट करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(५) या कलमान्वये प्रदान केलेल्या शक्तीमध्ये, यात कोणताही अन्नपदार्थ असेल असे कोणतेही पुडके फोडून उघडण्याची किंवा जेथे कोणताही अन्नपदार्थ विक्रीसाठी ठेवला असेल अशा कोणत्याही वास्तूचा दरवाजा फोडून उघडण्याचा अधिकार अंतर्भूत आहे.

परंतु, पुडके किंवा दरवाजा फोडून उघडण्याच्या अधिकारात वापर करावयाचा झाल्यास पुडक्याचा मालक अथवा जिच्या ताब्यात पुडके असेल किंवा, प्रकरणपरत्वे, जिच्या वहिवाटीत ती वास्तू असेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती त्या वास्तूमध्ये उपस्थित असून तिला पुडके किंवा दरवाजा उघडण्यासाठी सांगितले असता तसे करण्यास तिने नकार दिल्यानंतरच आणि दोन्ही बाबतीत तसे करण्याबद्दल कारणे नमूद करून नंतरच असा वापर करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, या कलमान्वये एखाद्या वास्तूमध्ये प्रवेश करून पाहणी करण्याचा अधिकाराचा वापर करताना अन्न निरीक्षक, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अन्वये काढलेल्या झडती वॉरंटाची अंमलबजावणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने एखाद्या वास्तूची झडती अथवा तपासणी करण्यासंबंधी त्या संहितेत जे उपबंध असतील त्यांचे होईल तेथवर अनुसरण करील.

(६) एखाद्या प्रकारच्या अन्नपदार्थांचा निर्माणक, वितरक किंवा व्यापारी याच्या कब्जात अथवा त्या नात्याने त्याने ताब्यात ठेवलेल्यांपैकी कोणत्याही वास्तूमध्ये कोणताही भेसळकारी पदार्थ सापडला आणि तो पदार्थ आपल्या कब्जात कसा याबद्दल तो अन्न निरीक्षकाचे समाधान होईल अशा प्रकारे खुलासा करू शकला नाही तर तो पदार्थ आणि त्याच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असल्याचे आढळलेली ती कोणतीही हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज या अधिनियमाखालील कोणतेही अन्वेषण किंवा कार्यवाही यासाठी उपयुक्त होऊ शकतील किंवा संबद्ध ठरू शकतील ती अन्न निरीक्षकाला जप्त करता येतील आणि अशा भेसळकारी पदार्थांचा नमुना शासकीय विश्लेषकांकडे विश्लेषणासाठी सादर करता येईल.

परंतु अशी कोणतीही हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज अन्न निरीक्षकाला, तो ज्या प्राधिकरणास पदाच्या नात्याने दुय्यम असेल अशा प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेखेरीज जप्त करता येणार नाहीत.

(७) जेव्हा अन्न निरीक्षक पोटकलम (१) चा खंड (a) किंवा पोटकलम (४) किंवा पोटकलम (६) अन्वये कोणतीही कारवाई करील तेव्हा तो एका व्यक्तीला किंवा अधिक व्यक्तींना अशी कारवाई केली जात असताना उपस्थित राहावयास सांगेल व तिची किंवा त्यांची सही घेईल.

(७–A)) पोटकलम (६) अन्वये कोणतीही हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज जप्त केले जातील त्याबाबत ते जप्त केल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त तीस दिवसांच्या आत, अन्न निरीक्षक, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या व्यक्तीने प्रमाणित केल्याप्रमाणे त्याच्या नकला किंवा त्यातील उतारे काढून घेऊन नंतर, ज्या व्यक्तीकडून ते जप्त करण्यात आले होते त्या व्यक्तीला ते परत करील.

परंतु अशा व्यक्तीने अशा प्रकारे प्रमाण करण्यास नकार दिला असेल आणि या अधिनियमाखाली त्या व्यक्तीच्या विरुद्ध खटला भरण्यात आला असेल तर अशी हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज, न्यायालयाने प्रमाणित केल्याप्रमाणे त्यांच्या नकला किंवा त्यातील उतारे काढून घेतल्यानंतरच परत करण्यात येतील.

(७–B) पोटकलम (६) खाली कोणताही भेसळकारी पदार्थ जप्त केला असेल त्या बाबतीत असा भेसळकारी पदार्थ भेसळ करण्यासाठी वापरण्याचा उद्देश नव्हता हे शाबीत करण्याचा भार असा भेसळकारी पदार्थ जिच्या ताब्यातून जप्त करण्यात आला असेल अशा व्यक्तींवर असेल.

(८) कोणताही अन्न निरीक्षक, ज्या व्यक्तीकडून नमुना घेतला असेल किंवा अन्नपदार्थ जप्त केला असेल तिचे खरे नाव व राहण्याचे ठिकाण याची खातरजमा करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४२ खाली पोलीस अधिकाऱ्याला असलेल्या अधिकारांचा वापर करू शकेल.

(९) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये शक्तीचा वापर करणारा जो कोणताही अन्न निरीक्षक

(a) त्रास देण्याच्या हेतूने आणि संशयाला रास्त आधार नसताना कोणताही अन्नपदार्थ किंवा भेसळकारी पदार्थ जप्त करील किंवा

(b) कोणत्याही व्यक्तीची हानी करणारी अन्य एखादी कृती आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक आहे असे समजण्यास कारण नसताना अशी कृती करील.

तो या अधिनियमान्वये गुन्ह्याबद्दल तो द्रव्यदंडास पात्र होईल आणि तो द्रव्यदंड १,०००/– रु. पर्यंत असू शकेल मात्र ५००/– रुपये पेक्षा कमी असणार नाही.

**विवेचन**

**साक्षीदारांचे अस्तित्व :**

कलम १०, पोटकलम (७) नुसारची कोणतीही कार्यवाही करण्यात येईल अशा वेळी अन्न निरीक्षकाने अशी कार्यवाही करण्यापूर्वी एक किंवा अधिक व्यक्तींना साक्षीदार म्हणून हजर राहण्यास सांगितले पाहिजे. मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये एक किंवा अधिक व्यक्तींनी त्या ठराविक वेळी तेथे उपस्थित असणे किंवा नसणे यामुळे आरोपींविरुद्ध खटला दाखल करण्यात कोणतीही अडचण येत नाही. कलम १० (७) अन्वये अन्न निरीक्षकावर लादण्यात आलेले दायित्व एवढेच आहे की त्याने कार्यवाहीच्या वेळी एक किंवा अधिक स्वतंत्र व्यक्तींना बोलावले पाहिजे. अन्न निरीक्षक नमुना घेत असेल त्याने साक्षीदार म्हणून हजर राहण्याकरिता आजूबाजूच्या दुकानदारांमध्ये आपापसात बंधुत्वाची भावना असणे साहजिकच असले तरी न्यायालयाचे कामकाज निष्फळ ठरविण्यासाठी स्वतंत्र साक्षीदारांना दूर ठेवण्याचे प्रयत्न न्यायालयापुढे चालणार नाहीत.

**१६. शिक्षा :–**

(१) पोटकलम १-A च्या उपबंधाच्या अधीनतेने, जर कोणत्याही व्यक्तीने –

(a) स्वत: किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी –

(i) जो अन्नपदार्थ कलम २, खंड (i-a) च्या उपखंड (d) च्या अर्थानुसार भेसळयुक्त असेल अथवा त्या कलमाच्या खंड (ix) च्या अर्थानुसार गैरछापाचा असेल अथवा या अधिनियमाच्या अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधानुसार किंवा अन्न (आरोग्य) प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे याच्या विक्रीद्वारे बंदी घालण्यात आली असेल असा,

(ii) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करून, उपखंड (i) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अन्नपदार्थाहून अन्य असा,

कोणताही अन्नपदार्थ, भारतात आयात केला किंवा विक्रीसाठी त्याची निर्मिती केली किंवा तो साठवला, विकला किंवा वितरित केल्यास किंवा

(b) स्वत: किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी, आरोग्यास अपायकारक नसलेला असा कोणताही भेसळकारी पदार्थ भारतात आयात केला किंवा विक्रीसाठी त्याची निर्मिती केली किंवा तो साठवला, विकला किंवा वितरित केल्यास किंवा,

(c) या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केल्याप्रमाणे नमुना घेण्यास अन्न निरीक्षकाला प्रतिबंध केल्यास किंवा

(d) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली कोणत्याही अन्न निरीक्षकाला प्रदान करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही शक्तीचा वापर करण्यास, त्याला प्रतिबंध केल्यास किंवा,

(e) ती स्वत: अन्नपदार्थाचा निर्माणक असून, तिने आरोग्यास अपायकारक नसलेला असा कोणताही भेसळकारी पदार्थ स्वत: जवळ किंवा तिच्या ताब्यातील कोणत्याही वास्तूमध्ये बाळगल्यास किंवा,

(f) केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाने किंवा शासकीय विश्लेषकाने केलेली चाचणी किंवा विश्लेषण याबाबतच्या कोणत्याही अभिप्रायाचा किंवा प्रमाणपत्राचा किंवा त्यामधील कोणत्याही उताऱ्याचा कोणत्याही अन्नपदार्थाची जाहिरात करण्यासाठी वापर केल्यास, किंवा

(g) आपण विकलेल्या कोणत्याही अन्नपदार्थाच्या संबंधात विक्रेत्याला स्वत: किंवा आपल्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी लेखी खोटे आश्वासन दिल्यास,

ती व्यक्ती कलम ६ च्या तरतुदीनुसार ज्या शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेव्यतिरिक्त आणखी ती सहा महिन्यापेक्षा कमी असणार नाही; परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

परंतु,

(i) जर अपराध खंड (a) च्या उपखंड (i) नुसार घडलेला असेल आणि माणसाकडून भेसळ झालेल्या मुलान्न स्वरूपातील अन्नपदार्थाच्या किंवा कलम २, खंड (ix) उपखंड (k) च्या अर्थानुसार गैरछापाच्या अन्नपदार्थाच्या संबंधात असेल, किंवा

(ii) जर अपराध खंड (g) च्या उपखंड (ii) नुसार घडलेला असेल परंतु कलम २३, पोटकलम (१–A), खंड (a) किवा खंड (g) नुसार किंवा कलम २४, पोटकलम (२) खंड (b) नुसार केलेल्या कोणत्याही नियमाच्या उल्लंघनाच्या संबंधात नसल्यास,

कोणत्याही पुरेशा व विशेष कारणास्तव न्यायालय, न्यायनिर्णयात ती कारणे नमूद करून तीन महिन्यापेक्षा कमी असणार नाही परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल. इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देऊ शकेल,

परंतु आणखी असे की, जर अपराध खंड (a) च्या उपखंड (२) खाली घडलेला असेल आणि २३, पोटकलम (१–A) च्या खंड (a) किंवा खंड (g) खाली किंवा कलम २४ पोटकलम (२) खंड (b) खाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या उल्लंघनाच्या संबंधात असेल तर कोणत्याही पुरेशा व विशेष कारणास्तव न्यायालय न्यायनिर्णयात ती कारणे नमूद करून, तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देऊ शकेल.

(१–A) जर कोणत्याही व्यक्तीने, स्वत: किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी

(i) कलम २, खंड (i) (i-A) याचे उपखंड (e) ते (l) पर्यंतच्या उपखंडापैकी (दोन्ही उपखंड धरून) कोणत्याही उपखंडाच्या अर्थानुसार भेसळयुक्त असलेला असा कोणताही अन्नपदार्थ किंवा

(ii) आरोग्यास अपायकारक असेल असा कोणताही भेसळकारी पदार्थ.

भारतात आयात केला किंवा त्याची विक्रीकरिता निर्मिती केली किंवा तो साठवला, विकला किंवा वितरित केल्यास ती व्यक्ती

कलम ६ च्या उपबंधाखाली ज्या शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेव्यतिरिक्त आणखी ती, एक वर्षापेक्षा कमी असणार नाही, परंतु सहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि दोन हजार रुपयापेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल,

परंतु जर असा अन्नपदार्थ किंवा भेसळकारी पदार्थ कोणत्याही व्यक्तीने सेवन केल्यास तिचा मृत्यू होणे संभवनीय असेल किंवा भारतीय दंड संहिता, कलम ३२० च्या अर्थानुसार जबर दुखापत ठरेल अशा प्रकारची इजा तिच्या शरीरास होणे संभवनीय असल्यास, तीन वर्षांपेक्षा कमी असणार नाही; परंतु हयातीपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि पाच हजार रुपयापेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.

(१–A) कोणताही अन्नपदार्थ कलम १०, पोटकलम (४) अन्वये जिच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीने अशा पदार्थात गैरफेर केला किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यात ढवळाढवळ केल्यास सहा महिन्यापेक्षा कमी असणार नाही; परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि एक हजार रुपयापेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.

(१–B) कोणताही अन्नपदार्थ कलम १०, पोटकलम (४) अन्वये जिच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीने असा पदार्थ विकला किंवा वितरित केला असेल आणि याच्यासमोर असा पदार्थ हजर करण्यात आला असेल त्या दंडाधिका–यास, कलम १ खंड (i-a) उपखंड (j) यांच्या अर्थानुसार तो भेसळयुक्त असल्याचे आढळले असेल, आणि कोणत्याही व्यक्तीने त्याचे सेवन केले असता तिचा मृत्यू होणे संभवनीय असेल किंवा भारतीय दंडसंहिता कलम ३२० च्या अर्थानुसार जबर दुखापत ठरेल अशी इजा तिच्या शरीरास होणे संभवनीय असल्यास पोटकलम (१–AA) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी तीन वर्षांपेक्षा कमी असणार नाही. परंतु हयातीपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.

(१–C) ) जर कोणत्याही व्यक्तीने कलम १४ किंवा कलम १४–A च्या उपबंधाचे उल्लंघन केल्यास, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, आणि पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.

(१–D) या अधिनियमानुसार अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यानंतर तशाच प्रकारचा अपराध केला तर पोटकलम २ च्या उपबंधांना बाधा न येता ज्या न्यायालयासमोर दुसरी किंवा नंतरची दोषसिद्धी होईल ते न्यायालय त्या व्यक्तीस या अधिनियमाखाली कोणतेही लायसन दिलेले असल्यास ते रद्द करण्याचा आदेश देऊ शकेल आणि तद्नंतर असे लायसन्स या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमात काहीही अंतर्भूत असल्यास रद्द होईल.

(२) या अधिनियमानुसार अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही त्यानंतर तशाच प्रकारचा अपराध केल्यास या न्यायालयासमोर दुसरी किंवा नंतरची दोषसिद्धी होईल त्या न्यायालयाने, अपराध्याचे नाव व राहण्याचे ठिकाण, अपराध आणि दिलेली शिक्षा या संबंधीचे वृत्त, न्यायालय निवेदन करील अशा वृत्तपत्रांमध्ये किंवा अशा अन्य प्रकारे अपराध्यांच्या खर्चाने प्रसिद्ध करवणे हे कायदेशीर असेल. अशा प्रसिद्धीचा खर्च हा दोषसिद्धीच्या संबंधातील खर्चाचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल आणि द्रव्यदंडाप्रमाणे त्याच रीतीने तो वसूल करण्याजोगा असेल.

## विवेचन

**हेतूपुरस्सर व अजाणता विक्री :**

भेसळयुक्त माल विकणाऱ्या व्यक्तीला त्याची जाणीव असणे किंवा नसणे हे गैरलागू आहे. मात्र शिक्षा देतेवेळी हेतुपुरस्सर भेसळयुक्त पदार्थ विकणारा आणि अजाणता भेसळयुक्त पदार्थ विकणारा यांच्यामध्ये फरक करणे आवश्यक आहे. **(प्रभाकर वि. महाराष्ट्र राज्य १९७७ क्रिमि. लॉ जर्नल १२७)**

**१६–A. खटल्याची संक्षिप्त संपरीक्षा करण्याची न्यायालयाची शक्ती :–**

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कलम १६ च्या पोटकलम (१) नुसार सर्व अपराधांची संपरीक्षा, राज्यशासनाने या बाबतीत विशेषरीत्या शक्तिप्रदान केलेल्या पहिल्या वर्गाच्या न्यायिक दंडाधिकाऱ्याकडून किंवा महानगर दंडाधिकाऱ्याकडून संक्षिप्तरित्या करण्यात येईल आणि अशा संपरीक्षेस उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यातील उपबंध शक्यतोवर लागू होतील.

परंतु या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेमधील कोणत्याही दोषसिद्धीच्या बाबतीत दंडाधिकाऱ्याने जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश देणे हे कायदेशीर असेल.

परंतु आणखी असे की, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेच्या प्रारंभी किंवा ती चालू असताना जर दंडाधिकाऱ्यास असे वाटले की, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश द्यावा लागेल किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव खटल्याची संक्षिप्त रीतीने संपरीक्षा करणे अनिष्ट होईल असे त्या प्रकरणाचे स्वरूप आहे तर दंडाधिकारी पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तसे आदेशाद्वारे नमूद करील आणि याची तपासणी करण्यात आली असेल त्या कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावील आणि उक्त संहितेद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने खटल्याची सुनावणी किंवा फेरसुनावणी करण्याचे काम पुढे सुरू करील.

**१७. कंपन्यांनी केलेले अपराध :–**

(१) या अधिनियमानुसार अपराध कंपनीने केला असल्यास :

(a) (i) कंपनीचे कामकाज चालविण्याबद्दल कंपनीची प्रभारी म्हणून किंवा कंपनीस जबाबदार म्हणून पोटकलम (२) नुसार नामनियुक्त केलेली अशी कोणतीही व्यक्ती असल्यास अशी व्यक्ती (तिचा या कलमात यापुढे 'जबाबदार व्यक्ती' म्हणून निर्देश करण्यात आला आहे. किंवा

(ii) अशा प्रकारे कोणतीही व्यक्ती नामनियुक्त करण्यात आली नसल्यास, अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्याबद्दल कंपनीची प्रभारी आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती आणि

(b) कंपनी

अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यास आणि त्यानुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र असतील.

परंतु अशा कोणत्याही व्यक्तीने अपराध आपल्या नकळत घडला आणि असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केल्यास या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) कोणतीही कंपनी, कंपनीकडून या अधिनियमानुसार कोणताही अपराध घडू नये म्हणून आवश्यक किंवा समयोचित असतील अशा सर्व शक्तींचा वापर करण्यासाठी व अशा सर्व उपाययोजना करण्यासाठी तिच्या संचालकांपैकी किंवा व्यवस्थापकांपैकी कोणालाही (अशा व्यवस्थापकांची मुख्यत्वे करून व्यवस्थापकीय किंवा पर्यवेक्षकीय नात्याने नियुक्ती केली असतांना) लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करू शकेल आणि असा संचालक किंवा व्यवस्थापक याला जबाबदार व्यक्ती म्हणून आपण नामनियुक्त केले आहे अशा अर्थाची नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात विहित अशा रीतीने आणि सोबत याप्रमाणे नामनियुक्त होण्यास अशा संचालकाने किंवा व्यवस्थापकाने दिलेली लेखी संमती स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडे पाठवू शकेल.

**स्पष्टीकरण:** कंपनीच्या निरनिराळ्या आस्थापना किंवा शाखा असल्यास अथवा कोणत्याही आस्थापनेत किंवा शाखेत निरनिराळी युनिटे असल्यास, निरनिराळ्या आस्थापनांच्या किंवा शाखांच्या अथवा युनिटांच्या संबंधात या पोटकलमाखाली

निरनिराळ्या व्यक्ती नामनियुक्त करता येतील व कोणत्याही आस्थापनेच्या, शाखेच्या किंवा युनिटाच्या संबंधात नामनियुक्त केलेली व्यक्ती ही अशी आस्थापना, शाखा किंवा युनिट यांच्या संबंधातील जबाबदार व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (२) नुसार नामनियुक्त केलेली व्यक्ती

(i) कंपनीकडून अशी नामनियुक्ती रद्द करणारी त्यानंतरची नोटीस स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास मिळणे, किंवा

(ii) त्या कंपनीचा संचालक किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक असण्याचे बंद होणे किंवा

(iii) नामनियुक्ती रद्द करण्यासाठी कंपनीला तसे कळवून स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाला तिने विनंती करणे व स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडून ती विनंती मान्य करण्यात येईल.

यापैकी जी गोष्ट सर्वात आधी घडेल ती घडेपर्यंत जबाबदार व्यक्ती असण्याचे चालू राहील.

परंतु जेव्हा अशी व्यक्ती कंपनीचा संचालक किंवा प्रकरणपरत्वे व्यवस्थापक असण्याचे बंद होईल तेव्हा ती व्यक्ती ते वृत्त स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास कळवील,

परंतु आणखी असे की, जेव्हा अशी व्यक्ती खंड (iii) खाली विनंती करील तेव्हा स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण अशी नामनियुक्ती, ज्या तारखेस विनंती करण्यात आली असेल त्या आधीच्या तारखेपासून रद्द करणार नाही.

(४) पूर्ववर्ती पोटकलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी (पोटकलम (२) खाली नामनियुक्त केलेली व्यक्ती नव्हे) ज्याच्या संमतीने किंवा मुकानुमतीने करण्यात आला आहे किंवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण–** या कलमाच्या प्रयोजनार्थ

(a) 'कंपनी' याचा अर्थ कोणताही निगम निकाय, असा आहे व त्यात पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा अंतर्भाव आहे.

(b) संचालक यांच्या पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे आणि

(c) हॉटेल उद्योगातील कंपनीच्या संबंधात व्यवस्थापक' या संज्ञेमध्ये त्या कंपनीने व्यवस्थापन केलेल्या किंवा चालवलेल्या कोणत्याही हॉटेलच्या खाद्यपेयव्यवस्था विभागाच्या प्रभारी व्यक्तीचा समावेश होतो.

## विवेचन

### आरोपीची अनुपस्थिती :

म्हशीचे दूध गायीचे म्हणून विकताना, गुन्ह्याचे वेळी संबंधित आरोपी उपस्थित नसेल आणि परिस्थितीजन्य पुराव्यावरून असे दिसून येत असेल की, विवक्षित गुन्हा घडला असा स्पष्ट निष्कर्ष काढण्यासाठी कोणताही पुरावा अस्तित्वात नाही अशा वेळी त्या गुन्ह्याचा आरोप ठेवता येणार नाही. रोजच्या रोज म्हशीचे दूध गायीचे दूध म्हणून नियमितपणे विकण्याचा व्यवसाय चालवण्यात येतो. याविषयी जर पुरावा नसल्यास गैरछापाचा आरोप अनुपस्थित भागीदारावर लादता येणार नाही **(१९७७) १ एससीसी ३००:१९७७ एससीसी (क्रिमी) ९७).**

**१८. संपत्ती समपहृत करणे :–**

जर एखादी व्यक्ती या अधिनियमातील कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखालील कोणत्याही नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल या अधिनियमाखाली दोषी ठरली असल्यास, याच्या संबंधात उल्लंघन झाले असेल तो अन्नपदार्थ समपहृत करून सरकारजमा करता येईल.

परंतु त्या अन्नपदार्थाचे पुन:संस्करण केल्यास तो माणसांनी उपयोग करण्यायोग्य अशा विहित दर्जानुरूप करता येण्यासारखा आहे अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, न्यायालय, आदेश काढून आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली पुन:संस्करण करून नंतर या अधिनियमातील अन्य उपबंधाच्या अधीनतेने तो अन्नपदार्थ विकता यावा यासाठी मालकाने, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित करून दिले की त्यास तो परत करण्यात यावा असे फर्मावू शकेल.

**२०. अपराधांची दखल घेणे व संपरीक्षा :**

(१) कलम १४ किंवा कलम १४–A नुसारच अपराध वगळून या अधिनियमानुसार अपराधांबद्दलचा खटला केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेली व्यक्ती यांच्याशिवाय किंवा त्यांच्या लेखी संमतीशिवाय कोणालाही सुरू करता येणार नाही.

परंतु या अधिनियमानुसार अपराधाबद्दलचा खटला कलम १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या खरेदीदाराने किंवा मान्यताप्राप्त संघटनेने न्यायालयामध्ये तक्रारीसोबत शासकीय विश्लेषकाचा अभिप्राय हजर केल्यास त्याला किंवा तिला सुरू करता येईल.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कलम १६ पोटकलम (१–AA) नुसारचा शिक्षापात्र अपराध हा दखलपात्र व बिनजामिनी गुन्हा असेल.

**विवेचन**

**अपीलकर्ता**

नगरपालिका मंडळाच्या प्राधिकारपत्राच्या आधारावर अन्न निरीक्षक तक्रार दाखल करीत असल्यास तो ही तक्रार स्वत:च्या वतीने दाखल करीत नसून नगरपालिका मंडळाच्या वतीने दाखल करीत आहे असे समजले पाहिजे. तक्रारदार हा नगरपालिका मंडळ असेल आणि नगरपालिका मंडळाने दाखल केलेले अपील अवैध ठरेल **(नगरपालिका मंडळ वि. राजाराम १९७७ क्रिमि. लॉ जर्नल १२२ अलग).**

––––––

# २६. पोलीस दल (हक्क निर्बंधन) अधिनियम, १९६६

भारतीय संविधान विभाग ३ अन्वये काही विशेष अधिकार व हक्क प्रदान करण्यात आले आहेत जे सार्वजनिक सुव्यवस्था राखणेकामी नेमलेल्या दलाचे सदस्य आहेत त्यांनी त्यांची कर्तव्ये आणि शिस्तीचे पालन योग्य रीतीने करावे म्हणून संविधान विभाग ३ नुसार दिलेले हक्क व अधिकार यांना निर्बंध (आळा) घालण्यासाठी सदरचा कायदा अंमलात आणला आहे :

**क. १. संक्षिप्त नाव व्याप्ती व सुरुवात :–**

(१) ह्या कायद्यास ''पोलीस दल (हक्क निर्बंधन) अधिनियम १९६६'' असे म्हणावे.

(२) ह्याची व्याप्ती संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा कायदा ऑफिशिअल गॅझेटमध्ये प्रथम प्रकाशित झाला त्या दिवशी अमलात आला (२ जानेवारी १९६६)

(a) संघ राज्य संबंधात केंद्र शासन

(b) राज्याचे संबंधात राज्य सरकार

केंद्र शासनाने वेगवेगळ्या प्रदेशासाठी वेगवेगळ्या तारखेस नेमलेला आहे.

**क. २. व्याख्या :–**

(a) पोलीस दलाचा सदस्य –

म्हणजे अशी कोणतीही व्यक्ती ज्याची नेमणूक अथवा नामांकन परिशिष्ट एकमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कायद्याखाली झालेली असेल ती व्यक्ती.

(b) पोलीस दल (पोलीस बल) –

यामध्ये अशा कोणत्याही दलाचा समावेश होतो, ज्या दलाकडे सार्वजनिक सुव्यवस्थेचे कार्य सोपविलेले असते.

(c) प्राधिकृत –

म्हणजे या कायद्याखालील नियमाद्वारे प्राधिकृत केलेले.

**क. ३. भाषणसह स्वातंत्र्य तथा संघटना बनविण्याचा हक्क इ. बाबत निर्बंध :–**

(१) पोलीस दलाचा कोणीही सदस्य, केंद्र सरकार अथवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी अथवा पूर्व परवानगीशिवाय.

(a) कोणत्याही औद्योगिक संघटना, कामगार संघटना, राजकीय समूहाचा सदस्य होऊ शकणार नाही.

(b) अशा समाज, संस्था, समूह अथवा संघटनेचा सदस्य होता येणार नाही ज्या समाजाला, संस्थेला, समूहाला अथवा संघटनेला अशा दलाचा भाग असल्याची मान्यता प्राप्त झालेली नाही ज्या दलाचा तो सदस्य आहे किंवा जी संस्था, समाज, समूह अथवा संघटना पूर्णपणे सामाजिक मनोरंजनाकरिता किंवा सामाजिक किंवा धार्मिक स्वरूपाची नाही किंवा नसेल.

(c) अशा पुस्तकाची, पत्राची, अगर दस्तऐवजाची, प्रामाणिकपणे आपल्या कर्तव्यबजावणीचे अथवा पूर्णपणे वाङ्मयीन किंवा कौशल्यपूर्ण किंवा खुबीदार किंवा शास्त्रोक्त पद्धतीचे असल्याशिवाय, त्या पुस्तकाची, पत्राची अगर दस्ताऐवजाची माहिती कोणत्याही वृत्तसंस्थेला देता येणार नाही. अथवा ती प्रसिद्ध करता येणार नाही.

**स्पष्टीकरण –** (१) अमुक एखादा समाज, संस्था, समूह अथवा संघटना ही पूर्णपणे सामाजिक मनोरंजनाकरिता किंवा धार्मिक आहे किंवा नाही असा प्रश्न उपस्थित झाल्यावर त्यावर केंद्र सरकारचा निर्णय अंतिम राहील.

(२) पोलीस दलातील कोणीही सदस्य कोणत्याही लोकांना राजकीय कारणाकरिता अथवा अन्य कोणत्याही ठरवून दिलेल्या कारणाकरिता भरविलेल्या सभेत किंवा निर्देशनामध्ये भाग घेणार नाही अथवा संबंधित करणार नाही.

**क.४. शिक्षा :–**

कोणत्याही इसमाने कलम ३ मधील तरतुदीचे उल्लंघन केल्यास त्यास दोन वर्षे कैद किंवा दंड रु. २००० पर्यंत किंवा दोन्हीही.

**क. ५. परिशिष्टात दुरुस्ती करण्याचा अधिकार :–**

(१) केंद्र शासन सरकारी राजपत्रात जाहीरनामा काढून परिशिष्टात सुधारणा करू शकते त्यात इतर कायद्यान्वये सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी नेमलेल्या दलाचा समावेश केला जाईल किंवा गाळले जाईल.

**क. ६. नियम करण्याचे अधिकार :–**

(१) केंद्र सरकार सरकारी गॅझेटात प्रसिद्ध करून ह्या कायद्याचा उद्देश सफल होणेसाठी नियम करील.

(२) प्रत्येक नियम जो या कलमानुसार तयार केला असेल तो केल्यानंतर दोन्ही सभागृहापुढे लवकरात लवकर मंजुरीसाठी ठेवले पाहिजे.

**परिशिष्ट**

**(क.२ आणि ५ पहा)**

(१) मद्रास डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट १८५९ (१८५९ चा २४).

(२) आंध्र प्रदेश (आंध्र एरिया) डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट १८५९.

(३) दि पोलीस ॲक्ट १८६१ चा ५).

(४) दि कलकत्ता सबर्बन पोलीस ॲक्ट १८६६ (बंगाल ॲक्ट १८६६ चा २).

(५) दि कलकत्ता सबर्बन पोलीस ॲक्ट १८६६ (बंगाल ॲक्ट १८६६ चा ४).

(६) दि बेंगॉल पोलीस ॲक्ट १८८८ (१८८८ चा ७).

(७) दि पोलीस ॲक्ट १८८८ (१८८८ चा ३).

(८) दि मद्रास सीटी पोलीस ॲक्ट १८८८ (मद्रास ॲक्ट १८८८ चा ३).

(९) दि बेंगॉल मिलिटरी पोलीस ॲक्ट १८९२ (१८९२ चा ५).

(१०) दि आंध्र प्रदेश (तेलंगणाना विभाग) डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट १३२९ फालखी (१३२९ चा १०).

(११) दि इस्टर्न फ्रन्टीअर रायफल्स (वेस्ट बेंगॉल बटालियन) ॲक्ट १९२० (बेंगॉल ॲक्ट १९२० चा २).

(१२) दि पोलीस ॲक्ट (१९२९ अे.डी.) (जे आणि के ॲक्ट–२–१९८३).

(१३) दि हैद्राबाद सिटी पोलीस ॲक्ट १३४८ कालसी (१३४८ क्र. चा ९).

(१४) दि आसाम रायफल ॲक्ट १९४१ (१९४१ चा ५).

(१५) दि ओरिसा मिलिटरी पोलीस ॲक्ट १९४६ (१९४६ चा ओरिसा ॲक्ट ७).

(१६) दि दिल्ली स्पेशल पोलीस एस्टाब्लीशमेंट ॲक्ट १९४६ (१९४६ चा २५).

(१७) दि यु.पी. प्रादेशिक आर्म्ड कॉन्स्टाट्यूलरी ॲक्ट १९४८ (१९४८ चा यु.पी.ॲक्ट ४०).

(१८) दि सेंट्रल रिझर्व्ह पोलीस ॲक्ट १९४९ (१९४९ चा ६६).

(१९) दि राजस्थान आर्म्ड कॉन्स्टाट्यूलरी ॲक्ट १९५० (१९५० चा राजस्थान ॲक्ट १२).

(२०) दि बॉम्बे पोलीस ॲक्ट (१९५१ बॉम्बे ॲक्ट २२).

(२१) दि बॉम्बे स्टेट रिझर्व्ह पोलीस ॲक्ट १९५१ (१९५१ चा बॉम्बे ॲक्ट ३८).

(२२) दि केरला पोलीस ॲक्ट १९६० (१९६० चा केरला ॲक्ट ५).

(२३) दि म्हैसूर पोलीस ॲक्ट १९६३ (१९६४ चा म्हैसूर ॲक्ट ४).

(२४) दि नागालँड आर्म्ड पोलीस फोर्स ॲक्ट १९६६ (१९६६ चा नागालँड ॲक्ट ६).

------

# २७. पोलीस (अप्रीतीची भावना चेतावणे) अधिनियम, १९२२

# The Police (Incitement To Disaffection) Act, 1922

**(१९२२ चा अधिनियम क्रमांक २२)**

**[दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान]**

**दिनांक ५ ऑक्टोबर १९२२.**

**पोलिसांमध्ये अप्रीतीची भावना पसरविणे व सजातीय अपराध याबद्दल शिक्षेचा उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, पोलिसांमध्ये अप्रीतीची भावना पसरविणे व सजातीय अपराध याबद्दल शिक्षा करणे समयोचित आहे. त्याअर्थी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम तयार करण्यात येत आहे.

**कलम १. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ :–**

(१) या अधिनियमास ''पोलीस (अप्रीतीची भावना चेतावणे) अधिनियम, १९२२ असे म्हणता येते.

(२) १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग व राज्यामध्ये समाविष्ट असलेले क्षेत्र खेरीज करून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निदेशित करील अशा दिनांकापासून कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या भागात तो अमलात येईल.

**कलम २. व्याख्या :–**

(१) पोलीस दलातील व्यक्ती :

पोलीस दलातील व्यक्ती या शब्दप्रयोगात या कायद्याच्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमाखालील सुव्यवस्था राखण्याची कामे पार पाडण्यासाठी नियुक्त केलेली किंवा सेवेत भरती केलेली व्यक्ती असा आहे.

**कलम ३. अप्रीतीची भावना निर्माण करणे इत्यादीबद्दल शिक्षा :–**

(१) जो कोणीही भारतात कायद्याद्वारे प्रस्थापित झालेल्या शासनाच्या विरुद्ध पोलीस दलातील व्यक्तींमध्ये उद्देशपूर्वक अप्रीतीची भावना निर्माण करील किंवा तशी भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही कृतीमुळे अप्रीतीची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे हे स्वत:ला माहीत असूनही तशी कृती करील अथवा पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीला तिने कामगिरी थांबवून ठेवावी म्हणून किंवा तिने शिस्तभंग करावा म्हणून प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही कृतीमुळे ती व्यक्ती तशी प्रवृत्त होण्याची शक्यता आहे हे माहीत असूनही तशी कृती करील तर :–––

**शिक्षा :**

दोष सिद्धीनंतर तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासात किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या दोन्हीही शिक्षांना पात्र राहील.

परंतु या विरुद्ध अशा विशेष व पर्याप्त कारणांच्या अभावी असा कारावास सहा महिन्यापेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही. तशी कारणे असल्यास ती न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करावी लागतील.

(२) या अधिनियमाखालील सर्व अपराध दखलपात्र व बिनजामिनी असतील.

**स्पष्टीकरण :** शासनाने केलेल्या उपाय योजनांमध्ये कायदेशीर मार्गाने बदल घडवून आणण्याच्या हेतूने नापसंतीदर्शक

अभिप्राय अथवा शासनाच्या प्रशासकीय किंवा अन्य कार्यवाहीबाबत नापसंतीदर्शक अभिप्राय व्यक्त करणे हा या कलमान्वये अपराध ठरणार नाही. मात्र या अभिप्रायामुळे अप्रीतीची भावना निर्माण होऊ नये किंवा ती निर्माण व्हावी या उद्देशाने ते अभिप्राय व्यक्त केलेले नसावेत किंवा त्यामुळे तशी भावना निर्माण होण्याची शक्यता नसावी.

**कलम ४ : विवक्षित प्रयोजनासाठी पोलीस संघ व अन्य व्यक्ती यांनी केलेल्या कृतीची व्यावृत्ती (अपवाद) :–**

एखादी गोष्ट सद्‌भावपूर्वक केलेली असून

(a) पोलीस दलातील एखाद्या व्यक्तीच्या कल्याणासाठी किंवा तिच्या हितासाठी तिला आपली कामगिरी कायद्याद्वारे प्राधिकृत असलेल्या कोणत्याही रीतीने थांबवून ठेवल्यास प्रवृत्त करणारी असेल तर किंवा

(b) पोलीस दलातील व्यक्ती म्हणून त्याचे हितवर्धन करण्यासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही संघात शासनाने प्राधिकृत केले असून त्याला मान्यता दिली असून शासनाने संमत केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा संस्थापन नियमावली अन्वये संघाने किंवा संघाच्या वतीने ती गोष्ट असेल तर, अशी कोणतीही गोष्ट त्या कलमाखाली अपराध असल्याचे मानले जाणार नाही.

**कलम ६. प्रकरणांची संपरीक्षा (ट्रायल ऑफ केसेस) :–**

(१) कोणत्याही न्यायालयाला जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडून किंवा शाखा शहराच्या बाबतीत पोलीस आयुक्तांच्या पूर्व मंजुरीखेरीज या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करण्याची कार्यवाही करता येणार नाही.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणताही महानगर दंडाधिकारी किंवा कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी त्याला योग्य वाटल्यास, या अधिनियमाखालील सर्व अपराधांची किंवा त्यापैकी कोणत्याही अपराधाची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा करू शकेल आणि उक्त संहितेतील कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) याचे उपबंध, शक्य होईल तितपत अशा संपरीक्षेत लागू होतील.

परंतु, जेव्हा कोणत्याही प्रकरणांची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा केलेली असेल आणि या अधिनियमान्वये आरोपीत सिद्ध ठरविले गेले असेल तेव्हा, संबंधित दंडाधिकारी तीन महिन्यापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावणार नाही आणि या अधिनियमान्वये किमान रकमेचा द्रव्यदंड देण्यासंबंधीचा उपबंध लागू होणार नाही.

**परिशिष्ट (कलम २ पाहा)**

| वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव |
|---|---|---|
| १८५९ | २५ | दि मद्रास डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट, १८५९. |
| १८६१ | ५ | दि पोलीस ॲक्ट, १८६१. |
| १८८८ | ३ | दि पोलीस ॲक्ट, १८८८. |
| १८९२ | ५ | दि बेंगॉल मिलिटरी पोलीस ॲक्ट, १८९२ |
| | | मद्रास ॲक्ट. |
| १८८८ | ५ | दि मद्रास सिटी पोलीस ॲक्ट, १८८८. |
| | | बॉम्बे ॲक्टस्. |

| | | |
|---|---|---|
| १८९० | ४ | दि बॉम्बे डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट, १८९०. |
| १९०२ | ४ | दि सिटी ऑफ बॉम्बे पोलीस ॲक्ट, १९०२. |
| | | बेंगॉल ॲक्टस्. |
| १८६६ | २ | दि कलकत्ता सबर्बन पोलीस ॲक्ट, १८६६. |
| | ४ | दि कलकत्ता पोर्ट ॲक्ट, १९६६. |
| १८९० | ३ | दि कलकत्ता पोर्ट ॲक्ट, १८९०. |
| १९२० | २ | दि इस्टर्न कॉरीनर रायफल्स (बेंगॉल बटालियन) ॲक्ट, १९२०. |
| | | आसाम ॲक्टस्. |
| १८८८ | २ | दि अंदमान आणि निकोबार आयलँडस् मिलिटरी पोलीस रेग्युलेशन्स १८८८. |
| | | राज्य सुधारणा (स्टेट अमेंडमेंटस). |
| | | महाराष्ट्र |
| १८९० | ६ | दि बॉम्बे डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट, १८९०. |
| १९०२ | ४ | दि सिटी ऑफ बॉम्बे पोलीस ॲक्ट, १९०२ |
| | | त्याऐवजी खालीलप्रमाणे |
| १९५१ | २२ | दि बॉम्बे पोलीस ॲक्ट, १९५१. |
| | | बॉम्बे ॲक्टच्या शीर्षकाखाली येणारे खालील ॲक्टचा समावेश |
| १९५१ | ३८ | दि बॉम्बे स्टेट रिझर्व्ह पोलीस फोर्स ॲक्ट, १९५१. |

--------

# २८. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५

## (सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १०)

### (दिनांक १ एप्रिल, १९८६ रोजी अमलात असल्याप्रमाणे)

### (१ एप्रिल, १९५५)

**सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी विवक्षित वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि त्यांच्याशी संबंधित व्यापार व वाणिज्य यांचे नियोजन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :–

**१. संक्षिप्त नाव व विस्तार :–**

(१) या अधिनियमास ''अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५'' असे म्हणता येईल.

(२) संपूर्ण भारतावर त्यांचा विस्तार आहे.

(सन १९६२ चा विनियम १२, कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा दमण व दीव यांवर १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दादरा व नगर–हवेली यांवर आणि सन १९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदिवी बेटांवर या अधिनियमांचा विस्तार करण्यात आला)

**२. व्याख्या :–**

या अधिनियमात संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर;

( (i–a ) संहिता याचा अर्थ, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' असा आहे; आणि

(ii–b) ) जिल्हाधिकारी यामध्ये अपर जिल्हाधिकाऱ्याचा अणि या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्याकरिता व त्याचे अधिकार वापरण्याकरिता जिल्हाधिकारी प्राधिकृत करील अशा, उप–विभागीय अधिकाऱ्यापेक्षा खालचा दर्जा नसलेल्या अन्य अधिकाऱ्याचा समावेश आहे;

(a) अत्यावश्यक वस्तू याचा अर्थ, पुढीलपैकी कोणताही वस्तूवर्ग असा आहे :–

(i) पेंड आणि इतर सत्वे यांसुद्धा गुरांची वैरण;

(ii) कोक आणि इतर तज्ञन्य पदार्थ यांसुद्धा कोळसा;

(iii) मोटारींचे घटक भाग आणि उपसाधने;

(iv) सुती आणि लोकरी कापड;

(iv-a) औषधीद्रव्ये;

**स्पष्टीकरण २ –** या उपखंडात औषधीद्रव्य या शब्दाचा अर्थ 'औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम, १९४०' याच्या कलम ३, खंड (b) मध्ये त्या शब्दास नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल;

(v) खाद्य तेलबिया आणि तेले यांसुद्धा अन्नसामग्री;

(vi) लोखंड व पोलाद यांची यंत्रनिर्मित उत्पादने यांसुद्धा लोखंड व पोलाद;

(vii) वृत्तपत्र कागद, कागदी पुठ्ठा, पेंढ्यापासून बनवलेला पुठ्ठा यांसुद्धा कागद;

(viii) पेट्रोलियम आणि पेट्रोलियम उत्पादने;

(ix) कच्चा कापूस– मग तो सरकी काढलेला असो वा सरकी न काढलेला असो– आणि सरकी;

(x) कच्चा ताग;

(xi) जी वस्तू, तिच्याबाबत संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील तिसऱ्या सूचींमधील ३३ व्या नोंदीच्या आधारे संसदेला कायदे करण्याचा अधिकार आहे अशा प्रकारची असून जी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अत्यावश्यक वस्तू असल्याचे केंद्र शासन अधिसूचित आदेशाद्वारे घोषित करील अशी अन्य कोणत्याही वर्गातील वस्तू;

(b) ''अन्नपिके'' यामध्ये उसाच्या पिकांचा समावेश आहे;

(c) ''अधिसूचित आदेश'' याचा अर्थ, शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेला आदेश असा आहे;

(cc) ''आदेश'' यामध्ये, त्याखाली दिलेल्या निदेशाचा समावेश आहे;

(d) राज्य शासने याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्याचा प्रशासक असा आहे;

(e) साखर याचा अर्थ–

(i) खडीसाखरसुद्धा ९० टक्क्यांहून जास्त सुक्राजनेयुक्त असलेली कोणत्याही प्रकारची साखर असा आहे;

(ii) खांडसरी साखर किंवा बुरा साखर किंवा पिठी साखर अथवा कोणतीही दाणेदार किंवा भुकटीच्या स्वरूपातील साखर असा आहे; किंवा

(iii) निर्यातपात्र साखर कारखान्यातील प्रक्रियाधीन साखर किंवा तेथे उत्पादन करण्यात आलेली कच्ची साखर असा आहे;

(f) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले आणि संहितेमध्ये व्याख्या दिलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांना त्या संहितेमध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील;

**कलम २ चे विवेचन**

अत्यावश्यक वस्तू म्हणजे काय? या अधिनियमान्वये, अत्यावश्यक वस्तू यांची व्याख्या सर्वसमावेशक आहे. या व्याख्येत केंद्र शासनाने, कलम २ च्या खंड (a) मध्ये निर्देश केलेल्या वस्तूंचा तर समावेश होतोच, परंतु या अधिनियमाच्या अर्थांतर्गत कोणत्याही वस्तूला अत्यावश्यक वस्तूच्या कक्षेत आणण्याचा अधिकारही केंद्र शासन राखून ठेवते. भारत संरक्षण नियमाच्या, नियम ३५, खंड ५ अन्वये, अत्यावश्यक वस्तू या संज्ञेचा अर्थ समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक अशा केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या, अन्न, पाणी, इंधन, वीज, ऊर्जा यांसारख्या कोणत्याही वस्तू असा आहे. अर्थातच भारत संरक्षण नियमाच्या तुलनेत अत्यावश्यक वस्तू अधिनियम हा अधिक व्यापक आहे व भारत संरक्षण नियमांमध्ये स्पष्टपणे निर्दिष्ट न केलेल्या वस्तूदेखील अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या कक्षेमध्ये येऊ शकतात **(नथुनीलाल वि. प. बंगाल राज्य, ऑ.ई.रि, १९६४ कलम २७९; (१९६४) १ क्रि.मि. लॉ. जर्नल ६६२)** परंतु विवादाच्या प्रसंगी भारत संरक्षण नियम ग्राह्य धरला पाहिजे, कारण, एकदा तो नंतर पारित झाला आहे. दुसरे म्हणजे आणीबाणीच्या कालावधीत विशेष कायदे करण्यासाठी तो अमलात येतो व आणीबाणीमुळे निर्माण झालेल्या प्रसंगावर मात करण्यासाठी विशेष उपाययोजना म्हणून त्याद्वारे तरतूद **(आदर्श कृषी सेवा केंद्र वि. मध्य प्रदेश राज्य, ऑ. इं. रि. १९८१ म. प्र. ४४))**

केंद्र सरकारने, अधिसूचित आदेश क्र. एससी ३५९४ (ईसीए) १/६२ दिनांक २४ नोव्हेंबर १९६२ अन्वये अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सीमेंट ही अत्यावश्यक वस्तू असल्याचे घोषित केले आहे.

**अन्न व अन्नसामग्री :–** ''अन्नसामग्री'' या संज्ञेची अधिनियमात व्याख्या देण्यात आलेली नाही. अन्नसामुग्री या संज्ञेला स्वत:चा असा अर्थही नाही. एखादी वस्तू प्रत्यक्षपणे खाद्य नसताना ती अन्नसामग्री असू शकते. याबाबत न्यायालयाने जे जे विविध निर्णय दिलेत त्यावरून असे स्पष्ट दिसून येते. अन्न व अन्नसामग्री यामध्ये फारच थोडा फरक आहे. ज्या वस्तू आहेत त्याच स्थितीत खाद्य म्हणून ग्रहण केल्या जातात त्यांनाच केवळ अन्नसामग्री म्हणायचे असे नाही. तर ज्या विविध यांत्रिक प्रक्रियेनंतर खाद्यपदार्थ म्हणून वापरल्या जाऊ शकतात त्याही अन्नसामग्री या संज्ञेत अंतर्भूत होतात. **(नथुनीलाल वि. प. बंगाल राज्य, ऑ. इं. रि. १९६४ कलम २७९; (१९६४) १ क्रि.मि. लॉ जर्नल ६६२)** या अर्थाने केवळ गहु, तांदूळ इत्यादी सारख्या वस्तूच अन्नसामग्री ठरतात असे नव्हे तर हळकुंड इत्यादी सारख्या वस्तूही अन्नसामग्री ठरतात. **(मुंबई राज्य वि. वीरकुमार, ऑ.इं.रि, १९५२ स.न्या. ३३५, १९५२ क्रि.मि. लॉ. जर्नल १४०६.)** एखादी वस्तू अन्न सामग्री आहे किंवा नाही हे ठरविण्याचा निकष, ती आहे त्या स्थितीत ग्रहण केली जाते किंवा नाही हा नाही तर त्यावर प्रक्रिया केल्यानंतर तिचा अन्नसामग्री म्हणून वापर करता येतो की नाही, हा आहे. सरकी (Cotton seed) या तेलबिया आहेत. परंतु त्या मानवी खाद्य नाहीत. अन्नसामग्री म्हणजे केवळ अंतिम क्रिया–प्रक्रिया करून खाण्याजोगे बनलेल्या वस्तूच नाहीत, तर त्यामध्ये प्रक्रिया केल्यानंतर मानवी खाद्य होणाऱ्या कच्च्या स्वरूपातील अन्नसामग्रीचाही समावेश होतो. आजच्या काळात 'काजू' ही अन्नसामग्री केवळ धनिकांनाच परवडण्याजोगी आहे तरीही कच्च्या स्वरूपातील काजू देखील अत्यावश्यक वस्तू असून त्या कलम २–अ)(v) याखाली येतात. **(के. जनार्दन पिल्लाई वि. भारतीय महासंघ, ऑ. इं. रि. १९८१ स. न्या. १४८५ ते १४९१).**

अन्नसामग्री ही संज्ञा १९४६ व १९५५ च्या अधिनियमांत व्यापक अर्थात वापरण्यात आली असून त्यामध्ये शिजवलेल्या अन्नाचाही समावेश होतो.

अन्नसामग्री या संज्ञेमध्ये पशुखाद्याचाही समावेश होतो. कोणतीही जीवित व्यक्ती – मग ती मानवी असो की पशु–पक्ष्यांच्या कोटीतील असो जी साम्ग्री खाद्य म्हणून वापरते, ती सर्व सामुग्री अन्नसामग्री समजली पाहिजे. याच अर्थाने पशुखाद्य व कुक्कुट आहार याही अन्नसामग्री ठरतात. तांदुळाचा भुसा किंवा कोंडा हा कोंबड्याचा आहार असल्याने कलम २ ((a) ((b) च्या अर्थानुसार अन्नसामग्री ठरतो. **(श्रद्धादेवी वि. कृष्णचंद्र, ऑ. इं. रि. १९८२ स. न्या.१५६९)**

**खाद्य तेलबिया व तेले :–** ''खाद्य तेलबिया'' या संज्ञेतील 'खाद्य' याचा अर्थ ''खाण्याजोगे'' जे ग्रहण केल्या जाते किंवा ग्रहण केल्या जाऊ शकते'' असा आहे. या अर्थाने, या संज्ञेचा अर्थ, ज्यापासून खाद्यतेल काढता येते अशा तेलबिया असा नसून ज्या खाद्य म्हणून वापरता येतील केवळ अशा तेलबिया असा आहे. कापसाच्या बिया किंवा सरकी हे मानवी खाद्य नसल्याने त्यांचा ''खाद्य तेलबिया'' या संज्ञेत अंतर्भाव होत नाही. **(गिरधरमल वि. देव राज, ऑ. इं. रि. १९६३ स. न्या.१५८७ ते १५९०)** मानवी आहारासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या तेलांचा खाद्य तेलांमध्ये अंतर्भाव होतो. दिल्ली खाद्य तेले (अनुज्ञापन व नियंत्रण) आदेश, १९७७ च्या खंड (२) (ई) अन्वये खाद्यतेलाची व्याख्या व्यापक बनविण्यात आली असून त्यामध्ये सरकीच्या तेलाचाही समावेश करण्यात आला आहे. तसेच सुधारित व्याख्येमध्ये सोयाबिन तेल इत्यादीचाही समावेश करण्यात आला आहे.

**३. अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा, वितरण इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार :–**

(१) जर कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी अथवा त्यांच्या नियोचित वितरणाची आणि रास्त किमतीला त्या उपलब्ध होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी (अथवा भारताच्या संरक्षणाकरिता किंवा लष्करी कामगिऱ्यांच्या कार्यक्षम संचालनाकरिता एखाद्या अत्यावश्यक वस्तूची सुनिश्चिती करण्यासाठी) तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे

जर केंद्र शासनाचे मत असेल तर केंद्र शासनाला आदेशाद्वारे तिचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि तद्विषयक व्यापार व वाणिज्य यांचे विनियमन करण्याचा किंवा ते मना करण्याविषयीची तरतूद करता येईल.

(२) पोट–कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराच्या व्यापकतेला बाधा न येता, त्याखाली देण्यात आलेल्या आदेशाद्वारे पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल.

(a) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन किंवा निर्मिती यांचे लायसनद्वारे, परवान्याद्वारे किंवा अन्यथा विनियमन करणे;

(b) कोणतीही पडीक किंवा कृषियोग्य जमीन – मग ती एखाद्या इमारतीस अनुलग्न असो वा नसो – लागवडीखाली आणणे, सरसकट सर्व अन्नपिके किंवा विनिर्दिष्ट अन्नपिके काढणे आणि सरसकट अन्नपिकांची किंवा विनिर्दिष्ट अन्न पिकांची लागवड अन्यथा चालू ठेवणे किंवा वाढवणे;

(c) अत्यावश्यक वस्तू किती किमतीला खरेदी करता येईल किंवा विकता येईल तीवर नियंत्रण ठेवणे.

(d) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची साठवण, वाहतूक, वितरण, विल्हेवाट, संपादन, वापर किंवा उपयोग यांचे लायसनद्वारे, किंवा परवान्याद्वारे किंवा अन्यथा विनियमन करणे;

(e) सामान्यतः विक्रीसाठी ठेवल्या जाणाऱ्या कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची विक्री रोखून धरण्यास मनाई करणे;

(f) जिच्याकडे कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचा साठा असेल अथवा जी अत्यावश्यक वस्तूच्या उत्पादनात किंवा तिच्या खरेदी विक्रीच्या व्यवसायात गुंतलेली असेल अशा कोणाही व्यक्तीने केंद्र शासनाला अथवा राज्य शासनाला अशा शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला किंवा अभिकर्त्याला अथवा अशा शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या महामंडळाला अथवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य व्यक्तीला किंवा व्यक्तीवर्गाला त्यात विनिर्दिष्ट अशा परिस्थितीत, –

    (a) आपण साठ्यात बाळगलेला किंवा उत्पादन केलेल्या किंवा आपल्या हाती आलेला माल संपूर्णतः किंवा त्याचा एखादा विनिर्दिष्ट भाग विकावा म्हणून, अथवा

    (b) आपण जी वस्तू उत्पादन करण्याची किंवा जी आपल्या हाती येण्याची शक्यता आहे अशा कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या बाबतीत, अशा वस्तूचे आपण उत्पादन केल्यावर किंवा ती आपल्या हाती आल्यावर विकावा म्हणून तिला भाग पाडणे

**स्पष्टीकरण १–** अन्नधान्ये, खाद्य तेलबिया व खाद्य तेले यांच्या संबंधात या खंडाखाली केलेल्या आदेशाद्वारे, संबंधित क्षेत्रात अशी अन्नधान्ये, खाद्य तेलबिया व खाद्य तेल यांचे अंदाजे उत्पादन किती होणार ते ध्यानात घेऊन, अशा क्षेत्रात उत्पादकांनी किती माल विकावा ते परिमाण निश्चित करता येईल, अथवा उत्पादकांनी किंवा त्यांच्या कसणुकीखाली एकूण किती क्षेत्र धारण केलेले आहे ते ध्यानात घेऊन श्रेणीवारीच्या तत्त्वावर असे परिमाण निश्चित करण्याचा उपबंध करता येईल.

**स्पष्टीकरण २ –** या खंडाच्या प्रयोजनार्थ ''उत्पादन'' या शब्दाचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग याचासुद्धा त्याच्या अर्थात, खाद्यतेलांच्या व साखरेच्या निर्मितीचा समावेश आहे.

(g) खाद्यपदार्थाशी किंवा सुती कापडांशी संबंधित असे ज्या कोणत्याही वर्गातील वाणिज्यिक किंवा वित्तीय संव्यवहार हे आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाच्या मते लोकहिताला हानिकारक आहेत किंवा ज्यांचे विनियमन न केल्यास हानिकारक ठरल्यासारखे आहेत त्यांचे विनियमन करणे किंवा ते मना करणे;

(h) पूर्वोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींचे विनियमन करण्याच्या किंवा त्या मना करण्याच्या दृष्टीने कोणतीही माहिती किंवा आकडेवारी गोळा करणे;

(i) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण किंवा तद्विषयक व्यापार व वाणिज्य व्यवहार यामध्ये गुंतलेल्या व्यक्तींना, आदेशामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशी त्यांच्या धंद्याशी संबंधित असलेली पुस्तके, हिशेब आणि अभिलेख ठेवण्यास आणि निरीक्षणार्थ हजर करण्यास आणि त्यासंबंधीची माहिती सादर करण्यास फर्माविणे;

(i-i) लायसने व परवाने किंवा अन्य दस्तऐवज मंजूर करणे किंवा पुरस्कृत करणे, त्याबद्दल शुल्क आकारणे, असे कोणतेही लायसन्स, परवाना किंवा इतर दस्तऐवज त्यांच्या शर्तीच्या रीतसर पालनासाठी तारण म्हणून आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कोणतीही रक्कम अनामत ठेवणे, याप्रमाणे अनामत ठेवण्यात आलेली रक्कम किंवा तिचा कोणताही भाग अशा कोणत्याही शर्तीचे उल्लंघन झाल्यास जप्त करणे, आणि आदेशात विनिर्दिष्ट केले जाईल अशा प्राधिकरणाने अशा जप्तीचा अभिनिर्णय करणे;

(j) कोणत्याही आनुषंगिक व पूरक गोष्टी – विशेषत: पुढील गोष्टींचा त्यात समावेश आहे – परिवास्तू, वायुयाने, जलयाने, वाहने किंवा इतर याने यामध्ये प्रवेश करून त्यांची आणि जनावरांची झडती घेणे किंवा तपासणी करणे, आणि असा प्रवेश, झडती किंवा तपासणी करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने पुढील वस्तूंचे अभिग्रहण करणे :–

  (i) ज्या कोणत्याही वस्तूंबाबत आदेशाचे उल्लंघन झालेले आहे, होत आहे किंवा होण्याच्या बेतात आहे असे समजण्यास अशा व्यक्तीला कारण आहे त्या वस्तू आणि ज्यामध्ये अशा वस्तू सापडल्या ती आवेष्टने, आच्छादने किंवा पात्रे;

  (ii) अशा वस्तूंची ने–आण करण्यासाठी वापरण्यात येणारे एखादे वायुयान, जलयान, वाहन किंवा अन्य यान किंवा जनावर या अधिनियमाच्या उपबंधाखाली जप्त होण्यास पात्र आहे असे समजण्यास अशा व्यक्तीला कारण असल्यास असे वायुयान, जलयान, वाहन किंवा अन्य यान किंवा जनावर;

  (iii) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत अशा व्यक्तीच्या मते उपयोगी पडण्यासारखी किंवा संबंध ठरण्यासारखी असतील अशी कोणतीही हिशेब पुस्तके व दस्तऐवज – अशी हिशेब–पुस्तके व दस्तऐवज जिच्या ताब्यातून ते घेतले त्या व्यक्तीला अशी हिशेब–पुस्तके व दस्तऐवज ज्याच्या ताब्यात आहेत अशा अधिकाऱ्याच्या समक्ष त्यांच्या नकला करून घेण्याचा व त्यातील उतारे काढून घेण्याचा हक्क राहील.

(३) पोट–कलम (२) च्या खंड (f) ला अनुलक्षून काढण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून एखादी व्यक्ती कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंची विक्री करील तेव्हा त्या व्यक्तीला त्याबाबत यापुढे उपबंधित करण्यात आल्याप्रमाणे किंमत देण्यात येईल :–

(a) या कलमाखाली निश्चित करण्यात आलेली काही नियंत्रित किंमत असल्यास, जेव्हा त्या किमतीशी सुसंगत अशी किंमत दोन्ही पक्षांना मान्य होऊ शकत असेल तेव्हा, ती मान्य झालेली किंमत;

(b) जेव्हा असे कोणतेही मतैक्य होऊ शकत नाही तेव्हा, नियंत्रित किंमत असल्यास, तिच्या संदर्भात हिशेब करून ठरवण्यात आलेली किंमत;

(c) जेव्हा खंड (a) आणि खंड (b) यातील कोणताही खंड लागू होत नसेल तेव्हा, विक्रीच्या दिनांकास त्या स्थानिक भागात प्रचलित असलेल्या भावानुसार हिशेब करून ठेवण्यात आलेली किंमत.

(३–A) (i) जर वाढत्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अथवा कोणत्याही स्थानिक भागात खाद्य पदार्थाची साठेबाजी

रोखण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोट–कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट–कलम (२) च्या खंड (f) ला अनुलक्षून देण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून या पोट–कलमातील तरतुदीनुसार त्या ठिकाणी खाद्यपदार्थाच्या विक्रीची किंमत विनियमित करण्यात यावी असे निदेशित करू शकेल.

(ii) या पोट–कलमाखाली काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना त्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन महिने इतक्या कालावधीसाठी अमलात राहील;

(iii) या पोट–कलमाखाली अधिसूचना काढण्यात आल्यानंतर कोणतीही व्यक्ती तीत नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या खाद्यपदार्थाची याप्रमाणे नमूद केलेल्या स्थानिक भागात पोट–कलम (२) च्या खंड (f) ला अनुलक्षून काढण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून विक्री करील त्याबाबतीत विक्रेत्याला खालीलप्रमाणे किंमत देण्यात येईल :–

(a) जेव्हा या कलमाखाली खाद्यपदार्थाची काही नियंत्रित किंमत निश्चित करण्यात आलेली असल्यास त्या किमतीशी सुसंगत किंमत मान्य होते तेव्हा, ती मान्य किंमत;

(b) जेव्हा असे कोणतेही मतैक्य होऊ शकत नाही तेव्हा, काही नियंत्रित किंमत असल्यास तिच्या संबंधात हिशेब करून ठरवण्यात आलेली किंमत;

(c) जेव्हा खंड (a) आणि खंड (b) यातील कोणताही खंड लागू होत नसेल तेव्हा, अधिसूचनेच्या दिनांकाच्या लगतपूर्व तीन महिन्यांच्या कालावधीत त्या स्थानिक भागात प्रचलित असलेल्या सरासरी बाजारभावाच्या संदर्भात हिशेब करून ठरवण्यात आलेली किंमत;

(iv) खंड (iii) चा उपखंड (g) यातील प्रयोजनार्थ त्या स्थानिक भागातील प्रचलित बाजारभाव केंद्र शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून त्या स्थानिक भागाच्या किंवा त्याच्या शेजारच्या स्थानिक भागाच्या संबंधात ज्या प्रचलित बाजारभावांबद्दलची प्रकाशित आकडेवारी उपलब्ध असेल त्यांच्या संदर्भात निश्चित करण्यात येईल आणि असा निश्चित करण्यात आलेला सरासरी बाजारभाव अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात त्याविषयी प्रश्न उपस्थित करता येणार नाही.

(३–B) जेव्हा पोट–कलम (२) च्या खंड (f) ला अनुलक्षून काढण्यात आलेल्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीने ज्यांच्या संबंधात कलम ३–A खाली अधिसूचना काढलेली नाही, अगर अशी अधिसूचना काढली जाऊन ती अमलात असण्याचे बंद झाले आहे अशी अमुक दर्जाची किंवा प्रकारची अन्नधान्ये, खाद्य तेलबिया, खाद्य तेले केंद्रशासनाला किंवा राज्य शासनाला किंवा त्या शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याला किंवा प्रतिनिधीला विकणे आवश्यक असते तेव्हा, –

(a) अशा दर्जाचे आणि प्रकारचे अन्नधान्य, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले याबाबत या कलमाखाली किंवा त्या–त्या काळी अमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली काही ठरवण्यात आली असल्यास ती नियंत्रित किंमत;

(b) एकंदर पीक उत्पादनाचे भवितव्य;

(c) अशा दर्जाची किंवा प्रकारची अन्नधान्ये, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले ग्राहकांना – विशेषत: ग्राहकांपैकी दुर्बल वर्गांना वाजवी किमतीत उपलब्ध करून देण्याची गरज;

(d) संबंधित दर्जाची किंवा प्रकारची अन्नधान्ये, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले यांच्या किमतीबाबत 'कृषिविषयक किंमत आयोगाच्या काही शिफारशी असल्यास;

त्या शिफारशी लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या पूर्व मान्यतेने राज्य शासनाने अशी अन्नधान्ये, खाद्य तेलबिया किंवा यथास्थिती,

खाद्य तेले यांसाठी विनिर्दिष्ट केलेल्या प्रापण – किमतीएवढी रक्कम, पोट–कलम ((३) मध्ये याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, संबंधित व्यक्तीला देण्यात येईल;

(३–C) जेव्हा पोट–कलम (२) च्या खंड (f) खाली काढण्यात आलेल्या आदेशानुसर एखाद्या उत्पादकास, कोणत्याही प्रकारची साखर विकणे (– मग ते केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला असो, अशा शासनाचा अधिकारी किंवा प्रतिनिधी याला असो वा अन्य व्यक्ती किंवा व्यक्तीवर्ग यांना असो–) भाग असेल आणि एकतर पोट–कलम (३–A) खाली अशा साखरेबाबत अधिसूचना काढण्यात आली नसेल किंवा काढण्यात आलेली अशी अधिसूचना तिचा कालावधी लोटून गेल्यामुळे अमलात असण्याचे बंद झाले असेल तेव्हा–

(a) केंद्र शासनाने या कलमाखाली उसासाठी काही निश्चित केली असल्यास, अशी किमान किंमत;

(b) साखरेचा निर्मिती – खर्च;

(c) त्यावर भरलेले किंवा प्रदेय असे काही असल्यास, ते शुल्क किंवा कर; आणि

(d) साखर निर्मितीच्या धंद्यात घातलेल्या भांडवलावर वाजवी प्राप्ती मिळण्याची निश्चिती करणे,

या गोष्टी लक्षात घेऊन, केंद्र शासन आदेशाद्वारे साखरेची जी किंमत ठरवील अशा किमतीच्या संदर्भात परिगणना करून ठरवण्यात येईल अशी रक्कम, पोट–कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या उत्पादकाला देण्यात येईल, आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी किंवा वेगवेगळ्या कारखान्यांसाठी किंवा वेगवेगळ्या प्रकारच्या साखरेसाठी वेगवेगळ्या किमती वेळोवेळी निश्चित केल्या जातील.

**स्पष्टीकरण –** या पोट–कलमाच्या प्रयोजनार्थ, ''उत्पादक'' याचा अर्थ, साखर–निर्मितीचा धंदा करणारी व्यक्ती असा आहे.

(४) जर एखाद्या अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन व पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, ते आदेशाद्वारे एखाद्या व्यक्तीला (यात यापुढे ''प्राधिकृत नियंत्रक'' म्हणून निर्दिष्ट) त्या वस्तूचे उत्पादन व पुरवठा यांमध्ये गुंतलेला असा जो कोणताही उपक्रम त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा संपूर्ण उपक्रमाच्या किंवा त्याच्या भागाच्या बाबतीत त्या आदेशामध्ये उपबंधित करण्यात येतील असे नियंत्रण विषयक कार्याधिकार वापरण्यास प्राधिकृत करू शकेल, आणि कोणताही उपक्रम किंवा त्याचा भाग याबाबत असा आदेश अमलात असेपावेतो –

(a) प्राधिकृत नियंत्रक हा केंद्र शासनाने त्याला दिलेल्या कोणत्याही अनुदेशांनुसार आपले कार्याधिकार वापरील, तथापि त्यायोगे, आदेशामध्ये जेवढी स्पष्ट तरतूद केली असेल ते खेरीज करून एरवी त्यास उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीचे कार्याधिकार ठरवून देणाऱ्या कोणत्याही अधिनियमितीच्या किंवा संलेखाच्या उपबंधांशी विसंगत असा कोणताही निदेश देण्याचा कोणताही अधिकार असणार नाही; आणि

(b) आदेशाच्या उपबंधान्वये प्राधिकृत नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही निदेशांनुसार उपक्रम किंवा त्याचा भाग चालवला जाईल, आणि त्या उपक्रमाच्या किंवा भागाच्या संबंधात कोणतेही व्यवस्थापनविषयक कार्याधिकार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अशा कोणत्याही निर्देशाचे अनुपालन करावे लागेल.

(५) या कलमाखाली दिलेला कोणताही आदेश –

(a) सर्वसाधारण स्वरूपाचा किंवा एखाद्या व्यक्ती वर्गावर परिणाम करणारा असल्यास त्याबाबतीत, तो शासकीय राजपत्रात अधिसूचित केला जाईल; आणि

(b) एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीला उद्देशून दिलेला असल्यास त्याबाबतीत, तो आदेश त्या व्यक्तीवर –

(i) तो त्या व्यक्तीला सुपूर्द करून किंवा देऊ करून, किंवा

(ii) या प्रमाणे तिला तो सुपूर्द करणे किंवा देऊ करणे शक्य नसेल तर, ती व्यक्ती जेथे राहते त्या परिवास्तूच्या बाहेरच्या दरवाज्यावर किंवा त्या परिवास्तूच्या अन्य एखाद्या ठळक भागी लावून आणि त्याबाबत लेखी प्रतिवृत्त तयार करून शेजारी राहणाऱ्या दोन व्यक्तींची त्यावर साक्ष घेऊन बजावला जाईल.

(६) केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवला जाईल.

**कलम ३ चे विवेचन**

अत्यावश्यक वस्तूंचे सर्वत्र सारख्या प्रमाणात वितरण व्हावे व जनतेला त्या रास्त किमतीवर उपलब्ध व्हाव्यात हा अधिनियमाचा हेतू असल्याने, अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा सातत्याने करणे किंवा त्यात वाढ करणे किंवा त्याचे सर्वत्र सारख्या प्रमाणात वितरण करणे किंवा वस्तू रास्त भावाने उपलब्ध होणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाला वाटल्यास ते, अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वितरण नियमित करण्यासाठी कलम ३ खाली आदेश काढू शकते, किंवा आदेश काढण्याचा किंवा अधिसूचना जारी करण्याचा अधिकार त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाकडे किंवा कोणत्याही राज्य शासनाकडे किंवा त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवू शकते. तत्त्वतः केंद्र शासनास दुय्यम असल्याने प्राधिकरणांनी किंवा राज्य शासनांनी या कलमान्वये सोपविलेल्या अधिकारात काढलेला कोणताही आदेश हा कमी दर्जाचा असणार नाही परंतु अधिकाराचा दुरुपयोग होऊ नये म्हणून केंद्र शासनाने किंवा तिच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने काढलेला आदेश संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची तरतूद कलम ६ मध्ये केलेली आहे.

ग्राहकांना अत्यावश्यक वस्तू रास्त भावाने उपलब्ध करून देणे हे कलम ३ चे उद्दिष्ट आहे. केवळ वस्तूंचा भाव निश्चित करण्यामुळे हे साध्य होणार नाही, तर निश्चित भावाबरोबरच त्याचा नियमित पुरवठा होणे, जर पुरवठा पुरेशा प्रमाणात नसेल तर त्यात वाढ करणे आवश्यक आहे. उत्पादकांचे व कारखानदारांचे हित जोपासणे यास सर्वसाधारण जनतेच्या हिताएवढे महत्त्व नसले तरीही त्यांच्याही हिताचा विचार होणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अत्यावश्यक वस्तूंची निकड किंवा मागणी आणि उद्योजकांचे हित यामध्ये समतोल साधणे हे शासनाचे आद्य कर्तव्य ठरते. परंतु कोणत्याही परिस्थितीत उद्योगांचे हित अधिभावी किंवा वरचढ होता कामा नये. जनतेच्या हितास्तव उद्योगाची तात्पुरती हानी होत असली तरीही रास्त भाव ठरवताना शासनाने अशा हानीला वाजवीपेक्षा अधिक महत्त्व देता कामा नये. परंतु अशा हानीमुळे उद्योगधंदा बंद पडण्याची पाळी येणार नाही व उद्योजकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होणार नाही. याकडेही लक्ष देणे आवश्यक ठरेल.

या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी कलम ३ द्वारे केंद्र शासनाला अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा व वितरण याचे तसेच त्यासंबंधात व्यापार व वाणिज्य यांचे नियमन करण्यासाठी आदेश काढण्याविषयीचा अधिकार दिला आहे. कलम ३, पोट–कलम (२) खंड (c) द्वारे कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंच्या खरेदी व विक्रीचा किमतीचे नियंत्रण करण्यासाठी आदेशात तरतूद करता येते. पोट–कलम (२) च्या खंड (f) द्वारे अत्यावश्यक वस्तूंच्या खरेदी–विक्रीचा व्यवहार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, विशिष्ट परिस्थितीत त्याच्या जवळच्या संपूर्ण किंवा अधिक साठा केंद्र किंवा राज्य शासनाला विकण्यासाठी भाग पाडण्यासाठी आदेशातच तरतूद करता येते.

कलम ३ खाली काढण्यात आलेले सर्व आदेश हे अधिनियमाचाच भाग असल्याने अधिनियमापासून आदेश स्वतंत्र आहेत असे मानणे चुकीचे ठरेल. कलम ३ पोट–कलम (१) हे अत्यंत महत्त्वाचे कलम असून त्याद्वारे शासनाला आदेशाचे अधिकार मिळालेले आहेत. परंतु हे अधिकार अनिर्बंध नाहीत तर, **(नरेंद्रकुमार वि. भारतीय महासंघ)** या प्रकरणात **(ऑ. इं. रि. १९६० स. न्या. ४३०)** सर्वोच्च न्यायालयाने प्रतिपादन केल्याप्रमाणे कलम ३ द्वारे अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन

करण्याचे किंवा त्यास प्रतिबंध करण्याचे अधिकार हे भारतीय संविधानाने बहाल केलेल्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन न करण्याच्या अधीनतेने दिलेले असतात. ''कलम ३ च्या पोट–कलम (२) मध्ये, पोट–कलम (१) मध्ये दिलेल्या अधिकाराविषयीची मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत.

अधिनियमाच्या कलम ३ अन्वये केवळ आदेश काढून चालत नाही तर हे आदेश शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाले पाहिजेत. हा आदेश अधिसूचनेद्वारे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध होणे ही 'अपरिहार्य अट' (Sine quanon) आहे. एकदा शासकीय राजपत्रामध्ये आदेश किंवा अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असल्याने पुरावा अधिनियमाच्या कलम ७८ च्या तरतुदीनुसार न्यायालयात सिद्ध करावे लागते. कलम ७८ मध्ये केवळ शासकीय दस्तऐवज हे पुरावा म्हणून सिद्ध करण्याची पद्धती सांगितली आहे. परंतु या दस्तऐवजाच्या अचूकतेविषयी त्यात निर्णय दिलेला नाही. संसदेने मंजूर केलेले अधिनियम आदेश यामध्ये फरक आहे. कारण आदेश हा जारी करावा लागतो व त्यास योग्यरीत्या प्रसिद्धी द्यावी लागते. **(हरला वि. स्टेट, ऑ. इं. रि. १९५१, स. न्या. ४६७)** शासकीय अधिसूचना ही ''कायदा'' नसल्याने पुराव्या दाखल राजपत्र सादर केल्याखेरीज **(जिल्हाधिकारी वि. जुगल, ऑ. इं. रि. १९२८, अलाहा ३३५)** किंवा अशी अधिसूचना जारी करणाऱ्या विभागाच्या प्रमुखाने प्रमाणित केलेली प्रत सादर केल्याखेरीज **(जानूखारी वि. स्टेट, ऑ. इं. रि. १९६९, पाटणा २९३)** न्यायालय त्याची दखल घेत नाही. शासकीय अधिसूचनेची वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रतिचा पुरावा म्हणून अधिनियमाच्या कलम ७८ च्या पहिल्या खंडात समावेश होत नाही.

**(सरकारी सस्ता अनाज विक्रेता संघ वि. राज्य, ऑ. इं. रि. १९८१, स. न्या. २०३०)** या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा दिला की, राज्य शासनाने काढलेले आदेश संसदेपुढे ठेवण्याची गरज नाही. तसेच **चिंता वि. भारत सरकार, ऑ. इं. रि. १९७१, स. न्या. ४७४)** या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे प्रतिपादन केले की, कलम ३ (b) खालील सर्व आदेश संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येत असल्याने त्यांना केवळ कार्य पार पाडण्याविषयीच्या अनुदेशांचेच (Executive Instructions)स्वरूप असत नाही तर त्यांना संविधानाच्या अनुच्छेद ३०२ च्या अर्थांतर्गत संसदेने पार पाडलेल्या कायद्यांचे स्वरूप प्राप्त होते.

या आदेशांना अत्यावश्यक वस्तू अधिनियमाहून स्वतंत्र अस्तित्व नसल्याने त्यांस राष्ट्रपतींच्या अलग मंजुरीची गरज नाही **(नागारेड्डी वि. म्हैसूर राज्य, ऑ. इं. रि. १९६०, म्हैसूर १९२)**.

## पोटकलमे (३), (३–A), (३–B) व (३–C) ची व्याप्ती

शासनाला आवश्यकता वाटल्यास पोट–कलम (२) खाली कार्यवाही करता येते. म्हणजेच, अत्यावश्यक वस्तूच्या खरेदी–विक्रीच्या किमती नियंत्रित करता येते किंवा विक्रीसाठी ठेवलेल्या कोणत्याही अत्यावश्यक वस्तूची विक्री थांबवू शकते किंवा त्यावर बंदी आणू शकते पोट–कलम (१) उल्लेखिलेल्या परिस्थिती बरोबरच जर शासनाला वाढत्या किमतीला किंवा साठेबाजीला तोंड देण्याची वेळ आली, ज्यामुळे एखाद्या विशिष्ट ठिकाणी कृत्रिम टंचाई निर्माण होऊन जनतेला वाजवी दराने वस्तू मिळेनाशा झाल्या तर कलम (३–A) लागू होतो. उत्पादकांच्या किंवा व्यापाऱ्यांच्या असामाजिक वर्तणुकीमुळे, टंचाईग्रस्त भागामध्ये दामदुपटीने अत्यावश्यक वस्तूंची विक्री करण्याचे प्रसंग वारंवार घडून येतात. केवळ अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी कलम (३–A) ची तरतूद केली आहे. म्हणून पोट–कलम (१) मध्ये निर्देश केलेली परिस्थिती अस्तित्वात असल्यास पोट–कलम (२), खालील कार्यवाही करण्यासाठी शासनाला या पोट–कलमान्वये प्रतिबंध होत नाही. **(थानमल वि. भारतीय महासंघ, ऑ. इं. रि. १९५९, राज २०६)** पोट–कलम (३) मध्ये संबंधित प्राधिकाऱ्याने ज्या पद्धतीने अत्यावश्यक वस्तूंची किंमत निर्धारित करावयाची आहे ती पद्धत दिलेली पोट–कलम (३) मध्ये सर्वच अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीत सर्वसाधारण तरतूद केली असून पोट–कलम (३–B) मध्ये अन्नसामग्री, तेलबिया व तेले याविषयीच विशिष्ट तरतूद केलेली आहे. पोट–कलम (३–C) हे १९६६ या सुधारणा अधिनियम

२५ द्वारे दाखल केले आहे, तर पोट–कलम (३–C) हे १९६७ चा अधिनियम ३६ याद्वारे दाखल केले आहे. साखरेच्या उत्पादनात, साखर उद्योगात वाढ व्हावी तसेच ऊस उत्पादकांचाही लाभ होईल तसेच ग्राहकांना रास्त भावात साखरही मिळू शकेल. या दृष्टीने प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हे कलम दाखल केले आहे. कलम (३–C)) अनुसार जेव्हा केंद्र किंवा राज्य शासन किंवा त्याचा अधिकारी, प्रतिनिधी पोट–कलम (२) च्या खंड (च) खाली आदेश काढून उत्पादकांना साखरेची विक्री करण्यास भाग पाडत असेल अशावेळी याच पोट–कलमाच्या खंड (a) ते (d) मध्ये विशद केलेल्या परिस्थितीच्या संदर्भात साखरेची किंमत निश्चित करण्यात येईल, अशी पोट–कलमात तरतूद केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने **पानिपत सहकारी साखर कारखाना वि. महासंघ,** या **(ऑ. इं. रि. १९७३, स. न्या. ५३७ : (१९७३) १ स.न्या. प्र. १२९)** या प्रकरणात असे प्रतिपादन केले आहे की, ''रास्त किंमत ही सयुक्तिक, सक्षम व आर्थिक आधारावर ठरवावयास पाहिजे. ज्यामुळे पोट–कलम (३–C) खाली किंमत निर्धारित करता येईल. उत्पादकाने साखरेच्या उत्पादनासाठी जे भांडवल गुंतवले त्याचा वाजवी मोबदला असेल अशा प्रकारे संपूर्ण उत्पादनासंबंधात रास्त किंमत निर्धारित केली पाहिजे.''

कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या किंमत–निश्चितीची उपाययोजना ही शेतकऱ्यांना उत्पादकांच्या पिळवणुकीपासून वाचवण्यासाठी करण्यात येते. परंतु अत्यावश्यक वस्तू अधिनियमाखाली किंमत निश्चित करतेवेळी प्रथमत: उत्पादकांपेक्षा ग्राहकांच्या हिताचा विचार करण्यात येतो. परंतु त्याच वेळी उद्योगांच्या हितांकडेही लक्ष पुरवणे आवश्यक ठरते. साखरेची लेव्ही किंमत ठरवतेवेळी उद्योजकांना पुरेसा मोबदला मिळतो की नाही, हे पाहणेही आवश्यक असते. अधिनियमाच्या कलम ३ (३) (g) मध्ये याविषयीच्या मार्गदर्शक तत्त्वाची तरतूद केलेली आहे. परंतु उत्पादकांचे हित हे ग्राहकाच्या हितापेक्षा अधिभाव होणार नाही, याकडे नेहमीच लक्ष ठेवले पाहिजे **(गुप्ता शुगर वर्क्स. लि. स्टेट, ऑ. इं. रि. १९८७, स. न्या. २३५१).**

कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या निश्चितीविषयी विवाद उत्पन्न होतो. अशा वेळी न्यायालय, केवळ निश्चित किंमत ही संविधानाने ज्या बाबी विचारात घेणे आवश्यक केले आहे त्या लक्षात घेतल्या किंवा नाही आणि किंमत–निश्चितीतून कोणत्याही अतिरिक्त बाबी वगळण्यात आल्यात किंवा नाही याची तपासणी करते. कोणतीही वैयक्तिक बाब किंवा समस्या याविषयी न्यायालयाला कोणतेही कर्तव्य असत नाही.

परंतु कलम ३ (३) (c) खाली करावयाचे रकमेचे प्रदान आणि कलम ३ (२) (c) खाली निश्चित करावयाची किंमत यामध्ये तफावत आहे. कारण ३ (२) (c) खाली काढावयाचा आदेश हा सर्वसाधारण स्वरूपाचा असतो, तर कलम ३ (३) (c) हे विशिष्ट व्यवहार दर्शवते. कलम ३ (२) (c) खाली काढलेला आदेश हा एकाच व्यवहारासंबंधी व एखाद्या विशिष्ट व्यक्तीस अनुलक्षून काढलेला नसल्याने ती वैधानिक कृती ठरते तर, कलम ३ (३) (c) खालील आदेश हा विवक्षित व्यक्तीस विक्री करण्यासाठी भाग पाडण्यासंबंधीचा विशिष्ट आदेश असल्याने ती अ–वैधानिक कृती (non-legislative act) ठरते. कलम ३ (२) (c) खाली अत्यावश्यक वस्तूंची किंमत नियंत्रित करण्यासाठी काढलेल्या आदेशातच किंमत ज्या पद्धतीने निश्चित करायची ती पद्धत विहित केलेली असते. परंतु त्याद्वारे अवैधानिक कृतिद्वारे संपादन केलेल्या वस्तूची किंमत निश्चित करता येणार नाही. कारण, कलम ३ (२) (c) खालील आदेश हा सर्वसाधारण स्वरूपाचा असतो व तो सर्वांना व सर्व व्यवहारांना सारखाच लागू होतो.

या कलमाखालील आदेशांचा भंग झाल्याचा संशय आल्यास सक्षम प्राधिकाऱ्यास (Competent Authority) झडती घेता येते व लेखापुस्तके इ. तपासल्यानंतर मालाची जप्तीही करता येते. परंतु, अशा प्राधिकाऱ्यास संशय कोणत्या कारणास्तव आला त्याची कारणे लेखी स्वरूपात प्रत्येक वेळी नमूद केली पाहिजेतच असे नाही. याबाबतीत पाटणा उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, ''झडती घेणाऱ्या अधिकाऱ्याने त्या निर्णयाची कारणे लेखी स्वरूपात नमूद केली नाहीत हे सत्य असले तरीही, विनंती अर्जदाराने यथायोग्य प्रकारे लेखे ठेवले नाहीत, यावरून झडतीसाठी कोणतेही कारण नव्हते असे दिसून येत नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने त्याच्या झडती व जप्तीची कारणे लेखी स्वरूपात नोंदली नाही एवढ्याच कारणावरून त्याने केलेली झडती व जप्ती ही

अवैध आहे असे मानता येणार नाही.'' असा दृष्टिकोन मध्य प्रदेश उच्च न्यायालयानेही स्वीकारला आहे. झडती घेण्याचा अधिकार हा संविधीद्वारे प्राप्त झाला आहे; तो लेखी अभिलेखाद्वारे मिळालेला नाही. म्हणून झडतीपूर्वी किंवा नंतर त्याविषयीची कारणे अभिलिखित न केल्याच्या कारणास्तव, कोणताही खटला अवैध ठरणार नाही; मात्र झडती घेण्यामागे अशा अधिकाऱ्याचा पूर्वग्रह (Prejudice) असे सिद्ध झाले तर गोष्ट वेगळी **(मथुरालाल वि. मध्य प्रदेश राज्य (१९८८)१ क्राईम्स १३६)** अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या कलम ३ चे उल्लंघन झाले असल्याचे पोलीस अहवालावरून दिसून आल्यास जिल्हाधिकाऱ्यांलादेखील जप्तीचा आदेश देता येतो.

राज्य शासनाने आदेशामध्ये केलेल्या सुधारणा हे वैधानिक कार्य (Legislative Function) असल्याने बाधित व्यक्तींना सुनावणीची संधी देण्यासाठी राज्य शासन बांधील असत नाही. **(सरकारी सस्ता अनाज विक्रेता संघ वि. राज्य, ऑ. इं. रि. १९८१, स. न्या. २०३०).**

अत्यावश्यक वस्तूचा पुरवठा सातत्याने व्हावा यासाठी किंवा त्यात वाढ करण्यासाठी किंवा सर्वत्र सारखे वितरण व्हावे यासाठी किंवा त्या अत्यावश्यक वस्तू रास्त किमतीवर उपलब्ध व्हाव्यात यासाठी किंमत निश्चित करण्यात आली असेल अशाबाबतीत किंमत निश्चित करणाऱ्या अधिसूचनेच्या अंमलबजावणी विरुद्ध न्यायालयाने अंतरिम स्थगनादेश देऊ नये, कारण असा आदेश जनहिताविरुद्ध असेल, आणि असा आदेश किंवा अधिसूचना याद्वारे कोणतेही जनहित साधणार नाही याविषयी न्यायालयाची खात्री झाल्याखेरीज न्यायालय असा कोणताही आदेश देणार नाही. किंमत निश्चितीच्या बाबतीत, पहिला पसंतीक्रम जनहितास असला पाहिजे आणि प्रत्येक अंतरिम आदेशाद्वारे जनहिताची जोपासना करावयास पाहिजे. **(भारतीय महासंघ वि. सायनामाईड इंडिया लिमिटेड, ऑ. इं. रि. १९८७, स. न्या.१८०२; (१९८७) २ स. न्या. प्र. ७२०).**

**४. राज्य शासन, इत्यादींना कर्तव्ये नेमून देणे :–**

कलम ३ खाली काढण्यात आलेला कोणताही आदेश केंद्र शासन किंवा राज्य शासन अथवा केंद्र शासनाचे किंवा राज्य शासनाचे अधिकारी आणि प्राधिकरणे यांना अधिकार प्रदान करू शकेल आणि कर्तव्ये नेमून देऊ शकेल, आणि त्यामध्ये, कोणत्याही राज्य शासनाला अथवा त्याचे अधिकारी किंवा प्राधिकरण यांना उद्देशून दिलेले, अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याविषयीचे किंवा अशी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याविषयीचे निदेश अंतर्भूत असू शकतील.

**कलम ४ चे विवेचन**

या कलमातील तरतुदींद्वारे वैधानिक धोरण स्पष्ट करण्यात आले आहे. या धोरणाच्या चौकटीत राहून दुय्यम प्राधिकरणांना अधिकार सोपवून हे धोरण अधिक प्रभावी कसे करता येईल याविषयी या कलमात तरतूद केलेली आहे.

कलम ४ अन्वये अधिकार सोपवल्यामुळे प्रांतिक शासनांना, आवश्यक पुरवठा (तात्पुरती तरतूद) अधिनियम, १९४६ याच्या कलम ३ (१) द्वारे केंद्र शासनाकडे निहित असलेल्या वैधानिक अधिकाराचा वापर करण्याचा हक्क प्राप्त होतो आणि कलमे ३ व ४ तसेच केंद्र शासनाने काढलेली अधिसूचना यांना संयुक्तपणे कार्यान्वित करून त्याद्वारे अधिसूचित आदेश काढण्यासाठी सक्षम असलेल्या प्रांतीय शासनांनी अशा आदेशातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांकडे अधिकार सोपवण्यासाठी कोणताही प्रत्यवाय असणार नाही **(ठाकोरलाल वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५९, मुंबई ५११८).**

या कलमाद्वारे, अधिसूचित आदेश काढण्याचे अधिकार केंद्र शासनाकडे निहित झाले आहेत. हे आदेश विशेष असतील की सर्वसाधारण हे त्या कलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींवर अवलंबून असेल. **(संतोष वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५१, स. न्या. २.१ : ५२ क्रिमी, लॉ जर्नल ७५७).** अशा अधिसूचित आदेशामध्ये, अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन, पुरवठा व वितरण यासंबंधीच्या बाबींचे विनियमन किंवा मनाई याविषयीची तरतूद करता येईल.

**५. अधिकार सोपवणे :–**

केंद्र शासन अधिसूचित आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, कलम ३ खाली आदेश देण्याचा किंवा अधिसूचना काढण्याचा अधिकार निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा बाबींच्या संबंधात आणि विनिर्दिष्ट असल्यास, तशा शर्तींच्या अधीनतेने, निदेशात विनिर्दिष्ट असेल.–

(a) असा केंद्र शासनाचा दुय्यम अधिकारी किंवा प्राधिकरण, अथवा

(b) असे राज्य शासन किंवा एखाद्या राज्य शासनाचा असा दुय्यम अधिकारी किंवा प्राधिकरण,

यानेही वापरण्याजोगा असेल.

**कलम ५ चे विवेचन**

कलम ३ (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, अत्यावश्यक वस्तूसंबंधीचे अधिकार केंद्र सरकारला वापरण्यायोग्य असून कलम ५ द्वारे केंद्र सरकारला या अधिकारांच्या सोपवणुकीचे प्राधिकार देण्यात आले आहेत.

कोणताही कायदा अधिनियमित करताना आपले उद्दिष्ट आणि धोरण यांस प्रभावी करण्यासाठी विधानमंडळाला कोणत्याही पद्धतीने अधिकाराची सोपवणूक करण्याइतपत कायदा करण्याची मोकळीक आहे. परंतु, कलम ५ अनुसार पुनर्प्रत्यायोजन करण्याची क्षमता फक्त संसदेला आहे. कलम ३ अन्वये स्वत:कडे असलेले अधिकार केंद्र शासन, राज्य शासनाकडे किंवा केंद्र शासन काढील अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे सोपविण्यासाठी सक्षम आहे. परंतु राज्य शासनाला मात्र हे अधिकार दुय्यम अधिकाऱ्याकडे स्वत:हून सोपवता येत नाहीत. राज्य शासनाने सोपवलेल्या अधिकाराच्या कक्षेत राहूनच या अधिकाराचा वापर केला पाहिजे. या संदर्भात मध्य प्रदेश अन्नसामग्री (नागरी पुरवठ्याचे जनतेत वितरण) योजना, १९८१ यास न्यायालयात आव्हान दिले असता सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, ''संविधानाचा अनुच्छेद १६२ तसेच अनुसूची सातची सूची तीनमधील नोंद ३३ (b) अन्वये राज्य शासनाला अन्न सामग्री वितरणासाठी कोणतीही योजना तयार करण्याचा अधिकार आहे. त्यासाठी अत्यावश्यक वस्तू अधिनियमाखालील कोणत्याही आदेशाद्वारे तिच्याकडे कोणतेही विशेष प्राधिकार निहीत असण्याची गरज नाही. म्हणून, ही योजना, अत्यावश्यक वस्तू अधिनियमाखाली प्रत्यायोजित केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करून तयार करण्यात आली नसून ती प्राधिकारांतर्गत (Intra vires) तयार करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेत (राज्य शासन हा केंद्र शासनाचा प्रतिनिधी या अर्थाने) प्रतिनिधीकडून प्रतिनिधीला अधिकार सोपवल्याच्या आधारावर त्यावर आक्षेप घेता येणार नाही. **(सरकारी सस्ता अनाज विक्रेता संघ वि. राज्य, ऑ. इं. रि. १९८१, स. न्या. २०३०).**

जो पर्यंत राज्य शासनाकडे सोपवलेले अधिकार अबाधित असतात, तोपर्यंतच असे सोपवलेले विधिविधान अमलात असते. कलम ३ खाली राज्य शासनाला सोपवलेले अधिकार हे विशिष्ट अत्यावश्यक वस्तूइतपत मर्यादित असत नाहीत तर, राज्य शासनाच्या आदेशाच्या तारखेस कलम २ (a) च्या कक्षेत येणाऱ्या सर्व वस्तूंच्या बाबतीत लागू होतात.

कार्यकारी प्राधिकरणाकडे (Executive Authority) अधिकाधिक अधिकार सोपवण्याची प्रवृत्ती हल्ली वाढत चालली आहे. संसदीय शासनात कार्यकारी प्राधिकरण कायदे बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. खरे सांगायचे, तर जनतेच्या वाटेला शासन पुरस्कृत कायदे येतात. त्यामुळे कार्यकारी प्राधिकरणाकडे अधिक अधिकार येतात, यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीही नाही.

विधिविधान या संज्ञेत विधान मंडळाने केलेले कायदे व प्रत्यायोजित विधिविधान अंतर्भूत असते. सालमंड यांनी प्रत्यायोजित विधिविधानाची पुढीलप्रमाणे व्याख्या केलेली आहे. ''ज्याची निर्मिती अधिसत्तेखेरीज कोणत्याही अन्य प्राधिकाऱ्याद्वारे करण्यात येते आणि म्हणून जे चिरंतन अस्तित्वासाठी व वैधतेसाठी एखाद्या वरिष्ठ किंवा अधिसत्तेवर (Soverign) अवलंबून असते त्यास प्रत्यायोजित विधीविधान असे म्हणता येईल ''विषयाधीन संविधी ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे की राज्य शासनच्या या

संदर्भात हे सर्वोच्च प्राधिकरण केंद्र शासन आहे की राज्य शासन हे ठरवता येते. काही वेळा केंद्र शासन वैधानिक अधिकार राज्य शासनाकडे सोपवते, तर काही वेळा केंद्र व राज्य शासनाला एकाच अधिनियमाद्वारे कायदे बनवण्याचा अधिकार मिळतो. खुद्द विधानमंडळाकडून मिळालेल्या नियम बनवण्याच्या अधिकाराखाली कार्यकारी प्राधिकरण विधिविधानाचे काम हाती घेते. कार्यकारी प्राधिकरणाच्या अशा प्रकारच्या नियम बनवण्याच्या अधिकारांना दुय्यम विधिविधान असेही म्हणता येईल.

संसदीय शासनात वैधानिक अधिकारांची सोपवणूक ही विधिविधानाला साह्यकारी ठरते. संसद केवळ दुय्यम व साह्यकारी विधिविधान करण्याचे कार्यच सोपवत नाही तर, प्रतिनिधीला, खुद्द संविधीमध्ये ज्यांचा विनिर्देश करण्यात आला आहे, अशा उप–प्रतिनिधीकडे या कार्याचे पुनर्सोपवणूक करते. **(हरिशंकर वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५४, स. न्या. ४६५).** अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या कलम ५ मध्ये सोपवणुकीचे किंवा पुनर्सोपवणुकीचे प्राधिकार दिलेले आहेत. परंतु उप–प्रतिनिधीला कोणतेही कार्य त्याच्याकडे विनिर्देशपूर्वक सोपवल्याखेरीज त्याचा वापर करता येत नाही. **(दाऊद अली वि. पोलीस आयुक्त, ऑ. इं. रि. १९८७, कलम. ५६५.)** राज्य शासनाला स्वतःच्या अधिकारात कोणत्याही अधिकाऱ्याकडे स्वतःकडील अधिकाराची पुनर्सोपवणूक करता येत नाही. कलम ३ अन्वये अधिकार सोपवण्यात आल्याखेरीज राज्य शासनाचा आदेश काढण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. राज्याकडे जोपर्यंत सोपवलेला अधिकार असेल तो पर्यंतच सोपवलेल्या विधिविधानाचा अंमल असतो. म्हणून, सोपवणुकीचा अधिकार नसताना अभिकथित ज्यांच्याकडे मुळातच अधिकार सोपवण्यात आला आहे अशा प्राधिकरणाने काढलेला आदेश शून्य ठरेल **(ठाणमल वि. भारतीय महासंघ, ऑ. इं. रि. १९५९, राज. २०६).**

केंद्र शासन हेच संसदेचे प्रतिनिधी असल्याने केंद्र शासनाने काढलेले आदेश हे दुय्यम विधिविधान ठरेल. याखेरीज या अधिनियमाखाली केंद्र शासनाला स्वतःकडील अधिकार व कार्ये राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे प्रत्यायोजित करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. अशा प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने अशा प्रकारे सोपवलेले अधिकार वापरल्यास ते अयोग्य प्रकारे वापरण्यात आले असल्याखेरीज अवैध ठरणार नाहीत. **(बी. सदन वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५९, अ. ला. ३३२ : क्रि. मी. लॉ जर्नल ६६३).**

दुय्यम विधिविधान वैध ठरण्यासाठी ते प्रकाशित होणे आवश्यक आहे. विधीविधानाद्वारे बाधित होणाऱ्या व्यक्तींना त्याविषयीची माहिती झाल्यानंतर म्हणजे ते प्रसिद्ध झाल्यानंतरच जनतेवर बंधनकारक ठरू शकते. **(हरला वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५२, एमसीआर ११०).** विधिविधान मंडळाने आपले अधिकार सोपविल्यानंतर त्याच्याकडील अधिकार समाप्त होत नाहीत. सोपवलेले अधिकार रद्द करण्याचे किंवा त्यांचा स्वतःचा वापर करण्याचे अधिकार ते स्वतःकडे राखते.

या ठिकाणी एका गोष्टीचा निर्देश करणे आवश्यक आहे व ती ही की, एकदा केंद्र शासनाचे आदेश काढून राज्य शासनाकडे अधिकार सोपवल्यानंतर एखादी वस्तू अत्यावश्यक वस्तू असल्याचे घोषित करण्यात आल्यास नव्याने पुन्हा त्या वस्तूच्या संदर्भात सोपवणुकीसंबंधीचे नवीन आदेश काढण्याची आवश्यकता असत नाही.

निरसनाचे अधिकार केंद्र शासनाकडे निहित आहेत आणि समुचित तरतुदींद्वारे केवळ या अधिकारांचा वापर संसदच करू शकते. संसदेला हे निरसनाचे अधिकार कोणत्याही कार्यकारी प्राधिकरणाकडे सोपवता येत नाहीत. असे कोणतेही अधिकार संसदेने, राज्य किंवा अन्य प्राधिकरणाकडे सोपवल्यास ते शून्य ठरतील आणि राज्य शासनाला प्रदान केलेल्या अधिकाराखाली राज्य शासनाने कोणताही आदेश काढल्यास केंद्र शासनाला तो निरसित करता येणार नाही. **(टिकारामजी वि. उत्तर प्रदेश राज्य, ऑ. इं. रि. १९५६, स. न्या. ६७६).**

निरनिराळ्या राज्यातील अत्यावश्यक वस्तूंच्या संबंधातील समतोल साधण्याचे काम केंद्र शासनाला पार पाडावे लागत असल्याने, अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीवर निर्बंध आणण्याचे अधिकार सर्वस्वी राज्य शासनाकडे असत नाहीत. अशी वाहतूक

करावयाची झाल्यास राज्यांना केंद्राची सहमती (Concurrence) प्राप्त करावी लागते. अशी सहमती देण्यामुळे सर्वांचेच हित साधेल अशी केंद्र शासनाची खात्री झाल्याखेरीज केंद्र शासन अत्यावश्यक वस्तूंच्या मुक्त वाहतुकीवर निर्बंध आणण्यास संमती देत नाही. **(जिल्हाधिकारी चित्तार वि. चित्तार जिल्हा भुईमूग व्यापारी संघ, ऑ.इं.रि, १९८९ सन्या ९८९)**

केंद्र शासनाद्वारे काढण्यात येणाऱ्या अधिसूचना कशा स्वरूपाच्या असतात, याची माहिती होण्यासाठी नमुन्यादाखल पुढील दोन अधिसूचना पाहाव्यात :

**१. सर्व राज्य शासने : अन्नसामग्री :**

जी.एस. आर. १६८ (ई) दिनांक १३ मार्च १९७३. – अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्र शासन, याद्वारे असा निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३, पोट–कलम (२) याच्या खंड (g) यात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी तरतूद करण्यासाठी आदेश काढण्याचे कलम ३ च्या पोट–कलम (१) अन्वये त्याच्याकडे सोपवलेल्या अधिकारांचा, अन्नसामग्रीचा संबंध असेल तेथवर राज्य शासनांनाही वापर करता येईल :

परंतु, उपरोक्त खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी आदेश काढण्यापूर्वी, राज्य शासन, केंद्र शासनाची सहमती प्राप्त करील.

(कृषी मंत्रालय क्र. ३ (सर्वसा) (२)/९२/७३–पीवाय–दोन).

(भारत सरकारचे राजपत्र, असाधारण, १९७३, भाग दोन, विभाग ३ (i) पृष्ठ ४४५).

**२. महाराष्ट्र :**

जी.एस. आर. ३२२ (ई) दिनांक १५ जुलै १९७४. – अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्र शासन, याद्वारे असा निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३, पोट–कलम (२), खंड (c) यात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी तरतूद करण्यासाठी आदेश काढण्याचे कलम ३ च्या पोट–कलम (१) अन्वये त्याच्याकडे सोपवलेल्या गव्हाच्या संदर्भात,

(१) महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या विवक्षित अधिकारितेत, आणि

(२) महाराष्ट्र अन्नसामग्री शिधावाटप (द्वितीय) आदेश, १९६६ याच्या अनुसूची अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिधावाटप क्षेत्रांतर्गत शिधावाटप नियंत्रक, मुंबई यांना, महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने वेळोवेळी नेमून देईल अशा मार्गदर्शक तत्त्वाचा अधीनतेने वापर करता येईल.

(कृषी मंत्रालय क्र. १ (महा) (२)/७४ – डब्ल्यू टी (१) – १५.)

(भारत सरकारचे राजपत्र, असाधारण, १९७४ भाग दोन, विभाग ३ (i), पृष्ठ १४७५.)

**६. इतर अधिनियमितीशी विसंगत आदेशांचा परिणाम :–**

कलम ३ खाली काढण्यात आलेला कोणताही आदेश, त्याच्याशी विसंगत असे काहीही या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणामकारक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये अंतर्भूत असले तरी, परिणामक होईल.

## कलम ६ चे विवेचन

पूर्वी अस्तित्वात असलेल्या कायद्यांतील कोणत्याही तरतुदींचे निरसन करणे हा या कलमाचा उद्देश नाही तर अत्यावश्यक वस्तू अधिनियमातील ज्या तरतुदी जेथवर विसंगत असतील तेथवर त्या परिणामकारक असणार नाहीत, अशी या कलमात तरतूद केलेली आहे. राज्य नियंत्रण आदेश व केंद्रीय नियंत्रण आदेश यांमध्ये जर विसंगती असेल तर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५४(१) अन्वये राज्य आदेश शून्य ठरतील **(रेमंड वुलन मिल्स वि.प. बंगाल राज्य, (१९८७) से. लॉ. जर्नल २५७).**

संविधानाच्या अनुच्छेद २५४ मध्ये ही बाब स्पष्ट केली आहे की, एखाद्या विवक्षित बाबीच्या संबंधात जेव्हा संसदेने कायदा केला असेल तेव्हा, अस्तित्वात असलेल्या राज्य कायद्याला तो अधिभावी असेल. केंद्रीय कायद्याशी प्रतिकूल असलेला कोणताही राज्य कायदा हा शून्य असेल. राज्य कायदा हा केंद्रीय कायद्याला प्रतिकूल नसेल तरीही, जर संसदेने केलेला कायदा हा सर्वसमावेशक व सर्व बाबींची पूर्ती करणारा आहे असा कायदा करण्यामागे संसदेचा उद्देश असेल तर केंद्रीय कायद्याने राज्य कायदा निरसित केला आहे असे समजण्यात येईल. परंतु त्यासाठी केंद्रीय कायदा व राज्य कायदा एकाच विषयाशी संबंधित असला पाहिजे आणि ते जर वेगळ्या व स्वतंत्र बाबींशी संबंधित असतील तर एकमेकांशी प्रतिकूल आहेत असे समजण्यात येणार नाही. **(श्री लक्ष्मी ट्रेडिंग वि. ए.डी.एम. रुरकेला, १९८९ क्रिमि. लॉ. जर्नल ६५९)**

**६–A . अत्यावश्यक वस्तूचे अधिग्रहण करणे :–**

६–A (१) कोणतीही अत्यावश्यक वस्तू तिच्या संबंधात कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार अभिग्रहण करण्यात आली असेल तर, ज्या जिल्ह्यात किंवा इलाखा शहरात अशा अत्यावश्यक वस्तूचे अभिग्रहण करण्यात आले असेल तेथील जिल्हाधिकाऱ्यास अशा अभिग्रहणाचे वृत्त गैरवाजवी विलंब न करता कळवावे लागेल आणि अशा आदेशाचे उल्लंघन झाल्याबद्दल खटला भरण्यात येवो वा न येवो – जिल्हाधिकारी, जर याला तसे करणे समयोचित वाटले तर, याप्रमाणे अभिग्रहण केलेली ती अत्यावश्यक वस्तू आपणापुढे तपासणीसाठी हजर करण्याचे निदेशित करू शकेल, आणि जर त्याची अशी खात्री झाली की, आदेशाचे उल्लंघन झाले आहे तर, तो ––

(a) अशा प्रकारे अभिग्रहण केलेली अत्यावश्यक वस्तू;

(b) ज्यात अशी अत्यावश्यक वस्तू आढळली असेल असे कोणतेही आवेष्टन, आच्छादन किंवा पात्र; आणि

(c) अशी अत्यावश्यक वस्तू वाहून नेण्यासाठी ज्याचा वापर करण्यात आला असेल असे कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान जप्त करण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधान्वये करण्यात येईल अशा कोणत्याही कारवाईस बाधा न येता, कोणतीही अन्नधान्ये किंवा खाद्य तेलबिया ही, त्यांच्या संबंधात कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार एखाद्या उत्पादकाकडून अभिग्रहण केली असून, जर अभिग्रहण केलेली अन्नधान्ये किंवा खाद्य तेलबिया त्याने उत्पादन केलेल्या असल्यास, त्यांचे या कलमान्वये जप्त करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, भाडे घेऊन मालाची किंवा प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारे कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान याच्या बाबतीत, असे जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान याद्वारे ज्या अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक करण्याचा प्रयत्न होता त्या वस्तूंच्या अधिहरणाऐवजी, तिच्या अभिग्रहणाच्या तारखेला असणाऱ्या तिच्या किमतीपेक्षा जास्त होणार नाही इतका द्रव्यदंड भरण्याचा विकल्पाधिकार असे जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान याच्या मालकाला देण्यात येईल.

(२) जर पोट–कलम (१) खाली अभिग्रहणाचे वृत्त मिळाल्यावर किंवा कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंची तपासणी केल्यावर

जिल्हाधिकाऱ्याचे असे मत झाले की, ती अत्यावश्यक वस्तू लवकर व जात्या नाशिवंत आहे, किंवा अन्यथा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुढील कृती समयोचित आहे, तर तो –

(i) या अधिनियमाखाली किंवा त्या–त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखाली अशा अत्यावश्यक वस्तूसाठी काही नियंत्रित किंमत निश्चित केली असल्यास, अशा किमतीला ती विकण्याचा आदेश देऊ शकेल; अथवा

(ii) अशी किंमत निश्चित केली नसेल तर; ती जाहीर लिलाव करून विकण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, केंद्र शासनाने किंवा एखाद्या राज्य शासनाने या अधिनियमान्वये किंवा त्या–त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये ज्याची किरकोळ विक्रीची किंमत निश्चित केली असेल अशा कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीत, जिल्हाधिकारी, तिचे न्यायोचित वितरण व्हावे व ती रास्त भावात उपलब्ध व्हावी म्हणून, याप्रमाणे निश्चित केलेल्या किमतीला रास्त भावाच्या दुकानांतून ती विकण्यात यावी असा आदेश देऊ शकेल.

(३) पूर्वोक्तानुसार कोणतीही अत्यावश्यक वस्तू विकण्यात येईल तेव्हा, तिच्या विक्रीचे उत्पन्न हे, त्यातून अशा विक्रीचा किंवा लिलावाचा खर्च अथवा त्यासंबंधीचा इतर आनुषंगिक खर्च वजा करून,–

(a) जिल्हाधिकाऱ्याने अखेरीस जप्तीचा आदेश काढला असेल तर,

(b) कलम ६–C च्या पोट–कलम (१) खाली अपिलान्ती काढलेल्या आदेशाद्वारे तसे आवश्यक केले असेल तर, किंवा

(c) या कलमाखाली ज्याबाबत जप्तीचा आदेश काढला असेल त्या आदेशाच्या उल्लंघनाबद्दल भरलेल्या खटल्यात, संबंधित व्यक्ती दोषमुक्त करण्यात आली असेल तर,

मालकाला किंवा ज्या व्यक्तीकडून ती वस्तू अभिग्रहण करण्यात आली त्या व्यक्तीला देण्यात येईल.

## कलम ६–A चे विवेचन

कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करण्याबद्दल त्या व्यक्तीविरुद्ध खटला भरण्यात आला किंवा आला नाही तरीही कलम ६–A अन्वये अत्यावश्यक वस्तू जप्त करण्याचे (Confiscation) अधिकार जिल्हाधिकाऱ्याला देण्यात आले आहेत. नियंत्रण आदेशाचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन झाले आहे यावर विश्वास ठेवण्यासाठी पर्याप्त कारण असले पाहिजे, हा माल जप्त करण्यासाठी पूर्वशर्त आहे व हे कारण ज्या कालावधीत असे अभिग्रहण (Sciture) करण्यात आले त्या कालावधीशी संबंधित असले पाहिजे **(ऑ. इं. रि. १९७६ दिल्ली २२५; ऑ.इं.रि १९६१ मुंबई २२७).**

'' नियंत्रण आदेशाचे उल्लंघन झाल्याबद्दल खात्री झाल्यास जिल्हाधिकाऱ्याला ती वस्तू जप्त करता येईल'' यामध्ये नियंत्रण आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याला अधिकार असले तरीही ही बाब त्याच्या स्वेच्छा निर्णयावर अवलंबून आहे, ही बाब नाकारता येत नाही **(आंध्र प्रदेश राज्य वि. बी. प्रकाशराव, ऑ.इं.रि १९७६ स. न्या. १८४५).**

कलम २ (a) यामध्ये व्याख्या दिलेल्या ''जिल्हाधिकारी'' या संज्ञेमध्ये अपर जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी किंवा त्याच्या दर्जाच्या अधिकारी यांचा समावेश होतो. परंतु या अधिनियमाखालील कार्य पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने स्वत: अपर जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्राधिकार सोपवणे आवश्यक आहे. सर्वसाधारण परिभाषा, अधिनियम १८९७ च्या कलम ३(i) अन्वये जिल्हाधिकारी या संज्ञेचा अर्थ, मुंबई, कलकत्ता व मद्रास या इलाखाशहरांच्या बाबतीत तेथील जिल्हाधिकारी व जिल्ह्याच्या ठिकाणी, महसूल प्रशासनाचा मुख्य अधिकारी असा आहे.

कलम ६–A खाली कार्यवाही सुरू करण्यासाठी व अत्यावश्यक वस्तू जप्त करण्यासाठी, (१) प्रथम, अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या कलम ३ खालील आदेशास अनुलक्षून अत्यावश्यक वस्तूचे अभिग्रहण केले पाहिजे, (२) अशा अभिग्रहणाविषयी जिल्हाधिकाऱ्याला अविलंब अहवाल पाठवला पाहिजे, आणि ३) आदेशाचे उल्लंघन झाले आहे याविषयी अहवालावरून जिल्हाधिकाऱ्यांची खात्री पटली पाहिजे. **(थानमल अँड सन्स वि. पश्चिम बंगाल राज्य, (१९८७)१ क्राईम्स ७०९.)**

कलम ६ (२) द्वारे केवळ नाशिवंत स्वरूपाच्या किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने निकालात काढण्यासाठी अंतरिम आदेश काढणे समयोचित आहे अशा वस्तू निकालात काढण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला दिलेले आहेत. ६(२) च्या परंतुकामध्ये अन्नसामग्रीच्या ऐवजी अत्यावश्यक वस्तू हे शब्द दाखल करून कार्यान्वयनाचे क्षेत्र अधिक व्यापक केले आहे. त्यामुळे अन्नसामग्रीसह कलम २(I) मध्ये वर्णन केलेल्या वस्तूंच्या संदर्भात त्या निकालात काढण्याचा आदेश जिल्हाधिकाऱ्याला देता येतो. मात्र विक्रीद्वारे निकालात अत्यावश्यक वस्तू रास्त भावाच्या दुकानातून विकण्यासंबंधीचे बंधन या कलमाद्वारे जिल्हाधिकाऱ्यावर टाकले आहे.

**कलम ६–A आणि अपराधाचा हेतू किंवा भावना (mens rea) –**

कलम ६ क च्या तरतुदी लागू करण्यासाठी अपराधाचा हेतू सिद्ध करणे ही आवश्यक बाब आहे. परंतु, अपराधी व्यक्तीला आपल्या कृतीमागे अपराधाची भावना होती हा आरोप खोडून काढता येतो.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने **बी. आर. जगन्नाथ वि. जिल्हा दंडाधिकारी, मेरठ (ऑ. इ. रि. १९७० अलाहा. ३९६)** या प्रकरणामध्ये असा निर्णय दिला आहे की, कलम ७ व कलम ६ क यातील तरतुदी वस्तुत: सारख्याच असल्याने जप्तीपूर्वी अपराधी भावना सिद्ध करणे आवश्यक आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही या मताला पुष्टी दिली असून **माधव केशव वि. महाराष्ट्र राज्य** या प्रकरणात असे मत प्रतिपादन केले आहे की, जिल्हाधिकाऱ्याने अपराधी भावनेचा घटक विचारात न घेता जप्तीचे आदेश दिले असतील अशा बाबतीत, अपील प्राधिकरणाने त्या प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती यांची सांगोपांग पडताळणी केल्यानंतर अपराधी भावना अस्तित्वात असल्याबद्दल स्वत:चे निष्कर्ष काढावयास पाहिजेत. मध्य प्रदेश शासनानेही **खेतराज जुगराज वि. राज्य (१९८१ क्रिमि. लॉ जर्नल १४७)** या प्रकरणात असेच मत व्यक्त केले आहे.

मात्र आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने आपले भिन्न मत नोंदवले आहे. **शासकीय अभियोक्ता वि. लेगीसेट्टी रामय्या (१९७५ क्रिमी. लॉ. जर्नल १४४)** या प्रकरणात या न्यायालयाने असा निर्णय दिला की, कलम ६ क खालील कार्यवाही ही, कार्यवाहीनंतर शिक्षेची तरतूद केली असल्याने, अर्ध – गुन्हेगारी स्वरूपाची विभागीय कार्यवाही आहे म्हणून कलम ६ क खाली विभागीय कार्यवाहीमध्ये, गुन्हा सिद्ध करण्यासाठी गुन्ह्यामागची अपराधी भावना सिद्ध करावयास पाहिजे हे गुन्हेगारी कायद्यातील तत्त्व येथे लागू करता येत नाही. मद्रास उच्च न्यायालयानेही **सी. देवमणी वि. राज्य (१९८३ क्रिमि. लॉ जर्नल १३२०)** या प्रकरणात आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या मताला पुष्टी दिली आहे.

कलम ६–A द्वारे जिल्हाधिकाऱ्याला जप्तीचे अधिकार दिलेले आहेत. परंतु, अभिग्रहित मालापैकी किती माल जप्त करावयाचा हे त्याच्या स्वेच्छानिर्णयावर व अपील प्राधिकरणावर अवलंबून राहील. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने **बी. सुधारामय्या वि. जिल्हा महसूल अधिकारी (ऑ.इं.रि. १९७७ आं.प्र. १९०३**) या प्रकरणात अभिग्रहित अत्यावश्यक वस्तूंपैकी केवळ २५ टक्के माल जप्त करण्याचे आदेश दिले. यावरून असे दिसते की, ज्या मालाच्या संबंधात आदेशाचे उल्लंघन झाले आहे तेवढाच माल जप्त करण्यात येतो. **सुवास मोतीचंद शे. वि. कर्नाटक राज्य (१९७८ क्रिमी. लॉ. जर्नल ७३६)** या प्रकरणात, (लायसन्सप्रमाणे) जेथे साखर विक्रीची परवानगी नव्हती अशा ठिकाणी ५७ पोती साखरेची विक्री करण्यात आली व ३३ पोती साखरेचा साठा शिल्लक होता. याबाबतीत असा निर्णय दिला की, साखरेच्या ५७ पोत्यांच्या संबंधात आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे तो साठा जप्त करता येईल परंतु, ३३ पोती साखरेच्या बाबतीत आदेशाचे कोणतेही उल्लंघन झाले नसल्याने तो कलम ६–A खाली अभिग्रहीतही करता येणार नाही

किंवा जप्तही करता येणार नाही. परंतु पटना उच्च न्यायालयाने, **नरेंद्र कुमार वि. बिहार राज्य (१९७७ क्रिमि.लॉ.जर्नल १९५३)** या प्रकरणात, जेवढ्या मालाच्या बाबतीत आदेशाचे उल्लंघन झाले आहे तेवढाच माल जप्त करावा असे कलमात कुठेही म्हटले नाही. कलमात फक्त एवढेच म्हटले आहे की, कलम ३ खालील आदेशाचे उल्लंघन झाले अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्यास अशी अभिग्रहित केलेली अत्यावश्यक वस्तू जप्त करण्याचा जिल्हाधिकाऱ्याला अधिकार आहे. या कलमात वापरलेल्या ''च्या संबंधातील'' (in relation thereto) असा आहे व ज्याबाबत गुन्हा घडला आहे अशाच केवळ मालाच्या संबंधातील असा त्याचा अर्थ होत नाही व होऊ शकत नाही.

तरीही अधिनियमामध्ये जिल्हाधिकाऱ्याला ''करता येईल'' (may) अशा शब्दप्रयोगाचा वापर करण्यात आला आहे. त्यावरूनही अभिग्रहित अत्यावश्यक वस्तूपैकी किती जप्त करावयाची हे त्याच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून राहील, असाच अर्थ निघतो. एखादेवेळी कलम ३ खालील आदेशाचे जाणूनबुजून उल्लंघन करण्यात आले आहे अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्यास संपूर्ण मालच जप्त करण्याचे आदेश त्याला देता येतील. **(राज्य वि. कृष्ण भीना ऑ.इं.रि. १९८१ स. न्या १४६८ : १९८१ क्रिमि. लॉ जर्नल ८६७)**

अभिग्रहित केलेली अत्यावश्यक वस्तू किती कालावधीत जप्त करून सरकारजमा करावयाची असा प्रश्न उपस्थित झाला असता केरळ उच्च न्यायालयाने, **एम. पुरूकन्नु वि. राज्य (१९८३ क्रिमि. लॉ जर्नल ४१०)** या प्रकरणात अधिग्रहणाची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत नेमून दिली. परंतु, संविधीमध्ये मात्र कालावधीसंबंधी अशी कोणतीही अट टाकलेली नाही.

वरील विवेचनावरून ही बाब स्पष्ट झाली आहे की, एखाद्या व्यापाऱ्याने कलम ६–A खाली, अभिग्रहित अत्यावश्यक वस्तूच्या संबंधातील कोणत्याही कायद्याचे उल्लंघन केले किंवा कसे हे ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्याला आहे. जर, असे उल्लंघन झाले आहे अशी त्याची खात्री झाली तर तो माल जप्त करील. परंतु, असे उल्लंघन झाले नाही, अशी त्याची खात्री झाल्यास जप्तीचा आदेश काढण्याचे त्याला नाकारता येईल. ह्या परिस्थितीत व्यापाऱ्याला माल परत मिळण्याचा हक्क असेल. कलम ६–A मध्ये, जर अभिग्रहित मालाची विक्री करण्यात आली असेल त्या बाबतीत काय कार्यवाही करावयाची याचीही तरतूद आहे. विक्रीच्या निमित्ताने झालेला खर्च वजा करून उरलेली रक्कम परत करण्याचे निदेश कलम ६–A मध्ये दिलेले आहेत. माल जप्त करण्यात आला व त्याची विक्री करण्यात आली व तदनंतर कलम ३ खालील आदेशाचे कोणतेही उल्लंघन झाले नसल्याचे आढळून आले अशा परिस्थितीत व्यापाऱ्याला त्याच्या मालाच्या विक्री रकमेवर कोणतेही व्याज देण्याची तरतूद कलम ६–A मध्ये करण्यात आलेली नाही. व्याज देण्याचे दायित्व ६–C खाली येते.

**६–B. अत्यावश्यक वस्तू जप्त करण्यापूर्वी ''कारण दाखवा'' नोटीस काढणे :–**

(१) कलम ६–A खाली कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचे, आवेष्टनाचे, आच्छादनाचे, पात्राचे, जनावराचे, वाहनाचे, जलयानाचे किंवा अन्य यानाचे जप्तीचा आदेश, अशा अत्यावश्यक वस्तूच्या, आवेष्टनाच्या, आच्छादनाच्या, पात्राच्या, जनावराच्या, वाहनाच्या, जलयानाच्या किंवा अन्य यानाच्या मालकाला अथवा जिच्याकडून ती अभिग्रहण करण्यात आली असेल त्या व्यक्तीला–

(a) ज्या कारणावरून (अत्यावश्यक वस्तूचे), आवेष्टन, आच्छादन, पात्र, जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान जप्त करण्यात येत आहे ती कारणे कळवणारी लेखी नोटीस देण्यात आल्याशिवाय;

(b) जप्तीच्या कारणाविरुद्ध, नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट असेल अशा वाजवी मुदतीत लेखी अभिवेदन करण्याची संधी दिल्याशिवाय; आणि

(c) त्या बाबतीत त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, काढला जाणार नाही.

(२) जर कोणत्याही जनावराच्या, वाहनाच्या, जलयानाच्या किंवा अन्य यानाच्या मालकाने आपल्या स्वत:च्या, त्याचा

कोणताही एजंट असल्यास त्या एजंटाच्या आणि असे जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान ताब्यात असणाऱ्या, व्यक्तीच्या नकळत त्या जनावराचा, वाहनाचा, जलयानाचा किंवा त्या अन्य यानाचा अत्यावश्यक वस्तूंची ने–आण करण्यासाठी वापर करण्यात आला होता किंवा असा वापर उक्त मालक, एजंट आणि उक्त व्यक्ती यांच्या मूकानुमतीने झाला नव्हता, आणि तसेच त्यांपैकी प्रत्येकाने असा वापर करण्यात येऊ नये म्हणून सर्व वाजवी व आवश्यक असे सावधगिरीचे उपाय योजले होते असे, जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध करून दाखवले तर त्या बाबतीत, पोट–कलम (१) च्या उपबंधास बाध न येता, ते जनावर वाहन, जलयान किंवा अन्य यान याचे कलम ६ क अन्वये जप्त करण्याविषयी कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(३) कोणतीही अत्यावश्यक वस्तू, आवेष्टन, आच्छादन, पात्र, जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान जप्त करण्याचा आदेश काढण्यापूर्वी, पोट–कलम (१) च्या खंड (I) खाली नोटीस देताना जर त्या खंडातील उपबंधाचे सारतः पालन झाले असेल तर, एरव्ही त्या नोटिशीत काही उणीव राहिली वा गैरनियम बाब झाली म्हणून तेवढ्या कारणावरून तो आदेश विधिबाह्य ठरणार नाही.

### कलम ६–B चे विवेचन

कलम ६–B मधील तरतूद अनिवार्य (mandatory) स्वरूपाची आहे. नोटिशीमध्ये जप्तीसंबंधीच्या कारणांची नोंद करणे आणि ज्याचा अत्यावश्यक माल जप्त करण्यात आलेला आहे. अशा व्यक्तीला, उक्त नोटिशीत जप्तीसाठी जी कारणे दर्शविण्यात आलेली आहेत त्या विरुद्ध अभिवेदन (representation) करण्याची संधी देणे ही या कलमान्वये आवश्यक बाब आहे.

कलम ६–A (१) द्वारे, अभिग्रहण केलेला माल जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. परंतु चौकशी चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही यंत्रणेसंबंधी त्यात तरतूद केलेली नाही. या विषयीची कार्यपद्धती कलम B मध्ये दिलेली आहे.

**जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य –** जिल्हाधिकाऱ्याने कलम ६–A खाली कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी कलम ६–B च्या खंड (a) (b) आणि (c) अनुसार प्रारंभिक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अत्यावश्यक वस्तूचे ज्याच्या मालाची जप्ती करण्यात आली आहे अशा व्यक्तीला प्रस्तावित जप्तीसंबंधीची लेखी नोटीस दिली पाहिजे आणि अशा नोटिशीत जप्तीची कार्यवाही ज्या कारणास्तव करण्यात येत आहेत ती कारणे नमूद केली पाहिजेत, अन्यथा जप्ती आदेश अवैध ठरेल **(बाळू राम वि. प. बंगाल राज्य, १९७७ क्रिमि. जर्नल (टिप्पणी) ५४).** सक्षम प्राधिकाऱ्याने, बाधित व्यक्तीच्या अभिवेदनावर सुनावणी केल्याखेरीज कोणतीही जप्ती करण्यात येऊ नये. सुनावणीची संधी दिल्यानंतर आदेशाचे उल्लंघन झाले आहे याविषयी खात्री झाल्यानंतरच जप्तीचा आदेश देता येईल. **टी. आर. रामैय्या वि. उपायुक्त (ऑ. इं. रि. १९७५ केएनटी ७७)** या प्रकरणामध्ये, उपायुक्ताने अत्यावश्यक वस्तूच्या मालकाला सुनावणीची संधी न देता माल जप्त केला आणि त्या आदेशाविरुद्ध अपील करण्याच्या संधीचा लाभ घेतला गेला नाही. या प्रकरणामध्ये नैसर्गिक न्याय नाकारण्यात आला आहे आणि म्हणून जप्ती आदेश शून्य ठरवण्यात आला.

कलम ६–B अन्वये ज्याच्या मालमत्तेचे अभिग्रहण करण्यात आले आहे त्या व्यक्तीला लेखी अभिवेदनाची संधी दिली पाहिजे आणि त्यासाठी ठराविक वेळ दिला गेला पाहिजे. आदेशामध्ये कोणताही वेळ नाकारण्यात आल्याचा आणि विवक्षित दिवस अंतिम सुनावणीसाठी निश्चित केल्याचा उल्लेख नसेल तर संबंधित व्यक्तीला सुनावणीची वाजवी संधी देण्यात आली असे म्हणता येणार नाही. **एकलाचंद वि. राज्य, (१९८७ सीसीआर एल आर (कल) ४७).** परंतु, नोटीस देताना त्या खंडातील सर्व तरतुदींचे रीतसर अनुपालन केलेले असल्यास, नोटिशीत कोणताही अनियमिततेचा दोष राहून गेला या कारणास्तव, कोणतीही अत्यावश्यक वस्तू जप्त करण्यासंबंधी काढलेला आदेश अवैध ठरणार नाही, **पी. अप्पु गोंडर वि. जिल्हाधिकारी, (१९८२ क्रिमि. लॉ जर्नल ११४५)** तसेच, या कलमाखाली काढावयाची नोटीस ही एखाद्या व्यवसायातील भागीदारासंबंधातील असेल तर, त्या भागीदारांतील कोणत्याही एका व्यक्तीच्या नावे नोटीस काढणे पुरेसे ठरेल, कारण कायद्यान्वये कोणताही एक भागीदार हा इतर भागीदारांचा अभिकर्ता असल्याचे समजण्यात येते **(काशीनाथ वि. राज्य, ऑ. इं. रि. १९८१ मुंबई १३२).**

परंतु ज्यावेळी जप्त केलेल्या अत्यावश्यक वस्तूची स्थिती अशी असेल की, बाधित पक्ष किंवा व्यक्ती यांच्या हिताचा विचार करता ती जास्त वेळ बाळगणे योग्य नसेल तर, अशा वेळी कलम ६–B खाली नोटीस काढून संबंधित व्यक्तीला सुनावणीची संधी देईपर्यंत ती वस्तू सडून– नष्ट होऊन जाईल व निरुपयोगी होईल, ही गोष्ट संबंधित व्यक्ती किंवा जनता यांच्यापैकी कुणाच्याही हिताची असणार नाही. याखेरीज दुष्काळी परिस्थिती, अन्न दुर्भिक्ष इ. मुळे तिचा शक्य तितका वापर होणे आवश्यक असेल तर, नोटीस काढणे व सुनावणीची संधी देणे या गोष्टी शक्य होणार नाहीत. या अधिनियमानुसार, अभिग्रहण केलेल्या अत्यावश्यक वस्तू लवकर व स्वाभाविकपणे नष्ट होण्याची शक्यता आहे किंवा अन्यथा जनहितास्तव त्या निकालात काढणे इष्ट आहे अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाली असल्याखेरीज व त्याने आपले तसे मत लेखी स्वरूपात नोंदले असल्याखेरीज अभिग्रहण केलेल्या अत्यावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावणे जिल्हाधिकाऱ्यास अनुज्ञेय नाही. याचाच अर्थ असा की, परिस्थितीची निकड असेल अशा वेळी जिल्हाधिकाऱ्याला अशा वस्तू तडकाफडकी निकालात काढण्याचा आदेश देता येतो. इतर सर्व परिस्थितीत ६–B (१) लेखी स्वरूपात नोटीस काढणे व संबंधित व्यक्तींना सुनावणीची संधी देणे ही अपरिहार्य बाब आहे.

जिल्हाधिकाऱ्यांपुढील कार्यवाहीमध्ये नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन होणे ही अत्यावश्यक बाब आहे. **अशोक रेड्डी वि. उप आयुक्त, गुलबर्गा १९८१ (कांत लॉ जर्नल ३०)** यामध्ये मयत व्यक्तींच्या प्रतिनिधींना अभिलेखावर आणण्याची गरज असल्याचा कुठेही उल्लेख नसला तरी अधिनियमाद्वारे प्राधिकरणामध्ये जे अधिकार निहित केलेले आहेत त्यांचा वापर करण्यासाठी व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी असे अधिकार जिल्हाधिकाऱ्याकडे असणे ही अत्यावश्यक बाब आहे. अभिग्रहित मालमत्ता रीतसर जप्त होईपर्यंत तिच्यावर अशा मालकाचा हक्क असतो व त्याच्या मृत्यूनंतर कलम ६–क खालील प्रकरण प्रलंबित असेपर्यंत तिच्यासंबंधातील सुनावणीचा हक्क मयत व्यक्तींच्या उक्त प्रतिनिधींनाही असतो. अशी सुनावणी अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. प्राधिकरणाला हे अधिकार अधिनियमाने दिले आहेत. अभिग्रहणाच्या वेळी ज्यांनी निवेदने अभिलेखावर आणली आहेत अशा व्यक्तींची उलटतपासणी करण्याचा अधिकार, ज्यांची मालमत्ता जप्त केली जावयाची आहे अशा व्यक्तींना कायद्याने नाही, परंतु, जिल्हाधिकाऱ्याला अशा उलटतपासणीस परवानगी देण्याचा स्वेच्छाधिकार आहे. **(१९७८ महा. लॉ जर्नल ५४२)** यालाच नैसर्गिक न्याय म्हणतात. निर्दोष व्यक्तींना आपला निरपराध सिद्ध करण्याची पुरेपूर परवानगी मिळणे आवश्यक असते.

**६–C. अपील :–**

(१) कलम ६–A खाली काढण्यात आलेल्या अधिहरणाच्या आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधित राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि राज्य शासन, अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, स्वत:स योग्य वाटेल त्याप्रमाणे, ज्याच्या विरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश कायम करणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा तो रद्द करणारा असा आदेश काढील.

(२) जेव्हा कलम ६–A खालील आदेशात त्या राज्य शासनाकडून फेरबदल करण्यात आले असतील किंवा तो रद्द करण्यात आला असेल अथवा ज्या आदेशांच्या संबंधात कलम ६–A खाली जप्तीचा आदेश देण्यात आला आहे त्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल सुरू करण्यात आलेल्या अभियोगात निबद्ध असलेल्या व्यक्तीला दोषमुक्त करण्यात आले असेल आणि दोन्ही प्रकरणी अभिग्रहण करण्यात आलेली अत्यावश्यक वस्तू कोणत्याही कारणास्तव परत करता येणे शक्य नसेल तर, ती अत्यावश्यक वस्तू जणू काही शासनाला विकण्यात आलेली असावी त्याप्रमाणे अशा व्यक्तींना कलम ६–A च्या पोट–कलम (३) मध्ये उपबंधित केलेले खेरीज करून एरव्ही, तिची किंमत, त्या अत्यावश्यक वस्तूच्या अभिग्रहणाच्या दिवसापासून हिशेब करून ठरवलेल्या वाजवी व्याजासहित देण्यात येईल आणि अशी किंमत –

(i) अन्नधान्ये, खाद्य तेलबिया किंवा खाद्य तेले यांच्या बाबतीत, कलम ३, पोट–कलम (३–b) च्या मधील तरतुदींनुसार;

(ii) साखरेच्या बाबतीत, कलम ३, पोटकलम (३ग) मधील तरतुदींनुसार; आणि

(iii) अन्य कोणत्याही अत्यावश्यक वस्तूच्या बाबतीत, कलम ३, पोट–कलम (३) मधील तरतुदींनुसार,

ठरवली जाईल.

**कलम ६–C चे विवेचन**

अपील करण्याचा अधिकार हा संविधीद्वारे देण्यात आलेला आहे, त्यामुळे तो निहित अधिकार ठरतो. संविधीद्वारे अपील करण्याचा अधिकार देण्यात आला आहे तसेच, अपील मंचाचे नियमनही केले आहे. सुधारणा अधिनियम, १९८१ यास प्रारंभ झाल्यानंतर कलम ६–C खालील सर्व अपिले राज्य शासनापुढे दाखल करता येतात व उक्त अपील प्राधिकरण, त्यास योग्य वाटेल त्या प्रकारे ज्याविरुद्ध त्याच्याकडे अपील करण्यात आले आहे असा आदेश कायम करण्यासाठी, त्यात सुधारणा करण्यासाठी किंवा तो विलोपित (annul) करण्यासाठी सक्षम असेल हे अपील प्राधिकरण, जिल्हाधिकाऱ्याच्या पुनर्विचारासाठी मार्गदर्शक तत्त्वे नमूद करून प्रकरण जिल्हाधिकाऱ्याकडे परत पाठवण्यासाठीदेखील सक्षम आहे **(वेंकटेश्वर वि. आंध्र प्रदेश राज्य, १९८३ क्रिमि. लॉ जर्नल (एनओसी) २१७ आ.प्र.)**

कलम ६–C (१) मध्ये असे नमूद केले आहे की, कलम ६–A खालील जप्ती आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे ज्यास वाटत असेल अशी कोणतीही व्यक्ती अपील करू शकते. कलम ६–A (२) खाली जिल्हाधिकाऱ्याने काढलेला विक्री आदेश हा कलम ६–A (१) खालील जप्तीच्या आदेशाहून वेगळा असल्याने त्याविरुद्ध कलम ६–C खाली कोणतेही अपील करता येत नाही **(उत्तर प्रदेश राज्य वि. राम अवतार जयस्वाल, (१९८४) क्राईम्स १४२.)**

अभिग्रहण केलेली आवश्यक वस्तू जप्त करावयाची की नाही हे जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असते. जिल्हाधिकाऱ्याने हा स्वेच्छानिर्णय योग्यप्रकारे वापरला किंवा नाही याची पडताळणी करण्याचा अधिकार अपील प्राधिकरणाचा आहे; नव्हे हे त्याचे कर्तव्य ठरते **(माधव वि. महाराष्ट्र राज्य, १९७७ क्रिमि. लॉ.जर्नल १८०० (मुंबई)** कलम ६–C खाली अपिलाची सुनावणी करणारे प्राधिकरण हे पूर्ण अधिकार असलेले अपील प्राधिकरण असून त्यास मूळ प्राधिकरणाचे सर्व प्राधिकार आहेत. त्यानुसार, अपील प्राधिकरणाने सर्व तथ्ये व परिस्थिती यांची तपासणी करून त्याद्वारे स्वत:चे निष्कर्ष काढावयाचे असतात.

जिल्हाधिकाऱ्याला, मालमत्ता जप्त करण्याचा स्वेच्छाधिकार असतो. अपील प्राधिकरण, त्यास योग्य वाटल्यास, ज्याविरुद्ध असे अपील करण्यात आले आहे असा आदेश कायम करू शकते, त्यात सुधारणा करू शकते किंवा ते विलोपित करू शकते. यावरून हे स्पष्ट होते की, दंड लादण्याचा कोणताही अधिकार अपील प्राधिकरणाला देण्यात आलेला नाही.

'त्यास योग्य वाटेल असा आदेश' या शब्दप्रयोगाचा अर्थ, जप्तीशी संबंधित कोणताही आदेश, त्यास योग्य वाटेल तर, कायम करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा किंवा तो विलोपित करण्याचा त्याला अधिकार आहे, असा आहे. त्यामधून अन्य कोणताही इतर अर्थ काढणे म्हणजे कलमामध्ये जे अनुस्यूत नाही ते त्यात दाखल करणे होईल. म्हणून म.प्र. न्यायालयाने कलम ६–C खाली अपील न्यायालयाने लादलेला दंड रद्द ठरवला **(माधव वि. राज्य, १९७७ क्रिमि. लॉ जर्नल १८००).**

कलम ६–C च्या पोट–कलम (२) मध्ये, ज्याच्या अधीनतेने अभिग्रहित केलेली मालमत्ता किंवा त्याची किंमत मालकाला परत करण्यात येईल त्या शर्ती दिल्या आहेत. त्या अशा : (१) कलम ६–C खालील अपिलामध्ये, कलम ६–A खालील आदेश विलोपित किंवा रद्दबातल करण्यात येईल अशा वेळी, आणि (२) ज्या आदेशाच्या संबंधात जप्तीचा आदेश देण्यात आला आहे त्या आदेशाचे उल्लंघन केल्याच्या आरोपातून संबंधित व्यक्तीला दोषमुक्त करण्यात येईल अशा वेळी या दोनपैकी कोणत्याही शर्तीचे पालन झाल्यास मालकाला त्याची मालमत्ता परत करण्यात येईल व मालमत्ता अगोदरच विकण्यात आली असल्यास वाजवी व्याजासह त्या मालमत्तेचे मूल्य परत करण्यात येईल. जप्तीच्या आदेशात सुधारणा करण्यात आली असेल त्या बाबतीत देखील प्रमाणशीर व्याज देण्याची तरतूद या कलमाद्वारे केलेली आहे.

**६–D. जप्तीचा निवाडा इतर शिक्षांच्या आड यावयाचा नाही :–**

या अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्याने जप्तीचा निवाडा दिला म्हणून, त्यामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला, या अधिनियमाखाली ती व्यक्ती ज्या कोणत्याही शिक्षेला पात्र असेल ती शिक्षा ठोठावली जाण्यास प्रतिबंध होणार नाही.

**कलम ६–D चे विवेचन**

कलम ३ चे उल्लंघन करण्याबद्दल या अधिनियमामध्ये आरोपी व्यक्तीविरुद्ध दोन स्वतंत्र कार्यवाहीची तरतूद केली आहे. कलम ६–A अन्वये अभिग्रहित मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला दिले आहेत तर, कलम ७ अन्वये अशा आरोपी व्यक्तींना विशेष न्यायालयाद्वारे शिक्षा करण्याची तरतूद केलेली आहे. या दोन्ही अधिकारिता एकमेकांपासून वेगळ्या व स्वतंत्र आहेत. कलम ६–A अन्वये जिल्हाधिकाऱ्याने मालमत्तेचे अधिग्रहण करण्याचे आदेश काढले नाहीत तरीही विशेष न्यायालय कलम ७ अन्वये शिक्षा ठोठावू शकते **(१९८१) २ आंध्र. लॉ न्यायाधिकरण ३३४).** त्याचप्रमाणे, ६ (a) अन्वये, नियंत्रण आदेशाचे उल्लंघन झाले नाही असा निवाडा जिल्हाधिकाऱ्याने दिला नाही केवळ एवढ्या कारणावरून आरोपी व्यक्ती सुटकेची मागणी करू शकत नाही. जिल्हाधिकाऱ्याला शिक्षा ठोठावण्याचे अधिकार नाहीत; तो फक्त मालमत्ता जप्त करू शकतो. शिक्षा ठोठावण्याचे अधिकार कलम ७ अन्वये विशेष न्यायालयाला देण्यात आलेले आहेत. विशेष न्यायालय कारावासाची शिक्षा ठोठावू शकते. परंतु अत्यावश्यक वस्तू जप्त करण्याचा अधिकार विशेष न्यायालयाला नाही.

**६–E. विवक्षित प्रकरण अधिकारितेला आडकाठी :–**

जेव्हा केव्हा एखादी अत्यावश्यक वस्तू तिच्या संबंधात कलम ३ खाली काढण्यात आलेल्या आदेशाला अनुसरून अभिग्रहण करण्यात आली असेल तेव्हा, अशा मालमत्तेचा कब्जा, सुपूर्दगी, विल्हेवाट किंवा वितरण यासंबंधी आदेश काढण्याची अधिकारिता जिल्हाधिकाऱ्याला किंवा, यथास्थिती कलम ६–C खालील संबंधित राज्य शासनाला असेल, आणि त्या–त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात विरुद्ध असे काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, अधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांना ती अधिकारिता असणार नाही.

**कलम ६–E चे विवेचन**

कलम ६–E द्वारे, या अधिनियमाच्या कलम ३ खाली काढलेल्या आदेशास अनुलक्षून अभिग्रहित केलेल्या अत्यावश्यक वस्तूचे वितरण, सुपूर्दगी, कब्जा किंवा विल्हेवाट याबाबतीत कोणत्याही न्यायालयाने कोणतेही आदेश काढण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. अत्यावश्यक वस्तू ज्यामध्ये अभिग्रहित करण्यात आले ते आवेष्टन किंवा आवरण मुक्त करण्याच्या संबंधात न्यायालयाच्या अधिकारितेसंबंधी कोणताही निर्देश करण्यात आलेला नाही. आवश्यक वस्तू अधिनियमाच्या तरतुदींची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी आणि न्यायालयाच्या अधिकारितेस अटकाव करण्याच्या दृष्टीने या कलमाची व्याप्ती अधिक वाढवण्यासाठी, कलम ६–E मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार कलम ६–E मध्ये अंतर्भूत असलेला प्रतिबंध, ज्या आवरणात किंवा आवेष्टनात अत्यावश्यक वस्तूचे अधिग्रहण करण्यात आले त्यालाही लागू होईल. तसेच हा प्रतिबंध, ज्यातून आवश्यक वस्तूंची ने–आण करण्यात येते असे जनावर, वाहन यांनाही लागू असेल. सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे अत्यावश्यक वस्तूच्या अभिग्रहणाबद्दल जिल्हाधिकाऱ्याकडे अहवाल पाठवण्यात आला असता, त्या संबंधात कोणत्याही न्यायालयाला आदेश देता येणार नाही. ज्यावर अन्याय झालेला आहे अशी कोणतीही व्यक्ती दंडप्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ खाली थेट न्यायालयाकडे दाद मागू शकणार नाही. कारण फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याखालील आदेशाच्या संबंधात दंडप्रक्रिया संहितेचे कलम ४८२ लागू होते, इतर कोणत्याही अधिनियमाखालील आदेशांबद्दल त्याद्वारे निर्णय देता येत नाही. सक्षम कार्यकारी प्राधिकरणाने केलेल्या जप्तीच्या संबंधातील कार्यवाहीचे पुनरीक्षण करण्याची अधिकारिता न्यायालयाला कलम ४८२ खाली प्राप्त होत नाही. **(पी. शिवपथीराम वि. राज्य, १९८२ क्रिमि. लॉ जर्नल ५५६.)**

त्याचप्रमाणे कलम ६–C राज्य शासनाने अपिलात दिलेल्या आदेशासही, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अन्वये न्यायालयात आव्हान देता येणार नाही. म्हणून, अत्यावश्यक वस्तूच्या जप्तीच्या संबंधातील आदेशाच्या बाबतीत जिल्हाधिकारी आणि अपील प्राधिकरण म्हणजेच संबंधित राज्य शासन यांच्याखेरीज उच्च न्यायालयासह कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अधीकरण यांना पुनरीक्षणाचा किंवा अपिलाचा अधिकार असणार नाही. **(खेमराज जुगराज वि. राज्य, १९८१ क्रिमि. लॉ. जर्नल १४७९.)** खेमराज प्रकरणातील निर्णय गुजरात उच्च न्यायालयाने, **राज्य वि. मनुसुखलाल रामजीभाई (१९७६ १ क्राईम्स २१६)** या प्रकरणात मान्य केला. या न्यायालयानेही असा निर्णय दिला की, जप्तीच्या आदेशाचे कोणतेही न्यायालय पुनरीक्षण करणार नाही किंवा त्याविरुद्ध अपील दाखल करून घेणार नाही किंवा अन्य प्रकारे कोणतीही कार्यवाही करणार नाही. कलम ६–E दाखल करून संसदेने याबाबत न्यायालयांना अनिवार्य आदेश दिला आहे आणि कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण यांना अत्यावश्यक वस्तूची विल्हेवाट, सुपूर्दगी, वितरण किंवा कब्जा यासंबंधात कार्यवाही करण्यास तसेच अत्यावश्यक वस्तूचे आवेष्टन इ. किंवा ज्यातून अशा मालाची ने–आण करण्यात येते असे जनावर, वाहन इ. मुक्त करण्यास प्रतिबंध केला आहे. मुंबई न्यायालयाने याबाबत आपले असे मत व्यक्त केले आहे की, अत्यावश्यक वस्तूंचे ज्या पद्धतीने अभिग्रहण करण्यात येते, त्यावरून जिल्हाधिकाऱ्याची अधिकारिता ठरत नाही तर मुळात अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या तरतुदीखाली येणारी अत्यावश्यक वस्तू अस्तित्वात आहे हा त्यामागचा मूळ मुद्दा आहे. एखाद्या विवक्षित प्रकरणात अभिग्रहणात गैरव्यवहार झाला असेल म्हणजेच चुकून अभिग्रहण करण्यात आले असेल तरीही त्याबाबत कोणत्याही दंडाधिकाऱ्याला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४५७ खालील अधिकारांचा वापर करून कोणतीही कार्यवाही करता येणार नाही **(दादरा व नगरहवेली प्रशासन वि. सी. बी. शाह, क्रिमि. लॉ जर्नल १०८७)** मालमत्ता निर्धारित करणे व ती निकालात काढणे यासंबंधीच्या यंत्रणेची तरतूद खुद्द अत्यावश्यक वस्तू अधिनियमातच केली आहे. संविधानाच्या अनुच्छेद २२७ अन्वये न्यायालयाचे अधिकार अत्यावश्यक वस्तू अधिनियम नियंत्रित करू शकत नाही. म्हणून अत्यंत मर्यादित बाबतीत उच्च न्यायालयाकडे विनंती–अर्ज करता येतो. ज्यावेळी गैरव्यवहार एवढा स्पष्ट असेल की, न्यायालयाने दखल घेणे आवश्यक आहे तर केवळ अशा बाबतीत गैरव्यवहार दूर करण्यासाठी न्यायालयास हस्तक्षेप करता येतो.

अभिग्रहण करण्यात आलेला ट्रक किंवा इतर वाहन मुक्त करण्यात यावे किंवा कसे हा प्रश्न विशेष न्यायालयापुढे उपस्थित करण्यात येतो. याबाबत कलकत्ता उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, मोटार वाहन ही सामान्य मालमत्ता नव्हे; अभिग्रहण केलेल्या मोटर वाहनाच्या मागणीसाठी अर्जदाराने सर्व कागदपत्रे सादर केली की, या मोटर–वाहनाची पोलीस ठाण्याच्या आवारात ऊन व पाऊस यापासून हानी होऊ नये या दृष्टीने, आवश्यक ते बंधपत्र घेतल्यानंतर ते मालकाला परत करण्यात यावे. आवश्यकता पडेल त्यावेळी ते वाहन सादर करण्याचे त्याच्यावर बंधन घालण्यात यावे. **(इबादत अली वि. राज्य, (१९८३) १ कल. एच.एन. ९३; (१९८३) १ क्राईम्स ७५२)** परंतु इबादत अलीचे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावले.

कलम ६–A वरून हे स्पष्ट होते की, कलम ६–A अन्वये एखादे वाहन जप्त केले जाण्यास पात्र ठरत असेल अशा वेळी, त्या वाहनातून ज्या अत्यावश्यक वस्तूची वाहतूक केली तिचे अभिग्रहण करण्याच्या तारखेस असलेले बाजारमूल्य दंडादाखल जमा करून संबंधित व्यक्ती ते वाहन सोडवून घेऊ शकते. जप्तीसंबंधीची कार्यवाही सुरू असताना जर ते वाहन मुक्त करण्यात आले तर, जप्तीचा आदेश काढल्यानंतर त्यासंबंधात अनेक अडचणी येऊ शकतात. परंतु त्या वाहनाच्या मालकाने किंवा त्या वाहनाचा कब्जा ज्याच्याकडे असेल अशा व्यक्तीने अशा प्रकारे अत्यावश्यक वस्तूचे अभिग्रहणाच्या दिवशीचे बाजारमूल्य तारण म्हणून जमा केले तर त्यामुळे न्यायाधीशाचे समाधान होऊ शकते कारण त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेल्या जप्तीच्या कार्यवाहीत कोणतीही बाधा येणार नाही. याबाबतीत कर्नाटक उच्च न्यायालयाने वेगळा विचार व्यक्त केला आहे.

परंतु, अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, १९८६ द्वारे कलम ६–E ची सुधारणा झाल्यानंतर सर्व न्यायालयीन वादावर पडदा पडला आहे. जप्तीची कार्यवाही सुरू असता, विशेष न्यायालयाला, अधिनियमाच्या कलम ७ खालील आरोपाशी संबंधित असल्याचा संशय असलेले वाहन निकालात काढण्याच्या संबंधात विशेष न्यायालयांना कोणतीही अधिकारिता नाही.

**७. शिक्षा :–**

(१) जर कोणत्याही व्यक्तीने कलम ३ खाली काढण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन केले तर,––

(a) ती व्यक्ती –

(i) त्या कलमाच्या पोट–कलम (२) च्या खंड (h) किंवा (i) ला अनुलक्षून दिलेल्या आदेशाच्या बाबतीत, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि

(ii) अन्य कोणत्याही आदेशाच्या बाबतीत, तीन महिन्यांहून कमी नसेल; परंतु सात वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल;

(b) जिच्याबाबत आदेशाचे व्यतिक्रमण झाले असेल अशी कोणतीही मालमत्ता जप्त होऊन शासनाकडे जमा होईल;

(c) ज्यामध्ये मालमत्ता आढळली ते आवेष्टन, आच्छादन किंवा पात्र आणि मालमत्तेच्या ने–आणसाठी वापरण्यात आलेले कोणतेही जनावर, वाहन, जलयान किंवा अन्य यान हे, न्यायालयाने तसा आदेश दिल्यास, जप्त होऊन शासनाकडे जमा होईल.

(२) कलम ३ च्या पोट–कलम (४) मधील खंड (b) खाली ज्या कोणत्याही व्यक्तीला निदेश दिलेला असेल ती व्यक्ती त्या निदेशाचे अनुपालन करण्यास चुकली तर, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल व सात वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही ती पात्र होईल :

(२–A) पोट–कलम (१) खंड (a) चा उपखंड (ii) या अन्वये किंवा पोट–कलम (२) अन्वये एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली कोणतीही व्यक्ती त्याच उपबंधाखालील अपराधाबद्दल पुन्हा सिद्धदोष ठरली असेल तर, ती व्यक्ती दुसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल सहा महिन्यांहून कमी नसेल; परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र होईल :

(३) एखादी व्यक्ती पोट–कलम (१) खालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली असून जर अत्यावश्यक वस्तूबाबतच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत त्याच पोट–कलमाखाली ती पुन्हा सिद्धदोष ठरली असेल तर, ज्या न्यायालयाने तिला सिद्धदोष ठरवले ते न्यायालय त्या पोट–कलमाखाली देण्यात येईल अशा कोणत्याही दंडाव्यतिरिक्त, आदेशाद्वारे, त्या व्यक्तीने आदेशात न्यायालयाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे किमान सहा महिने इतक्या कालावधीत त्या अत्यावश्यक वस्तूच्या संबंधात कोणताही व्यापारधंदा चालवू नये असे निदेशित करील.

**कलम ७ चे विवेचन**

कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करण्याबद्दलच्या शिक्षेच्या बाबतीत कलम ७ मध्ये विभागणी करण्यात आली आहे. १) पोट–कलम (२) च्या खंड (h) किंवा (i) च्या बाबतीत १ वर्षापर्यंत असू शकेल. एवढ्या मुदतीची शिक्षा व द्रव्यदंड आणि (२) कोणत्याही इतर आदेशाचे उल्लंघन करण्याबद्दल ७ वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीची शिक्षा व द्रव्यदंड या खेरीज, ज्या मालमत्तेच्या संबंधात आदेशाचे उल्लंघन झाले आहे त्या मालमत्तेचे समपहरण (forfeiture) करण्याची या कलमात तरतूद केलेली आहे असे समपहरण करण्यापूर्वी त्या मालमत्तेचे संबंधात अपराध घडला आहे हे सिद्ध करणे आवश्यक असते. **(अबुर रेहमान वि. राज्य, ऑ. इं. रि १९५५ कलम ६३१).**

कलम ७ (१)(b) ची भाषा आदेशार्थी आहे आणि उक्त तरतूद सन १९७४ च्या अधिनियम क्रमांक ३० द्वारे २२ जून १९७४ पासून लागू करण्यात आली आहे. या सुधारणेद्वारे न्यायालयांना या बाबतीत असलेला स्वेच्छाधिकार काढून घेण्यात आला आहे. आता न्यायालयांना ज्या संबंधात आदेशाचे उल्लंघन झाले आहे अशा मालाच्या समपहरणाचा आदेश देण्यावाचून अन्य पर्याय नाही.

**(अगरवाल ऑईल ॲड जनरल मिल्स वि. दिल्ली प्रशासन, (१९८२) २१ दिल्ली एल टी ४६६)**. समपहरणाचा आदेश हा त्या खटल्यावरील देताना द्यावयाचा असतो. तो पूर्वी किंवा नंतर देऊन चालत नाही.

जेव्हा एखादी व्यक्ती कलम ३ खालील आदेशांचे जाणूनबुजून उल्लंघन करीत असेल त्या वेळी ती व्यक्ती कलम ७ खाली शिक्षा करण्याजोगा अपराध करीत असते. अपराधीपणाची भावना किंवा अपराधाचा हेतू हा कलम ७ अपराधामागचा मुख्य भाग आहे. सन १९७४ च्या सुधारणा अधिनियमामध्ये दाखल केलेल्या कलम १०–C मध्ये न्यायालय अपराधाचा हेतू (mens rea) गृहीत धरील अशी तरतूद केली आहे.

पोट–कलम (२) मध्ये वाढीव शिक्षेची तरतूद केलेली असली तरीही कोणत्याही परिस्थितीत विशेष न्यायालय कलम १२–A च्या पोट–कलम (१) खंड (e) मध्ये केलेल्या तरतुदीनुसार दोन वर्षांपेक्षा अधिक असेल एवढ्या मुदतीची शिक्षा फर्मावणार नाही. परंतु एखादी व्यक्ती पोट–कलम (१) खालील अपराधासाठी एकदा सिद्धदोषी ठरवण्यात आली असता त्याच कलमाखालील अपराधासाठी पुन्हा सिद्धदोषी ठरवण्यात आली तर, विशेष न्यायालय शिक्षेबरोबरच, सहा महिन्यापेक्षा अधिक असणार नाही एवढ्या कालावधीसाठी ज्या अत्यावश्यक वस्तूंच्या संबंधात तिचा अपराध सिद्ध झाला आहे त्या अत्यावश्यक वस्तूचा व्यवसाय करणार नाही असे बंधन तिच्यावर लादू शकते.

**७–A . विवक्षित रकमा जमीन–महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा केंद्र शासनाचा अधिकार :–**

(१) जेव्हा –

(a) कलम ३ अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशानुसार कोणतीही रक्कम भरण्यास, किंवा

(b) त्या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे किंवा त्यानुसार स्थापन केलेल्या कोणत्याही लेख्याच्या किंवा निधीच्या जमाखाती कोणतीही रक्कम अनामत ठेवण्यास,

दायी असलेली कोणतीही व्यक्ती अशी संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही अंश भरण्यात किंवा अनामत ठेवण्यात कोणतीही कसूर करील तेव्हा, ज्या रकमेच्या बाबतीत अशी कसूर करण्यात आली असेल ती रक्कम मग असा आदेश 'अत्यावश्यक वस्तू (विशोधन) अधिनियम, १९८४' च्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर दिलेला असो, आणि अशी रक्कम भरण्याचे किंवा अनामत ठेवण्याचे अशा व्यक्तीवरील दायित्व अशा प्रारंभापूर्वी किंवा नंतर निर्माण झालेले असो, जमीन–महसुलाची थकबाकी म्हणून शासनाला अशा कसुरीच्या दिनांकापासून ते अशा रकमेच्या वसुलीच्या दिनांकापर्यंत दरसाल दर शेकडा सहा दराने तीवर देय होणाऱ्या सरळ व्याजासहित वसूल करता येण्यासारखी असेल.

(२) पोट–कलम (१) अन्वये वसूल केलेल्या रकमेबाबत अशी रक्कम भरण्याचे किंवा अनामत ठेवण्याचे दायित्व ज्या आदेशान्वये निर्माण झाले त्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) त्या–त्या काळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा विरुद्ध अशा कोणत्याही संविदेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालय, अधिकरण किंवा अन्य प्राधिकरण पोट–कलम (१) च्या उपबंधानुसार जमीन–महसुलाची थकबाकी म्हणून कोणतीही रक्कम वसूल करण्यापासून कोणत्याही शासनास मनाई करणारा किंवा निरुद्ध करणारा कोणताही व्यादेश देणार नाही किंवा आदेश काढणार नाही.

(४) ज्या आदेशानुसार पोट–कलम (१) खालील जमीन–महसुलाची थकबाकी म्हणून कोणतीही रक्कम शासनाने वसूल केलेली असेल तो आदेश सक्षम न्यायालयाने शासनाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर विधिबाह्य असल्याचे घोषित केले तर, याप्रमाणे वसूल केलेली रक्कम ज्या व्यक्तीकडून वसूल केली होती त्या व्यक्तीला शासन अशा रकमेच्या वसुलीच्या दिनांकापासून ते अशी रक्कम परत करावयाच्या दिनांकापर्यंत दरसाल दरशेकडा सहा दराने तीवर देय होणाऱ्या सरळ व्याजासहित परत देईल.

**स्पष्टीकरण –** ह्या कलमाच्या प्रयोजनार्थ ''शासन'' याचा अर्थ, कलम ३ खालील संबंधित आदेश ज्याने काढला ते शासन अथवा कोणत्याही शासनास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने, किंवा प्राधिकरणाने असा आदेश काढला असेल तेथे ते शासन असा आहे.

### कलम ७–A चे विवेचन

सुधारणा अधिनियम, १९८१ मध्ये सुरुवातीला कलम ७–A चा समावेश नव्हता. अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, १९८४ द्वारे हे कलम पूर्वलक्षी प्रभावाने दाखल करण्यात आले. कसूरदार व्यक्तीकडून शासनाला येणे असलेल्या रकमा वसूल करता याव्यात यासाठी, सदर रकमा जमीन–महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात याव्यात अशी तरतूद केली आहे. सुरुवातीला या रकमेवर ६ टक्के सरळव्याज आकारण्यात येत होते. या व्याजाच्या दरात आता द.सा. १५ टक्के एवढी वाढ करण्यात आली आहे. परंतु, त्याचबरोबर, ज्या आदेशान्वये अशा रकमेची वसुली करण्यात आली आहे तो आदेश सक्षम न्यायालयात अवैध ठरवण्यात आल्यास अशी रक्कम वसुलीच्या तारखेपासून १५ टक्के सरळ व्याजासह संबंधित व्यक्तीला परत करण्यात येतील.

कलम ७–A च्या पोट–कलम ४ अन्वये ज्या व्यक्तीकडून रकमेची वसुली करण्यात आली त्याच व्यक्तीला रक्कम परत करण्यात येईल. परंतु, प्रकरण प्रलंबित असताना त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, सक्षम न्यायालयाचे प्रमाणपत्र सादर केल्यास ही रक्कम त्याच्या वारसदारांना देण्यात येईल.

### ८. प्रयत्न आणि अपप्रेरण

जी व्यक्ती कलम ३ खाली दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल अशा कोणत्याही व्यक्तीने त्या आदेशाचे उल्लंघन केले असल्याचे मानले जाईल :

परंतु, कलम २ च्या खंड (a) चा उपखंड (iv-a) किंवा उपखंड (v) मध्ये नमूद केलेल्या स्वरूपाची कोणतीही अत्यावश्यक वस्तू अशा अत्यावश्यक वस्तूचा धंदा किंवा व्यापार करण्यासाठी नव्हे तर स्वत:च्या वापरासाठी किंवा स्वत:च्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या किंवा आपणावर अवलंबून असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या वापरासाठी प्राप्त करण्याच्या प्रयोजनार्थ काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करण्यास एखाद्या व्यक्तीने अपप्रेरणा दिली असेल अशा बाबतीत, कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि न्यायालय न्यायनिर्णयात कारणे नमूद करून त्या कारणास्तव फक्त दंडाची शिक्षा देऊ शकेल.

### कलम ८ चे विवेचन

**प्रयत्न :** अपराधाचा प्रयत्न म्हणजे अपराध करण्यासाठी थेट हालचाल करणे. प्रयत्नामध्ये निश्चय अंतर्भूत असतो, आणि यापूर्वी केलेल्या कृतीवरून गुन्हेगारी हेतू दिसून येतो. अशी किंवा अशा कृती जाणूनबुजून करण्यात आल्या असतील आणि उद्देशित अपराधाचा हेतू त्यांद्वारे स्पष्ट होत असेल तर गुन्हा जवळजवळ घडण्याच्या बेतात आहे, असे म्हणता येईल आणि हातून घडलेल्या कृतीवरून निश्चितपणे अशा कृतीची परिणती कशामध्ये होणार आहे हे निर्दिष्ट होत असेल तर तो प्रयत्न ठरेल **(गोपाल कृष्ण नायर वि. केरळ राज्य, १९८७) २ केरळ लॉ ट्राय १९८८ क्रिमि. लॉ. जर्नल एनओसी ३७ (केरळ).**

**अपप्रेरण आणि अपप्रेरक –** अपप्रेरण कशाला म्हणायचे यासाठी भारतीय दंड संहिता, कलमे १०७ व १०८ पाहावयास हवीत. अपप्रेरणाची अत्यावश्यक वस्तू अधिनियम व दंडप्रक्रिया या दोहोंतही व्याख्या दिलेली नाही. अत्यावश्यक वस्तू अधिनियमामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व संज्ञा यांना, दंडप्रक्रिया संहितेमध्ये व्याख्या केलेले अर्थ असतील. दंडप्रक्रिया संहितेच्या कलम २, खंड (y) मध्ये पुन्हा अशी तरतूद केली आहे की, या संहितेमध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व संज्ञा यांना भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) यामध्ये नेमून दिलेले अर्थ असतील.

अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या कलम ८ अन्वये कलम ३ खाली काढलेल्या आदेशाच्या उल्लंघनास अपप्रेरणा देणारी व्यक्ती ही अपराधी असल्याचे मानले आहे. परवान्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीशिवाय इतर पद्धतीने लेव्ही सिमेंटची विल्हेवाट लावणारा परवानाधारक व परवान्यामध्ये निर्दिष्ट केलेल्या पद्धतीशिवाय इतर प्रकारे लेव्ही सिमेंटची विल्हेवाट लावण्यासाठी त्याला चिथावणी देणारे, हे दोघेही या कलमाखाली अपराधी ठरतात.

ज्याविषयी अपप्रेरणा देण्यात आली तो जर अपराध असेल तर अपप्रेरणा हा एक स्वतंत्र अपराध ठरतो.

भारतीय दंड संहितेची कलमे १०७, १०८ व १०८–A पुढीलप्रमाणे आहेत :–

**१०७ अपप्रेरण :–**

एखादी व्यक्ती –

(i) एखादी व्यक्ती कोणतीही गोष्ट करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला चिथावणी देत असेल;

(ii) एक किंवा अधिक व्यक्तींसोबत एखादी गोष्ट करण्यासाठी कट रचत असेल त्या कटाच्या परिणामस्वरूप एखादी कृती किंवा अवैध अकृती घडून आल्यास;

(iii) कोणतीही कृती किंवा अवैध अकृती याद्वारे कोणतीही गोष्ट करण्यासाठी जाणूनबुजून मदत करत असेल;

तर ते अपप्रेरण ठरेल.

उदा. 'अ' हा शासकीय आधिकारी असून त्याने न्यायालयाकडून 'झ' ला पकडण्यासाठी अधिपत्र मिळवले आहे. 'ब' या व्यक्तीला 'क' ही व्यक्ती 'झ' नाही हे माहीत असूनही तो 'अ' ला 'क' 'झ' आहे असे जाणूनबुजून सांगत असेल तर 'ब' ने 'क'ला पकडण्यासाठी 'अ' ला चिथावणी देऊन अपप्रेरणा दिली आहे.

**कलम १०८**

एखादी व्यक्ती अपराध करण्यासाठी अपप्रेरणा देत असेल, किंवा जी कृती केल्यामुळे अपराध घडेल अशी कृती करण्यासाठी अपप्रेरणा देत असेल तर ती व्यक्ती अपप्रेरक ठरते.

उदा. 'अ' हा 'ब' ला 'क' चा खून करण्यासाठी अपप्रेरणा देतो. 'ब' खून करण्याचे नाकारतो. 'अ' हा 'ब' ला खून करण्यासाठी अपप्रेरणा देण्यासाठी अपराधी ठरतो.

**कलम १०८–A**

या संहितेच्या अर्थांतर्गत, एखादी व्यक्ती भारतात राहून अन्य व्यक्तीला जी कृती भारतात घडली असता अपराध ठरली असती अशी कृती भारताबाहेर करण्यासाठी अपप्रेरणा देत असेल ती अपप्रेरणा ठरते.

उदा. 'अ' हा भारतात राहून, गोव्यातील विदेशी 'ब' या व्यक्तीला गोव्यामध्ये खून करण्यासाठी अपप्रेरणा देत असेल तर 'अ' ने 'ब' ला खुनाची अपप्रेरणा दिली असे ठरेल.

अपराधाचा प्रयत्न व अपप्रेरणा यासाठी या कलमामध्ये फक्त दंडाच्या शिक्षेची तरतूद केली आहे.

**९. खोटे कथन :–**

जर कोणतीही व्यक्ती ––

(i) कलम ३ खाली देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे कथन करण्यास किंवा कोणतीही माहिती सादर करण्यास तिला फर्मावण्यात आले असताना, कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाबाबत जे खोटे आहे अथवा जे खरे आहे असा तिचा समज नाही असे कथन करील किंवा अशी माहिती देईल तर, किंवा

(ii) अशा आदेशानुसार तिने जे कोणतेही पुस्तक हिशेब, अभिलेख, अधिकथन, विवरण किंवा अन्य दस्तऐवज ठेवणे किंवा सादर करणे आवश्यक आहे त्यामध्ये पूर्वोक्तानुसार असे कोणतेही कथन करील तर,

ती पाच वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

### कलम ९ चे विवेचन

एखादी व्यक्ती, कलम ३ खालील आदेशाद्वारे तिला कोणतेही कथन करण्यात फर्मावण्यात आले असता, असत्य असल्याचे तिला माहीत आहे असे कथन करील किंवा लेखी पुस्तकात तफावत असल्याचे आढळून आले व हे जाणून बुजून करण्यात आले असे सिद्ध झाले तर या कलमाखाली अपराधी ठरते.

या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची अशा दोन्ही शिक्षांची तरतूद या कलमात केली आहे.

### १०. कंपन्यांनी केलेले अपराध :–

(१) कलम ३ खाली दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती जर एखादी कंपनी असेल तर, आदेशाचे उल्लंघन झाले त्यावेळी जी कंपनीची हुकूमतदार असेल आणि कंपनीच्या कामकाज चालनाबद्दल तिला जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही उल्लंघनाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि विरुद्ध कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र होईल :

परंतु जर अशा कोणत्याही व्यक्तीने उल्लंघन आपल्या नकळत घडले किंवा असे उल्लंघन होऊ नये यासाठी आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केले तर, या पोट–कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट–कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केलेला असून तो कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, कार्यवाह किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला आहे अथवा त्याच्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, कार्यवाहक किंवा अन्य अधिकारी हेसुद्धा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ते पात्र होतील.

**स्पष्टीकरण** – या कलमाच्या प्रयोजनार्थ –

(a) ''कंपनी'' याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय असा आहे आणि त्यात, पेढी किंवा अन्य व्यक्ती–संघ यांचा समावेश आहे;

(b) ''संचालक'' याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे,

### कलम १० चे विवेचन

नोकराने किंवा अभिकर्त्याने त्याच्या सेवावधीत जर कोणताही अपराध केला तर त्याच्या दायित्वातून मालकाला सुटका करून घेता येत नाही याला न्यायाच्या भाषेत अन्यार्थ दायित्व (Vicarious Liability) असे म्हणतात. खरे पाहता, नोकराच्या अपराधात जर मालकाचा कोणताही सहभाग नसेल तर मालकाला अपराधी समजण्यात येत नाही. परंतु या संबंधात आता अनेक कायदे करण्यात आलेले असून अन्यार्थ दायित्वास मान्यता देण्यात आली आहे. या कलमाखाली आदेशाचे उल्लंघन, मग ते कंपनीने केले असले तरीही तो एक अपराध ठरतो. कलम १० द्वारे कंपनीने केलेल्या अपराधाबद्दल कंपनीस जबाबदार असलेल्या व्यक्तीवर या

अपराधाचे दायित्व टाकले आहे, कारण एखादा अपराध अशा व्यक्तीच्या निष्काळजीपणामुळेही घडलेला असू शकतो. एखाद्या व्यक्तीला अन्यार्थ दायी ठरविण्यासाठी अभियोगपक्षाला अशा व्यक्तीकडे त्या कंपनीचा संपूर्णपणे ताबा होता हे सिद्ध करावे लागते. **(मनमोहन वि. उत्तर प्रदेश राज्य, १९७५ क्रिमि. लॉ. जर्नल १२४१).** तसेच कंपनीच्या जबाबदार व्यक्तीकडे एखादे काम संपूर्णपणे सोपवले असल्याखेरीज, अभिकर्त्याच्या अपराधासाठी त्याला जबाबदार धरता येत नाही. **(राज्य वि. शिवप्रसाद, ऑ. इं. रि, १९५६ अला. ६१०). राज्य वि. गंगाराम (ऑ. इं. रि, १९५३ एमबी २४४)** या प्रकरणात, मालकाच्या अनुपस्थितीत, नियंत्रित दराने विक्री करावयाच्या कापडाची अधिक दराने विक्री केल्याच्या नोकराच्या अपराधासाठी, मालकाला दोषी धरण्यात आले नाही.

कलम १० च्या स्पष्टीकरणाचा विचार करता एखाद्या भागीदारी संस्थेचा संचालक म्हणजे अशा संस्थेचा भागीदार आणि कंपनी म्हणजे कोणतेही निगमनिकाय (Body carporate) असते. कोणत्याही संयुक्त कुटुंबातील सदस्यांचा भागीदारात समावेश करण्याइतपत हे कलम आता व्यापक बनवण्यात आले आहे, व्यवसाय चालवण्यात जर सर्व कुटुंबाचा हितसंबंध असेल तर अशा कुटुंबातील सदस्य कलम १० मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या दायित्वातून स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही. **(मदनलाल वि. राज्य, ऑ. इं. रि, १९६१ कलम २४०)** या कलमान्वये दोन प्रकारच्या व्यक्ती अभियोग लावला जाण्यास पात्र असतात : (१) कंपनीचा व्यवहार चालविण्यासाठी जबाबदार असलेले कंपनीचे प्रमुख व (२) ज्यांच्या संमतीने किंवा निष्काळजीपणामुळे अपराध घडून आला अशा व्यक्ती.

पोट–कलम (१) कलम ३ खालील आदेशाचे उल्लंघन होण्याची घटना घडून आली त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी जबाबदार असलेल्या सर्व व्यक्तींना त्यासाठी जबाबदार धरण्यात येते; अशा उल्लंघनाची त्यांना माहिती नव्हती किंवा ते टाळण्याचा त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केला हे सिद्ध करण्याची जबाबदारी या व्यक्तींची असते. पोट–कलम (२) अन्वये, जर संचालक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा निष्काळजीपणामुळे अपराध घडून आला असल्यास असे अधिकारी अपराधासाठी जबाबदार असतात. त्याविरुद्ध सिद्ध करण्याची जबाबदारी अर्थातच अशा अधिकाऱ्याची असते.

कलम १० च्या तरतुदी लागू करण्यासाठी प्रथमत: आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती ही कंपनी आहे आणि कंपनीने कलम ३ खालील आदेशाचे उल्लंघन केले आहे हे सिद्ध करून कंपनीविरुद्ध अभियोग लावल्याखेरीज त्या कंपनीशी संबंधित असलेल्या व कंपनीच्या कामकाजासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तिविरुद्ध अर्थवाही सुरू करता येत नाही **(गुजरात राज्य वि. चंदुलाल जेठलाल, (१९८०) २१ गुज. ऑ. रि, ३४३).**

कंपनीद्वारे उल्लंघन झाले असता ती विरुद्ध अभियोग लावता येईल अशी या कलमामध्ये तरतूद केलेली आहे. परंतु, कंपनीविरुद्ध अभियोग लावला नसेल अशा कंपनीच्या प्रभावी अधिकाऱ्याविरुद्ध अभियोग लावण्यात येऊ नये असे या कलमात कुठेही सूचित कलेले नाही. म्हणून अशा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध स्वतंत्रपणे किंवा कंपनीसोबत अभियोग लावणे कायदेशीर असेल.

व्यवसाय चालविणाऱ्या व्यक्तीला शिक्षा सुनावतेवेळी न्यायालय, अशा व्यक्तीचे अपराधात अन्यार्थ दायित्व असल्यास ती बाब विचारात घेऊन व अपराध त्याला माहीत नसताना घडून आला असे दिसून आल्यास शिक्षा ठोठावते वेळी सौम्य भूमिका घेईल **(गिरधारीलाल वि. डी. एन. मेहता, ऑ. इं. रि, १९७१ स. न्या. २१६२).**

कंपनीचा संचालक किंवा भागीदारी संस्थेचा भागीदार यांच्या अन्यार्थ दायित्वाचे तत्त्व केवळ फौजदारी गुन्ह्यापुरतेच मर्यादित नसून ते सर्व बाबतीत वैध आहे. **(भगवती प्रसाद वि. विशेष संचालक एन्फोर्समेंट, १९७७, क्रिमि. लॉ. जर्नल १८२१(कल)**

**१०–A . अपराध दखलपात्र आणि बिनजामिनी असणे :–**

’फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३’ यात काहीही असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला प्रत्येक अपराध हा दखलपात्र आणि बिनजामिनी असेल.

## कलम १०–A चे विवेचन

'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' अनुसार अपराध हे दखली (Non-congnizable) व अदखली अशा दोन स्वरूपाचे असतात.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २ (C) मध्ये केलेल्या व्याख्येनुसार, दखली अपराध याचा अर्थ, ज्या बाबतीत पोलीस अधिकाऱ्याला, पहिल्या अनुसूचीनुसार किंवा त्या–त्या काळी अमलात असलेल्या कायद्यानुसार, अधिपत्राखेरीज अटक करता येते असा अपराध, असा आहे, कलम १०-A अन्वये या अधिनियमाखालील सर्व अपराध हे दखली अपराध आहेत. सुधारणा अधिनियमाद्वारे हे अपराध केवळ दखलीच नव्हेत तर बिनजामिनी (Non-bailable) ठरवण्यात आले आहेत.

दखली अपराधाच्या बाबतीत पोलिसांना चौकशीची अमर्याद शक्ती असते. दखली अपराधाचे अन्वेषण करण्याच्या सांविधिक अधिकारामध्ये न्यायालय दखल देत नाही आणि अन्वेषण थांबवण्याचा न्यायालयाला अधिकार असत नाही. चौकशीनंतर पोलिसांनी आरोपपत्र दाखल केल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करावयाची किंवा नाही हे ठरवण्याचा फक्त अधिकार न्यायालयाला असतो. तथापि, अन्वेषणाचा उद्देश संबंधित व्यक्तीला केवळ त्रास देण्याचा आहे अशी न्यायालयाची खात्री झाल्यास न्यायालय, अपवादात्मक परिस्थितीत चौकशी थांबवू शकते. **राज्य वि. सपन कुमार**, **(ऑ. इं. रि. १९८२ स. न्या. ९४९; १९८२ क्रिमि. लॉ जर्नल ८१९)** या सर्वोच्च न्यायालयापुढील प्रकरणात न्यायमूर्ती ए. एन. सेन यांनी असा निर्णय दिला की, ''न्यायालयापुढे आलेल्या तथ्यावरून जर असे दिसून आले की, त्यावरून कोणताही प्रकारचा अपराध घडल्याचे दिसत नाही आणि अन्वेषण पुढे चालू राहण्यामुळे संबंधित व्यक्तीला अकारण त्रास होण्याचा संभव आहे तर अशा अन्वेषणामध्ये हस्तक्षेप करणे हे न्यायालयाचे कर्तव्य ठरते.''

कोणताही वैध पुरावा उपलब्ध होत नसेल व कार्यवाही सुरू करण्यात किंवा पुढे चालू ठेवण्यात अडचणी येत असतील तर उच्च न्यायालय फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून उच्च न्यायालय अशी फौजदारी कार्यवाही थांबवू शकते.

### १०–AA . अटक करण्याचे अधिकार :–

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या किंवा याबाबतीत त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा कोणताही अधिकारी या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध केल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीस अटक करणार नाही.

### १०–B. या अधिनियमान्वये सिद्धदोषी ठरलेल्या कंपन्यांचे नाव, धंद्याचे ठिकाण, इत्यादी प्रसिद्ध करण्याचा न्यायालयाचा अधिकार :–

(१) कोणतीही कंपनी या अधिनियमान्वये सिद्धदोष ठरली असेल त्याबाबतीत, अशा कंपनीला सिद्धदोष ठरवणाऱ्या न्यायालयास, अशा कंपनीचे नाव व त्या कंपनीच्या कामकाजाचे ठिकाण, तिने केलेल्या उल्लंघनाचे स्वरूप कंपनीला अशा रीतीने सिद्धदोष ठरवण्यात आले आहे ही वस्तुस्थिती आणि प्रकरणाच्या वस्तुस्थितीनुरूप न्यायालयास योग्य वाटेल असा इतर तपशील न्यायालय निदेश देईल अशा वृत्तपत्रांत व अशा रीतीने कंपनीच्या खर्चाने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल.

(२) न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील करावयाच्या मुदतीत कोणतेही अपील करण्यात न येता असा कालावधी संपेतोपर्यंत किंवा असे अपील करण्यात आले असल्यास ते निकालात निघेतोपर्यंत पोट–कलम (१) खालील माहिती प्रसिद्ध केली जाणार नाही.

(३) पोट–कलम (१) अन्वये माहिती प्रसिद्ध करण्यास येणाऱ्या खर्चाची रक्कम ही जणू न्यायालयाने केलेल्या द्रव्यदंडाची रक्कम आहे असे समजून ती कंपनीकडून वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण** – या कलमाच्या प्रयोजनार्थ 'कंपनी' या शब्दाचा अर्थ, कलम १० च्या स्पष्टीकरणातील खंड (a) यात त्या शब्दास जो अर्थ दिला असेल त्या अर्थाप्रमाणे असेल.

**१०–C. आरोपीची मानसिक अवस्था दोषार्ह असल्याचे गृहीत धरणे :–**

(१) ज्या अपराधाच्या बाबतीत आरोपीची मानसिक अवस्था दोषार्ह असणे आवश्यक असेल अशा, या अधिनियमाखालील अपराधाच्या बाबतीतील कोणत्याही खटल्यात न्यायालय अशी मानसिक अवस्था होती असे गृहीत धरील. परंतु त्या खटल्यात जी कृती अपराध म्हणून आरोपीत करण्यात आली नसेल अशा कोणत्याही कृतीच्या बाबतीत आपली कोणत्याही प्रकारे अशी दोषार्ह मानसिक अवस्था नव्हती हे सिद्ध करून आरोपीला आपला बचाव करता येईल.

**स्पष्टीकरण** – या कलमातील ''दोषार्ह मानसिक अवस्था'' या शब्दप्रयोगात उद्देश, हेतू, वस्तुस्थिती माहीत असणे आणि वस्तुस्थितीवर विश्वास ठेवणे किंवा विश्वास ठेवण्यास कारण असणे या गोष्टींचा समावेश होतो.

(२) जेव्हा न्यायालय एखाद्या गोष्टीचे अस्तित्व पुरेसे शंकातीत असल्याचे मानील तेव्हाच ती गोष्ट या कलमाच्या प्रयोजनार्थ सिद्ध झाली आहे असे समजले जाईल – केवळ अशा गोष्टीचे अस्तित्व दाट संभाव्यतेमुळे प्रस्थापित होते म्हणून नव्हे.

**कलम १०–C चे विवेचन**

या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधामागे दोषार्ह मानसिक अवस्था कारणीभूत असते हे गृहीतक न्यायालय स्वीकारील. 'दोषार्ह मानसिक अवस्था' या संज्ञेत 'उद्दिष्ट, हेतू व तथ्याचे ज्ञान तसेच तथ्यामधील विश्वास किंवा तसा विश्वास ठेवण्यास कारण असणे' या गोष्टीचा समावेश होतो. कलम १०–C मध्ये वापरलेल्या भाषेवरून असे दिसून येते की, या अधिनियमाखालील आदेशाचे उल्लंघन होण्यासाठी दोषार्ह मानसिक अवस्था कारणीभूत असते आणि म्हणून अभिकथित कृतीच्या संबंधात तशी मानसिक अवस्था असल्याचे न्यायालय गृहीत धरील. केवळ या कलमातच नव्हे तर कलम १४ मध्येदेखील विरुद्ध सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर टाकली आहे.

कोणत्याही अपराधाच्या कृतीमागे अपराधाची भावना (mens rea) असते, हे तर उघडच आहे. कायद्याच्या सर्वसाधारण तत्त्वाविषयी चर्चा करताना कलकत्ता उच्च न्यायालयाने (न्याय. देवव्रत मुखर्जी यांनी) असा निर्णय दिला की, संविधीद्वारे, कोणत्याही अपराधामध्ये अपराधाची भावना हा महत्त्वाचा घटक असतो ही बाब स्पष्टपणे स्पष्ट करण्यात येईपर्यंत, गुन्ह्यामागे एखाद्या व्यक्तीचे अपराधी मन होते हे सिद्ध होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीला अपराधी समजण्यात येऊ नये.

कलम १०–C च्या पोट–कलम (२) मध्ये एखाद्या गोष्टीचे अस्तित्व शंकातीत असण्यावर भर दिलेला आहे. केवळ संभाव्यतेमुळे एखाद्या गोष्टीचे अस्तित्व सिद्ध होत नाही अशी या कलमात तरतूद केलेली आहे.

**११. अपराधांची दखल घेणे :–**

कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबत भारतीय दंड संहिता' १८६० (१८६० चा ४५), कलम २१ मधील व्याख्येनुसार लोकसेवक असलेल्या एखाद्या व्यक्तीने किंवा कोणत्याही व्यथित व्यक्तीने मग अशी व्यक्ती संघटनेची सभासद असो अथवा नसो किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त ग्राहक संघटनेनी अशा अपराधाच्या घटकतथ्यांसंबंधी लेखी अहवाल सादर केल्याखेरीज दखल घेणार नाही.

**स्पष्टीकरण :–** या कलमाच्या आणि कलम १२–AA च्या प्रयोजनासाठी ''मान्यताप्राप्त ग्राहक संघटना'' याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा त्या–त्या काळी अमलात असलेला कोणताही इतर कायदा या अन्वये नोंदणी केलेली स्वेच्छा ग्राहक संघटना असा असेल.

## कलम ११ चे विवेचन

कलम ११ ची व्याप्ती, कलम ११ व कलम १२–AA यांचा तौलनिक अभ्यास केल्याखेरीज कळून येणार नाही. पोलीस अधिकाऱ्याने आरोपपत्र सादर केले की कलम ११ च्या तरतुदीची पूर्तता होते, कारण अहवाल लोकसेवकाने सादर केला पाहिजे, ही कलम ११ तील एक शर्त आहे. या दृष्टीने कलम ११ मध्ये सर्वसाधारण तरतूद केली आहे असे म्हणता येईल. कलम १२–AA मध्ये, या अधिनियमाखालील आरोपीची दखल घेण्याचा अधिकार केवळ विशेष न्यायालयांनाच आहे, अशी तरतूद केली आहे. पोलीस अधिकाऱ्यांखेरीज अन्य लोकसेवकाने विशेष न्यायालयाकडे तक्रार केली असता कलकत्ता उच्च न्यायालयाने **संतोषचंद्र डे** प्रकरणात **(१९८४ क्रिमि. लॉ. जर्नल १५३२)** कलम १२–AA (१) खाली पोलीस अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला तरच विशेष न्यायालय दखल घेईल असा निर्वाळा दिला आहे. राजस्थान उच्च न्यायालयाने **(रामप्रसाद वि. राज्य १९८५ क्रिमि. लॉ. जर्नल ४४२)** आणि ओरिसा उच्च न्यायालयाने **(रवेंद्र वि. राज्य (१९८५) २ क्राईम्स २५८)** या कलकत्ता उच्च न्यायालयाचे मत ग्राह्य धरले आहे. पटना उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने व आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने आपले वेगळे मत नोंदवले आहे. या न्यायालयाच्या मते औषधी द्रव्ये निरीक्षकाने तक्रार दाखल केल्यानंतरही त्याची दखल घेण्याची अधिकारिता विशेष न्यायालयाला आहे असा निर्णय दिला. **(सरकारी अभियोक्ता वि. बुद्धे शंकर, (१९८८ क्रिमि. लॉ. जर्नल १४७०)** या वादावर पडदा पाडण्यासाठी कलम १२–AA च्या खंड (e) मध्ये तरतूद करण्यात आली. 'केंद्र किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या त्या त्या शासनांच्या अधिकाऱ्यांनी' या स्पष्ट तरतुदीनंतर विशेष न्यायालय कशाची दखल घेईल हा प्रश्नच उरला नाही.

**दखल घेणे म्हणजे काय? :–** दखल घेणे याचा अर्थ न्यायिकदृष्ट्या एखाद्या गोष्टीची सुनावणी करणे असा आहे (hearing of a thing judicially) दखल घेतली जाण्यासाठी कोणतीही औपचारिक क्रिया करावी लागत नाही. परंतु दाखल करण्यात आलेल्या एखाद्या प्रकरणात दंडाधिकाऱ्याने आपले लक्ष घातले की त्या प्रकरणाची त्याने दखल घेतली असे होते. परंतु विशेष न्यायालयाने संहितेच्या कलम १५६ (३) खाली चौकशी करण्याचा आदेश देण्यासाठी एखाद्या प्रकरणात लक्ष घातले असेल तर त्याने त्या प्रकरणाची दखल घेतली असे म्हणता येणार नाही. **(गोपालदास वि. राज्य ऑ. इं. रि. १९६१ स. न्या. ९८६).** एखाद्या गोष्टीची दखल केव्हा घेतली जाते ही बाब त्या प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती यावर अवलंबून असते. अन्वेषणाच्या प्रयोजनासाठी झडती अधिपत्र जारी करणे किंवा अटकेसाठी अधिपत्र काढणे या बाबींवरून न्यायालयाने त्या प्रकरणाची दखल घेतली आहे, असे म्हणता येणार नाही. **(नारायण दास वि. राज्य ऑ. ई. रि. १९५९ स. न्या. १११८)** अपराधाची दखल घेणे आणि अपराध्याविरुद्ध अभियोग लावणे यामध्ये फरक आहे. दखल ही अपराधाची घेतली जाते, अपराध्याची नव्हे. कलम १२–AA १ (e) खाली आरोपी व्यक्ती खटल्यासाठी न्यायालयापुढे दाखल केलेली नसतानाही विशेष न्यायालय अपराधाची दखल घेऊ शकते.

**दखल घेण्याची पद्धती :–** विशेष न्यायालय हे मूळ अधिकारिता असलेले न्यायालय आहे. ते पुढील पैकी कोणत्याही कारणास्तव अपराधाची दखल घेऊ शकते :

(१) पोलीस अहवालावरून,

(२) केंद्र शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने केलेल्या तक्रारीवरून,

(३) राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने केलेल्या तक्रारीवरून,

(४) व्यथित व्यक्तीने केलेल्या तक्रारीवरून आणि

(५) कोणत्याही मान्यताप्राप्त ग्राहक संघटनेनी केलेल्या तक्रारीवरून

विशेष न्यायालयाला त्याच्याकडे आलेल्या तक्रारीच्या स्वरूपावरून, फौजदारी प्रक्रियासंहिता, १९७३, याच्या कलम १५६(३) खालील पोलीस चौकशीचा आदेशही देता येतो.

**१२–A . खास न्यायालयाची स्थापना :–**

(१) राज्य शासनाला, या अधिनियमाखालील अपराधांची शीघ्र न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा अशा क्षेत्रासाठी आवश्यक असतील तितकी खास न्यायालये स्थापन करता येतील.

(२) खास न्यायालय हे एकाच न्यायाधीशाचे असेल व राज्य शासनाने केलेल्या विनंतीनुसार उच्च न्यायालय त्या न्यायाधीशास नियुक्त करील.

**स्पष्टीकरण :–** या पोट–कलमामध्ये ''नियुक्ती करणे'' या शब्दप्रयोगाला, संहितेच्या कलम ९ च्या स्पष्टीकरणामध्ये त्याला देण्यात आल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.

(३) एखादी व्यक्ती––

(a) ती उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह आहे, किंवा

(b) ती किमान एक वर्ष इतका काळ सत्र न्यायाधीश किंवा अपर सत्र न्यायाधीश म्हणून राहिलेली आहे,

असे झाल्याशिवाय खास न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली जाण्यास अर्ह होणार नाही.

**१२–AA . खास न्यायालयांद्वारे न्यायचौकशीयोग्य अपराध :–**

संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,––

(a) या अधिनियमाखालील सर्व अपराधांची न्यायचौकशी, तो अपराध ज्या क्षेत्रामध्ये करण्यात आला असेल त्या क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या खास न्यायालयालाच किंवा जेथे एकापेक्षा अधिक खास न्यायालये असतील तेथे, त्यांपैकी उच्च न्यायालयाकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका न्यायालयालाच करता येईल.

(b) या अधिनियमाखालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तशा संशयित असलेल्या एखाद्या व्यक्तीला, संहितेचे कलम १६७ चे पोट–कलम (२) किंवा पोट–कलम (२–a) अन्वये दंडाधिकाऱ्याकडे पाठवण्यात आले असेल अशा बाबतीत, असा दंडाधिकारी स्वत:ला योग्य वाटेल अशा हवालतीत अशा व्यक्तीला (असा दंडाधिकारी हा न्यायिक दंडाधिकारी असेल तर, जास्तीत जास्त पंधरा दिवसांच्या कालावधीसाठी आणि असा दंडाधिकारी हा कार्यकारी दंडाधिकारी असेल तर, जास्तीत जास्त सात दिवसांच्या कालावधीसाठी) स्थानबद्ध करून ठेवण्याचे प्राधिकृत करू शकेल :

परंतु, अशा दंडाधिकाऱ्याला जर–

(i) अशी व्यक्ती उपरोक्ताप्रमाणे त्याच्याकडे पाठवण्यात आली असेल तेव्हा; किंवा

(ii) त्याने प्राधिकृत केलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा तो समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी;

असे वाटले की, अशा व्यक्तीची स्थानबद्धता अनावश्यक आहे व ही बाब कलम ८ च्या परंतुकाखाली येते याबाबत त्याची खात्री झाली तर, तो अशा व्यक्तीची जामिनावर मुक्तता करण्याचा आदेश देऊ शकेल आणि त्याची अशा प्रकारे खात्री न झाल्यास, तो अधिकारिता असलेल्या खास न्यायालयाकडे अशा व्यक्तीला पाठवण्यात यावे असा आदेश देईल;

(c) खंड (b) अन्वये खास न्यायालयाकडे पाठवलेल्या व्यक्तीच्या संबंधात खास न्यायालय, या पोटकलमाच्या खंड (d) च्या तरतुदींच्या अधीनतेने, असाच अधिकार वापरू शकेल की, जो एखाद्या प्रकरणाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्याला संहितेच्या कलम १६७ अन्वये ज्या व्यक्तीला त्याच्याकडे पाठवण्यात आले आहे अशा आरोपी व्यक्तीच्या संबंधात त्या कलमान्वये अशा प्रकरणात वापरता येईल;

(d) उपरोक्ताप्रमाणे असेल ते खेरीज करून एरव्ही, या अधिनियमाखालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तशा संशयित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, खास न्यायालय किंवा उच्च न्यायालय यांच्याखेरीज इतर कोणत्याही न्यायालयाकडून जामिनावर सोडण्यात येणार नाही;

परंतु,–

(i) अशा सुटकेच्या अर्जाला विरोध करण्याची संधी फिर्यादीपक्षाला दिल्याशिवाय,–– मात्र अशी संधी देणे व्यवहार्य नाही असे काही कारणास्तव खास न्यायालयाचे मत असेल तर, त्याला ती कारणे नमूद करावी लागतील––, आणि

(ii) फिर्यादीपक्षाने अर्जाला विरोध केला असेल अशा बाबतीत, ती व्यक्ती संबंधित अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यास वाजवी कारण आहे याबाबत खास न्यायालयाची खात्री झाली तर,

खास न्यायालय अशा कोणत्याही व्यक्तीला जामिनावर सोडणार नाही :

परंतु, आणखी असे की, जर अशी व्यक्ती सोळा वर्षापेक्षा कमी वयाची असेल किंवा ती स्त्री असेल किंवा ती आजारी किंवा दुर्बल व्यक्ती असेल तर अथवा इतर कोणत्याही विशेष कारणासाठी –– ते लेखी नमूद करावे लागेल –– तसे करणे न्याय्य आणि योग्य आहे याबाबत खास न्यायालयाची खात्री झाली असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीला जामिनावर सोडावे असे खास न्यायालय निर्देशित करू शकेल;

(e) या अधिनियमाखाली अपराध ठरेल अशा वस्तुस्थितीसंबंधीच्या पोलीस अहवालाचे अवलोकन केल्यावर खास न्यायालय, आरोपीला न्यायचौकशीसाठी त्याच्याकडे संप्रेषित करण्यात आलेले नसतानाही त्या अपराधाची दखल घेऊ शकेल;

(f) या अधिनियमाखालील सर्व अपराधांची न्यायचौकशी संक्षिप्तरीत्या करण्यात येईल आणि संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध, शक्य असेल तितपत, अशा न्यायचौकशीला लागू होतील :

परंतु, या कलमाखालील संक्षिप्त न्यायचौकशीअन्ती कोणतीही दोषसिद्धी झाल्यास त्या बाबतीत, खास न्यायालयाने जास्तीत जास्त दोन वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर होईल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाची न्यायचौकशी करताना या अधिनियमाखाली नसलेल्या अन्य अपराधांचीही न्यायचौकशी खास न्यायालयाला करता येईल व संहितेअन्वये आरोपीवर त्याच न्यायचौकशीत तो दोषारोप ठेवता येईल:

परंतु, असा अन्य अपराध हा, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये संक्षिप्त न्यायचौकशीयोग्य असावा :

परंतु, आणखी असे की, अशा न्यायचौकशीतील अशा अन्य अपराधाबद्दल कोणतीही दोषसिद्धी झाल्यास त्या बाबतीत, अशा इतर कायद्यान्वये संक्षिप्त न्यायचौकशीअन्ती होणाऱ्या दोषसिद्धीबद्दल जेवढ्या मुदतीच्या शिक्षेचा उपबंध केला असेल त्यापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा खास न्यायालयाने ठोठावणे हे कायदेशीर होणार नाही.

(३) या अधिनियमाखालील अपराधात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निबद्ध असल्याबद्दल किंवा त्यात सामील असल्याबद्दल संशयित असलेल्या कोणत्याही इसमाचा साक्षीपुरावा मिळविण्याच्या हेतूने खास न्यायालय अशा व्यक्तीला त्या अपराधाच्या आणि तो करणारी मुख्य व्यक्ती म्हणून किंवा त्याला अपप्रेरणा देणारी व्यक्ती म्हणून संबंधित असलेल्या इतर प्रत्येक व्यक्तीच्या संबंधातील त्याला माहीत असलेल्या संपूर्ण परिस्थितीची संपूर्ण व खरी माहिती उघड करण्याच्या शर्तीवर माफी देऊ शकेल आणि अशा प्रकारे दिलेली प्रत्येक माफी, त्या संहितेच्या कलम ३०७ अन्वये दिली असल्याचे संहितेच्या कलम ३०८ च्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.

(४) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे संहितेच्या कलम ४३९ खालील, जामिनाच्या संबंधातील उच्च न्यायालयाच्या विशेष अधिकारांवर परिणाम होतो असे मानण्यात येणार नाही, आणि उच्च न्यायालयाला त्या कलमातील ''दंडाधिकारी'' या निर्देशामध्ये जणू काही कलम १२–A अन्वये स्थापन करण्यात आलेल्या ''खास न्यायालया''च्या निर्देशाचा समावेश असावा त्याप्रमाणे त्या कलमाच्या पोट–कलम (१) च्या खंड (b) खालील अधिकारासकट अशा अधिकारांचा वापर करता येईल.

## कलम १२–A व १२–AA चे विवेचन

या अधिनियमाखालील सर्व अपराधांचे खटले चालवण्यासाठी एकच मंच असेल व तो म्हणजे त्या क्षेत्राचे विशेष न्यायालय, जर त्या क्षेत्रामध्ये एकापेक्षा अधिक विशेष न्यायालये असतील तर, विशिष्ट खटल्यासाठी उच्च न्यायालय विनिर्दिष्ट करील असे न्यायालय हे विशेष न्यायालय असेल. ज्याची उच्च न्यायालयामध्ये नेमल्या जाण्याची पात्रता आहे किंवा ज्याने सत्र न्यायाधीश म्हणून किमान एक वर्ष काम पाहिले असेल अशा न्यायाधीशांचीच विशेष न्यायालयांवर नेमणूक होऊ शकते.

या अधिनियमाखालील अपराधांच्या अन्वेषणासाठी अधिनियमात कोणतीही कार्यपद्धती विहित केलेली नाही. परंतु या अधिनियमाखालील सर्वच अपराध दखली असल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ याच्या प्रकरण बारामधील तरतुदींनुसार पोलीस अधिकाऱ्यांद्वारे अन्वेषण करावे लागेल. संहितेच्या प्रकरण बारामध्ये, पोलीस ठाण्यामध्ये अपराध घडल्यासंबंधीची माहिती मिळाल्यापासून अन्वेषण पूर्ण करून दंडाधिकाऱ्याकडे अंतिम अहवाल पाठवण्यात येईपर्यंतची पूर्ण कार्यपद्धती विशद केली आहे. परंतु, फौजदारी प्रक्रिया संहितेतील तरतुदींना अधिभावी होतील अशा विशिष्ट तरतुदी कलम १२कक मध्ये केलेल्या आहेत. कलम १२–AA (१) (a) अन्वये या अधिनियमाखालील अपराधांचा निर्णय करण्यासाठी न्यायालयांना पूर्ण अधिकारिता देण्यात आली आहे. जर आरोपीला अटक करण्यात आली तर त्याला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ अन्वये २४ तासामध्ये दंडाधिकाऱ्यापुढे उभे करावे लागते. परंतु या कलमान्वये सर्व अधिकार विशेष न्यायालयांना देण्यात आले असल्याने, दंडाधिकाऱ्याने अशा परिस्थितीत काय कार्यवाही करावयाची त्याची तरतूद कलम १२–AA (१) (b) द्वारे केली आहे. कलम १२–AA (१) (b) अन्वये आरोपीला पाठवण्यात आल्यानंतर कोणती कार्यवाही करावयाची याची तरतूद कलम १२–AA १ (c) यात केली आहे. अन्वेषणाचे काम २४ तासामध्ये पूर्ण होणार नसेल अशा बाबतीत कोणती कार्यपद्धती अनुसरावयाची याची तरतूद कलम १२–AA , पोट–कलम (१) खंड (b) व (c) यात केली आहे. उपरोक्त खंडामध्ये केलेल्या बदलांच्या अधीनतेने, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१ किंवा १५१ खाली अटक केलेल्या अन्वेषणासाठी अटकावून ठेवलेल्या व्यक्तींबाबत, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६७ लागू असेल अशा व्यक्तींला चोवीस तासाच्या आत नजीकच्या दंडाधिकाऱ्याकडे किंवा इलाखाशहर, दंडाधिकाऱ्यापुढे दाखल करावे लागेल. अशी व्यक्ती, या अधिनियमाच्या कलम ८ च्या परंतुकाच्या तरतुदीखाली येत असल्यास, अशा व्यक्तींच्या विनंतीवरून, त्याला जामिनावर सोडण्यात येईल. दंडाधिकाऱ्याचे तसे समाधान न झाल्यास तो आरोपीला पोलीस अभिरक्षेमध्ये १५ दिवसासाठी किंवा अन्य अभिरक्षेत ठेवील. या कालावधीतही कलम ८ च्या परंतुकाच्या अधीनतेने, दंडाधिकाऱ्याला त्याला जामीन मंजूर करता येईल. दंडाधिकारी हा या अधिनियमाखालील अपराधाची दखल घेण्यासाठी सक्षम नसल्याने कलम १२–AA मधील तरतुदींन्वये आणखी ४५ दिवसांच्या अभिरक्षेचा आदेश दंडाधिकाऱ्याला देता येत नाही. या व्यक्तीला विशेष न्यायालयापुढे सादर केल्यानंतर विशेष न्यायालय त्याला जास्तीत जास्त ६० दिवसांपर्यंत अभिरक्षेत ठेवण्याचा आदेश देऊ शकतो. ६० दिवसांच्या मुदतीनंतर अशा व्यक्तीला जामिनावर सोडावेच लागते. कलम १२–AA च्या पोट–कलम (१) खंड (d) व पोट–कलम (४) अन्वये विशेष न्यायालयाला जामीन मंजूर करण्याचा किंवा मंजूर केलेला जामीन रद्द करण्याचा अधिकार आहे.

विशेष न्यायालयापुढील सर्व खटले हे संक्षिप्तपणे चालवावयाचे असतात. अत्यावश्यक वस्तू अधिनियमामध्ये विशेष तरतूद केलेली असल्याने दंडाधिकारी किंवा यथास्थिती विशेष न्यायाधीश संक्षिप्त कार्यपद्धतीचा अवलंब करावा लागतो. **(सत्यनाराण वि. राज्य १९८७ कल. क्रिमि. लॉ. रि. (कल २६)**, कलम १२–AA च्या पोट कलम (१) खंड (e) अन्वये खटले संक्षिप्तरीत्या चालवणे न्यायालयावर बंधनकारक आहे व याबाबतीत न्यायालयाला अन्य कोणताही विकल्प नाही.

प्रत्येक प्रकरणाच्या बाबतीत न्यायालयाला संक्षिप्त प्रकरणांच्या नोंदवहीमध्ये नोंद करावी लागते. जर आरोपी निर्दोष शाबीत होत असेल तर न्यायाधीश त्याच्या सुटकेच्या कारणांची नोंद करील. या अधिनियमाच्या कलम १२–AA , पोट–कलम (१) च्या खंड (e) अन्वये विशेष न्यायालयाचा शिक्षा देण्याचा कमाल अधिकार दोन वर्षाचा आहे. विशेष न्यायाधीशांना याहून अधिक मुदतीची शिक्षा देता येत नाही.

**द्रव्यदंडाची शिक्षा :–** न्यायमूर्ती छागला आणि गजेंद्रगडकर या संयुक्त न्यायाधीशांनी असे प्रतिपादन केले की, जेव्हा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या जिवावर एखादी व्यक्ती संपत्ती कमावून श्रीमंत होण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्याच्या पावलावर पाऊल ठेवून अन्य व्यक्तींनीही तोच मार्ग आचरू नये यासाठी हा अवैध मार्ग आहे व असा गुन्हा करणे सोपे नाही हे त्याच्या मनावर ठसवणे आवश्यक असते, तसेच त्याने अवैध मार्गाने मिळवलेल्या संपत्तीसह त्याला निसटूही देता येत नाही. अशा व्यक्तींना केवळ कारावासाची शिक्षाच ठोठावली तर, कारावासाची शिक्षा संपवून तो अशा अवैध मार्गाने मिळवलेल्या संपत्तीचा उपभोग घेऊ शकतो व अशा व्यक्तींच्या पावलावर पाऊल टाकून इतरही तशाच मार्गाचा अवलंब करण्याची शक्यता असते. म्हणून द्रव्यदंड लादणे आवश्यक ठरते व हा द्रव्यदंडदेखील गुन्ह्याच्या गांभीर्यास अनुसरुन असणे आवश्यक आहे. **(मोहनलाल गोकुलदास वि. एंपरर, ऑ. इं. रि, १९४८ मुंबई ३५८)** विशेष न्यायालयाला, कमाल शिक्षा निश्चित करण्यासाठी, भारतीय दंड संहितेचे कलम ६५ लागू करावे.

विशेष न्यायालयाने काढलेला आदेश हा अंतिम आदेश असतो, त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३६२ द्वारे घातलेल्या बंधनाच्या परिणामस्वरूप त्याला या अंतिम आदेशाचे पुनरीक्षण करता येत नाही. हा अधिकार अपील प्राधिकरणाला आहे. **(बाकुलाल वि. राज्य. १९८७, कल क्रिमि. लॉ. रि. (कल) २१०).**

### १२–AB. अपील व पुनरीक्षण :–

उच्च न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील खास न्यायालय हे जणू काही त्या उच्च न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील प्रकरणांची न्यायचौकशी करणारे सत्र न्यायालय असावे त्याप्रमाणे ते उच्च न्यायालय संहितेची प्रकरणे एकोणतीस व तीस यांद्वारे उच्च न्यायालयाला प्रदान केलेले सर्व अधिकार, ते लागू असतील तेथवर, वापरू शकेल.

### कलम १२–AB चे विवेचन

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मध्ये अपिलासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली नाही. अशा विशेष तरतुदींच्या अभावी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (कलमे ३७२ ते ३९४) याच्या प्रकरण एकोणतीसमध्ये अंतर्भूत असलेला सर्वसाधारण कायदा अपिलाला लागू असेल.

अपील करता येईल की नाही हे ठरविण्याचा मुख्य निकष म्हणजे प्रथम अपराधसिद्धी झाली आहे की नाही हे पाहणे हा आहे. जर फक्त द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात आली असेल तर अपील करता येत नाही. जर शिक्षा केवळ द्रव्यदंडच नसेल तर अपील करता येईल **(अझीझ खान वि. राज्य, ऑ. ई. रि. १९५४ अलाहा. ६४२:५५ क्रिमि. लॉ. जर्नल १३४५८).**

परंतु जर आरोपीने आपला गुन्हा कबूल केला असेल किंवा अशा कबुलीमुळे सिद्धदोषी ठरला असेल तर त्याला अपील करता येत नाही. गुन्हा कबूल करणे म्हणजे अपिलाचा हक्क गमावणे होय. तरीही या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, गुन्हा कबूल केल्यानंतरही देण्यात आलेली शिक्षा व शिक्षेची वैधता याबाबत आक्षेप घेता येतो **(याकूब अली वि. आर. ऑ. इं. रि. १९४४ कल. १२६ : ४५ क्रिमि. लॉ. जर्नल ५१७)**. गुन्ह्यांचा कबुलीजबाब स्वीकारण्यापूर्वी न्यायाधीशाने, अभिकथित व उघड केलेल्या तथ्यावरून, अत्यावश्यक वस्तू अधिनियमाखाली अपराध स्पष्ट होतो याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

अपिलाचे प्रकरणी प्रलंबित लायसेन्स रद्द करता येत नाही. अत्यावश्यक वस्तू अधिनियमान्वये, सिद्धदोष लायसेन्सधारकाला

सुनावणीची संधी दिल्याखेरीज लायसेन्स रद्द करण्याची कार्यवाही करता येत नाही. लायसेन्सधारकाने लायसेन्स प्राधिकाऱ्याबरोबरच त्यास मंजूर करण्यात आलेल्या लायसेन्सद्वारे करार केला असतो. आणि लायसेन्सच्या अटीनुसार लायसन प्राधिकारी, लायसनधारक कलम ७ खाली सिद्धदोषी ठरला या कारणास्तव लायसेन्स रद्द करत असेल तर, लायसेन्स प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा हा प्रश्न कोणत्याही न्यायालयात उपस्थित करण्यात येऊ नये.

अत्यावश्यक वस्तू अधिनियमामध्ये पुनरीक्षण व संदर्भ यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण तीसमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्वसाधारण कायद्याद्वारे या अधिनियमाखालील बाबींचे विनियमन करण्यात येईल.

### १२–AC. खास न्यायालयांसमोरील कार्यवाहींना संहिता लागू असणे :–

या अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून एरव्ही, संहितेचे उपबंध (जामीन आणि बंधपत्रे यासंबंधीच्या तरतुदींसकट) खास न्यायालयासमोरील कार्यवाहींनाही लागू होतील आणि उक्त तरतुदींच्या प्रयोजनांसाठी खास न्यायालय हे सत्र न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि खास न्यायालयासमोर फिर्यादीपक्षाचे काम चालविणारी व्यक्ती ही सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल.

### कलम १२–AC चे विवेचन

कलम १२–AC च्या पहिल्या भागामध्ये, अधिनियमामध्ये काहीही प्रतिकूल नसल्यास, विशेष न्यायालयापुढील कार्यवाहीमध्ये, फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम लागू होतील अशी तरतूद केली आहे. यातील कार्यवाही हा शब्द व्यापक अर्थाने वापरला असून, या शब्दाला त्या अधिनियमातील संदर्भानुसार त्याचा अर्थ असेल या अधिनियमामध्ये 'कार्यवाही' या शब्दाचा अर्थ 'खटला' असा नाही हे तर उघडच आहे. या कलमाच्या दुसऱ्या भागामध्ये, या अधिनियमातील तरतुदी पाहता विशेष न्यायालये हे सत्र न्यायालये असल्याचे मानण्यात येईल अशी तरतूद केली आहे.

सुधारणा किंवा विशोधन अधिनियमामध्ये जामीन व बंधपत्र याविषयीच्या तरतुदींच्या संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या प्रकरण तेहतीस यातील तरतुदी विशेष न्यायालयापुढील प्रकरणांना लागू होतील. अशी तरतूद केली आहे.

संहितेच्या कलम ४३९ अन्वये, जामीन मंजूर करण्याचा व तो रद्द करण्याचा अधिकार उच्च न्यायालय व सत्र न्यायालयाला देण्यात आला आहे. **एल. आर. वि. मंसूर (१९७८ क्रिमि. लॉ. जर्नल १४९७)** या प्रकरणात उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, संहितेच्या कलम ९ (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या सत्र न्यायाधीशांद्वारे सत्र न्यायालयाचे काम पाहिले जाते. त्यामुळे, त्यास कलम ४३९ खालील विशेष अधिकाराचा वापर करून अपर किंवा सहायक सत्र न्यायाधिशाने दिलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. या संदर्भात अत्यावश्यक वस्तू अधिनियमाखाली शिक्षायोग्य असलेला अपराध ज्याने केला असल्याचा संशय आहे अशा आरोपींच्या संबंधात संहितेच्या कलम ४३९ खालील विशेष अधिकाराचा वापर करण्यासाठी सत्र न्यायाधीश कितपत सक्षम आहे आणि तसा जर तो असेल तर, विशेष न्यायालयाने जामिनाच्या संबंधात दिलेल्या कोणत्याही आदेशात कोणत्याही प्रकारे त्याला हस्तक्षेप करता येतो का, हे पाहणे आवश्यक ठरेल.

१९८१ साली सुधारणा केलेल्या अत्यावश्यक वस्तू अधिनियमातील तरतुदींनुसार विशेष न्यायालयाची या अधिनियमाखालील अपराधाची प्रकरणे चालवण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. हे न्यायालय सत्र न्यायालयास दुय्यम आहे असे अधिनियमात कुठेही म्हटले नाही. उलट कलम १२–AC मध्ये विशेष न्यायालये जामीन व बंधपत्राच्या प्रयोजनासाठी हे सत्र न्यायालये असल्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सत्र न्यायालयाला असा हस्तक्षेप करता येणार नाही.

अपराधी व्यक्ती १६ वर्षाखालील असेल, किंवा स्त्री असेल किंवा आजारी किंवा अपंग व्यक्ती असेल अशा बाबतीत विशेष न्यायालयाला जामीन मंजूर करण्याचा स्वेच्छाधिकार आहे. आरोपी वरील वर्गातील असल्याखेरीज आणि जामीन देण्यास अभियोग

पक्षाने विरोध केला असता आरोपी व्यक्ती संबंधित आरोपाखाली दोषी आहे असे प्रारंभिक टप्प्यावर गृहीत धरावे लागते. पुढे कार्यवाही सुरू असताना त्याला आपले वेगळे मत बनवण्याचा अधिकार आहे. असे असूनही विशेष न्यायालय, लेखी नोंदलेल्या कारणास्तव, त्याला जामीन मंजूर करणे उचित वाटत असल्यास प्रारंभिक टप्प्यावरही जामीन मंजूर करू शकते. आरोपीला जामिनावर सोडले असता आरोपपत्र दाखल करण्यात येईपर्यंत आणि न्यायालयाने आदेशिका जारी करीपर्यंत तो जामिनीवर असला तरीही न्यायालयापुढे उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. आरोपी व्यक्तीने दर १४ दिवसांनी दंडाधिकाऱ्याच्या (किंवा विशेष न्यायाधीशापुढे उपस्थित राहण्याची कायद्यानुसार गरज नाही **(फ्रि लिगल एड कमिटी वि. राज्य, ऑ. इं. रि. १९८२ स. न्या. १४६३:१९८२ क्रिमि. लॉ जर्नल १९४३ : (१९८३) ३ एससीसी ३७८).**

**१२–B. दिवाणी न्यायालयांनी व्यादेश देणे इत्यादी :–**

या अधिनियमान्वये किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशान्वये केंद्र सरकारने किंवा कोणत्याही राज्य शासनाने किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने केलेल्या किंवा तसे म्हणून केलेल्या कोणत्याही कृतीविरुद्ध व्यादेश किंवा अन्य कोणताही अनुतोष मिळवण्यासाठी करण्यात आलेल्या अर्जाची नोटीस अशा सरकारास किंवा शासनास किंवा अशा अधिकाऱ्यास देण्यात आल्याशिवाय व येईतोपर्यंत कोणतेही दिवाणी न्यायालय अशा कृतीच्या संबंधात अशा सरकारविरुद्ध किंवा शासनाविरुद्ध किंवा अशा अधिकाऱ्याविरुद्ध व्यादेश देणार नाही किंवा अन्य कोणताही अनुतोष मंजूर करण्याविषयी आदेश काढणार नाही.

**कलम १२–B चे विवेचन**

व्यादेश किंवा मनाई हुकूम (Injunctions) हे दिवाणी न्यायालयाद्वारे दिवाणी प्रक्रिया संहितेखालील आदेश ३९, नियम १ व २ अन्वये काढण्यात येतात. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ८०, पोट–कलम (२) अन्वये राज्य किंवा केंद्र शासनाने किंवा सरकारी अधिकाऱ्याकडून अशा अधिकाऱ्याने न्यायालयाची परवानगी न घेता त्याच्या पदीय नात्याने कोणतीही कृती केल्याने अभिप्रेत असेल अशा कृतीच्या संबंधात तातडीने व तात्काळ सुटका मिळण्यासाठी वाद दाखल करता येतो. परंतु या कलमान्वये दिवाणी न्यायालय असा अंतरिम किंवा अन्य प्रकारचा आदेश काढणार नाही, अशी तरतूद केली आहे.

**१३. आदेशांबाबत गृहीतक :–**

जर एखादा आदेश एखाद्या प्राधिकाऱ्याने या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्याला प्रदान करण्यात आलेला कोणताही अधिकार वापरून काढलेला व स्वाक्षरित केलेला दिसत असेल तर, न्यायालय 'भारतीय पुरावा अधिनियम १८७२' यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे असा आदेश त्या प्राधिकाऱ्याने याप्रमाणे काढला होता असे गृहीत धरील.

**१४. विवक्षित प्रकरणात शाबितीचा भार :–**

कलम ३ खाली काढलेला जो कोणताही आदेश कायदेशीर प्राधिकाराशिवाय अथवा परवाना, लायसन किंवा अन्य दस्तऐवज याशिवाय एखादी कृती करण्यास किंवा एखादी वस्तू जवळ बाळगण्यास मना करतो त्याचे उल्लंघन केल्याबद्दल एखाद्या व्यक्तीवर अभियोग लावण्यात आला असेल तर, तिच्याकडे असा प्राधिकार परवाना, लायसन किंवा अन्य दस्तऐवज आहे हे शाबित करण्याचा भार तिच्यावर असेल.

**कलम १४ चे विवेचन**

या कलमाद्वारे शाबितीचा भार अपराधी व्यक्तीवर टाकलेला आहे. अशी शाबिती केवळ साक्षीदारांची तपासणी करून किंवा उलटतपासणीमध्ये अभियोग पक्षाच्या साक्षीदाराकडून अनुकूल उत्तरे प्राप्त केल्यानंतरच करता येईल. श्रीनिवास पन्नालाल या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निवाडा दिला की, परवाना सादर करण्याचा भार आरोपी व्यक्तीवर होता आणि 'चुनी भद्रा' निर्यात करण्यासाठी त्याला प्राधिकृत केलेला निर्यात परवाना त्याने सादर केल्यानंतर व तो निर्यात करीत असलेला माल 'चुनी भद्रा'

या वर्णनाचा असल्याचे त्याने दाखवून दिल्यानंतर निर्यात करण्यात येत असलेला माल चुनीभद्रा नव्हता हे शाबीत करण्याचा भार अभियोग पक्षावर आला **(श्रीनिवास वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५४ स. न्या. २३)**

शाबितीचा भार या शब्दप्रयोगाचे दोन अर्थ आहेत. १. कायद्याचा भार म्हणजे गुन्हा सिद्ध करण्याचा भार आणि २. पुराव्याचा भार, फौजदारी खटल्यातले अपराध्याविरुद्ध आवश्यक ते सर्व सिद्ध करण्याचा भार अभियोग पक्षावर असतो. गुन्हा शाबीत करण्याचा भार अभियोग पक्षावर असला तरी विवक्षित प्रकरणामध्ये हा भार आरोपीवरही येतो. आरोपीने अभियोग पक्षावर त्याच्यावर लादलेले सर्व आरोप खोडून काढल्याशिवाय त्याच्याविरुद्ध आरोप नाशाबीत होणार नाही. आरोपीच्या ताब्यातील सिमेंट हे लेव्ही सिमेंट असल्याचे आढळून आल्यास हे सिमेंट खुल्या बाजारात खरेदी केले होते हे सिद्ध करण्याचा भार बचाव पक्षावर असेल. **(पद्मनाभ वि. राज्य, क्रिमि. लॉ जर्नल एनओसी ८३ (ओरिसा).**

**१५. अधिनियमाखाली केलेल्या कारवाईला संरक्षण :–**

(१) कलम ३ खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाला अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) कलम ३ खाली काढलेल्या आदेशाला अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होणे संभवनीय असलेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**कलम १५ चे विवेचन**

या अधिनियमाखाली सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीबद्दल व्यक्तीला संरक्षण देण्याची या कलमामध्ये तरतूद केलेली आहे. या कलमाच्या पोट–कलम (१) मध्ये कलम ३ खालील आदेशास अनुलक्षून सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याची अपेक्षा असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणताही दावा, अभियोग लावता येणार नाही किंवा वैध कार्यवाही करता येणार नाही अशी तरतूद केली आहे. तर पोट–कलम (२) मध्ये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेले कोणत्याही कृतीमुळे एखाद्या व्यक्तीचे नुकसान झाले असेल किंवा होण्याचा संभव असेल तर त्याबद्दल शासनाविरुद्ध दावा लावता येणार नाही किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही, अशी तरतूद केली आहे.

या अधिनियमामध्ये 'सद्भावना' या शब्दाची व्याख्या करण्यात आलेली नाही. भारतीय दंड संहितेच्या कलम ५२ मध्ये ''जी कोणतीही गोष्ट योग्य काळजी घेतल्याखेरीज किंवा तिकडे लक्ष पुरवल्याखेरीज पार पाडण्यात आली आहे ती 'सद्भावनेने' केली आहे असे म्हणता येणार नाही.''

सर्वसाधारण परिभाषा अधिनियमाच्या कलम ३ (२२) मध्ये, ''एखादी गोष्ट प्रामाणिकपणे पार पाडण्यात आली की निष्काळजीपणे यावर ती सद्भावनेने केली किंवा नाही हे अवलंबून असेल'' फौजदारी कायद्यामध्ये अभिप्रेत असलेली 'सद्भावना'' ही दिवाणी कायद्यामध्ये अभिप्रेत असलेल्या ''सदभावनेहून'' वेगळी आहे. फौजदारी कायद्यामध्ये, योग्य काळजी न घेता केलेली कोणतीही गोष्ट सद्भावनेने केली असल्याचे मानले जात नाही. सर्वोच्च न्यायालयाने, **हरभजनसिंग वि. पंजाब राज्य, ऑ. इं. रि. १९६६ स. न्या. ९७, १९६६ क्रिमि. लॉ जर्नल ८२)** या प्रकरणामध्ये प्रत्येक प्रकरणामधील तथ्ये व परिस्थिती याच्या संदर्भात सदभावनेचा अर्थ लावता येईल असा निर्वाळा दिला आहे. एखादी व्यक्ती सद्भावनापूर्वक वागली किंवा नाही हा प्रश्न उपस्थित होईल अशावेळी, त्या व्यक्तींचा कृतीमागील उद्देश चांगला होता, एवढेच सांगून चालणार नाही तर एखादे काम पार पाडण्यासाठी जी काळजी घेणे आवश्यक आहे ती काळजी घेऊन व कौशल्याचा वापर करून पार पाडण्यात आलेले आहे किंवा नाही हे पाहावे लागेल **(रायादीन वि. आर., ऑ. इं. रि. १९३४ औंध १२४ : ३५ क्रिमि. लॉ जर्नल ८०४).**

**१५–A . लोकसेवकांविरुद्ध खटला भरणे :–**

एखादी व्यक्ती लोकसेवक असून कलम ३ खाली काढलेल्या आदेशाला अनुरोधाने आपले कर्तव्यपालन करण्यासाठी कार्य करीत असताना किंवा तसे म्हणून कार्य करीत असताना तिने एखादा अपराध केला असल्याचे अभिकथन करून तिच्यावर आरोप करण्यात आला असेल तेव्हा,–

(a) अशी जी व्यक्ती संघराज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला असेल, किंवा यथास्थिति, अभिकथित अपराध घडला त्यावेळी तेथे नोकरीला होती तिच्या बाबतीत, केंद्र शासनाच्या;

(b) अशी जी व्यक्ती राज्याच्या कारभारासंबंधात नोकरीला असेल, किंवा प्रकरणपरत्वे, अभिकथित अपराध घडला त्यावेळी तेथे नोकरीला होती तिच्या बाबतीत, राज्य शासनाच्या, पूर्व मंजुरीखेरीज कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.

**कलम १५–क चे विवेचन**

कलम १५–A द्वारे या अधिनियमाखाली काम करणाऱ्या लोकसेवकांत असद्‌भावनेने केलेल्या तक्रारींपासून संरक्षण देण्याची तरतूद केली आहे. तसेच राज्य किंवा यथास्थिती, केंद्र शासनाने मंजुरी दिल्याखेरीज कोणत्याही लोकसेवकांविरुद्धच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही अशीही तरतूद केली आहे. राज्य प्रशासन अधिक कार्यक्षमतेने चालावे यासाठी तसेच उचित न्यायदानासाठी अशी तरतूद करणे आवश्यक आहे.

या कलमामध्ये 'मंजुरी' हा शब्द वापरला आहे. ज्या प्रकरणामध्ये मंजुरी आवश्यक असते तेव्हा ही मंजुरी औपचारिक असत नाही. मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याला अशी मंजुरी देण्यापूर्वी सर्व तथ्यांचा विचार करावा लागतो. अशी सर्व तथ्ये त्यांच्यापुढे ठेवल्याशिवाय मंजुरी द्यावयाची किंवा नाही हा निर्णय त्याला घेता येत नाही. अभियोग लावण्यासाठी मंजुरी देणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे आणि या बाबतीत मंजुरी देणे किंवा ती न देणे याविषयी शासनाला संपूर्णपणे स्वेच्छाधिकार आहे. **(गोकुळचंद वि. आर., ऑ. इं. रि. १९४८ पीसी ८२).** या गोकुळचंद प्रकरणातील निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले.

आवश्यक असलेली मंजुरी प्राप्त करण्यात आलेली आहे हे सिद्ध करण्याचा भार अभियोग पक्षावर असतो. या भारात, प्रस्तावित अभियोग ज्यावर आधारित असेल अशा तथ्यांचा विचार करूनच मंजुरी प्राधिकरणानी मंजुरी दिलेली आहे. याविषयीच्या पुराव्याचा अंतर्भाव असेल, ही तथ्ये एकतर मंजुरी आदेशावर नोंदलेली असतील किंवा ती पुराव्याद्वारे सिद्ध करण्यात येतील **(मदन वि. राज्य, ऑ. इं. रि. १९५४ स. न्या. ६३७; १९५४ क्रिमि. लॉ जर्नल १६५६).**

**१६. निरसन व व्यावृत्ती :–**

(१) खालील कायदे याद्वारे निरसित करण्यात आले आहेत :–

(a) 'अत्यावश्यक वस्तू अध्यादेश, १९५५';

(b) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात अमलात असलेला अन्य कोणताही कायदा जेथवर एखाद्या अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण आणि तद्विषयक व्यापार व वाणिज्य यांचे नियंत्रण करतो अथवा त्याच्या नियंत्रणास प्राधिकृती देतो तेथवर असा कायदा.

(२) असे निरसन झाले असले तरीही, याद्वारे निरसित करण्यात आलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही प्राधिकरणाने काढलेला किंवा काढला असल्याचे मानण्यात येणारा कोणताही आदेश, या अधिनियमाखाली तसा आदेश काढता येईल तेथवर, या अधिनियमाखाली काढण्यात आला असल्याचे मानले जाईल आणि त्याचा अंमल चालू राहील आणि तदनुसार, अशा कोणत्याही आदेशाखाली करण्यात आलेली नियुक्ती, मंजूर करण्यात

आलेले लायसेन्स किंवा परवाना अथवा देण्यात आलेला निदेश या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असेल तर, या अधिनियमाखाली करण्यात आलेली नियुक्ती, मंजूर करण्यात आलेले लायसेन्स किंवा परवाना किंवा काढण्यात आलेला निदेश यांच्यामुळे ते निष्प्रभावी झाले नाही तर व तोपर्यंत अमलात राहतील.

(३) पोट–कलम (२) च्या उपबंधामुळे 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' याच्या कलम ६ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधाना बाध येणार नाही व ते पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला अध्यादेश किंवा इतर कायदा म्हणजे जणू काही एखादी अधिनियमिती असावी त्याप्रमाणे अशा अध्यादेशाच्या किंवा इतर कायद्याच्या निरसनासही लागू होतील.

## कलम १६ चे विवेचन

या कलमातील पोट–कलम (१) हा निरसन खंड असून पोट–कलम (२) व्यावृत्ती खंड आहे. अत्यावश्यक वस्तू अध्यादेश, १९५५ वगळता निरसित करावयाचे इतर अधिनियम स्पष्टपणे दिले नाहीत; फक्त ते कोणत्या वर्गातील असतील ही बाबच नमूद केली आहे.

सध्याचे अधिकार व दायित्वे, यांमध्ये नवीन अधिनियमामुळे तडकाफडकी बदल होण्यास प्रतिबंध करण्यासाठी व्यावृत्तीची तरतूद करण्यात येते. **(जोखुराम वि. रामदीन, ८ अला, ४१९).**

-------

# २९. शासकीय गुपिते अधिनियम, १९२३

**(१९२३ चा अधिनियम क्रमांक १(९)[1]**

**(१५ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान)**

**(२ एप्रिल १९२३)**

**शासकीय गुपितांशी संबंधित असलेला [2]* * * कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम**

[3]* * *

**ज्याअर्थी** [2]*** शासकीय गुपितांशी संबंधित असलेला कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे :

**त्याअर्थी,** याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे–

[4][**१. संक्षिप्त नाव व विस्तार व प्रयुक्ती :–**

(१) या अधिनियमास शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे व तो भारताबाहेर असलेले शासनाचे सेवक व भारतीय नागरिक यांनाही लागू आहे.]

**२. व्याख्या :–**

विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमामध्ये–

(१) शासनाच्या मालकीच्या जागेच्या कोणत्याही विभागाच्या ताब्यात असलेल्या जागेचा अंतर्भाव आहे– मग अशी जागा शसनाकडे प्रत्यक्षात निहित झालेली असो वा नसो;

[5]* * *

(२) संसूचित करणे किंवा ग्रहण करणे या क्रियांचा निर्देश करणाऱ्या शब्दप्रयोगांत, कोणतीही गोष्ट संसूचित करणाऱ्या किंवा ग्रहण करण्याच्या क्रियेचा समावेश आहे– मग अशी गोष्ट संपूर्णत: संसूचित किंवा ग्रहण केलेली असो किंवा अंशत: संसूचित किंवा ग्रहण केलेली असो, आणि प्रत्यक्ष रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती संसूचित किंवा ग्रहण केलेले असो अथवा त्यांचा केवळ आशय, तात्पर्य किंवा वर्णन संसूचित किंवा ग्रहण केलेले असो; कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज मिळविणे किंवा ठेवून घेणे याचा निर्देश करणाऱ्या शब्दप्रयोगांत, कोणतेही संपूर्ण रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज, अथवा त्यांचा कोणताही भाग यांची नक्कल करणे किंवा नक्कल करवणे याचा समावेश आहे; आणि कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज संसूचित करण्याचा

---

१. हा अधिनियम पुढील ठिकाणी विस्तारित करण्यात आला आहे :– १९६२ चा अधिनियम १२. कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांवर; १९६३ चा विनिमय ६. कलम २ आणि अनुसूची १ यांद्वारे दादरा व नगर हवेलीवर; १९६३ च विनियम ७. कलम ३ व अनुसूची १ यांद्वारे पाँडिचेरीवर : आणि १९६५ चा विनियम ८. कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदीवी बेटांवर.

२. अनुकूलन आदेश, १९५०. द्वारे ''प्रांतामधील'' हे शब्द गाळले.

३. वरील आदेशाद्वारे प्रास्ताविकेचे पहिले दोन परिच्छेद गाळले.

४. १९६७ चा अधिनियम २४. कलम २ द्वारे अगोदरच्या कलमाऐवजी घातले.

५. अनुकूलन आदेश. १९३७ द्वारे घातलेला खंड(१क) अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे निरसित केला.

निदेश करणाऱ्या शब्दप्रयोगात, असे रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज हस्तांतरित किंवा रवाना करणे याचा समावेश आहे;

(३) ''दस्तऐवज'' यात, दस्तऐवजाच्या भागाचा समावेश आहे;

(४) ''नमुनाकृती'' यात, संकल्पचित्र, आकृतिबंध व नमुना यांचा समावेश आहे;

(५) ''युद्धसामग्री'' यात, युद्धामध्ये उपयोग करण्यासाठी योजलेले किंवा युद्धामध्ये उपयोग करण्यासाठी अनुकूल करून घेतलेले कोणतेही संपूर्ण जहाज, पाणबुडी, विमान, रणगाडा किंवा तत्सम इंजिन, शस्त्रे व दारूगोळा, पाणतीर किंवा सुरूंग किंवा त्याचा कोणताही भाग, आणि अशा कामासाठी उपयोगी पडावी या उद्देशाने प्रत्यक्षात तयार केलेली किंवा सुचवलेली इतर कोणतीही वस्तू, सामग्री किंवा साधन यांचा समावेश आहे;

(६) ''शासनाच्या अखत्यारीखालील पद'' यामध्ये, शासनाच्या [१] * * * कोणत्याही विभागातील किंवा त्याच्या अखत्यारीखालील कोणतेही पद किंवा नोकरी याचा समावेश आहे;

(७) ''छायाचित्र'' यामध्ये न धुतलेली फिल्म किंवा प्लेट याचा समावेश आहे;

(८) ''प्रतिषिद्ध जागा'' याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :–

(a) शासनाच्या मालकीचे किंवा शासनाच्या ताब्यात असलेले अथवा शासनाच्यातर्फे ताब्यात असलेले कोणतेही संरक्षण बांधकाम, दारूगोळा कारखाना, नौसैनिकी, सैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी आस्थापना किंवा ठाणे, सुरूंग, सुरंगक्षेत्र, छावणी, जहाज किंवा विमान, याप्रमाणे शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही लष्करी तारायंत्र किंवा दूरध्वनीयंत्रणा, याप्रमाणे शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही बिनतारी केंद्र किंवा संकेतन केंद्र किंवा कार्यालय आणि याप्रमाणे शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या ताब्यात असलेला असा आणि कोणतीही युद्धसामग्री किंवा तिच्याशी संबंधित असलेली कोणतीही रेखाटने, आराखडे, नमुनाकृती किंवा दस्तऐवज (प्रकरणपरत्वे), बांधण्याच्या, दुरुस्त करण्याच्या, तयार करण्याच्या किंवा साठविण्याच्या प्रयोजनासाठी किंवा युद्धाच्या वेळी वापरण्यासाठी कोणतेही धातू, तेल किंवा खनिजद्रव्ये मिळविण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारा कोणताही कारखाना, गोदीक्षेत्र, किंवा इतर जागा;

(b) शासनाशी किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीशी, किंवा अन्यथा शासनाच्या वतीने केलेल्या करारान्वये या जागेत कोणतेही युद्धसामग्री किंवा तिच्याशी संबंधित असलेली कोणतीही रेखाटने, नमुनाकृती, आराखडे किंवा दस्तऐवज तयार करण्यात येतात, त्यात दुरुस्ती करण्यात येते, ते मिळवण्यात येतात किंवा साठवण्यात येतात अशी शासनाच्या मालकीची नसलेली कोणतीही जागा;

(c) जी जागा, तिच्या संबंधातील माहिती किंवा त्या जागेला होणारी हानी शत्रूला उपयुक्त ठरेल या कारणावरून केंद्र शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी प्रतिषिद्ध जागा म्हणून त्या त्या वेळी घोषित केली असेल व जेथे तिच्या संबंधातील अधिसूचनेची इंग्रजीमधील व तेथील स्थानिक भाषेतील एक प्रत लावण्यात आलेली असेल अशी शासनाच्या मालकीची किंवा शासनाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी कोणतीही जागा;

(d) जी कोणतीही रेल्वे, सडक, मार्ग किंवा जलमार्ग अगर जमिनीवरील किंवा पाण्यावरील दळणवळण इतर साधन (त्याचा

---

१. १९६७ चा अधिनियम २४, कलम ३ द्वारे ''किंवा युनायटेड किंग्डमच्या शासनाच्या किंवा विविध कब्जातील कोणत्याही प्रदेशांच्या शासनाच्या'' हा मजकूर गाळला.

भाग असलेली किंवा त्याच्याशी निगडित असलेली कोणतीही बांधकामे किंवा संरचना यासुद्धा), अथवा गॅस, पाणी किंवा वीज यासंबंधीची बांधकामे किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी असलेली इतर बांधकामे यासाठी वापरण्यात येणारी जी कोणतीही जागा, अथवा शासनाच्या वतीने नव्हे तर अन्यथा जेथे कोणतीही युद्धसामग्री किंवा तिच्याशी संबंधित अशी कोणतीही रेखाटने, नमुनाकृती, आराखडे किंवा दस्तऐवज तयार करण्यात, दुरुस्त करण्यात किंवा साठवण्यात येत आहेत अशी जी कोणतीही जागा, तिच्या संबंधातील माहिती, किंवा तिचा विनाश अथवा तिला अडथळा किंवा तिच्यामध्ये केलेला हस्तक्षेप शत्रूला उपयुक्त ठरेल या कारणावरून केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे** या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्रतिषिद्ध जागा म्हणून त्या–त्या वेळी घोषित केले असेल व जेथे तिच्या संबंधातील त्या अधिसूचनेची इंग्रजीमधील व तेथील स्थानिक भाषेतील प्रत लावण्यात आलेली असेल ती रेल्वे, सडक, मार्ग किंवा जलमार्ग किंवा ते दळणवळणाचे साधन किंवा ती जागा;

(९) ''रेखाटन'' यामध्ये, कोणतेही छायाचित्र अथवा एखाद्या जागेचे किंवा वस्तूंचे प्रतिरूपण करण्याची अन्य पद्धती यांचा समावेश आहे; आणि

[१]* * *

(१०) ''पोलीस अधीक्षक'' यामध्ये तत्सम किंवा त्याहून वरिष्ठ दर्जाचा कोणताही पोलीस अधिकारी, आणि केंद्र शासनाने [२]* * * या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पोलीस अधीक्षकाच्या शक्ती ज्या व्यक्तीला प्रदान केल्या आहेत अशी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश आहे.

**३. हेरगिरीबद्दल शिक्षा :–**

(१) जेव्हा कोणतीही व्यक्ती देशाची सुरक्षितता किंवा हित यास बाधक ठरणाऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी,–

(a) कोणत्याही प्रतिषिद्ध जागेजवळ जाईल, तिची पाहणी करील, तिच्या जवळून जाईल किंवा तिच्या आसपास फिरकेल किंवा त्या जागेत प्रवेश करील तेव्हा; किंवा

(b) शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयोगी पडण्याजोगे किंवा पडू शकेल असे किंवा पडावे म्हणून योजिलेले असे कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती किंवा टिप्पणी तयार करील तेव्हा; किंवा

(c) कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द अथवा शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयोगी पडण्याजोगे किंवा पडू शकेल असे किंवा पडावे म्हणून योजलेले असे [३][किंवा जी बाब उघड केल्यामुळे भारताची सार्वभौमता व एकात्मता, देशाची सुरक्षितता व विदेशी राज्यांशी असलेले मित्रत्वाचे संबंध यांच्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे अशा बाबींशी जे संबंधित आहे असे] कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू किंवा टिप्पणी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला संसूचित करील तेव्हा,

ती व्यक्ती, तिचा अपराध हा, कोणतेही संरक्षण बांधकाम, दारूगोळा कारखाना, नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी आस्थापना किंवा सुरूंग, सुरूंगक्षेत्र, कारखाना, गोदीक्षेत्र, छावणी, जहाज किंवा विमान याच्या संबंधातील किंवा अन्यथा शासनाच्या नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी कारभाराच्या संबंधातील किंवा कोणत्याही गुप्त शासकीय संकेतलिपीच्या संबंधातील अपराध असेल त्या बाबतीत, चौदा वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या व इतर प्रकरणात तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र होईल.

---

१. अनुकूलन आदेश. १९५० द्वारे घातलेला खंड (९क) १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे निरसित केला.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे ''किंवा कोणत्याही स्थानिक शासनाने'' हा मजकूर गाळला.

३. १९६७ चा अधिनियम २४. कलम ४ द्वारे घातले.

(२) या कलमाखाली [१]* * * शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल खटला भरण्यात आला असता, आरोपी व्यक्ती ही, देशाच्या सुरक्षिततेस किंवा हातास जो बाधक ठरेल असा हेतू दिसून येण्यासारखे कोणतेही विशिष्ट कृत्य केल्याबद्दल दोषी होती हे दाखवण्याची आवश्यकता असणार नाही, आणि, असे कोणतेही कृत्य तिच्याविरुद्ध सिद्ध झाले नाही तरीसुद्धा, जर प्रकरणाच्या परिस्थितीवरून किंवा तिच्या वर्तनावरून किंवा सिद्ध झालेल्या तिच्या ज्ञात चारित्र्यावरून तिचा हेतू हा देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक होता असे दिसून येत असेल तर, ती व्यक्ती दोषी ठरवली जाऊ शकेल; आणि जर कोणत्याही प्रतिषिद्ध जागेसंबंधीचे किंवा अशा जागेमध्ये वापरण्यात येणारे किंवा अशा जागेमधील कोणत्याही गोष्टींसंबंधीचे कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती किंवा कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द हा कायदेशीर प्राधिकारान्वये कार्य करणाऱ्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीने तयार केला असेल, मिळवला असेल, गोळा केला असेल, नमूद केला असेल, प्रसिद्ध केला असेल किंवा संसूचित केला असेल, आणि तिचा हेतू देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक होता हे प्रकरणाच्या परिस्थितीवरून किंवा तिच्या वर्तनावरून किंवा सिद्ध झालेल्या तिच्या ज्ञात चारित्र्यावरून दिसून येत असेल तर, असे रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज, [२][माहिती, संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द हे] देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक अशा प्रयोजनासाठी तयार करण्यात, मिळवण्यात, गोळा करण्यात, नमूद करण्यात, प्रसिद्ध करण्यात किंवा संसूचित करण्यात आलेले असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

**४. परकीय हस्तकांबरोबर केलेले संपर्क व्यवहार हा विवक्षित अपराध केल्याचा पुरावा असणे :–**

(१) कलम ३ खालील अपराधाबद्दल एखादा व्यक्तीविरुद्ध केल्या जाणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीत त्या व्यक्तीचा परकीय हस्तकाशी–मग तो [३][भारतात असो किंवा भारताबाहेर] असो–संपर्कव्यवहार चालू आहे किंवा तिने संपर्कव्यवहार चालू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे ही गोष्ट देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक अशा प्रयोजनासाठी त्या व्यक्तीने शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयोगी पडण्याजोगी किंवा पडू शकेल अशी किंवा पडावी म्हणून योजलेली माहिती मिळविलेली आहे किंवा मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे हे सिद्ध करण्याच्या दृष्टीने संबद्ध ठरेल.

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी, परंतु पूर्वगामी उपबंधाच्या व्यापकतेला बाधा न येता,–

(a) (i) जर एखादी व्यक्ती [४][भारताच्या] आत किंवा बाहेर एखाद्या परकीय हस्तकाच्या पत्त्यावर त्याला भेटली असेल किंवा तिने परकीय हस्तकाबरोबर सहचर्य किंवा सहयोग केला असेल तर, किंवा

(ii) [४][भारताच्या] आत किंवा बाहेर, एखाद्या परकीय हस्तकाचे नाव किंवा पत्ता किंवा त्याच्याबद्दलची इतर कोणतीही माहिती त्या व्यक्तीकडे मिळाली असेल किंवा तिने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून मिळवली असेल तर,

अशा व्यक्तीने एखाद्या परकीय हस्तकाशी संपर्कव्यवहार चालू ठेवला असल्याचे गृहीत धरता येईल;

(b) ''परकीय हस्तक'' या शब्दप्रयोगात, जी कोणतीही व्यक्ती देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक असे कृत्य [४][भारताच्या] आत किंवा बाहेर करण्याच्या प्रयोजनासाठी एखाद्या परकीय सत्तेने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे नियुक्त केलेली असेल किंवा नियुक्त केलेली होती किंवा ती अशा प्रकारे नियुक्त केलेली आहे किंवा होती असा संशय घेण्यास रास्त कारणे आहेत असे दिसते अथवा जिने परकीय सत्तेच्या हितासाठी [४][भारताच्या] आत किंवा बाहेर असे कृत्य केलेले असावे किंवा ते करण्याचा प्रयत्न केलेला असावा असा जिच्या संबंधात रास्त संशय असेल अशी कोणतीही व्यक्ती समाविष्ट आहे;

---

१. १९६७ चा अधिनियम २४. कलम ४ द्वारे, ''चौदा वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या'' हा मजकूर गाळला.

२. १९६७ चा अधिनियम २४. कलम ४ द्वारे ''किंवा माहिती'' याऐवजी घातले.

३. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची याद्वारे ''देश'' या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. कित्ता– कलम ३ व अनुसूचीद्वारे ''देश'' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

(c) [1][भारताच्या] आतील किंवा बाहेरील जे ठिकाण परकीय हस्तकासाठी अभिप्रेत असलेले संदेश ग्रहण करण्यासाठी वापरले जात असावे असा संशय घेण्यास रास्त कारणे असल्याचे दिसून येते, त्या ठिकाणचा असा कोणताही पत्ता, अथवा जेथे परकीय हस्तक राहतो किंवा संदेश देण्यासाठी किंवा ग्रहण करण्यासाठी त्याचा जेथे राबता असतो, किंवा जेथे तो कोणताही कामधंदा करतो असा कोणताही पत्ता हा परकीय हस्तकाचा पत्ता असल्याचे व अशा पत्त्यावर केलेला संपर्क–व्यवहार हा परकीय हस्तकाशी केलेला संपर्कव्यवहार असल्याचे गृहीत धरता येईल.

**५. गैरपणे माहिती कळवणे इत्यादी :–**

(१) एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द अथवा कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती असेल आणि ती प्रतिषिद्ध जागेशी संबंधित असेल किंवा अशा जागेत वापरण्यात येत असेल किंवा अशा जागेतील कोणत्याही गोष्टीशी संबंधित असेल, [2][किंवा शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे साहाय्यभूत होण्याची शक्यता असेल किंवा जी बाब उघड केल्यामुळे भारताची, सार्वभौमता व एकात्मता; देशाची सुरक्षितता किंवा विदेशी राज्यांशी असलेले संबंध यांस बाध येण्याची शक्यता आहे अशा बाबींशी ती संबंधित असेल किंवा या अधिनियमाचे उल्लंघन करून ती तयार करण्यात किंवा मिळवण्यात आलेली असेल] किंवा शासनाच्या अखत्यारातील पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, त्या व्यक्तीकडे जी विश्वासाने सोपवली असेल किंवा शासनाच्या अखत्यारातील पद धारण करणारी किंवा जिने धारण केले होते अशी व्यक्ती म्हणून, किंवा शासनाच्या वतीने केलेले कंत्राट जिने घेतलेले आहे किंवा घेतलेले होते अशी व्यक्ती म्हणून, किंवा असे पद धारण करणाऱ्या किंवा धारण केलेले होते अशा किंवा असे कंत्राट घेणाऱ्या किंवा घेतलेले होते अशा व्यक्तीने नियुक्त केलेली आहे किंवा नियुक्त केलेली होती अशी व्यक्ती म्हणून तिने ती मिळवलेली असेल किंवा ती तिला मिळवता आली असती अशी स्थिती असून ती व्यक्ती जर–

(a) ती संकेतलिपी किंवा तो परवलीचा शब्द, ते रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती ज्या व्यक्तीला कळवण्यास अशा व्यक्तीला प्राधिकृत केले आहे त्या व्यक्तीखेरीज किंवा एखाद्या न्यायालयाखेरीज किंवा देशाच्या हिताच्या दृष्टीने ज्या व्यक्तीला ती कळवणे अशा व्यक्तीचे कर्तव्य आहे त्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला जाणूनबुजून कळवील तर; किंवा

(b) स्वत:च्या ताब्यात असलेल्या माहितीचा कोणत्याही परकीय सत्तेच्या फायद्यासाठी किंवा देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा इतर कोणत्याही पद्धतीने उपयोग करील तर; किंवा

(c) स्वत:च्या ताब्यातील किंवा नियंत्रणाखालील कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज, तो ठेवून घेण्याचा अधिकार नसतानाही किंवा तो ठेवून घेणे त्याच्या कर्तव्याच्या विरुद्ध असतानाही ठेवून घेईल किंवा तो परत करण्याचा किंवा त्याची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात कायदेशीर प्राधिकरणाने काढलेल्या सर्व निदेशांचे पालन करण्यास जाणूनबुजून चुकेल तर; किंवा

(d) ते रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज, गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द किंवा माहिती याची वाजवी काळजी घेण्यास चुकेल किंवा त्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अशा प्रकारे वागेल तर,

ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(२) जर कोणतीही व्यक्ती स्वच्छेने, कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द किंवा कोणतेही रेखाटन,

---

१. कित्ता– कलम ३ व अनुसूचीद्वारे ''देश'' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९६७ या अधिनियम २४. कलम ५ द्वारे ''किंवा या अधिनियमाचे उल्लंघन करून ती तयार करण्यात किंवा मिळवण्यात आलेली असेल'' या ऐवजी घातले.

आराखडा, वस्तू नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा माहिती स्वीकारतेवेळी या अधिनियमाचे उल्लंघन करून ती पोहचवण्यात आली आहे हे तिला माहीत असेल किंवा तसे मानण्यास वाजवी कारण असेल तर, ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(३) जर एखादी व्यक्ती तिच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले, युद्धसामग्रीच्या संबंधातील कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही परकीय सत्तेला किंवा देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक ठरेल अशा रीतीने पोहोचती करील तर, ती व्यक्ती या कलमाखालील अपराधांबद्दल दोषी ठरेल.

[१][(४) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.]

**६. गणवेशांचा अनधिकृत वापर, खोटे अहवाल तयार करणे, बनावट दस्तऐवज करणे, तोतयेगिरी व खोटे दस्तऐवज :–**

(१) कोणतीही व्यक्ती प्रतिषिद्ध जागेत प्रवेश मिळवण्यासाठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीस प्रवेश मिळवण्याच्या कामी साहाय्य करण्यासाठी किंवा देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी–,

(a) कायदेशीर प्राधिकाराशिवाय कोणताही नौसैनिक, सैनिकी, वायुसैनिकी, पोलिसी किंवा इतर शासकीय गणवेश अगर तशी फसगत होण्याइतपत त्या गणवेशासारखा दिसणारा कोणताही गणवेश वापरील किंवा घालील, अथवा असा कोणताही गणवेश वापरण्यास किंवा घालण्यास जी व्यक्ती हक्कदार आहे किंवा होती ती व्यक्ती आपण स्वत: असल्याचे खोटेच भासवील तर; किंवा

(b) मौखिकरीत्या अथवा कोणतेही अधिकथन किंवा अर्ज यामधील किंवा स्वत: सही केलेल्या किंवा स्वत:च्या वतीने सही करण्यात आलेले कोणत्याही दस्तऐवजामधील लेखी मजकुरात, जाणूनबुजून कोणतेही खोटे निवेदन करील किंवा त्यातून कोणताही मजकूर गाळील अथवा तसे केले जात असता त्याकडे बुद्धया दुर्लक्ष करील तर; किंवा

(c) कोणताही पासपोर्ट किंवा कोणताही नौसैनिकी, सैनिकी, वायुसैनिकी, पोलिसी किंवा शासकीय पास, परवाना, प्रमाणपत्र, लायसन किंवा तत्सम स्वरूपाचा इतर दस्तऐवज (या कलमात यापुढे ''शासकीय दस्तऐवज'' म्हणून निर्देशिलेला) बनावट तयार करील, त्यात फेरफार करील, किंवा गैरफेर करील तर, अथवा अशा रीतीने कोणताही बनावट तयार केलेला, फेरफार केलेला किंवा नियमबाह्य दस्तऐवज वापरील किंवा आपल्या ताब्यात ठेवील तर; किंवा

(d) आपण शासनाच्या अखत्यारीखालील पद धारण करणारी व्यक्ती किंवा असे पद धारण करणाऱ्या व्यक्तीकडे नोकरीस राहिलेली व्यक्ती आहोत असे म्हणून किंवा ज्या व्यक्तीला शासकीय दस्तऐवज किंवा गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द रीतसर पाठवण्यात किंवा संसूचित करण्यात आलेला आहे ती व्यक्ती आहोत किंवा ती व्यक्ती आपण नव्हे असे म्हणून तोतयेगिरी करील किंवा तसे खोटेच भासवील तर अथवा स्वत:साठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही शासकीय दस्तऐवज, गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द मिळवण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून कोणतेही खोटे निवेदन करील तर; किंवा

(e) शासनाच्या कोणत्याही खात्याचा अथवा शासनाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली नियुक्त केलेल्या कोणत्याही राजदौतिक, नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी प्राधिकरणाचा किंवा त्याच्या मालकीचा किंवा त्याने वापरलेला किंवा बनवलेला किंवा पुरवलेला कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा अथवा तशी फसगत होण्याइतपत असा कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा यांच्यासारखा दिसणारा कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा वापरील किंवा ठसा नकली तयार

---

१. १९६७ चा अधिनियम २४. कलम ५ द्वारे पूर्वीच्या पोट–कलम(४) ऐवजी घातले (१० जुलै १९६८ रोजी व तेव्हापासून)

करील अथवा असा कोणताही नकली साचा, शिक्का किंवा ठसा नकली तयार करील अथवा असा कोणताही नकली साचा, शिक्का किंवा ठसा जाणूनबुजून वापरील किंवा आपल्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली ठेवील तर;

ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

(२) जर कोणतीही व्यक्ती, देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा कोणत्याही प्रयोजनाखाली,–

(a) कोणताही शासकीय दस्तऐवज– मग तो पूर्ण केलेला असो किंवा नसो किंवा वापरासाठी दिलेला असो किंवा नसो– तो स्वत:कडे ठेवून घेण्याचा अधिकार नसताना किंवा तसा तो ठेवून घेणे त्याच्या कर्तव्याच्या विरुद्ध असताना स्वत:कडे ठेवून घेईल किंवा शासनाच्या कोणत्याही खात्याने किंवा अशा खात्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, असा दस्तऐवज परत करण्याबाबत किंवा त्याची विल्हेवाट लावण्याबाबत दिलेल्या कोणत्याही निदेशांचे पालन करण्यास जाणूनबुजून चुकेल तर; किंवा

(b) केवळ तिच्या स्वत:च्या वापरासाठी दिलेला कोणताही शासकीय दस्तऐवज अन्य कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात राहू देईल, किंवा अशी पाठवलेली कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द संसूचित करील अथवा स्वत: खेरीज अन्य व्यक्तींच्या वापरासाठी देण्यात आलेल्या कोणताही शासकीय दस्तऐवज किंवा गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द कोणत्याही कायदेशीर प्राधिकाराशिवाय किंवा सबबीशिवाय स्वत:चा कब्जात बाळगील अथवा कोणताही शासकीय दस्तऐवज सापडल्यामुळे किंवा अन्यथा तो ताब्यात घेतल्यावर, जिने किंवा जिच्या वापरासाठी तो पाठवला होता अशा व्यक्तीकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे किंवा पोलीस अधिकाऱ्यांकडे परत पाठविण्यात जाणूनबुजून चुकेल तर; किंवा

(c) पूर्वोक्त असा कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा कायदेशीर प्राधिकाराशिवाय किंवा सबबीशिवाय तयार करील किंवा त्याची विक्री करील तो विक्रीसाठी स्वत:च्या कब्जात बाळगील तर,

ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

३) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती [१][तीन वर्षे] पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडांस, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(४) कलम ३, पोटकलम (२) चे उपबंध हे जसे देशाची सुरक्षितता किंवा हित यांस बाधक ठरेल असे प्रयोजन सिद्ध करण्यासाठी, त्या कलमाखाली [२] * * * शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दलच्या खटल्यांना लागू होतात, तसे ते देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल असे प्रयोजन सिद्ध करण्यासाठी, शासनाच्या नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी कारभाराच्या संबंधातील किंवा कोणत्याही गुप्त शासकीय संकेतलिपीच्या संबंधातील या कलमाखालील अपराधाबद्दलच्या कोणत्याही खटल्यास लागू होतील.

**७. पोलीस अधिकाऱ्यांच्या किंवा संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील सक्तीच्या कामात हस्तक्षेप करणे :–**

(१) कोणत्याही प्रतिषिद्ध जागेच्या जवळपासच्या कोणत्याही व्यक्तीने प्रतिषिद्ध जागेच्या संबंधात रखवालीच्या, सशस्त्र पहाऱ्याच्या किंवा गस्त घालण्याच्या कामी किंवा अन्य तत्सम कामात गुंतलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा [३][संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील] कोणत्याही सदस्याला अटकाव करता कामा नये किंवा त्याची जाणूनबुजून दिशाभूल करता कामा नये किंवा अन्यप्रकारे त्याच्या कामात हस्तक्षेप करता कामा नये किंवा व्यत्यय आणता कामा नये.

---

१. १९६७ चा अधिनियम २४. कलम ६ द्वारे ''दोन वर्षे'' याऐवजी घातले.

२. १९६७ चा अधिनियम २४. कलम ६ द्वारे चौदा वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या'' हा मजकूर गाळला.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे ''हिज मॅजेस्टीच्या सेनेतील'' याऐवजी घातले.

(२) एखादी व्यक्ती या कलमाच्या उपबंधाचे उल्लंघन करून त्याविरुद्ध वागली तर, ती [१][तीन वर्षे] पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**८. अपराध घडल्याबद्दलची माहिती देण्याचे कर्तव्य :–**

(१) पोलीस अधीक्षकास, किंवा फौजदाराच्या दर्जाहीन कमी दर्जा नसलेल्या ज्या अन्य पोलीस अधिकाऱ्याला पोलीस महानिरीक्षकाने किंवा पोलीस आयुक्ताने याबाबतीत शक्ती प्रदान केली असेल त्यास अथवा [२][संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील] जो सदस्य रखवालीच्या, सशस्त्र पहाऱ्याच्या किंवा गस्त घालण्याच्या किंवा अन्य तत्सम कामात गुंतलेला असेल अशा कोणत्याही सदस्यास, त्याने मागणी केल्यावर, कलम ३ खाली किंवा कलम ९ सहित कलम ३ खाली घडलेल्या अपराधासंबंधी किंवा तसा जो अपराध घडल्याचा संशय असेल अशा अपराधासंबंधी स्वत:च्या शक्तीनुसार शक्य ती माहिती पुरविणे आणि तसे फर्माविण्यात आल्यास व योग्य तो खर्च देऊ करण्यात आल्यास, अशी माहिती पुरवण्याच्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी वेळी व ठिकाणी राहणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य असेल.

(२) जर एखादी व्यक्ती पूर्वोक्ताप्रमाणे अशी माहिती पुरवण्यास किंवा हजर राहण्यास चुकली तर ती [१][तीन वर्षे] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**९. प्रयत्न, चिथावणी, इत्यादी :–**

जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखालील अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तसा अपराध करण्यास अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, जणू काही तिने असा अपराध केलेला असल्याप्रमाणे त्याचरीतीने त्याच शिक्षेस पात्र ठरेल व तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल.

**१०. हेरांना आसरा दिल्याबद्दल शिक्षा :–**

(१) एखादी व्यक्ती कलम ३ खाली किंवा कलम ९ सहित कलम ३ खाली अपराध करण्याच्या बेतात आहे हे किंवा तिने असा अपराध केलेला आहे हे स्वत:ला माहीत असताना किंवा तसे समजण्यास वाजवी कारणे असताना अशा व्यक्तीला जाणूनबुजून जर अन्य कोणत्याही व्यक्तीने आसरा दिला अथवा कोणत्याही व्यक्तींना स्वत:च्या वापरातील किंवा स्वत:च्या नियंत्रणाखालील कोणत्याही वास्तूमध्ये भेटण्यास किंवा एकत्र जमण्यास जाणूनबुजून परवानगी दिली तर, ती अन्य व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल;

(२) ज्या–ज्या व्यक्तीने उपरोक्त अशा कोणत्याही व्यक्तीस आसरा दिलेला असेल, किंवा उपरोक्त अशा कोणत्याही व्यक्तींना, स्वत:च्या वापरातील किंवा स्वत:च्या नियंत्रणाखाली कोणत्याही वास्तूमध्ये भेटण्यास किंवा एकत्र जमण्यास परवानगी दिलेली असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, पोलीस अधीक्षकास किंवा फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या ज्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला पोलीस महानिरीक्षकाने किंवा पोलीस आयुक्ताने याबाबत शक्ती प्रदान केली असेल त्यास, त्याने मागणी केल्यावर अशा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संबंधी आपल्या शक्तीनुसार शक्य ती माहिती देणे हे त्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य असेल आणि अशी कोणतीही माहिती देण्यास कोणतीही व्यक्ती चुकल्यास, ती व्यक्ती चुकल्यास, ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

(३) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती [३][तीन वर्षेपर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

---

१. १९६७ चा अधिनियम २४. कलम ७ द्वारे ''दोन वर्षे'' या ऐवजी घातले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे ''हिज मॅजेस्टीच्या सेनेतील'' याऐवजी घातले.

३. १९६७ अधिनियम २४. कलम ९ द्वारे ''एक वर्षे'' या ऐवजी घातले.

**११. झडतीची वॉरंटे :–**

(१) जर शपथेवर देण्यात आलेल्या माहितीवरून इलाखा शहर दंडाधिकारी, प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी याची, या अधिनियमाखाली अपराध करण्यात आलेला आहे, किंवा अपराध घडण्याच्या बेतात आहे असा संशय घेण्यास वाजवी कारण आहे अशी खात्री पटली तर तो झडतीचे वॉरंट देऊन, अशा वॉरंटात पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला जो पोलीस अधिकारी नामनिर्दिष्ट केला असेल त्याला, कोणत्याही वेळी वॉरंटात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वास्तूमध्ये किंवा जागेमध्ये आवश्यक तर, बळजबरीने प्रवेश करण्यास, आणि त्या वास्तूची किंवा जागेची व तेथे आढळून आलेल्या प्रत्येक व्यक्तीची झडती घेण्यास, आणि या अधिनियमाखाली अपराध घडलेला आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे याचा पुरावा असलेले जे काही त्या वास्तूमध्ये किंवा त्या जागी किंवा त्या व्यक्तीकडे त्याला सापडेल व ज्याच्याविषयी किंवा ज्यांचा संबंधात या अधिनियमाखालील अपराध घडलेला आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे असा संशय घेण्यास त्याला वाजवी कारण असेल असे कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज किंवा तत्सम स्वरूपाची कोणतीही गोष्ट सक्तीने ताब्यात घेण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) पोलीस अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास जेव्हा, एखादे प्रकरण अत्यंत निकडीचे असून देशाच्या हिताच्या दृष्टीने तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे असे वाटेल तेव्हा, त्याबाबतीत तो दंडाधिकाऱ्याच्या या कलमाखालील वॉरंटाद्वारे जशा प्रकारचा प्राधिकार देता येतो तसाच प्राधिकार आपल्या सहीच्या लेखी आदेशाद्वारे कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास देऊ शकेल.

(३) पोट–कलम (२) खाली पोलीस अधिकाऱ्याने कारवाई केलेली असेल त्याबाबतीत, तो शक्य तितक्या लवकर, अशा कारवाईचा वृत्तांत इलाखा शहरमध्ये मुख्य इलाखा शहर दंडााधिकाऱ्यास व अशा शहराबाहेर जिल्हा किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यास कळवील.

[१]**[१२. १८९८ चा अधिनियम ५, कलम ३३७ चे उपकलमे ३, ५, ७ याखालील अपराधांना लागू असणे :–**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८–कलम ३३७ याचे उपबंध हे जसे सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाच्या संबंधात लागू होतात तसे ते कलम ३ खाली किंवा कलम ५ खाली किंवा कलम ७ खाली अथवा कलम ९ सहित उक्त कलम ३, ५ किंवा ७ यांपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या अपराधाच्या संबंधात लागू होतील.]

**१३. अपराध्यांच्या संपरीक्षेवर निर्बंध :–**

(१) [२][समुचित शासनाने], याबाबत खास करून शक्ती प्रदान केलेला प्रथम वर्ग दंडाधिकारी सोडून अन्य असे] जे कोणतेही न्यायालय जिल्हा किंवा इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असेल ते या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल दंडाधिकाऱ्यापुढे संपरीक्षाधीन असलेल्या कोणत्याही व्यक्तीने दोषारोपपत्र तयार केले जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, जर सत्र न्यायालयानेच आपली संपरीक्षा करावयास हवी असा दावा सांगितला तर, अशा बाबतीत दंडाधिकारी, त्याने आरोपीला विनादोषारोप सोडून दिले नसल्यास, ते प्रकरण त्या न्यायालयाकडे संपरीक्षेसाठी पाठवील– मग ते प्रकरण फक्त त्याच न्यायालयाने संपरीक्षा करण्याजोगे असे नसले तरी हरकत नाही.

---

१. १९६७ चा अधिनियम २४. कलम १० द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी घातले.

२. अनकूलन आदेश, १९३७ द्वारे ‘‘स्थानिक शासन’’ याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

(३) कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबाबत, [१][समुचित शासनाच्या] [२]* * * किंवा [१][समुचित शासनाने] किंवा याबाबत शक्ती प्रदान केलेल्या अधिकाऱ्याच्या आदेशावरून किंवा त्याने दिलेल्या प्राधिकारान्वये तक्रार करण्यात आलेली असल्याखेरीज त्या अपराधाची दखल घेणार नाही.

[३]* * * *

(४) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीची संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनासाठी, अपराध एकतर तो ज्या ठिकाणी प्रत्यक्षात झालेला होता त्या ठिकाणी किंवा ज्या ठिकाणी अपराधी सापडेल अशा [४][भारतामधील] कोणत्याही ठिकाणी घडलेला आहे असे मानता येईल;

[५][(५) या कलमात, ''समुचित शासन'' याचा अर्थ,–

(a) कलम ५ खालील जे अपराध प्रतिषिद्ध जागेशी किंवा परकीय सत्तेशी निगडित नाहीत अशा कोणत्याही अपराधाच्या संबंधात, राज्य शासन असा आहे; व

(b) इतर कोणत्याही अपराधांच्या संबंधात केंद्र शासन असा आहे.]

**१४. कामकाजाच्या वेळी लोकांना मज्जाव करणे :–**

या अधिनियमाखालील अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध न्यायालयासमोर कार्यवाही चालू असताना किंवा अपिलावर कार्यवाही चालू असताना, किंवा या अधिनियमाखाली एखाद्या व्यक्तीची संपरीक्षा चालू असताना जर, कार्यवाहीच्या ओघात द्यावयाच्या कोणत्याही साक्षीपुरावा किंवा त्यावेळी करावयाचे कोणतेही निवेदन याच्या प्रसिद्धीमुळे देशाच्या सुरक्षिततेला बाध येण्याचा संभव आहे, या कारणावरून न्यायालयात सुनावणी चालू असतेवेळी सर्व लोकांना किंवा त्यांपैकी एखाद्या वर्गाला मज्ज्ञाव करण्याचे आदेश देण्याच्या ज्या शक्ती न्यायालयास असतील त्यांच्या व्यतिरिक्त व त्यास बाध न येता, न्यायालयास तशा आशयाचा आदेश काढता येईल, परंतु कोणत्याही परिस्थितीत शिक्षादेश मात्र लोकांसमक्ष देण्यात येईल.

**[६][१५. कंपन्यांनी केलेले अपराध :–**

(१) या अधिनियमाखालील अपराध करणारी व्यक्ती जर एखादी कंपनी असेल तर, अपराध घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज–चालनाबद्दल कंपनीची हुकूमतदार असलेली व त्याबद्दल कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे खुद्द कंपनी ही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तद्नुसार त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास ते पात्र ठरतील :

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमामध्ये उपबंधित केलेल्या अशा कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट–कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने असा अपराध घडलेला

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे ''गव्हर्नर जनरल इन–कौन्सिलच्या'' याऐवजी घातले.
२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे ''स्थानिक शासनाच्या'' हे शब्द गाळले.
३. १९६७ चा अधिनियम २४. कलम १२ द्वारे परंतुक गाळले.
४. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची याद्वारे ''देश'' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातले.
६. १९६७ चा अधिनियम २४, कलम १२ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी घातले.

आहे किंवा त्याने केलेल्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, कंपनीचा असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल व तद्नुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

स्पष्टीकरण :– या कलमाच्या प्रयोजनासाठी, –

(a) ''कंपनी'' याचा अर्थ कोणताही निगम–निकाय असा आहे. यात पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश आहे; व

(b) ''संचालक'' याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीचा भागीदार असा आहे.]

**१६. निरसने.**

निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२) – कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

---------------------------

# ३०. लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१

विधानसभा व राज्यातील प्रत्येक राज्यातील प्रत्येक राज्यासाठी घेतली जाणारी राज्यसभा यासाठी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकींची पद्धत, निवडणुकीसाठी उभ्या राहणाऱ्या उमेदवारांची पात्रता व अपात्रता, निवडणुकीत होणारा भ्रष्ट मार्गांचा अवलंब आणि इतर अपराध जे निवडणुकीसंदर्भात असतील आणि कोणत्याही निवडणूक संदर्भान्वये निर्माण होणाऱ्या वादांवर निर्णय होणेकामी सदरचा कायदा अमलात आणलेला आहे.

ह्या कायद्यात एकूण १७० कलमे दिलेली आहेत. त्यातील कलम १२५ ते १३६ यामध्ये निवडणुकी संदर्भातील गुन्हे व शिक्षा सांगितल्या आहेत.

**कलम १२५ :**

मतदानाचे बाबतीत विविध वर्गात, धर्म, जाती, जमातीत वंशभेद, भाषिक प्रांत इत्यादीवरून शत्रुत्वाची, द्वेषाची भावना वाढविणे वगैरे बाबतीत शिक्षा ३ वर्षे कैद किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा.

प्रोसिजर – गुन्हा दखलपात्र.

**१२६. निवडणुकीच्या दिवशी आणि त्याच्या आदल्या दिवशी जाहीर सभांना मनाई :–**

(१) कोणत्याही मतदान क्षेत्रात कोणत्याही निवडणुकीसाठी मतदान संपण्याची जी वेळ निश्चित केली असेल त्या वेळेपूर्वी ४८ तासांच्या अवधीत त्या मतदान क्षेत्रात कोणाही व्यक्तीने कोणतीही जाहीर सभा बोलाविता, भरविता किंवा तीस हजर राहता कामा नये.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट–कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील ती व्यक्ती दोनशे पन्नास रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र राहील.

**कलम १२७. निवडणुकीच्या सभांतील दंगली :–**

(१) जी कोणतीही व्यक्ती हे कलम लागू असलेल्या एखाद्या जाहीर सभेत, जे कामकाज चालविण्याकरिता सदरहू सभा बोलाविण्यात आली होती ते कामकाज चालविण्यास प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने गैरशिस्त वागेल किंवा तसे वागण्यास इतरांस प्रवृत्त करील ती व्यक्ती दोनशे पन्नास रुपयापर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(२) कोणत्याही मतदारसंघात, अशा मतदारसंघातून एक किंवा अनेक सदस्य निवडण्यासाठी या अधिनियमाखाली काढलेल्या अधिसूचनेचा दिनांक आणि ज्या दिनांकास अशी निवडणूक घेण्यात आली असेल तो दिनांक यांच्या दरम्यान घेण्यात आलेल्या राजकीय स्वरूपाच्या कोणत्याही जाहीर सभेस हे कलम लागू आहे.

(३) जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास, पोट–कलम (१) खाली अपराध केल्याचा एखाद्या व्यक्तीविषयी वाजवी रीतीने संशय येईल तर तो, सभेच्या अध्यक्षाने विनंती केल्यास, त्या व्यक्तीस ताबडतोब आपले नाव व पत्ता सांगण्यास भाग पाडू शकेल आणि जर ती व्यक्ती अशा रीतीने आपले नाव व पत्ता सांगण्याचे नाकारील किंवा तसे करण्यास चुकेल, किंवा जर त्या पोलीस अधिकाऱ्यास, त्या व्यक्तीने खोटे नाव अथवा पत्ता दिल्याचा वाजवी रीतीने संशय येईल तर तो पोलीस अधिकारी तिला वॉरंटापासून अटक करू शकेल.

**कलम १२७–A. निवडणुकीच्या सभांतील दंगली :–**

निवडणुकीबाबतची पत्रके छापतांना त्या पत्रकावर प्रिंटरचे व प्रकाशकाचे नांव व पत्ता असणे जरुरी आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास ६ महिने कैद किंवा दोन हजार रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

**१२८. मतदानाची गुप्तता राखणे :–**

(१) निवडणुकीच्या वेळी मतनोंदणी अथवा मतमोजणी यासंबंधीचे कोणतेही कर्तव्य करीत असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याने, लिपिकाने, प्रतिनिधीने अथवा अन्य व्यक्तीने मतदानासंबंधी गुप्तता राखली पाहिजे व तशी गुप्तता राखण्यास मदत केली पाहिजे आणि (कोणत्याही विधीद्वारे किंवा विधीनुसार मान्य अशा काही प्रयोजनांव्यतिरिक्त) जिच्यामुळे अशा गुप्ततेचा भंग होऊ शकेल अशी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीस कळविता कामा नये.

(२) पोट–कलम (१) मधील तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती तीन महिनेपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडास किंवा दोन्ही शिक्षास पात्र होईल.

**१२९. निवडणुकीतील अधिकारी वगैरेंनी उमेदवारांच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे :–**

(१) निवडणुकीच्या वेळी जिल्हा निवडणूक अधिकारी, निर्वाचन अधिकारी म्हणून असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा साहाय्यक निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी म्हणून असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा निवडणुकीसंबंधी कोणतेही कर्तव्य पार पाडण्याकरिता निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांजकडून नेमण्यात आलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने किंवा लिपिकाने निवडणूक चालू असताना, तिच्यासंबंधीची व्यवस्था पाहत असताना एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्यासाठी (मत देण्याखेरीज इतर) कोणतेही कृत्य करता कामा नये.

व्यक्ती होत; व या कलमाच्या बाबतीत ''अधिकृत कर्तव्ये'' या संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावण्यात आला पाहिजे; परंतु त्या संज्ञेत या अधिनियमाद्वारे किंवा त्याच्या अन्वये जी कर्तव्ये लादली गेली नाहीत, अशा कर्तव्यांचा समावेश होत नाही.

(२) उपरोक्त व्यक्तींपैकी कोणीही, आणि पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीने पुढील गोष्टी करण्याचा प्रयत्न करता कामा नये. ––

(a) निवडणुकीत आपले मत देण्याविषयी एखाद्या व्यक्तीचे मन वळविणे, किंवा

(b) निवडणुकीत आपले मत देण्यापासून एखाद्या व्यक्तीस परावृत्त करणे, किंवा

(c) निवडणुकीत एखाद्या व्यक्तीच्या मतदानाबाबत कोणत्याही रीतीने दडपण आणणे

(३) पोट–कलम (१) किंवा पोट–कलम (२) च्या तरतुदींचं उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती ही सहा महिनेपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा ह्या दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

(४) पोट–कलम (३) खालील कोणताही दंडनीय अपराध दखल घेण्याजोगा असेल.

**१३०. मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई :–**

(१) कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही मतदान केंद्रात ज्या दिनांकास किंवा दिनांकांना मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास किंवा दिनांकांना मतदान केंद्राच्या आत किंवा मतदान केंद्रापासून शंभर मीटरच्या अंतरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागी पुढील कृत्यांपेकी, कोणतेही कृत्य करता कामा नये.

(a) मते मिळविण्यासाठी प्रचार करणे, किंवा

(b) एखाद्या मतदारास मत देण्याची विनंती करणे, किंवा

(c) एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी एखाद्या मतदाराचे मन वळविणे, किंवा

(d) निवडणुकीत मत न देण्याविषयी एखाद्या मतदाराचे मन वळविणे, किंवा

(e) निवडणुकीसंबंधी (सरकारी सूचनेखेरीज इतर) कोणत्याही सूचनेचे किंवा चिन्हाचे प्रदर्शन करणे.

(२) पोट–कलम (१) च्या तरतुदींचं उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती दोनशे पन्नास रुपयापर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(३) या कलमाखालील कोणताही दंडनीय अपराध हा दखल घेण्याजोगा ठरेल.

**१३१. मतदान केंद्रांत किंवा केंद्राजवळ गैरवर्तणूक करण्याबद्दल शिक्षा :–**

(१) कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही मतदान केंद्रात ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकांना मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास किंवा दिनांकांना मतदानाकरिता मतदान केंद्रावर येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल किंवा मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या किंवा इतर व्यक्तींच्या कामात हस्तक्षेप होईल अशा रीतीने –––

(a) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्यांच्या शेजारी असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, कर्णा किंवा ध्वनिक्षेपक यांसारखे मनुष्याचा आवाज मोठा करण्यासाठी किंवा तो पुनर्क्षेपित करण्यासाठी कोणतेही साधन वापरता किंवा चालविता कामा नये, किंवा

(b) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराशी किंवा त्यांच्या शेजारी असलेल्या सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ओरडता कामा नये किंवा अन्य प्रकारे गैररीतीने वागता कामा नये.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट–कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा त्यांचे उल्लंघन करण्यास जाणून–बुजून साहाय्य करील किंवा प्रोत्साहन देईल, ती तीन महिने मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडास किंवा ह्या दोन्ही शिक्षास पात्र होईल.

(३) जर एखाद्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास, एखादी व्यक्ती या कलमाखाली दंडनीय असा अपराध करीत आहे किंवा असा अपराध तिने केला आहे असे वाटले तर, तो कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास तिला अटक करण्याचा आदेश देऊ शकेल आणि त्यानंतर तो पोलीस अधिकारी तिला अटक करील.

(४) कोणताही पोलीस अधिकारी, पोट–कलम (१) च्या तरतुदीचा कोणत्याही प्रकारे भंग होऊ नये यासाठी वाजवी रीतीने आवश्यक असतील अशा उपाययोजना करू शकेल किंवा बळांचा वापर करू शकेल आणि असा भंग करण्यासाठी वापरण्यात आलेले कोणतेही साधन जप्त करू शकेल.

**१३२. मतदान केंद्रावरील गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा :–**

(१) जी कोणी व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रावर मतदानासाठी ठरविलेल्या वेळात गैरवर्तन करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाने दिलेल्या कायदेशीर सूचना पाळण्यास कसूर करील त्या व्यक्तीस मतदान केंद्राध्यक्ष किंवा कामावर असलेला कोणीही पोलीस अधिकारी किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने याबाबत अधिकार दिलेली कोणीही व्यक्ती मतदान केंद्रातून घालवून देऊ शकेल.

(२) पोट–कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर, मतदान केंद्रावर मत देण्याचा अन्यथा हक्क असलेल्या कोणत्याही मतदारास त्या केंद्रावर मत देण्याची संधी मिळणार नाही अशा प्रकारे करता कामा नये.

(३) अशा रीतीने मतदान केंद्रातून घालवून दिलेल्या कोणत्याही व्यक्तीने मतदान केंद्राध्यक्षांच्या परवानगीशिवाय मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश केला तर ती तीन महिने मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र ठरेल.

(४) पोट–कलम (३) अन्वये दंडनीय असलेला अपराध दखलपात्र अपराध असेल.

**१३२–A–** मतदान प्रक्रियेत मतदान करणे पद्धतीचे मतदाराने उल्लंघन केल्यास ती मतदानपत्रिका रद्द करण्यात यावी.

**१३३. निवडणुकीत बेकायदेशीर रीतीने वाहने भाड्याने घेण्याबद्दल किंवा मिळविण्याबद्दल शिक्षा :–**

(१) निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात कलम १२३ च्या (५) व्या खंडात निर्दिष्ट केलेले कोणतेही भ्रष्टाचाराचे कृत्य केल्याबद्दल दोषी ठरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस एक हजार रुपयापर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल.

**१३४. निवडणुकीसंबंधीचे अधिकृत कर्तव्य पार न पाडणे :–**

(१) हे कलम जिला लागू आहे अशी कोणतीही व्यक्ती वाजवी सबबीवाचून तिचे अधिकृत कृत्य पार न पाडण्यामुळे वा त्यात हेळसांड केल्यामुळे दोषी ठरत असेल तर ती पाचशे रुपयापर्यंतच्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(१–A) पोट–कलम (१) खालील दंडनीय अपराध दखलपात्र अपराध असेल.

(२) पूर्वोक्त कोणत्याही कृत्याबद्दल वा अकृतीबद्दल अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नुकसानभरपाईचा दावा लावता येणार नाही किंवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

(३) हे कलम ज्या व्यक्तींना लागू आहे त्या व्यक्ती म्हणजे जिल्हा निवडणूक अधिकारी, निर्वाचन अधिकारी, सहायक निर्वाचन अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि नामनिर्देशन पत्रे किंवा उमेदवारी मागे घेण्याविषयीचे अर्ज स्वीकारणे किंवा निवडणुकीच्या वेळची मतनोंदणी किंवा मतमोजणी यासंबंधी कोणतेही काम करण्यासाठी नेमलेल्या इतर कोणत्याही;

**१३४–A. निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांकरिता शास्ती :–**

जर शासनाच्या सेवेत असलेली कोणतीही व्यक्ती एखाद्या निवडणुकीत कोणत्याही उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करीत असेल तर ती तीन महिन्यांपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**१३४–B– मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राजवळ हत्यारासह जाण्यास प्रतिबंध–**

**(१)** मतदानाचे दिवशी रिटर्निंग ऑफिसर, मतदान केंद्रप्रमुख, पोलिंग ऑफिसर किंवा त्या दिवशी त्या ठिकाणी नेमणुकीस असलेला कोणतेही अधिकारी की, जे शांतता प्रस्तापित करण्यासाठी नेमलेले असतील त्यांनी किंवा इतर कोणीही हत्यार कायद्यात निर्दिष्ट केलेले कुठलेही हत्यार घेऊन मतदान केंद्रात किंवा जवळपास जाऊ नये.

(२) वरील तरतुदीचा भंग केल्यास त्यास दोन वर्षापर्यंत शिक्षा किंवा दंड किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

(३) या संबंधी भारतीय हत्यार कायद्यानुसार तरतुदी नसल्यास व वरील कलमान्वये त्या इसमास शिक्षा झाल्यास ते हत्यार सरकार जमा करता येते व त्यासाठी दिलेला परवाना (हत्यार कायदा कलम १७ अन्वये) रद्द करण्यात आला असे समजण्यात येईल.

(४) सदरचा गुन्हा दखलपात्र आहे.

**१३५. मतदान केंद्रावरून मतपत्रिका हलविणे हा अपराध आहे :–**

(१) जी कोणी व्यक्ती कोणत्याही निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रामधून मतपत्रिका लबाडीने नेईल किंवा नेण्याचा प्रयत्न करील किंवा असे कृत्य करण्यास जाणूनबुजून सहाय्य करील किंवा प्रोत्साहन देईल ती एक वर्ष मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा पाचशे रुपयेपर्यंतच्या दंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) जर एखादी व्यक्ती, पोट–कलम (१) अन्वये दंडनीय असा एखादा अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असा विश्वास बाळगण्यास एखाद्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास कारण असेल तर असा अधिकारी, त्या व्यक्तीला मतदान केंद्र सोडण्यापूर्वी अटक करू शकेल किंवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास तिला अटक करण्याचा आदेश देऊ शकेल आणि अशा व्यक्तीची झडती घेऊ शकेल किंवा पोलीस अधिकाऱ्यास तिची झडती घेण्यास लावू शकेल,

मात्र जेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेण्याची आवश्यकता असेल तेव्हा अशी झडती दुसऱ्या स्त्रीकडून सभ्यतेचे काटेकोरपणे पालन करून घेण्यात आली पाहिजे.

(३) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची झडती घेण्यात आल्यावर तिच्याजवळ सापडलेली कोणतीही मतपत्रिका सुरक्षित ठेवण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षाने ती पोलीस अधिकाऱ्याच्या हवाली केली पाहिजे, किंवा सदर झडती पोलीस अधिकाऱ्याने घेतली असल्यास, ती अशा अधिकाऱ्याने सुरक्षित ठेवली पाहिजे.

(४) पोट–कलम (१) अन्वये दंडनीय असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

**१३५–A–** मतदान केंद्र ताब्यात घेण्याचा गुन्हा केल्यास कमीत कमी १ वर्ष शिक्षा व जास्तीत जास्त ३ वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे.

सदर गुन्हा एखाद्या सरकारी नोकराने केल्यास कमीत कमी तीन वर्ष व जास्तीत जास्त ५ वर्ष शिक्षा होऊ शकते.

**१३५–B– मतदानाचे दिवशी पगारी सुट्टी मंजूर करणेबाबत–**

कोणतीही व्यक्ती की जी, व्यापार, व्यवसाय, कंपनी कामगार, किंवा कोणत्याही संस्थेत काम करीत असेल व ती व्यक्ती लोकसभा किंवा विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्यास पात्र असेल तर त्याला पगारी सुट्टी देण्यात यावी.

**१३५–C–** (१) मतदानाचे दिवशी दारू, उत्साहवर्धक पेये, मादक गुंगी आणणारे पेय, मतदान सुरू झाल्यापासून ४८ तासा पर्यंत मतदान केंद्राजवळील हॉटेल, दुकान, खानावळ व इतर सरकारी किंवा खाजगी ठिकाणी विकू नये.

(२) वरील तरतुदींचा भंग केल्यास सहा महिने शिक्षा किंवा दोन हजार रुपयांपर्यंत दंड किंवा शिक्षा होतील.

(३) वरीलप्रमाणे बाळगलेले पेय, पदार्थ सरकारी नियमानुसार जप्त करावेत किंवा नष्ट करावेत.

**१३६. इतर अपराध व त्याबद्दल शास्ती :–**

(१) कोणत्याही निवडणुकीच्या वेळी पुढीलपैकी कोणतेही कृत्य करणारा इसम निवडणूकविषयक अपराध केल्याबद्दल दोषी ठरेल.–

(a) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(b) निर्वाचन अधिकाऱ्याने किंवा त्याच्या अधिकारान्वये लावलेली कोणतीही यादी, सूचना किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करणे किंवा त्यांचा नाश करणे किंवा काढून टाकणे; किंवा

(c) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह किंवा ओळखीबाबतचे प्रतिज्ञापत्र किंवा टपालाने मतपत्रिका पाठविण्याच्या संबंधात वापरलेला अधिकृत लिफाफा लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(d) योग्य अधिकारावाचून एखाद्या व्यक्तीस एखादी मतपत्रिका पुरविणे किंवा एखाद्या व्यक्तीकडून एखादी मतपत्रिका स्वीकारणे किंवा एखादी मतपत्रिका जवळ बाळगणे; किंवा

(e) जी मतपत्रिका पेटीत टाकण्याचा त्यास कायद्याने अधिकार दिलेला असेल अशा मतपत्रिकेखेरीज इतर कोणतीही वस्तू कोणत्याही मतपेटीत टाकणे; किंवा

(f) निवडणुकीत त्यावेळी उपयोगात असलेल्या कोणत्याही मतपेट्या किंवा मतपत्रिका यांचा योग्य अधिकारावाचून नाश करणे किंवा त्या काढून घेणे किंवा त्या उघडणे किंवा त्यात अन्य तऱ्हेने ढवळाढवळ करणे; किंवा

(g) लबाडीने किंवा योग्य अधिकारावाचून, जसे असेल त्याप्रमाणे, उपरोक्त कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करण्याचा प्रयत्न करणे किंवा असे कोणतेही कृत्य करण्यास जाणूनबुजून सहाय्य करणे किंवा प्रोत्साहन देणे.

(२) या कलमान्वये निवडणूकविषयक अपराधाबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती ––

(a) जर ती व्यक्ती निर्वाचन अधिकारी किंवा सहायक निर्वाचन अधिकारी किंवा एखाद्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणुकीच्या संबंधातील कोणत्याही अधिकृत कामावर नेमलेला इतर कोणीही अधिकारी किंवा लिपिक असेल तर दोन वर्षापर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(b) जर ती वरील व्यक्तीखेरीज दुसरी एखादी व्यक्ती असेल तर ती सहा महिनेपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेस किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) जर एखाद्या व्यक्तीचे कर्तव्य निवडणुकीचे काम पार पाडण्यात किंवा मतमोजणीच्या कामाचा समावेश असलेल्या निवडणुकीच्या कार्यात भाग घेणे किंवा अशा निवडणुकीच्या संबंधात उपयोगात असलेल्या मतपत्रिका आणि इतर कागदपत्रे यांच्यासाठी निवडणुकीनंतर जबाबदार असणे हे असेल तर, या कलमाच्या उद्देशानुसार, ती अधिकृत कामावर नेमलेली व्यक्ती आहे असे समजले पाहिजे; परंतु ''अधिकृत काम'' या संज्ञेत या अधिनियमाद्वारे किंवा त्यानुसार लादलेल्या कर्तव्याव्यतिरिक्त इतर कर्तव्यांचा समावेश होणार नाही.

(४) पोट–कलम (२) च्या अन्वये दंडनीय असलेला अपराध दखल घेण्याजोगा ठरेल.

**१५९– निवडणुकीचे कामासाठी काही अधिपत्याखालील कार्यालयीन कर्मचारी उपलब्ध करून देणे :–**

(१) राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी किंवा प्रादेशिक आयुक्त, ज्याची नेमणूक घटनेच्या आर्टिकल ३२४ पोटकलम ४ प्रमाणे झालेली आहे, यांनी विनंती केल्यास निवडणुकीचे कामे करण्यासाठी व परिपूर्ती करण्यासाठी आवश्यकतेनुसार कर्मचारी उपलब्ध करून दिले पाहिजेत.

(२) उपकलम १ चे उद्देशपूर्तीसाठी खालील अधिपत्य आहेत.

(१) प्रत्येक स्थानिक अधिपत्य

(२) प्रत्येक विद्यापीठ ज्याची स्थापना केंद्र किंवा प्रादेशिक कायद्यान्वये झालेली आहे.

(३) इतर कोणतीही संस्था, संबंधित संलग्न संस्था जिचेवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अम्मल व पूर्ण आर्थिक तरतूद किंवा वेळोवेळी भक्कम आर्थिक मदत केंद्र किंवा राज्य सरकारकडून दिली जात असेल.

––––––––––––––––––––

# ३१. खाजगी सुरक्षा एजन्सीज (विनियमन) अधिनियम, २००५ आणि नियम

**Ministry of Law and Justice ( Legislative Department)**
**New Delhi, the 23rd June, 2005/Asadha 2, 1927 (Saka)**

***The following Act of Parliament received the assent of the President on the 23rd June, 2005, and is hereby published for general information :-***

**The PRIVATE SECURITY AGENCIES (REGULATION) ACT, 2005**

No.29 OF 2005 (23rd June, 2005)

An Act to provide for the regulation of private security agencies and for matters connected therewith or incidental thereto.

Be it enacted by Parliament in the Fifty-sixth year of the year of the Republic of India as follows:-

**1. Short title, extent & commencement.-**

(1) This Act may be called the Private Security Agencies (Regulation) Act, 2005.

(2) It extends to the whole of India except the State of Jammu and Kashmir.

(3) It shall come into force on such date as the Central Government may, by notification in the Official Gazette, appoint.

**2. Definitions.-**

In this Act, unless the context otherwise requires:-

(a) "armoured car service" means the service provided by deployment of armed guards alongwith armoured car and such other related services which may be notified by the Central Government or as the case may be, the State Government from time to time;

(b) "Controlling Authority"; means the Controlling Authority appointed under sub-section (1) of section 3;

(c) "Licence" means a Licence granted under sub-section (5) of section 7;

(d) "notification" means a notification published in the Official Gazette;+

(e) " prescribed" means prescribed by rules made under this Act;

(f) "private security' means security provided by a person, other than a public servant, to protect or guard any person or property or both and includes provisions of armoured car service;

(g) "private security agency" means a person or body of persons other than a government agency, department or organization engaged in the business of providing private security services including training to private security guards or their supervisor or providing private security guards to any industrial or business undertaking or a company or any other person or property;

(h) "private security guard" means a person providing private security with or without arms to another person or property or both and includes a supervisor;

(i) "State Government", in relation to a Union territory, includes the Administrator of that Union territory appointed by the President under article 239 of the Constitution.

**3. Appointment of controlling authority.-**

(1) The State Government shall, by notification, designate an officer not below the rank of a Joint Secretary in the Home Department of the State or an equivalent officer to be the Controlling Authority for the purposes of this Act.

(2) The State Government may, for efficient discharge of functions by the Controlling Authority, provide it with such other officers and staff and that Government considers necessary.

**4. Persons or Private Security Agency not to engage or provide private security guard without licence.-**

No person shall carry on or commence the business of private security agency, unless he holds a licence issued under this Act.

Provided that the person carrying on the business of private security agency, immediately before the commencement of this Act, may continue to do so for a period of one year from the date of such commencement and if he has made an application for such licence within the said period of one year , till the disposal of such application.

Provided further that no private security agency shall provide security abroad, without obtaining permission of the Controlling Authority, which shall consult the Central Government before according such permission.

**5. Eligibility for Licence.-**

An application for issue of a licence under this Act shall only be considered from a person after due verification of his antecedents.

**6. Persons not eligible for licence.-**

(1) A person shall not be considered for issue of Licence under this Act, if he has been :-

(a) Convicted of an offence in connection with promotion, formation or management of a company (any fraud or misfeasance committed by him in relation to the company), including an undischarged insolvent; or

(b) convicted by a competent court for an offence, the prescribed punishment for which is imprisonment of not less than two years; or

(c) Keeping links with any organization or association which is banned under any law

on account of their activities which pose threat to national security or public order or there is information about such a person indulging in activities which are prejudicial to national security or public order; or

(d) dismissed or removed from Government service on grounds of misconduct or moral turpitude.

(2) A company, firm or an association of persons shall not be considered for issue of a licence under this Act, if, it is not registered in India, or having a proprietor or a majority shareholder, partner or director, who is not a citizen of India.

**7. Application for grant of licence.-**

(1) An application for grant of licence to a private security agency shall be made to the Controlling Authority in such form as may be prescribed.

(2) The applicant shall submit an affidavit incorporating the details in relation to the provisions contained in section 6, ensure the availability of the training for its private security guard and supervisors required under sub-section (2) of section 9, fulfilment of conditions under section 11 and of cases registered with police or pending in a court of law involving the applicant.

(3) Every application under sub-section (1) shall be accompanied by a fee of-

(a) rupees five thousand if the private security agency is operating in one district of State;

(b) rupees ten thousand if the agency is operating in more than one but up to five districts of State; and

(c) rupees twenty-five thousand if it is operating in the whole State.

(4) On receipt of an application under sub-section (1), the Controlling Authority may, after making such inquiries as it considers necessary and obtaining no objection certificate from the concerned police authority, by order in writing, either grant a licence or refuse to grant the same within a period of sixty days from the date of receipt of application with complete particulars and the prescribed fee:

Provided that no order of refusal shall be made unless -

(a) the applicant has been given a reasonable opportunity of being heard; and

(b) the grounds on which licence is refused is mentioned in the order.

(5) A licence granted under this section :-

(a) shall be valid for a period of five years unless the same is cancelled under sub-section (1) of section 13;

(b) may be renewed from time to time after the expiry of five years, for a further period of five years on payment of such fee as may be prescribed; and

(c) shall be subject to such conditions as may be prescribed.

**8. Renewal of licence-**

(1) An application for renewal of licence shall be made to the Controlling Authority, not less than forty-five days before the date of expiry of the period of validity thereof, in such form as may be prescribed and shall be accompanied by the requisite fee and other documents required under section 6, 7 and 11 of this Act.

(2) The Controlling Authority shall pass an order on application for renewal of licence within thirty days from the date of receipt of application complete in all respects.

(3) On receipt of an application under sub-section (1), the Controlling Authority may, after making such inquiries as he considers necessary and by order in writing, renew the licence or refuse to renew the same :

Provided that no order of refusal shall be made except after giving the applicant a reason able opportunity of being heard.

**9. Conditions for commencement of operation & engagement of supervisions.-**

(1) Every private security agency shall, within six months of obtaining the licence, commence its activities.

(2) Every private security agency shall ensure imparting of such training and skills to its private security guards and supervisors as may be prescribed.

Provided that the person carrying on the business or private security agency, before the commencement of this Act, shall ensure the required training to its security guards and supervisors within a period of one year from the date of such commencement.

(3) Every private security agency shall, within sixty days from the date of issue of the licence, employ such number of supervisors, as may be prescribed.

(4) A private security agency shall not employ or engage a person as a supervisor unless he fulfils the conditions specified in sub-section (1) of section 10.

(5) While engaging a supervisor of private security guards, every private security agency shall give preference to a person who has experience of serving in the Army, Navy, Air Force or any other Armed forces of the Union or State Police including armed constabularies and Home Guards for a period of not less than three years.

**10. Eligibility to be a private security guard.-**

(1) A private security agency shall not employ or engage any person as a private security

guard unless he-

(a) is a citizen of India or a citizen of such other country as the Central Government may, by notification in the Official Gazette, specify;

(b) has completed eighteen years of age but has not attained the age of sixty-five years;

(c) satisfies the agency about his character and antecedents in such manner as may be prescribed.

(d) has completed the prescribed security training successfully;

(e) fulfils such physical standards as may be prescribed; and

(f) satisfies such other conditions as may be prescribed.

(2) No person who has been convicted by a competent court or who has been dismissed or removed on grounds of misconduct or moral turpitude while serving in any of the armed forces of the Union, State Police Organisations, Central or State Governments or in any private security agency shall be employed or engaged as a private security guard or a supervisor.

(3) Every private security agency may, while employing a person as a private security guard, give preference to a person who has served as a member in one or more of the following namely :-

(i) Army;

(ii) Navy;

(iii) Air Force;

(iv) Any other armed forces of the Union;

(v) Police, including armed constabularies of States; and

(vi) Home Guards.

**11. Conditions of licence.-**

(1) The State Government may frame rules to prescribe the conditions on which licence shall be granted under this Act and such conditions shall include requirements as to the training which the licensee is to undergo, details of the person or persons forming the agency, obligation as to the information to be provided from time to time the Controlling Authority regarding any change in their address, change of management and also about any criminal charge made against them in the course of their performance of their duties of the private security agency or as the case may be, a private security guard employed or engaged by them.

(2) The State Government may make provision in the rules to verify about imparting of required training by the private security agency under sub-section (2) of section 9 and to review continuation or otherwise of licence of such private security agency which may not have adhered to the condition of ensuring the required training.

**12. Licence to be exhibited.-**

Every private security agency shall exhibit its licence or copy thereof in a conspicuous place of its business.

**13. Cancellation & suspension of licence.-**

(1) The Controlling Authority may cancel any licence on any one or more of the following grounds, namely-

(a) that the licence has been obtained on misrepresentation or suppression of material facts.

(b) that the licence holder has used false documents or photographs;

(c) that the licence holder has violated the provisions of this Act or the rules made thereunder or any of the conditions of the licence;

(d) that the licence holder has misused information obtained by him during the discharge of his duties as the private security agency to any industrial or business undertaking or a company or any other person;

(e) that the licence holder by using any letter-head, advertisement or any other printed matter or in any other manner represented that the private security agency is instrumentality of the Government or such agency is or has been using a name different from that for which licence has been granted.

(f) that the licence holder is or has been impersonating or permitted or aiding or abetting any body to impersonate as a public servant;

(g) that the private security agency had failed to commence its activities or to engage a supervisor within the specified time period;

(h) that the licence holder is or has willfully failed or refused to render the services agreed to any person;

(i) that the licence holder has done any act which is in violation of a court order or an order of a lawful authority or is or has been advising, encouraging or assisting any person to violate any such order;

(j) that the licence holder has violated the provisions of the Acts given in the Schedule which may be modified by the Central Government, by notification in the Official Gazette;

(k) that there have been repeated instances when the private security guard or guards provided by the private security agency -

(i) failed to provide private security or were guilty of gross negligence in not providing such security;

(ii) committed a breach of trust or misappropriated the property or a part thereof which they were supposed to protect;

(iii) were found habitually drunk or indiscipline;

(iv) had connived or abetted a crime against the person or property placed under their charge; or

(1) that the licence holder has done any act which poses a threat to national security, or did not provide assistance to the police or other authority in the discharge of its duties or acted in a manner prejudicial to national security or public order or law and order.

(2) Where the Controlling Authority, for reasons to be recorded in writing, is satisfied that pending the question of cancelling of licence on any of the grounds mentioned in sub-section (1), it is necessary to do so, that Controlling Authority may, by order in writing, suspend the operation of the licence for such period not exceeding thirty days as may be specified in the order and require the licence holder to show cause, within fifteen days from the date of issue of such order, as to why the suspension of the licence should not be extended till the determination of the question of cancellation.

(3) Every order of suspending or cancelling of a licence shall be in writing and shall specify the reasons for such suspension or cancellation and a copy thereof shall be communicated to the person affected.

(4) No order of cancellation of licence under sub-section (1) shall be made unless the person concerned has been given a reasonable opportunity of being heard.

**14. Appeals.-**

(1) Any person aggrieved by an order of the Controlling Authority refusing the licence under sub-section (4) of Section 7 or renewal under sub-section (3) of section 8 or order of suspension of licence under sub-section (2) of section 13 or cancellation of licence under sub-section (1) of that section, may prefer an appeal against that order to the Home Secretary of the State Government within a period of sixty days of the date of such order :

Provided that an appeal may be admitted after the expiry of the said period of sixty days if the appellant satisfies the State Government that he has sufficient cause for not preferring the appeal within that period.

(2) Every appeal under sub-section (1) shall be made in such form as may be prescribed and shall be accompanied by a copy of the order appealed against.

(3) Before disposing of an appeal, the State Government shall give the appellant a reasonable opportunity of being heard.

**15. Register to be maintained by Private Security Agency.-**

(1) Every private security agency shall maintain a register containing -

(a) the names and addresses of the persons managing the private security agency;

(b) the names, address, photographs and salaries of the private security guards and supervisors under its control;

(c) the names and addresses of the persons whom it had provided private security guards or services; and

(d) such other particulars as may be prescribed.

(2) The Controlling Authority may call for such information as it considers necessary from any private security agency, supervisor or private security guard to ensure due compliance of the Act.

**16. Inspection of Licence etc.-**

The Controlling Authority or any other officer authorized by it in this behalf may at any reasonable time, enter the premises of the private security agency and inspect and examine the place of business, the records, accounts and other documents connected with the licence and may take copy of any document.

**17. Issue of Photo Identiy Card.-**

(1) Every private security guard shall be issued a photo identity card, by the private security agency employing or engaging the guard.

(2) The photo identity card under sub-section (1) shall be issued in such form as may be prescribed.

(3) Every private security guard or supervisor shall carry on his person the photo identity card issued under sub-section (1) and shall produce it on demand for inspection by the Controlling Authority or any other officer authorized by it in this behalf.

**18. Disclosure of information to unauthorised person.-**

(1) Any person who may be or has been employed or engaged as a private security guard by the private security agency shall not divulge to anyone other than the employer, or in such manner and to such person as the employer directs, and information acquired

by him during such employment with respect to the work which he has been assigned by such employer, except such disclosure as may be required under this Act or in connection with any inquiry or investigation by police or as may be required by an authority or process of law.

(2) All private security guards of a private security agency shall render necessary assistance to the police or to such authority in the process of any investigation pertaining to the activities of that agency.

(3) If violation of any law is noticed by any private security guard during the course of discharge of his duties, he shall bring it to the notice of his superior, who in turn shall inform the police either through his employer or agency or on his own.

**19. Deligation.-**

The State Government may, by notification, direct that any power or function (except the powers to make rules under section 25 -

(a) which may be exercised or performed by it, or

(b) which may be exercised or performed by the Controlling Authority, under the Act, may, in relation to such matter and subject to such conditions, if any, as may be specified in the notification, be also exercised or performed by such officer or authority subordinate to the Government or officer subordinate to the Controlling Authority, as may be specified in such notification.

**20. Punishment for contravention of certain provisions.-**

(1) Any person who contravenes the provisions of section 4 shall be punishable with imprisonment for a term which may extend to one year, or with five which may extend to twenty-five thousand rupees, or with both.

(2) Any person or private security agency who contravenes, the provisions of sections 9, 10 and 12 of the Act, shall be punishable with a fine which may extend to twenty-five thousand rupees, in addition to suspension or cancellation of the licence.

**21. Penalty for unauthorised use of certain uniforms.-**

If any private security guard or supervisor wears the uniform of the Army, Air force, Navy or any other armed forces of the Union or Police or any dress having the appearance or bearing any of the distinctive marks of that uniform, he and the proprietor of the private security agency shall be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine which may extend to five thousand rupees, or with both.

**22. Offences by Companies.-**

(1) Where an offence under this Act has been committed by a company, every person who at the time the offence was committed was in charge of, and was responsible to, the company for a conduct of the business of the company as well as the company, shall be deemed to be guilty of the offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly.

Provided that nothing contained in this sub-section shall render any such person liable to any punishment, if he proves that the offence was committed without his knowledge or that he had exercised all due diligence to prevent the commission of such offence.

(2) Notwithstanding anything contained in sub-section (1), where any offence under this Act has been committed by a company and it is proved that the offence has been committed with a consent or connivance of, or is attributable to, any neglect on the part of any director, manager, secretary or other officer of the company, such director, manager, secretary or other officer shall be deemed to be guilty of that offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly.

**Explanation** - For the purposes of this section -

(a) "company" means anybody corporate and includes a firm or other association of individuals; and

(b) "director", in relation to a firm, means a partner in the firm.

**23. Idemnity.-**

No suit, prosecution or other legal proceeding shall lie against the Controlling authority or any other officer authorized by it in respect of anything in good faith done or intended to be done under this Act.

**24. Framing of model rules for adoption by states.-**

The Central Government may frame model rules in respect of all or any of the matters with respect to which the State Government may make rules under this Act, and where any such model rules have been framed the State Government shall, while making any rules in respect of that matter under section 25, so far as is practicable, conform to such model rules.

**25. Power of state government to make rules.-**

(1) The State Government may, by notification, make rules for carrying out the provisions of this Act.

(2) In particular, and without prejudice to the generality of the foregoing power, such rules may provide for all or any of the following matters namely:-

(a) the procedure for verification of character and antecedents under clause (l) of sub-section ((1) of section 10; the type of training under clause (d) of sub-section (1) of section 10; the physical standard under clause (e) of sub-section (1) of section 10; and other conditions under clause (f) of sub-section (1) of section 10;

(b) the number of supervisors to be employed under sub-section (3) of section 9;

(c) the form of an application for grant of licence under sub-section (1) of section 7;

(d) the form in which the licence to be granted under sub-section (4) of section 7 and conditions subject to which such licence to be granted under section 11;

(e) the form of an application for renewal of licence under sub-section (1) of section 8;

(f) the form under sub-section (2) of section 14 for preferring an appeal;

(g) particulars to be maintained in a register under sub-section ((1) of section 15;

(h) the form in which photo identity card under sub-section (2) of section 17 be issued;

(i) any other matter which is required to be, or may be, prescribed.

(3) Every rule made by the State Government under this section shall be laid, as soon as may be after it is made, before each House of the State Legislature where it consists of two Houses, or where such Legislature consists of one House, before that House.

(4) In respect of Union territories, every rule made to carry out the provisions of the Act shall be laid before each House of Parliament and where there exists a Legislative Assembly, before that Assembly.

THE SCHEDULE

**[ See Section 13(l)(i)]**

(1) The Payment of Wages Act, 1936 (4 of 1936).

(2) The Industrial Disputes Act, 1947 (14 of 1947).

(3) The Minimum Wages Act, 1948 (11 of 1948).

(4) The employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 (19 of 1952).

(5) The Payment of Bonus Act, 1965 (21 of 1965).

(6) The Contract Labour (Regulation and Abolition) Act, 1970 (37 of 1970).

(7) The Payment of Gratuity Act, 1972 (39 of 1972).

(8) The Equal Remuneration Act, 1976 (25 of 1976).

(9) The Inter-State Migrant Workmen (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1979 (30 of 1979).

---------

# ३२. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २000[१]

# THE INFORMATION TECHNOLOGY ACT, 2000

**(२००८ च्या सुधारणांसह)**

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभिक व प्रयुक्ती :–**

(१) या अधिनियमास माहिती तंत्रज्ञान अधिनियम, (अमेंडमन्ट) २००८ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण भारतास लागू असेल आणि या अधिनियमात इतरत्र तरतूद केली असेल ते वगळता कोणत्याही भारताबाहेर केलेल्या अपराधाला किंवा उल्लंघनालादेखील तो लागू असेल.

(३) केंद्र शासन अधिसूचनेव्दारे नेमून देईल अशा तारखेला तो अमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळ्या तारखा करता येईल आणि अशा तरतुदींमधील या अधिनियमाच्या प्रारंभासंबंधीचा कोणताही संदर्भ हा त्या अशा तरतुदीच्या प्रारंभाचा संदर्भ असल्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल.

(४) हा कायदा कागदपत्र किंवा व्यवहार जे शेड्यूल १ मध्ये नमूद केले आहे. त्यांना लागू होतो, परंतु केंद्र शासनाने अधिनियमांच्या प्रयोगासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे शेड्यूल १ मध्ये काही नोंद वाढविल्या व कमी केल्या आहेत.

(५) पोटकलम (४)मध्ये काही नमूद केलेली प्रत्येक अधिसूचना संसदेच्या समोर ठेवली जाते.

**२. व्याख्या :–**

(१) या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर–

(a) ‘प्रवेश’ या शब्दातील व्याकरणिक फेरफार आणि तत्सम अभिव्यक्ती याचा अर्थ संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क याच्या तर्कशास्त्रीय, अंकगणितीय किंवा मेमरी फंक्शन साधनांमधून माहिती मिळविणे, त्याचे शिक्षण देणे किंवा त्याबाबत माहिती देणे असा आहे;

(b) ‘प्रेषिती’ म्हणजे इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड जिला मिळावे असा प्रेषकाचा उद्देश असेल अशी व्यक्ती. मात्र त्यात कोणत्याही मध्यस्थाचा अंतर्भाव होत नाही;

(c) ‘न्यायनिर्णायक अधिकारी’ म्हणजे कलम ४६ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला न्यायनिर्णायक अधिकारी;

(d) [३][इलेक्ट्रॉनिक सिग्नेचर (सही) करणे’] याचा त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आणि तत्सम अभिव्यक्तीसह अर्थ इलेक्ट्रॉनिक अभिलेखांवर [१][इलेक्ट्रॉनिक सही] करून ते अधिकृत करण्याच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीने अंगीकारलेले कोणतेही पद्धतीशास्त्र किंवा कार्यपद्धती असा आहे;

---

१. जी.एस.आर.७८८(३), दि.१७ ऑक्टोबर, २००० द्वारे दि.१७ ऑक्टोबर २००० पासून अमलात आला.

२. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम ३ द्वारे पोटकलम (४) ऐवजी दाखल केला.

३. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम २ द्वारे ‘‘डिजिटल सिग्नेचर’’ याऐवजी दाखल.

(e) 'समुचित शासन' म्हणजे –

(i) संविधानाच्या सातव्या अनुसूचीच्या सूची दोनमध्ये यादी दिलेल्या;

(ii) संविधानाच्या सातव्या अनुसूचीच्या यादी तीन अन्वये अधिनियमात केलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात राज्य शासन आणि इतर कोणत्याही बाबतीत केंद्र शासन;

(f) 'ॲसीमेट्रीक क्रिप्टो सिस्टिम' म्हणजे [१][इलेक्ट्रॉनिक सहीसाठी] प्रायव्हेट की (Key) आणि डिजिटल सहीची पडताळणी करण्यासाठी 'पब्लिक की' यांचा समावेश असलेली सिक्युअर की–पेअर पद्धती;

(g) 'प्रमाणन प्राधिकारी' म्हणजे कलम २४ अन्वये [१][इलेक्ट्रॉनिक सही] प्रमाणपत्र देण्यासाठी जिला लायसेन्स देण्यात आले आहे अशी व्यक्ती;

(h) 'प्रमाणन प्रथा–विवरणपत्र' म्हणजे डिजिटल सही प्रमाणपत्र देताना प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकरणाने वापरलेल्या प्रथा विनिर्दिष्ट करण्यासाठी प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकरणाने दिलेले विवरणपत्र;

[२][(h-a) 'संदेशवहन साधन' याचा अर्थ सेलफोन, पर्सनल डिजिटल असिस्टंटस किंवा देहांचे संयुक्तिकरण अथवा कोणताही मजकूर व्हिडिओ किंवा प्रतिमा संदेशवहन करण्यासाठी, पाठविण्यासाठी किंवा पारेषित करण्यासाठी वापरलेले अन्य कोणतेही साधन असा आहे;]

(i) 'संगणक' म्हणजे कोणतेही इलेक्ट्रॉनिक मॅग्नेटिक, ऑप्टिकल किंवा इतर हाय स्पीड डाटा प्रोसेसिंग डिव्हाईस किंवा इलेक्ट्रॉनिक, मॅग्नेटिक किंवा ऑप्टिकल इम्ल्सेसच्या मॅन्युप्युलेशनद्वारे लॉजिकल, आरिथमेटिक ॲन्ड मेमरी परफॉर्म करणारी पद्धती आणि त्यात सर्व इनपुट, आऊटपुट, प्रोसेसिंग, स्टोअरेज, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर किंवा संगणकाला किंवा संगणक सिस्टीमला किंवा संगणक नेटवर्कला जोडलेल्या आहेत किंवा त्याच्याशी संबंधित आहेत अशा कम्युनिकेशन सुविधांचा त्यात समावेश होतो;

[३][(j) 'संगणक नेटवर्क' म्हणजे एक किंवा अधिक संगणक किंवा संगणक सिस्टिम किंवा संदेशवहन साधने.

(i) सॅटेलाईट, मायक्रोवेव्ह, टेरेस्टियल लाईन तार किंवा बिनतारी किंवा इतर कम्युनिकेशन माध्यमांमार्फत आणि

(ii) इंटरकनेक्शन सलगपणे असलेल्या किंवा नसलेल्या दोन किंवा अधिक परस्परांना जोडलेल्या संगणकांचा समावेश असलेल्या टर्मिनल्स किंवा कॉम्पलेक्स किंवा संदेशवहन साधन यांच्यामार्फत परस्परांना जोडणे;]

(k) 'संगणक साधनसामग्री' म्हणजे संगणक, संगणक सिस्टीम, संगणक नेटवर्क, डाटा, कॉम्प्युटर डाटाबेस किंवा सॉफ्टवेअर;

(l) 'संगणक यंत्रण' म्हणजे इनपुट–आऊटपुट आधार साधनासह आणि कार्यक्रम पार पाडण्याजोगे (प्रोग्रॅमबेल) आणि बाह्य फाईलबरोबर वापरण्यास योग्य नसतात असे कॅलक्युलेटर्स (परिगणित्रे) वगळून, ज्यामध्ये संगणक प्रोग्रॅम, इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रक्शन, इनपुट आधारसामग्री व आऊटपुट आधारसामग्री यांचा समावेश आहे आणि जे तर्कशास्त्र, गणित, आधारसामग्री साठवण व रिट्रीव्हल, कम्युनिकेशन कन्ट्रोल आणि इतर कार्ये पार पाडते असे साधन किंवा साधनांचा संग्रह;

---

१. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम २ द्वारे ''डिजिटल सिग्नेचर'' याऐवजी दाखल.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४(अ) द्वारे समाविष्ट केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) द्वारे दाखल केला.

(m) ‘नियंत्रक’ म्हणजे कलम १७ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या प्रमाणन प्राधिकरणाचे नियंत्रक;

(n) ‘सायबर’ अपील न्यायाधिकरण’ म्हणजे कलम ४८ च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले सायबर [१][***] अपील न्यायाधिकरण;

[२][n-a] ‘सायबर कॅफे’ म्हणजे जनतेतील कोणत्याही व्यक्तीस नेहमीचा व्यवहार करताना ज्या ठिकाणी इंटरनेटद्वारे कोणत्याही व्यक्तीस कोणतीही सुविधा पुरवली जाते असे ठिकाण;

(n-b) ‘सायबर सुरक्षा’ म्हणजे कोणत्याही अनधिकृत मार्गापासून, वापरापासून, उघड करण्यापासून, व्यत्ययापासून, फेरफारापासून किंवा विनाशापासून माहितीचे, साधनसामग्रीच्या, साधनांचे, संगणकांचे, संगणक साधनसंपत्तीचे, संदेशवहन साधनांचे व त्यात साठवलेल्या माहितीचे संरक्षण करणे;]

(o) ‘आधारसामग्री (डाटा)’ म्हणजे फॉर्मलाईज रीतीने तयार करण्यात येत असलेली किंवा तयार करण्यात आली असलेली आणि कॉम्प्युटर सिस्टीममध्ये किंवा कॉम्प्युटर नेटवर्कमध्ये प्रोसेस करावयाची किंवा प्रोसेस करण्यात येत असलेली किंवा प्रोसेस करण्यात आली असलेली माहिती ज्ञान, वस्तुस्थिती, संकल्पना किंवा सूचना यांचे नमुने होत आणि ते कोणत्याही स्वरूपात (कॉम्प्युटर प्रिंटआऊट, मॅग्नेटिक किंवा ऑप्टिक स्टोअरेज मीडिया, पंच कार्ड, टेप्स) किंवा कॉम्प्युटरच्या मेमरीमध्ये अंतर्गतपणे साठवलेले अशा स्वरूपात असतील;

(p) ‘डिजिटल सही (डिजिटल सिग्नेचर)’ म्हणजे कोणत्याही इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे कलम ३ च्या तरतुदींनुसार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा कार्यपद्धतीने सबस्क्रायबरने केलेले अधिप्रमाणन;

(q) ‘डिजिटल सही प्रमाणपत्र’ म्हणजे कलम ३५ च्या पोटकलम (४) अन्वये दिलेले डिजिटल सही प्रमाणपत्र;

(r) ‘इलेक्ट्रॉनिक प्रपत्र’ याचा माहितीच्या संदर्भातील अर्थ, निर्माण केलेली, पाठवलेली, मिळालेली किंवा मीडिया, मॅग्नेटिक, ऑप्टिकल, कॉम्प्युटर मेमरी, मायक्रो फिल्म किंवा कॉम्प्युटर जनरेटेड मायक्रोफिच किंवा तत्सम साधनामध्ये असलेली कोणतीही माहिती असा आहे;

(s) ‘इलेक्ट्रॉनिक गॅझेट’ म्हणजे इलेक्ट्रॉनिक प्रपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले राजपत्र;

(t) ‘इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड (अभिलेख)’ म्हणजे आधारसामग्री, अभिलेख किंवा इलेक्ट्रॉनिक फॉर्म किंवा मायक्रो फिल्म किंवा कॉम्प्युटर जनरेटेड मायक्रो फिच यामध्ये साठविलेली, प्राप्त केलेली किंवा पाठवलेली डेटा जनरेटेड प्रतिमा किंवा आवाज;

[३][t-a] ‘इलेक्ट्रॉनिक सही (सिग्नेचर)’ म्हणजे दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इलेक्ट्रॉनिक तंत्राच्या साहाय्याने एखाद्या वर्गणीदाराने (सबक्राईबर) केलेले कोणत्याही इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे अधिप्रमाणात आणि यात डिजिटल सहीचा समावेश होतो.

(t-b) ‘इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र’ म्हणजे कलम ३५ अन्वये दिलेले इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र आणि यात डिजिटल सिग्नेचर प्रमाणपत्राचा समावेश होतो;]

(u) ‘कार्य’ यामध्ये संगणकाच्या संबंधात लॉजिक, नियंत्रण, गणितीय प्रक्रिया, वगळणे, साठवणे आणि कॉम्प्युटरमधून किंवा त्याच्याबरोबर कम्युनिकेशन किंवा टेलिकम्युनिकेशन यांचा अंतर्भाव होतो;

---

१. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम ४(क) द्वारे ‘विनियमन हा शब्द वगळला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४(ड) द्वारे खंड (एन अ) व (एन ब) समाविष्ट केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४(३) द्वारे खंड (टी अ) व (टी ब) समाविष्ट केले.

[१][u-a] 'भारतीय संगणक आपत्ती निवारण पथक (इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम)' म्हणजे कलम ७०ब पोटकलम (b) अन्वये स्थापन केलेली एजन्सी.]

(v) 'माहिती' यामध्ये [२][डेटा, मेसेज, टेक्स्ट,] इमेजेस, साउंड, कोड, कॉम्प्युटर प्रोग्रॅम, सॉफ्टवेअर आणि डाटाबेसेस किंवा मायक्रो फिल्म किंवा कॉम्प्युटर जनरेटेड मायक्रोफिच यांचा अंतर्भाव होतो;

[३][(w)] कोणत्याही विशिष्ट इलेक्ट्रॉनिक अभिलेखाच्या संबंधातील 'मध्यस्थ' याचा अर्थ जी कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने तो अभिलेख स्वीकारते, साठवते किंवा पारेषित करते किंवा त्या अभिलेखाच्या संबंधात कोणतीही सेवा पुरवते अशी व्यक्ती; असा आणि त्यात दूरसंचार सेवा पुरवठाकाराचा नेटवर्क सेवा पुरवठाकारांचा, इंटरनेट सेवा पुरवठाकारांचा, सर्च इंजिन्सचा ऑनलाईन पेमेंट साईटचा (स्थळांचा), ऑनलाईन लिलाव साईटचा, ऑनलाईन मार्केट स्थळांचा आणि सायबर कॅफेचा समावेश होतो;

(x) 'की पेअर (जोडी)' ॲसिमेट्रिक क्रिप्टो सिस्टीमच्या संबंधात याचा अर्थ प्रायव्हेट की आणि त्याची गणितीयदृष्ट्या संबंधित पब्लिक की असा आहे. ज्या अशाप्रकारे संबंधित असतात की, प्रायव्हेट की द्वारे निर्माण केलेली डिजिटल सिग्नेचर पब्लिक की द्वारे पडताळता येते;

(y) 'कायदा' यामध्ये संसदेचे किंवा राज्य विधानमंडळाचे अधिनियम, राष्ट्रमंडळाचे अधिनियम, राष्ट्रपतींनी किंवा यथास्थिती राज्यपालांनी प्राख्यापित केलेले अध्यादेश, अनुच्छेद २४० अनुसार राष्ट्रपतींनी केलेले विनियम, संविधानाच्या अनुच्छेद ३५७ च्या खंड (१) च्या उपखंड (a) अन्वये राष्ट्रपतींचा अधिनियम म्हणून अधिनियमित केलेली विधेयके यांचा समावेश होतो आणि तसेच त्यात त्याअन्वये काढलेले किंवा केलेले नियम, विनियम, उपविधी आणि आदेश यांचा समावेश होतो;

(z) 'लायसेन्स' याचा अर्थ कलम २४ अन्वये प्रमाणन प्राधिकरणाला दिलेले लायसेन्स असा आहे;

(z-a) 'ओरिजिनेटर' म्हणजे जी कोणताही इलेक्ट्रॉनिक मेजेस पाठवते, निर्माण करते, साठवते किंवा पारेषित करते किंवा जी कोणताही इलेक्ट्रॉनिक मेसेज अन्य कोणत्याही व्यक्तीला पाठविण्याची, निर्माण करण्याची, साठवण्याची किंवा पारेषित करण्याची व्यवस्था करते अशी व्यक्ती मात्र त्यात मध्यस्थाचा अंतर्भाव होत नाही;

(z-b) 'विहित' म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले;

(z-c) 'प्रायव्हेट की' म्हणजे डिजिटल सिग्नेचर निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणारी की पेअरमधली की;

(z-d) 'पब्लिक की' म्हणजे डिजिटल सिग्नेचरची पडताळणी करण्यासाठी वापरण्यात येणारी आणि डिजिटल सिग्नेचर प्रमाणपत्रामध्ये सूचिबद्ध केलेली की पेअरमधली की;

(z-e) 'सुरक्षापद्धती' म्हणजे –

(a) अनाधिकृत प्रवेश आणि गैरवापर यापासून वाजवीपणे संरक्षण देते असे;

(b) विश्वासार्हता आणि अचूक वापर यासाठी वाजवी पातळीची तरतूद करते असे;

(c) उद्देशित कार्ये पार पाडण्यासाठी वाजवीरीत्या योग्य असते असे;

(d) सर्वसाधारणपणे स्वीकृत सुरक्षा कार्यपद्धतीला धरून असते असे; कॉम्प्युटर हार्डवेअर, सॉफ्टवेअर व प्रोसिजर;

---

१. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम ४८(क) द्वारे खंड (यु ए) समाविष्ट केला.

२. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम ४(जी) द्वारे दाखल.

३. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम ४(ह) द्वारे खंड (डब्ल्यू) ऐवजी दाखल.

(z-f) 'सुरक्षा कार्यपद्धती' म्हणजे केंद्र सरकारने कलम १६ अन्वये विहित केलेली सुरक्षा कार्यपद्धती;

(z-g) 'वर्गणीदार 'सबस्क्रायबर' म्हणजे जिच्या नावाने [१][इलेक्ट्रॉनिक सिग्नेचर] प्रमाणपत्र देण्यात येते ती व्यक्ती;

(z-h) 'पडताळणे' याचा डिजिटल सही, इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड किंवा पब्लिक की यांच्या व्याकरणिक फेरफार केलेल्या रूपांसह आणि तशाच अभिव्यक्तीसह अर्थ–

(a) वर्गणीदाराच्या 'पब्लिक की'शी अनुरूप अशा 'प्रायव्हेट की'चा वापर करून मूळ इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड डिजिटल सहीला जोडले आहे किंवा नाही,

(b) असे रेकॉर्ड डिजिटल सहीशी अशाप्रकारे जोडण्यात आले होते तेव्हा मूळ रेकॉर्ड जसेच्या तसे ठेवण्यात आले होते की, त्यात फेरबदल करण्यात आले होते हे निर्धारित करणे.

(२) या अधिनियमातील कोणत्याही अधिनियमितीचा किंवा तिच्या कोणत्याही तरतुदीचा अशी अधिनियमिती किंवा तरतूद ज्या क्षेत्रामध्ये अमलात नसेल, त्याच्या संबंधात अर्थ लावताना तो त्या क्षेत्रात अमलात असलेल्या तदनुरूप कायद्याचा किंवा त्या कायद्याच्या संबद्ध तरतुदीचा संदर्भ असल्याचे मानून लावण्यात येईल.

## प्रकरण नऊ

## शास्ती, मोबदला आणि अभिनिर्णय

### ४३. संगणक, संगणक यंत्रणा इ.ला नुकसान पोहोचवल्याबद्दल शास्ती आणि मोबदला :–

संगणक, संगणक यंत्रणा आणि संगणक नेटवर्क यांचा मालक त्याची प्रभारी व्यक्ती यांच्या परवानगीशिवाय जर एखादी व्यक्ती–

(a) असा संगणक, संगणक यंत्रणा आणि संगणक नेटवर्कमध्ये किंवा संगणक सांधनामध्ये प्रवेश करील किंवा प्रवेश मिळवील.

(b) असा संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्कमधून कोणताही आधारसामग्री, संगणक आधारसामग्री बेस किंवा माहिती उतरवून घेईल, नक्कल करील किंवा त्याचा गोषवारा घेईल, तसेच काढून घेण्याजोगा साठवण माध्यमात (स्टोरेज मीडियम) माहिती किंवा आधारसामग्री धारण करील किंवा साठवून ठेवील.

(c) कोणताही संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यामध्ये कोणताही संगणक दूषितक किंवा संगणक विषाणू (व्हायरस) घुसवील किंवा घुसविण्याची व्यवस्था करील.

(d) कोणतेही संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क किंवा अशा संगणकातील, संगणक यंत्रणेतील किंवा संगणक नेटवर्क आधारसामग्री, संगणक आधारसामग्री आधार किंवा इतर कोणताही कार्यक्रम याला नुकसान पोहचवील नुकसान पोहचवण्याची व्यवस्था करील.

(e) कोणताही संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यांमध्ये अडथळा आणेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न करेल.

(f) संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यामध्ये प्रवेश करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मार्गाने प्रवेश नाकारील किंवा नाकारण्याची व्यवस्था करील.

(g) कोणत्याही व्यक्तीला संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यामध्ये या अधिनियमाच्या आणि त्याखाली

---

१. सन २००८ च्या सुधारणा अधिनियमाच्या कलम २ द्वारे दाखल.

तयार करण्यात आलेले विनियम व नियम यांच्या तरतुदींचे उल्लंघन करून प्रवेश करण्यास साहाय्य करील किंवा ते सुकर करील.

(h) एखाद्या व्यक्तीने उपलब्ध करून घेतलेल्या सेवांचा आकार एखाद्या संगणकामध्ये, संगणक यंत्रणेमध्ये किंवा संगणक नेटवर्कमध्ये अदलाबदल करून किंवा लबाडीने फेरफार करून दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यावर आकारील.

(i) कोणत्याही संगणकातील माहिती नष्ट करील किंवा खोडून टाकेल किंवा त्यात बदल करेल किंवा त्याचे महत्त्व कमी करेल किंवा उपयुक्तता किंवा संगणकातील माहितीला कुठल्याही तऱ्हेने इजा पोहचवेल.

(j) चोरण्यास, लपवल्यास, नष्ट केल्यास किंवा बदलल्यास किंवा कुठल्याही व्यक्तीला चोरण्यासाठी, लपवण्यासाठी, नष्ट करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी कारणीभूत असेल असा संगणकातील सोर्स कोड जो संगणक साधनात वापरला गेला आहे, त्याला नुकसान पोहोचवण्याच्या उद्देशाने करतो.

ती, अशाप्रकारे बाधित झालेल्या व्यक्तीला नुकसानभरपाई देण्यास जबाबदार असेल.

**स्पष्टीकरण :–** या कलमाच्या प्रयोजनासाठी –

(i) संगणक दूषितक म्हणजे –

(a) संगणक, संगणक यंत्रणा आणि संगणक नेटवर्क यामध्ये असलेली आधारसामग्री किंवा कार्यक्रम यात फेरबदल करण्यासाठी, तो नष्ट करण्यासाठी, अभिलेखित करण्यासाठी किंवा पारेषित करण्यासाठी.

(b) संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क याचे सर्वसाधारण प्रवर्तन कोणत्याही मार्गाने बळावण्यासाठी तयार केलेला कोणताही संगणक निदेश संच.

(ii) संगणक आधारसामग्री म्हणजे औपचारिक रीतीने तयार करण्यात येत असलेल्या किंवा करण्यात आलेल्या किंवा संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्कव्दारे उत्पादन करण्यात आलेल्या टेक्स्ट, इमेज, ध्वनी किंवा चित्रण मधील माहिती, ज्ञान तथ्ये, संकल्पना किंवा निदेश यांचे प्रतीक आणि संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यामध्ये त्याचा वापर करण्यासाठी उद्देशित असते.

(iii) संगणक विषाणू (व्हायरस) म्हणजे, संगणक साधनमार्गाच्या कार्यचलनाचा नाश करणारा, त्याला नुकसान पोहचवणारा, त्याचा दर्जा कमी करणारा किंवा त्यावर प्रतिकूल परिणाम किंवा स्वत:च दुसऱ्या संगणक साधनाचा किंवा ऑपरेटरचा कार्यक्रम, आधारसामग्री किंवा निदेशन यांची अंमलबजावणी केली जात असताना त्यावर किंवा संगणक सामग्रीच्या इतर कोणत्याही प्रसंगी त्यावर हल्ला करणारा कोणताही संगणक निदेश, माहिती, आधारसामग्री किंवा कार्यक्रम.

(iv) हानी म्हणजे, कोणताही संगणक साधनमार्ग कोणत्याही साधनाव्दारे नष्ट करणे यात फेरबदल करणे, तो वगळणे, त्यात भर घालणे किंवा त्याची पुन्हा रचना करणे.

(v) संगणक सोर्स कोड म्हणजे प्रोग्रॅमची यादी, संगणकातील कमांड्स, आराखडा आणि आकृती आणि कुठल्याही स्वरूपातील संगणक साधनाचे प्रोग्रॅम विश्लेषण.

### ४३–A. डेटा सांभाळण्यास अयशस्वी झालात तर नुकसानभरपाई :–

जेव्हा एक कॉर्पोरेट बॉडी जिच्याकडे ताबा, व्यवहार किंवा कुठल्याही वैयक्तिक डेटा हाताळणे अशी किंवा माहिती जी संगणक साधनात तिच्या मालकीची आहे, सांभाळत आहे किंवा चालवत आहे, ही कॉर्पोरेट बॉडी निष्काळजीपणे कार्यान्वित आणि योग्य सुरक्षा पद्धती आचारत आणि कार्यपद्धती आहे आणि त्यामुळे कुठल्याही व्यक्तीला दोषपूर्ण नुकसान किंवा सदोष फायदा मिळतो, अशी कॉर्पोरेट बॉडी त्या व्यक्तीस मोबदला स्वरूपात नुकसानभरपाई देण्यास जबाबदार राहील.

**स्पष्टीकरण :** या कलमाच्या प्रयोजनासाठी –

(i) बॉडी कॉर्पोरेट म्हणजे कुठलीही कंपनी आणि यामध्ये एक फर्म, सोल प्रोप्रायटरशिप किंवा दुसरे असे वैयक्तिक लोकांचे असे संघटन जे व्यवसायात धंद्यात कार्यरत आहे.

(ii) समंजस सुरक्षापद्धती आणि कार्यपद्धती म्हणजे सुरक्षापद्धती आणि कार्यपद्धती अशी रूपरेखित असेल जी माहितीला अनधिकृत प्रवेश, नुकसान, वापर, बदल करणे, उघडकीस आणणे किंवा दुर्बलित करणे ह्यापासून सुरक्षित करेल, ही कार्यपद्धती दोन्ही पक्षांच्या करारामध्ये नमूद केलेले किंवा कुठल्याही कायद्याखाली निर्देशित केलेले आणि कुठलेही असे करार किंवा कायदा नसताना, व्यावसायिक बॉडी व संघटना यांच्याकडे सल्लामसलत करून केंद्र शासनाने जे ठीक वाटेल ते नमूद केलेले समंजस सुरक्षापद्धती आणि कार्यपद्धती.

(iii) संवेदनशील वैयक्तिक डेटा किंवा माहिती म्हणजे अशी वैयक्तिक माहिती जी व्यावसायिक बॉडी व संघटना यांच्याकडे सल्लामसलत करून केंद्र शासनाने जे ठीक वाटेल ते नमूद केलेले.

**४४. माहिती, विवरणे, इत्यादी देण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा (शास्ती ) :–**

जर हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा विनियम अन्वये तसे करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही व्यक्तीने –

(a) प्रमाण न करणाऱ्या प्राधिकरणाच्या कोणत्याही नियंत्रणाला कोणतेही दस्तऐवज, विवरण किंवा अहवाल देण्यात कसूर केल्यास अशा प्रत्येक कसुरीसाठी तो एक लाख पन्नास हजार रूपये इतका दंड भरण्यास जबाबदार ठरेल.

(b) विनियमामध्ये कोणतेही विवरण भरण्यासाठी किंवा कोणतीही माहिती, पुस्तके किंवा अन्य दस्तऐवज देण्यासाठी कालावधी विनिर्दिष्ट केला असताना त्या विनिर्दिष्ट कालावधीत विवरण फाईल करण्यात किंवा अन्य गोष्टी पुरविण्यात कसूर केल्यास, अशी कसूर चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडास जबाबदार असेल.

(c) लेखी पुस्तके किंवा अभिलेख ठेवणे आवश्यक असताना ते ठेवण्यात कसूर करील, तर अशी कसूर चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी दहा हजार रुपयापेक्षा अधिक नसेल इतक्या दंडास जबाबदार असेल.

**४५. उर्वरित शिक्षा (शास्ती) :–**

जो कोणी या अधिनियमाखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांचे उल्लंघन करील व त्यासाठी कोणत्याही स्वतंत्र शास्तीची तरतूद करण्यात आली नसल्यास, अशा उल्लंघनामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक अशी भरपाई देण्यास तो जबाबदार असेल.

**४६. अभिनिर्णय करण्याचा अधिकार :–**

(१) कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा त्या खाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा विनियमांच्या निदेशांचे किंवा आदेशाचे उल्लंघन केल्यास तो तरतुदींनुसार मोबदला व शास्ती हे दोन्ही देण्यास पात्र होईल याबाबत या प्रकरणाअन्वये अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी, केंद्र शासनाला पोटकलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, भारत सरकारचा संचालक किंवा राज्य शासनाचा त्याला समतुल्य अधिकारी यापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या एका अधिकाऱ्याची, केंद्र शासनाने विहित केलेल्या रीतीने चौकशी करण्यासाठीचा अभिनिर्णय करणारा अधिकारी म्हणून नियुक्ती करील.

(१–a) पोटकलम (१) खाली नेमणूक झालेल्या अभिनिर्णय करणाऱ्या अधिकाऱ्याला जर ५ करोडपेक्षा जास्त हानी किंवा नुकसानभरपाई करणे असेल तर त्याला निलंबित करण्याचा अधिकार हा अभिनिर्णय करणाऱ्या अधिकाऱ्याच्या अधिकारात बसत नाही; परंतु ५ करोडपेक्षा जास्त हानी किंवा नुकसानभरपाई असेल तर, तो अधिकार सक्षम न्यायालयाला देण्यात आला आहे.

(२) अभिनिर्णय करणारा अधिकारी पोटकलम (१)मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला त्या बाबतीत बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशी चौकशी करील व त्यात त्या व्यक्तीने उल्लंघन केले आहे याबाबत त्याचे समाधान झाले असल्यास, तो त्या कलमाच्या तरतुदींनुसार त्याला योग्य वाटेल अशी शिक्षा लादेल किंवा अशी भरपाई देण्याचा निर्णय देईल.

(३) कोणतीही व्यक्ती केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल अशी माहिती तंत्रज्ञानातील अनुभव आणि कायदेविषयक किंवा न्यायिक अनुभव धारण करीत असल्याशिवाय तिची अभिनिर्णय करणारा अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येणार नाही.

(४) एकापेक्षा अधिक अभिनिर्णय करणाऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्यास असा अधिकारी कोणत्या बाबतीत आणि कोणत्या ठिकाणी आपल्या अधिकारितेचा वापर करू शकेल, याबाबत केंद्र शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील.

(५) कलम ५८ च्या पोटकलम ((२) अन्वये सायबर अपील न्यायालयाला दिवाणी न्यायालयाचे जे अधिकार देण्यात आले असतील तेच अधिकार प्रत्येक अभिनिर्णय करणाऱ्या अधिकाऱ्याला असतील आणि –

(a) त्याच्या समोरील सर्व कार्यवाह्या या भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ व २२८ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाह्या असल्याचे मानण्यात येईल;

(b) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३४५ व ३४६ च्या प्रयोजनासाठी ते दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल;

(c) दिवाणी कार्यवाही आदेश २१ च्या प्रयोजनांसाठी ते दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**४७. अभिनिर्णय करणाऱ्या अधिकाऱ्याने विचारात घ्यावयाच्या गोष्टी :–**

या प्रकरणाखालील भरपाईच्या परिणामाचा अभिनिर्णय करताना अभिनिर्णय करणाऱ्या अधिकाऱ्याने पुढील गोष्टींकडे पुरेसे लक्ष पुरविले पाहिजे :

(a) जेथे मोजणे शक्य असेल तेथे, कसुरीचा परिणाम म्हणून किती रकमेच्या अयोग्य फायद्याचा लाभ होईल;

(b) कसुरीचा परिणाम म्हणून एखाद्या व्यक्तीला किती रकमेचा तोटा होईल;

(c) कसुरी पुन्हा पुन्हा होण्याची शक्यता.

## प्रकरण अकरा

## अपराध

**६५. संगणकाच्या मूळ दस्तऐवजात फेरबदल करणे :–**

जो कोणी संगणक, संगणक कार्यक्रम, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यासाठी वापरण्यात आलेला संगणक साधनमार्गकोड तो त्यावेळी अमलात असलेल्या कायद्यानुसार ठेवणे किंवा जतन करणे आवश्यक असताना जाणीवपूर्वक किंवा हेतुपूर्वक लपवील, नष्ट करील किंवा फेरफार करील किंवा हेतुपूर्वक किंवा जाणीवपूर्वक अन्य व्यक्तीला तो लपविण्यास किंवा नष्ट करण्यास किंवा फेरफार करण्यास लावील, त्याला तीन वर्षांपर्यंतची कारावासाची शिक्षा किंवा दोन लाख रुपयांपर्यंत दंड किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण –** या कलमाच्या प्रयोजनासाठी ''संगणक साधनामार्ग संकेताक्षर'' म्हणजे कार्यक्रम संगणक कमांड, संकल्पचित्र व आराखडा यांची सूत्रे करणे आणि संगणक साधनामार्गाचे कार्यक्रम विश्लेषण कोणत्याही स्वरूपात करणे.

**६६. संगणक संबंधित गुन्हे :–**

कुठल्याही व्यक्तीने कलम ४३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अप्रामाणिकपणे किंवा फसवणूक करून कोणतेही या कायद्याशी निगडित काम केले तर त्याला ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा ५ लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होतील.

स्पष्टीकरण : ह्या कलमासाठी,

(a) अप्रामाणिक शब्दाचा अर्थ आयपीसीच्या, १८६० कलम २४ मध्ये नमूद केलेल्या अर्थानुसार;

(b) फसवणूक शब्दाचा अर्थ आयपीसीच्या, १८६० कलम २५ मध्ये नमूद केलेल्या अर्थानुसार;

**६६–A. कम्युनिकेशन सेवेच्या माध्यमातून आक्षेपार्ह मेसेज पाठविण्यासाठी दंड :–**

कुठल्याही व्यक्तीने संगणक साधन किंवा कम्युनिकेशन डिवाईसच्या माध्यमातून खालील माहिती पाठवली –

(a) कुठलीही माहिती ही घोर आक्षेपार्ह किंवा जी धमकीपूर्ण चारित्र्य; किंवा

(b) कुठलीही माहिती त्याला माहीत आहे की खोटी आहे, परंतु फक्त छळ करणे, गैरसोय, अडवणूक, अपमान, हानी पोहोचविणे, गुन्हेगारी दहशत निर्माण करणे, दुश्मनी, तिरस्कार किंवा शत्रुत्व हे करण्यासाठी दीर्घप्रयत्नी संगणक साधन किंवा कम्युनिकेशन डिवाईसचा वापर केला;

(c) कुठलाही इलेक्ट्रॉनिक मेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेल मेसेज छळ करण्यासाठी किंवा गैरसोय करण्यासाठी किंवा फसविण्यासाठी किंवा तो मूळचा मेसेज कोठून आला त्या संदर्भात पाठवणाऱ्यास व येणाऱ्या भ्रम निर्माण करणे.

या गुन्ह्यासाठी ३ वर्षांपर्यंत कारावास आणि दंड या दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण :** ह्या कलमासाठी 'इलेक्ट्रॉनिक मेल' किंवा 'इलेक्ट्रॉनिक मेल मेसेज' म्हणजे मेसेज किंवा निर्माण केलेली माहिती किंवा प्रक्षेपित केलेली किंवा संगणकावर मिळालेली, संगणक प्रणाली, संगणकसाधन किंवा कम्युनिकेशन डिवाइसेस, यासह ॲटॅचमेंट, ई– मेल, व्हिडिओ, ऑडिओ किंवा आणखी कोणताही इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड जे शक्यता मेसेजसोबत प्रक्षेपित झाले.

**६६–B. कम्युनिकेशन डिवाईसेस किंवा अप्रामाणिकपणे मिळालेल्या चोरीच्या संगणकातील साधन ह्यासाठी शिक्षा :–**

कोणीही अप्रामाणिकपणे चोरलेले संगणकसाधन किंवा कम्युनिकेशन डिवाईस घेतो किंवा आपल्या जवळ ठेवतो, हे माहीत असून किंवा असे कुठलेही कारण याने असा विश्वास होईल की ते संगणकसाधन किंवा कम्युनिकेशन डिवाईस चोरीचे आहे. त्याला ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा १ लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**६६–C. आयडेन्टीटी थेफ्ट्साठी शिक्षा :–**

कोणीही, फसवून किंवा अप्रामाणिकपणे एखाद्या व्यक्तीची इलेक्ट्रॉनिक सही, पासवर्ड किंवा आणखी कुठले विश्लेषण असे ओळख पटवण्याचे साधन वापरले तर त्याला ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा १ लाख रुपयांपर्यंत दंड ह्या शिक्षेस पात्र असेल.

**६६–D. संगणक साधनाचा वापर करून वेषधारणाव्दारे फसवणूक केल्यास शिक्षा :–**

कोणाही, कम्युनिकेशन डिवाईस किंवा संगणक साधनाव्दारे वेषधारण करून फसवणूक केल्यास, त्याला ३ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड ह्या शिक्षा होऊ शकतात.

**६६–E. गुप्ततेचा भंग केल्यास शिक्षा :–**

कोणीही जाणूनबुजून किंवा माहितीपूर्वक कुठल्याही व्यक्तीच्या गुप्त भागाचे त्यांच्या/ तिच्या परवानगीशिवाय चित्रीकरण हस्तगत केले, प्रसिद्ध केले अशा परिस्थितीतून त्या व्यक्तीची गुप्तता भंग केली, तर ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा २ लाख रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**स्पष्टीकरण :** ह्या कलमासाठी –

(a) 'प्रेषित' (Transmit) म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे दिसणारे चित्र जे व्यक्तीने किंवा लोकांनी पाहावे या उद्देशाने पाठविले असेल.

(b) 'हस्तगत करणे' (capture) चित्राच्या संदर्भात, व्हिडिओ टेप, छायाचित्रे, सिनेमा, किंवा आणखीन कुठल्याही माध्यमाव्दारे अभिलेखिले असतील.

(c) 'गुप्त भाग (Private Area) म्हणजे नग्न किंवा अंतरवस्त्रे घातलेला, सार्वजनिक भाग, नितंब, किंवा महिलांचा छातीचा भाग.

(d) 'प्रसिद्ध करणे' (Publishers) म्हणजे छापील किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे पुन:र्निर्माण करणे आणि जनतेसाठी उपलब्ध करणे.

(e) 'परिस्थितिजन्य गुप्ततेचा भंग '(Under circumstances violating) म्हणजे अशी परिस्थिती यात माणसाला अशा वाजवी अपेक्षा असतात की–

(१) तो किंवा ती एकांतात निवस्त्र अवस्थेत असताना, त्यांना ह्यांची जाणीव नसते की त्यांच्या गुप्तनीय भागाचे चित्र हस्तगत होत आहेत, किंवा

(२) त्याचा किंवा तिचा कुठलाही गुप्त भाग हा लोकांच्या दृष्टीस दिसू नये, मग ते खाजगी ठिकाण असेल किंवा सार्वजनिक ठिकाण.

**६६–F. सायबर आतंकवादासाठी शिक्षा :–**

(१) जो कोणी –

(a) भारताची एकात्मता, नियम, सुरक्षा किंवा सार्वभौमत्वाला बाधा आणण्यासाठी किंवा जनतेमध्ये आतंकवाद उगमण्यासाठी किंवा काही विभागातील लोकांसाठी–

(i) कुठल्याही अधिकृत व्यक्तीला संगणक हाताळण्यासाठी नाकारणे किंवा नाकारण्यास कारणीभूत होणे किंवा

(ii) संगणकात शिरण्याचा प्रयत्न करणे किंवा कायदेशीर परवानगीशिवाय संगणकातील साधनापर्यंत पोहोचणे किंवा त्याचा कायदेशीर परवानगीपेक्षा जास्त वापर करणे, किंवा

(iii) संगणक बाधा घुसवील किंवा तशी व्यवस्था करील, आणि हे सर्व करून ह्यामुळे जर जनता मृत्युमुखी पडली किंवा इजाग्रस्त झाली किंवा नुकसान किंवा मालमत्ता नष्ट झाली किंवा विस्कळीत झाली किंवा जाणीवपूर्वक नुकसान केले किंवा या रोजच्या जीवनातील महत्त्वाच्या सेवा आहेत त्यांना विस्कळीत केले किंवा त्यांचा कलम ७० मध्ये नमूद केलेल्या पायाभूत घटकांवर विपरीत परिणाम झाला, किंवा

(b) जाणीवपूर्वक किंवा उद्देशपूर्वक संगणक प्रणालीत शिरणे किंवा कायदेशीर परवानगीशिवाय संगणक साधनात प्रवेश केला किंवा त्यांच्या कायदेशीर परवानगीपेक्षा जास्त प्रवेश केला आणि त्यामुळे त्यांना माहितीपर्यंत पोहोचला, आपल्या देशाचा डेटा व परराष्ट्रीय संबंधाच्या सुरक्षेसाठी वापरत आलेला सुरक्षेचा संगणक डेटाबेस, त्यावर विश्वास ठेवून ती माहिती, डेटा, संगणक डेटाबेस ह्यांचा वापर करून देशाच्या सार्वभौमत्वाला इजा पोहोचवली जाते आणि भारताच्या निष्ठेला हानी पोहोचेल, देशाची सुरक्षा, परराष्ट्रीय देशासोबतचे मैत्रीचे नाते, जनतेचे आदेश, सभ्यता, सदाचरण किंवा न्यायालयाचा अपमान करणे, अश्लीलता किंवा गुन्ह्याला उत्तेजना देणे किंवा परराष्ट्रीय देशांचा फायदा करणे, मग तो एकट्याने किंवा टोळीने मिळून केला असेल किंवा आणखी काही, हा सायबर आतंकवादाचा गुन्हा झाला.

(२) जो कोणीही सायबर आतंकवाद हा गुन्हा करेल किंवा हा गुन्हा करण्यासाठी कट करेल, तो कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, जी आजीवन कारावासापर्यंत सुद्धा होऊ शकते.

**६७. अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध किंवा प्रेषित करणाऱ्यास शिक्षा :–**

जो कोणी, कामोद्दिपक किंवा वैषयिक भावना चाळवणारे किंवा सर्व संबंध परिस्थिती विचारात घेता ज्या व्यक्ती ते वाचण्याची किंवा पाहण्याची किंवा त्यामध्ये समाविष्ट असलेला मजकूर ऐकण्याची शक्यता आहे, व्यक्तींना कूमार्गाला लावण्याचा किंवा भ्रष्ट करण्याचा उद्देश असलेले कोणतेही साहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करील किंवा प्रेषित करील किंवा प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील तो प्रथम दोषसिद्धीच्या बाबतीत तीन वर्षांच्या कालावधीच्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाच्या शिक्षेस आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र असेल. दुसऱ्या आणि नंतरच्या दोषसिद्धीच्या बाबतीत पाच वर्षांपर्यंत असू शकेल अशा कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस आणि दहा लाख रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**६७–A. अश्लील मजकूर प्रसिद्ध करणारे साहित्य किंवा भावना चाळवणारे साहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपातून प्रसिद्ध किंवा प्रेषित करणाऱ्यास शिक्षा :–**

जो कोणी लैंगिकता उघडकीस आणणारे कुठलेही साहित्य यामध्ये वैयक्तिक भावना चाळवणारे संचालन (वर्तणक) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रसिद्ध करेल किंवा प्रेषित करेल किंवा प्रसिद्ध करण्यास कारणीभूत ठरेल त्यास प्रथम दोषसिद्धीच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत कारावास आणि १० लाख रुपये दंड किंवा दुसऱ्या आणि नंतरच्या दोषसिद्धीच्या बाबतीत ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १० लाख रुपये दंड अशा शिक्षेस पात्र असेल.

**६७–B. लहान मुलांचे अश्लील शब्दचित्र रेखाटून भावना चाळवणारे साहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध किंवा प्रेषित करणाऱ्यास शिक्षा :–**

जो कोणी–

(a) प्रसिद्ध किंवा प्रेषित किंवा प्रसिद्ध करण्यास कारणीभूत ठरणारा किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात यामध्ये लहान मुलांचे अश्लील शब्दचित्र रेखाटून भावना चाळवणारे वर्णन साहित्य रूपात प्रेषित केल्यास किंवा वर्तणूक केल्यास, किंवा

(b) मजकूर बनविल्यास किंवा डिजिटल चित्रे गोळा केल्यास, शोधल्यास, मनोरंजनासाठी डाउनलोड केल्यास, जाहिरात केल्यास, वाढविल्यास, विनिमय (अदलबदल) केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात यामध्ये लहान मुलांचे अश्लील शब्दचित्र रेखाटून भावना चाळवणारे साहित्य वाटप केल्यास, किंवा

(c) जोपासून, फूस लावून, प्रवृत्त करून ऑनलाईन नाते एक किंवा अनेक मुलांसोबत जोडणे आणि उघडपणे लैंगिक कृती किंवा अशी कुठलीही कृती संगणक साधनावर एका प्रौढ माणसाला दुखावेल अशी, किंवा

(d) ऑनलाईन लहान मुलांना अपमानित करण्यास सुकर करणे, किंवा

(e) कुठल्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये स्वत: केलेली वाईट वागणूक किंवा कोणी दुसऱ्याने केलेली उघडपणे लैंगिक कृती मुलांसोबत रेकॉर्ड करणे,

प्रथम दोषसिद्धीच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंड आणि दुसऱ्या किंवा पुढील दोष निवाड्याबाबतीत ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकते.

परंतु कलम ६७ आणि ६७–A हे कलम कुठल्याही पुस्तकापर्यंत, पेपर, चित्रकार, लिहिणे, चित्रकला, पॅम्पलेट किंवा मानवी आकृती इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे असेल तर तेथे येत नाही–

(i) जर पुस्तक, चित्रकला, पॅम्पलेट, लेख किंवा मानवी आकृती ह्या वैज्ञानिक कला लिटरेचर किंवा शिकण्यासाठी किंवा आणखी दुसऱ्या चांगल्या जनतेच्या हितासाठी प्रसिद्ध करण्यात आले असेल तर, किंवा

(ii) वडिलोपार्जित किंवा धार्मिक कारणासाठी सद्‌भावपूर्वक ठेवले असेल किंवा वापरात आणले असेल,

**स्पष्टीकरण –** ह्या कलमासाठी लहान मुले म्हणजे या मुलांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आहे.

**६७–C. मध्यस्थी करणाऱ्यांनी ती माहिती जतन आणि धारण करावी :–**

(१) मध्यस्थी करणाऱ्यांनी ती माहिती केंद्र शासनाने नमूद केलेल्या कालावधीसाठी आणि नमूद केलेल्या स्वरूपात व त्याच नमुन्याप्रमाणे जतन व धारण करून ठेवावी.

(२) मध्यस्थी करणाऱ्याने जर जाणीवपूर्वक किंवा उद्देशपूर्वक पोटकलम (१) ची तरतूद भंग केली तर तो ३ वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा आणि दंड यास पात्र असेल.

**६८. निदेश देण्यात नियंत्रकाचे अधिकार :–**

(१) नियंत्रकाला या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा विनियमांच्या तरतुदींचे पालन होईल हे निश्चित करण्यासाठी आवश्यक असल्यास तो प्रमाणन प्राधिकरणाला किंवा अशा प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा उपाययोजना करण्याचे किंवा अशा कृती करणे बंद करण्याचा निदेश देता येईल.

(२) कोणतीही व्यक्ती नियोजनपूर्वक किंवा जाणूनबुजून पोटकलम (१) मधील कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात कसूर करील अशा अपराधाबद्दल दोषी ठरेल आणि ती दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कारावासाच्या शिक्षेस किंवा एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दंडास किंवा या दोन्हीस पात्र ठरेल.

**६९. गतिरोध करण्यासाठी किंवा देखरेख करण्यासाठी किंवा माहिती विस्तारित करण्याची सुविधा संगणकाच्या माध्यमाद्वारे अधिकाराने निर्देश करता येईल :–**

(१) केंद्र शासन किंवा राज्य शासन किंवा कुठल्याही अधिकारी (केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने नियुक्त केलेला) जशी वेळ असेल तसे किंवा त्याच्या व्यतिरिक्त भारताची सार्वभौमता किंवा एकात्मता, राज्याची सुरक्षा, विदेशी राज्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्यासाठी किंवा लोक व्यवस्थापनासाठी किंवा कोणताही दखलपात्र अपराध करण्याच्या प्रवृत्तीस प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे याबाबत वरील शोध व गुन्हे, किंवा पोटकलम (२) मध्ये लिहिलेली कारणे, आदेशानुसार, योग्य अशा शासनाची एजन्सीमध्ये स्थापना करते, देखरेख करते किंवा डीक्रिएशन संगणकाच्याद्वारे त्यात माहिती काढून गतिरोध करून, देखरेख करून संगणकात ठेवते.

(२) या पद्धतीने आणि सुरक्षिततेने गतिरोध, देखरेख, डीक्रिएशन हे झाले पाहिजे असे नमूद करते.

(३) वर्गणीदार व मध्यस्थी किंवा कुणी आणखीन एखादी व्यक्ती संगणकाच्या सामग्रीची प्रभारी पोटकलम (१)मध्ये निदेश देण्यात येईल तेव्हा कोणतीही एजन्सी फर्मावेल तसे तांत्रिक साहाय्य पुरवील–

(a) साधन वापरण्याची किंवा संगणक साधन सुरक्षेसाठी माध्यम घेण्यासाठी किंवा माहिती जमा करून ठेवण्यासाठी, किंवा

(b) माहिती गतिरोध करण्यासाठी, देखरेख किंवा डिक्रीप्ट करण्यासाठी जशी वेळ असेल तसे; किंवा

(c) संगणकात जमा असलेली माहिती पुरविणे.

(४) वर्गणीदार, मध्यस्थी व पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एजन्सीला साहाय्य करण्यात कसूर करणारी कोणतीही व्यक्ती, ७ वर्षे कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.

**६९–A. संगणकाच्या माध्यमाद्वारे जनतेने वापरात येणारी माहिती अडविण्याचा आदेश सोडण्याचा अधिकार :–**

(१) जर केंद्र शासनाने किंवा त्यांच्या विशिष्ट अशा निवडलेल्या अधिकाऱ्याने जर जरुरी असेल तर, भारताची सार्वभौमता

किंवा एकात्मता, राज्याची सुरक्षा, विदेशी राज्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्यासाठी किंवा लोक व्यवस्थापनासाठी किंवा कोणताही दखलपात्र अपराध करण्याच्या प्रवृत्तीस प्रतिबंध करण्यासाठी पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे जर लेखी नमूद करून आदेशाव्दारे, कोणत्याही शासकीय एजन्सीला किंवा मध्यस्थीला कोणत्याही संगणक साधन मार्गाव्दारे वापरात येणारी माहिती मध्येच अडविण्याचा निर्देश देता येईल.

(२) प्रक्रिया आणि सुरक्षा ह्या माहिती अडविण्यासाठी वापरात आल्या आहे, त्या नमूद केल्याप्रमाणेच वापरात येतील.

(३) पोटकलम (१)मध्ये नमूद केलेल्या मध्यस्थीने साहाय्य करण्यास कसूर केल्यास तो ७ वर्षांपर्यंत कारावासाच्या शिक्षेस आणि दंड या शिक्षेस पात्र होईल.

**६९–B. सायबर सुरक्षेसाठी संगणकाच्याव्दारे अधिकृत देखरेख करणे व ट्रॅफिक डेटा गोळा करण्याचे अधिकार :–**

(१) केंद्र शासन सायबर सुरक्षा वाढविण्यासाठी आणि ओळख पटविण्यासाठी, निष्कर्ष आणि आगंतुकता प्रतिबंध करण्यासाठी किंवा देशभरात संगणक सुस्थितीत पसरविण्यासाठी राजपत्रात प्रसिद्ध करेल, शासनाच्या एजन्सी देखरेख करतील आणि ट्रॅफिक डेटा जमा करतील किंवा माहिती मिळालेली, पारेषित केलेली किंवा संगणकात जमा असलेली.

(२) मध्यस्थी किंवा आणखी दुसरी कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एजन्सीला ऑनलाइन सुविधा, पारेषित, आलेला डेटा आणि ट्रॅफिक डेटा जमा झालेला किंवा आणखी काही माहिती.

(३) प्रक्रिया आणि डेटा ह्या देखरेख करण्याची आणि ट्रॅफिक डेटा किंवा माहिती जमा करण्याची प्रक्रिया जशी नमूद केली आहे त्याचप्रमाणे वापरात येईल.

(४) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मध्यस्थीला जाणूनबुजून किंवा उद्देशपूर्वक त्या प्रक्रिया अंमलात आणल्या नाहीत तर ३ वर्षांपर्यंत कारावास व दंड ह्या शिक्षेस पात्र राहावे लागेल.

**स्पष्टीकरण :** ह्या कलमासाठी,

(i) 'संगणक कंटामेन्ट' म्हणजे कलम ४३ प्रमाणे

(ii) ' ट्रॅफिक डेटा ' म्हणजे व्यक्तीला ओळखण्यासाठी संगणक सिस्टिम, संगणक नेटवर्क, जागा, कुठल्याही कम्युनिकेशन डिवाईसेस, वेळ, रूट कुठून डेटा आला, कुठे गेला, त्याची सर्व माहिती असलेला ट्रॅफिक डेटा.

**७०. सुरक्षित यंत्रणा :–**

(१) समुचित शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, कोणत्याही संगणक साधनाला जो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष क्रिटिकल इन्फॉर्मेशन, इनफ्रास्ट्रक्चर, नेटवर्क सुरक्षित यंत्रणांवर परिणाम करत असेल असे घोषित करू शकेल.

**स्पष्टीकरण –** ह्या कलमासाठी क्रिटीकल इन्फॉर्मेशन इनफ्रास्ट्रक्चर म्हणजे संगणक माध्यम, अयोग्यता किंवा त्याचा नाश, याचा कमकुवतपणा देशाच्या सुरक्षिततेवर, आर्थिकतेवर, जनतेच्या आरोग्यावर किंवा सुरक्षिततेवर परिणाम करेल.

(२) समुचित शासन, पोटकलम (१)अन्वये अधिसूचित केलेल्या सुरक्षित यंत्रणेत यांना प्रवेश करता येईल अशा व्यक्तींना लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करू शकेल.

(३) जो कोणी व्यक्ती या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून सुरक्षित यंत्रणेत प्रवेश मिळवील किंवा तसा प्रयत्न करील ती व्यक्ती दहा वर्षांपर्यंत असू शकेल अशा कोणत्याही वर्णनाच्या कारावासास आणि दंडासही पात्र ठरेल.

(४) केंद्र शासनाने नेमलेली माहिती सुरक्षापद्धती त्या सिस्टीमला सुरक्षित ठेवण्यासाठी आहे.

**७०–A. राष्ट्रीय नोडल एजन्सी :–**

(१) केंद्र शासन या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही राज्य शासनाच्या संघटनेला राष्ट्रीय नोडल एजन्सी म्हणून क्रिटीकल इन्फॉरमेशन इनफ्रास्ट्रक्चर प्रोटेक्शनसाठी निवडेल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली राष्ट्रीय नोडल एजन्सी ही पूर्णपणे उपाययोजना यामध्ये संशोधन आणि विकासाशी संबंधित क्रिटीकल इन्फॉर्मेशन इन्फ्रास्ट्रक्चरच्या सुरक्षेसाठी जबाबदार असेल.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे या एजन्सीला त्यांची सर्व कर्तव्ये आणि कामे ही त्यांना नेमून दिलेल्या मार्गाने अमलात येतील.

**७०–B. राष्ट्रीय एजन्सी (भारतीय संगणक तत्काल प्रतिक्रिया टीम) जेथे अपघात झाला तेथे प्रतिक्रिया देते :–**

(१) केंद्र शासन या अधिनियमांच्या प्रयोजनासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे ''भारतीय संगणक तत्काल प्रतिक्रिया टीम'' ही शासनाची एजन्सी म्हणून नेमणूक करते.

(२) केंद्र शासन हे पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे जनरल अध्यक्ष आणि बाकीचे अधिकारी आणि कर्मचारी एजन्सी नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध करतात.

(३) जनरल अध्यक्ष, बाकीचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन भत्ते, अटी आणि शर्ती नमूद/विहित केल्याप्रमाणे असतील.

(४) भारतीय संगणक तत्काल प्रतिक्रिया टीम ही राष्ट्रीय एजन्सी म्हणून सायबर सुरक्षा या विभागासाठी खालील कार्य करेल.

(a) सायबर घटनेवरील माहिती गोळा करणे, त्यांचे विश्लेषण व प्रचार करणे.

(b) सायबर सुरक्षा घटना भाकित आणि जागृत करणे.

(c) सायबर सुरक्षा घटना हाताळण्यासाठी तत्काळ उपाय.

(d) सायबर घटनांच्या उद्योगांच्या प्रतिक्रियांचे समन्वय.

(e) सायबर घटनांशी संबंधित माहिती देण्यासाठी, मार्गदर्शन, भेदनीयता, संबंधित नोट्स आणि माहिती सुरक्षा पद्धती संबंधित सफेद कागद, पद्धती, प्रतिबंधके, प्रतिक्रिया आणि सायबर घटना संबंधित अहवाल प्रसिद्ध करावे.

(f) सायबर घटनांशी संबंधित आणखी काही जुडलेली कामे जी नमूद केली असतील.

(५) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एजन्सीला त्यांची कर्तव्ये आणि कामे ही त्यांना नेमून दिलेल्या मार्गाने अंमलात येतील.

(६) पोटकलम (४) मधील तरतूद पूर्ण करण्यासाठी, एजन्सीला पोटकलम (१) निर्देशित करते अथवा माहितीसाठी फोन करते आणि सेवा पुरविणाऱ्या, मध्यस्थीला, डेटा सेंटरला, कॉर्पोरेट बॉडीला किंवा आणखीन कुठल्या व्यक्तीला सूचना देते.

(७) कुणीही सेवा देणारा, मध्यस्थी, डेटा सेंटर, कॉर्पोरेट बॉडी किंवा कुठलीही व्यक्ती जी माहिती पुरविण्यास बोलावले असता किंवा पोटकलम (६)मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे नियम पाळण्यास अपुरा पडला असेल, तर त्याला १ वर्षापर्यंत कारावास व १ लाखापर्यंत दंड होण्यास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

(८) ह्या कलमामध्ये कोणतेही न्यायालय दखलपात्र घेऊ शकत नाही, अपवादात्मक म्हणजे तक्रार एजन्सीच्या अधिकृत अधिकाऱ्याने एजन्सीच्या वतीने केली असेल जी पोटकलम (१)मध्ये नोंदवली आहे;

**७१. चुकीची माहिती देण्याबाबत शिक्षा :–**

जो कोणी कोणतेही लायसन्स किंवा इलेक्ट्रॉनिक सही मिळविण्यासाठी नियंत्रकाला किंवा प्रमाणन प्राधिकरणाला चुकीची माहिती देईल किंवा त्याच्यापासून महत्त्वाची गोष्ट लपवून ठेवील त्याला दोन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**७२. विश्वासार्हतेचा आणि गुप्ततेचा भंग :–**

या अधिनियमात किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, हा अधिनियम किंवा त्या अन्वये तयार करण्यात आलेले नियम किंवा विनियम याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांनुसार कोणतेही इलेक्ट्रॉनिक अभिलेख, पुस्तक, नोंदवही, पत्रव्यवहार माहिती, दस्तऐवज किंवा इतर सामग्रीत प्रवेश मिळवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने संबंधित व्यक्तीच्या संमतीशिवाय असे इलेक्ट्रॉनिक अभिलेख, पुस्तके, नोंदवही, पत्रव्यवहार, माहिती, दस्तऐवज किंवा इतर माहिती इतर कोणत्याही व्यक्तीला दिल्यास अशी व्यक्ती दोन वर्षांपर्यंतच्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाच्या किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**७२–A. कायदेशीर करार भंग करून माहिती प्रकटन केल्यास शिक्षा :–**

ज्या कायद्यात नमूद केल्याप्रमाणे किंवा आता अंमलात असणारा दुसऱ्या कुठल्याही कायद्याप्रमाणे, कुठलीही व्यक्ती यात मध्यस्थीचा समावेश आहे ती कायदेशीर कराराखाली सेवा पुरवताना, दुसऱ्या कुठल्याही व्यक्तीची वैयक्तिक माहिती सुरक्षितपणे पोहचवेल, तेव्हा उद्देश नुकसान पोहचविण्याचा किंवा जाणूनबुजून नुकसान पोहचवेल किंवा उत्पन्न बंद होईल, योग्य त्या व्यक्तीच्या संमतीशिवाय किंवा कायदेशीर करार भंग करून, ती माहिती दुसऱ्या कुठल्याही व्यक्तीला देईल, तर त्याला ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा ५ लाखांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**७३. विशिष्ट तपशील चुकीचा असलेले इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र प्रसिद्ध करण्याबद्दल शास्ती :–**

(१) कोणतीही व्यक्ती–

(a) प्रमाणपत्रामध्ये सूचीबद्ध केलेल्या प्रमाणन प्राधिकरणाने दिलेले नाही हे माहीत असलेले; किंवा

(b) प्रमाणपत्रामध्ये सूचीबद्ध केलेल्या वर्गणीदाराने स्वीकारले नसल्याचे माहीत असलेले; किंवा

(c) रद्द केलेले किंवा निलंबित केलेले प्रमाणपत्र असल्याचे माहीत असलेले, कोणतेही इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र हे अशा रद्द करण्यापूर्वी किंवा निलंबित करण्यापूर्वी निर्माण केलेल्या इलेक्ट्रॉनिक सहीच्या प्रमाणपत्राच्या प्रयोजनासाठी प्रसिद्ध करण्यात येत असेल ते वगळून, प्रसिद्ध करणार नाही किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला ते उपलब्ध करून देणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, कलम ७३ पोटकलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला दोन वर्षांपर्यंतच्या कारावासाची किंवा एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**७४. लबाडीच्या प्रयोजनासाठी प्रसिद्ध करणे :–**

जी कोणी, कोणत्याही लबाडीच्या किंवा बेकायदेशीर प्रयोजनासाठी एखादे इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र निर्माण करील, प्रसिद्ध करील किंवा अन्य प्रकारे उपलब्ध करील त्याला दोन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा दोन लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**७५. भारताबाहेर केलेल्या अपराधांना किंवा उल्लंघनांना अधिनियम लागू असणे :–**

(१) पोटकलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी भारताबाहेर केलेल्या कोणत्याही अपराधाला किंवा उल्लंघनालाही कोणत्याही व्यक्तीला तिचे नागरिकत्व विचारात न घेता लागू असतील.

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी, कोणत्याही व्यक्तीने भारताबाहेर अपराध किंवा उल्लंघन केले असेल व ती कृती किंवा वर्तणूक ही भारतात असलेला संगणक, संगणक यंत्रणा किंवा संगणक नेटवर्क यांच्याशी संबंधित असणारा अपराध किंवा नियमांचे उल्लंघन करणारी असल्यास तिला हा अधिनियम लागू असेल.

**७६. जप्त करणे :–**

कोणताही संगणक, संगणक यंत्रणा, फ्लॉपी, कॉम्पॅक्ट डिस्क, टेप डिव्हाईस किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणत्याही इतर सहाय्यक गोष्टी यांच्या संबंधातील या अधिनियमांच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, आदेश किंवा विनियम याच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले असेल किंवा करण्यात येत असल्यास, त्या जप्त करण्यास पात्र ठरतील :

परंतु असे की, असा कोणताही संगणक, संगणक यंत्रणा, फ्लॉपी, कॉम्पॅक्ट डिस्क, टेप डिव्हाईस किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणत्याही साहायक गोष्टी जिच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणात सापडली असेल ती व्यक्ती या अधिनियमांच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, आदेश किंवा विनियम यांच्या उल्लंघनास जबाबदार नाही हे त्याबाबतचा निर्णय करणाऱ्या न्यायालयाचे समाधान होईल अशा प्रकारे सिद्ध करण्यात आल्यास ते न्यायालय असा संगणक, संगणक यंत्रणा, फ्लॉपी, कॉम्पॅक्ट डिस्क, टेप डिव्हाईस किंवा त्याच्याशी संबंधित अशा इतर साहाय्यक गोष्टी जप्त करण्याचा आदेश देण्याऐवजी या अधिनियमांच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम, आदेश किंवा विनियम याच्या कोणत्याही तरतुदींद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्यांपैकी त्यांना योग्य वाटेल असा अन्य आदेश अशा उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध काढील.

**७७. नुकसान भरपाई, शास्ती (शिक्षा) किंवा उल्लंघन यांनी इतर शिक्षेमध्ये हस्तक्षेप न करणे :–**

या अधिनियमान्वये लादलेली शिक्षा किंवा नुकसान भरपाई किंवा या अधिनियमानुसार केलेली जप्ती यामुळे त्याद्वारे बाधित झालेली व्यक्ती, त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे इतर कोणत्याही शिक्षेस पात्र असेल तर, त्यास प्रतिबंध होणार नाही.

**७७–A. गुन्हे एकत्रित करणे :–**

(१) कार्यक्षम अधिकार क्षेत्राचे न्यायालय शक्यतो गुन्हे आपापसात मिटवतील, याच्या व्यतिरिक्त गुन्हे ज्याला शिक्षा हे आजीवन किंवा तुरुंगवास हा ३ वर्षांपेक्षा अधिकचा कालावधी दिला गेला असेल या कायद्याखाली,

परंतु ते न्यायालय असे गुन्हे एकत्रित करू शकत नाही जेथे गुन्हेगार हा त्यांच्या आधीच्या शिक्षेमुळे, एकतर शिक्षा वाढविण्यास जबाबदार आहे किंवा वेगळ्या प्रकारच्या शिक्षेस पात्र आहे.

परंतु पुढे न्यायालय असेही गुन्हे एकत्रित करू शकत नाही जेथे हे गुन्हे देशामध्ये सामाजिक आर्थिक परिस्थितीवर परिणाम करेल किंवा नुकसान पोहोचवेल किंवा १८ वर्षाखालील मुलांसंबंधित किंवा स्त्री संबंधित गुन्हा केला असेल.

(२) कुठलीही व्यक्ती गुन्ह्याचा गुन्हेगार ह्या कायद्याखाली असेल तो गुन्हा एकत्रित करण्यासाठी न्यायालय जेथे अनिर्णित चौकशीसाठी असेल आणि कलम २६५–B आणि २६५–C च्या फौजदारी कायदा, १९७३ खाली तरतूद असेल तेथे अर्ज देऊ शकते.

**७७–B. ३ वर्षांच्या तुरुंगवासासाठी गुन्ह्यांना जमानत :–**

फौजदारी प्रक्रिया, १९७३ च्या (२ ऑफ १९७४ नुसार) या गुन्ह्याची शिक्षा ३ वर्षे तुरुंगवास आणि जास्त असेल तर तो गुन्हा दखल घेण्याजोगा असेल आणि ३ वर्ष तुरुंगवास शिक्षा असणाऱ्या गुन्ह्याला जामीन योग्य असेल.

**७८. अपराधांचे अन्वेषण करण्याचे अधिकार :–**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेला कोणताही पोलीस अधिकारी या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करू शकेल.

--------

# ३३. राष्ट्रीय सन्मानांच्या अप्रतिष्ठेस प्रतिबंध अधिनियम, १९७१

## राष्ट्रीय सन्मानांच्या अप्रतिष्ठा करण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम

**उद्देश :–** राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व संविधान यांचा हेतुपुरस्सर व जाणूनबुजून अवमान करण्याच्या घटना आजकाल वारंवार घडत आहेत. अशा प्रकारच्या कृत्यांना शिक्षेची तरतूद नव्हती.

राष्ट्रीय एकात्मता, अखंडता तसेच राष्ट्राच्या सन्मानाच्या प्रतिकांची अप्रतिष्ठा करण्यास प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला.

**कलम १ – संक्षिप्त नाव व व्याप्ती :–**

(१) या अधिनियमास ''राष्ट्रीय सन्मानाच्या अप्रतिष्ठेस प्रतिबंध अधिनियम, १९७१'' असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

**कलम २ – राष्ट्रध्वज व संविधान याची अप्रतिष्ठा करणे :–**

जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही सार्वजनिक जागी किंवा कोणत्याही अन्य जागी, सर्वांच्या डोळ्यादेखत राष्ट्रध्वज किंवा संविधान किंवा कोणताही भाग जाळील, छिन्नविच्छिन्न करील, विद्रूप करील, अपवित्र करील, खराब करील, नष्ट करील, तुडविल किंवा अन्यथा अवहेलना करील (मग एकतर बांधलेल्या किंवा लिखित शब्दांच्या स्वरूपातील असो किंवा कृतीच्या स्वरूपातील असो) अशा व्यक्तीला, ज्यात तीन वर्षांपर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्हीही शिक्षा देण्यात येतील.

**स्पष्टीकरण –** (१) संविधानामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या किंवा भारताच्या राष्ट्रध्वजामध्ये कायदेशीर मार्गाने फेरबदल करण्याच्या हेतूने संविधान, भारताचा राष्ट्रध्वज किंवा शासनाची कोणतीही उपाययोजना याविषयी व्यक्त केलेली नापसंतीदर्शक किंवा टीकात्मक भाष्य हे या अधिनियमाखाली अपराध ठरणार नाही.

(२) ''भारताचा राष्ट्रध्वज'' या संज्ञेमध्ये कोणतेही चित्र, रंगचित्र, रेखाचित्र किंवा छायाचित्र किंवा कोणत्याही वस्तूपासून तयार केलेले किंवा कोणत्याही वस्तूचे व्यपदेशन (दृश्य स्वरूपातील सादरीकरण) करणारे भारतीय राष्ट्रध्वजाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे अन्य दृश्य स्वरूपातील व्यपदेशन यांचा अंतर्भाव असेल.

(३) ''सार्वजनिक जागा ''या संज्ञेचा अर्थ जनतेच्या वापरासाठी सुरू करण्यात आलेल्या किंवा जनतेच्या वापरासाठी खुल्या असलेल्या कोणत्याही जागा'' असा असेल.

(४) राष्ट्रीय ध्वजाचा अपमान करणे म्हणजे–

(a) राष्ट्रध्वजाचा जाणूनबुजून उघडउघड अपमान करणे. अनादर किंवा मान खंडणा करणे.

(b) राष्ट्रध्वज चुकीच्या पद्धतीने हाताळणे.

(c) सरकारी सूचनांप्रमाणे जेव्हा अर्ध्यावर उतरविलेला असतो, त्या सूचनांशिवाय किंवा सूचना नसताना ध्वज अर्ध्यावर उतरविणे.

(d) राष्ट्रध्वज पडद्यासारखा कोठेही वापरणे. तो फक्त भारतीय सेनादलात नोकरीत असलेल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर अंतिम विधीच्या वेळी वापरता येईल.

(e) राष्ट्रध्वजाचा कुठलाही भाग :–

(i) वेशभुषा (Costume), गणवेश (Uniform) किंवा कोणत्याही प्रकारच्या वस्तु ज्या कोणतीही व्यक्ती कमरेखालील भागात परिधान करते.

(ii) तसेच हातरूमाल, खोळ (Cushions), आभ्रे, मोठा रूमाल, अंतरवस्त्रे, पोशाख तयार करता येईल, असे कापड यावर तशा प्रकारची कलाकुसर किंवा छपाई करता येणार नाही.

(f) राष्ट्रध्वज कुठल्याही नाण्यावर किंवा थडग्यावर कोरणे.

(g) राष्ट्रध्वज काहीही घेण्यासाठी, वाहून नेण्यासाठी वापरणे. राष्ट्रध्वज स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिनी फक्त समारंभाच्या ठिकाणी फूल ठेवून फडकावते वेळी वापरता येईल.

(h) राष्ट्रध्वज पुतळा, ऐतिहासिक इमारती, किल्ले, सभापतीचा मेज (डेस्क) किंवा सभापतीच्या व्यासपीठास लावणे किंवा गुंडाळणे.

(i) राष्ट्रध्वज जमिनीला स्पर्श करू देणे किंवा पाण्यात वाहू देणे.

(j) राष्ट्रध्वज वाहनाच्या टपावर आजूबाजूला, मागेपुढे निशाण म्हणून लावणे तसेच विमान, रेल्वेला लावणे.

(k) राष्ट्रध्वज इमारत झाकण्यासाठी वापरणे.

(l) राष्ट्रध्वजाचा केसरी रंग खालील दिशेस दाखविल्यास.

**कलम ३ : भारताचे राष्ट्रगीत इत्यादींच्या गायनास प्रतिबंध करणे :–**

जी कोणतीही व्यक्ती भारताच्या राष्ट्रगीताच्या गायनास बुद्धिपुरस्सर प्रतिबंध करील किंवा असे गायन करीत असलेल्या कोणत्याही मेळाव्यास अडथळा आणील अशा व्यक्तीस ज्यात तीन वर्षापर्यंत वाढ करता येईल अशा मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही प्रकारच्या शिक्षा देण्यात येतील.

**कलम ३–A :–**

कलम दोन व तीन खाली दुसऱ्यांदा किंवा त्यापुढील प्रत्येक गुन्ह्यास शिक्षा एक वर्षापेक्षा कमी असणार नाही एवढी, कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असेल.

---------

# ३४. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७

**अनुक्रमणिका**


उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ ...

२. व्याख्या ...

३. ग्राम पोलिसांचे प्रशासन, नियंत्रण व निदेश देणे कोणाकडे निहित असेल ...

४. ग्राम पोलीस अधिकाऱ्यावरील प्राधिकार पोलीस अधीक्षकाकडे किंवा पोलीस आयुक्ताकडे प्रतिनियुक्त करण्याचा अधिकार.

५. पोलीस पाटलांची नेमणूक, त्यांचे पारिश्रामिक व सेवेच्या इतर शर्ती ...

६. पोलीस पाटलांची कर्तव्ये ...

७. ग्रामसेवकावर असलेले अधिकार ...

८. जबरी चोरी इत्यादी विरुद्ध सावधगिरीच्या उपाययोजना...

९. काम इत्यादींकडे दुर्लक्ष केल्याबद्दल शास्ती ...

१०. फौजदारी खटला भरण्यास बाधा न येणे ...

११. खातेनिहाय चौकशी किंवा फौजदारी चौकशी चालू असेपर्यंत निलंबित करण्याचा अधिकार .

१२. गावातील गुन्हेगार पळून गेल्यास किंवा त्याची माहिती नसल्यास ठाणे अधिकाऱ्यास कळविणे.

१३. गावात अनैसर्गिक किंवा आकस्मिक मृत्यू घडल्यास किंवा प्रेत सापडल्यास तपास करणे ...

१४. गंभीर स्वरूपाचा अपराध केला आहे असे पोलीस पाटलास वाटत असेल त्या इसमास पकडणे

१५. साक्षीदारांना बोलावून त्यांची तपासणी करण्याची, साक्षी पुरावा नोंदविण्याची व लपविलेल्या ... वस्तूसाठी झडती घेण्याची शक्ती.

१६. दावा न केलेली मालमत्ता ...

१७. या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यांबद्दल इतर अधिनियमान्वये खटला भरणे ...

१८. दावा न केलेली मालमत्ता ...

महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (त्यांची नेमणूक, पारिश्रमिक, भत्ते आणि सेवेच्या इतर अटी,) आदेश, १९६८.

फौजदारी प्रक्रिया संहितामधील कलमे ...

भारतीय दंड संहितामधील कलमे

# महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७

**(महाराष्ट्र अधिनियम १९६७ चा क्रमांक ४६)**

**(२२ डिसेंबर १९६७)**

**महाराष्ट्र राज्यातील ग्राम पोलिसांचे नियमन करण्यासंबंधीचा कायदा एकत्रित करण्याबाबत व त्यात सुधारणा करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील ग्राम पोलिसांचे नियमन करण्यासाठीचा कायदा एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :–

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ :–**

(१) या अधिनियमास महाराष्ट्र ग्राम पोलिस अधिनियम, १९६७ असे म्हणावे.

(२) तो बृहन्मुंबई वगळून संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून त्याबाबतीत जी तारीख विनिर्दिष्ट करील, त्या तारखेस अमलात येईल.

**२. व्याख्या :–**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,

(१) (a) ''ठाणे अधिकारी'' म्हणजे ज्यांची नेमणूक ज्या गावाकरिता करण्यात आली असेल त्या गावाच्या हद्दीमधील ठाण्याचा ताबा असलेला पोलीस अधिकारी.

**३. ग्राम पोलिसांचे प्रशासन, नियंत्रण आणि निदेश देणे कोणाकडे निहित असेल :–**

राज्य शासन आणि आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली आणि निदेशाखाली प्रत्येक जिल्ह्यातील प्रशासन ग्राम पोलिसांसाठी असेल, त्याचा वापर जिल्हा दंडाधिकारी करेल आणि अशा जिल्हा दंडाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या किंवा आयुक्तांच्या मंजुरीने या अधिनियमाच्या उपबंधानुसार किंवा तद्न्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या असतील किंवा ज्यांचा त्यास वापर करता येईल अशा (कलम ५ अन्वये पोलीस–पाटलांची नेमणूक करण्याची आणि तसेच कलम ९ अन्वये पोलीस पाटील किंवा पोलिसांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी बोलाविले जाण्यास पात्र असतील अशा ग्रामसेवक वर्गाच्या सदस्यांविरुद्ध कारवाई करण्याची शक्ती धरून) सर्व किंवा कोणत्याही शक्ती, सहाय्यक किंवा उप–जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार म्हणून महसुलाचा कार्यभार असणाऱ्या कोणत्याही उप–विभागीय दंडाधिकारी किंवा तालुका दंडाधिकारी यांच्याकडे सोपविता येतील.

**४. ग्राम पोलीस अधिकाऱ्यावरील प्राधिकार पोलीस अधीक्षकाकडे किंवा पोलीस आयुक्तांकडे प्रतिनियुक्त करण्याचा अधिकार:–**

जिल्हा दंडाधिकाऱ्यास पोलीस प्रयोजनासाठी, कोणत्याही ग्राम पोलीस अधिकाऱ्यावर ज्या कोणत्याही प्राधिकाराचा वापर करता येईल असे जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे कोणतेही प्राधिकार त्याने आयुक्तांच्या मंजुरीने पोलीस अधीक्षकाकडे किंवा यथास्थिती पोलीस आयुक्ताकडे प्रतिनियुक्त करणे हे कायदेशीर असेल.

**५. पोलीसपाटलांची नेमणूक, त्यांचे पारिश्रमिक व सेवेच्या इतर शर्ती :–**

(१) राज्य शासन, गावासाठी किंवा गावांच्या गटांसाठी, एक किंवा अधिक पोलीसपाटलांची नेमणूक करील;

(२) प्रत्येक गावातील ग्राम पोलीस पोलीस पाटलाच्या अधिकाराखाली असतील आणि एकापेक्षा अधिक ग्राम पोलीस असतील त्याबाबतीत राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे पोलीस पाटलाच्या अधिकाराखाली असतील.

(३) पोलीस पाटलांची नेमणूक, त्यांचे पारिश्रमिक व सेवेच्या इतर शर्ती या राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेळोवेळी ठरविल अशा असतील;

(४) पोट–कलमे (१) व ((२) याखालील राज्य शासनाच्या शक्ती जिल्हा दंडाधिकाऱ्यालासुद्धा वापरता येतील,

परंतु कोणत्याही गावाकरिता किंवा गावाच्या गटाकरिता राज्य शासनाकडून नेमण्यात आलेल्या पोलीस पाटलांची संख्या राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय वाढविता येणार नाही.

**६. पोलीस पाटलांची कर्तव्ये :–**

जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अधीन राहून पोलीस पाटील,–

(१) त्याचे गाव ज्याच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात येत असेल अशा इतर कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये काम करील;

(२) असा कार्यकारी दंडाधिकारी, जी कोणतीही माहितीपत्रके व माहिती मागवील ती पुरवील;

(३) गावातील अपराधांचे प्रमाण व ग्राम पोलिसांशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी याविषयी आणि गावातील समाजाचे स्वास्थ्य व त्यांची सर्वसाधारण परिस्थिती याविषयी माहिती कार्यकारी दंडाधिकाऱ्यास देईल.

(४) आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने मदत मागितली असता, आपल्या अधिकारात असेल त्याप्रमाणे सर्व प्रकारची मदत देईल;

(५) दंडाधिकाऱ्याकडून किंवा पोलीस अधिकाऱ्याकडून त्यास जे आदेश देण्यात येतील त्या सर्व आदेशांचे पालन करील आणि अशा कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडून किंवा पोलीस अधिकाऱ्याकडून त्याच्याकडे जी अधिपत्रे पाठविण्यात आली असतील त्या सर्व अधिपत्रांची ताबडतोब अंमलबजावणी करील;

(६) सार्वजनिक शांततेस ज्या गोष्टींमुळे धोका पोहोचेल अशा गोष्टीविषयी गुप्त माहिती गोळा करून ती ठाणे अधिकाऱ्यास कळवील;

(७) आपल्या गावाच्या हद्दीत अपराध घडू नये म्हणून किंवा समाजास उपद्रव होऊ नये म्हणून बंदोबस्त करील व आपल्या गावाच्या हद्दीतील गुन्हेगारांचा शोध करून त्यांच्याबाबत न्याय मिळवून देईल.

(८) या अधिनियमाच्या इतर उपबंधान्वये निर्दिष्ट करण्यात येतील अशी आणि राज्य शासनाकडून या बाबतीत, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी निर्देशित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**७. ग्रामसेवकावर असलेले अधिकार :–**

पोलीस पाटलास त्याच्याकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये बजाविताना सर्व ग्रामसेवकांना त्यास साहाय्य करण्यास भाग पाडता येईल, मग असे ग्रामसेवक सामान्यत: कोणत्याही हुद्द्याने कामावर लावण्यात आलेले असोत; आणि पोलीस पाटलासाठी सर्व लेखी माहितीपत्रके आणि कामकाजाची कागदपत्रे तयार करणे हे गावाच्या तलाठ्याचे कर्तव्य असेल.

**८. जबरी चोरी इत्यादी विरुद्ध सावधगिरीच्या उपाययोजना :–**

जबरी चोरी, शांतताभंग आणि नागरिकांस व गावातील समाजास क्षती पोहोचणारी कृत्ये घडू नयेत म्हणून शक्य होईल तितक्या अधिक सुरक्षिततेसाठी बंदोबस्त करता येईल अशा रीतीने ग्रामसेवकांस पोलीस पाटील कामास लावील आणि अशा

सेवकवर्गातील कोणत्याही इसमाने गैरवर्तणूक केल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास, अशा सर्व बाबतीत पोलीस पाटील कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे प्रतिवृत्त पाठवील.

**९. काम इत्यादीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल शास्ती :–**

कोणताही पोलीस पाटील किंवा पोलिसाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी बोलाविला जाण्यास पात्र असेल अशा ग्रामसेवक वर्गातील सदस्य यांनी आपले कर्तव्य पार पाडण्यास कसूर केली असेल किंवा हयगय केली असेल किंवा कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल तो दोषी असेल तर, तो पुढील शास्तींना पात्र ठरेल :––

(a) निर्भत्सना (निंदा);

(b) शासनाला पोहोचलेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीच्या सर्व किंवा काही भागाची वसुली त्याच्या परिश्रमिकामधून वसूल करणे;

(c) महिन्याच्या पारिश्रमिकापेक्षा जास्त नसेल एवढा दंड;

(d) एक वर्षापेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीपर्यंत सेवेतून निलंबित करणे;

(e) पदावरून काढून टाकणे, ज्यायोगे भविष्यकाळात शासनाच्या अधीन नोकरी करण्यास अपात्र ठरणार नाही;

(f) नोकरीतून बडतर्फ करणे, ज्यायोगे भविष्यकाळात शासनाच्या सेवेत अपात्र ठरेल.

तालुका दंडाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याला खंड (a) ते (d) मध्ये उल्लेखिलेल्या शास्तीपैकी कोणतीही शास्ती लादता येईल, आणि खंड (e) व (f) यामध्ये उल्लेखिलेली पोलीस पाटलाची नेमणूक करण्यास सक्षम असलेल्या उपविभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यास लादता येईल.

**१०. फौजदारी खटला भरण्यास बाधा न येणे :–**

निकटपूर्वीच्या कलमातील कोणत्याही उपबंधामुळे, कोणत्याही पोलीस पाटलावर किंवा ग्रामसेवक वर्गातील सदस्यावर कोणताही अपराध केल्याचा आरोप ठेवण्यात आल्यास फौजदारी खटला भरण्यास कोणतीही बाधा उत्पन्न होणार नाही.

**११. खातेनिहाय चौकशी किंवा फौजदारी चौकशी चालू असेपर्यंत निलंबित करण्याचा अधिकार :–**

पोलीस पाटलाची नेमणूक करण्यास सक्षम असलेला जिल्हा दंडाधिकारी किंवा उप–विभागीय दंडाधिकारी, यांच्या कार्यक्षेत्रात पोलीस पाटील नेमणुकीस असेल व त्याच्याविरुद्ध खातेनिहाय चौकशी किंवा फौजदारी चौकशी चालू असेल तर तोपर्यंत पोलीस पाटलाला निलंबित करता येईल.

**१२. गावातील गुन्हेगार पळून गेल्यास किंवा त्याची माहिती नसल्यास ठाणे अधिकाऱ्यास कळविणे :–**

कोणत्याही गावाच्या हद्दीमध्ये गुन्हा घडल्यास आणि तो घडण्यास कारणीभूत असलेली व्यक्ती पळून गेली असल्यास किंवा त्याची माहिती नसल्यास त्याबद्दलची माहिती पोलीस पाटील ठाणे अधिकाऱ्याला देईल आणि त्याबाबत प्राप्त करता येण्याजोगा पुरावा मिळवून तो ठाणे अधिकाऱ्याकडे पाठवील.

**१३. गावात अनैसर्गिक किंवा आकस्मिक मृत्यू घडल्यास किंवा प्रेत सापडल्यास तपास करणे :–**

(१) गावाच्या हद्दीत कोणताही अनैसर्गिक किंवा आकस्मिक मृत्यू घडल्यास किंवा–कोणतेही प्रेत सापडल्यास अशा ठिकाणी पोलीसपाटील त्वरित जाईल आणि गावातील किंवा जवळच्या गावातील समजण्याजोग्या दोन किंवा अधिक इसमांना बोलाविल व ते मृत्यूच्या कारणाची चौकशी करतील व त्या प्रकरणाच्या सर्व परिस्थितीची चौकशी करतील आणि त्याचे लेखी प्रतिवृत्त तयार करतील व पोलीस पाटील ते प्रतिवृत्त ठाणे अधिकाऱ्याकडे पाठविण्याची व्यवस्था करेल.

(२) ज्या कोणत्याही इसमास पोलीस पाटलाने असा तपास करण्यासाठी बोलविले असेल, असा इसम कोणतेही वाजवी कारण न देता नकार देईल किंवा दुर्लक्ष करेल तर दोषसिद्धीनंतर अशा इसमास पन्नास रुपयांपर्यंतची दंडाची शिक्षा होईल.

(३) तपासाच्या निष्कर्षावरून अनैसर्गिक मृत्यू झाला आहे असे सकारण वाटत असेल तर पोलीस पाटील ठाणे अधिकाऱ्याला त्वरित नोटीस देईल व मृतदेहाची तपासणी केली जावी या हेतूने व तो मृतदेह वाटेत कुजेल असा धोका न पत्करता सर्वात जवळच्या जिल्हा शल्यचिकित्सकाकडे किंवा राज्य शासनाने या संबंधात नियुक्त केलेल्या अन्य अर्हता प्राप्त वैद्यकीय तज्ज्ञाकडे तपासणीसाठी पाठवील व असा तज्ज्ञ मृत्यूच्या कारणाची निश्चित माहिती मिळविण्याचा प्रयत्न करेल.

परंतु प्रेत कुजून जाईल किंवा ते तपासणीस निरुपयोगी ठरेल असे वाटले तरी ठाणे अधिकारी किंवा दंडाधिकारी जोपर्यंत प्रेत दहन करण्यास किंवा दफन करण्यास परवानगी देत नाही तोपर्यंत पोलीस पाटील त्या प्रेताचे दहन किंवा दफन करण्यास प्रतिबंध करेल.

**१४. गंभीर स्वरूपाचा अपराध केला आहे असे पोलीस पाटलास वाटत असेल त्या इसमास पकडणे :–**

(१) एखाद्या इसमाने गंभीर स्वरूपाचा अपराध आपल्या गावाच्या हद्दीत केला आहे असे पोलीस पाटलास वाटत असेल तर तो अशा व्यक्तीस पकडील व त्याच्यासोबत पुरावा म्हणून उपयोगी पडण्याचा संभव असलेल्या सर्व वस्तू ठाणे अधिकाऱ्याकडे पाठवील.

(२) अशा रीतीने पकडलेल्या प्रत्येक व्यक्तीस त्यास ज्या ठिकाणी पकडण्यात आले असेल त्या ठिकाणापासून दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात नेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळून चोवीस तासांच्या आत जवळच्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात येईल.

**१५. साक्षीदारांना बोलावून त्यांची तपासणी करण्याची, साक्षी पुरावा नोंदण्याची व लपविलेल्या वस्तूसाठी झडती घेण्याची शक्ती :–**

(१) पोलीस पाटलास आपल्या कर्तव्याच्या कक्षेत येत असेल असा तपास करताना साक्षीदारांना बोलावून त्यांची तपासणी करण्याचा आणि त्यांच्या निवेदनाची नोंद करण्याचा आणि लपविण्यात आलेल्या वस्तूंचा शोध करण्याचा प्राधिकार असेल; मात्र अत्यंत निकडीच्या प्रसंगाखेरीज इतर प्रसंगी सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या काळात कोणत्याही राहत्या घराची झडती घेण्यात येणार नाही याविषयी पोलीस पाटील दक्षता घेईल.

(२) तसेच पोलीस पाटलास, संशयित गुन्हेगार इसमांची झडती घेण्यासाठी किंवा त्यांचा पाठलाग करण्यासाठी दुसऱ्या गावाच्या हद्दीत प्रवेश करण्याचा व त्या ठिकाणी काम करण्याचा प्राधिकार असेल; तथापि अशा दुसऱ्या गावाच्या पोलीस पाटलास ताबडतोब कळविणे त्यास बंधनकारक असेल आणि अशा दुसऱ्या गावाचा पाटील, त्याच्या अधिकारात असेल असे सर्व सहाय्य उक्त पोलीस पाटलास देईल आणि असा पाटील झडतीचे किंवा पाठलाग करण्याचे काम चालू ठेवण्यासाठी प्रत्यक्ष जबाबदार राहील.

**१६. दावा न केलेली मालमत्ता :–**

पोलीस पाटील आपल्या गावातील सर्व दावा न केलेली मालमत्ता किंवा मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यातील तरतुदीअन्वये स्वाधीन केलेली असेल अशी मालमत्ता ताब्यात घेईल आणि त्याचे गाव जर पोलीस आयुक्ताच्या कार्यक्षेत्रात येत असेल तर त्या आयुक्ताला आणि इतर बाबतीत जवळच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याला प्रतिवृत्त पाठवेल आणि आयुक्त किंवा दंडाधिकारी ज्याप्रमाणे निदेश देईल त्याप्रमाणे वागेल; परंतु अशी मालमत्ता गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१ याच्या किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात वर्णन केलेल्या स्वरूपाची असेल तर पोलीस पाटील त्या अधिनियमाच्या किंवा अधिनियमितीच्या तरतुदीनुसार वागेल. पोलीस पाटील तयार केलेल्या प्रत्येक प्रतिवृत्ताची एक प्रत ठाणे अधिकाऱ्याकडे पाठवील.

**१७. या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यांबद्दल इतर अधिनियमान्वये खटला भरणे :–**

या अधिनियमाखाली ज्या व्यक्तीने गुन्हा केला असेल त्या व्यक्तीवर इतर अधिनियमाखालील अपराधांबद्दल खटला भरण्यास प्रतिबंध होणार नाही किंवा इतर अधिनियमाखाली होणारी शिक्षा ही या अधिनियमात तरतूद केल्यापेक्षा जास्त दंड किंवा शिक्षा होण्यास प्रतिबंध होणार नाही.

**१८. दावा न केलेली मालमत्ता :–**

मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७ याद्वारे निरसित करण्यात येत आहे :

परंतु, अशा निरसनामुळे पुढील गोष्टींना बाध येणार नाही :–

(a) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याचा पूर्वीचा अंमल किंवा तद्न्वये रीतसर केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट;

(b) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये संपादन केलेल्या, उपार्जित झालेला हक्क, विशेषाधिकार, किंवा पत्करलेले आबंधन किंवा दायित्व;

(c) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत झालेली शास्ती, किंवा शिक्षा; किंवा

(d) कोणत्याही उपरोक्त हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, आबंधनाच्या, दायित्वाच्या, शास्तीच्या किंवा शिक्षेच्या बाबतीत अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना;

आणि जणू काही हा अधिनियम अमलात आला नव्हता असे समजून कोणतेही अन्वेषण, कायदेशीर येईल किंवा अमलात आणता येईल व अशी कोणतीही शास्ती किंवा शिक्षा लादता येईल;

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकास अधीन राहून अशा निरसित केलेल्या कायद्यान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कृती (विहित केलेली नेमणूक, दिलेला अधिकार, काढलेला किंवा दिलेला आदेश किंवा नियम धरून) या अधिनियमाशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअन्वये केलेली आहे असे समजण्यात येईल; आणि या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कृती याअन्वये तिचे अधिक्रमण होत नाही त्याप्रमाणे अमलात असण्याचे चालू राहील.

-----------

# ३५. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९

(नियम क्रमांक २० – २४, ३४, ५८, ७७ – ८४, ९५, ९६, १०२ – १०३, १०८, ११०, ११५ – ११७, १२०, १२२, १६१ – १६३, १६८, १७३, २२२, २२६, २२८ – २४५, २५०.)

**२०. लोकसेवा वाहनांच्या चालकांची कर्तव्ये, कामे व वर्तणूक :–**

**(१) प्रवासी वाहतूक किंवा करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनावरील वाहन चालकाने (टॅक्सी वगळून):–**

(१) मोटार वाहन नियम क्रमांक १७५ अन्वये चालक सीटच्या जागेत कुठल्याही व्यक्तीला, प्राण्याला बसण्यास किंवा वस्तू ठेवण्यास परवानगी देऊ नये किंवा वाहन चालकास रोडची स्थिती समजण्यास अडथळा येईल किंवा वाहन व्यवस्थित ताब्यात राहण्याच्या दृष्टीने अडथळा येऊ नये म्हणून चालक सीटवर किंवा चालकाच्या केबीनमध्ये प्रवेश करण्यास परवानगी देऊ नये.

(२) प्रवासी आकर्षित करणेसाठी ओरडू नये.

(३) महाराष्ट्र मोटार वाहन नियम अंतर्गत प्रवाशांना चढणे व उतरणे संदर्भात ठराविक वगळता प्रतिबंध करणे, वाहन सुरक्षित ठिकाणी योग्य वेळेसाठी विश्रांतीसाठी उभे करणे, वाहकाने निर्देश केलेनंतर किंवा मागणी केलेनंतर एखाद्या प्रवाशाला वाहनातून उतरवणेसाठी सुरक्षितपणे वाहन उभे करणे, प्रवाशाने खूण केलेनंतर प्रवासी म्हणून वाहनात घेणे.

(४) वाहन चालकाने वाहन विश्रांतीसाठी उभे करताना सदर वाहन प्रवासी चढवणेसाठी किंवा उतरणेसाठी या उद्देशाने उभे करू नये. वाहन चालकाने वाहन चालवताना दुसऱ्या वाहनाच्या चालकाला वाहकाला अपायकारक, असुविधाजनक व अडथळा होईल असे वाहन चालवू नये किंवा दुसऱ्या वाहनातील प्रवाशांना वाहनात चढताना किंवा उतरताना असुविधा होईल असे वाहन चालवू नये किंवा वाहन विश्रांतीसाठी उभे करताना दुसऱ्या वाहनाच्या समोर किंवा मागे रस्त्याच्या डाव्या बाजूला उभे करावे.

(५) वाहन चालकाने मोटार वाहन सुरक्षित ठेवणेसाठी आवश्यक काळजी घेतली पाहिजे. वाहन चालकाने मीटर वाहनाचे टायर, ब्रेक, दिवे सदोष (Defective) परिस्थितीत आहे हे माहिती असताना प्रवाशांना अपाय होईल अशा पद्धतीने वाहन चालवू नये किंवा वाहनामध्ये पुरेसे इंधन नसताना पुढील इंधन स्टेशनवर जाईपर्यंत इंधन पुरणार नाही हे माहीत असताना वाहन मार्गस्थ करू नये.

(६) कामावर असताना धूम्रपान करू नये.

(७) प्रवाशांबरोबर वागताना शिष्टाचार पाळावेत.

(८) वाहन चालकाने कामावर असताना खाकी शर्ट, बुश शर्ट, खाकी पॅंट स्वच्छ गणवेश वापरावा.

वाहन चालकांना अत्यावश्यक काळात (Emergency) ड्युटीवर बोलावणेत येते किंवा ट्रेनिंगसाठी बोलावले जाते तेव्हा राज्य सरकार विशेष किंवा जनरल आदेशान्वये वाहन चालकाला सदर नियमाच्या अंमलबजावणीपासून अपवाद ठरवू शकते.

(९) वाहन चालकाने ड्युटीवर असताना छातीवर डाव्या बाजूला बिल्ला लावला पाहिजे. बिल्ल्याच्यावर प्लॅस्टिक पट्टीवर चालकाचे थोडक्यात नाव काळ्या धर्तीवर पांढऱ्या अक्षरामध्ये मराठीमध्ये नाव लिहिले पाहिजे. नाव लिहिलेल्या पट्टीवर साईज ९ सें. मी. २ सें. मी. असली पाहिजे.

(१०) वाहनाची स्वच्छता ठेवली पाहिजे.

(११) शिष्टाचार पाळताना कुणाच्या धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये. (Shall not solicit custom serve in civil and quiet manner.)

(१२) वाहन चालकाने प्रवासाचे दरम्यान अकारण प्रवासात दिरंगाई करू नये किंवा मुक्काम ठिकाणी जाताना वाहनाचे वेळापत्रकाप्रमाणे पोहोचले पाहिजे व वेळापत्रक नसेल तर योग्य वेळेत पोहोचले पाहिजे.

(१३) मोटार वाहनाचा ब्रेक नादुरुस्त झालेमुळे किंवा इतर कारणास्तव वाहन चालक मुक्कामी ठिकाणी जाण्यास असमर्थ असेल तर वाहन चालकाने प्रवाशांची मुक्कामी ठिकाणी पोहोचवण्याची व्यवस्था दुसऱ्या वाहनातून केली पाहिजे. वेळेत वाहन चालक अशी व्यवस्था करू शकत नसेल व प्रवाशांनी मागणी केल्यास जेवढा प्रवास संपला तेवढे भाडे कापून बाकी रक्कम परत केली पाहिजे.

(१४) वाहन चालकाने व्यवस्थापनाने दिलेले एकापेक्षा जास्त बिल्ले धारण करू नये.

(१५) व्यवस्थापन किंवा प्राधिकरणाने प्रवासी वाहतुकीसाठी किंवा करार पद्धतीने वाहतूक करण्यासाठीचे अधिकारपत्र निलंबित केले किंवा रद्द केले किंवा कोर्टाने अवैध ठरवल्यास वाहनचालकाने बिल्ला देणाऱ्या प्राधिकरणाकडे सात दिवसाचे आत बिल्ला परत केला पाहिजे.

(१६) गणवेशधारी पोलीस अधिकाऱ्याने किंवा मोटार वाहन विभागाच्या मोटार वाहन सहाय्यक इन्स्पेक्टर या योग्यतेच्या अधिकाऱ्याने मागणी केल्यास चालक परवाना तपासणीसाठी (Inspection) हजर केला पाहिजे.

चालक परवान्याची मागणी केलेनंतर चालकाने नियम क्रमांक २४ प्रमाणे बिल्ला धारण केला असल्यास या नियमांतर्गत वाहन चालकाने पूर्तता केली असे गृहीत धरण्यात येईल. जर वाहन चालकाने राज्यातील पोलीस स्टेशनमध्ये ४८ तासांचे आत चालक परवाना पोलीस अधिकाऱ्याकडे किंवा मोटार वाहन इन्स्पेक्टरकडे मागणी केलेनंतर हजर केले तर वाहन चालकाने या नियमांतर्गत पूर्तता केली असे गृहीत धरण्यात येईल.

(१७) वाहनामध्ये इंधन भरताना इंजिन चालू स्थितीत नाही व वाहनात प्रवासी नाही याची खात्री केली पाहिजे.

(१८) वाहन चालकाने गार्ड नसलेल्या ठिकाणी रेल्वे क्रॉसींग करताना वाहन थांबवून दोन्ही बाजूने वाहन येत नाही याची खात्री करून मोटार वाहनाच्या वाहकाने खाली उतरून वाहकाच्या पाठीमागून रेल्वे क्रॉसींग केले पाहिजे.

(१९) वाहनाचा अपघात झालेनंतर प्रवाशांना मदत करून जखमी प्रवाशांना नजीकच्या दवाखान्यात पोहोचते केले पाहिजे. तसेच नजीकच्या दवाखान्यात अपघातसंबंधी माहिती दिली पाहिजे किंवा माहिती देणेसंबंधी व्यवस्था केली पाहिजे.

(२) करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाने किंवा प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाने वाहकाच्या (Conductor) गैरहजेरीत किंवा मोटार वाहनातील वाहक कारणास्तव ड्युटीवर असताना काम करू शकत नसेल तर वाहन चालकाने प्रवास संपलेनंतर आवश्यक तपासणी करून प्रवाशांचे किंवा इतर व्यक्तींचे काही सामान वाहनात राहिले किंवा काय याची तपासणी करावी व सामान आढळून असल्यास ताब्यात घेऊन ऑफिसमधील जबाबदार व्यक्तीच्या किंवा परवानाधारक वाहन मालकाच्या ताब्यात द्यावे.

(३) प्रवासी वाहतूक करणाऱ्या किंवा करार पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाने असाध्य रोगाने ग्रासलेल्या व्यक्तीला वाहन चालकावर सदर रोगग्रस्त व्यक्तीची माहिती असल्यास प्रवेश करू देऊ नये किंवा चालकाला माहिती झाल्यास असाध्य रोगग्रस्त व्यक्तीचे प्रेत वाहनात नेणेस परवानगी देऊ नये.

(४) महाराष्ट्र मोटार वाहन नियम क्रमांक २० पोट–नियम ३ मधील तरतुदीत नमूद केले असले तरी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनी लेखी स्वरूपात अर्ज केलेनंतर वाहन चालक असाध्य रोगग्रस्त व्यक्तीस प्रवासी वाहनातून नेऊ शकतो; परंतु अशा व्यक्तीबरोबर इतर प्रवाशास किंवा आजारी व्यक्तीबरोबर असणाऱ्या व्यक्तीस नेऊ शकत नाही.

(५) करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या प्रवासी वाहनातून किंवा प्रवासी वाहनातून असाध्य रोगग्रस्त व्यक्तीस वाहून नेले किंवा असाध्य रोगग्रस्त व्यक्तीचे प्रेत वाहून नेलेस अशा वाहनांच्या वाहन चालकाने अशी व्यक्ती किंवा प्रेत वाहून नेलेबद्दल नजीकच्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी, जिल्हा परिषदेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यास, पंचायत समिती किंवा सरकारी दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी व वाहन मालकास रिपोर्ट केला पाहिजे. वाहन चालकाने वैद्यकीय अधिकाऱ्याने नमूद केलेप्रमाणे वाहन निर्जंतुक केलेशिवाय व वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तसे प्रमाणपत्र घेतलेशिवाय इतर व्यक्तीस वाहनात प्रवेश करू देऊ नये.

**२१. टॅक्सी चालकांचे वर्तन व कर्तव्य यासंबंधी नियम :**

(१) टॅक्सी स्थानावरील पहिल्या दोन टॅक्सी चालकांनी टॅक्सी जवळ उभे राहिले पाहिजे. टॅक्सी चालकांनी एखादी व्यक्ती आल्यानंतर त्याला घेऊन जाणेसाठी ताबडतोब तयार असले पाहिजे.

(२) टॅक्सी चालकांनी स्थानकावरील जागा मोकळी झाली की, टॅक्सी पुढे हलवल्या पाहिजेत.

(३) प्रत्येक टॅक्सी चालकाने आपली टॅक्सी पुढील टॅक्सीच्या मागे ३० सें.मी. अंतरावर पुढील चाके सरळ स्थितीत ठेवून उभी केली पाहिजे.

(४) टॅक्सी चालकाने टॅक्सी सुस्थितीत नसेल तर स्थानकात उभी करू नये. टॅक्सी तात्पुरती नादुरुस्त असेल व लगेच दुरुस्त होणार असेल तर स्थानकात उभी केली पाहिजे.

(५) टॅक्सी चालकाने त्याची टॅक्सी कामात गुंतलेली नसेल तर ठरवून दिलेल्या स्थानकाखेरीज इतर ठिकाणी उभी करू नये.

(६) टॅक्सी चालकाने त्याच्यापुढे उभी असलेली टॅक्सी भाड्याने घेण्यास प्रतिबंध करू नये किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करू नये.

(७) टॅक्सी चालकाची टॅक्सी काही काळानंतर भाड्याने नेणेसंबंधी ठरले असेल तर व त्याला ताबडतोब टॅक्सी भाड्याने नेणेसंबंधी तयार नसेल तर टॅक्सी स्थानकात उभी करू शकतो.

(८) टॅक्सी चालकाने कुठल्याही सयुक्तिक कारणाशिवाय जवळच्या मार्गाने प्रवाशास लवकरात लवकर इष्ट स्थळी पोहोच केले पाहिजे.

(९) टॅक्सी चालकाने टॅक्सीचा उपयोग वेश्या व्यवसायासाठी देणे यासाठी करू नये.

(१०) टॅक्सी चालकाला क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाने विशेष परवानगी दिल्याशिवाय टॅक्सीमध्ये क्लीनर किंवा सहाय्यक ठेवता येत नाही.

(११) टॅक्सी चालकाला घेतलेले भाडे किंवा प्रवासी त्या व्यक्तीने टॅक्सी चालकाला सोडून दिल्याशिवाय सोडता येत नाही.

(१२) टॅक्सी चालकाला कायदेशीर भाड्यापेक्षा जास्त भाडे आकारता येत नाही.

(१३) टॅक्सी चालकाला प्रवासी आकर्षित करणेसाठी ओरडता येत नाही.

(१४) टॅक्सी चालकाने आपले वाहन सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक काळजी घेतली पाहिजे. टॅक्सी चालकाने वाहनाचे ब्रेक, टायर किंवा दिवा सदोष (Defective) परिस्थितीत असताना या गोष्टीची माहिती चालकाला असताना प्रवाशाच्या जीवितास अपायकारक होईल अशा पद्धतीने किंवा वाहनात पुरेसे इंधन नसताना व वाहन पुढील इंधन स्टेशनवर पोहोचेल इतके इंधन नसताना वाहन चालवू नये.

(१५) टॅक्सी चालकाने शांततेत व योग्यरीतीने शिष्टाचार पाळावेत. दुसऱ्या वाहनात चढणाऱ्या प्रवाशास किंवा तयारीत असणाऱ्या प्रवाशास अडथळा निर्माण करू नये.

(१६) टॅक्सी चालकाने वाहन चालवताना धूम्रपान करू नये.

(१७) टॅक्सी चालकाने प्रवासी व इतर प्रवाशाबरोबर वर्तणूक करताना शिष्टाचार पाळावेत.

(१८) क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाने ठरवून दिलेला गणवेश टॅक्सी चालकाने वापरला पाहिजे.

अशा वाहनांना अत्यावश्यक ड्युटीसाठी किंवा ट्रेनिंगसाठी बोलावले जाते सरकार अशा चालकाना विदेश आदेशाने सदर पोटनियमांच्या अंमलबजावणीपासून नमूद केलेल्या कालावधीपुरती अपवाद (Exempt) ठरवते.

(१९) टॅक्सी चालकाने वाहन स्वच्छ व सुरस्थितीत ठेवले पाहिजे.

(२०) टॅक्सी चालकाने टॅक्सीमधून प्रवासी वाहतूक करताना वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रात (Certificate of registration)नमूद केलेल्या बैठक क्षमतेपेक्षा (Seating capacity) जास्त प्रवासी वाहतूक करू नये.

(२१) टॅक्सी चालकाने राज्यातील प्राधिकरणाने दिलेल्या एकापेक्षा जास्त बिल्ले धारण करू नये.

(२२) टॅक्सी चालकाचा चालक परवाना अधिकार पत्र (Authorisation of driving licence) प्राधिकरणाने रद्द केले किंवा कोर्टाने अवैध ठरवले तर टॅक्सी चालकाने प्राधिकरणाने दिलेला बिल्ला ७ दिवसांचे आत प्राधिकरणाकडे जमा केला पाहिजे.

(२३) टॅक्सी चालकाने आपल्या वाहनातून असाध्य रोगग्रस्त व्यक्तीस प्रवास करण्यास किंवा असाध्य रोगग्रस्त व्यक्तीचे प्रेत वाहून नेणेस परवानगी देऊ नये किंवा वाहून नेऊ नये.

(२४) महाराष्ट्र मोटार वाहन नियम २१ पोट–नियम २३ मध्ये नमूद केले असले तरी नोंदणी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने लेखी अर्ज केलेनंतर टॅक्सीचालक असाध्य रोगग्रस्त व्यक्तीस टॅक्सीतून प्रवास करणेस वा परवानगी देऊ शकतो; परंतु सदर व्यक्ती बरोबर असलेल्या दुसऱ्या व्यक्तीला त्याचवेळेस प्रवास करू देण्यास परवानगी देऊ शकत नाही.

(२५) जर असाध्य रोगग्रस्त व्यक्तीला टॅक्सी चालकाने टॅक्सीतून नेले तर त्या टॅक्सी चालकाने त्या संदर्भात नजीकच्या नगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यास, जिल्हा परिषदेच्या, पंचायत समिती व सरकारी दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी व वाहनाच्या मालकाला सूचना दिली पाहिजे. तसेच टॅक्सी मालकाने किंवा टॅक्सी चालकाने वाहन व वाहन चालक यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलेप्रमाणे निर्जंतुक केल्याशिवाय व वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तसे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय इतर व्यक्तीस प्रवेश करू देऊ नये.

(२६) टॅक्सी चालकाने टॅक्सी दोन महिन्यातून एकदा डी.डी.टी. पावडर व महाराष्ट्र सरकारच्या सर्जनने स्वीकृत केलेल्या द्रवरूप कीटकनाशकाची (Liquid insectiside) फवारणी करून वाहन निर्जंतुक केले पाहिजे.

(२७) टॅक्सी चालकाने टॅक्सी नोंदवही ठेवली पाहिजे व मोटार वाहन विभागाच्या मोटारवाहन सहाय्यक इन्स्पेक्टर या योग्यतेच्या अधिकाऱ्याने किंवा पोलीस अधिकाऱ्याने मागणी केलेनंतर टॅक्सी कुठल्या तारखांना निर्जंतुक केली व टॅक्सी निर्जंतुक करताना वापरावयाचा मेकॅनिकल फवारा कार्यक्षम आहे किंवा नाही याची नोंद असणारी वही तपासणीसाठी हजर केली पाहिजे.

(२८) मोटार वाहन विभागाच्या सहाय्यक इन्स्पेक्टर किंवा पोलीस अधिकाऱ्याने मागणी केल्यानंतर टॅक्सीचालकाने चालक परवाना तपासणीसाठी (Inspection) हजर केला पाहिजे.

(२९) टॅक्सी चालकाने प्रवाशांचा प्रवास संपल्यानंतर वाहनात प्रवाशांचे सामान राहिले की काय यासंबंधी तपास केला पाहिजे व तपासाअंती काही आढळून आल्यास सामान ताब्यात घेऊन नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये हजर केले पाहिजे.

(३०) टॅक्सी चालकाने टॅक्सी मालकाची परवानगी घेतलेशिवाय इतर व्यक्तीला टॅक्सी चालवणेस देऊ नये.

(३१) टॅक्सी चालकाने टॅक्सी गार्ड नसलेल्या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग करताना थांबवली पाहिजे व दोन्ही बाजूने रेल्वे येत नाही याची खात्री करून मगच रेल्वे क्रॉसिंग केले पाहिजे.

**२२. टॅक्सी मीटर लावलेल्या मोटार वाहनाच्या चालकांच्या बाबतीत अतिरिक्त नियम :**

महाराष्ट्र मोटार वाहन नियम क्र. २१ मध्ये दिलेल्या अनुसरून अतिरिक्त नियम.

(a) टॅक्सी मीटर लावलेल्या मोटार वाहनाच्या मोटार वाहन चालकाने मोटार वाहन भाड्याने घेणेपूर्वी मीटर चालू करता कामा नये व प्रवाशांचे इच्छित ठिकाण आल्याबरोबर ताबडतोब बंद केले पाहिजे.

**सूचना :–** टॅक्सी बोलावले बरोबर किंवा ठराविक अंतरावरून हाक दिले बरोबर भाड्याने ठरवली असे समजण्यात येईल.

(b) टॅक्सी मीटर लावलेल्या मोटार वाहन भाड्याने ठरवलेनंतर मेकॅनिकल दोषामुळे किंवा वाहनाच्या टायरमुळे वाहनचालक टॅक्सी पुढे नेणेस असमर्थ असेल तर चालकाने मीटर बंद केले पाहिजे व मेकॅनिकल दोष दुरुस्त होईपर्यंत मीटर पुन्हा चालू करता कामा नये.

(c) टॅक्सी चालकाने टॅक्सी मीटरचे तोंड कुठल्याही परिस्थितीत झाकून किंवा अस्पष्ट ठेवता कामा नये.

(d) टॅक्सीचे निशाण उभ्या स्थितीत (Flag is in vertical position) असताना वाहन चालक कुठलेही सयुक्तिक कारण नसताना वाहनात भाडे घेणे नाकारू शकत नाही.

**२३. माल वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाचे वर्तनासंबंधी नियम :**

मालवाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहन चालकाने

(१) मोटार वाहन नियम क्र. १७५ नुसार चालक बैठक व्यवस्थेच्या जागेवर कुठल्याही व्यक्तीस, प्राण्यास परवानगी देऊ नये किंवा वाहन चालवताना वाहन चालकास रोडच्या परिस्थितीचा अंदाज येणेस अडथळा येईल किंवा वाहन ताब्यात ठेवणेस अडथळा येईल अशा ठिकाणी येणेस परवानगी देऊ नये.

(२) वाहन चालकाने मोटार वाहन सुस्थितीत ठेवणेसाठी आवश्यक काळजी घेतली पाहिजे. वाहन चालकास वाहनाचे ब्रेक, टायर, दिवा (Lamp) सदोष परिस्थितीत असताना वाहन ताब्यात असणाऱ्या व्यक्तीच्या किंवा इतर व्यक्तीच्या जीवितास अपाय होईल या गोष्टीची माहिती असताना किंवा मोटार वाहनास पुढील इंधन स्टेशन येईपर्यंत पुरेल इतके इंधन नसताना वाहन चालवू नये.

(३) मोटार वाहन कायद्यात दिलेल्या तरतुदी व मोटार वाहन नियमात दिलेल्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी सदर वाहन चालक त्याच्या कर्तव्यास अनुसरून जबाबदार आहे.

(४) वाहन भाड्याने घेणाऱ्या व्यक्ती तसेच त्यांचे वारस यांच्याशी शिष्टाचार पाळून वर्तन ठेवले पाहिजे.

(५) शिष्टाचार पाळताना कुणाच्या धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये. (Shall not solicit custom save in a civil & quite manner.)

(६) वाहन चालकाने प्रवास करताना अकारण प्रवासात दिरंगाई करू नये; परंतु इच्छित स्थळी लवकरात लवकर पोहचले पाहिजे.

(७) वाहनातील मालाचे नुकसान होऊ नये किंवा हरवू नये म्हणून वाहन चालकाने काळजी घेतली पाहिजे.

(८) वाहन चालक आपले वाहन घेऊन गार्ड नसलेल्या रेल्वे क्रॉसिंगजवळ पोहोचल्यानंतर वाहन थांबवून दोन्ही बाजूंनी रेल्वे येत नाही याची खात्री करून घेतल्यानंतर रेल्वे क्रॉसिंग केले पाहिजे.

(९) माल वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाकडे सब इन्स्पेक्टर या पात्रतेच्या पोलीस अधिकाऱ्याने किंवा मोटार वाहन विभागाच्या सहाय्यक इन्स्पेक्टरने मागणी केलेनंतर आवश्यक कागदपत्र तपासणीसाठी हजर केले पाहिजेत.

**२४. सार्वजनिक वाहनाच्या वाहन चालकाचे बिल्ले :–**

(१) सार्वजनिक वाहनावर चालक म्हणून काम करण्यासाठी अधिकारपत्र मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीला धातूचा बिल्ला (Metal badge) दिला जातो. हा बिल्ला चालकाने त्याला ज्या विभागात वाहन चालवणार आहे त्या विभागाचे भौगोलिक ज्ञान व मराठीचे आवश्यक ज्ञान व इतर बोली भाषेचे ज्ञान आवश्यक या अटीवर दिले जाते. हा बिल्ला परिशिष्ट क्र. २ मध्ये नमूद केले प्रमाणे या नियमांतर्गत मोठ्या बसच्या बसचालकासाठी वर्तुळ आकारात दिला जातो व टॅक्सी चालकासाठी त्रिकोणी आकारात बिल्ला दिला जातो. या बिल्ल्यामध्ये ज्या प्राधिकरणाने अधिकारपत्र दिलेल्या मुख्य स्थानकाचे नाव (Head quarter of the authority) व मोटार वाहनाचा प्रकार ओळख नंबर (Identification Number) नमूद केलेला असतो.

(२) सार्वजनिक वाहनावर वाहन चालकावर वाहन चालक म्हणून काम करणाऱ्या वाहन चालकाने डाव्या छातीवर धातुचा बिल्ला लावला पाहिजे. एकाच प्रकारचे दोन बिल्ले वाहन चालकाने धारण करता कामा नये.

तसेच आराम बसच्या वाहन चालकाने 'एल सी डी' अशी अक्षरे नमूद केलेला बिल्ला धारण केला पाहिजेच. पर्यटन वाहनावर वाहन चालक म्हणून काम करणाऱ्या वाहन चालकाने 'टी सी डी' अक्षरे नोंदवलेला बिल्ला धारण केला पाहिजे.

(३) या बिल्ल्यासाठी १० रु. शुल्क आकारले जाते. सदर बिल्ला हरवला किंवा गहाळ झाला तर परिशिष्ठ क्र.१ मध्ये या नियमा अंतर्गत नमूद केलेल्या नमुना अर्ज 'डी. टी. व्हि. बी.' नमुन्यात २०रु. शुल्कासह अर्ज केलेनंतर डुप्लिकेट बिल्ला दिला जातो. मूळ बिल्लानंतर सापडल्यास व बिल्ला दिलेल्या प्राधिकरणास (Issuing authority) बिल्ला परत केल्यास वाहन चालक पाच रुपये परत मिळण्यास पात्र ठरतो.

(४) सार्वजनिक वाहनावरील वाहन चालकाचे अधिकारपत्र प्राधिकरणाने रद्द केले किंवा कोर्टाने अवैध ठरविल्यास वाहन चालकाने त्याचा बिल्ला नियमाचे आत बिल्ला दिलेल्या प्राधिकरणाला परत केला पाहिजे.

**३४. प्रवासी वाहनावरील वाहकाचे कर्तव्य व वर्तन :–**

(१) प्रवासी वाहनावरील वाहक मोटार वाहन कायद्याच्या तरतुदी व महा. मोटार वाहन नियमाच्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी त्याचे कर्तव्याच्या अनुषंगाने जबाबदार आहे.

(२) कामावर असताना धूम्रपान करू नये.

(३) प्रवाशांशी वर्तन करताना शिष्टाचार पाळावेत.

(४) त्याचा पोषाख स्वच्छ असावा व त्याने खाकी शर्ट, खाकी बुश शर्ट व खाकी पँट असा गणवेश वापरावा.

परंतु, नियम २७ प्रमाणे वाहक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींना हे उपनियम लागू नाही.

(५) वाहकाने वाहन स्वच्छ ठेवले पाहिजे.

(६) शिष्टाचार पाळताना कुणाच्या धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये.

(७) दुसऱ्या वाहनात चढणाऱ्या प्रवाशांना किंवा चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला अडचण निर्माण करू नये.

(८) मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या प्रवासी बैठक क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांना प्रवास करण्यास परवानगी देऊ नये किंवा वाहनात प्रवाशांना उभे राहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना परवानगी असलेल्या संख्येपेक्षा जास्त प्रवाशांना उभे राहून प्रवास करू देऊ नये.

(९) योग्य व संयुक्तिक कारणाशिवाय कायदेशीर भाडे देणाऱ्या व्यक्तीला प्रवास करण्यास प्रतिबंध करू नये.

(१०) कायदेशीर भाडे न देणाऱ्या प्रवाशाला प्रवास करण्यास परवानगी देऊ नये.

(११) प्रवाशांबरोबर अतिरिक्त मालवाहतूक वाहनातून होत असेल तर प्रवाशांना अपाय किंवा असुविधा होऊ नये म्हणून आवश्यक काळजी घेतली गेली पाहिजे.

(१२) कायदेशीर भाडे देणाऱ्या व्यक्तीला प्रवास संपण्यापूर्वी कायदेशीर कारणाशिवाय वाहनातून उतरवून देऊ नये.

(१३) इच्छित स्थळी किंवा मुक्कामी ठिकाणी दिरंगाई करून वाहन घेऊन जाऊ नये तर वेळापत्रकानुसार वाहन पोहोचेल याची काळजी घ्यावी.

(१४) मेकॅनिकल ब्रेकडाऊनमुळे किंवा वाहकाच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे वाहन नियोजित वेळेत पोहचत नसेल किंवा वाहनास पुढील प्रवास शक्य नसेल तर प्रवाशांची दुसऱ्या वाहनात व्यवस्था केली पाहिजे. ठराविक वेळेत प्रवाशांची पुढील प्रवासाची व्यवस्था होऊ शकली नाही तर प्रवाशांनी मागणी करताच प्रवास संपला तिथपर्यंतच भाडे कापून उरलेली रक्कम प्रवाशांना परत केली पाहिजे.

(१५) प्रवाशांना वाहनात चढण्यास किंवा उतरण्यास अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी सामान ठेवण्यास परवानगी देता कामा नये.

(१६) प्रवाशांना कायदेशीर भाडे देताच त्यांना तिकीट दिले पाहिजे. अपवाद फक्त एवढाच की वाहनाच्या बाहेर तिकीटच देणेची व्यवस्था असेल तर.

(१७) प्रवास संपले नंतर वाहनात प्रवाशांची काही वस्तू किंवा सामान राहिले किंवा काय याबाबत शोध घेऊन काही सामान आढळून आल्यास ते ताब्यात घेऊन वाहन मालकाच्या ऑफिसमधील जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात दिले पाहिजे.

(१८) एखादी व्यक्ती असाध्य रोगाने रोगग्रस्त असल्याबद्दल किंवा रोगग्रस्त व्यक्तीचे प्रेत असलेबद्दल माहिती असल्यास अशा व्यक्तीस प्रवासी वाहनात प्रवेश करण्यास किंवा प्रवास करण्यास परवानगी देऊ नये.

(१९) उप–कलम १८ मध्ये नमूद केलेले असले तरी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने लेखी अर्ज केलेनंतर अशा रोगग्रस्त व्यक्तीला प्रवास करण्यास परवानगी देऊ शकतो परंतु अशा आजारी व्यक्तीबरोबर त्याच्या सेवा शुश्रूषा करणाऱ्या व्यक्तीला रोगग्रस्त किंवा आजारी व्यक्तीबरोबर प्रवास करण्यास परवानगी दिली जाऊ नये.

(२०) प्रवासी वाहनातून रोगग्रस्त व्यक्तीला प्रवास करण्याची परवानगी दिले किंवा अशा व्यक्तीचे प्रेत वाहून नेल्यास वाहकाने वैद्यकीय अधिकाऱ्यास किंवा आरोग्य अधिकारी किंवा वाहन मालकास रिपोर्ट करण्यास जबाबदार असतो. वाहन मालकाने, वाहन चालकाने, वाहन चालक किंवा वाहक यांनी वाहनाला वैद्यकीय अधिकाऱ्याने नमूद केल्याप्रमाणे निर्जंतुक केलेशिवाय व तसे प्रमाणपत्र वैद्यकीय अधिकाऱ्याकडून घेतल्याशिवाय वाहनामध्ये इतर व्यक्तींना प्रवास करण्यास परवानगी देऊ नये.

(२१) वाहकाने मोटार वाहनाच्या मागील सिग्नल संदर्भात चालकाला मदत केली पाहिजे.

(२२) प्रवाशांचे सामान रस्त्यात हरवू नये म्हणून काळजी घेतली पाहिजे.

(२३) ड्युटीवर असताना मद्यपान करू नये की ज्यामुळे वाहकाचे कार्यावर परिणाम होईल.

(२४) प्रवाशांनी मागणी केल्यास प्रवाशांना नोंद करण्यासाठी तक्रार पुस्तिका देण्यात यावी.

(२५) वाहन चालू स्थितीत असताना वाहनात इंधन भरण्यात येऊ नये.

(२६) प्रवासी वाहन गार्ड नसलेल्या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग जवळ आलेनंतर वाहन थांबवावे. वाहनाच्या दोन्ही बाजूने रेल्वे येत नाही याची खात्री झालेनंतर रेल्वे क्रॉसिंग करावे.

(२७) अपघात झाल्यास वाहकाने जखमींना मदत करावी व अपघातासंदर्भात नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती कळवावी.

(२८) अपंग व्यक्ती, गरोदर स्त्रिया, वयोवृद्ध, लहान मुले असलेल्या स्त्रियांना वाहनात चढणेस व उतरवणेस मदत करावी.

(२९) चालक वाहन मागे घेत असताना वाहकाने बसच्या खाली उतरून दुसरे एखादे वाहन येत नाही व मागे कुठल्याही वाहनाचा अडथळा आहे किंवा नाही यासंबंधी चालकाला सिग्नल दिला पाहिजे.

(३०) वाहनातून अपायकारक तसेच रसायने, स्फोटके खाजगी सामान म्हणून वाहून नेणेस परवानगी देऊ नये.

**५८. चोरीस गेलेल्या व नंतर सापडलेल्या मोटार वाहनाबाबत खबर देणे :–**

(१) वाहन मालक किंवा वाहन ताब्यात असलेल्या व्यक्तीने मोटार वाहनाच्या चोरीसंदर्भात ज्या पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला असेल त्या पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्याने गुन्हा नोंदवल्याबरोबर राज्य परिवहन अधिकाऱ्यास, महाराष्ट्र सरकार, राज्य परिवहन प्राधिकरणाच्या अधिकृत अधिकाऱ्याकडे परिशिष्ट क्र. १ मधील नमुना एम. व्हि. टी (Form M.V.T.) या स्वरूपात सूचना दिली पाहिजे व या सूचनेची एक नक्कल वाहन ज्या प्राधिकरणाकडे नोंद केले त्या प्राधिकरणास दिली पाहिजे.

(२) ज्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवला असेल ते पोलीस स्टेशन पोलीस कमिशनर मुंबईच्या कार्यक्षेत्रात असेल तर पोलीस अधिकाऱ्याने फॉर्म एम. व्हि. टी (Form M.V.T.) सूचना मुंबईतील नोंदणी प्राधिकरणाला दिली पाहिजे.

(३) परिवहन आयुक्तास पोट–नियम १ प्रमाणे नोटीस मिळालेनंतर परिवहन आयुक्ताने परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केलेल्या नमुना एम. व्हि. टी. आर. (Form M.V.T.R.) नोंदणी प्राधिकरणास चोरीस गेलेल्या वाहनांचा तपशील कळवला पाहिजे.

(४) परिवहन आयुक्ताने चोरीस गेलेल्या वाहनांच्या बाबतीत परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केलेल्या नमुना एम. व्हि. टी. रजि. (टी) (Form M.V.T.R.) नोंदवही ठेवणेत आली पाहिजे.

(५) नोंदणी प्राधिकरणाने नोंदणी आयुक्त किंवा पोलीस अधिकाऱ्याकडून चोरीस गेलेल्या वाहनांच्या बाबतीत सूचना आलेल्या वाहनांची नोंद ठेवली पाहिजे.

(६) चोरीस गेलेले वाहन सापडलेल्या ज्या पोलीस स्टेशनने वाहन सापडले असेल त्याने नमुना एम. व्हि. टी (Form M.V.T.) या स्वरूपात राज्य परिवहन प्राधिकरणाला सूचना दिली पाहिजे.

(७) पोट–नियम ६ प्रमाणे सूचना मिळाल्यानंतर परिवहन आयुक्त व नोंदणी प्राधिकरणाने पोटनियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात सापडलेल्या वाहनांच्या बाबतीत ठेवलेल्या नोंदवहीत नोंद ठेवली पाहिजे.

**७७. ठरावीक परिस्थितीत प्रवासी वाहन परवान्यात नमूद केलेल्या मार्गाव्यतिरिक्त इतर मार्गावर वाहन चालवणे:–**

(१) परवाना मंजूर करणाऱ्या प्राधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार प्रवासी वाहतूकीसाठी परवाना दिलेला परवानाधारक सार्वजनिक हिताचे दृष्टीने अत्यावश्यक परिस्थितीत परवान्यात नमूद केल्या मार्गाव्यतिरिक्त इतर मार्गावर आदेशात नमूद केलेल्या कालावधीत व वेळेपुरते वाहन चालवू शकतो.

**७८. ठरावीक परवान्यासंदर्भात अतिरिक्त अटी :–**

(१) प्रवासी वाहतूक वाहनासंदर्भात खालील अटी–

(a) प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन परवानाधारकाने त्याचे वाहन सार्वजनिक ठिकाणी प्रवासी वाहतूक करताना आवश्यक असल्यास अतिरिक्त चालक व वाहकाशिवाय चालवू नये.

(b) वाहनावर वाहन कुठल्या मार्गावरून जाणार यासंबंधी तपशील नमूद केला पाहिजे.

(c) वाहन नमूद केलेल्या मार्गावरून स्वीकृत वेळापत्रकानुसार चालवले पाहिजे. अपवाद फक्त

(i) अपघातामुळे किंवा इतर आवश्यक कारणामुळे,

(ii) क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाने लेखी स्वरूपात अधिकृतपणे सूचना दिल्यास.

(२) करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनास खालील अटी –

(a) असे वाहन परवानाधारकाने किंवा लायसन्स असलेल्या चालकाने सार्वजनिक वाहन चालवण्याचे अधिकारपत्र असलेशिवाय व परवानाधारकाने लेखी अधिकारपत्र असलेशिवाय सार्वजनिक ठिकाणी चालवू नये व सदर अधिकारपत्र वाहन चालकाकडे वाहन चालवताना असले पाहिजे व पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाच्या अधिकाऱ्याने मागणी केलेनंतर हजर केले पाहिजे.

(b) वाहन परवान्यात नमूद केलेल्या प्रवासी वाहून नेणेच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेता कामा नये.

(c) वाहनावर जाहिराती, आकृती व अक्षरे लावता कामा नये.

(३) सार्वजनिक वाहन परवाना देताना परवानाधारकाने वाहनातील प्रवाशांची सोयीसुविधा व त्याचे सामानाचे पावसापासून संरक्षण करण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे या अटीस अनुसरून दिले जाते.

(४) परिवहन वाहन परवाना, परवानाधारकाने कायद्यात नमूद केलेल्या तरतुदीची व नियमांची पूर्तता होते या अटीवर दिला पाहिजे.

**७९. प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनातून माल वाहतूक करणे :–**

(१) महाराष्ट्र मोटार वाहन नियम ८१ व नियम ७९ (२) च्या तरतुदींना अनुसरून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या छतावरून किंवा वाहनाच्या एखाद्या भागात, लॉकरमध्ये माल वाहतूक केली जाऊ शकते. माल वाहतूक वाहनाच्या छतावरून केली जात असेल तर मालाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केली पाहिजे.

(२) प्रवासी वाहनातून माल वाहतूक करताना वाहनात प्रवेश करताना किंवा वाहनातून बाहेर पडताना अडथळा होईल अशा प्रकारे वाहतूक करू नये.

(३) दुमजली मोटार वाहनातून माल वाहतूक करताना वाहनाच्या वरच्या मजल्यावर माल ठेवून माल वाहतूक करू नये.

(४) प्रवासी वाहनाच्या वाहन परवान्यात माल वाहतूक करण्यास परवानगी दिली असेल व परवानाधारक प्रवाशांची मालवाहतूकीची मागणी पूर्ण करू शकला नाही तर क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण परवानाधारकास आपली बाजू मांडणेची संधी देऊन परवानाधारकाने अटीचा भंग केला असे जाहीर करून कलम ८६ मधील तरतुदीनुसार कारवाई केली जाते.

(५) महाराष्ट्र मोटार वाहन नियम ८१ पोटनियम (२) मधील तरतुदींना अनुसरून प्रवासी वाहनातून परवान्यात नमूद केलेल्या अटीनुसार माल वाहतूक केली जाते.

(६) प्रवासी वाहनातून प्रवाशाबरोबर मालवाहतूक केली जात असेल वाहून नेला जाणारा माल व्यवस्थित पॅक केलेला व सुरक्षित असला पाहिजे की, ज्यायोगे प्रवाशांना असुविधा किंवा त्रास होणार नाही. परवान्यात नमूद केलेप्रमाणे बैठक व्यवस्था ही प्रवाशांना बसताना अडथळा होणार नाही तसेच वाहनात प्रवेश करताना व उतरताना अडथळा होणार नाही अशी असली पाहिजे.

(७) प्रवासी वाहनातून माल वाहतूक करताना मालाचे वजन ६८ कि. ग्रॅ. पेक्षा जास्त नसले पाहिजे. दुमजली वाहन असेल तर खालच्या मजल्यावर ६८ कि.ग्रॅ. पेक्षा जास्त मालवाहतूक केली जाऊ नये. या पोटनियमाच्या संदर्भात एन. म्हणजे प्रवासी वाहून नेण्याची नोंदणीकृत क्षमता व किती प्रवासी वाहून नेले ती संख्या.

**८०. करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या मोटार वाहनातून माल वाहतूक करण्यास प्रतिबंध :–**

क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनास माल वाहतूक करण्यास परवानगी देऊ शकते.

(१) जर ठराविक समारंभासाठी विशेष कारणास्तव परवान्यात नमूद केलेले मर्यादा व अटींना अनुसरून.

(२) वाहन भाड्याने किंवा कराराने घेणाऱ्या व्यक्तीचे खाजगी, ऑफिस, घरगुती सामान परवान्यात स्वीकृती दिली असेल तर परंतु व्यापारी सामान वाहतूक करण्यास प्रतिबंध.

**८१. प्रवासी वाहनातून किंवा करार पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहनातून ठरावीक प्रकारचा माल वाहतूक करण्यास प्रतिबंध:–**

(१) माल वाहतूक करताना प्रवासी वाहनातून किंवा करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करताना आरोग्य विघातक माल वाहतूक करू नये.

(२) क्षेत्रीय परवाना प्राधिकरणाने प्रवासी वाहनातून व करार पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनातून कुठल्या प्रकारची माल वाहतूक करू नये हे नमूद केले पाहिजे.

**८२. प्रवासी वाहनातून खाजगी सामान वाहून नेणे :–**

नगरपालिका हद्दीतून होणारी प्रवासी वाहतूक वगळता प्रवासी वाहनातून प्रवास करणारा प्रवासी १४ कि.ग्रॅ. वजनाचे सामान कुठलेही शुल्क न आकारले जाता वाहून नेऊ शकतो.

**८३ मालवाहतूक करणाऱ्या वाहनातून प्राण्यांची वाहतूक :–**

(१) सार्वजनिक ठिकाणी माल वाहतूक करणाऱ्या वाहनातून पाळीव प्राणी वाहून नेले जाऊ नये. अपवाद

(i) शेळी, मेंढी, हरीण व डुक्कर यांचे संदर्भात

(a) वाहनात प्रत्येक पशुच्यामागे ०.२० चौ.मी. जागा असली पाहिजे.

(b) वाहनात हवा खेळती राहणेसाठी पुरेशी उपाययोजना केली पाहिजे.

(c) दुमजली (Double Decker) माल वाहतूक करणाऱ्या वाहनातून प्राण्यांची वाहतूक केली जात असेल तर,

(i) वाहनाचे वरच्या मजल्याचे छत मेटल शीट्सचे व ७.८२ उंचीवर असले पाहिजे की ज्यामुळे प्राण्यांचे मलमूत्र खालच्या मजल्यावरील प्राण्यांचे अंगावर येणार नाही.

(ii) प्रत्येक मजल्यावर ड्रेनेजची पुरेशी सुविधा असली पाहिजे.

(iii) प्रत्येक मजल्यावर लाकडाची चीप असली पाहिजे की, ज्यायोगे प्राण्याचे खूर (Hoop) निसटणार नाही.

(२) इतर प्रकारच्या प्राण्यांच्या बाबतीत,

(i) वाहनात प्रत्येक प्राण्यासाठी २ x १ मी. जागा असली पाहिजे.

(ii) वाहनाचा सांगाडा मजबूत लाकडाच्या फळ्यांचा किंवा लोखंडी पत्र्याचा असला पाहिजे. छताची उंची जमिनीपासून १.४ मी असली पाहिजे.

(iii) प्राण्याचे खूर निसटू नये म्हणून फरशीच्या चिपा बसविल्या पाहिजे.

(iv) प्राण्यास त्रास होईल अशी गोष्ट वाहनातून हलविली पाहिजे.

(v) प्राण्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना दोरीने बांधले पाहिजे.

(२) सर्कस, प्राणी संग्रहालयातील प्राणी, शिकारखान्यातील प्राणी (Menagerie) सार्वजनिक ठिकाणी माल वाहतूक करणाऱ्या वाहनातून वाहून नेऊ नये जर –

(a) जंगली श्वापद किंवा रोगीट प्राण्याचे बाबतीत वाहनाच्या आतील बाजूस त्याच्यासाठी पिंजरा केलेला असेल.

(b) प्राण्यासाठी वाहनात आवश्यक जागा असेल.

(३) पोटनियम (१) व (२) प्रमाणे प्राण्यांची वाहतूक करताना वाहनाचा वेग प्रत्येक तासी २४ कि.मी. पेक्षा जास्त असता कामा नये.

**८४. खाजगी वाहनातून सामान वाहतूक करणे :–**

(१) खाजगी वाहनातून प्रत्येक प्रवास करणाऱ्या व्यक्तीला ३० कि.ग्रॅ. पेक्षा जास्त वजनाचे सामान वाहून नेता येत नाही.

तसेच वाहन परवान्यात नमूद केले असेल तर अतिरिक्त सामान म्हणून परवानाधारकाचे घरगुती सामान व ऑफिस सामान वाहनाच्या सामान वाहून नेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त वजन वाहून नेऊ नये या अटीवर वाहून नेता येते.

(२) पोट–नियम (१) मध्ये नमूद केलेल्या नियमात नमूद केले असले तरी खाजगी वाहनातून व्यापारी सामानाची (Merchandise) वाहतूक करता येत नाही.

**९५. परवाना हजर करणे :–**

(१) वाहनात परवाना नेहमी ठेवला पाहिजे व क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने मागणी करताच हजर केले पाहिजे.

(२) कुठलाही गणवेशधारी पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाच्या असिस्टंट इन्स्पेक्टर पात्रतेचा अधिकारी परवाना तपासणीसाठी मागू शकतो.

**९६. परवान्याऐवजी तात्पुरते अधिकारपत्र :–**

(१) परवानाधारकाने आपला परवाना राज्य परिवहन प्राधिकरण किंवा क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाकडे परवाना नूतनीकरण किंवा परवाना प्रतिस्वाक्षरांकित करण्यासाठी किंवा इतर कारणांसाठी हजर केला किंवा सदर परवाना पोलीस अधिकारी, कोर्ट किंवा अधिकृत प्राधिकरण यांनी तात्पुरते काळासाठी परवाना ताब्यात घेतला असेल तर प्राधिकरण अधिकाऱ्याने परवान्यासाठी पावती परवानाधारकास दिली पाहिजे व परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केलेल्या नमुना टेम्प पी. ए. (Form Tem. P. A) या स्वरूपात वाहन चालवणेसाठी अधिकारपत्र त्यात नमूद केलेल्या काळासाठी दिले जाते. अधिकारपत्र हजर करणे म्हणजे परवाना हजर केला असे समजले जाते.

अधिकारपत्र मंजूर करणारे प्राधिकरण अधिकारपत्राचे वैधतेचा कालावधी वाढवू शकते किंवा परवाना परत देईपर्यंत अधिकारपत्र वैध ठरतो. यापैकी जे लवकर असेल ते.

(२) परवाना परत येईपर्यंत संबंधित वाहन तात्पुरत्या अधिकारपत्रात नमूद केलेल्या कालावधीपेक्षा पुढील कालावधीत चालवू नये.

(३) तात्पुरत्या अधिकारपत्रासाठी शुल्क आकारले जात नाही.

**१०२. महाराष्ट्र राज्यात प्रवासी वाहन वापरत असताना त्या व्यक्तीचे वर्तन –**

**१. एखाद्या प्रवाशाने किंवा वाहनाचा वापर करणाऱ्या व्यक्तीने किंवा वाहनाचा वापर करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने**

(१) परवानाधारकाच्या अधिकृत नोकरदारास काम करत असताना अडथळा केला,

(२) प्रवाशांच्या जड सामानामुळे इतर प्रवाशास असुविधा किंवा अडथळा होत असेल,

(३) एखादा प्रवासी, एखादा प्राणी, मांस, मासे किंवा साहित्य, आयुध वाहून नेत असताना इतर प्रवाशास अशा सामानापासून अडथळा निर्माण झाल्यास,

(४) स्त्री प्रवाशांसाठी राखीव ठेवलेले सीट बेकायदेशीरपणे ताब्यात घेतले.

(५) संगीत साहित्य किंवा ट्रांझिस्टर, रेडिओ वापरले तर,

(६) बेकायदेशीरपणे बेल वाजवून प्रवासी वाहनाच्या सिग्नलला हस्तक्षेप (Interfere) केला.

(७) प्रवासी किंवा व्यक्ती असाध्य रोगग्रस्त असेल,

(८) प्रवासी वाहनात नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या बैठक क्षमतेपेक्षा जास्तीत जास्त प्रवासी माहिती असताना हेतुपूर्वक वाहून नेले व परवान्यात नमूद केलेल्या बैठक क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेले किंवा

(९) बैठक व्यवस्था किंवा आसन व्यवस्थेचे नुकसान होईल, अशाप्रकारे ड्रेस घातला किंवा कपडे वापरले व इतर प्रवाशांच्या कपड्यांना नुकसान होईल असे कपडे घातल्यास,

(१०) मोटार वाहन कायदा किंवा मोटार वाहन नियम तरतुदींचा भंग केल्यास किंवा भंग करण्याचा प्रयत्न केल्यास,

वाहन चालक किंवा वाहकाने अशा व्यक्तीस ताबडतोब वाहनाच्या बाहेर काढून दिले पाहिजे व अशा व्यक्तीस वाहनाच्या बाहेर काढून देईपर्यंत वाहन उभे करून त्याच स्थितीत ठेवले पाहिजे. वाहनाबाहेर काढून दिलेली व्यक्ती भाडे परत घेणेस पात्र राहणार नाही. तसेच मोटार वाहक व चालकाने सदर प्रवाशास वाहनाच्या बाहेर उतरण्यास सांगितले तरी सदर प्रवाशाने पूर्तता न केल्यास वाहक व चालक किंवा वाहन चालकाच्या विनंतीवरून अशा प्रवाशास वाहनातून बाहेर काढले पाहिजे असा प्रवासी गुन्हेगार ठरतो.

**२. प्रवासी वाहनातून प्रवास करणारी व्यक्ती, वाहनाचा वापर करणारी व्यक्ती**

(१) कायदेशीर भाडे देणे नाकारू शकत नाही किंवा

(२) अधिकृत व्यक्तीने मागणी केलेनंतर तिकीट दाखविणेचे नाकारू शकत नाही.

(३) दिलेले तिकिटात बदल केल्यास, खराब केल्यास किंवा तिकिटावरील नंबर स्पष्ट दिसत नसल्यास नवीन भाडे देणेचे नाकारू शकत नाही.

(४) अव्यवस्थित वागू शकत नाही.

(५) स्त्री प्रवाशांना त्रास होईल किंवा नुकसान होईल असे वर्तन करू शकत नाही.

(६) शिवीगाळ किंवा अर्वाच्य भाषेत बोलू शकत नाही.

(७) थुंकू शकत नाही.

(८) धूम्रपानास बंदी असे लेखी स्वरूपात लिहिलेले असताना धूम्रपान करू शकत नाही.

(९) वाहन बसस्थानकावर असले खेरीज वाहन चालू स्थितीत असताना वाहनात प्रवेश करू शकत नाही किंवा वाहनातून उतरू शकत नाही.

(१०) वाहनात इंधन भरत असताना वाहनात उपस्थित राहू नये.

(११) वाहन चालकाच्या कामात हस्तक्षेप करू नये.

(१२) प्रवासी वाहनाच्या (Stage Carriage) फिटींगचे नुकसान होईल किंवा वाहनाच्या लाईटचे किंवा वाहनाच्या इतर अवशेषाचे नुकसान होईल असे वर्तन करू नये.

(१३) प्रवासी वाहनात वाहनाचा नोकरदार किंवा वाहनातील प्रवासी किंवा प्रवास करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीशिवाय वाहनात चढू नये, वाहनाच्या बाहेरील बाजूस टांगू (Hang) नये.

(१४) जेवढ्या अंतरापर्यंत प्रवासाचे भाडे दिलेले असेल ते अंतर संपलेनंतर वाहक किंवा चालक याचे परवानगी शिवाय पुढील प्रवास करू नये व पुढील प्रवासाचे कायदेशीर भाडे अगोदर देऊन मग पुढील प्रवास केला पाहिजे. वाहक किंवा चालक यांनी ज्या प्रवासाचे भाडे दिले असेल तेवढा प्रवास संपलेनंतर मागणी केल्यास वाहनातून उतरले पाहिजे.

(१५) वाहक किंवा चालक किंवा पोलीस अधिकाऱ्यांना एखाद्या व्यक्तीने मोटार वाहन कायद्यातील तरतुदी व नियमांचा भंग केला असा संशय आलेनंतर वाहक, चालक व पोलीस अधिकाऱ्यांनी मागणी केलेनंतर नाव व पत्ता देणेस नकार देणे किंवा

(१६) प्रवासी वाहनातून प्रवास करत असताना वाहकाने विनंती करून कुठपर्यंत प्रवास करावयाचा किंवा किती प्रवास पूर्ण केला हे जाहीर करून कायदेशीर भाडे देणे नाकारले तर किंवा

(१७) वातानुकूलित (Air conditioned) वाहनात धूम्रपान केले.

३. प्रवासी वाहनातून प्रवास करणाऱ्या व्यक्तीने किंवा वाहनाचा वापर करणाऱ्या व्यक्तीने प्रवासादरम्यान किंवा प्रवास संपलेनंतर अधिकृत व्यक्तीने तिकिटाची मागणी केले नंतर तिकीट हजर करू शकला नाही किंवा तिकीट दाखवू शकला नाही तर अशा व्यक्तीने कायदेशीर भाडे दिले पाहिजे.

४. प्रत्येक प्रवासी भाडे दिलेनंतर वाहकाकडून तिकीट घेणेस पात्र ठरतो.

५. प्रवासी वाहनाच्या वाहक किंवा चालकाने सूचना करून एखाद्या प्रवाशाच्या सामानाची तपासणी करण्यासंबंधी नियम ३४ उपनियम (३१) व नियम २० पोटनियम (२–a) प्रमाणे मागणी केली तर प्रवाशाने त्या संदर्भात आवश्यक पूर्तता केली पाहिजे. प्रवाशाने वाहक व चालकाचे मागणी प्रमाणे पूर्तता न केल्यास वाहक किंवा चालकाच्या मागणीवरून पोलीस अधिकारी अशा प्रवाशास वाहनातून उतरवून देऊ शकतो व अशी व्यक्ती गुन्हेगार ठरते.

**१०३. महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या हद्दीत वाहतूक करणाऱ्या बस प्रवाशांचे वर्तणूक संदर्भात अतिरिक्त तरतूद :–**

(१) कुठलीही व्यक्ती बस चालू असताना बस स्थानकाशिवाय इतर वेळेस वाहनात चढू किंवा उतरु शकत नाही.

(२) कुठलीही व्यक्ती बसमध्ये प्रवास करताना बसमध्ये चढणेचे प्रवेशद्वार व उतरणेचे प्रवेशद्वारा शिवाय इतर ठिकाणाहून बसमध्ये चढू किंवा उतरू शकत नाही.

(३) बसमधील सर्व प्रवासी बसमधून उतरलेशिवाय बसमध्ये कुठलीही व्यक्ती चढू शकत नाही.

(४) कुठलाही प्रवासी किंवा प्रवास करू इच्छिणारी व्यक्ती किंवा अनधिकृत व्यक्ती चालकाचे जागेवर चढून चालकाशी बोलू किंवा चालकाचे कामात अडथळा येईल किंवा चालकाचे लक्ष आकर्षित होईल अशा पद्धतीने वर्तन करू शकत नाही.

(५) कुठल्याही प्रवाशाने बैठक व्यवस्थेवर (आसन) पाय ठेवू नये.

(६) ज्या ठिकाणापर्यंत प्रवास करावयाचा त्या ठिकाणापर्यंत तिकीट वैध ठरते.

(७) प्रवाशाने एकापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (आसन) स्वत:साठी व इतर प्रवाशांसाठी ताब्यात घेतले व इतर प्रवाशाने त्यासंबंधी वाहक किंवा चालकाकडे विनंती केली. वाहक किंवा चालकाने प्रवाशास तसे न करण्यासंबंधी बजावले परंतु प्रवाशाने पूर्तता न केल्यास अशा प्रवाशास वाहनातून उतरवून दिले जाते व सदर प्रवासी वाहनातून उतरेपर्यंत बस उभ्या स्थितीत ठेवले जाते. सदर प्रवाशाने प्रवास भाडे दिले असेल तर अशा प्रवाशास भाडे परत दिले जात नाही व आवश्यकता पडल्यास त्यास वाहनातून जबरदस्तीने उतरवून दिले जाते. वाहक किंवा चालकाच्या विनंतीवरून पोलीस अधिकारी अशा प्रवाशास वाहनातून उतरवून देऊ शकतो. सदर प्रवासी मोटार वाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुन्हेगार ठरतो.

(८) महाराष्ट्र मोटार वाहन नियम १०२ मधील तरतुदींना अनुसरून अतिरिक्त तरतूद म्हणून सदर नियमातील तरतूद नगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या हद्दीतील बस वाहनाच्या बाबतीत लागू आहेत.

(९) नियम १०२ ची व १०३ ची नक्कल बसमध्ये इंग्रजी भाषेत किंवा क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाने सूचित केलेल्या भाषेत बसच्या दर्शनी (Prominant) भागावर लावली पाहिजे.

(१०) महा. मोटार वाहन नियम १० पोट–नियम (५) मधील तरतुदी नगरपालिका हद्दीतून बस वाहतूकीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लागू नये.

**१०८. मालवाहतुक करणाऱ्या वाहनातून प्रवासी वाहतूक करणे : –**

१. या नियमाअंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार मालवाहतूक करणाऱ्या वाहनातून कुठल्याही व्यक्तीस वाहून नेऊ नये.

परंतु वाहनमालक किंवा वाहन भाड्याने ज्या व्यक्तीने घेतले असेल अशी व्यक्ती (Hirer), वाहन मालकाने नेमणूक केलेला नोकरदार किंवा मोटार वाहन विभागाचा अधिकारी कुठलेही भाडे न आकारता वाहून नेले पाहिजे, परंतु वाहनातील एकंदर व्यक्तींची संख्या

(१) इतक्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनाचे मालासहित वजन (Ladder weight) ९९० कि. ग्रॅ. असेल तर अशा वाहनात एकापेक्षा जास्त व्यक्ती असू नये.

(२) इतर हलक्या मालाची (Light Transport Vehicle) वाहतूक करणाऱ्या वाहनातून तीनपेक्षा जास्त व्यक्तीची वाहतूक केली जाऊ नये.

(३) हलके स्वरूपाचे माल वाहतूक करणाऱ्या वाहनाव्यतिरिक्त इतर वाहनातून सात व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्तींची वाहतूक केली जाऊ नये.

परंतु उपनियम (२) (३) मध्ये दिलेल्या तरतुदी आंतरराज्यीय (Inter state) माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच टँकरमधून प्रवाही (Liquid) पदार्थ वाहून नेणाऱ्या टँकर सारख्या वाहनांना लागू नाही.

२. पोटनियम १ मध्ये नमूद केले असले तरी पोटनियम (४) व (५) मधील तरतुदींना अनुसरून क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण लेखी आदेशाद्वारे परवानगी देऊन बहुसंख्य व्यक्तींना वाहनातून नेणेस परवानगी देते; परंतु प्रवाशाचे अतिरिक्त या वाहनातून मालवाहतूक करू नये व अशा प्रकारे वाहनातून वाहतूक करताना माणसाची वाहतूक कामाचे संदर्भात केली असेल तर त्याचेकडून भाडे आकारणी केली जाऊ नये किंवा क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाने घातलेल्या इतर अटीवर अशा प्रकारे वाहतूक केली जावी.

३. पोटनियम (१) व (२) मध्ये सांगितले असले तरी पोटनियम (४) व (५) मधील तरतुदींना अनुसरून

(a) सहकारी संस्थेने किंवा सहकारी संस्थांनी त्याचे सभासदाची वाहतूक करणेसाठी माल वाहतूक करणाऱ्या वाहनातून केली तर क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण सेक्रेटरी.

(a-i) स्वातंत्र्य दिवस, महाराष्ट्र दिन, लोकसत्ताक दिवस उत्सव साजरा करणेसाठी वापरले तर क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण

(b) सार्वजनिक हिताचे दृष्टीने माल वाहतूक करणारे वाहन भाड्याने घेतले किंवा विकत घेतले तर राज्य सरकार विशेष किंवा जनरल आदेशाने परवानगी देऊन माल वाहतूक करणाऱ्या वाहनातून लोकांची वाहतूक करण्यास परवानगी देणेत येते.

४. माल वाहतूक करणाऱ्या वाहनातून कुठल्याही व्यक्तीची वाहतूक करू नये.

(a) वाहनात प्रत्येक व्यक्तीसाठी ०.४० चौ. मी. जागा असलेशिवाय

(b) अशा पद्धतीने वाहतूक करणेत येऊ नये की,

(१) मालावर अशा व्यक्तीची वाहतूक करताना वाहनातून पडण्याची भीती असेल किंवा अपायकारक असेल

(२) वाहनात बसलेल्या व्यक्तीच्या डोक्यापासून वाहनाचे छत ३ मी. पेक्षा जास्त उंचीवर असलेशिवाय

५. मोटार वाहन कायदा कलम ६० नुसार नोंदणी केलेल्या वाहनास सदर नियमातील तरतुदी लागू नाहीत.

६. माल वाहतूक करणाऱ्या ट्रेलरमधून ट्रेलर चालवणाऱ्या खेरीज इतर व्यक्तीची वाहतूक करू नये.

**११०. वाहन थांबवणेचे स्थानके किंवा वाहन थांबवण्याच्या जागा :–**

मुंबई या शहरात पोलीस आयुक्ताच्या (Police Commissioner) स्वीकृतीनंतर व इतर ठिकाणी जिल्हा न्यायाधीश यांच्या स्वीकृतीनंतर क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण राजपत्रात अधिसूचनेद्वारे व कलम ११६ पोट–कलम (१) अंतर्गत परवानगी असलेले वाहतूक चिन्ह बांधून खाजगी वाहनात प्रवासी चढणेसाठी व उतरणेसाठी

(१) अटीवर किंवा विनाअट ठराविक वाहनासाठी ठराविक जागेचा वापर करणेस प्रतिबंध करते.

(२) अधिसूचनेत नमूद केलेल्या महानगरपालिका हद्दीत नगरपालिका हद्दीत किंवा कॅन्टोन्मेंट विभागात वाहन थांबा म्हणून स्थानके किंवा वाहन थांबवणेसाठी जागा निश्चित करते.

खाजगी मालकीच्या जागेत जागा मालकाच्या लेखी परवानगीशिवाय वाहन थांबा म्हणून जागा निश्चित करू नये.

वाहन थांबा म्हणून निश्चित केलेल्या जागेवर वाहतूक चिन्ह (Traffic signs)लावले. नंतर सदर जागा सार्वजनिक जागा (Public Place) म्हणून संबोधण्यात येते. क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण त्यानुसार एखाद्या व्यक्तीची करार करून सदर जागेत बांधकाम करणेसाठी, सदर जागेची व्यवस्था बघणेसाठी त्या व्यक्तीला लायसन्स देऊ शकते. कराराच्या अटीचा भंग झाल्यास करार रद्द केला जातो व जागेसंदर्भात सूचना दिल्या जातात.

(१) जागेचा वापर करणाऱ्या वाहन मालकाने आवश्यक शुल्क भरले पाहिजे.

(२) जागेचा वापर करणारे खाजगी वाहन व वापर न करणारे वाहन असे निर्दिष्ट केले पाहिजे.

(३) जागेची व्यवस्था पाहणेसाठी मॅनेजरची नेमणूक करून त्याला असलेला अधिकार व कर्तव्याची माहिती दिली पाहिजे.

(४) जागा मालकाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला शेल्टर, शौचालय बांधणेस सांगितले पाहिजे व स्वच्छ ठेवले पाहिजे.

(५) जागा मालकाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला प्रवाशांच्या पिण्याचे पाण्याची सोय करणेस सांगितले पाहिजे.

(६) विशिष्ट लोकांना सदर जागेचा वापर करणेस प्रतिबंध केला पाहिजे.

३. वाहन स्थानक किंवा वाहन थांबा असलेल्या जागा मालकाने जागेवर काम करणेस, खर्च करणेस नकार दिल्यास किंवा या नियमाअंतर्गत दिलेल्या सूचनाची पूर्तता न केल्यास अधिकृत व्यवस्थापन अशा व्यक्तीस जागेचा वापर करणेस प्रतिबंध केला पाहिजे.

**११५. ट्रेलरचा वापर करणे संदर्भात आवश्यक अटी :–**

या नियमातील पोट–नियम २ व ३ मधील तरतुदींना अनुसरून खाली नमूद केलेल्या मार्ग किंवा विभाग वगळता इतर मार्गावर किंवा विभागातून ट्रेलरमधून माल वाहतुकीस परवानगी दिली जाऊ शकते.

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेले घाट विभाग,

(२) राज्यातील नगरपरिषद व महानगरपालिका हद्दीतील विभाग.

२. माल वाहतूक करणाऱ्या ट्रेलरचा वेग सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत दर ताशी ३० कि. मी. पेक्षा जास्त असता कामा नये.

३. ट्रेलरची लांबी नेहमीपेक्षा जास्त असेल (Extra Length) तर ट्रेलरवर प्रतिबिंबित होणाऱ्या रंगात सावधान वाहन जास्त लांब आहे अशी सूचना बोर्ड लावले पाहिजे. (Caution Extra Vehicle)

**११६. माल वाहतूक करणाऱ्या वाहनाचे बोर्ड :–**

प्रत्येक माल वाहतूक करणाऱ्या वाहनावर प्रदर्शनी भागावर प्रादेशिक भाषेत किंवा इंग्रजी भाषेत माल वाहतूक करणारे वाहन असे नमूद करणारा मजकूर श्वेतपटलावर काळ्या अक्षरामध्ये नमूद केला पाहिजे. प्रत्येक अक्षराची उंची व जाडी १२७ मि.मी. व ६४ मि. मी. असली पाहिजे.

**११७. माल वाहतूक करणाऱ्या वाहनाचे व वाहनाच्या विभागाची तपासणी :–**

१. कुठलाही सब इन्स्पेक्टर या पात्रतेचा पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाचा अधिकारी त्याच्या कार्यक्षेत्रात (Jurisdiction) सार्वजनिक वाहन (Public Service Vehicle) किंवा माल वाहतूक करणाऱ्या वाहनाची सार्वजनिक ठिकाणी बोलावून घेऊन किंवा वाहनाच्या विभागाची तपासणी करू शकते. अशी तपासणी करून परवान्यात नमूद केलेल्या अटीची तसेच कायदेशीर तरतुदीची वाहन पूर्तता करत आहे त्याबाबत समाधान करून घेऊ शकते.

२. पोटनियम १ मध्ये सांगितले असले तरी पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाचा अधिकारी माल वाहतूक करणाऱ्या वाहनाची तपासणी करू शकत नाही जर,

(i) वाहनास परवाना दिला असेल व परवान्यात कुठला माल वाहतूक करू नये व कुठला माल वाहतूक करावी त्याबाबत नमूद केले असेल,

(ii) पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाच्या अधिकाऱ्यास वाहन मोटार वाहन कायदा व मोटार वाहन नियमाचा भंग करून माल वाहतूक करते असे वाटले तर,

३. पोटनियम १ प्रमाणे माल वाहतूक करणाऱ्या वाहनाची वाहन तपासणीसाठी वाहन थांबवले तर अधिकाऱ्याचे वाहन चालकाला किंवा वाहन ताब्यात (Detain) असलेल्या व्यक्ती, वाहन ताब्यात घेतल्याची तारीख व किती वेळ वाहन ताब्यात घेतले या संदर्भात प्रमाणपत्र द्यावे.

**१२०. टॅक्सी मीटर तपासणी संदर्भात मोटार वाहन इन्स्पेक्टरचे अधिकार :–**

मोटार वाहन विभागाचा असिस्टंट इन्स्पेक्टर पात्रतेचा अधिकारी किंवा पोलीस अधिकाऱ्याची खात्री झाली की, टॅक्सीमध्ये

बसविलेले मीटर हे सदोष पद्धतीचे आहे तर असा अधिकारी मोटार वाहन थांबवून नियम १४१ पोटनियम (१) नुसार मीटर बसवले किंवा नाही याची खात्री करणेसाठी मीटरची तपासणी करू शकतो व आवश्यकता पडल्यास योग्य ती पावले उचलतो.

**१२२. हरवलेली मालमत्ता :–**

(१) परवानाधारकास किंवा परवानाधारकाने नियुक्त केलेल्या नोकरदारास नियम ३४ उपनियम (१७) व नियम (२०) पोटनियम (२) नुसार सामान मिळाल्यास त्या व्यक्तीने सात दिवसांपर्यंत सामान स्वतःचे ताब्यात ठेवले पाहिजे व सात दिवसात कोणीही सामानाची मागणी न केलेस नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये आणून दिले पाहिजे.

तसेच मिळून आलेली वस्तू नाशवंत असेल तर अशी वस्तू सात दिवसाचे आत नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये दिली पाहिजे.

(२) पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये;

(a) मिळून आलेल्या वस्तूची मागणी केलेस परवानाधारक आवश्यक चौकशी करून आवश्यक वाटल्यास इंडेमिनीटी बाँड घेऊन वस्तू अर्जदारास परत करतो.

(b) मिळून आलेल्या वस्तूवर एकापेक्षा जास्त व्यक्तीने मालकी सांगितल्यास परवानाधारक सदर वस्तू नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये हजर करू शकते.

(३) या नियमांतर्गत किंवा नियम २२ पोटनियम २९ नुसार पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यास एखादी हरविलेली वस्तू पोहोच झाल्यास व सापडलेल्या वस्तूबद्दल कोणीही मालकी न सांगितल्यास पोलीस अधिकारी मुंबई पोलीस कायदा, १९५१ च्या कलम ८२ ते ८८ च्या तरतुदी लागू करतो.

**१६१. आरसा :–**

प्रत्येक मोटार वाहनाने परिवहन वाहन वगळता दुचाकी वाहन असेल व त्याला साईड काच जोडलेली नसेल तर अशा वाहनाला आतील बाजूने किंवा बाहेरील बाजूने आरसा जोडला पाहिजे व प्रत्येक परिवहन वाहनाला मोटार कॅब वगळता मोटार वाहन चालकाला मागील बाजूने येणारे वाहन स्पष्टपणे दृष्टीस येणेच्या दृष्टीने बाहेरील बाजूला आरसा बसविलेला असला पाहिजे. राज्य सरकार जनरल किंवा विशेष आदेशाने सरकारचे समाधान झाले की वाहनाची बांधणी अशा प्रकारची आहे की, त्यात आरसा बसविल्याने फारसा उपयोग होणार नाही तर अशा वाहनाला सदर नियम लागू होण्यापासून अपवाद ठरविले जाते.

**१६२. मोटार वाहनात दूरदर्शन संच किंवा व्हिडीओ संच ठेवल्यास प्रतिबंध :–**

मोटार वाहनाच्या पुढच्या बाजूला लावण्यात आलेल्या अटक फळीवर (Dash Board) किंवा फळीजवळ किंवा वाहन चालकाच्या जवळ दूरदर्शन संच किंवा व्हिडिओ संच लावण्यात येऊ नये.

**१६३. भयानक चित्रे किंवा नकाशा :–**

(१) भारतामध्ये नोंदणी करण्यात आलेल्या कुठल्याही मोटार वाहनात शुभप्रद वस्तू (Mascot) किंवा त्यासारखे एखादे यंत्र वाहनात लावू नये की ज्यामुळे एखाद्या व्यक्तीस इजा होण्याचा संभव असतो.

(२) कुठल्याही मोटार वाहनात चालकाच्या रिमच्या वर ४ इंचापेक्षा जास्त ॲक्सल हब कॅब लावणेत येऊ नये.

**१६८. पोलीस किंवा मिल्ट्री वाहनांनी वापरायचे रंग नोंदणी खूण वापरणेस प्रतिबंध :–**

(१) कुठल्याही मोटार वाहनांना मिल्ट्री किंवा पोलीस विभागांनी वापरावयाच्या वाहना व्यतिरिक्त मिल्ट्री किंवा पोलीस वाहनाचा रंग वापरू नये.

(२) मिल्ट्री वाहनाची नोंदणी खूण (Registration Mark) इतर कुठल्याही वाहनांना वापरण्यात येऊ नये.

**१७३. उभे राहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाहून नेणेसाठी परवानगी मिळणेसाठी अट :–**

(१) पोटनियम (२) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक वाहनातून (Public Service Vehicle) उभे राहून प्रवास करणाऱ्या प्रवासी वाहून नेणेस परवानगी नसते.

(२) पोटनियम (१) मध्ये सांगितले असले तरी,

(a) खाजगी वाहनातील दोन्ही बाजुच्या आसन व्यवस्थेच्या मधून जाणाऱ्या रस्त्याच्या (Gangway) छताला हँगर लावले असतील तर खालच्या जिन्यावर (Lower) उभ्याने प्रवास करणारे प्रवासी वाहून नेले जातात.

(b) महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या हद्दीतून सार्वजनिक वाहतूक सेवा देणारे वाहन ८ कि. मी. आत सेवा देत असेल व नियम १७२ मध्ये नमूद केल्यापेक्षा जास्त मोकळी जागा वाहनाच्या गँगवे मध्ये उपलब्ध असेल तर क्षेत्रीय परिवहन प्राधिकरण उभ्याने प्रवास करणारे प्रवासी वाहून नेऊ शकते.

(c) क्षेत्रीय परिवहन प्राधिकरणाने उभ्याने प्रवास करणारे प्रवासी वाहून नेण्यास परवानगी दिली असेल तर क्षेत्रीय परिवहन.

## वाहतूक नियंत्रण

**२२२. रस्त्यावर सोडून दिलेले वाहन :–**

(१) कुठलेही मोटार वाहन वाहने थांब्यांच्या नियोजित जागेव्यतिरिक्त (other than parking place) इतर जागेवर अशा रीतीने उभे केले असेल की ज्यायोगे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असेल किंवा एखाद्या व्यक्तीच्या जीवितास धोका निर्माण होत असेल तर पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाच्या सहाय्यक इन्स्पेक्टर या रँन्कचा कुठलाही अधिकारी.

(i) ते वाहन त्याच्या अधिकारात तेथून हलवून वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी ठेवते.

(ii) सदर वाहन हलवेपर्यंत वाहन उभे असल्याबद्दल खुणा दर्शविणे.

(iii) नियोजित जागे व्यतिरिक्त (Parking Place) वाहन इतर ठिकाणी उभे केल्यास कायदेशीर कारवाई करणे करिता वाहन ताब्यात घेणे.

(iv) एखादे वाहन एकाच जागेवर १० तासापेक्षा जास्त काळ उभे केले असेल व सदर वाहन दुरुस्तीसाठी आवश्यक पावले उचलली नसतील तर असे वाहन त्या ठिकाणाहून उचलून सुरक्षित ठिकाणी नेले जाते.

२. एखादे वाहन नियोजित जागेत (पार्किंगच्या ठिकाणी) पार्किंग जागेच्या अधिकृत प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा व अशी वेळ ठरवून दिलेली नसेल तर सहा तासापेक्षा जास्त काळ वाहन तेथेच थांबविलेले असेल तर पोलीस अधिकारी असे मोटार वाहन तेथून उचलून नजीकच्या सुरक्षित ठिकाणी नेतात.

३. मोटार वाहन कायदा कलम १२२ मधील तरतुदीचा भंग करणाऱ्या व्यक्तीस दंड किंवा शिक्षा होऊ शकते. किंवा पार्किंगच्या जागेची व्यवस्था पाहणाऱ्या प्राधिकरणाने केलेल्या नियमाचा भंग केल्यास वाहन मालक किंवा त्याचे प्रतिनिधी यांचेकडून पोलीस अधिकाऱ्याने वाहन हलविणेसाठी, लाईटिंग, लक्ष पुरविणेसाठी जो काही खर्च केला तो वसूल केला जातो व हा खर्च वसूल होईपर्यंत पोलीस अधिकारी मोटार वाहन ताब्यात ठेवू शकतो.

४. मोटार वाहन कायदा कलम २०१ अंतर्गत करण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम मोटार वाहन विभागाचा सहाय्यक इन्स्पेक्टर या दर्जाचा अधिकारी किंवा पोलीस सब इन्स्पेक्टर यांना वसूल करण्याचे अधिकार आहेत.

**२२६. मोटार वाहन वाहून किंवा ओढून नेणे :–**

(१) यांत्रिक बिघाड झालेले वाहन किंवा पूर्णपणे जुळणी न झालेले वाहन, नोंदणीकृत किंवा साईड कार दुसऱ्या मोटार वाहनाच्या साहाय्याने ओढून नेले जाते.

(२) कुठलेही मोटार वाहन ओढून नेताना वाहून नेण्यात येणाऱ्या चालक सीटवर चालक असला पाहिजे किंवा वाहनाचे स्टिअरींग व्हील एखाद्या क्रेनच्या साहाय्याने सुरक्षितपणे सपोर्ट केलेले असले पाहिजे.

(३) कुठलेही मोटार वाहन दुसऱ्या मोटार वाहनाच्या साहाय्याने वाहून नेले जात असेल तेव्हा पुढील वाहनाची मागील बाजू व मागील वाहनाची पुढील बाजू यामध्ये ५ मीटर इतके अंतर असले पाहिजे. तसेच मागील वाहून नेण्यात येणाऱ्या वाहनावर ७५ मि. मी. उंची इतके मोठ्या टाईपच्या अक्षरात पांढऱ्या पृष्ठभागावर ओढून नेण्यात येणारे वाहन (On Tow) असे लिहिलेले असले पाहिजे.

(४) ट्रेलर किंवा साईडकार वगळता इतर दुसरे मोटार वाहन वाहून नेणाऱ्या वाहनाचा वेग २० कि.मी. दर ताशी असला पाहिजे.

**२२८. फुटपाथ किंवा सायकल ट्रॅक्सवरून मोटार वाहन चालवण्यात येऊ नये :–**

फुटपाथ किंवा सायकल ट्रॅक्स वरून कुठल्याही व्यक्तीस मोटार वाहन चालवण्यास परवानगी देणेत येऊ नये.

**२२९. सामान लादणे :–**

(१) दुमजली वाहतूक सेवा देणाऱ्या वाहनाच्या टपावर कुठल्याही प्रकारे सामान लादण्यात येऊ नये.

(२) कुठल्याही व्यक्तीस त्याचे ताब्यातील मालाने भरलेले मोटार वाहन चालवताना सार्वजनिक ठिकाणी जनतेला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने वाहन चालवू नये.

(३) मोटार वाहन नोंदणी प्राधिकरण, किंवा सहाय्यक क्षेत्रीय परिवहन अधिकारी या दर्जाचा अधिकारी त्यांच्याकडे परिशिष्ट १ प्रमाणे नमुना टी. ओ. डी. ए. (Form T.O.D.A.) या स्वरुपात ऑर्डर देऊन काही ठराविक काळाकरिता काही अटीवर या नियमातील तरतुदी लागू होणेपासून अपवाद ठरवतो.

(४) वाहनाची नोंदणी झालेली नोंदणी प्राधिकरण महाराष्ट्र राज्याबाहेरचे असेल तर वाहनाचा नोंदणीकृत मालक ज्या राज्यातून प्रवास सुरू केला किंवा ज्या राज्यात प्रवेश करावयाचा आहे. अशा राज्याच्या नोंदणी प्राधिकरणाकडे अर्ज करून पोट–नियम ३ प्रमाणे मोकळीक/माफी (Exemption) मागू शकते.

(५) नोंदणी प्राधिकरण अशी माफी देणेपूर्वी पब्लिक वर्कस् डिपार्टमेंट किंवा राज्य वाहतूक पोलीस यांचेशी विचार विनिमय करून त्यांची अशी खात्री झाली की सदर माफीमुळे एखाद्या पुलाचे नुकसान किंवा वाहतुकीस अडथळा होणार नाही तर अशा प्रकारची माफी दिली जाते.

(६) पोट–नियम (३) व (४) प्रमाणे देण्यात येणारी माफी परिशिष्ट क्र. १ मध्ये नमूद केलेल्या नमुना टी. ओ. डी. ए. नमुन्यात मंजूर केली जाते.

**२३०. धोकादायक वस्तूची वाहतूक करण्यावर प्रतिबंध :–**

(१) मोटार वाहनाकरिता आवश्यक असणारे इंधन किंवा ऑईल वगळता कुठलेही स्फोटके, ज्वालाग्राही पदार्थ किंवा इतर अपायकारक वस्तूची वाहतूक सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या वाहनातून करण्यात येऊ नये. आणि इतर मोटार वाहनातून वाहतूक करताना पॅकिंग अशा पद्धतीने केले असले पाहिजे की अपघात झाला तरी त्याच्यामुळे कोणत्याही व्यक्तीस इजा पोहोचणार नाही.

(२) मोटार वाहन विभागाच्या असिस्टंट इन्स्पेक्टर किंवा पोलीस इन्स्पेक्टर या पात्रतेच्या पोलीस अधिकाऱ्याचे असे लक्षात आले की सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या वाहनातून सदर नियमाचा भंग करून अपायकारक वस्तूची वाहतूक केली जात असेल तर अधिकारी मोटार वाहन चालकाला किंवा मोटार वाहन ताब्यात असणाऱ्या व्यक्तीला सदर वस्तू काढण्यास सांगून किंवा परत पॅकिंग करण्यास सांगितले जाते व तोपर्यंत मोटार वाहन पुढील प्रवास करू दिला जात नाही.

**२३१. सतत मोठा भोंगा वाजवणे किंवा इतर साधनांच्या सहाय्याने इशारा करण्यास प्रतिबंध :–**

(१) कुठल्याही मोटार वाहन चालकाने इशारे देणेकरिता भोंगा (Horn) किंवा इशारे देण्यासाठी वापरण्यात येणारे साधन आवश्यक नसताना सतत वाजवू नये.

(२) मुंबई पोलीस कमिशनर मुंबईमध्ये व इतर ठिकाणी कलेक्टर राजपत्रात अधिसूचना देऊन अधिसूचनेत नमूद केलेल्या विभागात व नमूद केलेल्या कालावधीत हॉर्न वाजवण्यास प्रतिबंध करतो.

**२३२. कट–आऊटस वापरण्यास प्रतिबंध :–**

कुठलाही वाहन चालक सार्वजनिक ठिकाणी वाहन चालवताना वाहनावर कट–आऊटस् लावू शकत नाही.

**२३३. मोटार वाहन मागे घेण्यास प्रतिबंध :–**

मोटार वाहन मागे घेताना वाहन चालकाने वाहने मागे चालविण्यामुळे मागे धोका होणार नाही किंवा गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**२३४. मोटार वाहन थांबले असताना किंवा विश्रांती घेत असताना वापरावयाचे दिवे :–**

(१) महानगरपालिका, नगरपालिका किंवा कॅन्टोन्मेंटच्या हद्दीत रस्त्याच्या डाव्या साईडला किंवा वाहन थांबणेसाठी आरक्षित असलेल्या जागेत वाहन विश्रांतीसाठी थांबले असले तरी नेहमी दिवे लावणे आवश्यक असले तरी अशा ठिकाणी दिवे लावणे आवश्यक नाही.

(२) नगरपालिका, महानगरपालिका किंवा कॅन्टोन्मेंट हद्दीबाहेर वाहन उभे केले असेल व अशा वाहनास दिवे लावणे आवश्यक असले तरी वाहन विश्रांतीसाठी ज्या ठिकाणी थांबले त्यामुळे रस्ता वापरणाऱ्यांना किंवा वाहतुकीस अडथळा होत नसेल तर अशा वाहनाला दिवे लावण्याची आवश्यकता नाही.

**२३५. झगझगाट किंवा चकाकीयुक्त दिव्यावर प्रतिबंध :–**

मोटार वाहन चालू असताना मोटार वाहन चालकाने दिवे लावताना त्या दिव्याच्या चकाकीमुळे इतर व्यक्तीस धोका किंवा गैरसोय होणार नाही अशा प्रकारे लावले पाहिजेत.

**२३६. नोंदणी खूण व दिवे मोटार वाहनास दर्शनी भागावर असले पाहिजेत :–**

(१) मोटार वाहनाचा नोंदणी क्रमांक दिसणार नाही किंवा मोटार वाहनाच्या दिव्याच्या व्हिजनला अडथळा होईल अशा प्रकारे वाहनात माल किंवा इतर गोष्टी ठेवल्या जाऊ नयेत.

(२) मोटार वाहन कायद्यांतर्गत मोटार वाहनात लावण्यात येणाऱ्या खुणा स्पष्ट स्वरूपात व दिसतील अशा पद्धतीने लावल्या पाहिजेत.

**२३७. वाहन थांबण्याची खूण केलेनंतर :–**

पोलीस अधिकाऱ्याने किंवा वाहतूक नियंत्रक दिव्याने वाहन थांबण्याची सूचना दिल्यानंतर मोटार वाहन चालकाने ठरवून दिलेल्या रेषेच्या पुढे येईल अशा पद्धतीने वाहन थांबवू नये.

**२३८. रहदारीचे नियम पाळणे :–**

प्रत्येक मोटार वाहन चालकाने वाहन चालवताना रहदारीचे नियम पाळणे आवश्यक आहे.

**२३९. रहदारी नियंत्रित करणारे सिग्नल अमलात आणण्याचे कर्तव्य :–**

सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या रहदारी नियंत्रित करण्यासाठी दिलेल्या सिग्नल सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

**२४०. गार्ड नसलेल्या रेल्वे क्रॉसींग जवळील वाहतूक सिग्नल :–**

पहारा नसलेल्या रेल्वे क्रॉसिंगजवळ असलेले वाहतूक सिग्नलचे नियमन करणे प्रत्येक वाहन चालकावर बंधनकारक आहे.

**बंधनकारक खुणा**

(Mandatory Signs)

६० सें. मी.

बॉर्डर -- लाल

पृष्ठभाग -- पांढरे

(Background)

अक्षर -- लाल

(Letter)

**२४१. रस्त्यावर जाहिराती किंवा इतर खुणा लावण्यास प्रतिबंध :–**

वाहतूक चिन्हाशी साम्य दर्शविणारी खुण किंवा जाहिरातीमुळे वाहतूक चिन्हास अडथळा होऊ नये म्हणून अशा जाहिराती किंवा चिन्हे लावण्यास प्रतिबंध. (No Parking) बोर्ड दिसत नाही.

**२४२. ट्रेलरचे बाबतीत विशेष नियम :–**

ट्रेलर हाप वगळता इतर ट्रेलर सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या मोटार वाहनास लावण्यात येऊ नये.

**२४३. मोटारसायकल किंवा अवैध वाहनास ट्रेलर लावण्यास बंदी : –**

(१) साईडकार असलेल्या दुचाकी मोटारसायकलला ट्रेलर लावण्यात येऊ नये.

(२) खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता केलेशिवाय साईडकार नसलेल्या दुचाकी मोटारसायकलला ट्रेलर लावण्यात येऊ नये.

(i) ट्रेलरचे कनेक्शन मोटारसायकलच्या मागील टायरला जोडलेले असावे.

(ii) ट्रेलर–मोटारसायकल कनेक्शनने मोटारसायकल पूर्णपणे १८० मध्ये वळवता आली पाहिजे.

**२४४. ठरावीक वाहनास ट्रेलर जोडण्यास प्रतिबंध :–**

कुठलेही मोटार वाहन की ज्यांची लांबी ८.४ मी. पेक्षा जास्त असेल परंतु मोटार ओढून नेणारे वाहन वगळता इतर वाहनास ट्रेलर जोडण्यास बंदी.

**२४५. ट्रॅक्टरला जास्त ट्रेलर जोडण्यास प्रतिबंध :–**

(१) कुठल्याही ट्रॅक्टरला तीनपेक्षा जास्त ट्रेलर जोडण्यात येऊ नयेत.

(२) कुठल्याही मालवाहतूक करणाऱ्या वाहनास एकपेक्षा जास्त ट्रेलर जोडण्यात येऊ नयेत.

**२५०. मोटार वाहन चालवताना संरक्षित शिरस्त्राण घालणे : –**

मोटारवाहन कायदा कलम १२९ मधील तरतुदी लागू होणेपासून खालील व्यक्ती अपवाद. अट सर्वांना लागू.

(१) नगरपालिका हद्दीत मोटारसायकल चालवणारे वाहन चालक.

(२) राज्यमहामार्गावर किंवा राष्ट्रीय महामार्गावर मोटारसायकल चालवणारे चालक.

(३) ५० क्युबिक सें.मी.पेक्षा कमी इंजिन क्षमता असलेले दुचाकी मोपेड राज्य महामार्गावर किंवा राष्ट्रीय महामार्गावर चालवणारे चालक.

-------------------

# ३६. महाराष्ट्राचा छळवणूक (रॅगिंग) प्रतिबंधक कायदा, १९९९

ज्या अर्थी महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची छळवणूक (रॅगिंग) प्रतिबंधित करण्यासाठी विशेष कायदा करणे अत्यावश्यक आहे, त्यावरून भारताच्या गणराज्याच्या ५५ व्या वर्षी हा कायदा खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**कलम १, कायद्याचे नाव, प्रारंभ :–**

(१) या कायद्यास महाराष्ट्राचा छळवणूक (रॅगिंग) प्रतिबंधक कायदा, १९९९ असे संबोधावे.

(२) राज्य सरकार आपल्या राजपत्रात अधिसूचनेद्वारे जाहीर करील त्या तारखेपासून हा कायदा अमलात येईल.

**कलम २, व्याख्या :–**

या कायद्यातील संदर्भानुसार वेगळा अर्थ होत नसेल तर,

(a) **''शैक्षणिक संस्था''** जेथे शिक्षण देण्याचे कार्य स्वतंत्रपणे अथवा इतर कार्याबरोबर केले जाते, असे महाविद्यालय अथवा कोणत्याही नावाने ओळखली जाणारी इतर संस्था असा अर्थ होतो आणि यात अनाथाश्रम किंवा वसतिगृह किंवा होस्टेल किंवा एखादे अध्यापन संस्थेचा किंवा त्यास लागून असलेली कोणतीही इमारत यांचा समावेश होतो.

(b) **''शैक्षणिक संस्थेचा प्रमुख''** या शब्दाचा अर्थ विद्यापीठाचा उपकुलपती, वैद्यकीय शाखेचा प्रमुख, संस्थेचा संचालक किंवा प्राचार्य, मुख्याध्यापक किंवा शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनास जबाबदार व्यक्ती, असा होतो.

(c) **छळवणूक (रॅगिंग)**– या शब्दाचा अर्थ असभ्य वर्तणुकीचे प्रदर्शन, असे कृत्य करणे की, ज्यामुळे शारीरिक अथवा मानसिक दुखापतीला कारण होते अथवा कारणीभूत होण्याचा संभव असतो, अथवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्याच्या मनात भीती अथवा लज्जा अथवा गोंधळ निर्माण करणारे कृत्य करणे असा होतो आणि यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

(१) अशा विद्यार्थ्याला चेष्टा, मस्करी, चिडविणे, अपशब्द वापरणे अथवा व्यवहारिक विनोद करणे, अथवा दुखापत करणे अथवा,

(२) एखाद्या विद्यार्थ्याला असे एखादे कृत्य करण्यास सांगणे अथवा पार पाडण्यास सांगणे की जे कृत्य तो विद्यार्थी सामान्यपणे व्यवहारात स्वेच्छेने करणार नाही.

**कलम ३, छळवणुकीस (रॅगिंग करण्यास) प्रतिबंध/मनाई :–**

कोणत्याही शैक्षणिक संस्थेत अथवा बाहेर छळवणूक करणेस मनाई आहे.

**कलम ४, छळवणूक केल्याबद्दल शिक्षा :–**

जो कोणी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत अथवा बाहेर छळवणूक करील, त्यात भाग घेईल, त्यास साहाय्य करील, अथवा त्याचा प्रसार करील त्यास दोषसिद्धीनंतर दोन वर्षापर्यंत वाढविता येईल, इतकी कैदेची शिक्षा आणि रुपये दहा हजार पर्यंत दंडास पात्र राहील.

**कलम ५, विद्यार्थ्याची बडतर्फी/काढून टाकणे :–**

कलम ४ प्रमाणे शिक्षा झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास शैक्षणिक संस्थेतून बडतर्फ केले जावे आणि अशा विद्यार्थ्यास अशा बडतर्फ केलेल्या दिनांकापासून दुसऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत पाच वर्षांपर्यंत प्रवेश देऊ नये.

**कलम ६, विद्यार्थ्याचे निलंबन :–**

(१) जेव्हा एखादा विद्यार्थी किंवा प्रकरणपरत्वे पालक अथवा कायदेशीर पालन करणारा किंवा एखाद्या शिक्षण संस्थेचा शिक्षक, शिक्षणसंस्थेच्या प्रमुखाकडे छळवणुकीबाबत लेखी तक्रार करतो तेव्हा अशा प्रमुखाने यापूर्वीच्या तरतुदींना बाध न येता अशा तक्रारीची चौकशी तक्रार मिळाल्या तारखेपासून सात दिवसांत करावी आणि जर प्रथमदर्शनी तक्रार खरी असल्याचे आढळल्यास ज्या विद्यार्थ्यावर अपराध केल्याचा आरोप आहे, त्यास निलंबित करावे आणि तक्रार ती शैक्षणिक संस्था ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत असेल त्यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी त्वरित पाठवावी.

(२) शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांनी केलेल्या चौकशीत सकृतदर्शनी पोटकलम (i) नुसार मिळालेल्या तक्रारीत तथ्य नसल्याचे शाबित झाल्यास त्याने तक्रारदारास ती गोष्ट लेखी कळवावी.

(३) पोटकलम (i) नुसार विद्यार्थी छळवणुकीत गुंतला आहे, असा शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाचा निर्णय राहील.

**कलम ७, छळवणुकीची (रॅगिंगची) तक्रार केल्यानंतर शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने साहाय्य केल्याचे गृहीत धरणे :–**

कलम ६ प्रमाणे कारवाई न केल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास त्याने रॅगिंगला साहाय्य केल्याचे गृहीत धरण्यात येईल आणि त्यास दोषसिद्धीनंतर कलम ४ प्रमाणे शिक्षा होईल.

**कलम ८ :–** या कायद्यातील तरतुदीचे अंमलबजावणीसाठी शासकीय अधिपत्रातील अधिसूचनेद्वारे निर्णय तयार करून प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य सरकारला देण्यात आले आहे.

**कलम ८ (२) :–** या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेला प्रत्येक नियम तयार झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात एकूण ३० दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्या लगतचे अधिवेशन समाप्त होणेपूर्वी त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील, तर असा निर्णय राजपत्रात अशा निर्णयाबद्दलची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अमलात येईल किंवा यथास्थिती मुळीच अमलात येणार नाही. तथापि असा फेरबदल किंवा विलोचन यामुळे त्या नियमांन्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

# ३७. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९

**(सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०)**

संघटित गुन्हेगारी संघटना किंवा टोळी यांच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांना तोंड देण्यासाठी आणि तत्संबंधातील किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता अधिनियम,

ज्याअर्थी, संघटित गुन्हेगारी संघटना किंवा टोळी यांच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांना तोंड देण्यासाठी आणि तत्संबंधातील किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विशेष तरतुदी करणे इष्ट होते;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

**१. संक्षिप्त नाव विस्तार व प्रारंभ :–**

(१) या अधिनियमास 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९' असे म्हणता येईल.

(२) संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा विस्तार असेल.

(३) तो दिनांक २४ फेब्रुवारी १९९९ रोजी अमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

**२. व्याख्या :–**

या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, –

(a) ''चिथावणी देणे'' यामध्ये, त्याचे व्याकरणिक फेरफार आणि सजातीय शब्दप्रयोग यासह पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल,–

(i) जी व्यक्ती संघटित गुन्हेगारी संघटनेला कोणत्याही प्रकारे मदत करीत असल्याची प्रत्यक्ष माहिती असेल किंवा तसे मानण्यासाठी कारण असेल अशा कोणत्याही व्यक्तीशी संपर्क किंवा संबंध ठेवणे;

(ii) संघटित गुन्हेगारी संघटनेस साह्यकारी होऊ शकेल अशी कोणतीही माहिती कोणत्याही कायदेशीर प्राधिकरणाशिवाय पुरवणे किंवा प्रसिद्ध करणे आणि संघटित गुन्हेगारी संघटनेकडून मिळालेली कोणतीही कागदपत्रे किंवा मजकूर पुढे पाठवणे किंवा प्रसिद्ध करणे किंवा त्याचे वितरण करणे; आणि

(iii) संघटित गुन्हेगारी संघटनेला आर्थिक किंवा अन्य प्रकारची मदत करणे;

(b) ''संहिता'' याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ असा आहे;

(c) ''सक्षम प्राधिकारी'' याचा अर्थ, कलम १३ अन्वये नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे;

(d) ''बेकायदेशीर कृत्य चालू ठेवणे'' याचा अर्थ, ज्याच्या बाबतीत मागील दहा वर्षांच्या कालावधीत, एकापेक्षा अधिक आरोपपत्रे सक्षम न्यायालयाकडे दाखल करण्यात आलेली असतील आणि अशा अपराधाची त्या न्यायालयाने दखल घेतलेली असेल असे संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हाती घेतलेले, दखलपात्र अपराध असून तीन किंवा त्याहून अधिक वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले व त्या काळी अमलात असलेल्या कायद्याने प्रतिबंधित केलेले कृत्य असा आहे;

(e) ''संघटित गुन्हेगारी'' याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने कायदेशीर मार्गांनी आर्थिक फायदा मिळविण्याच्या किंवा स्वत:साठी किंवा कोणत्याही अन्य व्यक्तींसाठी गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या किंवा उठाव करण्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एक तर संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने देऊन किंवा धाकदपटशा दाखवून किंवा जुलूम–जबरदस्ती करून किंवा अन्य अवैध मार्गांनी चालू ठेवलेले कोणतेही बेकायदेशीर कृत्य, असा आहे.

(f) 'संघटित गुन्हेगारी संघटना' याचा अर्थ, संघटना किंवा टोळी म्हणून एकट्याने किंवा संयुक्तपणे संघटित गुन्हेगारी कृत्ये करणारा दोन किंवा अधिक व्यक्तींचा गट, असा आहे;

(g) 'विशेष न्यायालय' याचा अर्थ, कलम ५ अन्वये रचना केलेले विशेष न्यायालय असा आहे.

**३. संघटित गुन्ह्यासाठी शिक्षा :–**

(१) जी कोणी व्यक्ती संघटित गुन्हेगारीचा अपराध करील ती, –

(i) जर अशा अपराधाच्या परिणामी कोणतीही व्यक्ती मरण पावली असेल तर, मृत्युदंडाची किंवा आजीवन कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी एक लाख रुपयाच्या अधीनतेने द्रव्य दंड केला जाण्यासही पात्र ठरेल;

(ii) इतर कोणत्याही बाबतीत कमीत कमी पाच वर्षे परंतु, ज्यात आजीवन कारावासाच्या शिक्षेएवढी वाढ केली जाऊ शकते, इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी पाच लाख रुपये इतक्या रकमेच्या अधीनतेने द्रव्यदंड केला जाण्यासही पात्र ठरेल;

(२) जी कोणी व्यक्ती एखादा संघटित गुन्हा करील किंवा संघटित गुन्ह्याची पूर्वतयारी म्हणून कोणतेही कृत्य करण्याचा कट करील किंवा प्रयत्न करील किंवा त्याचे समर्थन करील, त्यास चिथावणी देईल किंवा करणे जाणूनबुजून सुकर करील, ती किमान पाच वर्षांची परंतु ज्यात आजीवन कारावासाच्या शिक्षेएवढी वाढ केली जाऊ शकते अशी शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(३) जी कोणी व्यक्ती, संघटित गुन्हेगारी संघटनेच्या कोणत्याही सदस्यास, आश्रय देईल किंवा लपवून ठेवील किंवा आश्रय देण्याचा किंवा लपवून ठेवण्याचा प्रयत्न करील, ती कमीत कमी पाच वर्षे परंतु, ज्यात आजीवन कारावासाच्या शिक्षेएवढी वाढ केली जाऊ शकते अशी शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडाच्या अधीन राहून दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(४) संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य असणारी कोणतीही व्यक्ती कमीत कमी पाच वर्षांपेक्षा परंतु ज्यात आजीवन कारावासाच्या शिक्षेएवढी वाढ केली जाऊ शकते एवढी शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी पाच लाख रुपये इतक्या रकमेचा दंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

(५) जी कोणी व्यक्ती संघटित गुन्हा करून प्राप्त झालेली किंवा मिळवलेली किंवा संघटित गुन्हेगारी संघटनेच्या निधीमधून संपादन करण्यात आलेली आहे अशी कोणतीही मालमत्ता धारण करीत असेल ती कमीत कमी तीन वर्षे, परंतु ज्यात आजीवन कारावासाच्या शिक्षेएवढी वाढ केली जाऊ शकते अशी शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी दोन लाख रुपये इतक्या रकमेच्या अधीनतेने द्रव्यदंड केला जाण्यासही पात्र ठरेल.

**४. संघटित गुन्हेगारी संघटनेच्या सदस्याच्या वतीने बेहिशेबी संपत्ती जवळ बाळगल्याबद्दल शिक्षा :–**

जर कोणतीही व्यक्ती, संघटित गुन्हेगारी संघटनेच्या सदस्याच्या वतीने ती जिच्या बाबतीत समाधानकारकपणे हिशेब देऊ शकत नसेल अशी जंगम किंवा स्थावर संपत्ती जवळ बाळगीत असेल किंवा कोणत्याही वेळी तिने अशी संपत्ती जवळ बाळगलेली असेल तर ती, कमीत कमी तीन वर्षे, परंतु ज्यात दहा वर्षापर्यंत वाढ करता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल आणि कमीत कमी एक लाख रुपये इतक्या रकमेच्या अधीनतेने द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र ठरेल; आणि अशी संपत्ती कलम २० द्वारे तरतूद केल्यानुसार जप्त व समपहृत केली जाण्यासही पात्र असेल.

**५. विशेष न्यायालये :–**

(१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता किंवा अशा प्रकरणाकरिता किंवा प्रकरणांच्या वर्गाकरिता किंवा गटाकरिता एक किंवा अधिक विशेष न्यायालयाची स्थापना करू शकेल.

(२) कोणत्याही विशेष न्यायालयाच्या अधिकारितेसंबंधात कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, तो राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(३) मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने राज्य शासनाने नियुक्त करावयाचा न्यायाधीश विशेष न्यायालयाचा पीठासीन असेल. राज्य शासनाला विशेष न्यायालयाच्या अधिकारितेचा वापर करण्याकरिता, मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या सहमतीने अतिरिक्त न्यायाधीशांच्या नेमणुकादेखील करता येतील.

(४) एखादी व्यक्ती, विशेष न्यायालयाचा न्यायाधीश किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून तिची नेमणूक करण्याच्या लगतपूर्वी, सत्र न्यायाधीश किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश असल्याखेरीज तशी नेमणूक केली जाण्यास पात्र असणार नाही.

(५) जेव्हा विशेष न्यायालयात एक किंवा अनेक अतिरिक्त न्यायाधीशांच्या नेमणुका केलेल्या असतील तेव्हा, विशेष न्यायालयाचा न्यायाधीश, विशेष न्यायालयाच्या कामकाजाची स्वत:सहित एका किंवा अनेक अतिरिक्त न्यायाधीशांमध्ये कामकाज वाटून घेण्याची, तसेच वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे त्यांच्या गैरहजेरीत किंवा कोणत्याही अतिरिक्त न्यायाधीशांच्या गैरहजेरीत तातडीची कामे निकालात काढण्याची तरतूद करू शकेल.

**६. विशेष न्यायालयाची अधिकारिता :–**

संहितेमध्ये अंतर्भूत काहीही असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या प्रत्येक अपराधाची न्यायचौकशी, ज्याच्या स्थानिक अधिकारितेत अपराध घडला असेल ते विशेष न्यायालय किंवा यथास्थिती कलम ५, पोट–कलम (१) अन्वये अशा अपराधाची न्यायचौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले विशेष न्यायालय, केवळ त्यांच्याकडूनच करता येईल.

**७. इतर अपराधांच्या विषयात विशेष न्यायालयांचा अधिकार :–**

(१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करताना, विशेष न्यायालयाला आरोपीवर त्याच न्यायचौकशीच्या वेळी संहितेन्वये दोषारोप ठेवता येईल अशी कोणत्याही अन्य अपराधाची देखील, जर तो अपराध अशा अन्य अपराधाशी संबंधित असेल तर, न्यायचौकशी करता येईल.

(२) या अधिनियमान्वये कोणत्याही अपराधाची कोणतीही न्यायचौकशी चालू असताना, आरोपी व्यक्तींनी या अधिनियमाखालील किंवा एखाद्या अन्य कायद्याखालील कोणताही अन्य अपराध केला असल्याचे आढळून आल्यास विशेष न्यायालय, अशा व्यक्तीला अशा अन्य अपराधासाठी सिद्धापराधी ठरवू शकेल आणि त्याची शिक्षा देण्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा यथास्थिती, अशा अन्य कायद्याद्वारे त्या अपराधासाठी प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

**८. सरकारी अभियोक्ता :–**

(१) प्रत्येक विशेष न्यायालयासाठी राज्य शासन सरकारी अभियोक्ता म्हणून एखाद्या व्यक्तीला नियुक्त करील आणि तास एक किंवा अधिक व्यक्तींची अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करता येईल.

परंतु असे की, राज्य शासनाला, एखाद्या प्रकरणासाठी किंवा प्रकरणांच्या गटासाठी विशेष सरकारी अभियोक्त्याची देखील नियुक्ती करता येईल.

(२) एखादी व्यक्ती दहा वर्षांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीसाठी अभियोक्ता म्हणून व्यवसाय करीत असल्याखेरीज सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त असणार नाही.

(३) या कलमान्वये, सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नेमणूक झालेली प्रत्येक व्यक्ती, संहितेचे कलम २, खंड (u) मधील अर्थांतर्गत सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार संहितेच्या तरतुदी परिणामकारक होतील.

**९. विशेष न्यायालयाची कार्यपद्धती आणि अधिकार :–**

(१) विशेष न्यायालयाला एखादा अपराध घडल्याची तथ्ये दर्शविणारी तक्रार त्याच्याकडे आल्यावर किंवा अशा तथ्यासंबंधीचा पोलीस अहवाल आल्यावर, आरोपीस न्यायचौकशीसाठी त्याच्याकडे सोपविण्यात आलेले नसतानाही अपराधाची दखल घेता येईल.

(२) ज्या वेळी विशेष न्यायालयाकडून न्यायचौकशी केली जाण्यायोग्य असलेला अपराध कमाल तीन वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा केली जाण्यास किंवा द्रव्यदंड केला जाण्यास किंवा दोन्हींसाठी पात्र असेल त्यावेळी, संहितेच्या कलम २६० च्या पोट–कलम (१) मध्ये किंवा कलम २६२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, विशेष न्यायालयास संहितेत विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्या अपराधाची संक्षिप्त न्यायचौकशी करता येईल आणि संहितेच्या कलमे २६३ ते २६५ च्या तरतुदी शक्य तेथवर, अशा न्यायचौकशीला लागू होतील;

परंतु, या पोटकलमान्वये संक्षिप्त न्यायचौकशी करतेवेळी खटल्याचे स्वरूप हे संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करण्यासाठी योग्य नाही तर विशेष न्यायालयास असे आढळून आले की, विशेष न्यायालय ज्याची यापूर्वी तपासणी करण्यात आलेली आहे अशा कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावून घेईल आणि अशा अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी संहितेच्या तरतुदीमध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्या खटल्याची फेरसुनावणी करण्याची कार्यवाही सुरू करील आणि उक्त तरतुदी दंडाधिकाऱ्याला आणि दंडाधिकाऱ्याच्या संबंधात जशा लागू होतात तशा त्या विशेष न्यायालयाला आणि विशेष न्यायालयाच्या संबंधात लागू होतील.

आणखी असे की, या कलमान्वये करण्यात आलेल्या संक्षिप्त न्यायचौकशीमधील कोणत्याही दोषसिद्धीच्या बाबतीत, विशेष न्यायालयाने दोन वर्षांहून अधिक नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर असेल.

(३) विशेष न्यायालयास, अपराधाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असल्याचे किंवा अपराधात सामील असल्याचे अनुमान असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून पुरावा मिळविण्याकरिता अशा व्यक्तीस, अपराधाशी संबंधित आणि तो अपराध घडवून आणण्याशी संबंधित इतर सर्व प्रमुख व्यक्ती किंवा त्याला चिथावणी देणाऱ्या व्यक्तींबाबत त्याला ठाऊक असलेली संपूर्ण आणि सत्य परिस्थिती उघड करण्याच्या अटीवर, माफी देता येईल आणि अशा प्रकारे दिलेली कोणतीही माफी संहितेच्या कलम ३०८ च्या प्रयोजनासाठी त्यातील कलम ३०७ अन्वये दिलेली माफी असल्याचे समजण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, विशेष न्यायालयास, कोणत्याही गुन्ह्याची न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी, सत्र न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि विशेष न्यायालय, ते जणू सत्र न्यायालय आहे अशा तऱ्हेने, शक्य

होईल तेथवर सत्र न्यायालयापुढील न्यायचौकशीकरिता संहितेमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, अशा गुह्याची न्यायचौकशी करील.

**१०. विशेष न्यायालयाने केलेल्या न्यायचौकशीला प्राथम्य मिळणे :–**

विशेष न्यायालयाकडून या अधिनियमान्वये करण्यात येणाऱ्या कोणत्याही गुह्याच्या न्यायचौकशीला, त्या आरोपीच्या (विशेष न्यायालय नसलेल्या) इतर कुठल्याही न्यायालयातील न्यायचौकशीच्यावर प्राथम्य मिळेल आणि अशा इतर खटल्याच्या न्यायचौकशीपेक्षा ती न्यायचौकशी आधी संपविण्यात येईल आणि त्यानुसार अशा इतर खटल्याची न्यायचौकशी त्या वेळेपुरती स्थगित ठेवण्यात येईल.

**११. नियमित न्यायालयांकडे खटले हस्तांतरित करण्याचा अधिकार :–**

एखाद्या अपराधाची दखल घेतल्यानंतर, विशेष न्यायालयास तो गुन्हा त्याने न्यायचौकशी करण्यायोग्य नाही असे वाटले तर, विशेष न्यायालय, अशा अपराधाची न्यायचौकशी करणे त्याच्या अधिकारितेत नसले तरीही, अशा गुन्ह्यांची न्यायचौकशी करण्याचा खटला संहितेन्वये अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे हस्तांतरित करील आणि न्यायालयाकडे तो खटला सोपवण्यात आला असेल, ते न्यायालय, जणू काही त्यानेच त्या गुन्ह्याची दखल घेतली आहे अशा तऱ्हेने त्या गुन्ह्याची न्यायचौकशी करू शकेल.

**१२. अपील :–**

(१) संहितेत काहीही अंतर्भूत असले तरीही, अंतर्वादिक (Interlocutory) आदेश नसेल असा विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आदेश यांवर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) या कलमाखाली कोणतेही अपील न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आदेश यांच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल.

**१३. सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती :–**

राज्य शासनास, सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणाऱ्या गृह विभागातील आपल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कलम १४ च्या प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

**१४. तारेने पाठविलेला इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार :–**

(१) या अधिनियमाखाली संघटित गुन्ह्याच्या अन्वेषणाच्या कामावर देखरेख ठेवणारा पोलीस अधीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला पोलीस अधिकारी तारेने पाठविलेला दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश अन्वेषण अधिकाऱ्याने मध्येच पकडण्याच्या बाबतीत, जर असा संदेश मध्येच पकडण्यात आल्यामुळे संघटित गुन्हेगारीचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही गुन्ह्याचा पुरावा मिळत असेल किंवा मिळाला असेल तर, प्राधिकार किंवा मान्यता देणारा आदेश मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज सादर करू शकेल.

(२) प्रत्येक अर्जामध्ये खालील माहितीचा समावेश असेल;

(a) अर्ज करणाऱ्या अन्वेषण अधिकाऱ्याची किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याची आणि तो अर्ज प्राधिकृत करणाऱ्या विभागप्रमुखाची ओळख;

(b) अर्जदाराने आदेश काढण्यात यावा या त्याच्या मताचे समर्थन करण्यासाठी ज्यांचा आधार घेतला आहे त्या तथ्यांचे व परिस्थितीचे विवरण, यात पुढील गोष्टींचा समावेश असेल;

(i) करण्यात आलेल्या किंवा करण्यात येत असलेल्या किंवा केला जाण्याची शक्यता असलेल्या संघटित गुन्हेगारीच्या अपराधाचा तपशील;

(ii) जेथून किंवा ज्या ठिकाणी संदेश मध्येच पकडावयाचा असेल त्या सुविधांचे स्वरूप व ठिकाण किंवा ती जागा यांचा विशिष्ट तपशील;

(iii) मध्येच पकडण्यात यावयाच्या संदेशाच्या प्रकाराचा विशिष्ट तपशील; आणि

(iv) जिचे संदेश मध्येच पकडण्यातच यावयाचे आहेत अशा संघटित गुन्हेगारीचा अपराध करत असलेल्या व्यक्तींची, माहिती असल्यास, ओळख;

(c) चौकशी करण्यासाठी किंवा माहिती मिळविण्यासाठी इतर पद्धतींचा वापर करण्यात आला व त्यात अपयश आले किंवा कसे किंवा वापर केल्यास अशा पद्धती यशस्वी होणे शक्य नाही असे वाटण्याची किंवा त्या खूप धोकादायक वाटण्याची किंवा त्यामुळे, संदेश मध्येच पकडण्याच्या कामाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची ओळख उघड होण्याची शक्यता वाटण्याची सयुक्तिक कारणे, या संबंधातील विवरण;

(d) किती काळासाठी संदेश मध्येच पकडणे चालू ठेवणे जरुरीचे आहे त्याचे विवरण, चौकशीचे स्वरूप जर वर्णन केलेल्या प्रकारचा संदेश पहिल्यांदा प्राप्त झाल्यानंतर संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार आपोआपच समाप्त होऊ नये असे असेल तर, त्यानंतर तशाच स्वरूपाचे आणखी संदेश प्राप्त होतील असे ज्या कारणावरून वाटण्याची शक्यता आहे त्या कारणांची पुष्टी करणाऱ्या वस्तुस्थितीचा विशिष्ट तपशील,

(e) अर्ज प्राधिकृत करणाऱ्या व्यक्तीस, ज्या अर्जामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्ती, सुविधा किंवा ठिकाणे यांपैकी कोणाचाही त्यात संबंध असेल असे, तारसंदेश इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार मिळण्यासाठी किंवा मान्यता मिळविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे करण्यात आलेले पूर्वीचे सर्व अर्ज आणि प्रत्येक अर्जावर सक्षम प्राधिकाऱ्याने केलेली कार्यवाही, त्या संबंधातील वस्तुस्थितीचे विवरण; आणि

(f) ज्या बाबतीत आदेशास मुदतवाढ मागण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत संदेश मध्येच पकडण्यामधून आतापावेतो, प्राप्त झालेले परिणाम किंवा असे परिणाम प्राप्त करण्यात आलेल्या अपयशाचे सयुक्तिक स्पष्टीकरण.

(३) सक्षम प्राधिकारी, अर्जदाराला अर्जाच्या पुष्टीदाखल आणखी तोंडी किंवा लेखी पुरावा सादर करणे आवश्यक करू शकेल.

(४) असा अर्ज आल्यावर सक्षम प्राधिकारी अर्जदाराने सादर केलेल्या तथ्यांच्या आधारे जर असे ठरवील की,–

(a) एखादी व्यक्ती या अधिनियमाच्या कलमे ३ आणि ४ मध्ये नमूद केलेला व शिक्षापात्र ठरविलेला विशिष्ट अपराध करीत आहे, तिने असा गुन्हा केला आहे किंवा ती असा गुन्हा करणार आहे असे समजण्यास संभाव्य कारण आहे;

(b) अशाप्रकारे संदेश मध्येच पकडल्यामुळे त्या अपराधाशी संबंधित विशिष्ट संदेश प्राप्त होतील असे समजण्यास संभाव्य कारण आहे;

(c) चौकशीच्या व माहिती मिळविण्याच्या नेहमीच्या पद्धती वापरण्यात आल्या असून त्यात अपयश आले आहे किंवा वापरण्यात आल्यास अशा पद्धती यशस्वी होणे शक्य नाही किंवा त्या खूपच धोकादायक आहेत किंवा त्यामुळे संदेश मध्येच पकडण्याच्या कामाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची ओळख उघड होण्याची शक्यता आहे असे वाजवीरीत्या दिसते;

(d) असा अपराध घडण्याच्या संबंधात जेथून किंवा ज्या ठिकाणी दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्यात यावयाचा असेल किंवा ज्यांचा वापर करण्यात येत असेल किंवा करण्यात यावयाचा असेल अशा सुविधा किंवा जागा, अशा व्यक्तीला भाड्याने देण्यात आली आहे किंवा तिच्या नावावर आहे किंवा तिच्याकडून सामान्यत: वापरली जात आहे असे समजण्यास संभाव्य कारण आहे;

तर सक्षम प्राधिकारी, अशा अर्जावर कारणे लेखी नमूद केल्यानंतर, अर्ज फेटाळू शकेल किंवा विनंतीनुसार किंवा फेरबदल केल्यानुसार तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक्स किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार किंवा त्यास मान्यता देणारा आदेश देऊ शकेल.

(५) या कलमान्वये कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणाऱ्या किंवा त्यास मान्यता देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला प्रत्येक आदेशात पुढील बाबी विनिर्दिष्ट करण्यात येतील–

(a) ज्या व्यक्तीचे संदेश मध्येच पकडण्यात येणार आहेत त्या व्यक्तीची–माहीत असल्यास ओळख;

(b) ज्याच्या बाबतीत किंवा ज्या ठिकाणी संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देण्यात आला आहे त्या संदेश सुविधांचे किंवा जागेचे स्वरूप आणि स्थान;

(c) मध्येच पकडण्यात यावयाच्या संदेशाच्या प्रकारचे विशिष्ट वर्णन आणि तो ज्याच्याशी संबंधित आहे त्या अपराधाबाबतचे विवरण;

(d) संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार ज्या एजन्सीला देण्यात आला आहे त्या एजन्सीची आणि अर्ज प्राधिकृत करणाऱ्या व्यक्तीची ओळख; आणि

(e) वर्णन केलेला संदेश पहिल्यांदा प्राप्त झाल्यानंतर संदेश मध्येच पकडण्याची प्रक्रिया आपोआप समाप्त होईल अथवा नाही याच्या विवरणांसह ज्या कालावधीत संदेश मध्येच पकडण्याचा अधिकार दिलेला असेल तो कालावधी.

(६) पोट–कलम (४) खाली आदेश दिल्यानंतर लगेचच परंतु कोणत्याही प्रकरणी, आदेश दिल्यापासून सात दिवसांपेक्षा उशिराची नसेल अशा वेळी, सक्षम प्राधिकारी, त्या आदेशाची एक प्रत व उक्त आदेशाच्या संबंधातील सर्व मूळ कागदपत्रे, अभिलेख, तसेच त्या आदेशाच्या संबंधातील त्याचे स्वतःचे निष्कर्ष, इत्यादी, कलम १५ अन्वये रचना करण्यात आलेल्या पुनर्विलोकन समितीकडे त्या आदेशाच्या विचारार्थ व मान्यतेसाठी पाठवील.

(७) अर्जदाराच्या विनंतीवरून या कलमाखालील तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणाऱ्या आदेशाद्वारे, तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश, सेवा पुरविणारा, जमीन मालक, परिरक्षक किंवा अन्य व्यक्ती यांनी अर्जदारास, ताबडतोब, ज्या व्यक्तीचे संदेश मध्येच पकडण्यात यावयाचे आहेत त्या व्यक्तीला अशी सेवा पुरविणारा, जमीन मालक, परिरक्षक किंवा व्यक्ती ज्या सेवा पुरवीत आहे, त्या सेवांमध्ये अडथळा न आणता कमीत कमी हस्तक्षेप करून संदेश मध्येच पकडण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती, सोयी, सवलती आणि तांत्रिक साहाय्य द्यावे, असा निदेश देण्यात येईल.

(८) या कलमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशान्वये, प्राधिकाराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकतर आवश्यक असेल अशा कालावधीपेक्षा कोणत्याही अधिक कालावधीकरिता किंवा कोणत्याही प्रसंगी साठ दिवसांपेक्षा जास्त कालावधीकरिता कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार किंवा मान्यता देण्यात येणार नाही. असा साठ दिवसांचा कालावधी आदेशान्वये अन्वेषण किंवा कायदा अंमलबजावणी अधिकारी संदेश मध्येच पकडण्याच्या कामास ज्या दिवसास प्रथम सुरुवात करील तो दिवस किंवा आदेश काढल्यानंतर दहा दिवस यांपैकी जो आधीचा असेल त्या दिवसाच्या लगत पूर्वीच्या तारखेस सुरू होईल. पोट–कलम (१) ला अनुसरून, जर मुदतवाढीसाठी अर्ज केला असेल आणि पोट–कलम (४) द्वारे आवश्यक असलेले निष्कर्ष सक्षम प्राधिकाऱ्याने काढलेले असतील तरच केवळ, आदेशास मुदतवाढ देण्यात येईल. मुदतवाढीचा कालावधी हा सक्षम प्राधिकाऱ्याला, ज्याकरिता तो देण्यात आला होता, ती प्रयोजने साध्य करण्यासाठी आवश्यक वाटेल अशा कालावधीपेक्षा जास्त असणार नाही आणि तो एका वेळी साठ दिवसांपेक्षा जास्त असणार नाही. प्रत्येक आदेश किंवा त्याची

मुदतवाढ, यामध्ये संदेश मध्येच पकडण्याच्या प्राधिकाराचा व्यवहार्य असेल तितक्या लवकरात लवकर वापर करण्यात येईल आणि या कलमान्वये मध्येच पकडले जाण्याच्या अधीन नसतील असे संदेश मध्येच पकडले जाण्याचे प्रमाण कमी असेल अशा पद्धतीने किंवा रीतीने ते करण्यात येईल आणि ते प्राधिकृत केलेल्या उद्देशाच्या प्राप्तीनंतर किंवा कोणत्याही परिस्थितीत आदेशाची मुदत संपल्यानंतर समाप्त होईल अशा तरतुदीचा समावेश असेल. मध्येच पकडण्यात आलेला संदेश सांकेतिक भाषेत किंवा परदेशी भाषेत असेल आणि त्या परदेशी भाषेतील किंवा सांकेतिक भाषेतील तज्ज्ञ, संदेश मध्येच पकडण्याच्या कालावधीत सयुक्तिकपणे उपलब्ध नसेल तर, असा संदेश मध्येच पकडण्यात आल्यानंतर संदेश मध्येच पकडण्याचे प्रमाण व्यवहार्य असेल तेथवर कमीत कमी करण्यात यावे. या कलमाखाली संदेश मध्येच पकडण्याची प्रक्रिया ही, संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार दिलेल्या अन्वेषण किंवा कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याकडून किंवा राज्य शासनाच्या कंत्राटान्वये व्यक्तीकडून संपूर्णत: किंवा अंशत: चालविण्यात येईल.

(९) ज्या वेळी या कलमानुसार संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणारा आदेश देण्यात येईल त्यावेळी आदेशाद्वारे प्राधिकार दिलेले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने प्रगती करण्यात आलेली आहे. आणि संदेश मध्येच पकडण्याचे काम पुढे चालू ठेवण्याची गरज आहे हे दर्शविणारे अहवाल ज्याने आदेश दिलेला आहे त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे देण्यास फर्माविता येईल. असे अहवाल सक्षम प्राधिकारी फर्मावील अशा कालांतराने देण्यात येतील.

(१०) या कलमाच्या इतर कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जो अतिरिक्त पोलीस महानिरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी सयुक्तिकपणे असे ठरवील की–

(a) आणीबाणीची परिस्थिती अस्तित्वात असून त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे,–

(i) कोणत्याही व्यक्तीला मृत्यूचा किंवा गंभीर शारीरिक इजा होण्याचा तात्काळ धोका निर्माण होणे,

(ii) राज्याची सुरक्षा व हितसंबंध धोक्यात आणणाऱ्या कटकारस्थानात्मक हालचाली,

(iii) संघटित गुन्हेगारीच्या स्वरूपात कटकारस्थानात्मक हालचाली,

ज्यांच्या बाबतीत अशा प्रकारे संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून यथायोग्य कार्यासक्तीने आदेश प्राप्त करणे शक्य होण्यापूर्वी तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडणे आवश्यक आहे असे संभाषण; आणि

(b) ज्या आधारे असे संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार देणारा आदेश काढता येईल अशी कारणे आहेत,

तर ती पोट–कलम (१) आणि (२) च्या तरतुदींस अनुसरून, संदेश मध्येच पकडण्याची स्थिती उद्‌भवल्यानंतर किंवा अशी स्थिती उद्‌भवण्यास सुरुवात झाल्यानंतर, अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीत, जर संदेश मध्येच पकडण्यास मान्यता देणारा आदेश मिळण्याकरिता अर्ज करण्यात आलेला असेल तर, अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास असा तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडण्याला लेखी प्राधिकार देऊ शकेल.

(११) पोट–कलम (१०) खाली संदेश मध्येच पकडण्यास मान्यता देणारा आदेश देण्यात आला नसेल त्याबाबतीत जेव्हा हवा असलेला संदेश मिळविण्यात येईल किंवा आदेशाकरिता केलेला अर्ज नाकारता येईल, यापैकी जे आधी घडेल तेव्हा असे संदेश मध्येच पकडण्याचे काम तात्काळ बंद होईल. संदेश मध्येच पकडण्याच्या परवानगीकरिता केलेला अर्ज पोट–कलम (४) अन्वये नाकारण्यात आला असेल किंवा मान्यतेकरिता पोट–कलम (१०) अन्वये केलेला अर्ज नाकारण्यात आला असेल किंवा आदेश काढल्याशिवाय संदेश मध्येच पकडण्याचे काम बंद करण्यात आलेले असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत, पकडण्यात आलेला

कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशामधील मजकूर या कलमाचा भंग करून मिळविला आहे असे समजण्यात येईल.

(१२) (a) या कलमाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही साधनाद्वारे, मध्येच पकडण्यात आलेल्या कोणत्याही, तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संभाषण यांचा मजकूर, शक्य असल्यास, ध्वनीफितीवर किंवा दूरध्वनीवर किंवा इतर तुलनात्मक साधनांवर ध्वनिमुद्रित करण्यात येईल. या पोट–कलमाखालील कोणताही दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश यांच्या मजकुराचे ध्वनिमुद्रण त्यांचे संकलनापासून किंवा फेरफारापासून संरक्षण होईल अशा प्रकारे करण्यात येईल. आदेशाचा किंवा त्याच्या मुदतवाढीचा कालावधी संपल्यानंतर, ताबडतोब असे ध्वनिमुद्रण, असा आदेश काढणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास, उपलब्ध करून देण्यात येईल व त्याच्या निदेशांनुसार ते मोहोरबंद केले जाईल. सक्षम प्राधिकारी आदेश देईल त्या ठिकाणी ध्वनिमुद्रित मजकूर अभिरक्षित ठेवण्यात येईल. सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशावरून असेल त्याखेरीज ते नष्ट करण्यात येणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत ते दहा वर्षांकरिता ठेवण्यात येतील.

(b) या कलमाखालील करण्यात आलेले अर्ज आणि काढण्यात आलेले आदेश, सक्षम प्राधिकाऱ्याकडून मोहोरबंद करण्यात येतील. सक्षम प्राधिकारी निदेश देईल त्या ठिकाणी अर्ज आणि आदेश अभिरक्षित ठेवण्यात येतील आणि सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशावरून असेल त्या खेरीज, ते नष्ट करण्यात येणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत दहा वर्षांकरिता ठेवण्यात येतील.

सक्षम प्राधिकारी, प्रस्ताव दाखल झाल्यावर, स्वविवेकाने, न्यायाच्या दृष्टीने सक्षम प्राधिकाऱ्यास हितकारक आहे असे वाटेल अशा व्यक्तीला किंवा तिच्या समुपदेशीला, मध्येच पकडण्यात आलेला संदेशांचा, अर्जाचा किंवा आदेशांचा असा भाग उपलब्ध करून देईल.

(१३) संहितेमध्ये किंवा त्या वेळी अमलात असले, इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही असले तरी या कलमान्वये मध्येच पकडण्यात आलेला तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशामार्फत गोळा केलेला पुरावा त्या प्रकरणाच्या न्यायचौकशीच्या वेळी न्यायालयामध्ये आरोपीविरुद्धचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल :

परंतु या कलमानुसार मध्येच पकडण्यात आलेला कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशाचा मजकूर किंवा त्यातून प्राप्त केलेला पुरावा प्रत्येक पक्षकारास, न्यायचौकशी, सुनावणी किंवा कार्यवाहीच्या दहा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपूर्वी ज्याअन्वये संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार किंवा मान्यता दिलेली होती अशा सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाची आणि त्यासोबतच्या अर्जाची प्रत दिलेली नसेल तर कोणत्याही न्यायालयातील कोणतीही न्यायचौकशी, सुंनावणी किंवा अन्य कार्यवाही यात पुरावादाखल स्वीकारण्यात येणार नाही किंवा अन्य प्रकारे उघड करण्यात येणार नाही :

आणखी असे की, न्यायचौकशी करणाऱ्या न्यायाधीशास न्यायचौकशी, सुनावणी किंवा कार्यवाही यांच्यापूर्वी दहा दिवस पक्षकारास वरील माहिती देणे शक्य नव्हते आणि पक्षकारास अशी माहिती मिळण्यास लागलेल्या विलंबामुळे बाधा पोहोचत नाही असे आढळले तर तो या दहा दिवसांच्या कालावधीच्या बाबतीत सूट देऊ शकेल.

**स्पष्टीकरण–** या कलमाच्या प्रयोजनासाठी,–

(a) ''तार संदेश'' याचा अर्थ उगम बिंदू आणि जोडणी बिंदू यांच्या दरम्यान, उगम बिंदू आणि ग्रहणबिंदू या दरम्यान (स्विचिंग केंद्रातील अशा जोडणीच्या वापरासह) तार, वीजतार किंवा तत्सम इतर जोडणी यांच्या साह्याने दिल्या जाणाऱ्या संदेशाचे पारेषण (Trasnsmission) करण्यासाठी असलेल्या सुविधांचा वापर करून संपूर्णत: किंवा भागश: करण्यात येणारे कोणतेही श्रुति संदेश स्थानांतरण (Aural transfer) असा आहे आणि अशा संज्ञेत अशा संदेशांच्या कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साठवणुकीचा समावेश होतो.

(b) ''मौखिक संदेश'' याचा अर्थ संदेश मध्येच पकडला जाणार नाही या अपेक्षेला पुष्टी देणाऱ्या परिस्थितीत अशी अपेक्षा दर्शित करणाऱ्या एखाद्या व्यक्तीकडून उच्चारण्यात आलेला कोणताही मौखिक संदेश असा आहे, परंतु अशा संज्ञेत कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संदेशाचा समावेश होत नाही;

(c) ''इलेक्ट्रॉनिक संदेश'' याचा अर्थ ज्याचा देशांतर्गत किंवा विदेशी व्यापारावर परिणाम होतो अशी कोणत्याही प्रकारची चिन्हे, संकेत, लेख, प्रतिमा, ध्वनी, माहिती किंवा गुप्तवार्ता यांचे तार, रेडिओ, इलेक्ट्रॉमॅग्नेटिक, फोटो, इलेक्ट्रॉनिक किंवा फोटो ऑप्टिकल यंत्रणेद्वारे पूर्णतः किंवा भागशः करण्यात येणारे कोणतेही स्थानांतरण असा आहे, परंतु, त्यात पुढील गोष्टींचा समावेश होत नाही,–

(i) बिनतारी दूरध्वनी हॅन्डसेट आणि आधार युनिट यांच्या दरम्यान पारेषित केला जाणारा कॉर्डलेस दूरध्वनी संदेशाचा रेडिओ भाग;

(ii) कोणताही तारसंदेश किंवा मौखिक संदेश;

(iii) केवळ ध्वनी पेजिंग उपकरणाद्वारे दिलेला कोणताही संदेश; किंवा

(iv) ट्रॅकिंग उपकरणामधून देण्यात आलेला कोणताही संदेश;

(d) ''संदेश मध्येच पकडणे'' याचा अर्थ कोणत्याही इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक किंवा अन्य उपकरणाचा वापर करून तारसंदेश इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशाद्वारे आशयाचे श्रुत किंवा अन्य संपादन असा आहे.

**१५. प्राधिकार देणाऱ्या आदेशांचे पुनरीक्षण करण्यासाठी समितीची स्थापना :–**

(१) कलम १४ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पुनरीक्षण करण्यासाठी एक पुनरीक्षण समिती असेल.

(२) पुनर्विलोकन समितीमध्ये पुढील पदसिद्ध सदस्य असतील :

(i) शासनाचे मुख्य सचिव, अध्यक्ष

(ii) गृह विभागातील यथास्थिती, अपर मुख्य सचिव किंवा सदस्य
वरिष्ठतम प्रधान सचिव

(iii) प्रधान सचिव किंवा सचिव व विधी परामर्शी, सदस्य
विधी व न्याय विभाग.

(३) कलम १४ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश, कलम १४ च्या पोट–कलम (४) अन्वये, संदेश मध्येच पकडण्याच्या बाबतीत प्राधिकार देणारा किंवा अर्जास मान्यता देणारा किंवा आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत त्या कलमाच्या पोट–कलम (१०) अन्वये करण्यात आलेला संदेश मध्येच पकडण्याची कृती अमान्य करणारा, सक्षम प्राधिकाऱ्याकडून देण्यात आलेला आदेश आवश्यक, सयुक्तिक आणि समर्थनीय होता किंवा कसे हे ठरविण्यासाठी, तो मिळाल्यानंतर दहा दिवसांच्या आत पुनरीक्षण समितीकडून विचारात घेण्यात येईल.

(४) पुनरीक्षण समिती, संपूर्ण अभिलेखाची तपासणी केल्यानंतर आणि आवश्यक वाटेल अशी कोणतीही असल्यास चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, सक्षम प्राधिकरणाने काढलेला आदेश मान्य करू शकेल किंवा तो आदेश अमान्य करणारा आदेश देऊ शकेल. पुनरीक्षण समितीने अमान्य करणारा आदेश दिल्यानंतर अगोदरच सुरू झालेले संदेश मध्येच पकडण्याचे काम, कोणतेही असल्यास तात्काळ थांबवण्यात येईल. टेप, वायर, किंवा इतर उपकरणाच्या स्वरूपात मध्येच पकडण्यात आलेला संदेश, कोणताही असल्यास, कोणत्याही प्रकरणात पुरावा म्हणून स्वीकारला जाणार नाही आणि तो नष्ट करण्याचा निदेश देण्यात येईल.

**१६. तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडणे आणि उघड करणे यास मनाई असणे :–**

कलम १४ मध्ये अन्यथा विशेष करून तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त अन्य रीतीने, जो कोणी पोलीस अधिकारी,–

(a) तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश बुद्धिपुरस्सर मध्येच पकडील, किंवा पकडण्याचा प्रयत्न करील किंवा संदेश मध्येच पकडण्यासाठी किंवा पकडण्याचा प्रयत्न करण्यासाठी कोणत्याही अन्य व्यक्तीचे साहाय्य मिळवील;

(b) एखादे इलेक्ट्रॉनिक, तांत्रिक किंवा इतर उपकरण, जेव्हा–

(i) असे उपकरण तारयंत्रणा, केबलला किंवा तार संदेशामध्ये वापरल्या जाणाऱ्या तत्सम जोडणीला जोडलेले असेल किंवा त्याद्वारे संदेश पारेषित करीत असेल; किंवा

(ii) असे उपकरण रेडिओद्वारे संदेश पारेषित करीत असेल किंवा अशा संदेशाच्या पारेषणामध्ये हस्तक्षेप करीत असेल; तेव्हा हेतुपुरस्सरपणे वापरील, वापरण्याचा प्रयत्न करील किंवा वापरण्यासाठी किंवा वापरण्याचा प्रयत्न करण्यासाठी कोणत्याही अन्य व्यक्तीचे साहाय्य मिळवील.

(c) कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश यामधील मजकूर, माहिती ही या पोट–कलमांचा भंग करून, तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडून प्राप्त केलेली आहे हे माहिती असून किंवा माहीत असण्यास कारण असताना, अन्य कोणत्याही व्यक्तीकडे बुद्धिपुरस्सरपणे उघड करील किंवा उघड करण्याचा प्रयत्न करील;

(d) कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश यामधील मजकूर, ती माहिती या पोट–कलमचा भंग करून, तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश मध्येच पकडून प्राप्त केलेली आहे हे माहिती असून किंवा माहीत असण्याचे कारण असताना बुद्धिपुरस्सरपणे वापरील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील; किंवा

(e) (i) कलम १४ द्वारे प्राधिकृत केलेल्या मार्गांनी मध्येच पकडलेल्या कोणताही तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशातील मजकूर;

(ii) या अधिनियमान्वये, गुन्हा अन्वेषणाच्या संबंधात असा संदेश मध्येच पकडून माहिती मिळविलेली आहे हे माहिती असून किंवा माहीत असण्यास कारण असताना;

(iii) गुन्हा अन्वेषणाशी संबंधित माहिती मिळविलेली किंवा मिळालेली असताना; आणि

(iv) रीतसर प्राधिकार दिलेल्या गुन्ह्याच्या अन्वेषणामध्ये अनुचितरीत्या अडथळा आणण्याच्या, व्यत्यय आणण्याच्या किंवा हस्तक्षेप करण्याच्या हेतूने कोणत्याही अन्य व्यक्तीकडे बुद्धिपुरस्सरपणे उघड करील किंवा उघड करण्याचा प्रयत्न करील;

(f) कलम १५ च्या पोट–कलम (४) अन्वये पुनरीक्षण समितीद्वारे संदेश मध्येच पकडण्याची कृती अमान्य करणारा आदेश जारी करण्यात आल्यानंतरही बुद्धिपुरस्सरपणे तारसंदेश, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेश पकडण्याचे चालू ठेवील,

तो अशा उल्लंघनासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस आणि पन्नास हजार रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**१७. पुराव्याचे विशेष नियम :–**

(१) संहितेमध्ये किंवा भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ यात याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील किंवा अधिनियमांशी संबंधित गुन्ह्याच्या न्यायचौकशीच्या आणि शिक्षेच्या प्रयोजनासाठी न्यायालयास आरोपीच्या संबंधित पुढील वस्तुस्थिती तिचे पुरावा म्हणून मूल्य असल्याने विचारात घेता येईल :

(a) आरोपीस संहितेच्या कलम १०७ किंवा ११० अन्वये पूर्वी कोणत्याही प्रसंगी बद्ध केले होते;

(b) प्रतिबंधक स्थानबद्धतेशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली स्थानबद्ध केले होते;

(c) विशेष न्यायालयामध्ये, या अधिनियमाखाली कोणत्याही आधीच्या प्रकरणात खटला भरला होता.

(२) एखाद्या संघटित गुन्ह्यात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा तिच्या वतीने कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात जंगम किंवा स्थावर मालमत्ता असेल व त्याचे कारण ती समाधानकारक देऊ शकत नाही हे सिद्ध झाले असेल त्या बाबतीत, याविरुद्ध सिद्ध झाले नसेल तर विशेष न्यायालय, अशी मालमत्ता किंवा आर्थिक साधने ही त्याच्या बेकायदेशीर कृत्यांद्वारे तिने संपादन केली आहेत किंवा मिळविली आहेत असे गृहीत धरेल.

(३) आरोपीने कोणत्याही व्यक्तीचे अपहरण केल्याचे शाबित झाले असेल तर, विशेष न्यायालय ते त्याने खंडणीसाठी केल्याचे गृहीत धरील.

**१८. पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला विशिष्ट कबुलीजबाब विचारात घेण्यात येईल.**

(१) संहितेमध्ये किंवा भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ मध्ये, काहीही असले तरी, परंतु या कलमातील तरतुदींना अधीन राहून, एखाद्या व्यक्तीने पोलीस अधीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेला आणि अशा पोलीस अधिकाऱ्याने एकतर लेखी किंवा ज्यावरून ध्वनी किंवा प्रतिमा पुनः उद्धृत करता येतात, अशा कॅसेट ध्वनिफिती किंवा ध्वन्‍ी आलेख यांसारख्या कोणत्याही यांत्रिक साधनांवर अभिलिखित केलेला कबुलीजबाब, अशा व्यक्तीच्या किंवा सह आरोपीच्या, चिथावणी देणाऱ्या व्यक्तीच्या किंवा कट करणाऱ्या व्यक्तीच्या न्यायचौकशीमध्ये ग्राह्य असेल.

परंतु सह आरोपी, चिथावणी देणारी व्यक्ती किंवा कट करणारी व्यक्ती यांच्यावर त्याच प्रकरणात आरोपीबरोबर दोषारोप केलेला असावा किंवा न्यायचौकशी चाललेली असावी.

(२) कबुलीजबाब मोकळ्या वातावरणात व ज्या भाषेत त्या व्यक्तीची तपासणी करण्यात आली असेल त्याच भाषेत व त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदवून घेण्यात येईल.

(३) पोट–कलम (१) अन्वये कोणताही कबुलीजबाब नोंदवून घेण्यापूर्वी, पोलीस अधिकारी, कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीकडे, तिने असा कबुलीजबाब देणे हे तिच्यावर बंधनकारक नाही आणि जर तिने तसे केले तर, तिच्याविरुद्ध पुरावा म्हणून तो वापरला जाऊ शकेल हे स्पष्ट करील आणि असा पोलीस अधिकारी, असा कबुलीजबाब देणाऱ्या व्यक्तीकडे विचारणा केल्यावर तसा कबुलीजबाब स्वेच्छेने दिला जात आहे याबद्दल त्याची खात्री झाल्याखेरीज असा कोणताही कबुलीजबाब नोंदवून घेणार नाही. संबंधित पोलीस अधिकारी, अशा स्वेच्छा कबुलीजबाबाची नोंद घेतल्यानंतर, त्यावर दिनांक व वेळ नमूद करून, अशा कबुलीजबाबाच्या स्वेच्छा स्वरूपाविषयी त्याची व्यक्तिगत खात्री झाल्याबद्दल कबुलीजबाबाच्या खाली लेखी प्रमाणित करील.

(४) पोट्कलम (१) अन्वये नोंदविलेला प्रत्येक कबुलीजबाब, असा कबुलीजबाब ज्या क्षेत्रामध्ये नोंदविण्यात आला असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असणारा मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्याकडे तात्काळ पाठवण्यात येईल आणि असा दंडाधिकारी, अशा प्रकारे प्राप्त झालेला, अभिलिखित कबुलीजबाब विशेष न्यायालयाकडे पाठवील व ते न्यायालय अशा अपराधाची दखल घेईल.

(५) जिच्याकडून पोट–कलम (१) अन्वये कबुलीजबाब नोंदवून घेतला असेल त्या व्यक्तीला देखील पोट–कलम (४) अन्वये ज्याच्याकडे असा कबुलीजबाब पाठविणे आवश्यक असेल असा मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य दंडाधिकारी यांच्यासमोर गैरवाजवी विलंबाशिवाय, कबुलीजबाबाच्या मूळ लेखी किंवा यांत्रिक साधनांवर नोंदवून घेतलेल्या निवेदनासह हजर करण्यात येईल.

(६) मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा मुख्य न्यायदंडाधिकारी अशा प्रकारे हजर करण्यात आलेल्या व आरोपीने केलेले असे कोणतेही निवेदन काटेकोरपणे नोंदवून घेईल व त्यांची स्वाक्षरी घेईल आणि छळ झाल्याची कोणतीही तक्रार असल्यास, अशा व्यक्तीला, सहायक जिल्हा शल्यचिकित्सकाच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा वैद्यकीय अधिकाऱ्यापुढे वैद्यकीय तपासणीकरिता हजर करण्याचे आदेश देण्यात येतील.

**१९. साक्षीदारांना संरक्षण :–**

(१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी विशेष न्यायालयाची तशी इच्छा असल्यास या अधिनियमान्वये होणारी कार्यवाही गुप्तरीत्या केली जाईल.

(२) विशेष न्यायालय, त्याच्यासमोर चालणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीतील साक्षीदाराने किंवा अशा साक्षीदाराच्या बाबतीत सरकारी अभियोक्त्याने केलेल्या अर्जावर किंवा त्याच्या स्वतःच्या मताने, कोणत्याही साक्षीदाराची ओळख आणि पत्ता गुप्त ठेवण्याकरिता त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना करील.

(३) विशेषतः आणि पोट–कलम (२) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाधा येऊ न देता, विशेष न्यायालय त्या पोट–कलमाखाली ज्या उपाययोजना करील त्यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल :

(a) विशेष न्यायालय ठरवील अशा ठिकाणी कार्यवाही चालविणे;

(b) लोकांना पाहण्यास खुल्या असणाऱ्या प्रकरणामध्ये त्याने दिलेल्या आदेशात किंवा न्याय–निर्णयात किंवा कोणत्याही अभिलेखामध्ये साक्षीदाराच्या नावाचा आणि पत्त्याचा उल्लेख टाळणे;

(c) साक्षीदारांची ओळख आणि पत्ते उघड केले जात नाहीत याची खात्री करण्याकरिता कोणतेही निदेश काढणे.

(d) अशा एखाद्या न्यायालयासमोर प्रलंबित असलेली सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्यवाही, लोकहितार्थ, कोणत्याही प्रकारे प्रसिद्ध करू नये असे आदेश काढणे.

(४) पोट–कलम (३) अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, एका वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या आणि एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**२०. मालमत्तेचे समपहरण करणे व जप्त करणे :–**

(१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीवरील गुन्हा सिद्ध झाला असेल, तर विशेष न्यायालयास, कोणतीही शिक्षा देण्याबरोबरच, आरोपीच्या मालकीची असलेली आणि आदेशामध्ये विनिर्दिष्ट असलेली कोणतीही जंगम किंवा स्थावर किंवा या दोन्ही मालमत्ता राज्य शासनाकडे समपहृत होतील व ती सर्व भारांपासून मुक्त असेल असे लेखी आदेशाद्वारे जाहीर करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीवर या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचा आरोप असेल त्याबाबतीत, त्याची न्यायचौकशी करणाऱ्या विशेष न्यायालयास, अशा न्यायचौकशीच्या कालावधीत आरोपीच्या मालकीची सर्व किंवा कोणत्याही, स्थावर किंवा जंगम किंवा दोन्ही मालमत्ता जप्त करण्यात यावी असा आदेश देता येईल आणि न्यायचौकशीच्या शेवटी ती व्यक्ती दोषी असल्याचे सिद्ध झाल्यास अशा प्रकारे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेचे राज्य शासनाकडे समपहरण होईल. तसेच ती मालमत्ता सर्व भारांपासून मुक्त असेल.

(३) (a) कलम १४ च्या पोट–कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या पर्यवेक्षी अधिकाऱ्याच्या मान्यतेने अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने तयार केलेल्या लेखी अहवालाच्या आधारावर या अधिनियमाखाली शिक्षायोग्य असणारा अपराध केलेली

कोणतीही व्यक्ती फरारी झाली आहे किंवा तपाला तपास लागू नये म्हणून ती स्वत:ला लपवून ठेवत आहे, असे कोणत्याही विशेष न्यायालयास वाटण्यासाठी कोणतेही कारण असल्यास, संहितेच्या कलम ८२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असे न्यायालय लेखी उद्‌घोषणा प्रसिद्ध करून त्याला उद्‌घोषणेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी आणि अशी उद्‌घोषणा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांपेक्षा कमी नसलेल्या परंतु तीस दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या, विनिर्दिष्ट केलेल्या काळात हजर राहण्यास फर्मावील.

परंतु, जर अन्वेषण करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्याला फरारी झालेल्या किंवा लपून बसलेल्या आरोपीला, अशा व्यक्तीविरुद्ध अपराधाची नोंद झालेल्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अटक करण्यात अपयश आले तर तो अधिकारी उक्त कालावधी समाप्त झाल्यावर उद्‌घोषणा काढण्याकरिता विशेष न्यायालयाला कळवील.

(b) खंड (a) खाली उद्‌घोषणा काढणारे विशेष न्यायालय, कोणत्याही वेळी, उद्‌घोषित केलेल्या व्यक्तीच्या मालकीची असणाऱ्या, कोणत्याही जंगम किंवा स्थावर किंवा दोन्ही मालमत्तेवर जप्ती आणण्याचे आदेश देईल, आणि संहितेच्या कलमे ८३ ते ८५ यातील तरतुदी, ती जप्ती त्या संहितेखाली केली असल्याप्रमाणे अशा जप्तीला लागू होतील.

(l) जिची मालमत्ता संहितेच्या कलम ८५ च्या पोट–कलम (२) खाली राज्य शासनाच्या ताब्यात असेल अशी कोणतीही व्यक्ती, जप्ती आणल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, स्वेच्छेने हजर झाली किंवा पकडण्यात आली आणि ज्याच्या आदेशाने मालमत्ता जप्त केली होती त्या विशेष न्यायालयासमोर किंवा ज्या न्यायालयाला असे न्यायालय दुय्यम असेल त्याच्यासमोर आणण्यात आली आणि तिने जर, पकडले जाण्याचे टाळण्याच्या उद्देशाने ती फरारी झाली नव्हती, किंवा लपून राहिली नव्हती, आणि उद्‌घोषणेच्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत हजर राहणे शक्य होण्यासाठी तिला ती नोटीस मिळालेली नव्हती, असे न्यायालयाची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध केले तर, अशी मालमत्ता किंवा, ती जर विकण्यात आली असेल, तर तिचे निव्वळ उत्पन्न आणि उर्वरित मालमत्ता, त्यातून जप्तीच्या परिणामी झालेला खर्च भागविल्यानंतर तिच्या स्वाधीन करण्यात येईल.

**२१. संहितेच्या विशिष्ट तरतुदी सुधारित स्वरूपात लागू करणे :–**

(१) संहितेमध्ये किंवा कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला प्रत्येक अपराध संहितेच्या कलम २, खंड (a) च्या अर्थांतर्गत दखलपात्र अपराध असल्याचे मानण्यात येईल, आणि त्या खंडामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे 'दखलपात्र प्रकरण' याचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

(२) संहितेचे कलम १६७ हे या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाचा अंतर्भाव असलेल्या प्रकरणाच्या संबंधात पुढील फेरबदलांच्या अधीन राहून लागू होईल, पोट–कलम (२) मध्ये–

(a) ज्या ठिकाणी ''पंधरा दिवसांएवढ्या'' आणि ''साठ दिवसांच्या'' असा निर्देश करण्यात आलेला असेल त्या त्या ठिकाणी त्याचा अन्वयार्थ अनुक्रमे ''तीस दिवसांएवढ्या'' आणि ''नव्वद दिवसांच्या'' असा लावण्यात येईल;

(b) विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :

''परंतु आणखी असे की, नव्वद दिवसांच्या उक्त कालावधीच्या आत अन्वेषणाचे काम पूर्ण करणे शक्य नसेल तर विशेष न्यायालय अन्वेषणाची प्रगती आणि आरोपीला नव्वद दिवसांच्या उक्त कालावधीपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध करण्यासंबंधीची विशिष्ट कारणे दर्शविणारा सरकारी अभियोक्त्याचा अहवाल आल्यावर उक्त कालावधी एकशे ऐंशी दिवसांपर्यंत वाढवील.''

(३) संहितेच्या कलम ४३८ मधील कोणतीही गोष्ट, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध केल्याच्या आरोपावरून कोणत्याही व्यक्तीला झालेल्या अटकेचा समावेश असणाऱ्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत लागू होणार नाही.

(४) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ती अभिरक्षेत असेल तर,

(a) अशा मुक्ततेच्या अर्जाला विरोध करण्याची सरकारी अभियोक्त्याला संधी दिल्याखेरीज आणि;

(b) सरकारी अभियोक्त्याने अर्जास विरोध कोणताही केला असेल त्या बाबतीत तो अशा अपराधाबद्दल दोषी नाही हे मानण्यास पुरेशी कारणे आहेत आणि जामिनावर मुक्त असताना तो अपराध करण्याची शक्यता नाही, अशी न्यायालयाची खात्री पटल्याखेरीज, जामिनावर किंवा त्याच्या स्वत:च्या बंधपत्रावर मुक्त करण्यात येणार नाही.

(५) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रस्तुत अपराध घडल्याच्या दिनांकास, आरोपी या अधिनियमाखालील किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखालील अपराधाच्या बाबतीत जामिनावर मुक्त होता असे न्यायालयास दिसून आले तर, आरोपीस जामीन देण्यात येणार नाही.

(६) पोट–कलम (४) मध्ये जामीन देण्यासाठी विनिर्दिष्ट केलेले निर्बंध हे संहितेन्वये किंवा जामीन देण्यासाठी त्या–त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये दिलेल्या निर्बंधाच्या शिवाय आणखी असलेले निर्बंध आहेत.

(७) एखाद्या व्यक्तीला, अभ्यारोपपूर्व किंवा न्यायचौकशीपूर्व चौकशीसाठी न्यायालयीन अभिरक्षेतून पोलीस अभिरक्षेत घेण्याची मागणी करणारा पोलीस अधिकारी, लेखी निवेदन दाखल करील व त्यास असा ताबा मिळण्याबाबतची तसेच, पोलीस अभिरक्षा मिळविण्यासाठी विलंब झाला असल्यास, त्याबाबतची कारणे विशद करील.

**२२. कलम ३ खालील अपराधाच्या विषयातील गृहीतक :–**

(१) कलम ३ खालील शिक्षापात्र असलेल्या संघटित गुन्हेगारी अपराधाच्या खटल्यामध्ये,–

(a) आरोपीकडून बेकायदेशीर शस्त्र आणि दस्तऐवज किंवा कागदपत्रांसह इतर साहित्य प्राप्त झाले आणि असा अपराध करताना, अशा बेकायदेशीर शस्त्रांचा आणि साहित्य व दस्तऐवज किंवा कागदपत्रांसह इतर साहित्याचा, वापर करण्यात आला असे मानण्यास सयुक्तिक कारण आहे, असे सिद्ध झाले तर; किंवा

(b) तज्ज्ञाच्या पुराव्याद्वारे, आरोपीच्या बोटांचे ठसे अपराधाच्या जागेवर किंवा असा अपराध करण्याच्या संबंधात वापरण्यात आलेल्या बेकायदेशीर शस्त्रांवर किंवा इतर साहित्य आणि दस्तऐवज अथवा कागदपत्रे व वाहने यांसह कशावरही आढळून आल्याचे सिद्ध झाले तर,

विशेष न्यायालय, याविरुद्ध काही सिद्ध होईपर्यंत, त्या आरोपीनेच असा अपराध केल्याचे गृहीत धरील.

(२) कलम ३ च्या पोट–कलम (२) खाली शिक्षापात्र असलेल्या संघटित गुन्हेगारीच्या अपराधाच्या खटल्यामध्ये आरोपी, संघटित गुन्हेगारीच्या अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीस किंवा तसा वाजवी संशय असणाऱ्या व्यक्तीस वित्तीय साह्य देतो असे सिद्ध झाले तर, याविरुद्ध काही सिद्ध होईपर्यंत, विशेष न्यायालय, उक्त पोट–कलम (२) खालील अपराध अशा व्यक्तीने केल्याचे गृहीत धरील.

**२३. अपराधाची दखल घेणे आणि अन्वेषण करणे :–**

(१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी–

(a) या अधिनियमाखाली कोणताही संघटित गुन्हेगारीचा अपराध केल्याबाबतची कोणत्याही माहितीची नोंद पोलीस

उप महानिरीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय कोणताही पोलीस अधिकारी करणार नाही;

(b) या अधिनियमाच्या तरतुदीखालील कोणत्याही अपराधाचे अन्वेषण, पोलीस उप–अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांकडून केले जाणार नाही.

(२) विशेष न्यायालय, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची, पोलीस अपर महासंचालक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा असलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय दखल घेणार नाही.

**२४. कर्तव्य पार पाडण्यात कसूर करणाऱ्या लोकसेवकांना शिक्षा :–**

कलम २ च्या खंड (e) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे संघटित गुन्हा करण्याच्या कामी लोकसेवक असणाऱ्या कोणाही, कोणत्याही स्वरूपाची कोणतीही मदत किंवा साह्य केले मग ते संघटित गुन्हेगारी संघटनेच्या सदस्याने कोणताही अपराध करण्यापूर्वी असो, किंवा केल्यानंतर असो– किंवा या अधिनियमान्वये कायदेशीर उपाययोजना केली नाही किंवा या संदर्भात कोणत्याही न्यायालयाने किंवा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याचे हेतुत: टाळले तर त्यास तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या दोन्हीपैकी कोणत्याही प्रकारच्या कारावासाची आणि तसेच दंडाची शिक्षा होईल.

**२५. अधिभावी परिणाम :–**

या अधिनियमाच्या तरतुदी, किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा अशा कोणत्याही नियमान्वये दिलेला कोणताही आदेश, त्या–त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा कायद्याचा प्रभाव असलेल्या कोणत्याही लेखात तद्‌विरुद्ध काहीही असले तरी परिणामक होईल.

**२६. सद्‌भावनेने केलेल्या कृतींना संरक्षण :–**

हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा अशा कोणत्याही नियमान्वये दिलेला कोणताही आदेश याला अनुलक्षून सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा प्राधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**२७. मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशाचा वार्षिक अहवाल :–**

(१) राज्य शासन–

(i) संदेश मध्येच पकडण्याचा प्राधिकार मिळण्यासाठी पोलीस विभागाकडून सक्षम प्राधिकाऱ्यास प्राप्त झालेल्या, ज्यांच्या बाबतीत कार्यवाहीस प्रारंभ झाला आहे अशा अर्जाची संख्या;

(ii) मान्य करण्यात किंवा नाकारण्यात आले आहेत अशा अर्जांची संख्या;

(iii) आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशाची संख्या आणि अशा बाबीमध्ये कार्योत्तर प्राधिकार दिलेल्या किंवा मान्यता दिलेल्या किंवा नाकारलेल्या संदेशांची संख्या;

(iv) अशा मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांच्या आधारे प्रारंभ झालेल्या कार्यवाहींची संख्या आणि अशा मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशांच्या परिणामी झालेल्या दोषसिद्धींची संख्या;

यांचा संपूर्ण तपशील देणारा वार्षिक अहवाल व त्यासोबत मध्येच पकडण्यात आलेल्या संदेशाची उपयुक्तता व महत्त्व यांचे सर्वसाधारण मूल्यनिर्धारण करणारे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन तयार करण्याची व्यवस्था करील.

(२) असा वार्षिक अहवाल, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या समाप्तीपासून तीन महिन्यांच्या आत राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर राज्य शासनाकडून मांडण्यात येईल :

परंतु, वार्षिक अहवालामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबी, राज्याच्या सुरक्षेस किंवा कोणत्याही संघटित गुन्हेगारीच्या प्रतिबंधास किंवा अन्वेषणास बाधक ठरत आहेत, असे राज्य शासनाचे मत झाल्यास राज्य शासन, अशा बाबी अशा वार्षिक अहवालामध्ये अंतर्भूत करण्यातून वगळू शकेल.

**२८. उच्च न्यायालयाचा नियम करण्याचा अधिकार :–**

उच्च न्यायालयास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या विशेष न्यायालयाशी संबंधित तरतुदी पार पाडण्यासाठी त्यास, आवश्यक वाटतील असे नियम करता येतील.

**२९. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार :–**

(१) कलम २८ अन्वये नियम करण्याचा उच्च न्यायालयाच्या अधिकारास बाधा न आणता, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा पूर्वेक्तानुसार, त्यानंतरची अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल तर व असा निर्णय ते राजपत्रात अधिसूचित करतील तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अमलात येईल किंवा यथास्थिती, मुळीच अमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या वैधतेस बाधा येणार नाही.

**३०. सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती :–**

(१) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अध्यादेश १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये, यथास्थिती, करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

---------

# ३८. महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स ) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१.

**सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५**

(दिनांक २१ सप्टेंबर १९८१ रोजी राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग चार मध्ये दिनांक २३ सप्टेंबर १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.)

**झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार यांच्या सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरतील अशा विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी त्या व्यक्तींच्या प्रतिबंधक स्थानबद्धतेविषयीची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही व्यक्तींच्या विघातक कृत्यांमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेला वेळोवेळी बाधा पोहोचत होती.

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात, विशेषकरून राज्याच्या नागरी क्षेत्रात, झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार यांसारख्या व्यक्ती कायद्याचा भंग करून ज्या प्रचंड प्रमाणावर आणि ज्या पद्धतीने समाजविघातक चोरट्या कारवाया करीत होत्या आणि त्या व्यक्तीची उत्पन्नाची साधने व त्यांचा प्रभाव या गोष्टींचा विचार करता, या तीन प्रकारच्या वर्गातील व्यक्तींच्या प्रतिबंधक स्थानबद्धतेची आणि तत्संबंधीची अन्य बाबींची तरतूद करण्यासाठी या राज्यात विशेष कायदा असावा म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक आहे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी दिनांक ११ जून १९८१ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अध्यादेश, १९८१ प्रख्यापित केला;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे आता राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, आता भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ :–**

(१) या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृक्श्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो ११ जून १९८१ रोजी अमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

**२. व्याख्या :–**

या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर;

(a) सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरेल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य म्हणजे–

(i) झोपडपट्टीदादाच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अथवा बाधा पोहोचण्याचा संभव असेल असे, झोपडपट्टीदादा म्हणून तो करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य;

(ii) हातभट्टीवाल्याच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अथवा बाधा पोहोचण्याचा संभव असेल असे हातभट्टीवाला म्हणून, तो करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य;

(iii) औषधी द्रव्यविषयक गुन्हेगाराच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अथवा बाधा पोचण्याचा संभव असेल असे, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार म्हणून, तो करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल, अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य;

(iv) धोकादायक व्यक्तींच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अथवा बाधा पोचण्याचा संभव असेल असे, धोकादायक व्यक्ती म्हणून, ती करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य;

(v) दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल किंवा बाधा पोहोचण्याचा संभव असेल असे दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती म्हणून ती करीत असेल किंवा करण्याच्या तयारीत असेल अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य.

(१९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याद्वारे हा नवीन खंड समाविष्ट करण्यात आला. महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, असाधारण दिनांक ११ डिसेंबर १९९६).

**स्पष्टीकरण :** या खंड (a) च्या प्रयोजनार्थ, जर या खंडात निर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही कृत्यामुळे इतर गोष्टीबरोबरच, प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे सर्वसाधारण जनतेची किंवा त्यातील काही घटकांची कोणतीही हानी होत असेल किंवा ती होण्याचा संभव असेल किंवा जनतेत धोका निर्माण होत असेल किंवा असा धोका होण्याचा संभव असेल किंवा जनतेत असुरक्षिततेची भावना निर्माण होत असेल किंवा अशी भावना निर्माण होण्याचा संभव असेल किंवा जीविताला वा आरोग्याला गंभीर किंवा विस्तृत प्रमाणावर धोका निर्माण होत असेल किंवा असा धोका निर्माण होण्याचा संभव असेल. किंवा संगीत कलाकृतीच्या किंवा चित्रपट कलाकृतीच्या विनापरवाना प्रती काढून आणि त्यांचे वितरण करून जनजीवनात अस्वच्छता निर्माण करीत असेल व त्यामुळे प्रशासनावरील विश्वास गमावला जात असेल, तर सार्वजनिक सुरक्षिततेला बाधा पोहोचली आहे अथवा बाधा पोचण्याचा संभव आहे असे समजण्यात येईल.

(b) हातभट्टीवाला म्हणजे, जी व्यक्ती मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ व त्याखालील नियम व आदेश यांच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून, कोणतेही मद्य, मादक औषधी किंवा अन्य मादक द्रव्य गाळत असेल, निर्माण करीत असेल, त्याचा साठा करीत असेल, ते वाहून नेत असेल, आयात करीत असेल, त्याची निर्यात करीत असेल, त्याची विक्री किंवा वाटप करीत असेल अथवा जी व्यक्ती जाणीवपूर्वक, वर नमूद केलेल्या गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट अन्य व्यक्तीकडून वा व्यक्तिमार्फत करून घेण्यासाठी किंवा

त्याच्या पुष्ट्यर्थ पैसे खर्च करीत असेल वा पैसा पुरवीत असेल किंवा कोणतेही जनावर, वाहन, जलयान वा वाहतुकीचे साधन किंवा कोणतेही पात्र वा इतर कोणतेही साहित्य पुरवीत असेल, किंवा जी व्यक्ती अशी कोणतीही गोष्ट करण्यासाठी अन्य कोणत्याही मार्गाने अपप्रेरणा देत असेल, ती व्यक्ती होय.

(b-i) ''धोकादायक व्यक्ती'' म्हणजे भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) प्रकरण १६ किंवा प्रकरण १७ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांपैकी कोणताही अपराध, किंवा शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) याच्या प्रकरण ५ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांपैकी कोणताही अपराध स्वत:च किंवा टोळीचा सदस्य अथवा प्रमुख म्हणून सराईतपणे करत असेल, किंवा करण्याचे प्रयत्न करत असेल अथवा करण्यासाठी अपप्रेरणा देत असेल अशी व्यक्ती;

(१९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याद्वारे हा नवीन खंड समाविष्ट करण्यात आला. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दिनांक ११ डिसेंबर १९९६).

(c) 'स्थानबद्धता आदेश' म्हणजे कलम ३ अन्वये काढलेला आदेश;

(d) 'स्थानबद्ध' म्हणजे, स्थानबद्धता आदेशान्वये स्थानबद्ध केलेली कोणतीही व्यक्ती;

(e) 'औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार' म्हणजे, जी व्यक्ती, औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० किंवा घातक औषधी द्रव्ये अधिनियम, १९३० यांच्या कोणत्याही तरतुदींचे अथवा दोहोपैकी कोणत्याही अधिनियमाखाली केलेल्या नियमांचे व आदेशांचे उल्लंघन करून किंवा त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याचे उल्लंघन करून, कोणतीही औषधी द्रव्य निर्माण करीत असेल, त्याचा साठा करीत असेल, ते आयात करीत असेल, त्याची निर्यात करीत असेल, त्याची विक्री किंवा वाटप करीत असेल अथवा एखाद्या वनस्पतीची लागवड करीत असेल, किंवा अन्य कोणतीही गोष्ट अन्य व्यक्तीकडून वा व्यक्तिमार्फत करून घेण्यासाठी किंवा त्याच्या पुष्ट्यर्थ पैसे खर्च करीत असेल किंवा ते पैसे पुरवीत असेल, किंवा जी व्यक्ती अशी कोणतीही गोष्ट करण्यास अन्य कोणत्याही मार्गाने अपप्रेरणा देत असेल, ती व्यक्ती होय;

तसेच घातक औषधी द्रव्य अधिनियम, १९३० यात 'घातक औषधी द्रव्य' या शब्दाच्या केलेल्या व्याख्येनुसार त्यामध्ये कोकोपत्ती, भांग व अफू आणि सर्व बनीव औषधी द्रव्ये यांचा समावेश होतो.

(f) 'झोपडपट्टीदादा' म्हणजे जी व्यक्ती, बेकायदेशीरपणे कोणत्याही जमिनीचा (मग ती जमीन शासनाच्या मालकीची असो किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या वा अन्य एखाद्या व्यक्तीच्या मालकीची असो) ताबा घेते किंवा अशा जमिनीत प्रवेश करते किंवा बेकायदेशीरपणे त्या जमिनीच्या संबंधात भाडेदारीचा अथवा संमती व परवानगीचा करार व अन्य कोणताही करार करते, किंवा जी व्यक्ती विकण्याच्या वा भाड्याने देण्याच्या उद्देशाने त्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम करते, किंवा अशा जमिनी कोणत्याही व्यक्तीला, भाड्याने अथवा संमती व परवानगी तत्त्वावर बांधकामासाठी किंवा त्यावरील अनधिकृत बांधकामाचा वापर वा भोगवटा करण्यासाठी देते, किंवा जी व्यक्ती, अशा जमिनीचा बेकायदेशीर ताबा घेण्याकरिता किंवा ज्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम करण्याकरिता दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला जाणीवपूर्वक पैशाची मदत देते, किंवा जी व्यक्ती अशा जमिनीवर राहणाऱ्या रहिवाश्यांकडून भाडे, भरपाई म्हणून किंवा इतर रकमा धाकदपटशाने वसूल करते वा वसूल करण्याचा प्रयत्न करते, किंवा जी व्यक्ती, कोणत्याही कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता तेथील भोगवटादारांना बळजबरीने हुसकावून लावते वा तसा प्रयत्न करते, किंवा जी व्यक्ती, वर नमूद केलेल्यापैकी कोणतीही गोष्ट करण्यास अन्य कोणत्याही मार्गाने अपप्रेरणा देते, ती व्यक्ती होय.

दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती म्हणजे, ज्या व्यक्तीविरुद्ध कॉपीराइट अधिनियम, १९५७ अन्वये चलचित्रपटाशी किंवा ध्वनिमुद्रणाशी संबंधित कॉपीराइटच्या उल्लंघनासाठी यापूर्वी किमान एक तरी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे आणि न्यायालयाने अशा अपराधाची दखल घेतलेली आहे; आणि जिने चलचित्रपट किंवा ध्वनिमुद्रण अथवा चित्रपटातील किंवा ध्वनिमुद्रणातील ध्वनिमुद्रणाचा कोणताही भाग यांच्या संबंधातील कॉपीराइटचे उल्लंघन करणारे व उक्त अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेले असे अपराध केले आहेत किंवा करण्याचा प्रयत्न केला आहे अथवा असे अपराध करण्याची अपप्रेरणा दिली आहे, ती व्यक्ती होय.

(g) 'अनधिकृत बांधकाम' म्हणजे महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये, महापालिका आयुक्तांची आणि अन्यत्र, जिल्हाधिकाऱ्यांची स्पष्ट लेखी परवानगी न घेता किंवा संबंधित क्षेत्रामध्ये त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार असेल त्या व्यतिरिक्त केलेले कोणतेही बांधकाम होय.

**३. विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्याचे आदेश देण्याचा अधिकार :–**

(१) सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरेल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य करण्यापासून एखाद्या व्यक्तीला प्रतिबंध करण्यासाठी त्या व्यक्तीला स्थानबद्ध करणे आवश्यक आहे याबद्दल राज्य शासनाची खात्री झाल्यास, राज्य शासनास, त्या व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात यावे असा निर्देश देणारा आदेश काढता येईल.

(२) जिल्हा दंडाधिकारी किंवा पोलीस आयुक्त त्यांच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीतील कोणत्याही क्षेत्रात प्रचलित असलेल्या किंवा प्रचलित होण्याचा संभव असलेल्या परिस्थितीचा विचार करता, तसे करणे आवश्यक आहे याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली, तर त्यास लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत अशा दंडाधिकाऱ्यास किंवा पोलीस आयुक्तासही पोट–कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याची खात्री झाल्यास उक्त पोट–कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करता येईल.

परंतु, या पोट–कलमान्वये राज्य शासनाने दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेली मुदत प्रथमत: तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. परंतु राज्य शासनास, तसे करणे आवश्यक आहे याबद्दल वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्याची खात्री झाल्यास, कोणत्याही एका वेळी जी तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा कोणत्याही कालावधीने अशा मुदतीत वेळोवेळी वाढ करण्यासाठी अशा आदेशात सुधारणा करता येईल.

(३) जेव्हा पोट–कलम (२) मध्ये नमूद केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने या कलमान्वये कोणताही आदेश काढला असेल तेव्हा त्याने ती गोष्ट ताबडतोब राज्य शासनाला कळविली पाहिजे आणि त्यासोबत, ज्या कारणास्तव तो आदेश काढला असेल ती कारणे आणि त्या प्रकरणाशी त्याच्या मते संबंधित असा अन्य तपशील कळविला पाहिजे आणि असा कोणताही आदेश दरम्यानच्या काळात राज्य शासनाकडून मान्य झाला नाही तर तो काढल्यापासून बारा दिवसांपेक्षा अधिक काळ अमलात राहणार नाही.

**४. स्थानबद्धता आदेशाची अंमलबजावणी :–**

स्थानबद्धता आदेश हा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये अटक अधिपत्राची अंमलबजावणी करण्यासंबंधी जी तरतूद करण्यात आलेली आहे त्याच रीतीने कोणत्याही ठिकाणी अमलात आणता येईल.

**५. स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती यांचे नियमन करण्याचा अधिकार :–:**

जिच्या बाबतीत स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल, अशी प्रत्येक व्यक्ती :

(a) राज्य शासन सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी आणि सुव्यवस्था, शिस्त आणि शिस्तभंगाबद्दलच्या शिक्षा यांबाबतच्या शर्ती धरून, अशा शर्तींनुसार स्थानबद्ध केली जाण्यास पात्र ठरेल, आणि

(b) राज्य शासनाच्या आदेशानुसार राज्यातील स्थानबद्धतेच्या एका ठिकाणाहून स्थानबद्धतेच्या अन्य ठिकाणी हलविली जाण्यास पात्र असेल.

**५–A. स्थानबद्धतेची कारणे वेगळी करता येण्याजोगी असणे :–**

ज्या बाबतीत कलम ३ खालील स्थानबद्धता आदेशानुसार एखाद्या व्यक्तीस दोन किंवा त्यापेक्षा अधिक कारणांच्या आधारे स्थानबद्ध करण्यात आलेले असेल त्या बाबतीत असा स्थानबद्धता आदेश हा अशा कारणांपैकी प्रत्येक कारणाच्या आधारे स्वतंत्रपणे काढण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार :

(a) असा आदेश, केवळ त्या कारणांपैकी एखादे कारण किंवा काही कारणे :

(i) मोघम,

(ii) अस्तित्वहीन,

(iii) असंबद्ध,

(iv) अशा व्यक्तींशी संबंधित किंवा प्रत्यक्षपणे संबंधित नसलेले आहे किंवा नसलेली आहेत म्हणून, किंवा

(v) कोणत्याही स्वरूपाच्या कोणत्याही अन्य कारणामुळे विधिग्राह्य आहे किंवा आहेत आणि म्हणून राज्य शासनाची किंवा असा आदेश काढणाऱ्या कलम ३ च्या पोट–कलम (२) मध्ये निर्देश केलेल्या अधिकाऱ्यांची उर्वरित कारणाच्या किंवा कारणांच्या संदर्भात कलम ३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे खात्री झाली असती व राज्य शासनाने किंवा त्या अधिकाऱ्याने स्थानबद्धतेचा आदेश काढला असता असे मानणे शक्य नाही, या कारणास्तव;

विधिअग्राह्य किंवा अप्रवर्तनीय असल्याचे मानण्यात येणार नाही.

(b) राज्य शासनाने किंवा स्थानबद्धतेचा आदेश काढणाऱ्या अशा अधिकाऱ्याने उर्वरित कारणाच्या किंवा कारणांच्या संदर्भात कलम ३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याची खात्री झाल्यानंतर उक्त कलमान्वये स्थानबद्धतेचा आदेश काढलेला आहे असे मानण्यात येईल.

**६. विवक्षित कारणांमुळे स्थानबद्धता आदेश विधिअग्राह्य किंवा अप्रवर्ती न ठरणे :–**

कोणताही स्थानबद्धता आदेश केवळ पुढील कारणांमुळे विधिअग्राह्य अथवा अप्रवर्ती ठरणार नाही :

(a) त्या स्थानबद्धता आदेशानुसार राज्यात स्थानबद्ध करावयाची व्यक्ती ही, तो आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रादेशिक अधिकारितेच्या हद्दीबाहेर आहे; किंवा

(b) अशा व्यक्तींच्या स्थानबद्धतेचे ठिकाण हे राज्याच्या हद्दीत असले तरी ते अधिकारितेच्या उक्त हद्दीबाहेर आहे.

**७. फरारी व्यक्तींच्या संबंधातील अधिकार :–**

(१) राज्य शासनास, किंवा कलम (३) च्या पोट–कलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्यास जर असे सकारण वाटले की, ज्या व्यक्तीच्या बाबतीत स्थानबद्धता आदेश काढण्यात आला आहे ती व्यक्ती फरारी झाली आहे, किंवा आदेशाची अंमलबजावणी होऊ नये म्हणून लपून राहिली आहे, तर अशा व्यक्तींच्या व तिच्या मालमत्तेच्या बाबतीत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलमे ८२ ते ८६ (दोन्ही धरून) च्या तरतुदी लागू होतील, मात्र ही गोष्ट या पोट–कलमात उल्लेखिलेल्या फेरबदलाच्या अधीन असेल आणि ती व्यक्ती नेहमी ज्या ठिकाणी राहात असेल ते ठिकाण कोठेही असले तरी त्या व्यक्तीच्या बाबतीत काढण्यात आलेला स्थानबद्धता आदेश हा सक्षम न्यायालयाने काढलेले अधिपत्र असल्याचे समजण्यात येईल. जेव्हा स्थानबद्धता आदेश राज्य शासनाकडून काढला जाईल तेव्हा, राज्य शासनाने या संदर्भात प्राधिकृत केलेल्या आणि जिल्हा अधिकाऱ्यास अथवा स्थानबद्धता

आदेश जेव्हा कलम ३ च्या पोट–कलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने काढलेला असेल तेव्हा, यथास्थिती, त्या अधिकाऱ्यास त्यांची सर्वसाधारण अधिकारिता कोणतीही असली तरी, अशा व्यक्तीसंबंधात उद्‌घोषणा करण्याबाबत व राज्याच्या कोणत्याही भागात असलेली त्या व्यक्तीची मालमत्ता जप्त करून ती विकण्याबाबत आणि उक्त कलमान्वये कोणतीही अन्य कार्यवाही करण्याबाबत उक्त संहितेची कलमे ८२, ८३, ८४ व ८५ याखालील सक्षम न्यायालयाचे सर्व अधिकार प्रदान करण्यात आल्याचे मानण्यात येईल. अशा कोणत्याही अधिकाऱ्याने, जप्त मालमत्ता परत करण्यासंबंधी केलेला अर्ज नाकारणारा कोणताही आदेश काढला असल्यास, त्या आदेशाविरुद्धचे अपील, उक्त संहितेच्या कलम ८६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, ती व्यक्ती नेहमी जेथे राहत असेल त्या जागेवर अधिकारिता असणाऱ्या सत्र न्यायालयाकडे दाखल केले पाहिजे.

(२) (a) पोट–कलम (१) मध्ये काहीही असले तरी, राज्य शासनाची किंवा कलम ३ च्या पोट–कलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्याची जर सकारण अशी खात्री होईल की, जिच्या बाबतीत स्थानबद्धता आदेश काढण्यात आला आहे ती व्यक्ती फरारी झाली आहे किंवा आदेशाची अंमलबजावणी होऊ नये म्हणून लपून राहिली आहे, तर राज्य शासनाने किंवा यथास्थिती उक्त अधिकाऱ्याने, शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे उक्त व्यक्तीस, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यासमोर अशा कालावधीमध्ये व अशा ठिकाणी हजर होण्याबद्दल निदेश दिला पाहिजे.

(b) जर अशा व्यक्तीने त्या आदेशाचे पालन करण्यात कसूर केली तर, तिला तो आदेश पाळणे शक्य नव्हते आणि आदेशात नमूद केलेल्या कालावधीत तिने, आदेशात नमूद केलेल्या अधिकाऱ्याला आदेशाचे पालन करणे आपल्याला का अशक्य होते याचे कारण आणि आपला ठावठिकाणा कळविला होता, हे त्या व्यक्तीने सिद्ध केलेले नसल्यास, किंवा आदेशात नमूद केलेले अधिकाऱ्याला तसे कळविणे आपल्याला शक्य नव्हते असे तिने सिद्ध केलेले नसल्यास त्या व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंतच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(c) उक्त संहितेत काहीही असले तरी खंड (b) खाली प्रत्येक गुन्हा दखलपात्र असेल.

**८. स्थानबद्धता आदेशाचा परिणाम होणाऱ्या व्यक्तींना त्या आदेशामागील कारणे सांगणे :–**

(१) जेव्हा एखाद्या व्यक्तीस स्थानबद्धता आदेशानुसार स्थानबद्ध करण्यात येईल तेव्हा, तो आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाने शक्य तेवढ्या लवकर, परंतु स्थानबद्ध केल्याच्या तारखेपासून पाच दिवसांपेक्षा उशिरा नसेल अशा दिवशी त्या व्यक्तीला तो आदेश ज्या कारणास्तव काढण्यात आला असेल ती कारणे कळविली पाहिजेत आणि त्या आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे निवेदन सादर करण्याची लवकरात लवकरची संधी दिली पाहिजे.

(२) पोट–कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, प्राधिकरणाला ज्या गोष्टी उघड करणे सार्वजनिक हिताच्या विरुद्ध आहे असे वाटत असेल त्या गोष्टी उघड करणे त्यास आवश्यक असणार नाही.

**९. सल्लागार मंडळाची रचना :–**

(१) राज्य शासनाने, आवश्यक असेल तेव्हा, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी एक किंवा यापेक्षा अधिक सल्लागार मंडळाची रचना केली पाहिजे.

(२) जे कोणत्याही उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आहेत किंवा ज्यांनी असे न्यायाधीश म्हणून काम केलेले आहे किंवा जे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून होण्यासाठी भारतीय संविधानानुसार पात्र आहेत, अशा एक सभापती व दोन अन्य सदस्यांचे मिळून प्रत्येक मंडळ होईल.

**१०. सल्लागार मंडळाकडे निर्देश करणे :–**

या अधिनियमान्वये स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशा प्रत्येक प्रकरणात सदर आदेशान्वये एखाद्या व्यक्तीला

स्थानबद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन आठवड्यांच्या आत ज्या कारणांमुळे आदेश काढण्यात आला असेल ती कारणे आणि त्या आदेशाचा परिणाम झालेल्या व्यक्तीने कोणतेही अभिवेदन केलेले असल्यास ते अभिवेदन आणि उक्त आदेश एखाद्या अधिकाऱ्याने काढलेला असेल अशा प्रकरणी, अशा अधिकाऱ्याने कलम ३ पोट–कलम (३) अन्वये तयार केलेला अहवाल राज्य शासनाने कलम ९ अन्वये रचना केलेल्या सल्लागार मंडळापुढे ठेवला पाहिजे.

**११. सल्लागार मंडळाच्या कामकाजांची कार्यपद्धती :–**

(१) सल्लागार मंडळाने त्यांच्यासमोर ठेवण्यात आलेल्या सामग्रीचा विचार केल्यानंतर आणि राज्य शासनाकडून किंवा शासनामार्फत त्या प्रयोजनासाठी बोलावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संबंधित व्यक्तीकडून त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती मागविल्यानंतर, आणि कोणत्याही विवक्षित प्रकरणात सल्लागार मंडळास तसे करणे आवश्यक वाटत असेल तर, किंवा संबंधित व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची इच्छा असेल तर, जातीने तिची बाजू ऐकून घेतल्यानंतर, संबंधित व्यक्तीस स्थानबद्ध केल्याच्या तारखेपासून सात आठवड्यांच्या आत, आपला अहवाल राज्य शासनाला सादर केला पाहिजे.

(२) सल्लागार मंडळाच्या अहवालात संबंधित व्यक्तीस स्थानबद्ध करण्यास पुरेसे कारण आहे किंवा नाही याविषयीचे सल्लागार मंडळाचे मत अहवालाच्या एका स्वतंत्र भागात नमूद केले पाहिजे.

(३) जेव्हा सल्लागार मंडळात समाविष्ट असलेल्या सदस्यांचे मतैक्य होत नसेल, तेव्हा अशा सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांचे मत हे मंडळाचे मत असल्याचे मानण्यात येईल.

(४) सल्लागार मंडळाचे कामकाज आणि त्याचा अहवाल, ज्या भागात सल्लागार मंडळाचे मत नमूद करण्यात आलेले असेल तो अहवालाचा भाग वगळता, गोपनीय असेल.

(५) जिच्याविरुद्ध स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे सल्लागार मंडळाकडे करण्यात आलेल्या निर्देशाशी संबंधित अशा कोणत्याही प्रकरणात कोणत्याही विधिव्यवसायीद्वारे आपली बाजू मांडण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

**१२. सल्लागार मंडळाच्या अहवालावरील कार्यवाही :–**

(१) एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यास सल्लागार मंडळाच्या मते पुरेसे कारण आहे असे त्याने कळविले असेल अशा बाबतीत राज्य शासनाने, स्थानबद्धता आदेश कायम केला पाहिजे आणि कलम १३ द्वारे विहित करण्यात आलेल्या कालावधीपेक्षा अधिक नसेल अशा त्यास योग्य वाटेल अशा कालावधीसाठी, संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता पुढे चालू ठेवली पाहिजे.

(२) संबंधित व्यक्तीला स्थानबद्ध करण्यास सल्लागार मंडळाच्या मते पुरेसे कारण नाही असे सल्लागार मंडळाने कळविले असेल अशा बाबतीत, राज्य शासनाने स्थानबद्धता आदेश रद्द केला पाहिजे आणि त्या व्यक्तीला तात्काळ सोडून देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**१३. स्थानबद्धतेचा कमाल कालावधी :–**

या अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या आणि कलम १२ अन्वये कायम करण्यात आलेल्या अशा कोणत्याही स्थानबद्धता आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्धतेत ठेवता येण्याचा कमाल कालावधी हा स्थानबद्धतेच्या तारखेपासून बारा महिने इतका असेल.

**१४. स्थानबद्धता आदेश रद्द करणे :–**

(१) मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २१ च्या तरतुदीस बाधा न आणता, राज्य शासनाला,

कोणत्याही वेळी एखादा स्थानबद्धता आदेश, तो आदेश कलम ३ च्या पोट–कलम (२) मध्ये नमूद करण्यात आलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने दिलेला असला तरीही रद्द करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येतील.

(२) स्थानबद्धता आदेश रद्द केल्याच्या किंवा त्याची मुदत समाप्त झाल्याच्या तारखेनंतर अशी कोणतीही नवीन घटना घडली असेल की, जिच्यामुळे त्याच व्यक्तीविरुद्ध नवीन स्थानबद्धता आदेश काढण्यात यावा याबाबत राज्य शासनाची किंवा एखाद्या अधिकाऱ्याची खात्री झाली असेल अशा कोणत्याही बाबतीत, एखादा स्थानबद्धता आदेश रद्द किंवा समाप्त झाल्यामुळे, त्याच व्यक्तीविरुद्ध कलम ३ अन्वये नवीन स्थानबद्धता आदेश काढण्यास प्रतिबंध होणार नाही.

**टीप :** मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २१ मध्ये असलेली तरतूद पुढीलप्रमाणे आहे:

‘कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये अधिसूचना काढण्याचा, आदेश देण्याचा, नियम किंवा उपविधी करण्याचा अधिकार देण्यात येईल, तेव्हा त्या अधिकारामध्ये अशा काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत, दिलेल्या कोणत्याही आदेशात, केलेल्या कोणत्याही नियमात किंवा कोणत्याही उपविधीत जादा मजकूर दाखल करण्याच्या, त्यात सुधारणा करण्याच्या, त्यात फेरफार करण्याच्या किंवा ते विखंडित करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो, परंतु असा अधिकार वरील अधिकाराप्रमाणे वापरण्यात येईल आणि तो तशाच मंजुरीस आणि शर्तीस (तशा शर्ती असल्यास) अधीन असेल.’

**१५. स्थानबद्ध व्यक्तींची तात्पुरती सुटका :–**

(१) राज्य शासनाला कोणत्याही वेळी असे निदेश देता येतील की, एखाद्या स्थानबद्धता आदेशानुसार स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीसाठी, एक तर बिनशर्त किंवा त्या व्यक्तीने मान्य केल्या असतील अशा, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तीवर सुटका करता येईल आणि कोणत्याही वेळी, त्याची सुटका रद्द करता येईल.

(२) पोट–कलम (१) अन्वये कोणत्याही स्थानबद्ध व्यक्तीच्या सुटकेबाबतचे निदेश देताना, राज्य शासनाने निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तीच्या योग्य पालनासाठी त्याला जामिनासह किंवा जामिनाशिवाय बंधपत्र करून देण्यास फर्माविले पाहिजे.

(३) पोट–कलम (१) अन्वये सुटका केलेल्या कोणत्याही व्यक्तीने यथास्थिती, तिच्या सुटकेबाबतच्या किंवा यथास्थिती सुटका रद्द करणारे निदेश देणाऱ्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आली असेल अशा वेळी, अशा जागी आणि अशा प्राधिकरणासमोर हजर झाले पाहिजे.

(४) कोणतीही व्यक्ती पोट–कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने हजर होण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील तर, अपराधसिद्धीनंतर ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेच्या किंवा दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांना पात्र होईल.

(५) पोट–कलम (१) अन्वये सुटका करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती उक्त पोट–कलमान्वये किंवा तिने केलेल्या बंधपत्रान्वये तिच्यावर लादलेल्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर करील तर, ते बंधपत्र जप्त करण्यात आल्याचे घोषित करण्यात येईल आणि त्याद्वारे बांधील असलेली कोणतीही व्यक्ती त्याबद्दलची शास्ती देण्यास पात्र ठरेल.

**१६. सद्भावनेने केलेल्या कृतीचे संरक्षण :–**

या अधिनियमानुसार सद्हेतूने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी राज्य शासन किंवा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**१७. कोणताही झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाला किंवा औषधी द्रव्याच्या संबंधातील गुन्हेगार किंवा धोकादायक व्यक्ती यांच्याविरुद्धचे स्थानबद्धता आदेश राष्ट्रीय सुरक्षा अधिनियमाखाली न काढता ते या अधिनियमाखाली काढणे :–**

(a) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिवशी आणि त्यानंतर कोणताही झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाला किंवा औषधी द्रव्यांच्या संबंधातील गुन्हेगार यांच्या बाबतीत;

(b) महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार यांच्या घातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९९६, यांच्या प्रारंभाच्या दिवशी आणि त्यानंतर, कोणत्याही धोकादायक व्यक्तीच्या बाबतीत, आणि

(c) महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २००९ याच्या प्रारंभाच्या दिवशी आणि त्यानंतर कोणत्याही दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत,

सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरेल अशा कोणत्याही रीतीने कृती करण्यास तिला प्रतिबंध करण्यासाठी, या अधिनियमान्वये अशा व्यक्तीविरुद्ध स्थानबद्धता आदेश काढता येत असेल किंवा काढणे शक्य असेल त्या बाबतीत, राज्य शासनाकडून किंवा राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, १९८० खालील त्याच्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्यांकडून, त्या अधिनियमान्वये स्थानबद्धता आदेश काढण्यात येणार नाही.

(१९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९) याद्वारे मूळ कलम १७ ऐवजी नवीन कलम १७ दाखल करण्यात आले. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार, दिनांक ११ डिसेंबर १९९(६).

**१८. सन १९८१ चा महाराष्ट्र क्र. ३ याचे निरसन व व्यावृत्ती :**

(१) महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार यांच्या घातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अध्यादेश, १९८१ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (काढलेला कोणताही आदेश धरून) ही यथास्थिती, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

---------

# ३९. ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २०००

पर्यावरण (संरक्षण) अधिनियम , १९८६ (१९८६ चा २९) याच्या कलम ३ च्या पोटकलम (२) च्या खंड (ii), कलम ६ चे पोटकलम (१) व पोटकलम (२) चा खंड (b) आणि कलम २५, तसेच पर्यावरण (संरक्षण) नियम १९८६ याचा नियम ५ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्र शासन याद्वारे, आवाज उत्पन्न करणाऱ्या आणि निर्माण करणाऱ्या साधनांचे विनियमन आणि नियंत्रण करण्यासाठी पुढील नियम करीत आहे.

**१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ :–**

(१) या नियमांना, ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २००० असे म्हणावे.

(२) ते शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील तेव्हापासून अमलात येतील.

**२. व्याख्या :–**

या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

(a) ''अधिनियम'' म्हणजे, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१९८६ चा २९).

(b) ''क्षेत्र/झोन '' म्हणजे, या नियमांना जोडलेल्या अनुसूचीमध्ये देण्यात आलेल्या चार प्रवर्गापैकी प्रत्येक प्रवर्गामध्ये येणारी सर्व क्षेत्रे.

(c) ''प्राधिकरण'' म्हणजे केंद्र शासनाने किंवा यथास्थिती, राज्य शासनाने तेव्हा अमलात असणाऱ्या कायद्यांनुसार प्राधिकृत केलेला कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी आणि त्यात जिल्हा दंडाधिकारी, पोलीस आयुक्त किंवा त्या–त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आवाजाच्या संबंधात सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा राखण्यासाठी पदनिर्देशित केलेला पोलीस उपअधीक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही इतर अधिकारी यांचा समावेश होतो.

(d) ''न्यायालय'' म्हणजे विवादांचा अभिनिर्णय करण्यासाठी आणि न्यायदान करण्यासाठी बैठकीत पीठासीन असणाऱ्या एका किंवा अधिक न्यायाधीशांचा समावेश असलेले शासकीय मंडळ आणि त्यात एक किंवा अनेक न्यायाधीश किंवा दंडाधिकारी यात पीठासीन असतात अशा आणि दिवाणी, करविषयक आणि फौजदारी प्रकरणात न्यायाधिकरणे म्हणून काम करतात अशा कोणत्याही न्यायालयांचा समावेश होतो.

(e) ''शैक्षणिक संस्था'' म्हणजे शाळा, विद्यालय (सेमिनरी), महाविद्यालय, विद्यापीठ, व्यावसायिक अकादमी, प्रशिक्षण संस्था किंवा इतर शैक्षणिक आस्थापना – मात्र त्या चार्टर्ड संस्था असल्याच पाहिजेत असे नाही. आणि त्यात अशा संस्थांच्या केवळ इमारतींचाच समावेश होतो असे नाही तर शैक्षणिक अनुदेशांची पूर्ण व्याप्ती साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व मैदानांचा तसेच मानसिक, शारीरिक आणि नैतिक विकासासाठी आवश्यक असलेल्या अशा गोष्टींचाही त्यात समावेश होतो.

(f) ''रुग्णालय'' म्हणजे आजारी, जखमी, विकलांग किंवा वृद्ध व्यक्तींना स्वीकारण्यासाठी आणि त्यांची काळजी घेण्यासाठी असलेली संस्था आणि त्यात शासकीय किंवा खाजगी रुग्णालये, परिचर्या गृहे आणि चिकित्सालये यांचा समावेश होतो.

(g) ''व्यक्ती'' या संज्ञेमध्ये कोणतीही कंपनी किंवा संघटना किंवा व्यक्तींचा संघ यांचा समावेश होतो. मग तो कायद्याने संस्थापित केलेला असो वा नसो.

(h) ''राज्य शासन '' यांचा संघराज्य क्षेत्र याच्या संबंधातील अर्थ संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त केलेला त्या भागाचा प्रशासक असा आहे.

**३. वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी/झोनसाठी आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा :–**

(१) वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी/ झोनसाठी आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा, या नियमांना जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे असेल.

(२) वेगवेगळ्या क्षेत्रासाठी आवाजाच्या दर्जाच्या कार्यान्वयनाच्या प्रयोजनासाठी औद्योगिक, वाणिज्यिक, निवासी किंवा शांतता क्षेत्र/झोन यामधील क्षेत्राची राज्य शासन जिल्हेवारी करील.

(३) राज्य शासन आवाजासाठी तसेच वाहनाच्या हालचालीमधून निर्माण होणाऱ्या आवाजासाठी अपप्रेरणा देण्याच्या बाबतीत उपाययोजना करील आणि सध्याच्या आवाजाच्या पातळ्या या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सभोवतालच्या हवेच्या, गुणवत्तेच्या दर्जापेक्षा अधिक होणार नाही याची सुनिश्चिती करील.

(४) सर्व विकास प्राधिकरण, स्थानिक मंडळे आणि इतर संबंधित प्राधिकरणे विकास विषयक कार्यक्रमांचे नियोजन करतांना किंवा नगर नियोजन आणि देश नियोजन यांच्याशी संबंधित कार्ये पार पाडताना ध्वनी उपद्रव टाळण्यासाठी आणि आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा टिकवून ठेवणे साध्य करण्यासाठी जीवनाच्या गुणवत्तेचा पॅरामीटर म्हणून ध्वनिप्रदूषणाच्या सर्व बाजू विचारात घेईल.

(५) रुग्णालये, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांच्या सभोवतालच्या सुमारे १०० मीटरपेक्षा कमी नसेल अशा क्षेत्राला या नियंत्रणाच्या प्रयोजनासाठी शांतता क्षेत्र/झोन म्हणून घोषित करता येईल.

**४. ध्वनिप्रदूषण नियंत्रण उपाययोजना अमलात आणण्याची जबाबदारी :–**

(१) कोणत्याही शांतता क्षेत्रातील/झोनमधील आवाजाची पातळी अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेतील गुणवत्तेच्या दर्जापेक्षा अधिक असणार नाही.

(२) ध्वनिप्रदूषण नियंत्रण उपाययोजना अमलात आणण्यासाठी आणि आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेतील गुणवत्तेच्या दर्जाचे अनुपालन करण्यासाठी प्राधिकरण जबाबदार असेल.

**५. लाऊडस्पीकर (ध्वनिक्षेपक) सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांच्या वापरातील निर्बंध :–**

(१) प्राधिकरणाकडून लेखी परवानगी घेण्यात आल्याखेरीज लाऊडस्पीकर्स किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांचा वापर करण्यात येणार नाही.

(२) रात्री १० ते पहाटे ६ या दरम्यानच्या काळात संपर्क यंत्रणा असलेल्या बंदिस्त जागा म्हणजे प्रेक्षागृह, कॉन्फरन्स रूम, समाज मंदिर (कम्युनिटी हॉल), बँक्वीट हॉल या खेरीज अन्य ठिकाणी ध्वनिक्षेपकाचा किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणांचा वापर करण्यात येणार नाही.

(३) पोटनियम २ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनाला, ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक आहेत अशा अटी व शर्ती यांना अधीन राहून कोणत्याही सांस्कृतिक किंवा धार्मिक सणाच्या प्रसंगी एका पूर्ण कॅलेंडर वर्षात एकूण पंधरा दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा मर्यादित कालावधीसाठी रात्रीच्या वेळी (रात्री १० ते रात्री १२ च्या दरम्यान) लाऊडस्पीकर्स किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांचा वापर करण्यास परवानगी देता येईल.

**६. शांतता क्षेत्राचा/झोनचा कोणताही भंग केल्याचा परिणाम :–**

जो कोणी, शांतता क्षेत्र/झोन मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही ठिकाणी पुढीलपैकी कोणताही अपराध करील तो अधिनियमाच्या तरतुदींनुसार असलेल्या शास्तीस पात्र ठरेल.

(i) कोणतेही संगीत लावणे किंवा कोणत्याही ध्वनिवर्धक यंत्राचा वापर करणे.

(ii) ड्रम किंवा टमटम वाजविणे किंवा संगीतयुक्त किंवा दाबयुक्त हॉर्न वाजविणे.

(iii) गर्दीला आकर्षित करील अशा स्वरूपाची नक्कल किंवा इतर कार्यक्रम करणे.

**७. प्राधिकरणाकडे तक्रार करणे :–**

(१) जर आवाजाची पातळी सभोवतालच्या आवाजाच्या दर्जाच्या पातळीपेक्षा १० डेसिबल (ए) ने किंवा कोणत्याही क्षेत्राच्या/झोनच्या समोरच्या संबंधित स्तंभामध्ये देण्यात आल्यापेक्षा अधिक झाली असेल तर, एखाद्या व्यक्तीला त्यांच्याविरुद्ध प्राधिकरणाकडे तक्रार करता येईल.

(२) प्राधिकरण त्या तक्रारीवर कृती करील आणि भंग करणाऱ्या विरुद्ध या नियमांच्या आणि अमलात आलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**८. संगीताचा आवाज किंवा ध्वनी चालू ठेवण्यास प्रतिबंध इ. करण्याचे अधिकार :–**

(१) पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा त्याच्याकडून मिळालेल्या इतर माहितीवरून, त्रास, उपद्रव, अस्वस्थता किंवा क्षती यांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्रास, उपद्रव, अस्वस्थता किंवा क्षती यांपासून लोकांना किंवा त्यांच्या सान्निध्यात राहणाऱ्या किंवा मालमत्ता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला असलेल्या धोक्यापासून प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे, याबाबत प्राधिकरणाचे समाधान झाले असेल तर, त्याला

(a) कोणत्याही जागेत किंवा जागेवर

(i) कोणतेही गायन किंवा वाद्य संगीत

(ii) सार्वजनिक ध्वनिक्षेपण यंत्रणा, साधने किंवा उपकरणे किंवा आवाज निर्माण करण्यास किंवा पुन्हा सादर करण्यास सक्षम असणाऱ्या यंत्रकाला चालवून, ठोकून, एकमेकांवर आपटून किंवा फुंकून किंवा लाऊडस्पिकरसह कोणत्याही उपकरणाचा वापर करून आवाज निर्माण करणे किंवा

(b) याच्या परिणामी किंवा याच्यामुळे आवाज निर्माण होईल असा कोणताही व्यापार, उपव्यवसाय, कामकाज किंवा प्रक्रिया कोणत्याही जागेत किंवा जागेवर पार पाडणे.

याला प्रतिबंध करणे, मना करणे, त्याचे नियंत्रण करणे किंवा विनियमन करणे यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही व्यक्तीला लेखी आदेशाद्वारे देता येतील.

(२) पोटनियम (१) अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकरणाला, एकतर स्वाधिकारे किंवा पोटनियम(१) खालील काढण्यात आलेल्या आदेशामुळे बाधित झालेल्या व्यक्तीने केलेल्या अर्जावरून एक तर असा कोणताही आदेश विखंडित करता येईल. त्यात फेरबदल करता येतील.

परंतु असे की, असा कोणताही अर्ज निकालात काढण्यापूर्वी उक्त प्राधिकरण त्या अर्जदाराला एकतर स्वत: जातीने किंवा त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिमार्फत त्या प्राधिकरणासमोर अशा आदेशाविरोधात कारणे दाखविण्यासाठी हजर होण्याची संधी देईल आणि जर त्याने ते अर्ज पूर्णपणे किंवा अंशत: फेटाळला असेल तर त्याची जागा नाकारण्याची कारणे अभिलिखित करील.

–––––––

# ४०. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनामधील) हितसंबंधाचे रक्षण करण्याबाबत अधिनियम, १९९९


| कलम | कशावर आहे? |
|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ |
| २. | व्याख्या |
| ३. | वित्तीय आस्थापनेने केलेली कपटपूर्ण कसूर |
| ४. | ठेवी परत करण्यात कसूर केल्यास मालमत्ता जप्त करणे |
| ५. | सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक |
| ६. | विशेषित न्यायालय |
| ७. | जप्तीविषयीचे विशेषित न्यायालयाचे अधिकार |
| ८. | असद्‌भावी हस्तांतरिणीची मालमत्ता जप्त करणे |
| ९. | जप्तीऐवजी प्रतिभूती देणे |
| १०. | जप्त केलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन |
| ११. | अपील |
| १२. | विशेष सरकारी अभियोक्ता |
| १३. | अपराधाच्या बाबतीत विशेषित न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार |
| १४. | अधिनियम अन्य कायद्यांवर अधिभावी ठरणे |
| १५. | सद्‌भावपूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण |
| १६. | नियम करण्याचा अधिकार |
| १७. | अडचणी दूर करण्याचा अधिकार |
| १८. | सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३४ चे निरसन व व्यावृत्ती |

# महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनांमधील) हितसंबंधाचे रक्षण करण्याबाबत अधिनियम १९९९

**(सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६)**

## (Maharashtra Protection of Interest of Depositors in Financial Establsihments) Act, 1999)

**(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर ''महाराष्ट्र शासन राजपत्रात'' दिनांक २१ जानेवारी २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)**

**वित्तीय आस्थापनांच्या ठेवीदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २९ एप्रिल १९९९ रोजी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनांमधील) हितसंबंधांचे रक्षण अध्यादेश १९९९ (यात यापुढे याचा निर्देश) ''उक्त अध्यादेश '' असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता.

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर राज्य विधानमंडळाची सत्र समाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर १९९९ रोजी झाल्यामुळे उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत वेळेअभावी प्रस्तुत करता आले नव्हते.

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) या तरतुदीनुसार उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवडयांचा कालावधी या तारखेस संपतो, त्या ३ डिसेंबर १९९९ या तारखेनंतर असल्याचे बंद झाले असते.

**आणि ज्याअर्थी** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी कायद्याद्वारे प्रचलित असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटले होते.

**आणि त्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे, अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी उक्त अध्यादेशांच्या तरतुदी प्रचलित असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जिमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती. आणि म्हणून उक्त अध्यादेश मागे घेऊन त्याचे निरसन करण्यात आले होते आणि दिनांक २ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे रक्षण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश १९९९हा भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक २९ एप्रिल १९९९ पासून प्रस्थापित केला होता.

**आणि ज्या अर्थी** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) च्या परंतुकान्वये राष्ट्रपतींकडून अनुदेश प्राप्त झाले आहेत.

**आणि त्याअर्थी** महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ याचे राज्य विधान मंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे.

**त्या अर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :–**

(१) या अधिनियमास, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे रक्षण अधिनियम १९९९ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २९ एप्रिल १९९९ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२. व्याख्या :–**

या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(a) ''सक्षम प्राधिकारी'' याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे.

(b) ''विशेष न्यायालय'' याचा अर्थ, कलम ६ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेले विशेष न्यायालय, असा आहे.

(c) ''ठेव'' या शब्दप्रयोगामध्ये, कोणत्याही वित्तीय संस्थेचे, व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरुपातील कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय एका विनिर्दिष्ट मुदतीनंतर किंवा अन्यथा, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात किंवा एखाद्या विनिर्दिष्ट सेवेच्या स्वरूपात परत करण्यात यायचा घेतलेला कोणताही पैसा किंवा स्वीकारलेली कोणतीही मौल्यवान वस्तू यांचा समावेश होतो आणि त्यांच्या नेहमीचा तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल. परंतु यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश नसेल.

(i) भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळ अधिनियम १९९२ या अन्वये स्थापना करण्यात आलेल्या भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळाने (सेबी) घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि केलेले विनियम यांच्या कक्षेत येणाऱ्या भाग – भांडवलाद्वारे किंवा ऋणपत्र, रोखा किंवा कोणताही अन्य संलेख याद्वारे उभारलेली रक्कम.

(ii) एखाद्या भागीदारी संस्थेच्या भागीदारांनी भांडवल म्हणून दिलेल्या रकमा.

(iii) अनुसूचित बँक किंवा सहकारी बँक किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम १९४९ याच्या कलम ५, खंड (a) यामध्ये व्याख्या केलेली कोणतीही अन्य बँक, व्यवसाय कंपनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या रकमा.

(iv) (a) भारतीय औद्योगिक विकास बँक,

(b) राज्य वित्तीय महामंडळ,

(c) भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम १९६४ याच्या कलम ६–A मध्ये किंवा त्या अन्वये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वित्तीय संस्था किंवा

(d) या बाबतीत शासन विनिर्दिष्ट करील अशी अन्य कोणतीही संस्था, यांच्याकडून प्राप्त झालेली कोणतीही रक्कम.

(v) झालेली कोणतीही रक्कम

(a) प्रतिभूती ठेव

(b) डिलरशिप ठेव

(c) इसाऱ्याची रक्कम

(d) माल किंवा सेवा यांच्या नोंदविण्यात आलेल्या मागणीसंबंधात आगाऊ दिलेली रक्कम, या स्वरूपात प्राप्त झालेल्या रकमा.

(vi) राज्यात त्यावेळी अमलात असलेल्या, सावकारी व्यवसायाशी संबंधित एखाद्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेली एखादी व्यक्ती किंवा निगम निकाय नसलेली एखादी व्यवसाय संस्था किंवा व्यक्तींच्या संघ यांच्याकडून प्राप्त झालेली कोणतीही रक्कम आणि

(vii) चिट–फंडाच्या बाबतीत वर्गणीच्या मार्गाने प्राप्त झालेली कोणतीही रक्कम.

**स्पष्टीकरण एक –** 'चिट फंड' या शब्दप्रयोगाला चिट फंड अधिनियम १९८२ याच्या कलम २, खंड (b) मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल.

**स्पष्टीकरण दोन –** एखाद्या मालमत्तेच्या (जंगम किंवा स्थावर) विक्रीवर, विक्रेत्याने खरेदीदाराला दिलेली पतउधारी (क्रेडिट) ही या खंडाच्या प्रयोजनार्थ ठेव म्हणून मानण्यात येणार नाही.

(d) 'वित्तीय संस्था' याचा अर्थ, कोणतीही योजना किंवा व्यवस्था याअन्वये किंवा कोणत्याही अन्य रीतीने, ठेवी स्वीकारणारी कोणतीही व्यक्ती, असा आहे. परंतु त्यात राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या मालकीच्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या महामंडळाच्या किंवा सहकारी संस्थेचा किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम १९४९ याच्या कलम ५ खंड (a) अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या बँक व्यवसाय कंपनीचा समावेश होत नाही.

(e) 'शासन' याचा अर्थ, महाराष्ट्र शासन.

**३. वित्तीय आस्थापनेने केलेली कपटपूर्ण कसूर :–**

जिने अभिवचन दिल्याप्रमाणे मुदत संपल्यानंतर व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील कोणत्याही लाभासह ठेवींची कोणतीही परतफेड करण्यात कपटपूर्ण रीतीने कसूर केली असेल किंवा आश्वासन दिल्याप्रमाणे ठेवीच्या बदल्यात सेवा देण्यात कपटपूर्ण रीतीने कसूर केली असेल, अशा कोणत्याही वित्तीय आस्थापनेस अशा वित्तीय व्यवस्थापनास किंवा तिचा धंदा अथवा कामकाज चालविण्यास जबाबदार असलेल्या प्रवर्तक, आस्थापनेचा भागीदार, संचालक, व्यवस्थापक किंवा कोणतीही अन्य व्यक्ती किंवा कर्मचारी यांसह, प्रत्येक व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर सहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची आणि एक लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि अशी वित्तीय आस्थापनादेखील एक लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण –** या कलमाच्या प्रयोजनार्थ या वित्तीय आस्थापनेने अभिवचन दिल्याप्रमाणे व्याज, लाभांश, फायदा, यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील अशा लाभांसह अशा ठेवीची परतफेड करण्यात कसूर केली असेल किंवा अशा ठेवीच्या बदल्यात कबूल केलेली कोणतीही विनिर्दिष्ट सेवा देण्यास कसूर केली असेल किंवा एखाद्या व्यक्तीला अन्याय्य लाभ देण्याच्या हेतूने किंवा अन्य एखाद्या व्यक्तीची अन्याय्य हानी करण्याच्या हेतूने ठेवीच्या बदल्यात कबूल केलेली कोणतीही विशिष्ट सेवा देण्यास कसूर केली असेल किंवा अशी ठेव स्वीकारताना दिलेल्या अव्यवहार्य किंवा व्यापारीदृष्ट्या व्यवहार्य नसलेल्या अभिवचनामधून उद्भवणाऱ्या किंवा अशा ठेवीमधून संपादन करण्यात आलेला पैसा किंवा मालमत्ता, आवश्यक तेव्हा त्या परत मिळविण्यात यामध्ये अंगभूत जोखीम अंतर्भूत असेल अशा रीतीने उपयोगात आणल्यामुळे उद्भवणाऱ्या तिच्या असमर्थतेमुळे अशी

कसूर केली असेल त्या वित्तीय आस्थापनेने कपटपूर्ण रीतीने अशी कसूर केली असल्याचे किंवा विशिष्ट सेवा देण्यात कसूर केली असल्याचे मानण्यात येईल.

**४. ठेवी परत करण्यात कसूर केल्यास मालमत्ता जप्त करणे :–**

(१) त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी

(i) ठेवीदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्यावर किंवा अन्यथा शासनाची अशी खात्री पटली असेल की, कोणतीही वित्तीय आस्थापना

(a) मुदत संपल्यानंतर किंवा ठेवीदारांची मागणी केल्यावर ठेव परत करण्यात, किंवा

(b) व्याज किंवा आश्वासन दिलेला इतर लाभ देण्यात, किंवा

(c) अशा ठेवीच्या बदल्यात देण्याचे अभिवचन दिलेली सेवा पुरविण्यात कसूर करीत आहे व त्याबाबतीत किंवा

(ii) कोणतीही वित्तीय आस्थापना ठेवीदारांची फसवणूक करण्याच्या इराद्याने त्यांच्या हितसंबंधास हानिकारक ठरेल अशा रितीने बुद्धिपुरस्सरपणे काम करीत आहे. असे शासनाला कारण वाटत असेल तर त्या बाबतीत

आणि अशी वित्तीय आस्थापना ठेवी परत करण्याची किंवा आश्वासन दिलेले व्याज किंवा इतर लाभ देण्याच्या किंवा यांच्या बदल्यात या ठेवी स्वीकारण्यात आल्या त्या सेवा पुरविण्याची शक्यता नाही अशी शासनाची खात्री पटली असेल तर, शासनास, अशा वित्तीय आस्थापनांमधील ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी, त्यांची कारणे लेखी नमूद केल्यानंतर, अशा वित्तीय आस्थापनेने गोळा केलेल्या ठेवींमधून स्वतःच्या नावाने किंवा कोणत्याही अन्य व्यक्तींच्या नावाने संपादन केला असल्याचा मानण्यात येणारा पैसा किंवा अन्य मालमत्ता किंवा असा पैसा किंवा अन्य मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवीची परतफेड करण्यासाठी पुरेशी नाही असे त्यास दिसून आले तर, उक्त वित्तीय आस्थापनेची किंवा तिच्या प्रवर्तक, संचालक, भागीदार किंवा आस्थापक किंवा सदस्य यांची शासनाला योग्य वाटेल अशी अन्य मालमत्ता जप्त करण्याचा आदेश राजपत्रात प्रसिद्ध करून देता येईल.

(२) पोट–कलम (१) अन्वये आदेश प्रसिद्ध झाल्यावर त्यामध्ये निर्देशिलेली वित्तीय आस्थापना आणि व्यक्ती यांच्या सर्व मालमत्ता आणि मत्ता, विशेषित न्यायालयाकडून पुढील आदेश होईपर्यंत, शासनाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे ताबडतोब निहित होतील.

(३) जिल्हाधिकारी, पोट–कलम (१) अन्वये त्याच्या जिल्ह्यातील तक्रारी स्वीकारण्यात सक्षम असेल आणि तो त्या त्याच्या अहवालासोबत लवकरात लवकर शासनाकडे पाठवील आणि तक्रारीची एक प्रत यथास्थिती, संबंधित जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त याच्याकडेदेखील तपासासाठी पाठवील.

**५. सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक :–**

(१) शासनास कलम ४ च्या पोट कलम (१) अन्वये आदेश देताना, त्याने कलम ४ अन्वये जप्ती आणलेल्या वित्तीय आस्थापनेच्या पैशावर व मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्याकरिता, उप–जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याची, सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

(२) सक्षम प्राधिकाऱ्यास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता आवश्यक असतील असे इतर अधिकारी असतील.

(३) सक्षम प्राधिकारी उक्त आदेश प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कलम ४ अन्वये या कारणांच्या आधारे उक्त आदेश दिलेला आहे ती कारणे आणि ठेवीपासून संपादन केला असल्याचे वाटत असेल असा पैसा किंवा इतर मालमत्ता, आणि या व्यक्तीच्या नावे अशा मालमत्तेत गुंतवणूक केली असल्याचे किंवा ती संपादित केली असल्याचे समजले जात असेल त्या व्यक्तींचा किंवा कलम ४ अन्वये जप्त करण्यात आलेल्या कोणत्याही इतर मालमत्तेचा कोणताही असल्यास, तपशील नमूद करणाऱ्या एका किंवा अधिक शपथपत्रांसह आवश्यक वाटतील अशा पुढील आदेशांसाठी विशेषित न्यायालयाकडे अर्ज करील.

**६. विशेष न्यायालय :–**

(१) या अधिनियमांच्या प्रयोजनार्थ, शासनास मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या सहमतीने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक क्षेत्रांसाठी किंवा अशा प्रकरणासाठी किंवा प्रकरणांच्या वर्गासाठी किंवा गटासाठी जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या संवर्गामध्ये एका किंवा अधिक विशेषित न्यायालयांची प्रस्थापना करता येईल.

(२) विशेष न्यायालय वगळता इलाखा शहर दिवाळखोरी अधिनियम १९०९ आणि प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम १९२० या अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या न्यायालयासह अन्य कोणत्याही न्यायालयाला या कोणत्याही प्रकरणात या अधिनियमाच्या तरतुदी लागू होत असतील त्याबाबत अधिकारिता असणार नाही.

(३) या अधिनियमाच्या तरतुदी लागू असलेले कोणतेही प्रकरण अन्य कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असेल तर, ते हा अधिनियम अमलात आल्याच्या दिनांकाला विशेषित न्यायालयाकडे हस्तांतरित होईल.

**७. जप्तीविषयीचे विशेष न्यायालयाचे अधिकार :–**

(१) कलम ५ अन्वये अर्ज आल्यानंतर विशेष न्यायालय कलम ४ अन्वये शासनाने जिची मालमत्ता जप्त करून सक्षम प्राधिकाऱ्याकडे निहित केली असेल अशा वित्तीय संस्थेस किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, अर्ज आणि शपथपत्रे व नोंदविण्यात आलेले कोणतेही पुरावे असल्यास, ते पुरावे यांसह नोटीस पाठवील आणि अशा नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करायच्या तारखेला हजर राहून जप्तीचा आदेश का कायम करू नये याची कारणे दाखविण्यास उक्त संस्थेस व उक्त व्यक्तीस फर्मावील.

(२) त्याचप्रमाणे विशेष न्यायालय कलम (१) अन्वये यांना अशी नोटीस पाठविण्यात आलेली असेल अशा वित्तीय आस्थापनेच्या किंवा व्यक्तीच्या मालमत्तेमध्ये यांचा कोणताही हितसंबंध किंवा हक्क आहे किंवा ते तसा दावा करण्याची शक्यता आहे, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल अशा इतर सर्व व्यक्तींना देखील नोटीस पाठवील आणि त्यांना नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या त्याच तारखेस उपस्थित राहण्यास आणि मालमत्तेमध्ये किवा मालमत्तेच्या भागामध्ये त्यांचा हितसंबंध असल्याच्या कारणावरून त्यांची तशी इच्छा असल्यास जप्तीस आक्षेप घेण्यास फर्मावील.

(३) जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये किंवा तिच्या भागामध्ये हितसंबंधाचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती तिला या कलमाखाली कोणतीही नोटीस देण्यात आलेली नसली तरी पोट–कलम (४) किंवा पोट–कलम (६) अन्वये कोणताही आदेश निघण्यापूर्वी कोणत्याही वेळी विशेषित न्यायालयामध्ये पूर्वी म्हटल्याप्रमाणे आक्षेप घेऊ शकेल.

(४) जर पोट–कलम (३) अन्वये विनिर्दिष्ट तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी कोणतेही कारण देण्यात आले नाही किंवा कोणतेही आक्षेप घेण्यात आले नाहीत तर विशेष न्यायालय, जप्तीचा आदेश कायम करणारा आदेश ताबडतोब देईल आणि जप्त केलेल्या

वसुलीसाठी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेमधून वसूल झालेल्या रकमेच्या समन्याय वाटपाकरिता आवश्यक असेल असा निदेश देईल.

(५) जर वर सांगितल्याप्रमाणे कारण दाखविले गेले असेल किंवा कोणताही आक्षेप घेतला गेला नसेल तर विशेष न्यायालय त्याच्या तपासणीची कार्यवाही करील, आणि असे करीत असता, पक्षकारांच्या तपासणीसंबंधी आणि इतर सर्व बाबतीत, विशेषित न्यायालय, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३७ खालील वादाच्या सुनावणीच्या बाबतीतील न्यायालयाच्या संक्षिप्त कार्यपद्धतीचे अनुसरण करील आणि वादाच्या सुनावणीच्या वेळी आणि उक्त संहिते अन्वये न्यायालयाचे सर्व अधिकार वापरील आणि आक्षेप घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला जप्तीच्या दिवशी, जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये त्याचा हितसंबंध होता हे दाखवून देण्यासाठी पुरावा सादर करण्यास फर्माविण्यात येईल.

(६) पोट–कलम (५) खालील ४ तपासणीनंतर विशेष न्यायालय, एकतर कलम ४ च्या पोट कलम (१) अन्वये दिलेला जप्तीचा आदेश कायम करणारा किंवा जप्तीमधून मालमत्तेचा काही भाग मुक्त करण्यासाठी आदेशात बदल करणारा किंवा जप्तीचा आदेश रद्द करणारा आदेश काढील :

परंतु विशेष न्यायालय वित्तीय आस्थापना किंवा पोट–कलम (१) मध्ये निर्देश केलेली व्यक्ती यांचा मालमत्तेत जो कोणताही हितसंबंध असल्याची त्याची खात्री पटली आहे त्या हितसंबंधाची अशा वित्तीय आस्थापनेच्या ठेवीदारांची परतफेड करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यापेक्षा कमी नसेल इतक्या मूल्याची रक्कम किंवा मालमत्ता जप्तीखाली राहील याचीदेखील खात्री पटल्याशिवाय जप्तीतून सुटका करणार नाही.

**८. असद्‌भावी हस्तांतरितीची मालमत्ता जप्त करणे :–**

(१) वित्तीय आस्थापनेच्या किंवा कलम ४ मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या जप्तीसाठी उपलब्ध असलेल्या मत्ता, अशा वित्तीय आस्थापनेला ठेवीदारांची परतफेड करण्याकरिता लागणाऱ्या रकमेपेक्षा किंवा मूल्यापेक्षा कमी आहेत असे आढळून येईल त्या बाबतीत आणि या बाबतीत शपथपत्राद्वारे किंवा अन्यथा, विशेषित न्यायालयाची अशी खात्री झाली असेल की, उक्त वित्तीय आस्थापनेने कोणतीही मालमत्ता, सद्‌भावपूर्वक असेल ते खेरीज करून अन्य प्रकारे आणि मोबदल्यासाठी हस्तांतरित केली आहे (मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो किंवा नंतर असो) असे समजण्यास वाजवी कारण आहे त्या बाबतीत विशेषित न्यायालय नोटिशीद्वारे अशा मालमत्तेच्या कोणत्याही हस्तांतरिताला (मग त्याला थेट उक्त वित्तीय आस्थापनेद्वारे मालमत्ता मिळाली असो अथवा नसो) नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल. त्या तारखेस न्यायालयापुढे हजर राहायला फर्मावू शकेल आणि हस्तांतरिताची जेवढी मालमत्ता हस्तांतरित केलेल्या मालमत्तेच्या उचित मूल्याइतकी असेल तेवढी मालमत्ता जप्त का करण्यात येऊ नये याबद्दल कारणे दाखविण्यास फर्मावू शकेल.

(२) या बाबतीत उक्त हस्तांतरित विनिर्दिष्ट तारखेला हजर राहणार नाही व कारण दाखविणार नाही त्या बाबतीत, किंवा यावेळी कलम ७, पोट–कलम (५) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने तपासणी केल्यानंतर, उक्त हस्तांतरितीमध्ये मालमत्तेचे हस्तांतरण सद्‌भावपूर्वक केलेले नव्हते व मोबदल्यासाठी केलेले होते याबद्दल विशेषित न्यायालयाची खात्री पटली असेल त्या बाबतीत, विशेषित न्यायालय, त्यांच्या मते उक्त हस्तांतरितीची जेवढी मालमत्ता हस्तांतरित केलेल्या मालमत्तेच्या सममूल्य असेल तेवढी मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देईल.

**९. जप्तीऐवजी प्रतिभूती देणे :–**

या अधिनियमान्वये जिची मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे अथवा करण्यात येणार आहे अशी कोणतीही वित्तीय आस्थापना किंवा व्यक्ती यांना अशा जप्तीऐवजी प्रतिभूती देण्याच्या परवानगीसाठी कोणत्याही वेळी विशेषित न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि या बाबतीत, विशेषित न्यायालयाच्या मते, देऊ केलेली आणि दिलेली प्रतिभूती, समाधानकारक व पुरेशी असेल त्या बाबतीत ते जप्तीचा आदेश रद्द करू शकेल किंवा यथास्थिती, जप्तीचा आदेश देण्यापासून परावृत्त होऊ शकेल.

**१०. जप्त केलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन :–**

या अधिनियमान्वये जप्त केलेल्या व सक्षम प्राधिकाऱ्याकडे निहित असलेल्या मालमत्तेत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावर आणि सक्षम प्राधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर विशेषित न्यायालय पुढील गोष्टींसाठी त्याला न्याय आणि वाजवी वाटतील असे आदेश देऊ शकेल.

(a) अर्जदार जीमध्ये हितसंबंध असल्याचा दावा करीत असेल अशा जप्ती आणलेल्या व सक्षम प्राधिकरणाकडे निहित असलेल्या मालमत्तेतून अर्जदार आणि त्याच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी आवश्यक असेल अशा वाजवी रकमेची आणि कलम ३ अन्वये विशेषित न्यायालयात त्याच्याविरुद्ध फौजदारी कार्यवाही सुरु करण्यात आली असेल त्या बाबतीत अर्जदाराचा बचाव करण्याच्या संबंधात असलेल्या खर्चाची तरतूद करणे.

(b) जप्तीचा परिणाम झालेल्या कोणत्याही व्यवसायातील हितसंबंधाचे आणि विशेषत: अशा व्यवसायातील कोणत्याही भागीदारांच्या हितसंबंधाचे, व्यवहार्य असेल तेथवर संरक्षण करणे.

--------

# ४१. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४

## महाराष्ट्र राज्यातील सावकारीच्या व्यवहारांचे नियमन करण्याकरिता अधिनियम

**ज्याअर्थी,** राज्यात सावकारांकडून होणाऱ्या पिळवणुकीमध्ये वाढ झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या वारंवार आत्महत्या घडत होत्या;

**आणि ज्याअर्थी,** सावकारीतील विद्यमान अधिनियम हा, कर्जदार शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यास आणि सावकारांकडून होणाऱ्या त्याच्या पिळवणुकीस प्रतिबंध करण्यास अपर्याप्त असल्याचे दिसून आले होते;

**आणि ज्याअर्थी,** अशा परिस्थितीत, सावकारांकडून होणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांच्या पिळवणुकीस प्रभावी रीतीने प्रतिबंध करण्यासाठी समुचित व कठोर सामाजिक आणि कायदेशीर उपाययोजना करणे शासनास अत्यावश्यक झाले होते; तसेच महाराष्ट्र राज्यात सावकारीच्या व्यवहारांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी अधिक चांगल्या तरतुदी असलेला एक नवीन कायदा करणे इष्ट होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १६ जानेवारी २०१४ रोजी, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश, २०१४ हा प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १६ जानेवारी २०१४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२. व्याख्या.-** या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(१) ''बँक'' याचा अर्थ, बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) जिला लागू होतो अशी बँक व्यवसायी कंपनी किंवा सहकारी बँक असा आहे आणि त्यात,-

(a) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ (१९५५ चा २३) अन्वये स्थापन करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक;

(b) भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ३८) यामध्ये व्याख्या केलेली दुय्यम बँक;

(c) बँक व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) अन्वये किंवा, यथास्थिती, बँक व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० (१९८० चा ४०) अन्वये स्थापन करण्यात आलेली तत्सम नवीन बँक; आणि

(d) बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) याच्या कलम ५१ मध्ये निर्देशिलेली अन्य कोणतीही बँक व्यवसायी संस्था,

यांचा समावेश होतो;

(२) ''बँक व्यवसायी कंपनी'' या संज्ञेस, बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) याच्या कलम ५ च्या खंड (c) द्वारे जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल;

(३) ''सावकारीचा धंदा'' याचा अर्थ, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात कर्जे देण्याचा धंदा, असा आहे- मग तो धंदा अन्य कोणत्याही धंद्याच्या संबंधात अथवा त्याच्या जोडीने केलेला असो किंवा नसो;

(४) ''भांडवल'' याचा अर्थ, सावकाराने सावकारीच्या धंद्यामध्ये गुंतविलेला पैसा, असा आहे;

(५) ''कंपनी'' याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कंपनी, असा आहे;

(६) ''सहकारी बँक'', ''सहकारी संस्था'', ''बहुराज्यीय सहकारी बँक'' आणि ''प्राथमिक पतसंस्था'' या संज्ञांना, बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) याच्या कलम ५६ च्या खंड (c) द्वारे जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील;

(७) ''कर्जदार'' याचा अर्थ, ज्याला रोखीने किंवा वस्तुरूपात कर्ज देण्यात आले आहे अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यात त्याच्या हितसंबंधित उत्तराधिकाऱ्याचा किंवा जामीनदाराचा समावेश होतो;

(८) ''तपासणी शुल्क'' याचा अर्थ, सावकाराच्या लेखा पुस्तकांची तपासणी करण्यासाठी कलम १२ अन्वये आकारण्यात येणारे शुल्क, असा आहे;

(९) ''व्याज'' या संज्ञेत कर्जाच्या बाबतीत कर्जाचा मोबदला म्हणून किंवा अन्यथा सावकाराला मुद्दलाच्या रकमेपेक्षा जादा देण्यात आलेल्या किंवा येणाऱ्या कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या कोणत्याही रकमेचा समावेश होतो; परंतु त्यामध्ये, या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार सावकाराने परिव्यय, आकार व खर्च म्हणून कायदेशीररीत्या आकारलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश होत नाही;

(१०) ''धंद्यातील गुंतवणूक'' याचा अर्थ, सावकाराने सावकारीच्या धंद्यामध्ये वेळोवेळी गुंतवलेली एकूण रक्कम, असा आहे;

(११) ''अनुज्ञप्ती'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये दिलेली अनुज्ञप्ती, असा आहे;

(१२) ''अनुज्ञप्ती शुल्क'' याचा अर्थ, अनुज्ञप्तीसाठी द्यावयाचे शुल्क, असा आहे;

(१३) ''कर्ज'' याचा अर्थ, व्याजाने दिलेली आगाऊ रक्कम अथवा वस्तू, असा आहे, मात्र त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होत नाही,-

(a) सरकारी डाक कार्यालय बँकेमध्ये किंवा अन्य कोणत्याही बँकेमध्ये किंवा एखाद्या कंपनीमध्ये वा सहकारी संस्थेमध्ये ठेव म्हणून ठेवलेला पैसा अथवा अन्य मालमत्ता;

(b) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये किंवा एखाद्या सार्वजनिक, धार्मिक वा धर्मादाय उद्दिष्टाशी संबंधित अन्य कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही संस्थेला किंवा संघाला दिलेले किंवा त्यांनी दिलेले कर्ज, किंवा त्यांच्याकडे ठेवलेली ठेव;

(c) शासनाने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने दिलेले कर्ज;

(d) शासकीय कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी किंवा साहाय्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या निधीतून एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याला देण्यात आलेले व राज्य शासनाने मंजूर केलेले कर्ज;

(e) सहकारी संस्थेत जमा केलेले पैसे किंवा सहकारी संस्थेला दिलेले कर्ज;

(f) भविष्य निर्वाह निधीच्या एखाद्या वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या जमाखाती असलेल्या रकमेतून त्या वर्गणीदाराला किंवा ठेवीदाराला, त्या निधीच्या नियमांनुसार देण्यात आलेले अग्रिम;

(g) विमा अधिनियम, १९३८ (१९३८ चा ४) मध्ये व्याख्या केलेल्या विमा कंपनीला दिलेले अथवा तिने दिलेले कर्ज;

(h) बँकेला दिलेले अथवा बँकेने दिलेले कर्ज;

(i) कोणत्याही कायद्याद्वारे विधिसंस्थापित केलेल्या, राज्यामध्ये त्या त्या वेळी अमलात असलेल्या किंवा त्या अधिनियमानुसार ज्या कोणत्याही कायद्याद्वारे कोणतेही कर्ज किंवा अग्रिमाची रक्कम मंजूर करण्यात येत असेल अशा कायद्याखाली किंवा तदन्वये स्थापन केलेल्या (या खंडाच्या इतर कोणत्याही तरतुदींच्या कक्षेत न येणारी अशी संस्था असलेली) कोणत्याही महामंडळाला दिलेले अथवा अशा महामंडळाने दिलेले कर्ज, किंवा त्याच्याकडे ठेवलेली ठेव;

(j) वचनचिठ्ठीव्यतिरिक्त अन्य अशा, परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) यात व्याख्या केलेल्या परक्राम्य संलेखाच्या आधारे देण्यात आलेले, तीन लाख रुपयांहून अधिक असलेले कितीही रकमेचे अग्रिम;

(k) हुंडीच्या (इंग्रजीमध्ये किंवा कोणत्याही भारतीय भाषेत लिहिलेल्या) आधारे देण्यात आलेले, तीन हजार रुपयांहून अधिक असलेले कितीही रकमेचे अग्रिम;

(l) पैसे कर्जाऊ देणे हे प्राथमिक उद्दिष्ट नसलेला कोणताही धंदा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने आपल्या धंद्याच्या सर्वसाधारण ओघात अग्रिम दिले असेल तर, तिने असे सद्भावपूर्वक दिलेले अग्रिम;

(m) कलमे २९ व ३१ यांच्या प्रयोजनांव्यतिरिक्त एरव्ही,-

(i) जमीनमालकाने आपल्या कुळाला पिकांसाठी भांडवल पुरविण्याच्या किंवा हंगामी भांडवल पुरविण्याच्या उद्देशाने, कुळाने धारण केलेल्या जमिनीच्या दर एकरास १,००० रुपयांहून अधिक नसेल एवढे दिलेले कर्ज;

(ii) शेतमजुराला त्याच्या मालकाने दिलेले कर्ज;

**स्पष्टीकरण.-** ''कुळ'' या शब्दाला, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, (१९४८ चा ६७) यामध्ये किंवा शेतजमिनीच्या कुळवहिवाटीशी संबंधित अशा, अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही संबंधित कुळवहिवाट कायद्यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल आणि ''पिकांसाठी भांडवल पुरविणे'' व ''हंगामी भांडवल पुरविणे'' या शब्दप्रयोगांना महाराष्ट्र कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम, (१९४७ चा २८) यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल.

(१४) ''सावकार'' याचा अर्थ,-

(i) एखादी व्यक्ती; किंवा

(ii) एखादे अविभक्त हिंदू कुटुंब; किंवा

(iii) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या प्रकरण तीन-B अन्वये विनियमन केलेल्या बँक व्यवसायेतर वित्तीय कंपनीखेरीज अन्य कंपनी.

(iv) (a) जो राज्यात सावकारीचा धंदा करतो असा, वा

(b) ज्याचे या धंद्याचे प्रमुख ठिकाण या राज्यामध्ये आहे असा,-

विधिसंस्थापित नसलेला व्यक्तींचा संघ,- असा आहे; आणि त्यामध्ये तारणव्यवसायीचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये-

(i) शासन;

(ii) स्थानिक प्राधिकरण;

(iii) बँक;

(iv) सहकारी बँक;

(v) बहुराज्यीय सहकारी बँक;

(vi) बँक व्यवसायेतर वित्तीय कंपनी;

(vii) प्राथमिक पत संस्था;

(viii) प्रादेशिक ग्रामीण बँक;

(ix) भारतीय रिझर्व्ह बँक;

(x) कृषिविषयक पुनर्वित्तव्यवस्था व विकास महामंडळ अधिनियम, १९६३ (१९६३ चा १०) अन्वये स्थापन केलेले कृषिविषयक पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ; किंवा

(xi) राज्य शासन याबाबतीत **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी इतर कोणतीही बँक वा वित्तीय संस्था,

यांचा समावेश होत नाही.

(१५) ''तारणव्यवसायी'' याचा अर्थ, जो आपल्या धंद्याच्या सर्वसाधारण ओघात कर्ज देतो आणि त्या कर्जाच्या परतफेडीसाठी प्रतिभूती म्हणून मालाच्या स्वरूपात तारण स्वीकारतो असा सावकार, असा आहे;

(१६) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(१७) ''मुद्दल'' याचा कर्जाच्या संबंधातील अर्थ, कर्जदाराला प्रत्यक्षात देण्यात आलेली रोख रक्कम किंवा वस्तू, असा आहे;

(१८) ''प्रादेशिक ग्रामीण बँक'' याचा अर्थ, प्रादेशिक ग्रामीण बँक अधिनियम, १९७६ (१९७६ चा २१) याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेली बँक, असा आहे;

(१९) ''मान्यताप्राप्त भाषा'' याचा अर्थ, मराठी, गुजराती, हिंदी किंवा शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतीही भाषा, असा आहे;

(२०) ''नोंदवही'' याचा अर्थ, कलम ७ अन्वये ठेवलेली सावकारांची नोंदवही, असा आहे;

(२१) ''महानिबंधक'' याचा अर्थ, कलम ३ अन्वये नियुक्त करण्यात आलेला सावकारी महानिबंधक, असा आहे;

(२२) ''नियम'' याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेले नियम, असा आहे;

(२३) ''राज्य'' याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(२४) ''हा अधिनियम ज्यास लागू आहे असा दावा'' याचा अर्थ, सावकाराने दिलेल्या कर्जातून सावकार आणि कर्जदार किंवा त्याचा उत्तराधिकारी यांच्यामध्ये उद्भवणारा कोणताही दावा, असा आहे- मग ते कर्ज या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दिलेले असो किंवा नंतर दिलेले असो;

(२५) ''व्यापारी'' याचा अर्थ, जी व्यक्ती धंद्याच्या सर्वसाधारण ओघात मालाची अथवा इतर स्थावर किंवा जंगम मालमत्तेची खरेदी व विक्री करते ती व्यक्ती, असा आहे आणि त्यात,-

(i) घाऊक किंवा किरकोळ व्यापारी,

(ii) कमिशन एजंट,

(iii) दलाल,

(iv) माल उत्पादक,

(v) कंत्राटदार,

(vi) कारखानदार,

यांचा समावेश होतो, परंतु त्यात कारागिराचा अथवा जी व्यक्ती आपले शेतीचे उत्पन्न किंवा गुरे विकते किंवा आपल्या उपयोगासाठी शेतीचे उत्पन्न किंवा गुरे विकत घेते अशा व्यक्तीचा समावेश होत नाही.

**स्पष्टीकरण.-** या खंडाच्या प्रयोजनासाठी ''कारागीर'' याचा अर्थ, जी व्यक्ती निकटपूर्वीच्या बारा महिन्यांतील कोणत्याही एका दिवशी वस्तुनिर्माण प्रक्रियेत दहाहून अधिक कामगार कामावर ठेवीत नाही ती व्यक्ती, असा आहे.

**३. महानिबंधक आणि त्याला साहाय्य करण्यासाठी इतर अधिकारी यांची नियुक्ती.-** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, सावकारी महानिबंधक आणि त्यास योग्य वाटतील तितके विभागीय निबंधक, जिल्हा निबंधक आणि सहायक निबंधक यांची नियुक्ती करता येईल.

(२) महानिबंधकाची राज्यात सर्वत्र अधिकारिता असेल, विभागीय निबंधकाची त्याच्या संपूर्ण विभागात अधिकारिता असेल, जिल्हा निबंधकाची त्याच्या संपूर्ण जिल्ह्यात अधिकारिता असेल आणि सहायक निबंधकाची अधिकारिता, राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, जिल्ह्याच्या क्षेत्रात असेल; विभागीय निबंधक हा महानिबंधकास दुय्यम असेल, जिल्हा निबंधक हा विभागीय निबंधकास दुय्यम असेल आणि सहायक निबंधक हा जिल्हा निबंधकास दुय्यम असेल.

**४. सावकाराने अनुज्ञप्ती मिळालेल्या क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रामध्ये आणि अनुज्ञप्तीच्या अटींनुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने सावकारीचा धंदा न करणे.-** कोणताही सावकार, ज्या क्षेत्रासाठी त्याला अनुज्ञप्ती देण्यात आलेली असेल त्या क्षेत्राव्यतिरिक्त अन्यत्र आणि त्या अनुज्ञप्तीच्या अटी व शर्ती यांच्यानुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने सावकारीचा धंदा करणार नाही.

**५. अनुज्ञप्तीसाठी अर्ज.-** (१) प्रत्येक सावकार, दरवर्षी अनुज्ञप्ती मिळविण्याकरिता, ज्या ठिकाणी तो सावकारीचा धंदा करीत असेल किंवा तो करण्याचा त्याचा इरादा असेल ते ठिकाण ज्या क्षेत्राच्या हद्दीत असेल त्या क्षेत्राच्या सहायक निबंधकाकडे विहित नमुन्यात आणि विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी अर्ज करील. जेव्हा तो एकापेक्षा अधिक ठिकाणी असा सावकारीचा धंदा करीत असेल किंवा करण्याचा त्याचा इरादा असेल तेव्हा, अशा प्रत्येक ठिकाणासाठी त्याला अशा सहायक निबंधकाकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल. या अर्जात पुढील तपशील अंतर्भूत असेलः-

(a) अशा सावकाराचा ज्या नावाने सावकारीचा धंदा करण्याचा इरादा असेल ते खरे नाव, आणि या धंद्याच्या व्यवस्थापनास जबाबदार म्हणून योजिलेल्या व्यक्तीचे खरे नाव;

(b) जर असा अर्ज,-

  (i) एखाद्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने करण्यात आला असेल तर, अशा व्यक्तीचे खरे नाव व पत्ता;

  (ii) एखाद्या अविभक्त हिंदू कुटुंबाने केलेला असेल किंवा त्याच्या वतीने करण्यात आला असेल तर, अशा कुटुंबाचा कर्ता व कुटुंबातील प्रौढ समान हिस्सेदार यांची खरी नावे व पत्ते;

  (iii) एखाद्या कंपनीने केलेला असेल किंवा तिच्या वतीने करण्यात आला असेल तर, तिची व्यवस्था पाहणारे संचालक, व्यवस्थापक किंवा मुख्य अधिकारी यांची खरी नावे व पत्ते;

  (iv) विधिसंस्थापित नसलेल्या व्यक्तींच्या संघाने केलेला असेल किंवा त्यांच्या वतीने करण्यात आला असेल तर, अशा व्यक्तींची खरी नावे व पत्ते;

(c) राज्यातील सावकारीच्या धंद्याचे क्षेत्र आणि ठिकाण किंवा मुख्य ठिकाण;

(d) राज्यातील ज्या इतर कोणत्याही ठिकाणी सावकारीचा धंदा करण्याचा इरादा असेल त्या ठिकाणाचे नाव;

(e) अर्जावर सही करणारी व्यक्ती स्वतः किंवा, यथास्थिती, ज्याच्या वतीने हा अर्ज करण्यात आला असेल असा, अविभक्त हिंदू कुटुंबाचा कोणताही प्रौढ समान हिस्सेदार किंवा कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक वा मुख्य अधिकारी, किंवा विधिसंस्थापित नसलेल्या संघाचा कोणताही सदस्य, अर्जाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या ३१ मार्च रोजी संपणाऱ्या वर्षात, राज्यामध्ये, एकतर व्यक्तिशः किंवा भागीदारीमध्ये किंवा अन्य कोणत्याही समान हिस्सेदाराबरोबर अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर संयुक्तरीत्या आणि त्याच नावाने अथवा अन्य कोणत्याही नावाने सावकारीचा धंदा करीत होता किंवा कसे;

(f) ज्या वर्षासाठी अर्ज करण्यात आला असेल, त्या वर्षात सावकारीच्या धंद्यात जेवढे भांडवल गुंतविण्याचा अशा व्यक्तीचा इरादा असेल त्या एकूण भांडवलाची रक्कम;

(g) सावकारीचा धंदा चालविण्याची ठिकाणे एकाहून अधिक असतील तर, अशा प्रत्येक ठिकाणी धंद्याची व्यवस्था पाहण्यासाठी ज्या व्यक्ती असतील त्यांची खरी नावे.

(२) असा अर्ज लेखी स्वरूपात करण्यात येईल आणि त्यावर,-

(a) (i) जर तो अर्ज एखाद्या व्यक्तीने केलेला असेल तर, ती व्यक्ती;

(ii) जर तो अर्ज अविभक्त हिंदू कुटुंबाच्या वतीने केलेला असेल तर, अशा कुटुंबाचा कर्ता;

(iii) जर तो अर्ज एखाद्या कंपनीने किंवा विधिसंस्थापित नसलेल्या संघाने केलेला असेल तर, व्यवस्थापन संचालक किंवा त्यांच्या धंद्याचे मुख्य ठिकाण जिच्या नियंत्रणाखाली असेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती;

(b) वैयक्तिक सावकाराने स्वतः किंवा कुटुंबाने किंवा कंपनीने किंवा यथास्थिती विधिसंस्थापित नसलेल्या संघाने याबाबतीत ज्यास मुखत्यारपत्राद्वारे प्राधिकृत केले असेल असा अभिकर्ता,

-सही करील.

(३) अर्जामध्ये, विहित करण्यात येईल असा इतर तपशीलदेखील अंतर्भूत असेल.

(४) प्रत्येक अर्जासोबत विहित करण्यात येईल असे अनुज्ञप्ती शुल्क भरण्यात येईल.

(५) या कलमान्वये द्यावयाचे शुल्क, विहित केलेल्या रीतीने भरण्यात येईल आणि जरी अर्ज मागे घेण्यात आला किंवा नंतर फेटाळण्यात आला तरी, ते परत करण्यात येणार नाही.

**६. अनुज्ञप्ती देणे व नोंदवहीत नोंद करणे.–** कलम ५ अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर सहायक निबंधक, अर्जदाराचा खरेपणा व वर्तणूक याविषयी स्वतःची खात्री पटवून घेण्यासाठी आवश्यक ती चौकशी करील आणि आपला अभिप्राय लिहून तो अर्ज पुढे जिल्हा निबंधकाकडे पाठवील. या अध्यादेशाच्या तरतुदींना अधीन राहून, जिल्हा निबंधकास याबाबतीत त्याला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी, कोणतीही असल्यास, केल्यानंतर विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, आणि अशा शर्तींना अधीन राहून, अर्जदारास अनुज्ञप्ती देईल आणि कलम ७ अन्वये सहायक निबंधकाने ठेवलेल्या नोंदवहीत अशा अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी त्यास निदेश देता येईल :

परंतु, जिल्हा निबंधक अनुसूचित क्षेत्रांमध्ये संबंधित ग्रामसभेच्या आणि पंचायत समितीच्या शिफारशीनंतर अशी अनुज्ञप्ती देईल; आणि जेव्हा अशी अनुज्ञप्ती एकापेक्षा अधिक ग्रामसभांच्या किंवा पंचायतींच्या क्षेत्रासाठी द्यावयाची असेल तेव्हा, ज्या संबंधित ग्रामसभांच्या किंवा पंचायत समितींच्या अधिकारक्षेत्रात सावकार सावकारीचा धंदा करत असेल किंवा करण्याचा त्याचा इरादा असेल त्या सर्व ग्रामसभांच्या आणि पंचायत समित्यांच्या शिफारशीनंतर अशी अनुज्ञप्ती देईल :

परंतु आणखी असे की, वरीलपैकी कोणत्याही बाबतीत संबंधित ग्रामसभांनी बहुमताने ठराव संमत करून घेतलेला निर्णय संबंधित पंचायत समितीवर बंधनकारक असेल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनार्थ,-

(i) ''ग्रामसभा'', ''पंचायत'' आणि ''अनुसूचित क्षेत्र'' या शब्दप्रयोगांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) मध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील;

(ii) ''पंचायत समिती'' या शब्दप्रयोगाला, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

**७. सावकारांची नोंदवही.-** प्रत्येक सहायक निबंधक आपल्या अधिकारितेतील क्षेत्रासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात सावकारांची नोंदवही ठेवील :

परंतु, अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामपंचायत स्तरावर अशी नोंदवही ठेवण्यात येईल.

**८. अनुज्ञप्ती देण्यास नकार.-** (१) पुढील कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणावरून अनुज्ञप्ती देण्यास नकार देता येणार नाहीः-

(a) अर्जदार किंवा त्याचा सावकारीचा धंदा चालविण्यास जबाबदार असलेली किंवा जबाबदार म्हणून योजलेली व्यक्ती, अनुज्ञप्ती धारण करण्यास अपात्र ठरवण्यात आली असेल;

(b) अनुज्ञप्ती मिळवण्यासाठी करावयाच्या अर्जासंबंधीच्या, या अध्यादेशाच्या तरतुदींचे किंवा नियमांचे अर्जदाराने पालन केलेले नसेल;

(c) या अध्यादेशाखालील कोणत्याही आवश्यक गोष्टीचे पालन करण्यात अर्जदाराने बुद्धिपुरस्सर कसूर केली असेल किंवा जाणूनबुजून तिचे उल्लंघन होईल असे वर्तन केले असेल;

(d) अर्जदार किंवा सावकारीचा धंदा चालविण्यास जबाबदार असलेल्या किंवा जबाबदार म्हणून योजलेल्या कोणत्याही व्यक्तीने-

(i) सावकारीचा धंदा करताना किंवा त्या धंद्याच्या संबंधात एखादे फसवणुकीचे किंवा अप्रामाणिकपणाचे कृत्य करण्यात जाणूनबुजून भाग घेतला आहे किंवा त्याकडे दुर्लक्ष केले आहे; किंवा

(ii) ती, भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) प्रकरण सतरा खालील किंवा प्रकरण अठराची कलमे ४६५, ४७७ किंवा ४७७-A यांखालील अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळून आले आहे,

याबाबत जिल्हा निबंधकासमोर समाधानकारक पुरावा सादर केला असेल.

(२) पोटकलम (१) अन्वये अनुज्ञप्ती नाकारण्यापूर्वी जिल्हा निबंधक, अर्जदाराला, अर्जाच्या पुष्ट्यर्थ कोणताही पुरावा असल्यास, तो सादर करण्याची आणि अनुज्ञप्ती का नाकारण्यात येऊ नये याबद्दल कारणे दर्शविण्याची वाजवी संधी देईल; आणि त्याच्याकडे सादर केलेल्या पुराव्याची आणि अशी अनुज्ञप्ती नाकारण्याबद्दलच्या त्याच्या कारणांची नोंद करील.

(३) पोटकलम (१) अन्वये अनुज्ञप्ती नाकारणाऱ्या जिल्हा निबंधकाच्या निर्णयाविरुद्ध विभागीय निबंधकांकडे अपील दाखल करता येईल आणि त्याचा त्यावरील निर्णय हा अंतिम असेल.

(४) जिल्हा निबंधकाने पोटकलम (१) अन्वये दिलेल्या निर्णयाविरोधातील अपील, अशा निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत दाखल करता येईल :

परंतु, अपीलकर्त्यास, त्याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे, जिल्हा निबंधकाने पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत अपील दाखल करण्यास प्रतिबंध झाला होता याबाबत विभागीय निबंधकाची खात्री पटली तर, त्याला, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून, तीन महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील अपील दाखल करून घेता येईल.

**९. महानिबंधकाचे पुनरीक्षणविषयक अधिकार.–** (१) जेव्हा एखाद्या प्रकरणामध्ये महानिबंधकास दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने कोणताही आदेश दिलेला असेल किंवा कोणताही निर्णय दिलेला असेल, आणि अशा निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करता येणार नसेल तेव्हा, महानिबंधकास स्वतःहून किंवा आलेल्या अर्जावरून, त्या निर्णयाच्या वा आदेशाच्या वैधतेबाबत व औचित्याबाबत आणि कार्यवाहीच्या नियमानुसारितेबाबत स्वतःची खात्री पटवून घेण्यासाठी, त्या कोणत्याही प्रकरणाच्या कोणत्याही चौकशीचे किंवा कार्यवाहीचे अभिलेख मागविता येतील व त्यांची तपासणी करता येईल. जर अशा चौकशीदरम्यान, या मागविलेल्या निर्णयामध्ये किंवा आदेशामध्ये बदल करणे, तो विलोपित करणे किंवा फिरवणे आवश्यक आहे अशी महानिबंधकाची खात्री पटली तर, महानिबंधकास त्यासंदर्भात बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्यास न्याय्य वाटतील असे आदेश काढता येतील.

**१०. अनुज्ञप्तीची मदत.–** ज्या दिनांकास अनुज्ञप्ती देण्यात येईल त्या दिनांकापासून, त्यानंतर येणाऱ्या ३१ मार्चपर्यंत ते वैध राहील :

परंतु अनुज्ञप्ती नवीकरणासाठीचा अर्ज सहायक निबंधकाला विहित कालावधीच्या आत मिळाला असेल त्याबाबतीत, अर्ज अंतिमरीत्या निकालात काढण्यात येईपर्यंत, ती अनुज्ञप्ती वैध असल्याचे मानण्यात येईल.

**११. जिल्हा निबंधकाचा अनुज्ञप्ती रद्द करण्याचा अधिकार.–** (१) ज्या व्यक्तीला अनुज्ञप्ती देण्यात आली असेल त्या व्यक्तीला जिल्हा निबंधकाने कलम ८ अनुसार ज्या कोणत्याही कृत्यासाठी वा वर्तनासाठी अनुज्ञप्ती देण्यास नकार दिला असता असे कृत्य वा वर्तन अनुज्ञप्ती देतेवेळी त्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले नव्हते अशा कोणत्याही कृत्याबद्दल वा वर्तनाबद्दल ती व्यक्ती दोषी आहे या कारणास्तव जिल्हा निबंधकास ती अनुज्ञप्ती, त्या अनुज्ञप्तीच्या मुदतीमध्ये लेखी आदेशाद्वारे रद्द करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये अनुज्ञप्ती रद्द करण्यापूर्वी, जिल्हा निबंधक अनुज्ञप्तीधारकाला लेखी नोटीस देईल आणि आवश्यक वाटेल अशी चौकशी करील.

(३) पोटकलम (१) अन्वये जिल्हा निबंधकाने अनुज्ञप्ती रद्द करण्याबाबत दिलेल्या आदेशावर विभागीय निबंधकाकडे अपील दाखल करता येईल, आणि विभागीय निबंधकाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(४) पोटकलम (१) अन्वये जिल्हा निबंधकाने दिलेल्या आदेशाविरुद्ध, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अपील दाखल करता येईल :

परंतु, अपीलकर्त्यास त्याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे, पोटकलम (१) अन्वये जिल्हा निबंधकाने दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत अपील दाखल करण्यास प्रतिबंध झाला होता याबाबत विभागीय निबंधकाची खात्री पटली तर, त्याला त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील अपील दाखल करून घेता येईल.

**१२. तपासणी शुल्क आकारणे.–** (१) अनुज्ञप्तीचे नवीकरण करून घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या सावकारावर, कलम ५ अन्वये आकारणीयोग्य अनुज्ञप्ती शुल्काबरोबरच, नवीकरण करून घ्यावयाच्या अनुज्ञप्तीच्या मुदतीमध्ये त्याने वापरलेल्या कमाल भांडवलाच्या एक टक्का दराने किंवा पन्नास हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे तपासणी शुल्क आकारण्यात येईल.

(२) अनुज्ञप्तीचे नवीकरण करून घेण्यासाठीचा अर्ज, पोटकलम (१) अन्वये देय असलेले तपासणी शुल्क भरल्याशिवाय मंजूर केला जाणार नाही.

**स्पष्टीकरण.-** या कलमाच्या प्रयोजनार्थ, ''कमाल भांडवल'' याचा अर्थ, अनुज्ञप्तीच्या मुदतीमध्ये कोणत्याही दिवशी सावकारीच्या धंद्यामध्ये गुंतवून ठेवलेली भांडवलाची उच्चतम एकूण रक्कम असा आहे.

**१३. अनुज्ञप्ती धारण न करणाऱ्या सावकारांबाबतचे दावे.-** (१) ज्याच्याशी दावा निगडित आहे ते कर्ज वा त्याचा कोणताही भाग ज्यावेळी देण्यात आला होता त्यावेळी सावकाराने वैध अनुज्ञप्ती धारण केली होती याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्याखेरीज कोणतेही न्यायालय कोणत्याही दाव्यामध्ये सावकाराच्या बाजूने हुकूमनामा काढणार नाही, आणि जर सावकार वैध अनुज्ञप्ती धारण करीत नव्हता याद्दल न्यायालयाची खात्री पटली तर, ते तो दावा फेटाळून लावील.

(२) पाल्याधिकरण किंवा सरकारी अभिहस्तांकिती, धारक, प्रशासक अथवा इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९ (१९०९ चा ३) किंवा प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० (१९२० चा ५) किंवा त्या अधिनियमाशी अनुरूप असा, अमलात असलेला अन्य कोणताही कायदा यांच्या तरतुदींखालील न्यायालय यांच्या, अथवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा, यथास्थिती कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) यांच्या तरतुदींखालील परिसमापकाच्या, सावकाराची मालमत्ता संपादन करण्याबाबतच्या अधिकारांना या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोचणार नाही.

**१४. अनुज्ञप्ती रद्द करण्याकरिता अर्ज.-** (१) जिल्हा निबंधक कलम ८ अन्वये एखाद्या सावकाराला ज्या कृत्याबद्दल वा वर्तनाबद्दल अनुज्ञप्ती नाकारू शकेल असे कोणतेही कृत्य वा वर्तन केल्याबद्दल तो सावकार दोषी आहे या कारणास्तव त्यास दिलेली अनुज्ञप्ती रद्द करण्यात यावी म्हणून, कोणत्याही व्यक्तीस, अनुज्ञप्तीची मुदत चालू असताना, जिल्हा निबंधकाकडे अर्ज करता येईल. उक्त व्यक्ती अर्ज करताना, जिल्हा निबंधकास योग्य वाटेल अशी, पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम अनामत म्हणून ठेवील.

(२) असा अर्ज व अनामत रक्कम मिळाल्यावर किंवा कलम १६ अन्वये काम करणाऱ्या अधिकाऱ्याकडून तशा आशयाचा अहवाल मिळाल्यावर, जिल्हा निबंधक त्याबाबत चौकशी करील आणि अशा कृत्याबद्दल किंवा वर्तनाबद्दल सावकार दोषी आहे अशी त्याची खात्री पटली तर, त्याला सावकाराची अनुज्ञप्ती रद्द करता येईल आणि पोटकलम (१) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम परत करण्याचे निदेश देखील देता येतील.

(३) जिल्हा निबंधकाच्या मते, पोटकलम (१) अन्वये केलेला अर्ज क्षुल्लक किंवा तापदायक असल्यास त्यास, पोटकलम (१) अन्वये अनामत ठेवलेल्या रकमेतून त्याला योग्य वाटेल इतकी रक्कम सावकाराला भरपाई म्हणून देण्यासाठी निदेश देता येईल.

**१५. महानिबंधक व त्याला दुय्यम असणारे अधिकारी यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.-** कलमे ६ व १६ यांच्या प्रयोजनांकरिता, महानिबंधक, विभागीय निबंधक, जिल्हा निबंधक, सहायक निबंधक व कलम १६ अन्वये प्राधिकृत केलेला अधिकारी; आणि कलम १४ व १८ च्या प्रयोजनांकरिता जिल्हा निबंधक यांना, पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतील तेच अधिकार असतील व त्यांना त्यांचा वापर करता येईलः-

(a) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व शपथेवर तिची तपासणी करणे;

(b) दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू सादर करण्यास भाग पाडणे;

(c) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे; आणि

(d) शपथपत्राद्वारे वस्तुस्थितीचा पुरावा घेणे.

**१६. अभिलेख किंवा दस्तऐवज सादर करण्यास फर्मावण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार.–** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, सावकारीचा धंदा करण्यात येत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी, महानिबंधकास, विभागीय सहनिबंधकास, जिल्हा निबंधकास किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, एखादा सावकार किंवा त्याच्या मते अन्य कोणतीही व्यक्ती, राज्यात सावकारीचा धंदा करीत आहे असे सकारण वाटल्यास, अशा महानिबंधकास, विभागीय सहनिबंधकास, जिल्हा निबंधकास किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, त्याच्या मते त्या प्रयोजनाशी संबंधित असलेला असा, त्या सावकाराच्या किंवा व्यक्तीच्या कब्जातील कोणताही अभिलेख किंवा दस्तऐवज सादर करण्यास फर्माविता येईल, आणि त्यानंतर तो सावकार किंवा ती व्यक्ती असा अभिलेख किंवा दस्तऐवज सादर करील. महानिबंधकास, विभागीय निबंधकास, जिल्हा निबंधकास व सहायक निबंधकास किंवा याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास वाजवी नोटीस दिल्यानंतर, जेथे असा अभिलेख किंवा दस्तऐवज ठेवलेला आहे असे त्यास वाटत असेल अशा कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही योग्य वेळी अधिपत्राशिवाय प्रवेश करता येईल व त्याचा शोध घेता येईल आणि अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची तपासणी करता येईल आणि अशा अभिलेखाचा अर्थ लावण्यासाठी किंवा त्याची पडताळणी करण्यासाठी आवश्यक असे कोणतेही प्रश्न विचारता येतील.

**१७. वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारीचा धंदा करणाऱ्या सावकाराकडे तारण ठेवलेल्या मालमत्तेची विल्हेवाट.–** (१) कलम १६ अन्वये केलेल्या अभिलेखाच्या व दस्तऐवजांच्या तपासणीनंतर वैध अनुज्ञप्तीशिवाय आपला सावकारीचा धंदा करण्याच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जाकरिता प्रतिभूती म्हणून कर्जदाराने सावकाराकडे तारण ठेवलेली मालमत्ता सावकाराच्या कब्जात आहे अशी जर तपासणी अधिकाऱ्याची खात्री पटली तर, तो तपासणी अधिकारी, सावकाराला अशा मालमत्तेचा कब्जा ताबडतोब त्याच्या स्वाधीन करण्यास फर्मावील.

(२) तपासणी अधिकाऱ्याकडे मालमत्ता स्वाधीन करण्यात आल्यानंतर, जर तो तपासणी अधिकारी जिल्हा निबंधक नसेल तर तो, ती मालमत्ता जिल्हा निबंधकाकडे सोपवील आणि जिल्हा निबंधक (जेव्हा तो तपासणी अधिकारी देखील असेल तेव्हा) त्या मालमत्तेची, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी ती स्वतःच्या अभिरक्षेत ठेवील.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये मालमत्ता स्वाधीन करण्यात आल्यावर जिल्हा निबंधक, तिची उचित पडताळणी करील व ओळख पटवील आणि त्यानंतर ती, ज्या कर्जदाराने ती तारण म्हणून दिली असेल त्याला, किंवा कर्जदार मरण पावला असेल तर त्याच्या ज्ञात वारसांना परत करील.

(४) कर्जदार किंवा त्याचा ज्ञात वारस यांचा शोध लागत नसेल तर, जिल्हा निबंधक मालमत्तेचा कब्जा घेतल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, विहित रीतीने, त्या मालमत्तेवरील दावे मागवणारी नोटीस प्रसिद्ध करील. उक्त कालावधी संपण्यापूर्वी, नोटिशीला उत्तर म्हणून किंवा अन्यथा, एखादा दावा प्राप्त झाल्यास तो, अशा दाव्यावर अभिनिर्णय देऊन तो दावा निकालात काढील. जर एखादा दावा कायदेशीर असल्याबद्दल जिल्हा निबंधकाची खात्री झाली तर तो, असा दावा करणाऱ्या व्यक्तीकडून मालमत्तेचा कब्जा मिळाल्याबाबतची पावती घेऊन ती मालमत्ता तिच्या कब्जात देईल; आणि मालमत्तेचा दावा करणाऱ्या व्यक्तीकडे अशा रीतीने मालमत्ता स्वाधीन करण्यामुळे जिल्हा निबंधक अशा मालमत्तेच्या इतर

कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत असलेल्या आपल्या दायित्वातून मुक्त होईल. जर दावा नाकारण्यात आला तर, ती मालमत्ता राज्य शासनाकडे सरकारजमा होईल.

(५) जेव्हा कर्जदाराने तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेचा कब्जा कोणत्याही कारणामुळे (तिची ओळख पटण्याच्या कारणासह) कर्जदाराला देणे शक्य नसेल तेव्हा, जर अशा कर्जदाराने किंवा, यथास्थिती, वारसाने त्या मालमत्तेचा दावा केलेला असेल तर, ज्या सावकाराकडे ती तारण म्हणून देण्यात आली होती त्या सावकारास अशा मालमत्तेचे मूल्य त्या कर्जदाराला किंवा तो मरण पावला असल्यास त्याच्या ज्ञात वारसाला देण्यास भाग पाडण्यात येईल. सावकाराने मूल्य देण्यात कसूर केल्यास, त्याच्याकडून ते मूल्य जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल, आणि मूल्याच्या वसुलीनंतर ते, ज्याने अशी मालमत्ता तारण म्हणून दिली होती त्या कर्जदारास किंवा यथास्थिती, त्याच्या वारसास देण्यात येईल.

(६) सावकार आणि कर्जदार किंवा, यथास्थिती, त्याचा वारस यांच्यामध्ये मालमत्तेच्या मूल्यासंबंधी किंवा तिची ओळख पटवण्यासंबंधीच्या प्रश्नावर मतभेद झाला तर, तो प्रश्न विभागीय निबंधकाकडे निर्णयार्थ सोपवण्यात येईल आणि त्या प्रश्नावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(७) मालमत्तेचे मूल्य, राज्य शासनाने त्याबाबतीत नेमलेल्या तज्ज्ञांच्या सेवेचे साहाय्य घेऊन ठरवता येईल. तज्ज्ञास, राज्य शासन किंवा त्याने नेमलेल्या, तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारा कोणताही अधिकारी, कोणत्याही क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या संबंधात, वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे ठरवील असे मानधन देता येईल.

**१८. सावकारीच्या ओघात संपादित केलेली स्थावर मालमत्ता परत करणे.-** (१) कलम १६ खालील पडताळणीच्या दरम्यान किंवा कलम १७ खालील तपासणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे, किंवा कर्जदाराच्या अर्जावरून किंवा अन्य रीतीने, जर त्या पडताळणीच्या किंवा तपासणीच्या दिनांकापासून अथवा कर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा वर्षांच्या आत, विक्री, गहाण, भाडेपट्टा, विनियम या रूपाने किंवा अन्य रूपाने सावकाराच्या कब्जात येणे अभिप्रेत असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ही, सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जाबद्दल कर्जदाराने सावकाराला प्रतिभूती म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या स्वरूपाची आहे, असे जिल्हा निबंधकास सकारण वाटत असेल तर, त्या जिल्हा निबंधकास, स्वतः किंवा या प्रयोजनासाठी विहित रीतीने नियुक्त करण्यात येईल अशा चौकशी अधिकाऱ्यामार्फत त्या व्यवहाराच्या स्वरूपाची आणखी चौकशी करता येईल.

(२) पोटकलम (१) अनुसार चौकशी करण्यात आल्यावर, सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जाबद्दल प्रतिभूती म्हणून स्थावर मालमत्ता सावकाराच्या कब्जात असल्याची जिल्हा निबंधकाची खात्री पटली तर, त्यास वेळोवेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कारणे लेखी नोंदवून तो संलेख किंवा अभिहस्तांतरणपत्र अवैध असल्याचे घोषित करता येईल आणि त्या मालमत्तेचा कब्जा, ज्याने तो संलेख किंवा ते अभिहस्तांतरणपत्र प्रतिभूती म्हणून निष्पादित केले असेल त्या कर्जदाराकडे किंवा, यथास्थिती, त्याच्या वारसाकडे किंवा उत्तराधिकाऱ्याकडे परत करण्याचा आदेश देता येईल.

(३) पोटकलम (२) अनुसार आदेश काढण्यापूर्वी अथवा निर्णय देण्यापूर्वी, जिल्हा निबंधक, संबंधित व्यक्तीस, त्याच्याकडून नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत आपल्या हरकती कोणत्याही असल्यास, मांडण्याची वाजवी संधी देईल व त्यास जर त्याची तशी इच्छा असेल तर, वैयक्तिक सुनावणी करता येईल.

(४) पोटकलम (२) खालील जिल्हा निबंधकाच्या आदेशाने किंवा निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या आदेशाच्या किंवा निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, विभागीय निबंधकाकडे अपील दाखल करता येईलः

परंतु, अर्जदाराने, त्या कालावधीत अपील दाखल करू न शकल्याबद्दल पुरेसे कारण देऊन विभागीय निबंधकाची खात्री पटविल्यास, त्यास एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देखील अपील दाखल करून घेता येईल.

(५) पोटकलम (४) अन्वये दाखल केलेल्या अपिलावर विभागीय निबंधकाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(६) पोटकलम (४) अन्वये तरतूद केलेल्या अपिलाच्या अधीनतेने, पोटकलम (२) अन्वये जिल्हा निबंधकाने काढलेला आदेश किंवा दिलेला निर्णय हा पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल आणि, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये जमिनीचे अभिलेख ठेवण्यासंबंधातील काम सोपविण्यात आलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याचे त्याच्या अभिलेखात अशा आदेशाची अंमलबजावणी करणे, हे कर्तव्य असेल.

**१९. अनुज्ञप्ती रद्द करण्याचा किंवा निलंबित करण्याचा न्यायालयाचा अधिकार.-** (१) (i) या अधिनियमाखालील एखाद्या अपराधासाठी एखाद्या सावकाराला दोषी ठरवणारा आदेश देणाऱ्या न्यायालयाची, किंवा

(ii) दाव्याची न्यायचौकशी करणाऱ्या न्यायालयाची-

जर अशी खात्री पटली की, त्या सावकाराने या अधिनियमाच्या तरतुदींचे अथवा नियमांचे असे उल्लंघन केले आहे की त्यामुळे तो सावकार त्या न्यायालयाच्या मते सावकारी करण्यास अयोग्य झाला आहे तर, त्या न्यायालयास,-

(a) त्या सावकाराने राज्यात धारण केलेल्या सर्व अनुज्ञप्त्या रद्द करण्यात याव्यात किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा मुदतीसाठी स्थगित ठेवण्यात याव्यात, असा आदेश देता येईल; आणि

(b) त्यास योग्य वाटल्यास, असा कोणताही सावकार किंवा जर असा कोणताही सावकार अविभक्त हिंदू कुटुंब, कंपनी किंवा विधिसंस्थापित नसलेली संस्था असेल तर, असे कुटुंब, कंपनी किंवा संस्था, तसेच असे कुटुंब, कंपनी किंवा संस्था करत असलेल्या सावकारीच्या धंद्याची व्यवस्था पाहण्यास जबाबदार असलेली कोणतीही व्यक्ती न्यायालयास योग्य वाटेल इतक्या मुदतीपर्यंत राज्यात कोणतीही अनुज्ञप्ती धारण करण्यास अपात्र आहे असे घोषित करता येईल :

परंतु, कोणत्याही सावकाराने धारण केलेली कोणतीही अनुज्ञप्ती स्थगित किंवा रद्द करण्यात आली असेल किंवा कोणत्याही सावकारास या कलमान्वये कोणतीही अनुज्ञप्ती धारण करण्यास अपात्र ठरविण्यात आले असेल त्याबाबतीत, त्यास, असा आदेश देणाऱ्या न्यायालयाच्या निर्णयावर सर्वसाधारणपणे ज्या न्यायालयाकडे अपील करता येते त्या न्यायालयाकडे अशा आदेशाविरुद्ध अपील करता येईल आणि असा आदेश देणाऱ्या न्यायालयास किंवा अपील न्यायालयास, योग्य वाटल्यास अपिलाचा निर्णय होईपर्यंत या कलमान्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

(२) जेव्हा न्यायालय या अध्यादेशाखालील अपराधाबद्दल सावकारास दोषी ठरवील अथवा पोटकलम (१) च्या खंड (ii) च्या उपखंड (a) किंवा (b) अन्वये आदेश देईल किंवा घोषित करील तेव्हा ते न्यायालय, दोषी ठरविण्यात आलेल्या सावकाराने किंवा अशा आदेशामुळे किंवा घोषणेमुळे बाधित झालेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने धारण केलेल्या सर्व

अनुज्ञप्तींवर दोषसिद्धीचा, आदेशाचा किंवा, यथास्थिती, घोषणेचा तपशील पृष्ठांकित करण्याची व्यवस्था करील आणि असा तपशील नोंदवह्यांमध्ये नोंदविण्याच्या प्रयोजनासाठी आपल्या आदेशाच्या किंवा घोषणेच्या प्रती, ज्यांनी अशी अुज्ञप्ती दिली होती त्या जिल्हा निबंधकांकडे पाठवण्याची व्यवस्था करील.

(३) पोटकलम (२) अनुसार पृष्ठांकनासाठी न्यायालयाने मागितलेली कोणतीही अनुज्ञप्ती, ती धारण करणारी व्यक्ती न्यायालय निर्दिष्ट करील अशा रीतीने व अशा मुदतीच्या आत सादर करील आणि जी कोणतीही व्यक्ती अशा रीतीने मागितलेली अनुज्ञप्ती वाजवी कारणाशिवाय सादर करण्यात कसूर करील ती दोष सिद्ध झाल्यानंतर, ज्या कालावधीपर्यंत कसूर चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल.

(४) या कलमान्वये न्यायालयास प्रदान करण्यात येणाऱ्या अधिकारांचा वापर, कोणत्याही अपील न्यायालयास किंवा पुनरीक्षण न्यायालयास करता येईल.

**२०. अनुज्ञप्ती स्थगित केल्याबद्दल किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीही भरपाई न मिळणे.–** या अध्यादेशान्वये कोणतीही अनुज्ञप्ती स्थगित किंवा रद्द करण्यात आली असेल त्याबाबतीत कोणत्याही व्यक्तीस भरपाई मिळण्याचा किंवा कोणतीही अनुज्ञप्ती शुल्क किंवा तपासणी शुल्क परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

**२१. अनुज्ञप्ती स्थगित किंवा रद्द करण्यात आल्याच्या कालावधीत व्यक्तींना सावकारीचा धंदा करण्यास मनाई.–** या अध्यादेशाच्या तरतुदींनुसार ज्या व्यक्तीची अनुज्ञप्ती स्थगित किंवा रद्द करण्यात आली असेल ती व्यक्ती, अनुज्ञप्ती स्थगित किंवा, यथास्थिती, रद्द करण्यात आली असेल त्या कालावधीत राज्यात सावकारीचा धंदा करण्यास अपात्र असेल.

**२२. ज्या व्यक्तीची अनुज्ञप्ती स्थगित किंवा रद्द करण्यात आली असेल तिने अनुज्ञप्तीवरील पृष्ठांकनाचा व अपात्रतेचा तपशील दिल्याशिवाय अर्ज न करणे.–** कलम १९ अन्वये ज्या व्यक्तीच्या अनुज्ञप्तीवर पृष्ठांकन करण्यात आले असेल किंवा जी व्यक्ती अनुज्ञप्ती धारण करण्यास अपात्र ठरविण्यात आली असेल ती व्यक्ती, अशा पृष्ठांकनाचा किंवा अपात्रतेचा तपशील दिल्याशिवाय अनुज्ञप्ती मिळण्यासाठी अर्ज करणार नाही किंवा अनुज्ञप्ती धारण करण्यास पात्र असणार नाही.

**२३. वचनपत्र, बंधपत्र इत्यादी वस्तुस्थितीनिदर्शक असणे.–** कोणताही सावकार, ज्यात कर्जाची प्रत्यक्ष रक्कम व व्याजाचा दर नमूद केलेला नसेल किंवा ज्यात अशी रक्कम चुकीची दिलेली असेल असे कोणतेही वचनपत्र, पोच, बंधपत्र किंवा इतर लेख स्वीकारणार नाही अथवा ज्या संलेखात दिनांक व कर्जाची रक्कम नमूद न करता निष्पादनानंतर भरण्यासाठी मोकळया जागा सोडलेल्या असतील असा कोणताही संलेख निष्पादित करणार नाही.

**२४. सावकाराचे हिशेब ठेवण्याचे व प्रती सादर करण्याचे कर्तव्य.–** (१) प्रत्येक सावकार विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने एक रोकडवही व खातेवही ठेवील.

(२) प्रत्येक सावकार-

(a) (i) ज्या दिनांकास कर्ज दिले त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कर्जाची रक्कम, कर्ज काढल्याचा दिनांक व ते परत करण्याचा अखेरचा दिनांक, कर्जासाठी प्रतिभूती असल्यास तिचे स्वरूप, कर्जदाराचे व

सावकाराचे नाव व पत्ता आणि आकारलेला व्याजाचा दर हे सुवाच्य व स्पष्ट शब्दात दर्शविणारे कोणत्याही मान्यताप्राप्त भाषेतील एक विवरणपत्र कर्जदाराला पाठवील किंवा पाठवण्याची व्यवस्था करील :

परंतु, जर सावकाराने कर्जदारास पासबुक पुरविलेले असेल तर त्याला कर्जदाराला असे विवरणपत्र देण्याची आवश्यकता असणार नाही, हे पासबुक विहित नमुन्यात असेल आणि त्यात कर्जदाराशी केलेल्या व्यवहाराचा अद्ययावत हिशेब नमूद करण्यात येईल;

(ii) उक्त मुदतीत, उप-खंड (i) मध्ये निर्दिष्ट केलेला तपशील असणारे विवरणपत्र सहायक निबंधकाकडे पाठवील किंवा पाठविण्याची व्यवस्था करील;

(b) कर्जाची पूर्णपणे फेड झाल्यावर, कर्जदाराने स्वाक्षरित केलेल्या प्रत्येक कागदावर कर्जाची फेड झाली आहे किंवा ते रद्द झाले आहे अशी खोडता न येण्यासारखी नोंद करील आणि कर्जासाठी कर्जदाराने प्रतिभूती म्हणून दिलेले प्रत्येक गहाण मुक्त करील, प्रत्येक ताबेगहाण परत करील; प्रत्येक लेख परत करील आणि प्रत्येक अभिहस्तांकनपत्र रद्द करील किंवा पुनः अभिहस्तांकित करील.

(३) पोटकलम (२) च्या खंड (a) च्या उपखंड (ii) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा सावकारांच्या वर्गाला आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रत्येक कालावधीत दिलेल्या सर्व कर्जाच्या संबंधात पोटकलम (२) च्या खंड (a) च्या उपखंड (i) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असलेले विवरणपत्र सहायक निबंधकाकडे पाठविण्याची किंवा पाठवण्याची व्यवस्था करण्याची परवानगी देता येईल, आणि असा आदेश देण्यात आल्यावर या पोटकलमात तरतूद केल्याप्रमाणे नियतकालिक विवरणपत्र पाठवण्याची निवड केलेला सावकार असा प्रत्येक कालावधी संपल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत असे विवरणपत्र पाठवील किंवा पाठवण्याची व्यवस्था करील.

(४) कोणताही सावकार कोणत्याही कर्जाच्या संबंधात कर्जदाराने दिलेल्या रकमेबद्दल साधी व संपूर्ण तपशील अंतर्भूत असलेली अशी पावती दिल्याशिवाय कर्जदाराकडून कोणतीही रक्कम स्वीकारणार नाही.

(५) कोणताही सावकार, वस्तूचे वर्णन, तिची अंदाजे किंमत, तिच्या बदल्यात दिलेली कर्जाची रक्कम व विहित करण्यात येईल असा अन्य तपशील अंतर्भूत असलेली, स्वाक्षरित केलेली साधी पावती कर्जदाराला दिल्याशिवाय कर्जदाराकडून कर्जाबद्दल अशी कोणतीही वस्तू तारण, ताबेगहाण किंवा प्रतिभूती म्हणून स्वीकारणार नाही. सावकार अशा पावत्यांच्या प्रतिलिपी एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवील.

**२५. सावकाराने लेखा विवरणपत्र व त्याच्या प्रती देणे.-** (१) प्रत्येक सावकार दरवर्षी, आपल्या प्रत्येक कर्जदारास, त्याच्याकडे थकित असलेल्या कोणत्याही रकमेच्या हिशेबाचे सुवाच्य विवरणपत्र पाठवील किंवा पाठवण्याची व्यवस्था करील. त्यावर त्या सावकाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची स्वाक्षरी असेल. या विवरणपत्रामध्ये पुढील बाबी दर्शविलेल्या असतील :-

(i) वर्षाच्या सुरुवातीस सावकाराला येणे असलेली मुद्दलाची रक्कम, व्याजाची रक्कम आणि कलम २६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या शुल्काची रक्कम;

(ii) त्या वर्षात दिलेल्या कर्जाची एकूण रक्कम;

(iii) त्या वर्षात परतफेड केलेली एकूण रक्कम; आणि

(iv) त्या वर्षाच्या अखेरीस येणे असलेली मुद्दलाची व व्याजाची रक्कम.

या विवरणपत्रावर सावकाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची स्वाक्षरी असेल आणि ते कोणत्याही मान्यताप्राप्त भाषेत असेल. ते विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी कर्जदारास पाठविण्यात येईलः

परंतु, सावकाराने कर्जदारास विहित नमुन्यातील व कर्जदाराशी केलेल्या व्यवहाराचा अद्ययावत हिशेब अंतर्भूत असलेले पासबुक पुरविलेले असेल तर, कर्जदारास असे विवरणपत्र देणे आवश्यक असणार नाही.

सावकार उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी खंड (i) ते (iv) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असणारे विवरणपत्र सहायक निबंधकाकडे पाठवील किंवा पाठविण्याची व्यवस्था करील.

(२) कोणत्याही विशिष्ट कर्जाच्या बाबतीत, त्या कर्जाची किंवा त्याच्या भागाची फेड करण्यात आलेली नसेल त्या कालावधीत कोणत्याही वेळी, कर्जदाराने लेखी मागणी केल्यावर व विहित केलेले शुल्क भरल्यावर, सावकार, कर्जदाराने अर्ज केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्या कर्जदारास किंवा कर्जदाराने मागणीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही मान्यताप्राप्त भाषेतील सावकाराने किंवा त्याच्या अभिकर्त्याने स्वाक्षरित केलेले आणि पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला संबंधित तपशील अंतर्भूत असलेले, विवरणपत्र पुरवील.

(३) कर्जदाराने लेखी मागणी केल्यावर आणि खर्चाची विहित रक्कम भरल्यावर, सावकार कर्जदारास किंवा त्याने त्या मागणीत यासंदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, सावकाराने कर्जदाराला दिलेल्या कर्जासंबंधातील किंवा त्यासाठीच्या प्रतिभूतीसंबंधातील कोणत्याही दस्तऐवजाची प्रत पुरवील.

(४) या कलमाच्या प्रयोजनाकरिता 'वर्ष' याचा अर्थ, सावकाराचे लेखे सर्वसाधारणतः ज्या वर्षाकरिता त्याच्या स्वतःच्या पुस्तकांमध्ये ठेवले जातात ते वर्ष, असा आहे.

**२६. कर्जदार व सहायक निबंधक यांस पुरविण्यात आलेल्या विवक्षित विवरणपत्रांसाठी शुल्क.–** कलम २४ च्या पोटकलम (२) अन्वये कर्जदारास पुरविलेल्या पासबुकाबद्दल अथवा कलम २४ च्या पोटकलम (३) अन्वये सहायक निबंधकाला पुरविण्यात आलेल्या विवरणपत्राच्या प्रतींबद्दल किंवा कलम २५ च्या पोटकलम (१) अन्वये कर्जदारास पुरविलेल्या लेखा विवरणपत्राबद्दल, तसेच उक्त पोटकलमान्वये सहायक निबंधकास पुरविण्यात आलेल्या, त्या विवरणपत्राच्या प्रतींबद्दल त्याला कर्जदाराकडून शुल्क वसूल करता येईल.

(२) असे शुल्क, विहित करण्यात येईल अशा दरांनी व अशा रीतीने, तथापि संबंधित वर्षात कर्जदाराला किंवा सहायक निबंधकाला कितीही विवरणपत्रे वा त्यांच्या प्रती पुरविलेल्या असल्या तरी, प्रत्येक कर्जदाराकडून दर वर्षाला कमाल दोन रुपये या अटीला अधीन राहून वसुलीयोग्य असेल.

**२७. लेख्यांची अचूकता कबूल करणे हे कर्जदारावर बंधनकारक नसणे.–** ज्याला कलम २४ अन्वये पासबुक देण्यात आले असेल किंवा कलम २५ अन्वये लेखा विवरणपत्र देण्यात आले असेल त्या कर्जदाराने ते अचूक असल्याबाबत किंवा नसल्याबाबत कळवणे हे त्याच्यावर बंधनकारक असणार नाही आणि त्याने तसे कळवले नाही म्हणून ते लेखे बरोबर आहेत असे मानण्यात येणार नाही.

**२८. कर्जासंबंधीच्या दाव्यात न्यायालयाने अनुसरावयाची कार्यपद्धती.–** त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, सावकाराने कर्जदाराविरुद्ध दाखल केलेल्या, ज्या दाव्यास हा अध्यादेश लागू आहे, अशा कोणत्याही दाव्यामध्ये,-

(a) न्यायालय, गुणवत्तेवरून दाव्याचा निर्णय देण्यापूर्वी, कलमे २४ व २५ यांच्या तरतुदींचे सावकाराने पालन केले आहे किंवा कसे हा वादप्रश्न विचारात घेऊन त्यावर निर्णय देईल;

(b) कलमे २४ व २५ यांच्या तरतुदींचे सावकाराने पालन केलेले नाही असे न्यायालयाच्या निदर्शनास आले तर, त्यास, वादीचा दावा पूर्णतः वा अंशतः शाबीत झाला असल्यास, प्रकरणाच्या परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, देय झालेले सर्व व्याज किंवा त्याचा कोणताही भाग नामंजूर करता येईल व त्याचा खर्च नामंजूर करता येईल.

**स्पष्टीकरण.–** ज्या सावकाराने विहित नमुन्यात व विहित रीतीने पावती दिलेली असेल किंवा लेखा विवरणपत्र वा पासबुक पुरविलेले असेल, त्यामध्ये कोणत्याही चुका असतील आणि नोंदी गाळलेल्या असतील आणि जर त्या चुका आणि गाळलेल्या नोंदी महत्त्वाच्या नाहीत अथवा लबाडीने त्या चुका करण्यात आलेल्या नाहीत वा नोंदी गाळण्यात आलेल्या नाहीत असे जर न्यायालयास आढळून आले तर, त्या पावतीमध्ये किंवा लेखा विवरणपत्रामध्ये वा पासबुकामध्ये जरी अशा चुका असल्या व नोंदी गाळलेल्या असल्या तरीही त्या सावकाराने कलम २४ किंवा, यथास्थिती, कलम २५ च्या तरतुदींचे पालन केले आहे असे समजण्यात येईल.

**२९. विवक्षित बाबतीत वसूल करण्याजोग्या व्याजाची मर्यादा ठरविण्याचा अधिकार.–** कोणत्याही करारात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, हा अधिनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या संबंधात हुकूमनाम्याच्या दिनांकास जी मुद्दलाची रक्कम देय असेल त्यापेक्षा अधिक रक्कम व्याज म्हणून देण्याबद्दल हुकूमनामा काढणार नाही.

**३०. हुकूमनाम्याची रक्कम हप्त्याने देण्यासाठी निदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार.–** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायर्णीत कर्जदाराने अर्ज केल्यावर, न्यायालयास हुकूमनामा धारण करणाऱ्या व्यक्तीस नोटीस देऊन नंतर केव्हाही असा निदेश देता येईल की, कर्जाबाबत न्यायालयाने न्यायनिर्णीत कर्जदाराविरुद्ध दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यात नमूद केलेली रक्कम न्यायनिर्णित कर्जदाराची परिस्थिती व हुकूमनाम्यात नमूद केलेली रक्कम लक्षात घेऊन न्यायालयास योग्य वाटतील अशा हप्त्यांमध्ये, अशा शर्तींना अधीन राहून व अशा दिनांकास देण्यात येईल- मग तो हुकूमनामा हा अधिनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी काढलेला असो किंवा नंतर काढलेला असो.

**३१. व्याजाच्या दरांवरील मर्यादा.–** (१) राज्य शासनास, प्रतिभूत केलेल्या किंवा न केलेल्या कर्जाच्या बाबतीत सावकाराने आकारावयाच्या व्याजाचे कमाल दर वेळोवेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, निश्चित करता येतील :

परंतु, अनुसूचित क्षेत्रांमध्ये सावकाराने आकारावयाचा व्याजाचा दर ग्रामसभेमार्फत निश्चित करण्यात येईल, जो शासनाने या पोट-कलमान्वये निश्चित केलेल्या कमाल व्याजदरापेक्षा अधिक असणार नाही.

(२) कोणत्याही सावकाराला, कर्जदार किंवा इच्छुक कर्जदाराकडून, दिलेल्या कर्जावर किंवा देण्याचा हेतू असलेल्या

कर्जावर, चक्रवाढ व्याजाच्या रूपाने कोणतीही रक्कम घेता येणार नाही किंवा पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने व्याजाच्या रूपाने कोणतीही रक्कम घेता येणार नाही.

(३) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, सावकार, कोणत्याही कर्जदाराला व्याजापोटी, कर्जाच्या मुद्दल रकमेपेक्षा अधिक रक्कम, आकारणार नाही किंवा त्यांच्याकडून वसूल करणार नाही, मग असे कर्ज या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी दिलेले असो किंवा त्यानंतर दिलेले असो.

(४) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने, पोटकलम (१) अन्वये ठरविलेल्या कमाल दरापेक्षा अधिक दराने व्याज देण्याबद्दल सावकार व कर्जदार या दोघांत झालेला कोणताही करार आणि पोटकलमे (२) व (३) यांच्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेला कोणताही करार कायदेशीर असणार नाही.

**३२. सावकारांनी कर्जाच्या संबंधातील खर्चावर आकार घेण्यास मनाई करणे.–** (१) जेथे उभय पक्षांमध्ये झालेल्या करारात मालमत्ता प्रतिभूती म्हणून किंवा गहाण म्हणून देण्याची अट समाविष्ट असेल आणि जेथे उभयपक्षांनी असा खर्च व त्याची भरपाई देण्याचे लेखी स्वरूपात कबूल केलेले असेल अथवा जेथे असा परिव्यय, आकार वा खर्च संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ (१८८२ चा ४) याच्या तरतुदींअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याअन्वये वसूल करण्याजोगा असेल त्याबाबतीत, कोणताही सावकार कर्जदाराकडून किंवा इच्छुक कर्जदाराकडून, मालमत्तेवरील हक्काचा तपास करण्यासाठी झालेला वाजवी खर्च, दस्तऐवजांची मुद्रांक व नोंदणी याबाबतचा खर्च आणि प्रत्यक्ष झालेला इतर नेहमीचा खर्च याव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम घेणार नाही.

(२) पोटकलम (१) चे उल्लंघन करून सावकाराने कर्जदाराकडून किंवा इच्छुक कर्जदाराकडून त्या पोटकलमामध्ये निर्दिष्ट केलेला परिव्यय, आकार किंवा खर्च म्हणून घेतलेली कोणतीही रक्कम त्या सावकाराकडून, कर्जदाराला किंवा, यथास्थिती, इच्छुक कर्जदाराला देय असलेले कर्ज म्हणून वसुलीयोग्य असेल अथवा ती रक्कम कर्जदाराला किंवा इच्छुक कर्जदाराला प्रत्यक्षात दिलेल्या कर्जातून वजावट केली जाण्यास पात्र असेल.

**३३. कर्जाचे अभिहस्तांकन करणे.–** (१) हा अधिनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर देण्यात आलेले कर्ज किंवा अशा कर्जाचे कोणतेही व्याज किंवा अशा कर्जाच्या वा व्याजाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही कराराचा लाभ किंवा घेतलेली प्रतिभूती, कोणत्याही अभिहस्तांकितीच्या नावे अभिहस्तांकित करण्यात आली असेल त्याबाबतीत तो अभिहस्तांकनकर्ता (मग तो पैसे कर्जाऊ देणारा सावकार असो किंवा जिच्याकडे अगोदर कर्ज अभिहस्तांकित केलेले आहे अशी कोणतीही व्यक्ती असो), अभिहस्तांकन करण्यापूर्वीः

(a) असे कर्ज, व्याज करार किंवा प्रतिभूती या अध्यादेशाच्या अमलाखाली येत आहे याबद्दल अभिहस्तांकितीस लेखी नोटीस देईल;

(b) अभिहस्तांकितीस या अध्यादेशाच्या तरतुदींचे पालन करणे शक्य व्हावे या दृष्टीने आवश्यक असलेली सर्व माहिती त्यास पुरवील; आणि

(c) कर्जाच्या अभिहस्तांकनाबद्दल कर्जदारास लेखी नोटीस देऊन अभिहस्तांकितीचे नाव व पत्ता त्यास कळवील.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, अशा उल्लंघनामुळे जिचे नुकसान होईल, अशा इतर कोणत्याही व्यक्तीस नुकसानभरपाई देण्यास जबाबदार राहील.

**३४. अभिहस्तांकितींना अध्यादेश लागू असणे.–** (१) यात यापुढे जी तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, हा अधिनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर सावकाराने कर्जाऊ दिलेल्या पैशाच्या बाबतीत, अथवा अशा कर्ज म्हणून दिलेल्या पैशावरील व्याजाच्या बाबतीत अथवा अशा कोणत्याही कर्जाच्या किंवा व्याजाच्या बाबतीत केलेल्या कोणत्याही कराराच्या, लाभाच्या किंवा घेतलेल्या प्रतिभूतीच्या बाबतीत सावकाराला देय असणारे कोणतेही कर्ज अभिहस्तांकित करण्यात आले असेल त्याबाबतीत, अभिहस्तांकिती सावकार असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा अभिहस्तांकितीस जणू तो सावकार असल्याप्रमाणे लागू होतील.

(२) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे कोणत्याही कारणासाठी असे कोणतेही अभिहस्तांकन अवैध असेल आणि अशा रीतीने अभिहस्तांकित केलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल कर्जदाराने कोणतेही पैशाचे प्रदान केलेले असेल किंवा मालमत्तेचे हस्तांतरण केलेले असेल तेथे, अशा प्रदानाच्या किंवा हस्तांतरणाच्या बाबतीत तो अभिहस्तांकिती या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी सावकाराचा अभिकर्ता असल्याचे मानण्यात येईल.

**३५. व्यवहारांची पुन्हा तपासणी करणे.–** त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सावकार व कर्जदार यांच्यामधील, ज्या दाव्यास हा अध्यादेश लागू आहे अशा कोणत्याही दाव्यात न्यायालय,-

(a) उभयपक्षात झालेल्या अगोदरच्या कोणत्याही व्यवहाराची किंवा कोणत्याही हिशेबाची पुन्हा तपासणी करील;

(b) दोन्ही पक्षांचे आपसातील हिशेब घेईल;

(c) कोणत्याही व्याजापोटी कर्जदारावर आकारलेली बेसुमार रक्कम कमी करील;

(d) हिशेब घेताना कर्जदाराकडून देय असलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम सावकारास मिळाली आहे असे आढळून आले तर, अशा रकमेच्या बाबतीत कर्जदाराच्या बाजूने हुकूमनामा काढील;

मग अशी सुनावणी एकतर्फी झालेली असो किंवा अन्यथा झाली असो :

परंतु, या अधिकारांचा वापर करताना न्यायालय,-

(i) ज्या दाव्यास हा अधिनियम लागू आहे अशा दाव्याच्या उभयपक्षांनी किंवा जिच्यामार्फत ते हक्क सांगतात अशा कोणत्याही व्यक्तीने पूर्वीचा व्यवहार बंद करून नवीन आबंधने निर्माण करण्याच्या उद्देशाने त्या दाव्याच्या दिनांकापासून सहा वर्षांपेक्षा अधिक काळानंतरच्या दिनांकास केलेले कोणतेही समायोजन किंवा करार याची पुन्हा तपासणी करणार नाही;

(ii) एखाद्या न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्याला बाधक ठरेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनाकरिता "बेसुमार व्याज" याचा अर्थ, कलम ३१ च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या दराने घेतलेले व्याज, असा आहे.

**३६. हिशेब घेणे व देय असलेली रक्कम ठरविणे याबाबत चौकशी.–** (१) कोणत्याही कर्जदारास, सावकाराकडून हिशेब घेण्याकरिता व सावकारास देय असलेली रक्कम ठरविण्याकरिता कोणत्याही वेळी न्यायालयाकडे अर्ज करता येईल- मग ते कर्ज देय झालेले असो वा नसो, असा अर्ज विहित नमुन्यात करण्यात येईल आणि त्यासोबत विहित शुल्क देण्यात येईल.

(२) असा अर्ज मिळाल्यावर न्यायालय सावकारास त्या अर्जाची नोटीस देण्याची व्यवस्था करील.

(३) अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास किंवा वेळोवेळी ज्या दिनांकास सुनावणी स्थगित करण्यात येईल, त्या दिनांकास न्यायालय चौकशी करील आणि दोन्ही पक्षांमध्ये झालेल्या कोणत्याही व्यवहाराचा हिशेब घेऊन, मुद्दल व व्याजापोटी कोणतेही असल्यास, कोणतीही रक्कम कर्जदाराकडून सावकारास अद्याप देय असल्यास, ती रक्कम कळवणारा आदेश काढील. या कलमान्वये हिशेब घेताना न्यायालय, कलमे २४ ते ३५ आणि कलम ३८ च्या तरतुदींचे अनुसरण करील.

**३७. सावकारास देय असलेली रक्कम न्यायालयात जमा करणे.-** (१) कर्जदारास, त्याच्याकडून सावकारास मुद्दलापोटी, व्याजापोटी किंवा मुद्दल व व्याज या दोहोंपोटी देणे असलेली कर्जाची कोणतीही रक्कम कोणत्याही वेळी सावकारास देता येईल.

(२) अशा रीतीने दिलेली कोणतीही रक्कम स्वीकारण्यास सावकाराने नकार दिला तर, कर्जदारास उक्त रक्कम न्यायालयात सावकाराच्या खाती जमा करता येईल.

(३) त्यानंतर न्यायालय या जमा केलेल्या रकमेबाबतची लेखी नोटीस सावकारावर बजावण्याची व्यवस्था करील आणि सावकारास, कर्जाची त्यावेळी देय असलेली रक्कम नमूद केलेला विनंतीअर्ज सादर केल्यावर आणि उक्त रक्कम स्वीकारण्याची आपली तयारी दर्शविल्यावर ती रक्कम घेता येईल आणि त्या रकमेचा सर्वप्रथम व्याजाची रक्कम फेडण्यासाठी आणि त्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिल्यास, तिचा मुद्दलाची रक्कम फेडण्यासाठी विनियोग करता येईल.

(४) सावकाराने ती रक्कम स्वीकारली नाही तर, न्यायालय त्या रकमेचा सर्वप्रथम व्याज फेडण्यासाठी आणि काही रक्कम शिल्लक राहिल्यास तिचा मुद्दल फेडण्यासाठी विनियोग करील.

**३८. व्याजाची परिगणना.-** पक्षकारांमध्ये कोणताही करार झालेला असला किंवा त्या त्या वेळी कोणताही कायदा अमलात असला तरी, एखाद्या कॅलेंडर महिन्याच्या कोणत्याही दिवशी एखाद्या कर्जदाराला कलम २४ अन्वये पासबुक पुरविण्यात आले असेल किंवा कलम २५ अन्वये विवरणपत्र पाठविण्यात आले असेल किंवा कलम ३६ अन्वये हिशेब घेण्यात आला असेल किंवा कर्जदाराने कलम ३७ अनुसार सावकाराला कर्जाच्या बाबतीत कोणतीही रक्कम देऊ केलेली असेल तर, जरी अशा कॅलेंडर महिन्याच्या कोणत्याही दिवशी असे विवरणपत्र पाठविण्यात आले असले किंवा पासबुक पुरविण्यात आले असले किंवा असे हिशेब घेण्यात आले असले तरी ती वस्तुस्थिती लक्षात न घेता, परतफेड करावयाच्या प्रत्यक्ष दिनांकापर्यंत देय असल्याप्रमाणे येणे असलेल्या व्याजाची परिगणना करण्यात येईल.

**३९. वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारी करण्याबद्दल शास्ती.-** जी कोणी व्यक्ती वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारीचा व्यवसाय करील त्या व्यक्तीला दोष सिद्ध झाल्यानंतर पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**४०. खोटे विधान करण्याबद्दल शास्ती.-** जी कोणी व्यक्ती अनुज्ञप्ती मिळण्याकरिता किंवा अनुज्ञप्तीचे नवीकरण करण्याकरिता केलेल्या अर्जामध्ये अथवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींद्वारे वा त्या तरतुदींच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही दस्तऐवजामध्ये, कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाबाबत एखादे विधान खोटे आहे हे माहीत असूनही बुद्धीपुरस्सर असे खोटे विधान करील त्या व्यक्तीला, दोष सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या

कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**४१. खोट्या नावाने अनुज्ञप्ती मिळवणे, अनुज्ञप्तीमध्ये नमूद न केलेल्या जागी सावकारी करणे, इत्यादी.-** जी कोणी व्यक्ती,-

(a) जे तिचे खरे नाव नाही अशा नावाने अनुज्ञप्ती मिळवील किंवा अशा प्रकारे मिळवलेल्या अनुज्ञप्तीवर सावकारीचा व्यवसाय करील, किंवा

(b) असा व्यवसाय करण्यास तिला प्राधिकृत करणाऱ्या अनुज्ञप्तीमध्ये नमूद केलेले नसेल अशा कोणत्याही जागी सावकारीचा व्यवसाय करील, किंवा

(c) वैध अनुज्ञप्तीशिवाय किंवा जे तिचे खरे नाव नाही अशा नावाने मिळवलेल्या अनुज्ञप्तीवर, सावकारीचा व्यवसाय करताना कोणताही करार करील,-

त्या व्यक्तीला, दोष सिद्ध झाल्यानंतर,-

(i) पहिल्या अपराधासाठी, एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील, आणि

(ii) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, खंड (i) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्तीव्यतिरिक्त, किंवा त्या शास्तीऐवजी, ती व्यक्ती कंपनी नसेल तेव्हा पाच वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची, आणि ती व्यक्ती कंपनी असेल तेव्हा, पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल.

**४२. वचनपत्र, बंधपत्र इत्यादींमध्ये चुकीची नोंद केल्याबद्दल शास्ती.-** जी कोणी व्यक्ती कलम २३ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**४३. कलम २४ किंवा २५ चे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.-** जी कोणी व्यक्ती कलम २४ किंवा २५ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल.

**४४. कलम ३१ चे उल्लंघन करून व्याज दर आकारण्याबद्दल शास्ती.-** जी कोणी व्यक्ती कलम ३१ चे उल्लंघन करून व्याज आकारील किंवा वसूल करील तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, जर तो तिचा पहिला अपराध असेल तर पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल.

**४५. उपद्रव दिल्याबद्दल शास्ती.-** जी कोणी व्यक्ती, कर्जदाराकडून सावकाराला देय असलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी कर्जदाराला उपद्रव देईल अथवा उपद्रव देण्यास अपप्रेरणा देईल त्या व्यक्तीस, दोष सिद्ध झाल्यानंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाच्या किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**स्पष्टीकरण.-** या कलमाच्या प्रयोजनासाठी, जी व्यक्ती, अन्य एखाद्या व्यक्तीने, जे कृत्य करण्याचा तिला हक्क आहे असे कोणतेही कृत्य करू नये किंवा जे कृत्य न करण्याचा तिला हक्क आहे असे कोणतेही कृत्य करावे या उद्देशाने,-

(a) अशा अन्य व्यक्तीस अडथळा करील किंवा तिच्यावर बळाचा वापर करील किंवा तिला धाकदपटशा दाखवील, अथवा

(b) अशा अन्य व्यक्तीचा जागोजागी पाठलाग करील, किंवा तिच्या मालकीच्या अथवा ती वापरत असलेल्या कोणत्याही मालमत्तेमध्ये ढवळाढवळ करील, किंवा तिला त्या मालमत्तेचा वापर करू देणार नाही किंवा तिचा वापर करण्यात अडथळा निर्माण करील, अथवा

(c) ज्या घरात किंवा इतर ठिकाणी अशी अन्य व्यक्ती राहत असेल किंवा काम करीत असेल किंवा व्यवसाय करीत असेल किंवा तेथे राहत असेल अशा कोणत्याही घराच्या किंवा इतर जागेच्या जवळपास भटकत राहील अथवा तिला त्रास होईल किंवा धाकदपटशा वाटेल असे कोणतेही कृत्य करील,

ती व्यक्ती अशा व्यक्तीस उपद्रव देते असे समजण्यात येईल :

परंतु, जी व्यक्ती, कर्जदाराच्या घरी अथवा ठिकाणी, केवळ माहिती मिळविण्यासाठी किंवा ती देण्यासाठी जाईल त्यास या कलमाच्या प्रयोजनार्थ उपद्रव असे मानण्यात येणार नाही.

**४६. शास्तीसंबंधी सर्वसाधारण तरतुदी.-** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर करील किंवा तिचे उल्लंघन करील, ती व्यक्ती त्याबाबत या अधिनियमात विशिष्ट शास्तीची तरतूद नसेल तर,-

(a) पहिल्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाच्या किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल; आणि

(b) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कोणत्याही प्रकारच्या कारावासाच्या किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**४७. महामंडळ इत्यादींकडून झालेले अपराध.-** या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणारी व्यक्ती, अविभक्त हिंदू कुटुंब किंवा कंपनी किंवा विधिसंस्थापित नसलेली संस्था असेल तर, अशा कुटुंबाच्या, कंपनीच्या किंवा विधिसंस्थापित नसलेल्या संस्थेच्या धंद्याच्या व्यवस्थेबद्दल जबाबदार असलेली व्यक्ती अशा उल्लंघनाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल.

**४८. विवक्षित अपराध दखलपात्र असणे.-** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी,-

(a) कलम ४ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कलम ३९ व ४१ अन्वये शिक्षापात्र असलेले अपराध, आणि

(b) कलम २३ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कलम ४२ अन्वये शिक्षापात्र असलेले अपराध; आणि

(c) उपद्रव देण्याच्या बाबतीत कलम ४५ अन्वये शिक्षापात्र असलेले अपराध,

हे दखलपात्र अपराध असतील.

**४९. पैशांसंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना कर्जदार शेतकऱ्यांना अटक किंवा कारावासाची शिक्षा न करणे.–** त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जो जातीने जमीन कसतो व ज्याचे कर्ज पंधरा हजार रुपयांहून अधिक नाही अशा कर्जदारास सावकाराच्या बाजूने केलेल्या पैशासंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना अटक किंवा कारावासाची शिक्षा करण्यात येणार नाही- मग असा हुकूमनामा हा अधिनियम अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी काढलेला असो किंवा त्यानंतर काढलेला असो.

**स्पष्टीकरण.–** ''जातीने जमीन कसणे'' याचा अर्थ, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम (१९४८ चा ६७) याच्या कलम २ च्या खंड (vi) मध्ये किंवा अन्य कोणत्याही तत्सम अधिनियमामध्ये त्यास नेमून दिल्याप्रमाणे असेल.

**५०. प्रत्येक अधिकारी लोकसेवक असणे.–** या अधिनियमाच्या तरतुदींन्वये काम करणारा शासनाचा प्रत्येक अधिकारी, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**५१. सद्भावनेने करण्यात आलेल्या कृतींकरिता संरक्षण.–** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसाठी महानिबंधक किंवा कोणताही प्राधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**५२. सन १९४७ चा अधिनियम क्रमांक २८ याच्या तरतुदींची व्यावृत्ती.–** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमुळे, महाराष्ट्र कर्जदार शेतकरी साहाय्य अधिनियम (१९४७ चा २८) किंवा कर्जदार शेतकऱ्यांना साहाय्य देण्याबाबत अमलात असलेला तत्सम स्वरूपाचा कोणताही इतर कायदा याच्या तरतुदींना बाध येणार नाही आणि कोणतेही न्यायालय, ज्या कर्जाच्या बाबतीत उक्त अधिनियमान्वये किंवा, यथास्थिती, उक्त कायद्यान्वये कर्ज समायोजन कार्यवाही केली जाऊ शकते त्या कोणत्याही कर्जाच्या संबंधातील कोणताही दावा या अधिनियमान्वये विचारार्थ स्वीकारणार नाही किंवा या अधिनियमान्वये त्यासंबंधात कोणतीही कार्यवाही करणार नाही.

**५३. आपले अधिकार सोपविण्याचा राज्य शासनाचा अधिकार.–** राज्य शासनास, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास प्रदान करण्यात आलेले कोणतेही अधिकार, राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

**५४. नियम.–** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषकरून व वरील तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांत, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :-

(a) कलम ५ अन्वये अनुज्ञप्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, त्यात समाविष्ट करावयाचा आणखी तपशील आणि अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम व ती भरण्याची रीत;

(b) कलम ६ अन्वये अनुज्ञप्तीचा नमुना व त्याच्या शर्ती;

(c) कलम ७ अन्वये ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना;

(d) सावकाराकडे तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेवरील दावे मागवण्यासाठी कलम १७ च्या पोटकलम (४) अन्वये नोटीस प्रसिद्ध करावयाची रीत;

(e) कलम २४ च्या पोटकलम (१) अन्वये ठेवावयाची रोकडवही व खातेवही यांचा नमुना व त्या वह्या ज्या रीतीने ठेवावयाच्या ती रीत, पोटकलम (२) अन्वये ज्या नमुन्यात पासबुक देण्यात येईल, त्या पासबुकाचा नमुना आणि पोटकलम (५) अन्वये विहित करावयाचा इतर तपशील;

(f) कलम २५ च्या पोटकलम (१) अन्वये पुरविण्यात आलेल्या लेखा विवरणपत्राचा नमुना व पोटकलम (३) अन्वये द्यावयाची खर्चाची रक्कम;

(g) कलम २६ च्या पोटकलम (२) अन्वये द्यावयाचे शुल्क;

(h) कलम ३६ च्या पोटकलम (१) अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना व द्यावयाचे शुल्क;

(i) या अधिनियमान्वये विहित केलेली किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब अथवा या अधिनियमात ज्याबद्दल तरतूद केलेली नाही किंवा केलेली तरतूद अपुरी आहे आणि या अधिनियमान्वये तरतुदी अमलात आणण्याकरिता ज्याबाबत तरतूद करणे राज्य शासनाच्या मते आवश्यक आहे अशी इतर कोणतीही बाब;

(j) उपरोक्त नियमांपैकी कोणत्याही नियमांचे उल्लंघन करणे हा अपराध असेल व त्यास विहित केल्याप्रमाणे ज्या कमाल द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकेल अशा आशयाची तरतूद.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत झाले आणि अशा आशयाचा त्यांचा निर्णय त्यांनी **राजपत्रात** अधिसूचित केला तर तो नियम, अशा निर्णयाच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अमलात येईल किंवा यथास्थिती, तो अमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**५५. अडचणी दूर करण्याचा अधिकार.-** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या पोटकलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**५६. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.-** (१) मुंबई सावकार अधिनियम, १९४६ (१९४७ चा मुंबई ३१) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (देण्यात आलेली कोणतीही अनुज्ञप्ती यासह) ही, या अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, देण्यात आलेली अनुज्ञप्ती असल्याचे मानण्यात येईल.

**५७. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.-** (१) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश, २०१४ (२०१४ चा महा. अध्या. १) हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (देण्यात आलेली कोणतीही अनुज्ञप्ती यासह) ही, या अधिनियमान्वये करण्यात आलेली कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, देण्यात आलेली अनुज्ञप्ती असल्याचे मानण्यात येईल.

-----------

# ४२. महाराष्ट्र लॉटऱ्या (नियंत्रण व कर आकारणी) आणि बक्षीस स्पर्धा (कर आकारणी) अधिनियम

## (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ८२)

### (८ ऑक्टोबर १९५८)

### मुंबई राज्यातील लॉटऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत व कर बसविण्याबाबत आणि बक्षीस स्पर्धांवर कर बसविण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, मुंबई राज्यातील लॉटऱ्यांवर नियंत्रण ठेवणे आणि लॉटऱ्या व बक्षीस स्पर्धा यांवर कर बसविणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास महाराष्ट्र लॉटऱ्या (नियंत्रण व कर आकारणी) आणि बक्षीस स्पर्धा (कर आकारणी) अधिनियम असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून यासंबंधात नेमील त्या तारखेस अंमलात येईल.

**२. व्याख्या.-** या अधिनियमात, विषयात अगर संदर्भात काही प्रतिकूल नसेल तर-

(a) ''लॉटरी'' या संज्ञेत बक्षीस स्पर्धेचा समावेश होत नाही;

(b) ''पैसे' या संज्ञेत धनादेश किंवा इतर कोणताही परक्राम्य लेख, पोस्टल ऑर्डर किंवा मनीऑर्डर यांचा समावेश होतो;

(c) ''वृत्तपत्र'' या संज्ञेत कोणतेही कालिक, मासिक किंवा इतर नियतकालिका प्रकाशन यांचा समावेश होतो;

(d) ''बक्षीस स्पर्धा'' या संज्ञेचा अर्थ, बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४२) याच्या अर्थानुसार बक्षीस स्पर्धा असा समजावा;

(e) ''प्रवर्तक'' या संज्ञेचा अर्थ, बक्षीस स्पर्धेच्या संबंधात बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४२) याअन्वये बक्षीस स्पर्धा सुरू करण्यासाठी व चालविण्यासाठी लायसन्स मिळालेली व्यक्ती असा समजावा आणि लॉटरीच्या संबंधात त्या संज्ञेत मालक, व्यवस्थापक, आयोजक किंवा लॉटरीवर नियंत्रण ठेवणारी व ती चालविण्याविषयी निर्देशन करणारी कोणतीही व्यक्ती असा समजावा आणि वृत्तपत्रांद्वारे चालविण्यात येणाऱ्या लॉटरीच्या बाबतीत त्या संज्ञेत अशा वृत्तपत्राच्या प्रकाशकांचा समावेश होतो :

परंतु, राज्याबाहेर छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्रांतील किंवा प्रकाशनातील लॉटरीच्या बाबतीत, अशा वृत्तपत्रांच्या किंवा प्रकाशनाच्या प्रसाराचे किंवा वाटपाचे काम स्वाधीन असणारा त्याचा व्यवस्थापक किंवा प्रकाशकाचा अभिकर्ता हा, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता लॉटरीचा प्रवर्तक आहे असे समजले पाहिजे; आणि ''सुरू करणे'' या संज्ञेचा त्याप्रमाणे अर्थ लावला पाहिजे;

(f) ''राज्य'' या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र राज्य असा समजावा;

(g) ''तिमाही'' या संज्ञेचा अर्थ प्रत्येक वर्षाची १ जानेवारीपासून ३१ मार्चपर्यंतची, १ एप्रिलपासून ३० जूनपर्यंतची, १ जुलैपासून ३० सप्टेंबरपर्यंतची व १ ऑक्टोबरपासून ३१ डिसेंबरपर्यंतची तीन महिन्यांची मुदत असा समजावा;

(h) ''तिकीट'' या संज्ञेत, कोणत्याही लॉटरीच्या किंवा योजिलेल्या लॉटरीच्या संबंधात एखाद्या व्यक्तीस लॉटरीच्या संधीमध्ये भाग घेण्याच्या हक्काबद्दल पुरावा म्हणून असलेल्या कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश होतो.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता-

(a) छापण्यासंबंधीच्या उल्लेखामध्ये लिखाणासंबंधीचे किंवा शब्द दृश्य स्वरूपात मांडण्याच्या किंवा उद्‌धृत करण्याच्या दुसऱ्या कोणत्याही पद्धतीसंबंधीचे उल्लेख यांचा समावेश होतो असे समजले पाहिजे;

(b) कागद किंवा इतर गोष्टी या, जर त्यांचे, राज्यातील किंवा राज्याबाहेरील व्यक्तींना किंवा ठिकाणी वितरण करण्यात आले असेल तर वितरित करण्यात आल्या आहेत असे समजले पाहिजे आणि त्याप्रमाणे ''वितरण'' या संज्ञेचा अर्थ लावला पाहिजे; आणि

(c) जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, लॉटरीच्या संबंधात कोणती व्यक्ती प्रवर्तक आहे किंवा आहे असे समजले पाहिजे हे ठरविता येईल आणि त्याचा निर्णय अखेरचा असेल.

**३. सर्व लॉटऱ्या बेकायदेशीर असणे.-** या अधिनियमाद्वारे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर सर्व लॉटऱ्या बेकायदेशीर असतील.

**४. लॉटऱ्यांच्या संबंधात अपराध.-** (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये बेकायदेशीर असलेल्या; परंतु, या राज्यात किंवा इतर ठिकाणी सुरू केलेल्या किंवा सुरू करण्याचे योजिलेल्या कोणत्याही लॉटरीच्या संबंधात जी व्यक्ती-

(a) लॉटरीतील कोणतेही तिकीट, सोडत, नंबर किंवा आकडा काढण्याच्या संबंधी असलेली किंवा लागू होण्यासारखी कोणतीही घटना किंवा नैमित्तिक गोष्ट याबाबत कोणतीही रक्कम देण्याची किंवा कोणाताही माल देण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीच्या हिताकरिता कोणतीही गोष्ट करण्याची किंवा करण्यापासून परावृत्त होण्याची कोणतीही योजना जाहीर करील; किंवा

(b) लॉटरीच्या उपयोगाकरिता कोणतीही तिकिटे छापील; किंवा

(c) लॉटरीची कोणतीही तिकिटे अगर संधी विकील किंवा वितरित करील किंवा विकण्याचे किंवा वितरित करण्याच्या प्रयोजनासाठी देऊ करील अगर त्याबाबत जाहिरात देईल अथवा स्वतःजवळ बाळगील; किंवा

(d) (i) लॉटरीची कोणतीही जाहिरात; किंवा

(ii) लॉटरीतील बक्षिसे मिळविणाऱ्या व्यक्तींची किंवा बक्षिसे मिळालेल्या तिकिटांची यादी (मग ती पूर्ण असो वा नसो); किंवा

(iii) एखाद्या लॉटरीत किंवा इतर लॉटऱ्यांत लोकांनी भाग घ्यावा म्हणून त्यांचे मन वळविण्याच्या कामी ज्याचा उपयोग होऊ शकेल असा लॉटरी काढण्यासंबंधीचा किंवा नियोजित लॉटरी काढण्यासंबंधीचा

वर्णनात्मक मजकूर किंवा इतर रीतीने लॉटरीशी संबंध असलेला कोणताही मजकूर छापील किंवा प्रसिद्ध करील किंवा वितरित करील किंवा प्रसिद्ध करण्याच्या किंवा छापण्याच्या प्रयोजनाकरिता जवळ बाळगील; किंवा

(e) लॉटरीतील कोणतेही तिकीट किंवा लॉटरीची कोणतीही जाहिरात विकण्याच्या किंवा वितरित करण्याच्या प्रयोजनाकरिता राज्यात आणील किंवा ती पाठविण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीस कळवील; किंवा

(f) लॉटरीचे कोणतेही तिकीट किंवा संधी, हे विकण्यासंबंधी किंवा वितरित करण्यासंबंधी मिळालेला कोणताही पैसा अगर मौल्यवान वस्तू किंवा विक्रीची किंवा वितरणाची नोंद ठेवणारा कोणताही कागद किंवा धारण करणाऱ्या व्यक्तीची ओळख (पटविण्याचे साधन) राज्याबाहेर पाठवील किंवा पाठविण्याचा प्रयत्न करील; किंवा

(g) लॉटरी सुरू करण्याशी किंवा चालविण्याशी संबंध असलेल्या प्रयोजनांकरिता कोणत्याही जागा वापरील किंवा वापरू देईल; किंवा

(h) उपरिनिर्दिष्ट कोणतेही कृत्य कोणत्याही व्यक्तीस करावयास लावील किंवा लावण्याचा प्रयत्न करील;

ती प्रत्येक व्यक्ती, अपराधसिद्धीनंतर-

(i) पहिल्या अपराधाबद्दल, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस;

(ii) दुसऱ्या अपराधाबद्दल, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस; आणि

(iii) त्यानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस अगर या दोन्ही शिक्षांस; पात्र होईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये चालू केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत, जर आरोपी व्यक्ती असे सिद्ध करील की, ज्या लॉटरीसंबंधी कामकाज चालू असेल ती लॉटरी यथास्थिती, कलम ५ किंवा ६ अन्वये, बेकायदेशीर म्हणून समजली न जाणारी अशी लॉटरी होती आणि अभिकथित अपराधाच्या तारखेस लॉटरी सुरू करण्याच्या किंवा चालविण्याच्या संबंधात कलम ५ अगर ६ अन्वये पाळावयाच्या कोणत्याही शर्ती मोडल्या गेल्या नाहीत अशी आरोपीची समजूत होती आणि त्याची अशी समजूत होण्यास योग्य कारणे होती तर तो अपराधी आहे असे समजण्यात येता कामा नये.

**५. लायसन्स दिलेल्या करमणुकीच्या लॉटऱ्या बेकायदेशीर नसणे.-** (१) करमणुकीचा आनुषंगिक भाग म्हणून चालविलेली लॉटरी ही, तिच्या प्रवर्तकाने अशा लॉटरीबाबत लायसन्स मिळविले नसल्यास, बेकायदेशीर लॉटरी म्हणून समजण्यात आली पाहिजे.

(२) अशी लॉटरी सुरू करणे व ती चालविणे याबाबत प्रवर्तकाने पुढील शर्ती पाळल्या पाहिजेत :-

(a) करमणुकीपासून आलेल्या उत्पन्नाच्या सर्व रकमेमधून (यात लॉटरीच्या उत्पन्नाची रक्कम धरून)-

(i) लॉटरीच्या संबंधात झालेला खर्च वजा करता करमणुकीवरील खर्च

(ii) लॉटरीची तिकिटे छापण्यासाठी आलेला खर्च; आणि

(iii) लॉटरीची बक्षिसे विकत घेण्यामध्ये झालेल्या कोणत्याही खर्चामुळे लॉटरीच्या प्रवर्तकांना स्वतःकरिता

बाजूला काढून ठेवण्यास योग्य वाटेल अशी शंभर रुपयांपेक्षा जास्त नसेल अशी रक्कम असल्यास ती रक्कम,

वजा केल्यानंतर राहिलेल्या रकमेचा खाजगी नफ्याव्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरिता उपयोग करण्यात आला पाहिजे;

(b) लॉटरीची कोणतीही बक्षिसे पैशाच्या रूपातील बक्षिसे असता कामा नयेत;

(c) करमणूक ज्या जागी व्हावयाची असेल त्या जागेत आणि ज्या वेळात ती चालू असेल त्या वेळी असेल त्या व्यतिरिक्त, लॉटरीची तिकिटे किंवा संधी विकण्यात अगर देण्यात येता कामा नये; आणि लॉटरीचा निकालसुद्धा जाहीर करता कामा नये; आणि

(d) लॉटरीत भाग घेण्याकरिता दिलेल्या सवलती या लोकांना करमणुकीस हजर राहण्याकरिता दाखविण्यात आलेले एकमेव आमिष किंवा एकमेव महत्त्वाचे आमिष असता कामा नये.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शर्तींपैकी कोणतीही शर्त मोडण्यात आली तर लॉटरी सुरू करण्याशी किंवा चालविण्याशी संबंध असलेली प्रत्येक व्यक्ती अपराधसिद्धीनंतर-

(a) पहिल्या अपराधाबद्दल एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस;

(b) दुसऱ्या अपराधाबद्दल दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस; आणि

(c) त्यापुढील कोणत्याही अपराधाबद्दल तीन महिन्यांपर्यंत मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल :

परंतु, या कलमान्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीत (या अधिनियमाच्या तरतुदींचा) भंग त्याच्या नकळत घडून आला असे सिद्ध करणे हे बचाव म्हणून समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.-** हे कलम ज्या करमणुकीस लागू आहे त्या करमणुकी म्हणजे बाजार, तयार कामी विक्री, उत्सव प्रसंग आणि त्यासारख्या इतर करमणुकी होत, मग त्या एक दिवसापुरत्या मर्यादित असोत अगर दोन अगर अधिक दिवस चालणाऱ्या असोत.

**६. लायसन्स दिलेल्या खाजगी लॉटऱ्या बेकायदेशीर नसणे.-** (१) खाजगी लॉटरीच्या प्रवर्तकाने अशा लॉटरीसंबंधीचे लायसन्स मिळविले नसेल तर ती बेकायदेशीर लॉटरी आहे असे समजले पाहिजे.

(२) अशी लॉटरी सुरू करण्याच्या व ती चालविण्याच्या संबंधात, प्रवर्तकाने पुढील शर्ती पाळल्या पाहिजे :-

(a) विकून आलेल्या उत्पन्नाच्या रकमेतून छपाई व लेखनसामग्री यासाठी झालेला खर्च तेवढाच वजा करून बाकीच्या सर्व उत्पन्नाचा उपयोग तिकिटे अगर संधी घेणाऱ्या व्यक्तींना बक्षिसे देण्याची तरतूद करण्यासाठी करण्यात आला पाहिजे किंवा एखाद्या संस्थेच्या सदस्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या लॉटरीच्या बाबतीत एकतर वर सांगितल्याप्रमाणे बक्षिसांची तरतूद करण्यासाठी किंवा जे संस्थेचे उद्देश असतील त्या उद्देशांसाठी किंवा त्याचा काही भाग पूर्वोक्त बक्षिसांची तरतूद करण्यासाठी आणि राहिलेला भाग पूर्वोक्त अशा उद्देशांसाठी करण्यात आला पाहिजे;

(b) (i) यथास्थिती लॉटरी ज्या संस्थेच्या सदस्यांसाठी सुरू करण्यात आली असेल त्या संस्थेच्या जागेत किंवा

ज्या व्यक्तींसाठी ती सुरू करण्यात आली असेल त्या व्यक्ती ज्या जागेत काम करतात किंवा राहतात त्या जागेत, प्रकट रीतीने लावलेल्या त्या लॉटरीच्या नोटिशीखेरीज; आणि

(ii) काही तिकिटे असतील तर त्या तिकिटांवर असेल अशा त्या लॉटरीच्या जाहीर घोषणेखेरीज किंवा जाहिरातीखेरीज;

लॉटरीची कोणतीही लेखी नोटीस किंवा जाहिरात प्रकट रीतीने लावता, प्रसिद्ध करता किंवा वितरित करता कामा नये;

(c) प्रत्येक तिकिटाची अगर संधीची किंमत सारखी असली पाहिजे आणि कोणत्याही तिकिटाची किंमत त्यावर दिलेली असली पाहिजे;

(d) प्रत्येक तिकिटावर, प्रवर्तकांपैकी प्रत्येकाचे नाव व पत्ता आणि तिकिटे अगर संधी यांची विक्री प्रवर्तकांनी ज्या व्यक्तीपुरती मर्यादित केली असेल त्या व्यक्तीसंबंधीचे विधान आणि लॉटरीत मिळालेल्या बक्षिसांची रक्कम ही, प्रवर्तकांनी ज्या व्यक्तीला बक्षिसांचे तिकीट किंवा संधी विकली होती त्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला त्यांच्याकडून दिली जाणार नाही किंवा त्याच्या स्वाधीन केली जाणार नाही अशा अर्थाचे विधान, ही असली पाहिजेत; आणि कोणत्याही बक्षिसाची रक्कम, त्या विधानानुसार असेल, त्याव्यतिरिक्त देता कामा नये किंवा कोणाच्या स्वाधीन करता कामा नये;

(e) प्रवर्तकांनी, कोणतेही तिकीट किंवा संधी विक्री म्हणून असेल त्याव्यतिरिक्त आणि त्याची संपूर्ण किंमत मिळाल्याखेरीज देता कामा नये किंवा नेमून देता कामा नये आणि प्रवर्तकाला अशा रीतीने मिळालेला कोणताही पैसा अगर मूल्यवान वस्तू कोणत्याही परिस्थितीत परत करता कामा नये; आणि

(f) लॉटरीची कोणतीही तिकिटे पोस्टाने पाठविता कामा नयेत.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करण्यात आल्यास लॉटरीच्या प्रवर्तकांपैकी प्रत्येक व्यक्ती ही आणि त्या बाबतीत ज्या व्यक्तीकडून शर्तीचे उल्लंघन करण्यात आले असेल ती व्यक्ती प्रवर्तकांपैकी एक नसेल त्याबाबतीत ती व्यक्ती देखील, अपराधसिद्धी झाल्यावर-

(a) पहिल्या अपराधाबद्दल, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल, इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल;

(b) दुसऱ्या अपराधाबद्दल, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि

(c) त्यानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस अगर त्या दोन्ही शिक्षांस पात्र होईलः

परंतु, या कलमान्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीत, एखादी व्यक्ती लॉटरीची प्रवर्तक आहे याच केवळ कारणावरून ज्यावर आरोप ठेवण्यात आला असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत, उक्त अपराध आपल्या नकळत करण्यात आला असे त्याने सिद्ध करणे हा बचाव होईल.

**स्पष्टीकरण.-** या कलमाच्या कारणांसाठी-

(a) ''खाजगी लॉटरी'' या संज्ञेचा अर्थ, राज्यातील जी लॉटरी एकतर

(i) जुगार, पैज किंवा लॉटऱ्या यांच्याशी संबंध नसलेल्या उद्देशांसाठी स्थापन करण्यात आलेल्या व चालविण्यात आलेल्या एखाद्या संस्थेच्या सदस्यांसाठी; किंवा

(ii) ज्या व्यक्तींपैकी सर्व व्यक्ती त्याच जागेत काम करतात त्या व्यक्तींसाठी; किंवा

(iii) ज्या व्यक्तींपैकी सर्व व्यक्ती त्याच जागेत राहतात त्या व्यक्तींसाठी;

सुरू करण्यात आलेली असेल आणि (वरील सदस्यांपुरती) जिच्या तिकिटांची किंवा संधीची विक्री मर्यादित करण्यात आलेली असेल आणि ज्या व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्तीस लॉटरीच्या प्रवर्तकांना वरील तरतुदींन्वये तिकिटे किंवा संधी विकता येतात अशा व्यक्तींकडून आणि एखाद्या संस्थेच्या सदस्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या लॉटरीच्या बाबतीत, ज्या व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्ती ही, त्या संस्थेच्या नियामक मंडळाने लॉटरी सुरू करण्याचा लेखी अधिकार दिलेली व्यक्ती आहे अशा व्यक्तींकडून जी सुरू करण्यात आली आहे अशी लॉटरी, असा समजावा, आणि

(b) ''संस्था'' या संज्ञेत क्लब, संस्था, संघटना किंवा कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारा व्यक्तींचा इतर संघ यांचा समावेश होतो आणि एखाद्या संस्थेची स्थानिक अगर संलग्न शाखा किंवा तिचा भाग हा, एक स्वतंत्र व निराळी संस्था म्हणून समजला पाहिजे.

**७. लायसन्स.-** या अधिनियमान्वये लॉटरीच्या बाबतीत दिलेले प्रत्येक लायसन्स, विहित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यांत जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात येईल.

**८. लायसन्ससंबंधीचे आदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.-** या अधिनियमात किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमामध्ये काहीही असले तरी, राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देऊन पुढील गोष्टी करणे कायदेशीर असेल-

(a) संपूर्ण राज्यात किंवा कोणत्याही क्षेत्रात, एखाद्या लॉटरीच्या किंवा लॉटरीच्या वर्गाच्या संबंधात लायसन्स देण्यास मनाई करणे;

(b) कोणत्याही क्षेत्रात जास्तीत जास्त किती लायसन्से द्यावयाची ती संख्या ठरविणे;

(c) अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेले कोणतेही लायसन्स राज्य शासनाच्या आगाऊ मान्यतेवाचून द्यावयाचे नाही असा निदेश देणे;

(d) या अधिनियमान्वये लायसन्स देणे अगर न देणे याविषयीच्या कोणत्याही बाबतीत राज्य शासनाला योग्य वाटतील अशा, इतर सूचना देणे.

**९. लायसन्स निलंबित किंवा रद्द करणे.-** (१) ज्या शर्तींना अधीन ठेवून लायसन्स दिले असेल त्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचा कोणताही भंग झाल्यास, किंवा

(२) कलम ५ किंवा ६ यांत विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन, असे लायसन्स धारण करणाऱ्याने केल्यास, किंवा

(३) कलम १० अन्वये देण्याजोगा असलेला कोणताही कर प्रवर्तकाने योग्य रीतीने न भरल्यास, किंवा

(४) असे लायसन्स धारण करणाऱ्याने कलम १४ च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केल्यास, किंवा

(५) ज्या इतर कोणत्याही कारणासाठी लायसन्स निलंबित करणे किंवा रद्द करणे हे राज्य शासनाच्या मते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल त्या कारणासाठी;

या अधिनियमान्वये लॉटरीच्या संबंधात दिलेले लायसन्स, जिल्हाधिकाऱ्यास तहकूब किंवा रद्द करता येईल.

**१०. लॉटऱ्या व बक्षीस स्पर्धा यावर कर बसविणे.–** (१) (a) ज्या लॉटरीसाठी कलम ५ किंवा ६ अन्वये लायसन्स मिळविण्यात आले असेल त्या प्रत्येक लॉटरीच्या बाबतीत, अशा लॉटरीत मिळालेल्या किंवा येणे असलेल्या एकूण रकमेच्या २५ टक्के दराने, आणि

(b) बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४२) अन्वये लायसन्स मिळालेल्या प्रत्येक बक्षीस स्पर्धेच्या बाबतीत, अशा स्पर्धेत मिळालेल्या व ठेवून घेतलेल्या एकूण प्रवेश फीच्या ५ टक्के दराने, कर बसविण्यात येईल.

(२) हा कर, यथास्थिती, अशा लॉटरीच्या किंवा बक्षीस स्पर्धेच्या प्रवर्तकाकडून वसूल करण्यात येईल.

**११. राज्याबाहेर छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्रांतील व प्रकाशनांतील लॉटऱ्यांवर कर बसविणे.–** कलम १०मध्ये काहीही असले तरी, कलम ५ किंवा ६ अन्वये लायसन्स दिलेल्या, राज्याबाहेर छापलेल्या व प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्रातील किंवा प्रकाशनातील प्रत्येक लॉटरीच्या बाबतीत, लॉटरीच्या प्रवर्तकाने कलम १४ अन्वये केलेल्या अधिकथनात अशा लॉटरीच्या संबंधात मिळालेली असल्याचे किंवा येणे असल्याचे निर्दिष्ट केलेल्या रकमेवर, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, कलम १० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा अधिक नसलेल्या दराने किंवा वृत्तपत्राचा किंवा प्रकाशनाचा राज्यात होणारा खप किंवा वितरण लक्षात घेऊन ठोक रकमेत, कर आकारला पाहिजे.

**१२. कलम १० अन्वये बसविण्यात आलेल्या कराची परिगणना व वसुली.–** (१) कलम १० अन्वये लॉटरीच्या किंवा बक्षीस स्पर्धेच्या बाबतीत बसवावयाच्या कराच्या रकमेची परिगणना ही, कलम १४ अन्वये ठेवलेले हिशेब व जिल्हाधिकाऱ्यास सादर केलेली विवरणपत्रे किंवा त्याच्यासमोर लिहून दिलेले अधिकथन यावरून त्याला लॉटरीत किंवा बक्षीस स्पर्धेत मिळालेली किंवा येणे असलेली म्हणून दिसून येणाऱ्या एकूण रकमेवरून जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात आली पाहिजे.

(२) ज्या बाबतीत असे कोणतेही हिशेब ठेवण्यात आलेले नसतील किंवा अशी कोणतीही विवरणपत्रे सादर करण्यात आलेली नसतील किंवा असे अधिकथन लिहून देण्यात आलेले नसेल किंवा असे हिशेब, विवरणपत्रे किंवा अधिकथन जिल्हाधिकाऱ्याच्या मते खोटे किंवा चुकीचे असेल, त्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने आपल्या उत्तम न्यायबुद्धीनुसार हिशेब केला पाहिजे.

(३) कलम १० अन्वये बसविण्याजोगा असलेला कर हा, बक्षीस स्पर्धेच्या बाबतीत प्रत्येक तिमाहीच्या अखेरीपासून ३० दिवसांच्या आत आणि लॉटरीच्या बाबतीत, ज्या दिवशी अशा लॉटरीचा निकाल लावण्यात आला त्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत, भरला पाहिजे.

(४) जर कलम १० अन्वये द्यावयाचा कोणताही कर देणे बाकी राहिला तर जिल्हाधिकाऱ्याला त्याऐवजी, अशा रीतीने न भरलेल्या रकमेच्या दुपटीहून जास्त नसलेली रक्कम किंवा त्याहून कमी असून कराच्या रकमेपेक्षा जास्त असलेली कोणतीही रक्कम, त्यास वसूल करणे वाजवी वाटेल त्याप्रमाणे वसूल करता येईल.

**१३. लायसन्स फी व इतर येणे असलेल्या रकमा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असणे.–** या अधिनियमान्वये फी किंवा कर म्हणून देण्याजोग्या असलेल्या सर्व रकमा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असतील.

**१४. लॉटरीच्या किंवा बक्षीस स्पर्धेच्या प्रवर्तकाने हिशेब ठेवणे व ते सुस्थितीत ठेवणे, विवरणपत्रे सादर करणे आणि अधिकथने लिहून देणे.–** (१) कोणत्याही प्रकारची लॉटरी किंवा बक्षीस स्पर्धा चालविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने असा लॉटरीसंबंधीचे किंवा स्पर्धेसंबंधीचे हिशेब ठेवले पाहिजेत आणि ते सुस्थितीत ठेवले पाहिजेत आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा मुदतीत जिल्हाधिकाऱ्याला विवरणपत्रे सादर केली पाहिजेत :

परंतु, बक्षीस स्पर्धेच्या बाबतीत, बक्षीस स्पर्धा अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४२) अन्वये ठेवलेले हिशेब व लायसन्स देणाऱ्या प्राधिकाऱ्याला सादर केलेली त्याबाबतची विवरणपत्रे ही, या कलमान्वये यथास्थिती, ठेवावयाचे हिशेब किंवा सादर करावयाची विवरणपत्रे आहेत असे समजण्यात येईल.

(२) राज्याबाहेर छापलेल्या किंवा प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्रात किंवा प्रकाशनात असलेल्या लॉटरीच्या बाबतीत अशी लॉटरी चालविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा मुदतीसाठी अधिकथन लिहून दिले पाहिजे.

**१५. हिशेब ठेवण्यात, विवरणपत्रे सादर करण्यात किंवा अधिकथन लिहून देण्यात कसूर केल्याबद्दल किंवा खोटे हिशेब ठेवल्याबद्दल, खोटी विवरणपत्रे सादर केल्याबद्दल व खोटे अधिकथन लिहून दिल्याबद्दल शिक्षा.–** जर-

(a) कलम १४, पोट-कलम (१) अन्वये हिशेब ठेवण्यास व सुस्थितीत ठेवण्यास किंवा विहित केलेल्या रीतीने व अशा मुदतीची विवरणपत्रे सादर करण्यास जबाबदार असलेला लॉटरीचा किंवा बक्षीस स्पर्धेचा कोणताही प्रवर्तक, हिशेब ठेवण्यात किंवा अशा रीतीने विवरणपत्रे सादर करण्यात कसूर करील, किंवा जे खोटे आहेत असे त्यास माहीत असेल किंवा वाटण्यास कारण असेल असे हिशेब ठेवील किंवा अशी विवरणपत्रे सादर करील; किंवा

(b) कलम १४, पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या रीतीने व अशा मुदतीसाठी अधिकथन लिहून देण्यास जबाबदार असलेला लॉटरीचा कोणताही प्रवर्तक अधिकथन लिहून देण्यात कसूर करील किंवा जे खोटे आहे असे त्यास माहीत असेल किंवा वाटण्यास कारण असेल असे अधिकथन लिहून देईल,

तर त्यास, अपराधसिद्धीनंतर, रुपये ५०० पर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**१६. बेकायदेशीर लॉटऱ्या असलेली वृत्तपत्रे व प्रकाशने जप्त करणे.–** जेव्हा कोणत्याही वृत्तपत्रात किंवा प्रकाशनात, मग ते कोठेही छापलेले किंवा प्रसिद्ध केलेले असो, बेकायदेशीर लॉटरी असेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्यास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशी लॉटरी असलेल्या वर्तमानपत्राच्या अंकाची प्रत्येक प्रत किंवा अशा प्रकाशनाची प्रत्येक प्रत राज्य शासनाकडे जप्त करण्यात यावी असे जाहीर करता येईल.

**१७. हिशेब हजर करण्यास फर्माविण्याचा किंवा हिशेब तपासण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.–** जिल्हाधिकाऱ्यास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, सर्व वाजवी वेळी-

(१) लॉटरीच्या अगर बक्षीस स्पर्धेच्या कोणत्याही प्रवर्तकास हिशेब किंवा इतर कागदपत्र आपल्यापुढे हजर करण्याबद्दल किंवा कोणतीही इतर माहिती पुरविण्याबद्दल फर्माविता येईल, किंवा

(२) अशा कोणत्याही प्रवर्तकाचे हिशेब तपासता येतील.

**१८. प्रवेश करण्याचा व झडती घेण्याचा अधिकार.-** (१) बृहन्मुंबईत सार्जंटच्या अथवा फौजदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या आणि सर्वसाधारण लेखी आदेशावरून अधिकार मिळालेल्या अथवा पोलीस आयुक्त, मुंबई, यांनी प्रत्येक बाबतीत काढलेल्या खास अधिकारपत्रावरून अधिकार मिळालेल्या, आणि

(२) इतरत्र, प्रत्येक बाबतीत पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याने अथवा जिल्हा पोलीस अधीक्षकाने अथवा याबाबत राज्य शासनाकडून खास अधिकार मिळालेल्या जिल्हा पोलीस सहायक अधीक्षकाने अथवा उप-अधीक्षकाने काढलेल्या खास अधिपत्रावरून अधिकार मिळालेल्या फौजदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या,

पोलीस अधिकाऱ्याने,

(a) कोणतीही लॉटरी चालविण्याशी अथवा तिची व्यवस्था ठेवण्याशी संबंध असलेल्या कोणत्याही कारणांसाठी वापरण्यात येते असा संशय येण्यास त्यास कारण असेल अशा कोणत्याही घरात, खोलीत अथवा जागेत आवश्यक असल्याचे आढळून येईल इतक्या व्यक्तींच्या मदतीने, रात्री अगर दिवसा आणि जरूर पडल्यास जबरदस्तीने प्रवेश करणे;

(b) त्याने अशा रीतीने प्रवेश केलेल्या घरांच्या, खोलीच्या अथवा जागेच्या सर्व भागांची, त्यास तेथे आढळलेल्या व्यक्तींची तसेच अधिपत्रात नावानिशी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा व्यक्तींची झडती घेणे;

(c) अशा सर्व व्यक्तींना ताब्यात घेणे व दंडाधिकाऱ्यांपुढे हजर करणे;

(d) लॉटरीच्या संबंधात वापरण्यात आल्या असल्याविषयी अगर वापरण्याचा इरादा असल्याविषयी वाजवी संशय असलेल्या सर्व वस्तूंचे अभिग्रहण करणे;

हे कायदेशीर असेल :

परंतु, संबंधित पोलीस आयुक्ताची, दंडाधिकाऱ्याची किंवा जिल्हा पोलीस सहायक अधीक्षकाची अथवा उप-अधीक्षकाची त्याच्याकडे, शपथपूर्वक कोणतीही तक्रार करण्यात आल्यावर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी त्याने चौकशी केल्यानंतर बेकायदेशीर लॉटरी चालविण्याशी अथवा तिच्या व्यवस्थेशी संबंध असलेल्या कारणांसाठी उक्त घराचा, खोलीचा अगर जागेचा उपयोग करण्यात येत असल्याचा संशय घेण्यास वाजवी कारणे आहेत अशी त्याची खात्री झाल्याशिवाय कोणत्याही अधिकाऱ्यास खास अधिपत्रावरून प्राधिकृत करण्यात येता कामा नये.

**१९. झडत्या कशा घ्यावयाच्या.-** कलम १८ अन्वये घ्यावयाच्या सर्व झडत्या फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) तरतुदींनुसार घेतल्या पाहिजेत.

**२०. विवक्षित बाबतीत अधिपत्रांवाचून अटक करण्याचा अधिकार.-** पोलीस अधिकाऱ्यास कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात अथवा रहदारीच्या रस्त्यात अथवा जेथे सर्व लोकांना जाता येते अथवा जाण्याची मुभा असते अशा कोणत्याही जागेत कलम ४, पोटकलम (१), खंड (a), (c) अथवा (d) अन्वयेंचा अपराध करीत असता अथवा करीत असल्याचा रास्त संशय असलेल्या कोणत्याही व्यक्तीस अधिपत्रावाचून अटक करता येईल.

**२१. तपास करण्याचा अधिकार.-** (१) फौजदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यास या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेल्या सर्व अपराधांचा तपास करता येईल.

(२) अशा प्रत्येक अधिकाऱ्यास असा तपास करण्याचे काम चालविताना फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) अन्वये दखलपात्र अपराधाचा तपास करण्याबाबतचे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांस दिलेले (कलम २० अन्वये असेल त्याव्यतिरिक्त इतर रीतीने अधिपत्रावाचून अटक करण्याच्या अधिकाराखेरीज) सर्व अधिकार चालविता येतील.

**२२. अपराध जामीनयोग्य असणे.–** या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेले सर्व अपराध जामीनयोग्य असतील.

**२३. अपराधांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता.–** इलाखा शहर दंडाधिकारी किंवा दुसऱ्या वर्गाचा दंडाधिकारी यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा असलेल्या कोणाही दंडाधिकाऱ्यास या अधिनियमान्वयेच्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही.

**२४. शासनास जिल्हाधिकाऱ्याची कामे करण्यास विवक्षित अधिकाऱ्यांना प्राधिकृत करता येईल.–** राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींन्वये जिल्हाधिकाऱ्याने करावयाची कामे करण्यास कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करता येईल.

**२५. कंपन्यांनी केलेले अपराध.–** (१) एखाद्या कंपनीने या अधिनियमाखालील अपराध केला असेल त्या बाबतीत, अपराध करण्याच्या वेळी कंपनीची प्रभारी व कंपनीचा धंदा चालविण्याबद्दल कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनी, अपराधाबद्दल दोषी आहे असे समजले पाहिजे आणि ते त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असतील :

परंतु, जर अशा कोणत्याही व्यक्तीने, अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व योग्य खबरदारी घेतली होती असे सिद्ध केल्यास ती या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केला असेल आणि कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूक संमतीने किंवा त्याने केलेल्या कोणत्याही हयगयीमुळे अपराध घडला आहे असे सिद्ध करण्यात आल्यास असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी आहे असेही समजले पाहिजे आणि त्याच्याविरुद्ध कामकाज चालविले जाण्यास व त्यानुसार शिक्षा केली जाण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनांसाठी-

(a) ''कंपनी'' या संज्ञेचा अर्थ निगम निकाय असा समजावा आणि तीत भागीदारी संस्था व व्यक्तींचा इतर संघ यांचा समावेश होतो; आणि

(b) भागीदारी संस्थेच्या संबंधात ''संचालक'' या संज्ञेचा अर्थ भागीदारी संस्थेतील भागीदार असा समजावा.

**२६. जिल्हाधिकारी व इतर अधिकारी यांनी राज्य शासनाच्या आदेशास अधीन राहून काम करणे.–** जिल्हाधिकारी व कलम २४ अन्वये रीतसर अधिकार मिळालेले इतर अधिकारी यांनी या अधिनियमावरून अथवा त्याअन्वये, त्यास मिळालेले अधिकार वापरले पाहिजेत व लादलेली कामे, राज्य शासन वेळोवेळी देईल अशा आदेशांस अनुसरून पार पाडली पाहिजेत.

**२७. अधिकारी लोकसेवक असणे.–** या अधिनियमान्वये काम करणारे सर्व अधिकारी हे भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) च्या २१ व्या कलमाच्या अर्थाप्रमाणे लोकसेवक म्हणून समजण्यात येतील.

**२८. सद्‌भावनेने काम करणाऱ्या व्यक्तींस द्यावयाचे संरक्षण आणि दावे व खटले यांची मुदत मर्यादा.–** (१) या अधिनियमान्वये अथवा त्याअन्वये केलेल्या नियमांन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

(२) राज्याविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही आणि या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही कृत्यासंबंधाने शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही खटला अगर दावा हा, ज्यासंबंधी तक्रार केली असेल ते कृत्य घडल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत उक्त दावा अगर खटला न केल्यास, करता कामा नये.

**२९. अपील आणि पुनरीक्षण.–** (१) जिल्हाधिकाऱ्याने अथवा कलम २४ अन्वये अधिकार मिळालेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशाविरुद्ध आयुक्ताकडे अथवा याबाबत राज्य शासनाकडून नेमण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) या कलमाखालील अपिलात दिलेला प्रत्येक आदेश, पोट-कलम (३) वरून मिळालेल्या पुनरीक्षणाच्या अधिकारास अधीन राहून अखेरचा असेल आणि त्यास कोणत्याही न्यायालयात कोणत्याही दाव्यात अथवा इतर कामकाजात अगर अपिलात अथवा पुनरीक्षणात हरकत घेता येणार नाही.

(३) राज्य शासनाला कोणत्याही वेळी कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या कोणत्याही आदेशाचा अभिलेख किंवा त्याने नोंदलेले कामकाज अशा अधिकाऱ्याने अगर व्यक्तीने दिलेल्या अशा आदेशाचा कायदेशीरपणा अगर संयुक्तिकपणा द़र कामकाजांचा नियमबद्धपणा याबाबत स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी मागविता किंवा तपासता येईल आणि त्यासंबंधी आपणास योग्य वाटेल असा कोणताही आदेश देता येईल.

**३०. सूट.–** राज्य शासनास, ज्या बक्षीस स्पर्धेच्या किंवा लॉटरीच्या निव्वळ उत्पन्नाच्या पैशांचा विनियोग धर्मादाय प्रयोजनासाठी करावयाचा आहे अशा कोणत्याही बक्षीसस्पर्धेस या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीपासून पूर्णपणे किंवा अंशतः सूट देता येईल.

**३१. नियम.–** (१) राज्य शासनास **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः व मागील तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, शासनास पुढील बाबतीत नियम करता येतीलः-

(i) लायसन्सचा नमुना आणि कलम ७ अन्वये जी फी दिल्यानंतर ते देण्यात येईल ती फी आणि ज्या शर्तीस अधीन ठेवून ते देण्यात येईल त्या शर्ती;

(ii) हिशेब ज्या रीतीने ठेवले पाहिजेत व ते बाळगले पाहिजेत ती रीत व कलम १४ अन्वये हिशेबाची विवरणपत्रे ज्या नमुन्यात व ज्या मुदतीत सादर करावयाची असतील तो नमुना व ती मुदत.

(३) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये अशी तरतूद करण्याचा अधिकार आहे की, कोणत्याही अशा

नियमाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिद्धीनंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(४) या कलमान्वये केलेले नियम आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन असतील.

**३२. व्यावृत्ती.-** या अधिनियमातील कोणताही मजकूर-

(a) मुंबईचा रेसकोर्सच्या जागांबद्दल लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९१२ (१९१२ चा मुंबई ३) याच्या कलम ४ अन्वये ज्याला शर्यतीच्या जागेवर घोड्यांच्या शर्यती लावण्यासाठी लायसन्स दिले असेल अशा कोणत्याही जागेच्या मालकास, ती पट्ट्याने घेणारास अगर तिचा भोगवटा करणारास अथवा अशा मालकाने, पट्ट्याने घेणाराने अगर भोगवटा करणाराने लायसन्सात किंवा परवान्यात निर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त अधिनियमान्वये, टर्फ-कमिशन एजंटचा धंदा अगर व्यवसाय चालविता यावा म्हणून दिलेल्या लायसन्सान्वये किंवा परवान्यान्वये जी व्यक्ती बुक-मेकर अगर टर्फ-कमिशन एजंट म्हणून काम करते अशा कोणत्याही व्यक्तीस अगर अशा व्यक्तीने घेतलेल्या कोणत्याही पणाच्या अगर पैजेच्या पैशाबद्दल केलेल्या कोणत्याही नोंदीस;

(b) केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने चालविलेल्या लॉटरीस;

(c) राज्य शासनाने विशेषरीत्या प्राधिकृत केलेल्या लॉटरीस;

लागू असणार नाही.

**३३. सन १८६० चा अधिनियम ४५ याच्या कलम २९४-अ चे निरसन.-** भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) मुंबई राज्यास लागू असेल तेथवर, त्याच्या २९४-अ या कलमाच्या तरतुदी याद्वारे निरिसत करण्यात आल्या आहेत.

**३४. निरसन आणि व्यावृत्ती.-** पुढील अधिनियम म्हणजेच-

(१) मुंबईचा लॉटऱ्यांवर व बक्षीस स्पर्धांवर नियंत्रण ठेवण्याबाबत व त्यावर कर बसविण्याबाबत अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई ५४)

(२) सौराष्ट्राच्या लॉटऱ्यांवर व बक्षीस स्पर्धांवर नियंत्रण ठेवण्याबाबत व त्यावर कर बसविण्याबाबत अधिनियम, १९५१ (१९५१ चा सौराष्ट्र १६).

हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत :

परंतु, अशा रीतीने अधिनियम निरसित करण्यात आल्यामुळे अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वयेच्या पुढील गोष्टींना बाध येणार नाहीः-

(a) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अगोदरच संपादन केलेल्या किंवा उपर्जित झालेल्या किंवा पत्करलेल्या कोणत्याही हक्कास, विशेषाधिकारास, जबाबदारीस किंवा पात्रतेस;

(b) अशा हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, आबंधनाच्या किंवा दायित्वाच्या बाबतीत केलेल्या कोणत्याही कायदेशीर कारवाईस किंवा उपाययोजनेस किंवा;

(c) कोणताही कर किंवा फी बसविण्यास, आकारण्यास, जमा करण्यास किंवा परत करण्यास किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी देण्याजोगा असलेला कोणताही दंड लादण्यास किंवा वसूल करण्यास;

आणि जणू हा अधिनियम पारित झाला नसल्याप्रमाणे अशी कोणतीही कार्यवाही दाखल करण्याचा, चालू ठेवण्याचा किंवा निकालात काढण्याचा, आणि अशी कोणतीही उपाययोजना अमलात आणता येईल आणि असा कोणताही कर किंवा फी बसविता येईल, आकारता येईल किंवा जमा करता येईल किंवा परत करण्याचा आणि असा कोणताही दंड बसविता किंवा वसूल करता येईल.

तसेच, याद्वारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांन्वये दिलेला आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अमलात असलेले लॉटरीच्या संबंधातील कोणतेही लायसन्स, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमान्वये अंमलात असण्याचे चालू राहील.

----------

# ४३. महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१०

**महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा व्यक्तींबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम**

**ज्याअर्थी,** राज्यामध्ये वैद्यकीय सेवा-व्यक्तींच्या जीविताला इजा किंवा धोका निर्माण करणाऱ्या आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करणाऱ्या हिंसक कृत्यांमध्ये वाढ झाली होती, त्यामुळे वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि व्यावसायिक यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला होता, परिणामी राज्यातील या सेवांमध्ये मोठा अडथळा होत होता;

**आणि ज्याअर्थी,** वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करणे आणि अशा हिंसाचारातून होणाऱ्या वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेच्या हानीस किंवा नुकसानीस प्रतिबंध करणे आवश्यक झाले होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, आवश्यक त्या तरतुदी करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०१० रोजी महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, २०१० (२०१० चा महा. अध्या. १) प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १७ फेब्रुवारी २०१० पासून अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२. व्याख्या.-** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,- (a) ''वैद्यकीय सेवा-संस्था'' याचा अर्थ, जेथे रुग्णांवर उपचार करण्याची सुविधा असते आणि त्यांना भरती करून घेतले जाते किंवा जेथे सामान्यतः महिलांना बाळंतपणासाठी किंवा प्रसूतीशी संबंधित प्रसवपूर्व वा प्रसवोत्तर देखभालीसाठी अथवा तत्संबंधित प्रकरणांमध्ये भरती करून घेऊन त्यांच्या उपचाराची व्यवस्था करते असे कोणतेही खाजगी रुग्णालय आणि शारीरिक अथवा मानसिक असा

कोणताही आजार, दुखापत किंवा दुर्बलता असणाऱ्या व्यक्तींना भरती करून घेऊन त्यांच्या उपचाराची व्यवस्था करण्यासाठी असलेले किंवा तसा उद्देश असलेले आणि औषधोपचार किंवा शुश्रूषा किंवा या दोन्ही बाबी पुरविणारे खाजगी शुश्रूषालय यांसह, एकतर वैद्यकीय सेवा-संस्थेमध्ये किंवा फिरत्या वैद्यकीय पथकामार्फत किंवा वैद्यकीय तपासणी शिबिरे आयोजित करून व्यक्तींना वैद्यकीय सेवा पुरविते अशी, राज्य शासनाच्या अथवा केंद्र सरकारच्या अथवा स्थानिक संस्थेच्या नियंत्रणाखालील एखादी संस्था, असा आहे आणि त्यामध्ये आरोग्यधामाचाही समावेश होतो;

(b) वैद्यकीय सेवा-संस्थेच्या संबंधात ''वैद्यकीय सेवा-व्यक्ती'' यामध्ये,-

(i) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) च्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक नाही असा, वैद्यकीय सेवा-संस्थेमध्ये काम करणारा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी, व्यवसायी किंवा नोंदणीकृत व्यवसायी (तात्पुरती नोंदणी झालेल्या व्यवसायींसह);

(ii) महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४०) अन्वये जिची नोंदणी झालेली असेल, आणि भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत जी लोकसेवक नसेल अशी नोंदणीकृत परिचारिका;

(iii) वैद्यकीय विद्यार्थी;

(iv) परिचर्या विद्यार्थी; आणि

(v) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक नसेल असा, निमवैद्यकीय आरोग्यसेवक आणि आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी वैद्यकीय सेवा सदस्य संस्थेकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या कामावर घेतलेला अन्य सदस्य कर्मचारी किंवा आरोग्यसेवक,

यांचा समावेश होईल.

**स्पष्टीकरण.-** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी, व्यवसायी, नोंदणीकृत व्यवसायी, परिचारिका यांना महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. २८), महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४६), मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९ (१९६० चा मुंबई १२) आणि महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४०) यांमध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील;

(c) ''वैद्यकीय विद्यार्थी'' याचा अर्थ, जो वैद्यकीय व्यवसायाचे प्रशिक्षण घेत असेल किंवा त्या व्यवसायाचा अभ्यास करीत असेल, असा विद्यार्थी, असा आहे;

(d) ''फिरते वैद्यकीय पथक'' याचा अर्थ, वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी वापरण्यात येणारी, वैद्यकीय साधनसामग्रीने सुसज्ज असलेली रुग्णवाहिका, असा आहे;

(e) ''परिचर्या विद्यार्थी' याचा अर्थ, जो शुश्रूषा व्यवसायाचे प्रशिक्षण घेत असेल किंवा त्या व्यवसायाचा अभ्यास करीत असेल, असा विद्यार्थी, असा आहे;

(f) ''अपराधी'' याचा अर्थ, जी व्यक्ती एकतर स्वतः किंवा व्यक्तींच्या गटाचा किंवा संघटनेचा एक सदस्य किंवा

नेता या नात्याने, या अधिनियमाखालील हिंसाचाराचे कृत्य करील, ते करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(g) ''निम-वैद्यकीय आरोग्यसेवक'' याचा अर्थ, वैद्यकीय सेवा देणाऱ्या वैद्यकीय सेवा-व्यक्तीस साहाय्य करणारी व्यक्ती, असा आहे;

(h) ''मालमत्ता'' याचा अर्थ, कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या किंवा वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालकीची असलेली, किंवा त्यांच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेली, कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता किंवा वैद्यकीय साधनसामग्री किंवा वैद्यकीय यंत्रसामग्री, असा आहे;

(i) ''हिंसाचार'' याचा अर्थ, ज्या कृत्यामुळे, वैद्यकीय सेवा-संस्थेतील कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या जीवितास कोणतीही इजा, क्षती किंवा धोका पोहोचेल किंवा पोहोचू शकेल, किंवा अशी व्यक्ती आपले कर्तव्य बजावीत असताना जिला धाकदपटशा करण्यात येईल, अडवण्यात येईल किंवा तिच्या कामात अडथळा आणण्यात येईल किंवा एखाद्या वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेला हानी किंवा नुकसान पोहोचेल किंवा पोहोचू शकेल असे कृत्य, असा आहे.

**३. हिंसाचारास प्रतिबंध करणे.–** वैद्यकीय सेवा-व्यक्तीविरुद्धच्या कोणत्याही हिंसाचाराच्या किंवा वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करण्याच्या कृत्यास प्रतिबंध करण्यात येईल.

**४. शास्ती.–** जो, कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करून हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा ते करण्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशा कोणत्याही अपराध्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल, इतक्या कालावधीच्या कारावासाची आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

**५. अपराधाची दखल.–** या अधिनियमाखाली केलेला कोणताही अपराध, दखलपात्र व अजामीनपात्र असेल आणि तो, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाकडून न्याय चौकशी करण्यायोग्य असेल.

**६. मालमत्तेला झालेल्या हानी किंवा नुकसानीची भरपाई देण्याचे दायित्व.–** (१) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षेव्यतिरिक्त, अपराधी, कलम ५ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे न्यायालयाकडून निर्धारित करण्यात येईल अशा, मालमत्तेच्या झालेल्या हानीच्या किंवा नुकसानीच्या दुप्पट रकमेइतकी नुकसानभरपाई देण्यास पात्र असेल.

(२) जर अपराध्याने, पोटकलम (१) अन्वये लादलेली भरपाई दिली नसेल तर, ती रक्कम, जणू काही ती जमीन महसुलाची थकबाकी होती, असे समजून, वसूल करण्यात येईल.

**७. वैद्यकीय निष्काळजीपणामुळे बळी पडलेल्यांना साह्य व सल्ला देणारे प्राधिकरण.–** (१) वैद्यकीय निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे बळी पडलेल्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि योग्य अनुतोष मिळण्याकरिता समुचित मंचाचा त्यांनी अवलंब करावा यासाठी त्यांना साह्य व सल्ला देण्यासाठी राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्राकरिता, प्राधिकरणाची स्थापना करील.

(२) असे प्राधिकरण, वैद्यकीय, कायदा, ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मिळून बनलेले असेल.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या तज्ज्ञांच्या सेवा शर्ती आणि प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती ही राज्य शासन, या बाबतीत आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

**८. अधिनियम, इतर कोणत्याही कायद्याचे न्यूनीकरण करणार नाही.–** या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींव्यतिरिक्त असतील आणि त्यांचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील.

**९. सन २०१० च्या महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.–** (१) महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, २०१० (२०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती) हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

----------

# ४४. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०

**अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडीच विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यतः जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा अद्‌भुत शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकबाल करून त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच समाजात निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम**

**ज्याअर्थी,** नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथा, आणि भोंदू लोकांकडून केले जाणारे जादूटोण्याचे व भूतपिशाच्चाचे प्रयोग यांमुळे समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण होण्याच्या घटना सातत्याने उघडकीस येत असून त्यांचे प्रमाण अत्यंत भयावह होते;

**आणि ज्याअर्थी,** अशा नुकसानकारक प्रथा, चालीरीती, जादूटोणा आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथा व त्यांचे अनिष्ट परिणाम आणि त्यांचा प्रसार यांना परिणामकारक रीतीने प्रतिबंध घालण्यासाठी व त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती व भोंदू लोकांचा आपल्याकडे अद्‌भुत किंवा चमत्कारी उपाय किंवा शक्ती असल्याचा खोटा दावा आणि त्यांची समाजविघातक व नुकसानकारक कृत्ये यांमुळे समाजाची घडीच विस्कटण्याचा आणि अधिकृत व शास्त्रीय वैद्यकीय उपाय व उपचार यांवरील सर्वसामान्य लोकांच्या विश्वासाला तडा जाण्याचा धोका निर्माण झाला होता, आणि अज्ञानामुळे ते अशा भोंदू लोकांचा व जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींचा आश्रय घेत होते, अशा परिस्थितीत, अशा जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती व भोंदू लोक यांच्या कुटिल कारस्थानांना बळी पडण्यापासून सर्वसामान्य लोकांना वाचविण्यासाठी उचित व कठोर सामाजिक व कायदेविषयक उपाययोजना करणे शासनाला अत्यावश्यक झाले होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे असी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २६ ऑगस्ट २०१३ रोजी, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश, २०१३ (२०१३ चा महा. अध्या. १४) हा प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक २६ ऑगस्ट २०१३ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२. व्याख्या.-** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(a) ''संहिता'' याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) असा आहे;

(b) ''नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा'' याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने, या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या किंवा वर्णन केलेल्या कृतींपैकी कोणतीही कृती स्वतः करणे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून करवून घेणे किंवा त्या कृती करण्यास इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करणे, असा आहे;

(c) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(d) ''प्रचार करणे'' याचा अर्थ, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांच्याशी संबंधित किंवा त्याविषयी जाहिरात, साहित्य, लेख किंवा पुस्तक यांचे वितरण करणे किंवा ते प्रसिद्ध करणे, असा आहे आणि त्यामध्ये, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांच्या संबंधातील कोणतेही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपातील साहाय्य, अपप्रेरणा, सहभाग किंवा सहकार्य देणे यांचा समावेश होतो;

(e) ''नियम'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

(२) यात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, औषधिद्रव्ये व जादूटोण्याचे उपचार (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम, १९५४ (१९५४ चा २१) व संहितेमध्ये जे जे अर्थ नेमून देण्यात आले आहेत, ते ते अर्थ असतील.

**३. नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्यांचे समूळ उच्चाटन.-** (१) कोणतीही व्यक्ती एकतर स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत, या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद किंवा वर्णन केलेल्या, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा करणार नाही किंवा त्यांचे प्रचालन किंवा प्रचार किंवा आचरण करणार नाही किंवा प्रचालन, प्रसार किंवा आचरण, करावयास लावणार नाही.

(२) हा अधिनियम, अमलात आल्याच्या दिनांकापासून कोणत्याही व्यक्तीने स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा अशा स्वरूपाची कोणतीही कृती केली असेल आणि या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांची जाहिरात, आचरण, प्रचार किंवा प्रचालन केले तर, तो या अधिनियमाच्या तरतुदींखाली अपराध ठरेल आणि अशा अपराधासाठी दोषी असलेली व्यक्ती, दोषसिद्ध झाल्यानंतर सहा महिन्यांहून कमी नसेल परंतु, सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही कृतीस किंवा अपराधास अपप्रेरणा देईल किंवा कोणतीही कृती किंवा अपराध करण्याचा प्रयत्न करील, तिने तो अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि दोष सिद्ध झाल्यानंतर, तिला पोटकलम (२) मध्ये अशा अपराधासाठी जी शिक्षा असेल तीच शिक्षा करण्यात येईल.

(४) पोटकलम (२) खालील शिक्षापात्र अपराध हे दखलपात्र व अजामीनपात्र असतील.

**४. अपराधाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता.-** कलम ३ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी, महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या न्यायालयात चालविण्यात येणार नाही.

**५. दक्षता अधिकारी.-** (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, राज्याच्या कोणत्याही एक किंवा अनेक पोलीस ठाण्यात दक्षता अधिकारी म्हणून ओळखले जाणारे एक किंवा अनेक पोलीस अधिकारी, नियुक्त करता येतील :

परंतु, असा पोलीस अधिकारी हा पोलीस निरीक्षक, याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल.

(२) दक्षता अधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,-

(i) त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन किंवा भंग याचा तपास करणे व त्यास प्रतिबंध करणे, आणि त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामधील जवळच्या पोलीस ठाण्याकडे अशा प्रकरणांची तक्रार दाखल करणे; आणि अशा कृत्यास बळी पडलेल्या कुणाही व्यक्तीने अथवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने कोणत्याही पोलीस ठाण्याकडे तक्रार दाखल केली असता, त्यावर योग्यरित्या व वेगाने कार्यवाही होईल याची खातरजमा करणे व आवश्यक तो सल्ला, मार्गदर्शन आणि मदत संबंधित पोलीस ठाण्याला करणे;

(ii) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींचा खटला परिणामकारकपणे चालविण्यासाठी पुरावा गोळा करणे; आणि ज्या क्षेत्रामध्ये असे उल्लंघन झाले आहे किंवा केले जात आहे त्या क्षेत्रातील पोलीस ठाण्यात त्याबाबतची तक्रार दाखल करणे;

(iii) यासंबंधात राज्य शासनाकडून वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्याला नेमून देण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(३) पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला दक्षता अधिकारी आपली पदीय कर्तव्ये किंवा कामे पार पाडत असताना त्यात अडथळे आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धी झाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(४) दक्षता अधिकारी, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**६. प्रवेश करणे, झडती घेणे, इत्यादीचे अधिकार.-** (१) राज्य शासनाने, याबाबत वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण

किंवा विशेष आदेशांना अधीन राहून, दक्षता अधिकाऱ्याला, त्याच्या अधिकारितेतील क्षेत्राच्या स्थानिक मर्यादेत, त्याच्या क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्याच्या साहाय्याने-

(i) या अधिनियमाखालील अपराध केला आहे किंवा करण्यात येत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, अशा कोणत्याही ठिकाणी, सर्व वाजवी वेळी, त्यास आवश्यक वाटेल अशा साहाय्यांसह, कोणतेही असल्यास, प्रवेश करता येईल व झडती घेता येईल;

(ii) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही कृती किंवा गोष्ट करण्यासाठी जे वापरण्यात आले होते किंवा वापरण्यात येत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, असे कोणतेही साहित्य, उपकरण किंवा जाहिरात जप्त करता येईल;

(iii) खंड (i) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही जागेत आढळलेल्या कोणत्याही अभिलेखाची, कागदपत्राची किंवा इतर महत्त्वाच्या वस्तूची तपासणी करता येईल आणि जर ती या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध केल्याचा पुरावा म्हणून सादर करता येईल असे त्यास सकारण वाटत असेल तर, ती जप्त करता येईल.

(२) संहितेच्या तरतुदी, संहितेच्या कलम ९४ अन्वये काढलेल्या अधिपत्राच्या प्राधिकाराखाली केलेल्या कोणत्याही झडतीस व जप्तीस जशा लागू होतील, तशाच त्या, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही झडतीस किंवा जप्तीस, शक्य होईल तेथवर, लागू होतील.

(३) जर एखाद्या व्यक्तीने, पोटकलम (१) च्या खंड (ii) किंवा (iii) अन्वये काहीही जप्त केले असल्यास, ती व्यक्ती, शक्य तितक्या लवकर, त्याबाबत दंडाधिकाऱ्यास कळवील व त्याच्या अभिरक्षेसाठी दंडाधिकाऱ्याचे आदेश घेईल.

**७. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याची कलमे १५९ व १६० यांच्या तरतुदी लागू असणे.-** महाराष्ट्र पोलीस अधिनियमाची कलमे १५९ व १६० च्या तरतुदी, दक्षता अधिकाऱ्याने या अधिनियमांतर्गत सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना, असा अधिकारी हा जणू काही उक्त अधिनियमांतर्गत पोलीस अधिकारी असल्याचे समजून लागू असतील.

**८. संहितेच्या तरतुदी लागू असणे.-** या अधिनियमाखालील अपराधांच्या अन्वेषणाला व न्यायचौकशीला संहितेच्या तरतुदी लागू असतील.

**९. हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्यास पूरक असणे व न्यूनीकरण करणारा नसणे.-** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यास पूरक असतील व त्याचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील.

**१०. दोषसिद्धीची वस्तुस्थिती प्रसिद्ध करणे.-** (१) कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरली असेल त्याबाबतीत, अशा अपराध्याला सिद्धापराध ठरविणारे न्यायालय, असा अपराध जेथे घडला असेल तेथील स्थानिक वृत्तपत्रांमध्ये अशा व्यक्तीचे नाव व निवासाचे ठिकाण आणि अशा अपराध्यास या अधिनियमाखालील अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती, तसेच, जो तपशील प्रसिद्ध करण्याची परवानगी देणे न्यायालयास योग्य व उचित वाटेल असा अन्य तपशील, पोलिसांकडून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्यास सक्षम असेल.

(२) अशा आदेशाविरुद्ध दाखल केलेले अपील, कोणतेही असल्यास, अंतिमतः निकाली काढण्यात येईपर्यंत, पोटकलम (१) अन्वये अशी कोणतीही प्रसिद्धी करण्यात येणार नाही.

**११. नियम.-** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, नियम करता येतील.

(२) या अधिनियमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितिक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात, मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा त्यांचा निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अमलात येईल किंवा यथास्थिती, अमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**१२. व्यावृत्ती.-** (१) शंकानिरसनार्थ, असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट पुढील बाबींना लागू असणार नाही :-

(१) कोणत्याही धार्मिक वा आध्यात्मिक स्थळाच्या ठिकाणी घातलेल्या प्रदक्षिणा, यात्रा, परिक्रमा या प्रकारचे उपासनामार्ग तसेच वारकरी सांप्रदायाच्या व इतर वाऱ्या.

(२) हरिपाठ, कीर्तने, प्रवचने, भजने व इतर धार्मिक व पारंपरिक शास्त्रांचे तसेच प्राचीन विद्या व कलांचे शिक्षण, आचरण, प्रचार व प्रसार.

(३) दिवंगत संतांचे चमत्कार सांगणे, त्यांचा प्रसार, प्रचार व साहित्य वितरण करणे, तसेच शारीरिक व आर्थिक नुकसान न करणाऱ्या प्रकारचे धर्मगुरूंचे चमत्कार सांगणे, त्याचा प्रसार, प्रचार व साहित्य वितरण करणे.

(४) घर, मंदिर, दर्गा, गुरुद्वारा, पॅगोडा, चर्च किंवा इतर प्रार्थनास्थळ अशा ठिकाणी व्यक्तींकडून किंवा व्यवस्थापनांद्वारे शारीरिक व आर्थिक नुकसान न करणारे अशा प्रकारचे केले जाणारे प्रार्थना, उपासना व सर्व धार्मिक विधी.

(५) सर्व धार्मिक उत्सव, सण, विधी, प्रार्थना, मिरवणूक व त्यासंबंधातील इतर धार्मिक कृत्ये, अंगात येणे, कडक लक्ष्मी, व्रतवैकल्ये, उपवास, नवस बोलणे, मन्नत मागणे, मोहरम मिरवणूक इत्यादी सर्व धार्मिक विधी.

(६) धार्मिक विधीनुसार लहान मुलांचे कान व नाक टोचणे, जैन धर्मीयांद्वारा करण्यात येणारे केशलोचन या सारखे धार्मिक विधी.

(७) वास्तुशास्त्रानुसार तसेच जोशी-ज्योतिषी, नंदीबैलवाले ज्योतिषी व इतर ज्योतिषांद्वारे दिला जाणारा सल्ला, जमिनीखालचे पाणी सांगण्याबद्दल सल्ला.

(८) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करेल अशी वर नमूद केल्याव्यतिरिक्त कोणतीही परंपरागत धार्मिक विधी व कृत्ये.

(२) पोटकलम (१) च्या नोंद क्रमांक ८ नुसार शासनाने काढलेली कोणतीही अधिसूचना ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

**१३. सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ याचे निरसन व व्यावृत्ती.-** (१) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश, २०१३ (२०१३ चा महा. अध्या. १४) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला कोणताही आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिती काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

(कलम २(१) (b) पाहा)

१. भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला, दोराने किंवा साखळीने बांधून ठेवून तिला मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे, तिला पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे, मिरचीची धुरी देणे, त्या व्यक्तीला छताला टांगणे, त्याला दोराने किंवा केसांनी बांधणे, किंवा त्या व्यक्तीचे केस उपटणे, व्यक्तीच्या शरीरावर किंवा अवयवांवर तापलेल्या वस्तूंचे चटके देऊन इजा पोहोचविणे, व्यक्तीला उघड्यावर लैंगिक कृत्य करण्याची जबरदस्ती करणे, व्यक्तीवर अमानुष कृत्य करणे, व्यक्तीच्या तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा विष्ठा घालणे किंवा यांसारख्या कोणत्याही कृती करणे.

२. एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून, त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे; आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करून लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे.

३. अलौकिक शक्तीची कृपा मिळविण्याच्या हेतूने, ज्यामुळे जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे; आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे.

४. मौल्यवान वस्तू, गुप्त धन आणि जलस्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य आणि जादूटोणा करणे, आणि जारणमारण यांच्या नावाने व त्यासारख्या अन्य कारणाने नरबळी देणे, किंवा देण्याचा प्रयत्न करणे, किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे, त्याकरिता प्रवृत्त करणे, अथवा प्रोत्साहन देणे.

५. आपल्या अंगात अतींद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा एखाद्या व्यक्तीत अतींद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे, फसवणे व ठकवणे.

६. एखादी विशिष्ट व्यक्ती करणी करते, जादूटोणा करते किंवा भूत लावते किंवा मंत्रतंत्राने जनावरांचे दूध आटवते, असे सांगून त्या व्यक्तीबाबत तशी समजूत निर्माण करणे किंवा त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती अपशकुनी आहे किंवा रोगराई पसरण्यास कारणीभूत ठरणारी आहे असे भासवणे, अशा व्यक्तीचे जगणे मुश्किल करणे, त्रासदायक करणे वा कठिण करणे; एखादी व्यक्ती सैतान असल्याचे किंवा ती सैतानाचा अवतार असल्याचे जाहीर करणे.

७. जारणमारण, करणी किंवा चेटूक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे, किंवा तिच्या रोजच्या व्यवहारांवर बंदी घालणे.

८. मंत्रांच्या साहाय्याने भूतपिशाच्चांना आवाहन करून, किंवा भूतपिशाच्चांना आवाहन करीन अशी धमकी देऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराट निर्माण करणे, एखाद्या व्यक्तीला शारीरिक इजा होण्यास भुताचा किंवा अतींद्रिय शक्तीचा कोप असल्याचा समज करून देणे, आणि तिला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून, त्याऐवजी तिला अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे, जादूटोणा अथवा अमानुष कृत्ये करून किंवा तसा आभास निर्माण करून एखाद्या व्यक्तीला मृत्यूची भीती घालणे, शारीरिक वेदना करण्याची किंवा तिचे आर्थिक नुकसान करण्याची धमकी देणे.

९. कुत्रा, साप किंवा विंचू चावल्यास एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून, त्याऐवजी, मंत्रतंत्र, गंडेदोरे किंवा यांसारखे उपचार करणे.

१०. बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो असा दावा करणे किंवा गर्भवती स्त्रीच्या गर्भाचे लिंग बदल करून दाखवतो असा दावा करणे.

११.(a) स्वतःत विशेष अलौकिक शक्ती असल्याचे अथवा कुणाचा तरी अवतार असल्याचे वा स्वतःच पवित्र आत्मा असल्याचे भासवून किंवा त्याच्या नादी लागलेल्या व्यक्तीस पूर्वजन्मी तू माझी पत्नी, पती वा प्रेयसी, प्रियकर होता असे सांगून, अशा व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणे;

(b) मूल न होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्ती द्वारा मूल होण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे.

१२. एखाद्या मानसिक विकलांग व्यक्तीमध्ये अमानवी शक्ती असल्याचे भासवून त्याद्वारे अन्य व्यक्तीची लुबाडणूक करणे.

----------

# ४५. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२

(२०१२ चा अधिनियम क्रमांक ३२)

(१९ जून, २०१२)

**लैंगिक हमल्याच्या, लैंगिक छळवणुकीच्या व संभोगचित्रणाच्या (pornography) अपराधांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी आणि अशा अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ च्या खंड (३) मध्ये, इतर गोष्टींबरोबरच बालकांसाठी विशेष तरतुदी करण्याकरिता राज्याला अधिकार दिले आहे;

**आणि ज्याअर्थी,** संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने अंगिकारलेल्या बाल हक्कांबाबतच्या अभिसंधीस ११ डिसेंबर १९९२ रोजी भारत सरकारने मान्यता दिलेली असून ज्यामध्ये बालकांच्या सर्वोत्तम हिताचे संरक्षण करताना, सर्व राज्य पक्षकारांनी पालन करावयाची मानके विहित केलेली आहे;

**आणि ज्याअर्थी,** बालकांच्या योग्य विकासासाठी त्याच्या किंवा तिच्या खाजगीपणाच्या व गुप्ततेच्या हक्कांचे संरक्षण करण्याची आणि सर्व साधनांद्वारे आणि बालकाचा अंतर्भाव असणाऱ्या न्यायिक प्रक्रियेच्या सर्व टप्प्यांमध्ये प्रत्येक व्यक्तीने त्यांचा आदर करण्याची आवश्यकता आहे;

**आणि ज्याअर्थी,** बालकाचा निकोप शारीरिक, भावनिक, बौद्धिक व सामाजिक विकास करण्याची सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर बालकांच्या सर्वोत्तम हितास व कल्याणास सर्वोच्च महत्त्व देण्यात येत आहे अशा रीतीने कायद्याची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी,** बालकांच्या हक्कांबाबतच्या अभिसंधीच्या राज्य पक्षकारांनी पुढील गोष्टींस प्रतिबंध करण्यासाठी सर्व यथोचित राष्ट्रीय, उभयपक्षी व बहुपक्षीय उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहेः-

(a) कोणत्याही बेकायदेशीर लैंगिक कृत्यामध्ये सहभागी होण्यासाठी बालकास प्रलोभित करणे किंवा त्यास जबरदस्ती करणे;

(b) वेश्याकर्म करण्यामध्ये किंवा अन्य बेकायदेशीर लैंगिक व्यवसाय करण्यामध्ये बालकांचा शोषणकारी वापर करणे;

(c) संभोगचित्रणपर कार्यक्रमांमध्ये व साहित्यामध्ये बालकांचा शोषणकारी वापर करणे.

**आणि ज्याअर्थी,** बालकांचे लैंगिक शोषण व लैंगिक दुरुपयोग हे हिन दर्जाचे गुन्हे आहेत व त्यांचे प्रभावीपणे निर्दालन करण्याची गरज आहे,

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेसाष्टाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवोः-

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, बालकांसाठी विशेष तरतूद करण्यासाठी राज्याला अधिकार प्रदान केले आहे. याशिवाय, अनुच्छेद ३९ मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य हे, विशेषतः बालकांना व युवकांना शोषणापासून व उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे आणि बालकांना आरोग्यदायी रीतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात आपला विकास करण्याच्या सुविधा दिल्या जाव्यात याची सुनिश्चिती करण्याबाबत त्याचे धोरण आखील.

२. ११ डिसेंबर १९९२ रोजी भारताने अनुसमर्थन दिलेल्या बालकांच्या हक्कांबाबतच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या अभिसंधीद्वारे पुढील गोष्टींस प्रतिबंध करण्यासाठी सर्व यथोचित राष्टीय, उभयपक्षी व बहुपक्षीय उपाययोजना हाती घेण्यासाठी राज्य पक्षांना अनिवार्य केले आहे.

(अ) कोणत्याही बेकायदेशीर लैंगिक कृत्यामध्ये सहभागी होण्यासाठी बालकास प्रलोभित करणे किंवा त्यास जबरदस्ती करणे;

(ब) वेश्याकर्म करण्यामध्ये किंवा अन्य बेकायदेशीर लैंगिक व्यवसाय करण्यामध्ये बालकांचा शोषणकारी वापर करणे; आणि

(क) संभोगचित्रणपर कार्यक्रमांमध्ये व साहित्यामध्ये बालकांचा शोषणकारी वापर करणे.

३. राष्ट्रीय गुन्हे अभिलेख केंद्रो गोळा केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बालकांविरुद्धच्या लैंगिक अपराधांच्या प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे. यास, महिला व बाल विकास मंत्रालयाने केलेल्या "बालकांचा दुरुपयोग यावरील अभ्यास : भारत २००७" द्वारे पुष्टी देण्यात आली आहे. याशिवाय, बालकांविरुद्धच्या लैंगिक अपराधांचा विद्यमान कायद्याद्वारे पर्याप्तपणे मुकाबला करता येत नाही, अशा असंख्य अपराधांची त्यामध्ये तरतूद केलेली नाही किंवा पर्याप्त शिक्षेची तरतूद केलेली नाही. बालकांच्या पीडित तसेच साक्षीदार या दोहोंच्या हिताचे संरक्षण करण्याची गरज आहे. असे वाटते की, बालकांविरुद्धच्या अपराधांची सुस्पष्टपणे व्याख्या करण्याची आणि एक प्रभावी परावर्तक म्हणून त्यानुरुप शिक्षेद्वारे त्यांचा मुकाबला करण्याची गरज आहे.

४. म्हणून, न्यायिक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर बालकांच्या हिताचे व कल्याणाचे संरक्षण करण्याची, अपराधांचे वृत्त देण्यासाठी, पुरावा नोंदविण्यासाठी, अपराधांचे अन्वेषण व न्यायचौकशी करण्यासाठी बालहितैषी प्रक्रिया समाविष्ट करण्याची योग्य ती काळजी घेण्याबरोबरच लैंगिक हमल्याच्या, लैंगिक छळवणुकीच्या व संभोगचित्रणाच्या अपराधांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी आणि अशा अपराधांची जलदगतीने न्यायचौकशी करण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता एक स्वयंसमाविष्ट सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

५. लैंगिक दुरुपयोग व पिळवणूक यांपासून संरक्षणष सुरक्षा व रक्षण करण्यासाठी सर्व बालकांच्या हक्कांची अंमलबजावणी करण्याकरिता हे विधेयक योगदान देईल.

६. वरील उद्दिष्ट्ये साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास, लैंगिक अपराधांपासून व बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ असे म्हणावे.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्याखेरीज, संपूर्ण भारतास लागू असेल.

(३) तो, केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करील, अशा तारखेस अमलात येईल.

**२. व्याख्या.-** (१) या अधिनियमास, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(a) ''विकोपकारी अंतर्भेदी (penetrative) लैंगिक हमला'' यास, कलम ५ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;

(c) ''विकोपकारी लैंगिक हमला'' यास, कलम ९ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;

(c) ''सशस्त्र दले किंवा सुरक्षा दले'' याचा अर्थ, केंद्रीय सशस्त्र दले किंवा अनुसूचीमध्ये व्याख्या केलेली सुरक्षा दले किंवा पोलिस दले, असा आहे;

(d) ''बाल'' याचा अर्थ, अठरा वर्षे वयांखालील कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(e) ''कौटुंबिक नातेसंबंध'' यास, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (२००५ चा ४३) याच्या कलम २ च्या खंड (f) मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल;

(f) ''अंतर्भेदी लैंगिक हमला'' यास, कलम ३ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;

(g) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे;

(h) ''धार्मिक संस्था'' यास, धार्मिक संस्था (गैरवापरास प्रतिबंध) अधिनियम, १९८८ (१९८८ चा ४१) यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;

(i) ''लैंगिक हमला'' यास, कलम ७ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;

(j) ''लैंगिक छळवणूक'' यास, कलम ११ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल;

(k) ''सामाईक दर'' याचा अर्थ, जेथे अपराधाचा आरोप असलेली व्यक्ती, किंवा बालकाशी कौटुंबिक नातेसंबंध असताना राहत आहे, किंवा कोणत्याही वेळी राहिलेली आहे असे घर असा आहे;

(l) ''विशेष न्यायालय'' याचा अर्थ, कलम २८ अन्वये असे न्यायालय म्हणून नामनिर्दिष्ट केलेले न्यायालय, असा आहे;

(m) ''विशेष सरकारी अभियोक्ता'' याचा अर्थ, कलम ३२ अन्वये नियुक्त केलेला सरकारी अभियोक्ता, असा आहे;

(२) यात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले परंतु भारतीय दंड संहितेमध्ये (१८६० चा ४५) फौजदारी प्रक्रिया संहिता,

१९७३ (१९७४ चा २) मध्ये, बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० (२००० चा ५४) मध्ये व माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, उक्त संहितेमध्ये किंवा अधिनियमांमध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

## प्रकरण दोन

## बालकांविरुद्धचे लैंगिक अपराध

### (A) अंतर्भेदी (Penetrative) लैंगिक हमला व त्यासाठी शिक्षा

**३. अंतर्भेदी (Penetrative) लैंगिक हमला.-** जर एखादी व्यक्ती,-

(a) बालकाच्या योनीमध्ये, तोंडामध्ये, मूत्रमार्गामध्ये (युरेथ्रा) किंवा गुदद्वारामध्ये कोणत्याही मर्यादिपर्यंत, त्याचे शिस्न घुसवीत असेल किंवा बालकास, तिच्याबरोबर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर तसे कृत्य करण्यास लावीत असेल तर; किंवा

(b) बालकाच्या योनीमध्ये, मूत्रमार्गामध्ये (युरेथ्रा) किंवा गुदद्वारामध्ये शिस्न नसणारी कोणतीही वस्तू किंवा शरीराचा भाग घालीत असेल किंवा बालकास, तिच्याबरोबर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर तसे कृत्य करण्यास लावीत असेल तर;

(c) बालकाच्या योनीमध्ये, मूत्रमार्गामध्ये (युरेथ्रा) किंवा गुदद्वारामध्ये किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवामध्ये घुसविता यावे म्हणून बालकाच्या शरीराचा कोणताही अवयव हाताळीत असेल किंवा बालकास, तिच्याबरोबर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर तसे कृत्य करण्यास लावीत असेल तर; किंवा

(d) बालकाच्या शिस्नास, योनीस, गुदद्वारास, मूत्रमार्गास (युरेथ्रा) त्याचे तोंड लावीत असेल किंवा बालकास, अशा व्यक्तीशी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीशी तसे करण्यास लावीत असेल तर,

त्या व्यक्तीने असा अंतर्भेदी लैंगिक हमला केला असल्याचे म्हणता येते.

**४. अंतर्भेदी लैंगिक हमल्यासाठी शिक्षा.–** जी कोणी व्यक्ती, अंतर्भेदी लैंगिक हमला करील ती व्यक्ती, सात वर्षांपेक्षा कमी नसेल; परंतु आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस देखील पात्र असेल.

### (B) विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हमला व त्यासाठी शिक्षा

**५. विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हमला.–** (a) पोलिस अधिकारी असणारी जी कोणी व्यक्ती,-

(i) ज्या पोलिस ठाण्यामध्ये तिची नियुक्ती केलेली आहे, त्या पोलिस ठाण्याच्या सीमेमध्ये किंवा परिवास्तूमध्ये; किंवा

(ii) ज्यासाठी तिची नियुक्ती केलेली आहे अशा, कोणत्याही स्टेशन हाऊसच्या परिवास्तूमध्ये- मग ती पोलिस ठाण्यामध्ये स्थित असो किंवा नसो;

(iii) तिचे कर्तव्य करीत असताना किंवा अन्यथा; किंवा

(iv) ती पोलिस अधिकारी म्हणून माहिती असेल किंवा ओळखत असेल तेव्हा,

बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(b) सशस्त्र सेनादलांची किंवा सुरक्षा दलांची सदस्य असणारी जी कोणी व्यक्ती,-

(i) ज्या क्षेत्रासाठी अशा व्यक्तीस तैनात केलेले आहे अशा क्षेत्राच्या सीमेमध्ये; किंवा

(ii) दलांच्या किंवा सशस्त्र सेना दलाच्या समादेशनाखालील (कमांड) कोणत्याही क्षेत्रामध्ये; किंवा

(iii) तिचे कर्तव्य करीत असताना किंवा अन्यथा; किंवा

(iv) जेव्हा उक्त व्यक्ती, सुरक्षा दलांची किंवा सशस्त्र सेना दलांची सदस्य म्हणून माहित असेल किंवा ओळखत असेल तेव्हा,

बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(c) लोकसेवक असणारी जी कोणी व्यक्ती, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(d) तुरुंगाच्या, सुधारगृहाच्या, संरक्षणगृहाच्या, निरीक्षण गृहाच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेल्या अभिरक्षेच्या किंवा काळजी घेण्याच्या व संरक्षणाच्या अन्य ठिकाणाच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, अशा तुरुंगाचा, सुधारगृहाचा, संरक्षणगृहाचा, निरीक्षणगृहाचा किंवा अभिरक्षेच्या किंवा काळजी घेण्याच्या व संरक्षणाच्या अन्य ठिकाणाचा सहवासी असणाऱ्या बालकावर अतंर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(e) रूग्णालयाच्या- मग ते सरकारी असो किंवा खाजगी असो,- व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, त्या रुग्णालयातील बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(f) शैक्षणिक संस्थेच्या किंवा धार्मिक संस्थेच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, त्या संस्थेतील बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(g) जी कोणी व्यक्ती, बालकावर टोळीने अंतर्भेदी हमला करील;

**स्पष्टीकरण.-** जेव्हा एखादे बालक, एखाद्या गटाचा सामाईक उद्देश/बेत तडीस नेताना गटाच्या एक किंवा अधिक व्यक्तींनी केलेल्या लैंगिक हमल्यास बळी पडलेले असेल तेव्हा, अशा प्रत्येक व्यक्तीने या खंडाच्या अर्थानुसार टोळीने अंतर्भेदी लैंगिक हमला केला असल्याचे मानण्यात येईल आणि अशी प्रत्येक व्यक्ती, जणू काही ते कृत्य केवळ तिनेच केले होते अशा रीतीने त्या कृत्यासाठी जबाबदार असेल; किंवा

(h) जी कोणी व्यक्ती, प्राणघातक शस्त्रांचा, ज्वलनशील, उष्णताकारक पदार्थांचा किंवा क्षरणकारक पदार्थांचा वापर करून बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(i) जी कोणी व्यक्ती, तीव्र दुखापत करणारा किंवा शारीरिक दुखापत व इजा करणारा किंवा बालकाच्या लैंगिक अवयवांना इजा करणारा अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(j) जी कोणी व्यक्ती, जो,-

(i) बालकास शारीरिकदृष्ट्या विकलांग करील किंवा मानसिक आरोग्य अधिनियम, १९८७ (१९८७ चा १४) याच्या कलम २ च्या खंड (b) खाली व्याख्या केल्याप्रमाणे बालकास मानसिकदृष्ट्या आजारी करील किंवा बालक कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या स्वरुपात नियमित कामे करण्यास असमर्थ व्हावे म्हणून कोणत्याही प्रकारची हानी पोहचवील; किंवा

(ii) स्त्रीलिंग बालकाच्या बाबतीत, लैंगिक हमल्याच्या परिणामी बालक गरोदर राहील; किंवा

(iii) बालकास, एचआयव्हीची (ह्यूमन इम्युनोडेफिसियन्सी व्हायरस) किंवा जीवास धोका असणाऱ्या अन्य रोगाची किंवा जी एकतर तात्पुरत्या स्वरूपात किंवा कायमस्वरूपी, बालकास शारीरिकदृष्ट्या निःसमर्थ करील किंवा नियमित कामे करण्यासाठी मानसिकदृष्ट्या आजारी करील अशा संक्रमणकारी रोगाची बाधा करील, अशा प्रकारे बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(k) जी कोणी व्यक्ती, बालकाच्या मानसिक किंवा शारीरिक विकलांगतेचा फायदा घेऊन, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(l) जी कोणी व्यक्ती, एकापेक्षा अधिक वेळा किंवा वारंवार अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(m) जी कोणी व्यक्ती, बारा वर्षांखालील वयाच्या बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(n) रक्ताच्या किंवा दत्तकाच्या किंवा विवाहाच्या किंवा पालकत्वाच्या नात्याने बालकाची नातेवाईक असणारी किंवा बालकाचे पालन करणारी किंवा बालकाच्या आई-वडिलांशी घरगुती नातेसंबंध असणारी किंवा बालकाबरोबर एकाच किंवा सामाईक घरात राहणारी जी कोणी व्यक्ती, अशा बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(o) बालकास सेवा पुरविणाऱ्या कोणत्याही संस्थेचा मालकी हक्क असणारी किंवा व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(p) बालकाच्या विश्वस्ताच्या किंवा प्राधिकाराच्या स्थानी असणारी जी कोणी व्यक्ती, बालकाच्या संस्थेमध्ये किंवा गृहामध्ये किंवा अन्यत्र कोणत्याही ठिकाणी बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(q) बालक गरोदर असल्याचे माहीत असणारी जी कोणी व्यक्ती, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(r) जी कोणी व्यक्ती, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील आणि बालकाचा खून करण्याचा प्रयत्न करील; किंवा

(s) जी कोणी व्यक्ती, जातीय किंवा सांप्रदायिक हिंसाचाराच्या ओघात बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(t) जी कोणी व्यक्ती, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील आणि जिला यापूर्वी, या अधिनियमाखालील

कोणताही अपराध किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही लैंगिक अपराध केला असल्याबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले आहे; किंवा

(u) जी कोणी व्यक्ती, बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील आणि सार्वजनिक जागी बालकास नागडे करील किंवा त्याचे नग्न प्रदर्शन करील;

त्या व्यक्तीने विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हमला केला असल्याचे म्हणता येते.

**६. विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हमल्यासाठी शिक्षा.-** जी कोणी व्यक्ती, विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हमला करील ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल; परंतु आजीवन कारावासापर्यंत असू शकेल, इतक्या मुदतीचा सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

## (C) लैंगिक हमला व त्यासाठी शिक्षा

**७. लैंगिक हमला.-** जी कोणी व्यक्ती, लैंगिक उद्देशाने बालकाच्या योनीस, शिस्नास, गुदास किंवा स्तनास स्पर्श करते किंवा बालकास अशा व्यक्तीच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या योनीस, शिस्नास, गुदास किंवा स्तनास स्पर्श करण्यास लावते, किंवा अंतर्भेद न करता, शारीरिक संपर्काचा अंतर्भाव असेल असे अन्य कोणतेही कृत्य लैंगिक उद्देशाने करते ती व्यक्ती, लैंगिक हमला करीत असल्याचे म्हणता येते.

**८. लैंगिक हमल्यासाठी शिक्षा.-** जी कोणी व्यक्ती, लैंगिक हमला करील ती व्यक्ती, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल; परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल, अशा कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

## (D) विकोपकारी लैंगिक हमला व त्यासाठी शिक्षा

**९. विकोपकारी लैंगिक हमला.-** (a) पोलीस अधिकारी असणारी, जी कोणी व्यक्ती,-

(i) ज्या पोलीसठाण्यामध्ये तिची नेमणूक केलेली आहे, त्या पोलिस ठाण्याच्या सीमेमध्ये किंवा परिवास्तूमध्ये; किंवा

(ii) ज्यासाठी तिची नियुक्ती केलेली आहे, अशा कोणत्याही स्टेशन हाऊसच्या परिवास्तूमध्ये- मग ती पोलिस ठाण्यामध्ये स्थित असो किंवा नसो;

(iii) तिचे कर्तव्य करीत असताना किंवा अन्यथा; किंवा

(iv) ती पोलिस अधिकारी म्हणून माहिती असेल किंवा ओळखत असेल तेव्हा,

बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(b) सशस्त्र सेनादलांची किंवा सुरक्षा दलांची सदस्य असणारी जी कोणी व्यक्ती,-

(i) ज्या क्षेत्रासाठी अशा व्यक्तीस तैनात केलेले आहे, अशा क्षेत्राच्या सीमेमध्ये; किंवा

(ii) दलांच्या किंवा सशस्त्र सेना दलाच्या समादेशनाखालील (कमांड) कोणत्याही क्षेत्रामध्ये; किंवा

(iii) तिचे कर्तव्य करीत असताना किंवा अन्यथा; किंवा

(iv) जेव्हा उक्त व्यक्ती, सुरक्षा दलांची किंवा सशस्त्र सेना दलांची सदस्य म्हणून माहीत असेल किंवा ओळखत असेल तेव्हा,

बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(c) लोकसेवक असणारी जी कोणी व्यक्ती, बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(d) तुरुंगाच्या, सुधारगृहाच्या, संरक्षण गृहाच्या, निरीक्षण गृहाच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेल्या अभिरक्षेच्या किंवा काळजी घेण्याच्या व संरक्षणाच्या अन्य ठिकाणाच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, अशा तुरुंगाचा सुधारगृहाचा, संरक्षणगृहाचा, निरीक्षणगृहाचा किंवा अभिरक्षेच्या किंवा काळजी घेण्याच्या व संरक्षणाच्या अन्य ठिकाणाचा सहवासी असणाऱ्या बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(e) रुग्णालयाच्या- मग ते सरकारी असो किंवा खासगी असो,- व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, त्या रुग्णालयातील बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(f) शैक्षणिक संस्थेच्या किंवा धार्मिक संस्थेच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, त्या संस्थेतील बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(g) जी कोणी व्यक्ती, बालकावर टोळीने लैंगिक हमला करील;

**स्पष्टीकरण.–** जेव्हा एखादे बालक, एखाद्या गटाचा सामाईक उद्देश/बेत तडीस नेताना गटाच्या एक किंवा अधिक व्यक्तींनी केलेल्या लैंगिक हमल्यास बळी पडलेले असेल तेव्हा, अशा प्रत्येक व्यक्तीने या खंडाच्या अर्थानुसार टोळीने लैंगिक हमला केला असल्याचे मानण्यात येईल आणि अशी प्रत्येक व्यक्ती, जणू काही ते कृत्य केवळ तिनेच केले होते अशा रीतीने त्या कृत्यासाठी जबाबदार असेल; किंवा

(h) जी कोणी व्यक्ती, प्राणघातक शस्त्रांचा, ज्वलनशील, उष्णताकारक पदार्थांचा किंवा क्षरणकारक पदार्थांचा वापर करून बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(i) जी कोणी व्यक्ती, तीव्र दुखापत करणारा किंवा शारीरिक दुखापत व इजा करणारा किंवा बालकाच्या लैंगिक अवयवांना इजा करणारा लैंगिक हमला करील; किंवा

(j) जी कोणी व्यक्ती, जो,-

(i) बालकास शारीरिकदृष्ट्या विकलांग करील किंवा मानसिक आरोग्य अधिनियम, १९८७ (१८८७ चा १४) याच्या कलम २ च्या खंड (b) खाली व्याख्या केल्याप्रमाणे, बालकास मानसिकदृष्ट्या आजारी करील किंवा बालक कायमस्वरुपी किंवा तात्पुरत्या स्वरुपात नियमित कामे करण्यास असमर्थ व्हावे म्हणून कोणत्याही प्रकारची हानी पोहचवील; किंवा

(ii) बालकास, एचआयव्ही (ह्युमन इम्युनोडेफिसियन्सी व्हायरस) ची किंवा जीवास धोका असणाऱ्या अन्य रोगाची किंवा जो एकतर तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी बालकास शारीरिकदृष्ट्या निःसमर्थ करील,

किंवा नियमित कामे करण्यासाठी मानसिकदृष्ट्या आजारी करील अशा संक्रमणकारी रोगाची बाधा करील, अशा प्रकारे बालकावर अंतर्भेदी लैंगिक हमला करील; किंवा

(k) जी कोणी व्यक्ती बालकाच्या मानसिक किंवा शारीरिक विकलांगतेचा फायदा घेऊन, बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(l) जी कोणी व्यक्ती, एकापेक्षा अधिक वेळा किंवा वारंवार लैंगिक हमला करील; किंवा

(m) जी कोणी व्यक्ती, बारा वर्षांखालील वयाच्या बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(n) रक्ताच्या किंवा दत्तकाच्या किंवा विवाहाच्या किंवा पालकत्वाच्या नात्याने बालकाची नातेवाईक असणारी किंवा बालकाचे पालन करणारी किंवा बालकाच्या आई-वडिलांशी घरगुती नातेसंबंध असणारी किंवा बालकाबरोबर एकाच किंवा सामाईक घरात राहणारी जी कोणी व्यक्ती, अशा बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(o) बालकास सेवा पुरविणाऱ्या कोणत्याही संस्थेची मालकी हक्क असणारी किंवा व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणारी जी कोणी व्यक्ती, बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(p) बालकाच्या विश्वस्ताच्या किंवा प्राधिकाराच्या स्थानी असणारी जी कोणी व्यक्ती, बालकाच्या संस्थेमध्ये किंवा गृहामध्ये किंवा अन्यथा कोणत्याही ठिकाणी बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(q) बालक गरोदर असल्याचे माहीत असणारी जी कोणी व्यक्ती, बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(r) जी कोणी व्यक्ती बालकावर लैंगिक हमला करील आणि बालकाचा खून करण्याचा प्रयत्न करील; किंवा

(s) जी कोणी व्यक्ती, जातीय किंवा सांप्रदायिक हिंसाचाराच्या ओघात बालकावर लैंगिक हमला करील; किंवा

(t) जी कोणी व्यक्ती, बालकावर लैंगिक हमला करील आणि जिला यापूर्वी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही लैंगिक अपराध केला असल्याबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले आहे; किंवा

(u) जी कोणी व्यक्ती, बालकावर लैंगिक हमला करील आणि सार्वजनिक जागी बालकास नागडे करील किंवा त्याचे नग्न प्रदर्शन करील,

त्या व्यक्तीने विकोपकारी लैंगिक हमला केला असल्याचे म्हणता येते.

**१०. विकोपकारी लैंगिक हमल्यासाठी शिक्षा.–** जी कोणी व्यक्ती, विकोपकारी लैंगिक हमला करील ती व्यक्ती, पाच वर्षांपेक्षा कमी नसेल; परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

### (E) लैंगिक छळवणूक व त्यासाठी शिक्षा

**११. लैंगिक छळवणूक.–** जेव्हा एखादी व्यक्ती, लैंगिक उद्देशाने-

(i) असा शब्द किंवा आवाज बालक ऐकेल किंवा असा अंगविक्षेप किंवा शरीराचा भाग बालक पाहील, या उद्देशाने कोणताही शब्द उच्चारते किंवा कोणताही आवाज काढते, किंवा कोणताही अंगविक्षेप करते किंवा कोणतीही वस्तू किंवा शरीराचा भाग प्रदर्शित करते तेव्हा; किंवा

(ii) अशा व्यक्तीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने तो पहावा म्हणून बालकाच्या शरीराचे किंवा त्याच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे प्रदर्शन करण्यास बालकास लावते तेव्हा; किंवा

(iii) संभोगचित्रणाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही स्वरुपात किंवा माध्यमात बालकास कोणतीही वस्तू दाखविते तेव्हा; किंवा

(iv) एकतर प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रॉनिक, डिजीटल किंवा अन्य कोणत्याही साधनाद्वारे बालकाचा वारंवार किंवा सतत पाठलाग करते, त्यास पहाते किंवा त्याच्याशी संपर्क साधते तेव्हा; किंवा

(v) बालकाच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे किंवा एखाद्या लैंगिक कृत्यातील बालकाच्या सहभागाचे इलेक्ट्रॉनिक, चित्रपट किंवा डिजीटल किंवा अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे वास्तव किंवा बनावटपणे तयार केलेले चित्रण कोणत्याही माध्यमाच्या स्वरूपात वापरण्याची धमकी देते तेव्हा; किंवा

(vi) संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ, बालकास भुरळ घालते किंवा त्यासाठी अनुतोष देते तेव्हा,

अशा व्यक्तीने, बालकाची लैंगिक छळवणूक केली असल्याचे म्हणता येते.

**स्पष्टीकरण.–** ''लैंगिक उद्देश'' या संबंधात अंतर्भूत असलेला कोणताही प्रश्न, तथ्य (वस्तुस्थिती) विषयक प्रश्न असेल.

**१२. लैंगिक छळवणुकीसाठी शिक्षा.–** जी कोणी व्यक्ती, बालकाची लैंगिक छळवणूक करील ती व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

## प्रकरण तीन

## संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करणे व त्यासाठी शिक्षा

**१३. संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर.–** जी कोणी व्यक्ती, लैंगिक अनुतोषाच्या प्रयोजनार्थ दूरदर्शन वाहिन्यांद्वारे प्रसारित केलेल्या कार्यक्रमास किंवा इंटरनेटद्वारे किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे किंवा मुद्रित माध्यमाद्वारे केलेली जाहिरात यांसह कोणत्याही स्वरुपातील माध्यमामध्ये, बालकाचा वापर करते, ज्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो:-

(a) बालकाच्या लैंगिक अवयवांचे प्रदर्शन करणे;

(b) वास्तव किंवा बतावणी केलेल्या लैंगिक कृत्यामध्ये (अंतर्भेदासह किंवा त्याशिवाय) सहभागी असलेल्या बालकाचा वापर;

(c) बालकाचे असभ्य किंवा अश्लील प्रदर्शन;

ती व्यक्ती, संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करण्याच्या अपराधाबद्दल दोषी असेल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनार्थ, ''बालकाचा वापर करणे'' या शब्दप्रयोगात, संभोगचित्रणाचे साहित्य तयार करण्यासाठी, निर्माण करण्यासाठी, देण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी, प्रसिद्ध करण्यासाठी, सुलभ करण्यासाठी व वितरित करण्यासाठी मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, संगणक किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान यांसारख्या कोणत्याही माध्यमाद्वारे बालकाला सहभागी करण्याचा समावेश असेल.

**१४. संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करण्यासाठी शिक्षा.–** (१) जी कोणी व्यक्ती, संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा किंवा बालकांचा वापर करते ती व्यक्ती, पाच वर्षांपर्यंत असू शकेल, अशा कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या दोषसिद्धीच्या प्रसंगी, सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

(२) जर संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करणाऱ्या व्यक्तीने, संभोगचित्रणाचे कृत्य करण्यामध्ये प्रत्यक्षपणे सहभाग घेऊन त्याद्वारे कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेला अपराध केला असेल तर, ती व्यक्ती, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

(३) जर संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करणाऱ्या व्यक्तीने संभोगचित्रणाचे कृत्य करण्यामध्ये प्रत्यक्षपणे सहभाग घेऊन त्याद्वारे कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेला अपराध केला असेल तर, ती व्यक्ती, आजीवन सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस देखील पात्र असेल.

(४) जर संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करणाऱ्या व्यक्तीने, संभोगचित्रणाचे कृत्य करण्यामध्ये प्रत्यक्षपणे सहभाग घेऊन त्याद्वारे कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेला अपराध केला असेल तर, ती व्यक्ती, सहा वर्षांपेक्षा कमी नसेल; परंतु आठ वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

(५) जर संभोगचित्रणाच्या प्रयोजनार्थ बालकाचा वापर करणाऱ्या व्यक्तीने, संभोगचित्रणाच्या कृत्यांमध्ये प्रत्यक्षपणे सहभाग घेऊन त्याद्वारे कलम ९ मध्ये निर्दिष्ट केलेला अपराध केला असेल तर, ती व्यक्ती, आठ वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस देखील पात्र असेल.

**१५. बालकाचा सहभाग असणाऱ्या संभोगचित्रणपर साहित्याचा साठा करण्यासाठी शिक्षा.–** जी कोणतीही व्यक्ती, बालकाचा सहभाग असणारे कोणत्याही स्वरुपातील कोणतेही संभोगचित्रणपर साहित्य वाणिज्यिक प्रयोजनार्थ साठवील ती व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल किंवा या दोन्हीही शिक्षेस पात्र असेल.

## प्रकरण चार

## अपराध करण्याची अपप्रेरणा देणे व प्रयत्न करणे

**१६. अपराधाची अपप्रेरणा.–** जी व्यक्ती,-

**पहिलेः-** त्या अपराधासाठी कोणत्याही व्यक्तीस चिथावणी देते; किंवा

**दुसरेः-** तो अपराध करण्याच्या कोणत्याही कटामध्ये अन्य एक किंवा अधिक व्यक्तीस किंवा व्यक्तींना सहभागी करते, जर त्या कटाच्या अनुरोधाने आणि तो अपराध करण्याच्या क्रमात कोणतेही कृत्य किंवा बेकायदेशीर अकृत्य घडून आले असेल तर; किंवा

**तिसरे :-** तो अपराध करण्यासाठी, कोणत्याही कृतीने किंवा बेकायदेशीर कृतीने, उद्देशपूर्वक सहाय्य करते, ती व्यक्ती अपराधास अपप्रेरणा देते.

**स्पष्टीकरण एक.-** जी व्यक्ती, जाणीवपूर्वक दिशाभूल करून किंवा जी वस्तुस्थिती उघड करण्यास ती बांधील आहे अशी महत्त्वाची वस्तुस्थिती जाणीवपूर्वक लपवून ठेवून, करावयाच्या गोष्ट स्वेच्छापूर्वक करते किंवा मिळविते, किंवा करण्याचा किंवा मिळविण्याचा प्रयत्न करते ती व्यक्ती, तो अपराध करण्यास चिथावणी देते असे म्हणता येते.

**स्पष्टीकरण दोन.-** जी कोणी व्यक्ती, एकतर एखादे कृत्य करण्यापूर्वी किंवा करण्याच्या वेळी, ते कृत्य करणे सुकर होण्याच्या दृष्टीने कोणतीही गोष्ट करते, आणि त्याद्वारे ते घडणे सुकर करते ती व्यक्ती, ते कृत्य करण्यास सहाय्य करते असे म्हणता येते.

**१७. अपप्रेरणेसाठी शिक्षा.-** जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देते ती व्यक्ती, जर अपप्रेरणेच्या परिणामी अपप्रेरणा दिलेले कृत्य घडून आले असेल तर, त्या अपराधासाठी तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र असेल.

**स्पष्टीकरण.-** जेव्हा असे कृत्य, जी अपप्रेरणा ठरते, अशा चिथावणी दिल्याच्या परिणामी किंवा कटाच्या अनुरोधाने किंवा सहाय्याने घडून आले असेल तेव्हा, असे कृत्य किंवा अपराध, अपप्रेरणेच्या परिणामी घडून आले असल्याचे म्हणता येते.

**१८. अपराध करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षा.-** जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करण्याचा किंवा असा अपराध घडविण्याचा प्रयत्न करते, आणि असा प्रयत्न करताना अपराध करण्यासाठी कोणतेही कृत्य करते ती व्यक्ती, त्या अपराधासाठी तरतूद केलेल्या आजीवन कारावासाच्या निम्म्या, किंवा यथास्थिति, अपराधासाठी तरतूद केलेल्या दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या निम्म्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

## प्रकरण पाच

## प्रकरणांचे वृत्त देण्याची कार्यपद्धती

**१९. अपराधांचे वृत्त देणे.-** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या कोणत्याही व्यक्तीस (बालकासह), या अधिनियमाखालील अपराध घडण्याचा संभव असल्याचे धास्ती आहे किंवा असा अपराध घडून आला असल्याचे माहिती आहे अशी व्यक्ती, अशी माहिती.

(a) विशेष बालन्याय पोलिस युनिटास; किंवा

(b) स्थानिक पोलिसांना,

पुरवील.

(२) पोटकलम (२) अन्वये दिलेले प्रत्येक वृत्त,-

(a) नोंदणी क्रमांक देण्यात येईल आणि ते लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल;

(b) माहिती देणाऱ्यास वाचून दाखविण्यात येईल;

(c) पोलिस युनिटाने ठेवावयाच्या पुस्तकामध्ये नोंदविण्यात येईल.

(३) जेव्हा पोटकलम (१) खालील वृत्त बालकाने दिले असेल तेव्हा, ते पोटकलम (२) अन्वये साध्या भाषेत नोंदविण्यात येईल जेणेकरून बालक नोंदविण्यात आलेला मजकूर समजू शकेल.

(४) जर, मजकूर बालकास न समजणाऱ्या भाषेत नोंदविण्यात येत असेल तर, किंवा जेव्हाजेव्हा असे आवश्यक वाटेल तेव्हा तेव्हा, जर बालक तो मजकूर समजण्यास निष्फळ ठरत असेल तर, विहित करण्यात येईल अशी अर्हता, अनुभव असणारा व असे शुल्क प्रदान केल्यावर अनुवादक किंवा दुभाषिक, बालकास पुरविण्यात येईल.

(५) ज्या बालकाविरुद्ध अपराध घडून आला आहे त्या बालकास काळजीची व संरक्षणाची गरज आहे अशी विशेष बालन्याय पोलिस युनिटाची किंवा स्थानिक पोलिसांची, खात्री पटेल तेव्हा लेखी कारणे नोंदविल्यानंतर ते वृत्त दिल्यापासून चोवीस तासांच्या आत, विहित करण्यात येईल. बालकाची अशी काळजी घेण्याची व संरक्षण देण्याची (बालकास संरक्षणगृहामध्ये किंवा जवळच्या रुग्णालयामध्ये दाखल करण्यासह) तात्काळ व्यवस्था करील.

(६) विशेष बालन्याय पोलिस युनिट किंवा स्थानिक पोलिस, अनावश्यक विलंबाशिवाय; परंतु चोवीस तासांच्या कालावधीत, बालकास काळजी व संरक्षणाची गरज आणि यासंबंधात हाती घेतलेल्या उपाययोजना यांसह हे प्रकरण, बालकल्याण समितीस, विशेष न्यायालयास, विशेष न्यायालय स्थापन केलेले नसेल तेथे, सत्र न्यायालयास कळवील.

(७) पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ, सदभावनापूर्वक माहिती दिल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीवर, कोणतेही दायित्व-मग ते दिवाणी असो किंवा फौजदारी असो, लादण्यात येणार नाही.

**२०. प्रकरणांचे वृत्त देण्याचे माध्यमांचे, स्टुडिओचे व फोटोग्राफिक सुविधा पुरविणाऱ्यांचे दायित्व.–** त्यात किती संख्येने व्यक्ती काम करतात हे विचारात न घेता, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी वृत्त माध्यमे किंवा हॉटेल किंवा लॉज किंवा रुग्णालय किंवा क्लब किंवा स्टुडिओ किंवा फोटोग्राफिक सुविधा पुरविणाऱ्या संस्था यांचा कोणताही कर्मचारी, कोणत्याही माध्यमाचा वापर करून त्याद्वारे बालकाची लैंगिक पिळवणूक करणारे जे कोणतेही साहित्य किंवा वस्तू (संभोगचित्रण, लैंगिकदृष्ट्या संबंधित असलेले किंवा बालकाचे किंवा बालकांचे अश्लील प्रदर्शन करणे यांसह) निदर्शनास आल्यावर, त्याची माहिती विशेष बालन्याय पोलिस युनिटास, किंवा यथास्थिति, स्थानिक पोलिसांना पुरवील.

**२१. प्रकरणांचे वृत्त देण्यास किंवा नोंद करण्यास निष्फळ ठरल्याबद्दल शिक्षा.–** (१) जी कोणतीही व्यक्ती, कलम १९च्या पोटकलम (१) किंवा कलम २० खालील अपराध घडल्याचे वृत्त देण्यास निष्फळ ठरेल किंवा जी व्यक्ती, कलम १९ च्या पोटकलम (२) अन्वये अशा अपराधाची नोंद करण्यास निष्फळ ठरेल अशी व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

(२) कोणत्याही कंपनीची किंवा संस्थेची,- मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,- प्रभारी असणारी जी कोणतीही व्यक्ती, तिच्या नियंत्रणाखालील दुय्यम अधिकाऱ्याच्या बाबतीत, कलम १९च्या पोटकलम (१) खालील अपराध घडल्याचे वृत्त देण्यास निष्फळ ठरेल ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस व द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(३) पोटकलम (१) च्या तरतुदी, या अधिनियमाखालील बालकांना लागू असणार नाही.

**२२. खोट्या तक्रारीसाठी किंवा खोट्या माहितीसाठी शिक्षा.–** (१) जी कोणी व्यक्ती, कोणत्याही व्यक्तीचा

पाणउतारा करण्याच्या, तिच्याकडून पैसे उकळण्याच्या किंवा तिला धमकी देण्याच्या किंवा तिची मानहानी करण्याच्या एकमेव उद्देशाने, कलम ३, ५, ७ व कलम ९ अन्वये केलेल्या अपराधाच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध खोटी तक्रार करील किंवा खोटी माहिती पुरवील, ती व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

(२) जेव्हा एखाद्या बालकाने खोटी तक्रार केली असेल किंवा खोटी माहिती पुरविली असेल तेव्हा, अशा बालकावर, कोणतीही शिक्षा लादण्यात येणार नाही.

(३) बालक नसणारी जी कोणी व्यक्ती, एखाद्या बालकाविरुद्ध, ज्यामुळे असे बालक या अधिनियमाखालील अपराधांपैकी कोणत्याही अपराधामध्ये बळी पडेल, अशी जी खोटी असल्याचे माहीत आहे, अशी खोटी तक्रार करील किंवा खोटी माहिती पुरवील ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल, इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

**२३. वृत्त माध्यमांसाठी कार्यपद्धती.-** (१) कोणतीही व्यक्ती, जिचा परिणाम, बालकाची प्रतिष्ठा खालावण्यात किंवा त्याच्या खाजगीपणाचे उल्लंघन होण्यात होऊ शकेल, अशी परिपूर्ण व अधिकृत माहिती असल्याशिवाय वृत्तमाध्यमाच्या किंवा स्टुडिओच्या किंवा फोटोग्राफिक सुविधेच्या कोणत्याही प्रकारात कोणत्याही बालकावरील वृत्त देणार नाही किंवा अभिप्राय सादर करणार नाही.

(२) कोणत्याही वृत्तमाध्यमामधील वृत्तांमध्ये बालकाचे नाव, पत्ता, छायाचित्र, कौटुंबिक तपशील, शाळा, शेजारी किंवा ज्यामुळे बालकाची ओळख उघड होईल असा अन्य तपशील यांसह बालकाची ओळख उघड करणार नाही :

परंतु, लेखी नोंदवावयाच्या कारणांसाठी, अधिनियमाखालील प्रकरणाची न्यायचौकशी करण्यास सक्षम असलेले विशेष न्यायालय, जर त्याच्या मते, असे उघड करणे बालकाच्या हिताचे असेल तर, असे उघड करण्यास परवानगी देऊ शकेल.

(३) वृत्तमाध्यमाचा किंवा स्टुडिओचा किंवा फोटोग्राफिक सुविधांचा प्रकाशक व मालक, त्याच्या कर्मचाऱ्यांची कृत्ये व अकृत्ये यांसाठी संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असेल.

(४) जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) चे उल्लंघन करील ती व्यक्ती, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल; परंतु जी एक वर्षापर्यंत वाढविता येईल, अशा कोणत्याही वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

## प्रकरण सहा

## बालकाची जबानी नोंदविण्याची कार्यपद्धती

**२४. बालकाची जबानी नोंदविणे.-** (१) बालकाची जबानी, बालकाच्या निवासस्थानी किंवा ज्या ठिकाणी तो नेहमी राहतो, त्या ठिकाणी किंवा त्याच्या पसंतीच्या ठिकाणी आणि शक्य असेल तेथवर, उपनिरीक्षकापेक्षा निम्न दर्जा नसलेल्या महिला पोलिस अधिकाऱ्याद्वारे नोंदविण्यात येईल.

(२) पोलिस अधिकारी, बालकाची जबानी नोंदविते वेळी, गणवेशात असणार नाही.

(३) अन्वेषण करणारा पोलिस अधिकारी, बालकाची तपासणी करतेवेळी, बालक, कोणत्याही वेळी, कोणत्याही मार्गाने आरोपीच्या संपर्कात येणार नाही, याची खात्री करील.

(४) कोणत्याही बालकास, कोणत्याही कारणासाठी रात्रीच्या वेळी पोलिस ठाण्यात स्थानबद्ध करून ठेवण्यात येणार नाही.

(५) पोलिस अधिकारी, विशेष न्यायालयाने, बालकाच्या हितार्थ अन्यथा निदेश दिला नसेल तर, वृत्तमाध्यमापासून बालकांची ओळख सुरक्षित राखण्याची सुनिश्चिती करील.

**२५. दंडाधिकाऱ्याद्वारे बालकाची जबानी नोंदविणे.–** (१) जर बालकाची जबानी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''संहिता'' असा केला आहे) याच्या कलम १६४ अन्वये नोंदविण्यात येत असेल तर, अशी जबानी नोंदविणारा दंडाधिकारी, त्यात काहीही अंतर्भूत असले तरी, बालकाने बोलल्याप्रमाणे जबानी नोंदवीलः

परंतु, संहितेच्या कलम १६४ च्या पोटकलम (१) च्या पहिल्या परंतुकामध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदी, जेथवर त्या आरोपीच्या वकिलाच्या उपस्थितीस परवानगी देत असतील तेथवर, या प्रकरणी लागू असणार नाही.

(२) दंडाधिकारी, संहितेच्या कलम १७३ अन्वये पोलिसाने अंतिम अहवाल दाखल केल्यावर, त्या संहितेच्या कलम २०७ अन्वये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजाची प्रत, बालकास व त्याच्या आईवडिलांना किंवा त्याच्या प्रतिनिधीस पुरवील.

**२६. नोंदवावयाच्या जबानीसंबंधी अतिरिक्त तरतुदी.–** (१) दंडाधिाकीर किंवा यथास्थिति, पोलिस अधिकारी, बालकाच्या आईवडिलांच्या किंवा जिच्यावर बालकाचा विश्वास किंवा भरवसा आहे अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीत बालकाने बोलल्याप्रमाणे जबानी नोंदवील.

(२) जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, दंडाधिकारी किंवा यथास्थिती, पोलिस अधिकारी, बालकाची जबानी नोंदविते वेळी, विहित करण्यात येईल अशी शैक्षणिक अर्हता, अनुभव असणाऱ्या व अशी फी प्रदान केल्यावर अनुवादकाचे किंवा दुषाभिकाचे सहाय्य घेऊ शकेल.

(३) दंडाधिकारी किंवा यथास्थिति, पोलिस अधिकारी, मानसिक किंवा शारीरिक विकलांगता असणाऱ्या बालकाच्या बाबतीत, विशेष शिक्षकाचे किंवा बालकाच्या संदेशवहनाच्या रीतीशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे किंवा विहित करण्यात येईल, अशी शैक्षणिक अर्हता, अनुभव असणाऱ्या आणि अशी फी प्रदान केल्यावर, एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीचे सहाय्य मागवू शकेल.

(४) जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा, दंडाधिकारी किंवा यथास्थिति, पोलिस अधिकारी, बालकाची जबानी दृकश्राव्य इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे देखील नोंदविण्यात येत असल्याची खात्री करील.

**२७. बालकाची वैद्यकीय तपासणी.–** (१) ज्या बालकाच्या बाबतीत या अधिनियमान्वये कोणताही अपराध करण्यात आला आहे, अशा बालकाची वैद्यकीय तपासणी, या अधिनियमाखालील अपराधांसाठी प्रथम माहिती अहवाल (एफ.आय.आर.) किंवा तक्रार नोंदविण्यात आलेली असली तरी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १६४-अ अनुसार करण्यात येईल.

(२) जर पीडित व्यक्ती ही मुलगी असेल तर, वैद्यकीय तपासणी, महिला डॉक्टरद्वारे करण्यात येईल.

(३) वैद्यकीय तपासणी बालकाच्या आईवडिलांच्या किंवा जिच्यावर बालकाचा विश्वास किंवा भरवसा आहे, अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीत करण्यात येईल.

(४) जेव्हा बालकाच्या वैद्यकीय तपासणीच्या वेळी, पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेले बालकाचे आईवडील किंवा अन्य कोणतीही व्यक्ती, कोणत्याही कारणाने उपस्थित राहू शकले नाही तर, वैद्यकीय संस्थेच्या प्रमुखाने नामनिर्देशित केलेल्या महिलेच्या उपस्थितीत वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.

## प्रकरण सात

## विशेष न्यायालये

**२८. विशेष न्यायालये पदनिर्दिष्ट करणे.–** (१) जलदगतीने न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून, या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याकरिता विशेष न्यायालय म्हणून सत्र न्यायालयास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पदनिर्दिष्ट करील:

परंतु, जर बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा ४) याअन्वये बालकांचे न्यायालय म्हणून एखाद्या सत्र न्यायलयास अधिसूचित केले असेल तर किंवा त्या त्या वेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये तत्सम प्रयोजनासाठी एखादे विशेष न्यायालय पदनिर्दिष्ट केले असेल तर, असे न्यायालय, या कलमाखालील विशेष न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाची न्यायचौकशी करतेवेळी, विशेष न्यायालयास, ज्या अपराधाच्या बाबतीत आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याअन्वये त्याच न्यायचौकशीत दोषारोप ठेवता येईल, अशा पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराधाव्यतिरिक्त अन्य अपराधासाठी देखील न्यायचौकशी करता येईल.

(३) या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या विशेष न्यायालयास, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथवर ते, कोणत्याही कृत्यामध्ये बालकांचे चित्रण करणारे लैंगिक सूचक साहित्य प्रसिद्ध करण्याशी किंवा हस्तांतरित करण्याशी किंवा बालकांच्या ऑनलाईनचा गैरवापर करण्याचे वर्तन किंवा रीत किंवा सुविधा यांच्याशी संबंधित असेल तेथवर, त्या अधिनियमाच्या कलम ६७-B खालील अपराधांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असेल.

**२९. विवक्षित अपराधासंबंधीचे गृहितक.–** जेव्हा एखाद्या व्यक्तीवर, या अधिनियमाच्या कलम ३, ५, ७ व ९ अन्वये कोणताही अपराध केल्याबद्दल किंवा करण्यास चिथावणी दिल्याबद्दल किंवा करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अभियोग दाखल केला असेल तेव्हा, विशेष न्यायालय असे गृहित धरील की, अन्यथा विरुद्ध सिद्ध झाले नसेल तर, अशा व्यक्तीने अपराध केला आहे किंवा अपराधास चिथावणी दिली आहे किंवा अपराध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**३०. सदोष मानसिक स्थितीचे गृहितक.–** (१) ज्यासाठी आरोपीच्या बाजूने सदोष मानसिक स्थिती आवश्यक असते, अशा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या कोणत्याही खटल्यामध्ये, विशेष न्यायालय, अशी मानसिक स्थिती अस्तित्वात असल्याचे गृहित धरील; परंतु त्या अभियोगामधील अपराध म्हणून आरोप असलेल्या कृत्याच्या बाबतीत त्याची अशी मानसिक स्थिती होती हे तथ्य सिद्ध करण्यासाठी ती, आरोपीकरिता बचाव असेल.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, जेव्हा विशेष न्यायालय, वाजवी संशयाच्या पलिकडे ती अस्तित्वात असल्याचा विश्वास ठेवील तेव्हाच केवळ परंतु संभाव्यतेच्या प्राबल्याद्वारे तिचे अस्तित्व सिद्ध झाले आहे केवळ यावरून नव्हे, तथ्य सिद्ध झाले असल्याचे म्हणता येते.

**स्पष्टीकरण.–** या कलमामधील, ''सदोष मानसिक स्थिती'' या संज्ञेमध्ये, तथ्याचा उद्देश, प्रेरणा, माहिती आणि तथ्याबद्दल विश्‍वास किंवा विश्‍वास ठेवण्यास कारण यांचा समावेश होतो.

**३१. विशेष न्यायालयासमोरील कार्यवाहीसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ लागू असणे.–** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या तरतुदी (जामीन व बंधपत्राच्या तरतुदींसह) विशेष न्यायालयासमोरील कार्यवाहीस लागू असतील आणि उक्त तरतुदींच्या प्रयोजनार्थ, विशेष न्यायालय, हे सत्र न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि सत्र न्यायलयासमोरील अभियोग चालविणारी व्यक्ती, सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल.

**३२. विशेष सरकारी अभियोक्ते.–** (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, केवळ अधिनियमाखालील प्रकरणे चालविण्यासाठी प्रत्येक विशेष न्यायालयासाठी एक विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करील.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीने अधिवक्ता म्हणून सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी व्यवसाय केला असेल तरच केवळ ती व्यक्ती, पोटकलम (१) खालील विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यास पात्र असेल.

(३) या कलमान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २ च्या खंड (यु) च्या अर्थानुसार सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल आणि त्या संहितेच्या तरतुदी, तद्नुसार अमलात येतील.

## प्रकरण आठ

## विशेष न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार आणि साक्षीपुरावा नोंदविणे

**३३. विशेष न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार.–** (१) विशेष न्यायालय, न्यायचौकशीसाठी आरोपीला त्याच्याकडे सुपूर्द करण्यात आल्याशिवाय, असा अपराध केला असल्याच्या तथ्यांची तक्रार मिळाल्यावर किंवा अशा तथ्यांच्या पोलिस अहवालावरून कोणत्याही अपराधाची दखल घेईल.

(२) विशेष सरकारी अभियोक्ता, किंवा यथास्थिति आरोपीसाठी उपस्थित होणारा कौन्सेल (समुपदेशी), बालकाची सरतपासणी, उलटतपासणी किंवा पुनर्तपासणी नोंदविते वेळी, बालकास विचारावयाचे प्रश्‍न विशेष न्यायालयास कळवील, त्यानंतर ते (विशेष न्यायालय) ते प्रश्‍न बालकास विचारील.

(३) विशेष न्यायालय, जर त्याला योग्य वाटले तर, न्यायचौकशीमध्ये बालकासाठी वारंवार खंड घेऊ शकेल.

(४) विशेष न्यायालय, ज्याच्यावर बालकाचा भरवसा किंवा विश्‍वास आहे अशा बालकाच्या कुटुंबातील सदस्यास, पालकास, मित्रास किंवा नातेवाईकास, न्यायालयात उपस्थित राहण्याची मुभा देऊन बालहितैशी वातावरण निर्माण करील.

(५) विशेष न्यायालय अशी खात्री करील की, बालकास न्यायालयामध्ये साक्ष देण्यासाठी पुन्हापुन्हा बोलाविण्यात येणार नाही.

(६) विशेष न्यायालय, आक्रमक प्रश्‍न किंवा बालकाचे चारित्र्यहनन करणारे प्रश्‍न विचारण्यास परवानगी देणार नाही आणि न्यायचौकशीमध्ये सर्व काळ, बालकाची प्रतिष्ठा राखली जात असल्याची खात्री करील.

(७) विशेष न्यायालय, अशी खात्री करील की, अन्वेषण करताना किंवा न्यायचौकशी करताना कोणत्याही वेळी बालकाची ओळख उघड केली जाणार नाहीः

परंतु, विशेष न्यायालय, जर असे उघड करणे बालकाच्या हिताचे आहे असे त्याचे मत असेल तर, लेखी नोंदवावयाच्या कारणांसाठी असे उघड करण्यास परवानगी देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.–** या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, बालकाची ओळख, या संज्ञेत, बालकाच्या कुटुंबाची, शाळेची, नातेवाईकांची, शेजाऱ्यांची ओळख किंवा ज्याद्वारे बालकाची ओळख उघड होईल अशी अन्य कोणतीही माहिती, असा आहे.

(८) कोणत्याही उचित प्रकरणी, विशेष न्यायालय, शिक्षेशिवाय बालकास झालेल्या कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक ताणासाठी किंवा अशा बालकाचे तात्काळ पुनर्वसन करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी नुकसानभरपाई बालकास प्रदान करण्याचा निदेश देऊ शकेल.

(९) या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, विशेष न्यायालय, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, विशेष न्यायालयास, सत्र न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि जणूकाही ते सत्र न्यायालय होते, असे समजून, आणि शक्य असेल तेथवर सत्र न्यायालयासमोरील न्यायचौकशीसाठी फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार अशा अपराधाची न्यायचौकशी करील.

**३४. बालकाने अपराध केल्याच्या बाबतीतील कार्यपद्धती व विशेष न्यायालयाद्वारे वय निर्धारित करणे.–** (१) जेव्हा या अधिनियमाखालील कोणताही अपराध, एखाद्या बालकाने केला असेल तेव्हा, अशा बालकाची, बालन्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० (२००० चा ५६) याअन्वये कार्यवाही करण्यात येईल.

(२) एखादी व्यक्ती बाल आहे किंवा नाही यासंबंधी विशेष न्यायालयासमोरील कार्यवाहीत कोणतेही प्रश्न उदभवले तर, असे प्रश्न, अशा व्यक्तीच्या वयाबद्दल त्याची खात्री पटल्यानंतर विशेष न्यायालयाद्वारे निर्धारित करण्यात येतील आणि असे निर्धारित करण्यासाठी ते त्याची कारणे लेखी स्वरुपात नोंदवील.

(२) विशेष न्यायालयाने दिलेला कोणताही आदेश, पोटकलम (२) अन्वये त्याने निर्धारित केल्याप्रमाणे त्या व्यक्तीचे वय अचूक नव्हते यासंबंधी त्या व्यक्तीच्या वयाच्या नंतरच्या कोणत्याही पुराव्याद्वारे केवळ अविधिग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

**३५. बालकाची साक्ष नोंदविण्याची व प्रकरण निकालात काढण्याचा कालावधी.–** (१) विशेष न्यायालयाने अपराधाची दखल घेतल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत बालकाची साक्ष नोंदविण्यात येईल आणि कोणत्याही असल्यास, विलंबाची कारणे, विशेष न्यायालयाद्वारे नोंदविण्यात येतील.

(२) विशेष न्यायालय, शक्य असेल तेथवर, अपराधाची दखल घेतल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत न्यायचौकशी पूर्ण करील.

**३६. साक्ष देतेवेळी आरोपी बालकास पहाणार नाही.–** (१) विशेष न्यायालय, अशी खात्री करील की, साक्षीपुरावा नोंदविते वेळी आरोपीस कोणत्याही प्रकारे बालक दाखविण्यात येणार नाही, त्याच वेळी आरोपी बालकाची जबानी ऐकण्याच्या व त्याच्या वकिलास कळविण्याच्या स्थितीत असेल याची देखील खात्री करील.

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ, विशेष न्यायालय, व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे किंवा एकल दर्शनक्षम आरशांचा किंवा पडद्यांचा किंवा अन्य कोणत्याही साधनांचा वापर करून त्याद्वारे बालकाची जबानी नोंदवू शकेल.

**३७. न्यायचौकशी गुप्तपणे करावयाची.–** विशेष न्यायालय, प्रकरणाची न्यायचौकशी, गुप्तपणे (in camera) व बालकाच्या आईवडिलांच्या किंवा जिच्यावर त्याचा भरवसा किंवा विश्वास आहे अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीत करीलः

परंतु, जेव्हा न्यायालयाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी बालकाची तपासणी करणे गरजेचे आहे असे विशेष न्यायालयाचे मत असेल तेव्हा, ते फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २८४ च्या तरतुदीनुसार आयोगपत्र काढण्याची कार्यवाही करील.

**३८. बालकाची साक्ष नोंदवितेवेळी दुभाषिकाचे किंवा तज्ज्ञाचे सहाय्य.–** (१) जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा न्यायालय बालकाची साक्ष नोंदवितेवेळी विहित करण्यात येईल अशी शैक्षणिक अर्हता, अनुभव असणाऱ्या व अशी फी प्रदान केल्यावर, अनुवादकाचे किंवा दुभाषिकाचे सहाय्य घेऊ शकेल.

(२) जर बालक शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या विकलांग असेल तर, विशेष न्यायालय, बालकाची साक्ष नोंदविण्यासाठी विहित करण्यात येईल अशी शैक्षणिक अर्हता, अनुभव असणाऱ्या व अशी फी प्रदान केल्यावर विशेष शिक्षकाचे किंवा बालकाची संदेशवहनाची रीत परिचत असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे किंवा त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीचे सहाय्य घेऊ शकेल.

## प्रकरण नऊ : संकीर्ण

**३९. तज्ज्ञ, इत्यादींचे सहाय्य घेण्यासाठी बालकाकरिता मार्गदर्शक तत्त्वे.–** याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांस अधीन राहून, राज्य शासन, बालकास सहाय्य करण्यासाठी न्यायचौकशी पूर्व व न्यायचौकशीच्या टप्प्यात सहयोग घेण्यासाठी मानसशास्त्र, सामाजिक कार्य, शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य व बाल विकास यांचे ज्ञान असणाऱ्या अशासकीय संघटना, व्यावसायिक व तज्ज्ञ किंवा व्यक्ती यांचा वापर करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करील.

**४०. तज्ज्ञ, इत्यादींचे सहाय्य घेण्याचा बालकांचा हक्क.–** फौजदारी प्रक्रिया संतिा, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ३०१ च्या तरतुदींस अधीन राहून, बालकाचे कुटुंब किंवा पालक, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधासाठी, त्यांच्या पसंतीच्या कायदेशीर समुपदेशीचे सहाय्य घेण्यास हक्कदार असतील :

परंतु, जर बालकाचे कुटुंब किंवा पालक, विधी समुपदेशी देण्यास असमर्थ ठरले तर, विधी सेवा प्राधिकरण, त्यांना वकील पुरवील.

**४१. कलम ३ ते १३ च्या तरतुदी विवक्षित प्रकरणी लागू नसणे.–** कलम ३ ते १३ (दोन्ही धरून) च्या तरतुदी, जेव्हा बालकाची वैद्यकीय तपासणी किंवा वैद्यकीय उपचार, त्याच्या आईवडिलांच्या किंवा पालकाच्या संमतीने करण्यात येत असेल तेव्हा बालकाच्या अशा वैद्यकीय तपासणीच्या किंवा वैद्यकीय उपचाराच्या बाबतीत लागू असणार नाहीत.

**४२. पर्यायी शिक्षा.–** जेव्हा एखादी कृती किंवा अकृती ही, या अधिनियमान्वये आणि भारतीय दंड संहितेच्या कलम १६६-A, ३५४-A, ३५४-B, ३५४-C, ३५४-D, ३७०, ३७०-A, ३७५, ३७६, ३७६-A, ३७६-C, ३७६-D, ३७६-E किंवा कलम ५०९ याअन्वये शिक्षापात्र असलेला अपराध ठरेल तेव्हा, त्या त्या वेळी अमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अपराधांची दोषी असल्याचे आढळून आलेला अपराधी, जी मोठ्या प्रमाणात आहे अशा शिक्षेसाठी तरतूद केल्याप्रमाणे या अधिनियमाखालील किंवा भारतीय दंड संहितेखालील शिक्षेस पात्र असेल.

**४२-A. हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याचे अल्पीकरण करणार नाही.–** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींशिवाय असतील व त्या त्यांचे अल्पीकरण करणार नाही आणि, कोणतीही विसंगती निर्माण झाल्यास, या अधिनियमाच्या तरतुदींची विसंगतीच्या मर्यादेपर्यंत अशा कोणत्याही कायद्याच्या तरतुदींवर अधिभावी प्रभाव असेल..

**४३. अधिनियमाबद्दल जनजागृती.–** केंद्र सरकार व प्रत्येक राज्य शासन,-

(a) या अधिनियमाच्या तरतुदींची, सर्वसाधारण जनतेस, बालकांना तसेच त्यांच्या आईवडिलांना व पालकांना जाणीव करून देण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींची, नियमित कालांतराने दूरदर्शन, रेडिओ व मुद्रित प्रसारमाध्यमे यांसह प्रसारमाध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्ध करण्यात येत असल्याची;

(b) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याशी संबंधित असणाऱ्या बाबींवर केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांना आणि अन्य संबंधित व्यक्तींना (पोलिस अधिकाऱ्यांसह) नियत कालांतराने प्रशिक्षण देण्यात येत असल्याची,

खात्री करण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करील.

**४४. अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.–** (१) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा ४) याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेला राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, किंवा यथास्थिती, कलम १७ अन्वये स्थापन केलेला राज्य बालहक्क संरक्षण आयोग, या अधिनियमान्वये त्यांच्याकडे सोपविलेल्या कामांशिवाय, विहित करण्यात येईल, अशा रीतीने या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे देखील संनियंत्रण करील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या राष्ट्रीय आयोगास किंवा यथास्थिती, राज्य आयोगास या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबींची चौकशी करतेवेळी, बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा ४) याअन्वये त्यांना जे अधिकार निहित केलेले असतील ते अधिकार असतील.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला राष्ट्रीय आयोग किंवा यथास्थिती, राज्य आयोग, या अधिनियमाखालील त्याचे कार्य, बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा ४) याच्या कलम १६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या वार्षिक अहवालामध्ये देखील समाविष्ट करील.

**४५. नियम करण्याचा अधिकार.–** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमात, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईलः-

(a) कलम १९ च्या पोटकलम (४) अन्वये, कलम २६ च्या पोटकलम (२) व (५) अन्वये व कलम ३८ अन्वये अनुवादकाची किंवा दुभाषिकाची, विशेष शिक्षकाची किंवा बालकाची संदेशवहनाची रीत परिचित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची किंवा त्या क्षेत्रातील तज्ज्ञाची शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि त्यांना प्रदेय असलेली फी;

(b) कलम १९ च्या पोटकलम (५) अन्वये बालकाची काळजी व संरक्षण आणि त्याचा आकस्मिक वैद्यकीय उपचार;

(c) कलम ३३ च्या पोटकलम (८) खालील नुकसानभरपाईचे प्रदान;

(d) कलम ४४ च्या पोटकलम (१) अन्वये या अधिनियमाच्या तरतुदींचे नियतकालिक संनियंत्रण करण्याची रीत.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना एका सत्रात किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रांचे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल आणि जर, उपरोक्तप्रमाणे त्या सत्राच्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या समाप्तीपूर्वी, दोन्ही सभागृहे, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्यास सहमत झाली किंवा असे नियम करण्यात येऊ नये याबाबतीत दोन्ही सभागृहे सहमत झाली तर, त्यानंतर असे नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अमलात येतील, किंवा यथास्थिती अमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**४६. अडचणी दूर करण्याचा अधिकार.-** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणत्याही अडचणी उदभवल्या तर, केंद्र सरकार, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलल्या आदेशाद्वारे, अशा अडचणी दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करू शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## अनुसूची

(कलम २(c) पहा)

## सशस्त्र सेना दले व सुरक्षा दले

(अ) वायुदल अधिनियम, १९५० (१९५० चा ४५)

(ब) भूदल अधिनियम, १९५० (१९५० चा ४६)

(क) आसाम रायफल अधिनियम, २००६ (२००६ चा ४७)

(ड) मुंबई गृहरक्षक दल अधिनियम, १९४७ (१९४७ चा ३)

(इ) सीमा सुरक्षा दला अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४७)

(फ) केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अधिनियम, १९६८ (१९६८ चा ५०)

(ग) केंद्रीय राखीव पोलिस दल अधिनियम, १९४९ (१९४९ चा ६६)

(ह) किनारी सुरक्षा दल अधिनियम, १९७८ (१९७८ चा ३०)

(आय) दिल्ली विशेष पोलिस आस्थापना अधिनियम, १९४६ (१९४६ चा २५)

(जे) इंडो-तिबेट सीमा पोलिस दल अधिनियम, १९९२ (१९९२ चा ३५)

(के) नौदल अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२)

(ल) राष्ट्रीय अन्वेषण एजन्सी अधिनियम, २००८ (२००८ चा ३४)

(म) राष्ट्रीय सुरक्षा दल अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४७)

(न) रेल्वे सुरक्षा बल अधिनियम, १९५७ (१९५७ चा २३)

(ओ) सशस्त्र सीमा बल अधिनियम २००७ (२००७ चा ५३)

(प) विशेष सुरक्षा गट अधिनियम, १९८८ (१९८८ चा ३४)

(क्यू) प्रादेशिक सेना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ५६)

(र) सशस्त्र दल (विशेष अधिकार) अधिनियम, १९५८ (१९५८ चा २५) याच्या कलम २ च्या खंड (अ) मध्ये व्याख्या दिलेल्या सशस्त्र दलांसह राज्याच्या नागरी अधिकारांना साह्य करण्यासाठी राज्य अधिनियमांन्वये स्थापन केलेली आणि अंतर्गत अशांतता किंवा अन्यथा यामध्ये दले तैनात करण्याचा अधिकार असलेली राज्य पोलिस दले (सशस्त्र शिपाई दलांसह)

----------

# ४६. विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६

**(१९४६ चा अधिनियम क्रमांक ३१)**

**(२३ नोव्हेंबर १९४६)**

**विदेशी व्यक्तींबाबत केंद्र शासनाला विवक्षित अधिकार प्रदान करण्यासाठी अधिनियम**

ज्या अर्थी भारतात विदेशी व्यक्तींचा प्रवेश, तेथे त्यांची उपस्थिती व त्यांचे तेथून प्रयाण यासंबंधीच्या अधिकाराचा केंद्र शासनाने वापर करण्यासाठी काही तरतुदी करणे समयोचित आहे;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे -

**१. संक्षिप्त नाव व विस्तार.-** (१) या अधिनियमास ‘विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६’ असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

**२. व्याख्या.-** या अधिनियमात,-

(a) ‘विदेशी व्यक्ती’ याचा अर्थ भारताचा नागरिक नसलेली व्यक्ती असा होतो;

(b) ‘विहित’ याचा अर्थ, या अधिनियमाखाली काढलेल्या आदेशांद्वारे विहित केलेले असा होतो;

(c) ‘विनिर्दिष्ट’ याचा अर्थ, विहित प्राधिकरणाच्या निदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेले असा होतो.

**३. आदेश काढण्याचा अधिकार.-** (१) केंद्र शासन आदेश काढून त्याद्वारे, सर्वसाधारणपणे किंवा सर्व विदेशी व्यक्तींच्या बाबतीत किंवा एखाद्या विशिष्ट विदेशी व्यक्तीबाबत किंवा एखाद्या विहित वर्गाच्या वा वर्णनाच्या विदेशी व्यक्तीबाबत, विदेशी व्यक्तींनी भारतात प्रवेश करणे किंवा तेथून प्रयाण करणे किंवा त्यांनी तेथे उपस्थित असणे किंवा त्यांची तेथील उपस्थिती चालू राहणे या गोष्टींना मनाई करणारा, त्यांचे नियमन करणारा वा त्यांवर निर्बंध घालणारी तरतूद करू शकेल.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकाराच्या व्यापकतेला बाध न देता, या कलमाखाली दिलेल्या आदेशामध्ये अशी तरतूद करता येईल की,-

(a) विदेशी व्यक्तीस भारतात प्रवेश करता येणार नाही, किंवा विहित करण्यात येईल अशा वेळीच व अशा मार्गानेच, तसेच विहित अशाच बंदरात किंवा ठिकाणी आणि आगमनाच्या वेळी विहित अशा शर्तींचे पालन करूनच भारतात प्रवेश करावा लागेल;

(b) विदेशी व्यक्तीस भारतातून प्रयाण करता येणार नाही, किंवा विहित करण्यात येईल अशा वेळीच व अशाच मार्गाने, तसेच विहित अशा बंदरातून किंवा ठिकाणाहून आणि प्रयाणाच्याच वेळी विहित अशा शर्तींचे पालन करूनच भारतातून प्रयाण करावे लागेल;

(c) विदेशी व्यक्तीस भारतात किंवा तेथील एखाद्या विहित भागात थांबून राहता येणार नाही;

(cc) विदेशी व्यक्तीस या कलमाखालील आदेशाद्वारे भारतात तिने थांबून राहू नये असे फर्मावण्यात आले असेल तर, त्या विदेशी व्यक्तीस भारतातून होणाऱ्या तिच्या निष्कासनाचा व असे निष्कासन होईतोवर तिच्या निर्वाहाचा खर्च तिला जमेल त्या मार्गाने भागवावा लागेल;

(d) विदेशी व्यक्तीस भारतातील जे क्षेत्र विहित करण्यात येईल अशा क्षेत्रात स्थानांतरण करून तेथेच राहावे लागेल;

(e) विदेशी व्यक्तीस विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींचे पालन करावे लागेल, त्या अशाः-

(i) विशिष्ट ठिकाणी वास्तव्य करावयास लावणारी शर्त;

(ii) तिच्या हालचालींवर कोणतेही निर्बंध लादणारी शर्त;

(iii) विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे तिने आपली ओळख पटवणारा तसा पुरावा सादर करणे आणि विहित किंवा विनिर्दिष्ट असा तपशील तशा प्राधिकरणाला तशा पद्धतीने आणि तशावेळी व ठिकाणी कळवणे या गोष्टी आवश्यक ठरवणारी शर्त;

(iv) तिने आपले छायाचित्र व बोटांचे ठसे घेऊ देणे आणि आपल्या हस्ताक्षराचे व स्वाक्षरीचे नमुने विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशावेळी व ठिकाणी सादर करणे या गोष्टी आवश्यक ठरवणारी शर्त;

(v) विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडून आणि अशावेळी व ठिकाणी तिला स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घ्यावयास लावणारी शर्त;

(vi) विहित किंवा विनिर्दिष्ट वर्णनाच्या व्यक्तींशी संबंध ठेवण्यास तिला मनाई करणारी शर्त;

(vii) विहित किंवा विनिर्दिष्ट वर्णनाच्या कृती करण्यास तिला मनाई करणारी शर्त;

(viii) विहित किंवा विनिर्दिष्ट वस्तू वापरण्यास किंवा जवळ बाळगण्यास तिला मनाई करणारी शर्त;

(ix) विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही बाबतीत तिच्या वर्तणुकीचे अन्यथा नियमन करणारी शर्त;

(f) विदेशी व्यक्तीस, विहित किंवा विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही किंवा सर्व निर्बंधांचे किंवा शर्तींचे योग्य रीतीने पालन होण्यासाठी, किंवा त्यांच्या अंमलबजावणीला पर्याय म्हणून, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र करून द्यावे लागेल;

(g) विदेशी व्यक्तीला अटक करण्यात यावी आणि तिला स्थानबद्ध किंवा बंदिवान करण्यात यावे;

आणि, विहित करावयाच्या किंवा करता येईल अशा कोणत्याही गोष्टीसाठी आणि केंद्र शासनाच्या मते, या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने समयोचित किंवा आवश्यक असलेल्या कोणत्याही आनुषंगिक व पूरक बाबींसाठी त्या आदेशाद्वारे तरतूद करता येईल.

(३) यासंबंधात विहित केलेले कोणतेही प्राधिकरण, कोणत्याही विशिष्ट विदेशी व्यक्तीच्या बाबतीत, पोटकलम (२) चा खंड (e) किंवा खंड (f) यान्वये आदेश काढू शकेल.

**३-A. राष्ट्रकुलांतर्गत देशांतील नागरिकांना व इतर व्यक्तींना विवक्षित प्रकरणी हा अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याचा अधिकार.-** (१) केंद शासन आदेश काढून त्याद्वारे असे जाहीर करू शकेल की, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या सर्व किंवा काही तरतुदी पुढील व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या बाबतीत लागू होणार नाहीत किंवा प्रस्तुत आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशाच परिस्थितीत किंवा असेच अपवाद किंवा बदल करून किंवा अशाच शर्तींच्या अधीनतेने लागू होतीलः-

(a) याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही राष्ट्रकुलांतर्गत देशाचे नागरिक; किंवा

(b) इतर कोणतीही विशिष्ट विदेशी व्यक्ती किंवा विशिष्ट वर्गाची अथवा वर्णनाची विदेशी व्यक्ती.

(२) या कलमाखाली काढलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत, तो आदेश काढल्यानंतर शक्य होईल तेवढ्या लवकर संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

**४. नजरकैदी.-** (१) ज्या कोणत्याही विदेशी व्यक्तींबाबत, तिला स्थानबद्ध किंवा बंदिवान करण्यात यावे असे सांगणारा कलम ३, पोटकलम (२), खंड (g) खालील आदेश अमलात असेल तिला (यात यापुढे 'नजरकैदी' म्हणून निर्दिष्ट) केंद्र शासन वेळोवेळी आदेशाद्वारे ठरवून देईल अशा ठिकाणी व अशा पद्धतीने आणि निर्वाह, शिस्तपालन व गुन्ह्यांना शिक्षा आणि शिस्तभंग यासंबंधी ते ठरवून देईल अशा शर्तींच्या अधीनतेने स्थानबद्ध किंवा बंदिवान करण्यात येईल.

(२) ज्या कोणत्याही विदेशी व्यक्तीच्या बाबतीत, काही विदेशी व्यक्तींच्या देखरेखीखाली निवासासाठी अलग राखून ठेवलेल्या एखाद्या ठिकाणी तिने राहावे असे फर्मावणारा कलम ३, पोटकलम (२), खंड (e) खालील आदेश अमलात असेल ती व्यक्ती (यात यापुढे 'पारोलबद्ध वक्ती' म्हणून निर्दिष्ट), त्याठिकाणी राहात असताना, निर्वाह, शिस्तपालन व गुन्ह्यांना शिक्षा आणि शिस्तभंग याबाबतच्या ज्या शर्ती केंद्र शासन वेळोवेळी आदेशाद्वारे ठरवून देईल त्या शर्तींना अधीन राहील.

(३) कोणत्याही व्यक्तीस पुढील गोष्टी करता येणार नाहीतः-

(a) नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्तीस हवालतीतून किंवा तिच्या निवासासाठी अलग राखून ठेवलेल्या जागेतून निसटून जाण्यास जाणूनबुजून साहाय्य करणे किंवा अशाप्रकारे निसटून गेलेल्या नजरकैदीस किंवा पारोलबद्ध व्यक्तीस जाणूनबुजून आसरा देणे; किंवा

(b) नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्ती निसटून गेली असता, ती व्यक्ती पकडली जाऊ नये, त्याकामी व्यत्यय यावा किंवा हस्तक्षेप व्हावा अशा हेतूने त्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे साहाय्य करणे.

(४) भारतातील ज्याठिकाणी नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्तींना स्थानबद्धतेत किंवा, प्रकरणपरत्वे, निर्बंधात ठेवण्यात आलेले असेल त्याठिकाणी जाण्याबाबत आणि त्याठिकाणी करावयाच्या वर्तणुकीबाबत नियमन करण्याकरिता, आणि विहित करण्यात येतील अशा वस्तू अशा ठिकाणाबाहेरून नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्तींकडे पाठवण्यास किंवा त्यांच्यासाठी नेण्यास मनाई करण्याकरिता किंवा त्याबाबत नियमन करण्याकरिता केंद्र शासन आदेशाद्वारे तरतुदी करू शकेल.

**५. नावात बदल करणे.-** (१) हा अधिनियम अमलात आला त्या तारखेस जी विदेशी व्यक्ती भारतात होती अशा कोणत्याही व्यक्तीला, त्या तारखेनंतर भारतात असताना, उक्त तारखेच्या निकटपूर्व काळात ती साधारणतः ज्या नावाने ओळखली जात असेल त्या नावाव्यतिरिक्त इतर कोणतेही नाव कोणत्याही प्रयोजनासाठी धारण करता किंवा वापरता येणार नाही अथवा त्या प्रयोजनासाठी धारण करण्याचा किंवा वापरण्याचा उद्देश बाळगता येणार नाही.

(२) हा अधिनियम ज्या तारखेस अमलात आला त्या तारखेनंतर एखाद्या विदेशी व्यक्तीने जर एखादा व्यापार किंवा धंदा, उक्त तारखेच्या निकटपूर्वी तो व्यापार किंवा धंदा ज्या नावाने किंवा अभिधानाने चालवला जात होता त्यापेक्षा वेगळ्या अशा कोणत्याही नावाने स्वतंत्रपणे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीशी सहयोग करून चालू ठेवला किंवा चालू ठेवण्याचे योजिले तर, पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ ती व्यक्ती उक्त तारखेच्या निकटपूर्वी ज्या नावाने ती ओळखली जात होती त्यापेक्षा वेगळे नाव वापरीत आहे असे मानण्यात येईल.

(३) हा अधिनियम अमलात आला त्या तारखेस भारतात नसलेली एखादी विदेशी व्यक्ती त्यानंतर भारतात आली तर तिच्या बाबतीत, पोटकलम (१) व (२) मध्ये हा अधिनियम अमलात आल्याच्या तारखेसंबंधीचा जो कोणताही उल्लेख असेल त्याऐवजी जणू काही ती विदेशी व्यक्ती त्यानंतर भारतात प्रथम ज्या तारखेस आली त्या तारखेचाच उल्लेख केलेला असावा त्याप्रमाणे ती पोटकलमे परिणामक होतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ -

(a) 'नाव' या शब्दप्रयोगात आडनावाचाही समावेश होतो; आणि

(b) नावातील वर्णक्रम बदलल्यास नाव बदलण्यात आले असे मानण्यात येईल.

(५) (a) केंद्र शासनाने दिलेल्या लायसनास किंवा परवानगीस अनुसरून एखादे नाव; किंवा

(b) विवाहित महिलेने तिच्या पतीचे नाव धारण केल्याच्या किंवा वापरल्याच्या बाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**६. नौकाधिपती इत्यादींवरील आबंधने.-** (१) भारतातील बंदराला लागणाऱ्या किंवा तेथून प्रवासाला निघणाऱ्या ज्या जलयानातील उतारू समुद्रमार्गे त्या बंदरात येणारे किंवा तेथून जाणारे असतील त्याच्या अधिपतीला आणि भारतातील कोणत्याही ठिकाणी उतरणाऱ्या किंवा तेथून निघणाऱ्या ज्या वायुयानातील उतारू हवाईमार्गे त्याठिकाणी येणारे किंवा तेथून जाणारे असतील त्याच्या पायलटाला जे विदेशीय असतील असे कोणतेही उतारू किंवा यानिकगणाचे सदस्य यांच्याबाबत विहित तपशील पुरवणारे एक प्रतिवेदन विहित करण्यात येईल अशा व्यक्तीकडे आणि तशा पद्धतीने सादर करावे लागेल.

(२) कोणताही जिल्हा दंडाधिकारी आणि कोणताही **पोलीस आयुक्त किंवा जेथे पोलीस आयुक्त नसेल तेथे कोणताही पोलीस अधीक्षक** हा, या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या अंमलबजावणीच्या संबंधातील कोणत्याही प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल अशा कोणत्याही जलयानाच्या अधिपतीला किंवा अशा कोणत्याही वायुयानाच्या पायलटाला त्या जलयानातील किंवा वायुयानातील, प्रकरणपरत्वे, उतारू किंवा यानिकगणाचे सदस्य यांच्यासंबंधी विहित करण्यात येईल अशी माहिती सादर करण्यास फर्मावू शकेल.

(३) अशा जलयानातील किंवा वायुयानातील कोणत्याही उतारूकडून आणि अशा जलयानातील किंवा वायुयानातील यानिकगणाच्या कोणत्याही सदस्याकडून, प्रकरणपरत्वे, जलयानाच्या अधिपती किंवा वायुयानाचा पायलट पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले प्रतिवेदन सादर करण्यासाठी किंवा पोटकलम (२) अन्वये आवश्यक असेल अशी माहिती सादर करण्यासाठी मागवील अशी कोणतीही माहिती त्या उतारूला किंवा सदस्याला त्याच्याकडे सादर करावी लागेल.

(४) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून एखाद्या विदेशी व्यक्तीने भारतात प्रवेश केला तर, तिने असा प्रवेश केल्यापासून दोन महिन्यांच्या आत विहित प्राधिकरण,

ज्याच्याद्वारे असा प्रवेश करण्यात आला, त्या जलयानाच्या अधिपतीला किंवा वायुयानाच्या पायलटला अथवा अशा जलयानाच्या किंवा वायुयानाच्या मालकाला किंवा त्या मालकाच्या अभिकर्त्याला, प्राधिकरणाचे समाधान होईल अशाप्रकारे व सरकारच्या खर्चाने नव्हे तर अन्यथा उक्त विदेशी व्यक्तीला भारतातून निष्कासित करण्यासाठी जलयानात किंवा वायुयानात तिला जागा देण्याची व्यवस्था करण्यास फर्मावू शकेल.

(५) भारतातील एखाद्या बंदरातून किंवा ठिकाणाहून भारताबाहेरील इतर कोणत्याही ठिकाणी जे उतारूंना घेऊन जाणार आहे अशा कोणत्याही जलयानाच्या अधिपती किंवा वायुयानाचा पायलट अथवा अशा जलयानाचा किंवा वायुयानाचा मालक किंवा त्या मालकाचा अभिकर्ता, त्याला जर केंद्र शासनाने तसा निदेश दिला आणि चालू दराने भाड्याची रक्कम भरण्यात आली तर, कलम ३ अन्वये भारतात न राहण्याचा आदेश दिलेल्या विदेशी व्यक्तीला व तिच्यावर अवलंबून असलेल्या कोणी व्यक्ती तिच्यासोबत प्रवास करीत असल्यास त्यांना केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा ज्या बंदरात किंवा ठिकाणी ते जलयान किंवा वायुयान थांबणार असेल अशा भारताबाहेरील बंदरापर्यंत किंवा ठिकाणापर्यंत जाण्यासाठी आपल्या जलयानात किंवा वायुयानात जागा उपलब्ध करून देईल.

(६) या कलमाच्या प्रयोजनांसाठी -

(a) 'एखाद्या जलयानाच्या अधिपती' आणि 'कोणत्याही वायुयानाचा पायलट' या संज्ञांमध्ये या कलमान्वये आपणाकडे सोपवण्यात आलेली आपली कर्तव्ये आपल्या वतीने पार पाडण्यासाठी अशा अधिपतीने किंवा, प्रकरणपरत्वे, पायलटाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो;

(b) 'उतारू' याचा अर्थ, यानिकगणाचा खराखुरा सदस्य नसलेली आणि जलयानातून किंवा वायुयानातून प्रवास करणारी किंवा प्रवास करू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती असा होतो.

**७. हॉटेलचालक आणि इतर यांच्यावर तपशील पुरवण्याचे आबंधन.-** (१) ज्या ठिकाणी राहण्याची किंवा झोपण्याची सोय बक्षिसी घेऊन केली जाते अशी वास्तू सुसज्ज असली वा नसली तरी तेथील चालकाने, अशा वास्तूमध्ये ज्या विदेशी व्यक्तींची सोय करण्यात आलेली असेल त्यांच्याबद्दलची विहित करण्यात येईल अशी माहिती अशा विहित व्यक्तीस आणि विहित पद्धतीने कळवणे हे त्या चालकाचे कर्तव्य असेल.

**स्पष्टीकरण.-** या पोटकलमात उल्लेखिलेली माहिती ही अशा वास्तूत ज्यांची सोय करण्यात आली आहे त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही विदेशी व्यक्तींशी संबंधित असू शकेल आणि ती ठरावीक कालांतरागणिक किंवा विशिष्ट वेळ वा प्रसंगी सादर करण्यात यावी असे सांगता येईल.

(२) अशा प्रकारच्या कोणत्याही वास्तूत सोय करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेली माहिती सादर करण्यासाठी त्या वास्तूचा चालक मागवील असा तपशील त्या चालकाकडे सादर करावा लागेल.

(३) अशा प्रत्येक वास्तूच्या चालकाला, त्याने स्वतः पोटकलम (१) अन्वये सादर केलेल्या माहितीची आणि पोटकलम (२) अन्वये त्याने मिळवलेल्या माहितीची दप्तरी नोंद ठेवावी लागेल आणि ते दप्तर विहित करण्यात येईल अशा पद्धतीनुसार ठेवावे लागेल व विहित अशा कालावधीपर्यंत जतन करावे लागेल आणि कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला ते दप्तर निरीक्षणार्थ खुले राहील.

(४) यासंबंधात विहित केलेल्या एखाद्या क्षेत्रात, विहित प्राधिकरणाने संबंधित व्यक्तींना कळवण्यासाठी त्याच्या मते

सुयोग्य अशा पद्धतीने एखादी नोटीस प्रसिद्ध करून जर तसा निदेश दिला तर कोणत्याही निवासी वास्तूची वहिवाट करणाऱ्या किंवा तिच्यावर ताबा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने अशा वास्तूत सोय करण्यात येणाऱ्या विदेशी व्यक्तींच्या संबंधात, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती विनिर्दिष्ट अशा व्यक्तीस व विनिर्दिष्ट अशा पद्धतीने सादर करणे हे तिचे कर्तव्य असेल; आणि अशा वास्तूत सोय करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस पोटकलम (२) च्या तरतुदी लागू होतील.

**७-A. विदेशी व्यक्तींची वर्दळ असणाऱ्या जागांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.-** (१) जी वास्तू उपाहारगृह म्हणून किंवा सार्वजनिक राबत्याचे किंवा करमणुकीचे स्थान म्हणून किंवा क्लब म्हणून वापरण्यात येते व जेथे विदेशी व्यक्तींचा राबता असतो अशा कोणत्याही वास्तूच्या मालकास अथवा त्या वास्तूवर ताबा असणाऱ्या व्यक्तीस पुढील गोष्टी करण्याबाबत विहित प्राधिकरण, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, निदेश देऊ शकेलः-

(a) अशी वास्तू संपूर्णपणे किंवा विशिष्ट कालावधीपुरती बंद ठेवणे, किंवा

(b) विनिर्दिष्ट करण्यात येईल अशाच परिस्थितीत अशा वास्तूचा वापर करणे किंवा वापर करू देणे, किंवा

(c) अशा वास्तूमध्ये सर्व विदेशी व्यक्तींना किंवा एखाद्या विशिष्ट विदेशी व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला प्रवेश नाकारणे.

(२) ज्या व्यक्तीला पोटकलम (१) अन्वये कोणताही निदेश देण्यात आलेला असेल ती व्यक्ती, तो निदेश अमलात असेपर्यंत विहित प्राधिकरणाच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज व ज्या अटी घालणे प्राधिकरणास योग्य वाटेल अशा अटींचे अनुसरण केल्याखेरीज, उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी इतर कोणत्याही वास्तूचा वापर करणारे नाही किंवा करू देणार नाही.

(३) पोटकलम (१) अन्वये कोणताही निदेश देण्यात आलेला असून त्यामुळे जी व्यक्ती नाराज झाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, असा निदेश दिल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत केंद्र शासनाकडे अपील करता येईल; आणि या बाबतीत केंद्र शासनाचा निर्णय अंतिम राहील.

**८. राष्ट्रीयत्व ठरवणे.-** (१) जेव्हा एखादी विदेशी व्यक्ती ही एकापेक्षा अधिक विदेशी राष्ट्रांच्या कायद्यानुसार राष्ट्रीक म्हणून ओळखली जात असेल किंवा एखाद्या विदेशी व्यक्तीला एखादे राष्ट्रीयत्व द्यावयाचेच तर ते कोणते द्यावे हे काही कारणास्तव ठरविता येत नसेल तेव्हा, हितसंबंध किंवा सहानुबंध यादृष्टीने ती विदेशी व्यक्ती त्या त्या वेळी ज्या देशाशी सर्वाधिक निकटसंबंधित आहे असे विहित प्राधिकरणास वाटेल त्या देशाची अथवा तिचे राष्ट्रीयत्व अनिश्चित असेल तर, तिचे त्याप्रमाणे लगतपूर्वी ज्या देशाशी संबंध होते त्या देशाची ती राष्ट्रीक असल्याचे मानता येईल :

परंतु, जेव्हा एखाद्या विदेशी व्यक्तीस जन्माने एखादे राष्ट्रीयत्व प्राप्त झालेले असेल तेव्हा, केंद्र शासनाने सरसकट किंवा एखाद्या विशिष्ट प्रकरणी तसे निदेशित केल्यास तेवढे खेरीजकरून एरवी, त्या व्यक्तीचे मूळचे राष्ट्रीयत्व कायम आहे असे मानण्यात येईल - मात्र त्या विदेशी व्यक्तीने त्यानंतर नागरिकीकरणाद्वारे किंवा अन्यथा दुसरे एखादे राष्ट्रीयत्व प्राप्त करून घेतलेले आहे व अशा रीतीने तिने ज्या देशाचे राष्ट्रीयत्व प्राप्त करून घेतलेले आहे त्या देशाच्या शासनाकडून संरक्षण मिळण्यास पात्र म्हणून ती अजूनही ओळखली जात आहे असे त्या व्यक्तीने उक्त प्राधिकरणाचे समाधान होईल अशाप्रकारे शाबीत केले तर गोष्ट वगळण्यात येईल.

(२) राष्ट्रीयत्वासंबंधी पोटकलम (१) अन्वये दिलेला निर्णय अंतिम राहील आणि त्याला कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही :

परंतु, केंद्र शासन स्वतः होऊन किंवा संबंधित विदेशी व्यक्तीने अर्ज केल्यावरून, असा निर्णय बदलू शकेल.

**९. शाबितीची जबाबदारी.–** कलम ८ च्या कक्षेत न येणाऱ्या एखाद्या प्रकरणामध्ये या अधिनियमाच्या संदर्भात किंवा या अधिनियमान्वये दिलेल्या एखाद्या आदेशाच्या वा निदेशाच्या संदर्भात जर अमुक एखादी व्यक्ती ही विदेशी व्यक्ती आहे की नाही अथवा ती व्यक्ती विशिष्ट वर्गाची वा वर्णनाची विदेशी व्यक्ती आहे की नाही असा प्रश्न उपस्थित झाला तर, त्या परिस्थितीत ती व्यक्ती विदेशी व्यक्ती नाही अथवा, प्रकरणपरत्वे, विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची विदेशी व्यक्ती नाही हे शाबीत करण्याची जबाबदारी 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२' (१८७२ चा १) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा व्यक्तीवरच राहील.

**१०. अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याचा अधिकार.–** 'विदेशी व्यक्तींविषयीचे कायदे (सुधारणा) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ११) कलम ७ द्वारे निरसित (१९ जानेवारी, १९५७ पासून).

**११. आदेश, निदेश इत्यादींची अंमलबजावणी करण्याचा अधिकार.–** (१) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याखाली किंवा त्यानुसार कोणताही निदेश देण्याचा किंवा इतर कोणताही अधिकार वापरण्याचा अधिकार ज्याला प्रदान करण्यात आलेला आहे असे कोणतेही प्राधिकरण, या अधिनियमात स्पष्टपणे तरतूद केल्याप्रमाणे करावयाच्या अन्य कोणत्याही कारवाईव्यतिरिक्त, अशा निदेशाची अनुपालन व्हावे किंवा त्या निदेशाचा भंग होऊ नये वा झाल्यास त्याचे परिमार्जन व्हावे किंवा, प्रकरणपरत्वे, त्या अधिकाराचा वापर प्रभावीरीत्या व्हावा यासाठी, त्याच्या मते वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक असतील असे उपाय योजू शकेल किंवा योजण्याची व्यवस्था करू शकेल आणि आवश्यक तेवढ्या बळाचा वापर करू शकेल किंवा वापर करण्याची व्यवस्था करू शकेल.

(२) कोणताही **पोलीस अधिकारी** हा, या अधिनियमाखाली किंवा त्यानुसार काढलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा निदेशाचे अनुपालन व्हावे किंवा त्या आदेशाचा किंवा निदेशाचा भंग होऊ नये किंवा झाल्यास त्याचे परिमार्जन व्हावे यासाठी, त्याच्या मते वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक असतील असे उपाय योजू शकेल आणि आवश्यक तेवढ्या बळाचा वापर करू शकेल.

(३) या कलमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारामुळे, त्या अधिकाराचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही जमिनीवर व इतर मालमत्तेच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकारही प्रदान होतो असे मानण्यात येईल.

**१२. प्राधिकार प्रत्यायोजित करण्याचा अधिकार.–** एखादा निदेश, संमती किंवा परवानगी देण्याचा किंवा इतर कोणतीही कृती करण्याचा अधिकार या अधिनियमान्वये किंवा त्या अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशान्वये ज्या प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेली असेल ते प्राधिकरण, विरूद्ध अशी स्पष्ट तरतूद केलेली नसेल तर, आपल्या हाताखाली कोणत्याही दुय्यम प्राधिकरणास आपल्या वतीने अशा अधिकाराचा वापर करण्यासाठी, सशर्त वा बिनशर्त, लेखी प्राधिकृत करू शकेल, आणि त्यानंतर त्या प्राधिकारपत्रात ज्या काही शर्ती असतील त्यांच्या अधीनतेने, ते दुय्यम प्राधिकरण हे या अधिनियमान्वये किंवा त्याखाली ज्यास अधिकार प्रदान केलेला आहे ते प्राधिकरण असल्याचे मानले जाईल.

**१३. या अधिनियमाचे उपबंध इत्यादींचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करणे इ.–** (१) जी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल किंवा अपप्रेरणा देण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्याची पूर्वतयारी म्हणून एखादी कृती करील,

किंवा अशा कोणत्याही आदेशानुसार दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात कसूर करील तिने या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे मानण्यात येईल.

(२) जी कोणीही व्यक्ती, अन्य कोणाही व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतुदींचे अथवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा देण्यात आलेल्या निदेशाचे उल्लंघन केले आहे हे माहीत असताना अथवा असे समजण्यास वाजवी कारण असताना उक्त उल्लंघन केल्याबद्दल त्या अन्य व्यक्तीच्या अटकेला, संपरीक्षेला अथवा शिक्षेला प्रतिबंध करण्याच्या, त्यामध्ये व्यत्यय आणण्याच्या अथवा अन्यथा त्यात हस्तक्षेप करण्याच्या हेतूने कोणतेही साहाय्य करील तिने त्या उल्लंघनाला अपप्रेरणा दिली आहे असे मानण्यात येईल.

(३) कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा त्याच्या अनुसार देण्यात आलेल्या निदेशाचे उल्लंघन करून कोणतीही विदेशी व्यक्ती ज्याच्या साहाय्याने भारतात प्रवेश करील अथवा भारत सोडून जाईल त्या जलयानाचा अधिपती अथवा त्या वायुयानाचा पायलट याने उक्त उल्लंघन होऊ नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केले नाही तर, त्याने या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे असे मानण्यात येईल

**१४. अधिनियम इत्यादींच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.–** जो कोणी,

(a) त्याला ज्या कालावधीसाठी प्रवेशपत्र (व्हिसा) देण्यात आला असेल त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी भारतातील कोणत्याही क्षेत्रात राहील;

(b) त्याला भारतात प्रवेश करण्यासाठी देण्यात आलेल्या वैध प्रवेशपत्रातील शर्तींचे उल्लंघन करणारी कोणतीही कृती करील आणि भारतात किंवा त्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही भागात राहील;

(c) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींचे किंवा या अधिनियमानुसार देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे किंवा ज्यासाठी या अधिनियमान्वये विशिष्ट शास्तीची तरतूद करण्यात आलेली नाही अशा आदेशाचे उल्लंघन करील त्याला पाच वर्षांपर्यंत असू शकेल अशा कोणत्याही मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तसेच तो दंडासही पात्र असेल; आणि जर त्याने कलम ३, पोटकलम (२) च्या खंड (f) अनुसार बंधपत्र केले असेल तर त्याचे ते बंधपत्र जप्त करण्यात येईल आणि त्या बंधपत्राद्वारे बांधील असलेली कोणतीही व्यक्ती त्यासाठीची शास्ती भरील किंवा त्याने अशी शास्ती का न द्यावी याबाबतची कारणे, दोषी ठरविणाऱ्या न्यायालयाचे समाधान होईल अशाप्रकारे देईल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनासाठी 'प्रवेशपत्र' या संज्ञेला या पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम, १९२० (१९२० चा ३४) याखाली करण्यात आलेल्या पासपोर्ट (भारतात प्रवेश) नियम, १९५० यात जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

**१४-A. निर्बंधित क्षेत्र इत्यादीमध्ये प्रवेश केल्याबद्दल शास्ती.–** जो कोणी -

(a) या अधिनियमान्वये काढलेल्या आदेशानुसार किंवा त्यानुसार दिलेल्या निदेशानुसार, त्याला ज्या क्षेत्रात प्रवेश करण्यास निर्बंधित केले आहे अशा, भारतातील कोणत्याही क्षेत्रात भारत सरकारने या प्रयोजनासाठी भारतीय राजपत्रात अधिसूचित केले असेल अशा प्राधिकाऱ्याकडून परवानगी घेतल्याशिवाय प्रवेश करील किंवा अशा क्षेत्रात, अशा परवान्यामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा कालावधीपेक्षा अधिक काळ राहील; किंवा

(b) भारतातील कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी किंवा राहण्यासाठी, या अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींनुसार किंवा त्यानुसार दिलेल्या कोणत्याही निदेशानुसार आवश्यक असतील अशा वैध दस्तऐवजांशिवाय असा प्रवेश करील किंवा अशाप्रकारे राहील,

त्याला, दोन वर्षांपेक्षा कमी नाही मात्र आठ वर्षांपर्यंत असू शकते अशा कारावासाची शिक्षा होईल आणि तसेच तो दहा हजार रूपयांपेक्षा कमी नाही परंतु पन्नास हजार रूपयांपर्यंत कितीही असू शकेल अशा द्रव्यदंडासही पात्र ठरेल; आणि जर त्याने कलम ३, पोटकलम (२) च्या खंड (f) अनुसार एखादे बंधपत्र केले असेल तर त्याचे बंधपत्र जप्त करण्यात येईल आणि त्या बंधपत्राद्वारे बांधील असलेले कोणतीही व्यक्ती त्यासाठीची शास्ती भरील किंवा त्याने अशी शास्ती का भरू नये त्याबाबतचे, त्याला दोषी ठरविणाऱ्या न्यायालयाचे समाधान होईल असे कारण दाखवील.

**१४-B. बनावट पासपोर्ट वापरण्याबद्दल शास्ती.–** जो कोणी, भारतात प्रवेश करण्यासाठी, बनावट आहे असे माहीत असलेल्या पासपोर्टचा वापर करील आणि त्यावेळी अमलात असलेल्या कायद्यानुसार प्राधिकार नसताना तेथे राहील तो, दोन वर्षांपेक्षा कमी नाही परंतु आठ वर्षांपर्यंत कितीही असू शकेल अशा कारावासास पात्र असेल आणि तसेच, दहा हजार रूपयांपेक्षा कमी नाही मात्र पन्नास हजार रूपयांपर्यंत कितीही असू शकेल अशा द्रव्यदंडासही पात्र असेल.

**१४-C. अपप्रेरणा दिल्याबद्दल शास्ती.–** जो कोणी, कलम १४ किंवा कलम १४-A किंवा कलम १४-B अन्वये शिक्षा देण्यास योग्य असलेल्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल त्याला, ज्या कृतीसाठी अपप्रेरणा दिली असेल ती कृती अपप्रेरणेचा परिणाम म्हणून करण्यात आली असेल तर त्या अपराधासाठी असलेली शिक्षा देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनासाठी -

(i) एखादी कृती किंवा अपराध, अपप्रेरणेच्या परिणामी, किंवा करानुसार, किंवा जे अपराध ठरते त्याच्या साहाय्याने करण्यात आला असेल तर ती कृती किंवा अपराध त्या अपप्रेरणेच्या परिणामी करण्यात आला असे म्हणण्यात येते;

(ii) 'अपप्रेरणा' या संज्ञेला भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १०७ अन्वये जो अर्थ देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

**१५. या अधिनियमाखाली कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.–** या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक करण्यात आली असेल किंवा करण्याचे योजलेले असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**१६. इतर कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.–** या अधिनियमातील तरतुदी या 'विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९२९' (१९२९ चा १६) 'भारताचे पारपत्र अधिनियम, १९२०' (१९२० चा ३४) आणि त्या त्या वेळी अमलात असलेली इतर कोणतीही अधिनियमिती यातील तरतुदीखेरीज अधिक असतील, त्यास न्यूनकारी असणार नाहीत.

**१७. निरसने.–** 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५०' (१९५० चा ३५) - कलम २ व अनुसूची १ ली याद्वारे निरसित.

----------

# ४७. भारतीय पारपत्र अधिनियम, १९६७

**(सन १९६७ चा अधिनियम क्रमांक १५)**

**(२४ जून १९६७)**

भारतीय नागरिक आणि इतर व्यक्ती यांच्या भारताबाहेर प्रयाण करण्याबाबत नियमन करण्याच्या दृष्टीने त्यांना पासपोर्ट व प्रवासपत्रे देण्यासाठी आणि त्यास आनुषंगिक व साहाय्यभूत बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम

भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवोः-

**१. संक्षिप्त नाव व विस्तार.-** (१) या अधिनियमास, भारतीय पारपत्र अधिनियम, १९६७ असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे आणि भारताबाहेर असलेल्या भारतीय नागरिकांनाही तो लागू आहे.

**२. व्याख्या.-** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,-

(a) ''प्रयाण'' या शब्दाचे व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसुद्धा त्याचा अर्थ जलमार्गे, खुष्कीमार्गे किंवा हवाईमार्गे भारताबाहेर प्रयाण करणे, असा आहे;

(b) ''पासपोर्ट'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये दिलेला किंवा दिला गेल्याचे मानण्यात येणारा पासपोर्ट, असा आहे;

(c) ''पासपोर्ट प्राधिकारी/प्राधिकरण'' याचा अर्थ, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्याबाबत या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनुसार ज्याला शक्ती प्रदान कण्यात आल्या आहेत, असा अधिकारी किंवा असे प्राधिकरण, असा आहे; आणि यात केंद्र शासनाचा समावेश आहे;

(d) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे;

(e) ''प्रवासपत्र'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये दिलेले किंवा दिले गेल्याचे मानण्यात येणारे प्रवासपत्र असा आहे.

**३. भारताबाहेर प्रयाण करण्यासाठी पासपोर्ट किंवा प्रवासपत्र.-** कोणत्याही व्यक्तीला प्रयाण करण्याबाबतचा विधिग्राह्य पासपोर्ट किंवा प्रवासपात्र धारण केल्याखेरीज भारताबाहेर प्रयाण करता येणार नाही किंवा तसे प्रयाण करण्याचा प्रयत्न करता येणार नाही.

**स्पष्टीकरण.-** या कलमांच्या प्रयोजनांसाठी-

(a) ''पासपोर्ट'' यात विदेशी शासनाने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये दिलेला जो पासपोर्ट, तो ज्या वर्गापैकी असेल त्या पासपोर्ट वर्गासंबंधी, पासपोर्ट (भारतामध्ये प्रवेश) अधिनियम, १९२० (१९२० चा ३४) यान्वये विहित केलेल्या शर्ती पूर्ण करतो, अशा पासपोर्टाचाही समावेश आहे;

(b) ''प्रवासपत्र'' यात, विदेशी शासनाने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये दिलेले जे प्रवासपत्र विहित शर्ती पूर्ण करते अशा प्रवासपत्राचाही समावेश आहे.

**४. पासपोर्ट व प्रवासपत्र यांचे वर्ग.–** (१) या अधिनियमाखाली पुढील वर्गाचे पासपोर्ट देता येतील, ते म्हणजे :-

(a) सामान्य पासपोर्ट;

(b) सरकारी पासपोर्ट;

(c) राजदौतिक पासपोर्ट.

(२) या अधिनियमाखाली पुढील वर्गांची प्रवासपत्रे देता येतील, ती म्हणजेः-

(a) आकस्मिक निकडीच्या प्रसंगी एखाद्या व्यक्तीला भारतात प्रवेश करण्यास प्राधिकृत करणारे प्रमाणपत्र

(b) एखाद्या व्यक्तीची ओळख पटविण्याच्या प्रयोजनासाठी ओळख प्रमाणपत्र;

(c) विहित करण्यात येईल असे अन्य प्रमाणपत्र किंवा दस्तऐवज.

(३) केंद्र शासन, याबाबतीत त्याने स्वतः अनुसरलेला परिपाठ व शिरस्ता यानुसार, अनुक्रमे पोटकलम (१) व पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वर्गाचे पासपोर्ट आणि प्रवासपत्रे ज्यांना या अधिनियमान्वये देता येतील, अशा व्यक्तींचे वर्ग विहित करील.

**५. पासपोर्ट, प्रवासपत्रे इत्यादींसाठी अर्ज आणि त्यांवरील आदेश.–** (१) अर्जात नमूद करण्यात येऊ शकेल/शकतील अशा (नामित नसलेल्या) परकीय देशाला किंवा देशांना भेट देण्यासाठी पासपोर्ट मिळावा म्हणून या अधिनियमाखाली करावयाचा कोणताही अर्ज, पासपोर्ट प्राधिकरणाकडे करता येईल आणि त्यासोबत (खास सुरक्षा कागद, छपाई, लॅमिनेशन आणि पासपोर्ट व इतर प्रवासपत्रे देण्यासंबंधातील अन्य संकीर्ण सेवा यांसाठी झालेला खर्च भागविण्याकरिता विहित करण्यात येईल अशी फी) द्यावी लागेल.

**स्पष्टीकरण.–** या कलमात ''नामित परकीय देश'' याचा अर्थ, केंद्र शासन या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील असा परकीय देश, असा आहे.

(१-A) (i) नामित परकीय देशाला भेट देण्यासाठी या अधिनियमाखाली पासपोर्ट मिळावा याकरिता; किंवा

(ii) (नामित परकीय देशासह) अर्जात विनिर्दिष्ट करण्यात येईल/येतील अशा देशाला किंवा देशांना भेट देण्यासाठी प्रवासपत्र मिळावे, याकरिता किंवा या कलमात निर्देशित केलेला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र पृष्ठांकित करून मिळावे याकरिता,

करावयाचा अर्ज, पासपोर्ट प्राधिकरणाकडे करता येईल आणि विहित केलेली (असल्यास) जास्तीत जास्त पन्नास रुपये फी त्यासोबत द्यावी लागेल.

(१-B) या कलमाखाली करावयाचा प्रत्येक अर्ज हा विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा तपशिलासह असेल.

(२) या कलमाखालील अर्ज मिळाल्यावर, पासपोर्ट प्राधिकरण, त्याला काही चौकशी करणे आवश्यक वाटल्यास ती चौकशी करून, या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने लेखी आदेशाद्वारे,-

(a) अर्जामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परकीय देशाच्या किंवा देशांच्या संबंधात पासपोर्ट किंवा प्रवासपत्र पृष्ठांकनासहित देईल अथवा प्रकरणपरत्वे, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र पृष्ठांकित करील; किंवा

(b) अर्जामध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी एका किंवा अधिक परकीय देशांच्या संबंधात, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र पृष्ठांकनासहित देईल अथवा, प्रकरणपरत्वे, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र पृष्ठांकित करील आणि अन्य देशाच्या किंवा देशांच्या बाबतीत, पृष्ठांकन करून देण्याचे नाकारील; किंवा

(c) पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्याचे नाकारील अथवा, प्रकरणपरत्वे पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यांवर कोणतेही पृष्ठांकन करून देण्याचे नाकारील.

(३) जेव्हा पासपोर्ट प्राधिकरण कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून पोटकलम (२) च्या खंड (b) किंवा खंड (c) अन्वये आदेश करील तेव्हा, ते प्राधिकरण असा आदेश करण्याबाबतच्या आपल्या कारणांचे संक्षिप्त निवेदन लेखी नमूद करील आणि त्या व्यक्तीच्या मागणीवरून तिला त्याची एक प्रत देईल- मात्र एखाद्या बाबतीत अशा निवेदनाची प्रत देणे हे भारताची सार्वभौमता व एकात्मता, भारताची सुरक्षितता, भारताचे कोणत्याही परकीय देशाबरोबरचे मैत्रीचे संबंध यांच्या दृष्टीने हिताचे किंवा सर्वसाधारण जनतेच्या हिताचे होणार नाही, असे पासपोर्ट प्राधिकरणाचे मत असेल तर गोष्ट अलाहिदा.

**६. पासपोर्ट, प्रवासपत्रे इत्यादी नाकारणे.–** (१) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, पासपोर्ट प्राधिकरण, कोणत्याही परकीय देशाला भेट देण्याबाबतचे पृष्ठांकन करण्यास कलम ५ च्या पोटकलम (२) मधील खंड (b) किंवा खंड (c) अन्वये पुढीलपैकी एका किंवा अधिक कारणांवरून नकार देईल, अन्य कोणत्याही कारणावरून नाही; ती कारणे अशीः-

(a) अर्जदार अशा देशामध्ये भारताची सार्वभौमता आणि एकात्मता यांना बाधक अशा हालचाली करू शकेल किंवा करण्याचा संभव आहे;

(b) अर्जदाराची अशा देशातील उपस्थिती ही भारताच्या सुरक्षिततेला हानी पोचवू शकेल किंवा हानिकारक ठरण्याचा संभव आहे;

(c) अर्जदाराची अशा देशातील उपस्थिती ही, भारताचे त्या देशाबरोबर किंवा इतर कोणत्याही देशाबरोबर असलेले मैत्रीचे संबंध यांना बाध आणू शकेल किंवा बाधक ठरण्याचा संभव आहे;

(d) केंद्र शासनाच्या मते, अर्जदाराची त्या देशातील उपस्थिती ही लोकहिताची नाही.

(२) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने पासपोर्ट प्राधिकरण, कोणत्याही परकीय देशाला भेट देण्याबाबतचा पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्यास कलम ५ च्या पोटकलम (२) मधील खंड (c) अन्वये पुढीलपैकी एका किंवा अधिक कारणांवरून नकार देईल, अन्य कोणत्याही कारणावरून नाही. ती कारणे अशी :-

(a) अर्जदार हा भारताचा नागरिक नाही;

(b) अर्जदार भारताबाहेर भारताची सार्वभौमता आणि एकात्मता यांना बाधक अशा हालचाली करू शकेल किंवा करण्याचा संभव आहे;

(c) अर्जदाराचे भारताबाहेर प्रयाण होणे हे भारताच्या सुरक्षिततेला हानी पोचवू शकेल किंवा हानिकारक ठरण्याचा संभव आहे;

(d) अर्जदाराची भारताबाहेरची उपस्थिती ही, भारताच्या इतर कोणत्याही परकीय देशाबरोबरच्या मैत्रीच्या संबंधांना बाध आणू शकेल किंवा बाधक ठरण्याचा संभव आहे;

(e) अर्जदाराला, त्याच्या अर्जाच्या दिनांकाच्या लगतपूर्व पाच वर्षांच्या कालावधीमध्ये केव्हातरी भारतातील एखाद्या

न्यायालयाने नैतिक अधःपात अनुस्यूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवलेले आहे आणि त्या संदर्भात त्याला किमान दोन वर्षे कारावासाची शिक्षा देण्यात आलेली आहे;

(f) अर्जदाराने जो अपराध केला असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे, अशा एखाद्या अपराधाबाबतची कार्यवाही भारतातील फौजदारी न्यायालयापुढे प्रलंबित आहे;

(g) त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार न्यायालयाने अर्जदाराला उपस्थित राहण्याबद्दलचे वॉरंट किंवा समन्स किंवा अर्जदाराला अटक करण्याचे वॉरंट काढले आहे किंवा अशा कोणत्याही न्यायालयाने अर्जदाराला भारताबाहेर प्रयाण करण्यास मनाई करणारा आदेश दिलेला आहे;

(h) अर्जदाराला स्वदेशी परत पाठविण्यात आलेले आहे आणि याप्रमाणे त्याला परत पाठविण्यासाठी आलेल्या खर्चाची त्याने प्रतिपूर्ती केलेली नाही;

(i) केंद्र शासनाच्या मते, अर्जदाराला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देणे हे लोकहिताचे ठरणार नाही.

**७. पासपोर्ट आणि प्रवासपत्रे यांची मुदत.–** पासपोर्ट किंवा प्रवासपत्र हे विहित केले असेल तेवढ्या कालावधीपर्यंत अमलात राहील- मात्र तत्पूर्वी ते रद्द करण्यात आले तर गोष्ट अलाहिदा- आणि विविध वर्गाच्या पासपोर्टासाठी किंवा प्रवासपत्रांसाठी अथवा अशा प्रत्येक वर्गाखालील विविध प्रवर्गाच्या पासपोर्टासाठी किंवा प्रवासपत्रांसाठी वेगवेगळे कालावधी विहित करता येतील :

परंतु, पुढील बाबतीत, विहित कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठीही पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देता येईल :-

(a) ज्या व्यक्तीला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र हवे आहे तिची तशी इच्छा असेल तर; किंवा

(b) एखाद्या बाबतीत, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र कमी कालावधीसाठी देण्यात यावे असे जर पासपोर्ट प्राधिकरणाला सकारण वाटेल तर- मात्र, ती कारणे अर्जदाराला लेखी कळविण्यात येतील.

**८. पासपोर्टाच्या मुदतीत वाढ करणे.–** जेव्हा एखादा पासपोर्ट कलम ७ अन्वये विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठी देण्यात आला असेल, तेव्हा पासपोर्ट प्राधिकरणाने अन्यथा ठरवले असेल आणि त्याबद्दलची कारणे लेखी नमूद केली असतील त्याव्यतिरिक्त एरव्ही, असा कमी कालावधी आणखी वाढविता येईल (मात्र, असा कमी कालावधी व वाढविलेला कालावधी मिळून एकूण कालावधी विहित कालावधीपेक्षा अधिक होता कामा नये.) आणि या अधिनियमाचे उपबंध पासपोर्ट मंजूर करण्याबाबत जसे लागू होतात, तसेच ते या वाढीव कालावधीला लागू होतील.

**९. पासपोर्ट आणि प्रवासपत्रे यांच्या शर्ती व नमुने.–** कोणत्या शर्तीच्या अधीनतेने व कोणत्या नमुन्यात पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्यात येईल किंवा त्याचे नूतनीकरण करण्यात येईल ते विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, विविध वर्गांच्या पासपोर्टासाठी किंवा प्रवासपत्रांसाठी अथवा अशा प्रत्येक वर्गाखालील विविध प्रवर्गांच्या पासपोर्टासाठी किंवा प्रवासपत्रांसाठी वेगवेगळया शर्ती व वेगवेगळे नमुने विहित करता येतील :

आणखी असे की, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यांमध्ये विहित शर्तींखेरीज पासपोर्ट प्राधिकरण केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने विशिष्ट प्रकरणी ठरवून देईल अशा आणखी इतर शर्तींचाही समावेश असेल.

**१०. पासपोर्ट आणि प्रवासपत्रे यांमध्ये फेरफार करणे, ती अडकवून ठेवणे व ती रद्द करणे.–** (१) पासपोर्ट प्राधिकरण, कलम ६ च्या पोटकलम (१) चे उपबंध किंवा कलम १९ खालील कोणतीही अधिसूचना विचारात घेऊन,

पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यावरील पृष्ठांकनामध्ये फेरफार करू शकेल किंवा ते रद्द करू शकेल अथवा ज्या शर्तींच्या अधीनतेने पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्यात आले असेल, अशा (विहित शर्तींखेरीज इतर) शर्तींमध्ये केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने फेरफार करू शकेल किंवा त्या रद्द करू शकेल आणि या प्रयोजनासाठी, पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाला लेखी नोटिशीद्वारे त्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत पासपोर्ट किंवा प्रवासपत्र परत आपल्या स्वाधीन करण्यास फर्मावू शकेल आणि धारकाला अशा नोटिशीचे अनुपालन करावे लागेल.

(२) पासपोर्ट प्राधिकरण, पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाने केलेल्या अर्जावरून आणि केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या (विहित शर्तींखेरीज इतर) शर्तींमध्ये फेरफारही करू शकेल किंवा त्या रद्दही करू शकेल.

(३) पासपोर्ट प्राधिकरण पुढील प्रकरणी पासपोर्ट किंवा प्रवासपत्र अडकवून ठेवू शकेल किंवा अडकवून ठेवण्याची तजवीज करू शकेल किंवा ते रद्द करू शकेल :-

(a) जर पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाने ते गैरपणे कब्जात ठेवले आहे याबद्दल पासपोर्ट प्राधिकरणाची खात्री झाली असेल तर;

(b) महत्त्वाची माहिती दडपवून ठेवून, अथवा पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाने किंवा त्यांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्तीने चुकीची माहिती पुरवून त्या आधारावर पासपोर्ट किंवा प्रवासपत्र मिळविले असेल तर :

परंतु अशा पासपोर्टाच्या धारकाने दुसरा पासपोर्ट मिळवला तर पासपोर्ट प्राधिकरण असा दुसरा पासपोर्टही अडकवून ठेवील किंवा अडकवून ठेवण्याची तजवीज करील किंवा तो रद्द करील;

(c) भारताची सार्वभौमता व एकात्मता, भारताची सुरक्षितता व भारताचे इतर कोणत्याही परकीय देशांशी असलेले मैत्रीचे संबंध यांच्या हिताच्या दृष्टीने किंवा सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने पासपोर्ट प्राधिकरणाला असे करणे आवश्यक वाटत असेल तर;

(d) जर पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाला, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र दिल्यानंतर केव्हातरी भारतातील एखाद्या न्यायालयाने नैतिक अधःपात अनुस्यूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवले असेल आणि त्या संदर्भात त्याला किमान दोन वर्षे कारावासाची शिक्षा दिली असेल तर;

(e) पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाने जो अपराध केल्याचे अभिकथन करण्यात आले आहे, अशा एखाद्या अपराधाबाबतची कार्यवाही भारतातील फौजदारी न्यायालयापुढे प्रलंबित असेल तर;

(f) पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यातील कोणत्याही शर्तींचे उल्लंघन करण्यात आले असेल तर;

(g) पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाने पासपोर्ट किंवा प्रवासपत्र परत करण्यास फर्माविणाऱ्या, पोटकलम (१) खालील नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर केली असेल तर;

(h) त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार न्यायालयाने पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाला उपस्थित राहण्याबाबतचे वॉरंट किंवा समन्स किंवा त्याच्या अटकेचे वॉरंट काढले आहे असे पासपोर्ट प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आले तर, अथवा, अशा कोणत्याही न्यायालयाने पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाला भारताबाहेर प्रयाण करण्यास मनाई करणारा आदेश दिलेला असेल आणि अशा

प्रकारचे वॉरंट किंवा समन्स काढण्यात आलेले आहे किंवा अशा प्रकारचा आदेश देण्यात आलेला आहे याबाबत पासपोर्ट प्राधिकरणाची खात्री झालेली असेल तर,

(४) पासपोर्ट प्राधिकरण, पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाने केलेल्या अर्जावरून तो पासपोर्ट किंवा प्रवासपत्र रद्दही करू शकेल.

(५) जेव्हा पासपोर्ट प्राधिकरण, पोटकलम (१) अन्वये पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यावरील पृष्ठांकनामध्ये फेरफार करणारा किंवा तो रद्द करणारा, किंवा त्याच्या शर्तींमध्ये फेरफार करणारा आदेश देईल किंवा पोटकलम (३) अन्वये पासपोर्ट किंवा प्रवासपत्र अडकवून ठेवण्याचा किंवा ते रद्द करण्याचा आदेश देईल तेव्हा, ते प्राधिकरण असा आदेश देण्याबाबतच्या कारणांचे संक्षिप्त निवेदन लेखी नमूद करील आणि पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाच्या मागणीवरून त्याला त्याची एक प्रत देईल, मात्र, एखाद्या बाबतीत अशा निवेदनाची प्रत देणे हे भारताची सार्वभौमता व एकात्मता, भारताची सुरक्षितता, भारताचे कोणत्याही परकीय देशाशी असलेले मैत्रीचे संबंध यांच्या दृष्टीने हिताचे किंवा सर्वसाधारण जनतेच्या हिताचे होणार नाही असे पासपोर्ट प्राधिकरणाचे मत असेल तर गोष्ट अलाहिदा.

(६) पासपोर्ट प्राधिकरण हे ज्या प्राधिकरणाच्या अधीन असेल त्या प्राधिकरणास, पासपोर्ट प्राधिकरण ज्या कारणावरून पासपोर्ट किंवा प्रवासपत्र अडकवून ठेवू शकते किंवा रद्द करू शकते, अशा कोणत्याही कारणास्तव असा पासपोर्ट किंवा प्रवासपत्र लेखी आदेशाद्वारे अडकवून ठेवता येईल किंवा अडकवून ठेवण्याची तजवीज करता येईल किंवा रद्द करता येईल आणि अशा प्राधिकरणाद्वारे पासपोर्ट किंवा प्रवासपत्र अडकवून ठेवण्याच्या बाबतीत किंवा रद्द करण्याच्या बाबतीत या कलमाचे पूर्वगामी उपबंध शक्य असेल तेथवर लागू होतील.

(७) पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या धारकाला या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवणारे न्यायालय पासपोर्ट किंवा प्रवासपत्र रद्दही करू शकेल :

परंतु, अपिलान्ती किंवा अन्यथा दोषसिद्धी रद्द ठरवण्यात आली तर, असा पासपोर्ट किंवा प्रवासपत्र रद्द करणे हे शून्य ठरेल.

(८) पासपोर्ट किंवा प्रवासपत्र रद्द करण्यासंबंधीचा पोटकलम (७) खालील आदेश अपील न्यायालयालाही किंवा आपल्या पुनरीक्षणाच्या शक्तींचा वापर करत असताना उच्च न्यायालयालाही करता येईल.

(९) या कलमान्वये पासपोर्ट किंवा प्रवासपत्र रद्द करण्यात आले असता, तो पासपोर्ट किंवा प्रवासपत्र आधीपासूनच अडकवून ठेवण्यात आले नसेल तर, त्याच्या धारकाला ज्या प्राधिकरणाने ते रद्द केले असेल त्या प्राधिकरणाकडे किंवा रद्द करण्यासंबंधीच्या आदेशात याबाबतीत जे प्राधिकरण विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा दुसऱ्या एखाद्या प्राधिकरणाकडे ते विनाविलंब परत करावे लागेल.

**११. अपिले.–** (१) एखादी व्यक्ती कलम ५ च्या पोटकलम (२) मधील खंड (b) किंवा खंड (c) अन्वये अथवा कलम ७ च्या परंतुकामधील खंड (b) अन्वये अथवा कलम १० च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) अन्वये पासपोर्ट प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांमुळे किंवा पासपोर्ट प्राधिकरण ज्याच्या अधीन असेल अशा प्राधिकरणाने कलम १० च्या पोटकलम (६) अन्वये दिलेल्या आदेशामुळे नाराज झाली असेल तर, ती व्यक्ती अशा आदेशाविरुद्ध विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे (यात यापुढे 'अपील प्राधिकरण' म्हणून त्याचा निर्देश करण्यात आला आहे) आणि अशा विहित कालावधीमध्ये अपील करू शकेलः

परंतु, केंद्र शासनाने काढलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध अपील करता येणार नाही.

(२) विहित केलेला कालावधी संपल्यानंतर कोणतेही अपील दाखल केल्यास ते दाखल करून घेतले जाणार नाही :

परंतु, विहित कालावधीत अपील दाखल न करण्याला आपणास पुरेसे कारण होते याबद्दल अपीलकर्त्याने अपील प्राधिकरणाची खात्री पटवून दिली तर, विहित कालावधी संपल्यानंतरही अपील दाखल करून घेता येईल.

(३) अपिलासाठी विहित केलेल्या कालावधीची संगणना, मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) यात मुदतीची संगणना करण्याबाबत असलेल्या उपबंधानुसार करण्यात येईल.

(४) या कलमाखालील प्रत्येक अपील लेखी विनंतीअर्जाद्वारे करावे लागेल आणि ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले आहे त्या आदेशाची कारणे दर्शविणाऱ्या निवेदनाची एखादी प्रत जर अपीलकर्त्याला देण्यात आली असेल तर, त्या कारणांच्या निवेदनाची प्रत आणि संबंधित अभिलेख मागविण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित सेवांसाठी करण्यात येईल तो खर्च भागवण्याकरिता विहित करण्यात येईल अशी फी, अशा विनंती अर्जासोबत पाठवावी लागेल.

(५) अपील निकालात काढताना, अपील प्राधिकरण, विहित केली असेल अशी कार्यपद्धती अनुसरील :

परंतु, अपीलकर्त्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज कोणतेही अपील निकालात काढण्यात येणार नाही.

(६) ज्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल तो आदेश कायम करणारा, त्यात फेरफार करणारा किंवा तो फिरवणारा अपील प्राधिकरणाचा प्रत्येक आदेश अंतिम असेल.

**१२. अपराध व शिक्षा.-** (१) जो कोणी-

(a) कलम ३ च्या उपबंधांचे उल्लंघन करील; किंवा

(b) या अधिनियमानुसार पासपोर्ट किंवा प्रवासपत्र मिळवण्याच्या हेतूने, जाणूनबुजून कोणतीही चुकीची माहिती देईल किंवा कोणतीही महत्त्वपूर्ण माहिती दडपून ठेवील अथवा पासपोर्टात किंवा प्रवासपत्रात केलेल्या नोंदीमध्ये कायदेशीर प्राधिकाराशिवाय फेरबदल करील किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करील किंवा फेरबदल करवील; किंवा

(c) विहित प्राधिकरणाने तपासणीसाठी मागवलेला आपला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र (मग ते या अधिनियमाखाली दिलेले असो किंवा नसो) सादर करण्यात कसूर करील; किंवा

(d) दुसऱ्या व्यक्तीला दिलेल्या पासपोर्टाचा किंवा प्रवासपत्राचा जाणूनबुजून वापर करील; किंवा

(e) त्याला स्वतःला दिलेला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र दुसऱ्या व्यक्तीला जाणूनबुजून वापरू देईल,- तो दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(१-A) भारताचा नागरिक नसेल अशा जो कोणी-

(a) त्याच्या राष्ट्रीयत्वाविषयीची माहिती दडपून ठेवून पासपोर्टासाठी अर्ज करील किंवा पासपोर्ट मिळवील, किंवा

(b) बनावट पासपोर्ट किंवा कोणतेही प्रवासपत्र धारण करील,

तो, एक वर्षापेक्षा कमी नसेल; परंतु, पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि दहा हजारांपेक्षा कमी नसेल परंतु, पन्नास हजारांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(२) जर कोणी पोटकलम (१) किंवा पोटकलम (१-A) खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाला अपप्रेरणा दिली आणि ज्याला अपप्रेरणा दिली तो अपराध अपप्रेरणेच्या परिणामी घडला असेल तर, त्या पोटकलमामध्ये त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेला तो पात्र ठरेल.

(३) जर कोणी पासपोर्टाच्या किंवा प्रवासपत्राच्या कोणत्याही शर्तींचे किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन केले व त्यासाठी या अधिनियमामध्ये अन्यत्र कोणत्याही शिक्षेचा उपबंध करण्यात आलेला नसेल तर, तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल, एवढ्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(४) जो कोणी एकदा या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आला असता पुन्हा या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आला असेल, तो नंतरच्या अपराधासाठी उपबंधित असलेल्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षेस पात्र ठरेल.

**१३. अटक करण्याची शक्ती.–** (१) केंद्र शासनाने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ज्याला शक्ती प्रदान केलेल्या असतील असा कोणताही सीमाशुल्क अधिकारी आणि फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा उत्प्रवासन अधिकारी ज्या व्यक्तीविरुद्ध, तिने कलम १२ अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध केल्याचा वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीला वॉरंटाशिवाय अटक करू शकेल आणि तो शक्य होईल तितक्या लवकर त्या व्यक्तीला अशा अटकेची कारणे विदित करील.

(२) या कलमान्वये अटक करणारा प्रत्येक अधिकारी, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला; अनावश्यक विलंब न करता, त्या प्रकरणाच्या बाबतीत अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्यापुढे, किंवा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यापुढे घेऊन जाईल, किंवा पाठवील आणि अशा कोणत्याही अटकेच्या बाबतीत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), कलम ५७ याचे उपबंध शक्य असेल तेथवर लागू होतील.

**१४. झडती घेण्याची आणि अभिग्रहण करण्याची शक्ती.–** (१) केंद्र शासनाने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ज्याला शक्ती प्रदान केलेल्या असतील असा कोणताही सीमाशुल्क अधिकारी आणि फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा उत्प्रवासन अधिकारी जर एखाद्या व्यक्तीने कलम १२ अन्वये शिक्षापात्र ठरणारा कोणताही अपराध केला असल्याचा वाजवी संशय तिच्याविरुद्ध असेल तर, कोणत्याही जागेची झडती घेऊ शकेल आणि अशा कोणत्याही व्यक्तीकडून तिचा कोणताही पासपोर्ट किंवा प्रवासपत्र सक्तीने ताब्यात घेऊ शकेल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात झडती व अभिग्रहण यासंबंधी असलेले उपबंध या कलमाखालील झडती व अभिग्रहण यांना शक्य तेथवर लागू होतील.

**१५. केंद्र शासनाची पूर्वमंजुरी आवश्यक.–** या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, केंद्र शासनाच्या किंवा त्या शासनाने लेखी आदेशाद्वारे याबाबतीत ज्याला प्राधिकृत केले असेल अशा अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकरणाच्या पूर्वमंजुरीशिवाय खटला दाखल करता येणार नाही.

**१६. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.–** या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल शासन किंवा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**१७. पासपोर्ट आणि प्रवासपत्रे ही केंद्र शासनाची मालमत्ता असणे.–** या अधिनियमान्वये दिलेले पासपोर्ट किंवा प्रवासपत्र ही सदैव केंद्र शासनाची मालमत्ता राहील.

**१९. पासपोर्ट आणि प्रवासपत्रे विवक्षित देशांचा प्रवास करण्याच्या प्रयोजनार्थ विधिबाह्य असणे.–** एखादा परकीय देश हा,-

(a) भारतावर आक्रमण करणारा असा देश आहे; किंवा

(b) भारतावर आक्रमण करणाऱ्या देशाला साहाय्य करणारा असा देश आहे; किंवा

(c) जेथे सशस्त्र रणसंग्राम चालू आहे असा देश आहे; किंवा

(d) ज्या देशाच्या प्रवासामुळे भारत सरकारचे परराष्ट्र व्यवहार चालविण्याच्या कामी गंभीर हानी पोहोचेल अशी परिस्थिती असल्याकारणाने त्या देशामध्ये प्रवास करण्यावर निर्बंध घातले पाहिजेत असा देश आहे,-

अशी अधिसूचना केंद्र शासनाने काढली तर, अशा देशामधून प्रवास करण्यासाठी किंवा अशा देशाला भेट देण्यासाठी दिलेला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र अशा प्रवासाच्या किंवा भेटीच्या प्रयोजनार्थ विधिग्राह्य राहणार नाही; मात्र एखाद्या बाबतीत विहित प्राधिकरणाने विहित नमुन्यामध्ये त्यावर खास पृष्ठांकन करून दिले असेल तर गोष्ट अलाहिदा.

**२०. भारताचे नागरिकत्व नसलेल्या व्यक्तींना पासपोर्ट किंवा प्रवासपत्रे देणे.–** पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्याशी संबंधित असलेल्या पूर्वगामी उपबंधामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासन भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीला, पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देणे हे लोकहिताचे आहे असे त्या शासनाचे मत असेल तर, त्याप्रमाणे तिला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देऊ शकेल किंवा देण्याची तजवीज करू शकेल.

**२१. प्रत्यायोजन करण्याची शक्ती.–** केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, कलम ६ पोटकलम (१), खंड (d) खालील शक्ती किंवा त्या कलमाचे पोटकलम (२), खंड (i) खालील शक्ती किंवा कलम २४ खालील शक्ती खेरीजकरून, या अधिनियमान्वये त्याला जी कोणतीही शक्ती वापरता येते त्या शक्तीचा वापर किंवा तदन्वये त्याला जे कार्य करता येते ते कार्य, अधिसूचनेत ते विनिर्दिष्ट करील अशा बाबींच्या संबंधात आणि अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्या शर्तींच्या अधीनतेने अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे,-

(a) केंद्र शासनाला दुय्यम असलेल्या अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला; किंवा

(b) कोणत्याही राज्य शासनाला किंवा अशा शासनाला दुय्यम असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला; किंवा

(c) जेथे भारताची वकिलात नाही अशा कोणत्याही परकीय देशात, तशा विदेशी वाणिज्यदौतिक अधिकाऱ्याला,-

करता येईल.

**२२. सूट देण्याची शक्ती.–** जर लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे केंद्र

शासनाचे मत असेल तर, ते शासन शासकीय राजपत्रामधील अधिसूचनेद्वारे आणि अधिसूचनेत ते विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांच्या अधीनतेने,-

(a) कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला या अधिनियमाचे सर्व किंवा त्यापैकी कोणताही उपबंध किंवा त्याखाली केलेले नियम यांच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल; आणि

(b) अशी कोणतीही अधिसूचना कितीही वेळा रद्द करू शकेल आणि तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे अशा व्यक्तीला किंवा अशा व्यक्तिवर्गाला असे उपबंध पुन्हा लागू करू शकेल.

**२३. हा अधिनियम काही विवक्षित अधिनियमितीच्या व्यतिरिक्त असणे.–** या अधिनियमाचे उपबंध हे, पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम, १९२० (१९२० चा ३४), उत्प्रवासन अधिनियम, १९८३ (१९८३ चा ३१), विदेशी व्यक्तींची नोंदणी अधिनियम, १९३९ (१९३९ चा १६), विदेशी व्यक्तींबाबत अधिनियम, १९४६ (१९४६ चा ३१), शत्रूशी व्यापार (आणीबाणीचे उपबंध चालू ठेवणे) अधिनियम, १९४७ (१९४७ चा १६), विदेशी व्यक्तीविषयक विधी (लागू करणे आणि विशोधन) अधिनियम, १९६२ (१९६२ चा ४२), विदेशी विनियम चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) आणि विदेशी व्यक्ती व विदेशी विनियमन चलन यांच्याशी संबंधित असलेल्या इतर अधिनियमिती यांच्या उपबंधांच्या व्यतिरिक्त असतील, त्यास न्यूनकारी असणार नाही.

**२४. नियम करण्याची शक्ती.–** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशाः-

(a) पासपोर्ट प्राधिकरणाची नियुक्ती, अधिकारिता, नियंत्रण आणि कार्ये;

(b) कलम ४, पोटकलम (१) आणि पोटकलम (२) मध्ये अनुक्रमे निर्दिष्ट केलेले पासपोर्ट आणि प्रवासपत्रे ज्यांना देता येतील अशा व्यक्तींचे वर्ग;

(c) पासपोर्ट किंवा प्रवासपत्र मंजूर करण्यासाठी किंवा त्यांचे नूतनीकरण करण्यासाठी अथवा पासपोर्टवर किंवा प्रवासपत्रावर पृष्ठांकन करून मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व तपशील आणि नूतनीकरणासाठी अर्ज करावयाचा असेल त्याबाबतीत, किती मुदतीच्या आत तो करावा लागेल ती मुदत;

(d) पासपोर्ट आणि प्रवासपत्रे किती कालावधीपर्यंत अमलात असण्याचे चालू राहतील, तो कालावधी;

(e) ज्या नमुन्यामध्ये आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने विविध पासपोर्ट आणि प्रवासपत्रे देता येतील, त्याचे नूतनीकरण करता येईल किंवा त्यामध्ये फेरफार करता येतील ते नमुने व त्या शर्ती;

(ee) कलम ५ चे पोटकलम (१) याच्या स्पष्टीकरणाच्या प्रयोजनार्थ परकीय देशाचा विनिर्देश करणे;

कलम ५च्या पोटकलम (१) खाली पासपोर्ट देण्यासाठी किंवा कलम ५ च्या पोटकलम (१-A) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परकीय देशाला भेट देण्यासाठी असलेला पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देण्यासाठी अथवा पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यावरील कोणत्याही पृष्ठांकनामध्ये फेरफार करण्यासाठी किंवा नवीन पृष्ठांकन करून मिळण्यासाठी केलेल्या कोणत्याही अर्जाच्या संबंधात द्यावयाची फी आणि या अधिनियमाखाली करावयाच्या कोणत्याही अपिलांच्या संबंधात द्यावयाची फी;

(g) कलम ११, पोटकलम (१) अन्वये अपील प्राधिकरणाची नियुक्ती, अशा प्राधिकरणाची अधिकारिता आणि त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(h) पासपोर्ट किंवा प्रवासपत्र यांच्या संबंधात ज्या सेवा देता येतील त्या सेवा (पासपोर्ट किंवा प्रवासपत्र हरवले, खराब झाले किंवा नष्ट झाले तर त्याच्याऐवजी दुसरा पासपोर्ट किंवा प्रवासपत्र देणे यांसारख्या सेवासुद्धा) व त्याबद्दलची फी;

(i) विहित करावयाची किंवा करता येईल अशी किंवा ज्या बाबतीत या अधिनियमामध्ये उपबंध केलेले नसतील किंवा अपुरे उपबंध केलेले असतील आणि केंद्र शासनाच्या मते या अधिनियमाची योग्य रीतीने अंमलबजावणी होण्यासाठी उपबंध करणे आवश्यक असेल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपूण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा बदललेल्या रूपातच परिणामकारक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**२५. १९२० चा अधिनियम ३४ याच्या संक्षिप्त नावामध्ये बदल.-** ''भारतीय पासपोर्ट अधिनियम, १९२० मधील कलम १, पोटकलम (१) मध्ये ''भारतीय पासपोर्ट अधिनियम, १९२०'' या मजकुराऐवजी ''पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम, १९२०'' हा मजकूर घालण्यात येईल.

**२७. निरसन व व्यावृत्ती.-** (१) पासपोर्ट अध्यादेश, १९६७ (१९६७ चा ४) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन केले असले तरीही, जी गोष्ट किंवा कारवाई उक्त अध्यादेशान्वये केलेली आहे अथवा तदन्वये केली असल्याचे दिसते अशी कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, जणू काही दिनांक ५ मे १९६७ या दिवशी या अधिनियमाचा प्रारंभ झालेला आहे असे समजून या अधिनियमाखाली करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

----------

# ४८. कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक करण्यास (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३

**(२०१३ चा अधिनियम क्र. १४)**

**दि. १४ एप्रिल २०१३**

**कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक करण्यापासून संरक्षण करण्याकरिता आणि लैंगिक छळवणुकीच्या तक्रारीस प्रतिबंध करण्याकरिता व त्यांचे निवारण करण्याकरिता आणि त्यासंबंधित व तदनुषंगिक बाबींकरिता अधिनियम**

**ज्याअर्थी,** लैंगिक छळवणुकीमुळे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४ व १५ खालील महिलेच्या समानतेच्या मूलभूत हक्कांचे आणि भारताच्या संविधनाच्या अनुच्छेद २१ खालील तिच्या जीविताच्या व प्रतिष्ठेने जीवन जगण्याच्या हक्काचे आणि लैंगिक छळवणुकीपासून मुक्त असलेल्या सुरक्षित वातावरणाच्या हक्कासह कोणताही पेशा करण्याच्या किंवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करण्याच्या हक्कांचे उल्लंघन होते.

**आणि ज्याअर्थी,** २५ जून १९९३ रोजी भारत सरकारने, महिलांविरुद्धच्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे निर्मूलन करण्याबाबतच्या अभिसंधीसारख्या आंतरराष्ट्रीय अभिसंधी व करार यांद्वारे लैंगिक छळवणुकीपासून संरक्षण आणि प्रतिष्ठेसह कामाचा हक्क हे वैश्विक मान्यताप्राप्त मानवी हक्क असून त्यांचे अनुसमर्थन केलं आहे.

**आणि ज्याअर्थी,** कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणुकीपासून महिलांचे संरक्षण करण्याकरिता वरील अभिसंधी अंमलात आणण्यासाठी तरतुदी करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** तो भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियमित होवोः-

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.-** (१) या अधिनियमास कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक करण्यास (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण भारतास लागू असेल.

(३) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रामध्ये अधिसूचित करील, अशा दिनांकास तो अंमलात येई.

**२. व्याख्या.-** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(a) ''पीडित महिला'' याचा अर्थ,-

(i) कामाच्या ठिकाणच्या संबंधात, उत्तरवादीने केलेल्या लैंगिक छळवणुकीच्या कोणत्याही कृत्यास बळी

पडली असल्याचे आरोप जिने केले असेल अशी कोणत्याही वयाची महिला- मग ती नोकरीला असो किंवा नसा, असा आहे;

(ii) राहण्याचे ठिकाण किंवा घर यासंबंधात जी अशा राहण्याच्या ठिकाणी किंवा घरात नोकरी करीत आहे, अशी कोणत्याही वयाची महिला असा आहे.

(b) ''समुचित शासन'' याचा अर्थ,-

(i) जे ठिकाण,-

(a) केंद्र सरकारने किंवा संघराज्य क्षेत्राच्या प्रशासनाने स्थापन केलेल्या, त्याच्या मालकीच्या त्याच्या नियंत्रणात असलेल्या किंवा त्याने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पुरविलेल्या निधीतून संपूर्ण किंवा मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा होत असलेल्या, अशा कामाच्या ठिकाणाच्या संबंधात, केंद्र सरकार, असा आहे;

(b) राज्य शासनाने स्थापन केलेल्या त्याच्या मालकीच्या, त्याच्या नियंत्रणात असलेल्या किंवा त्याने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पुरविलेल्या निधीतून संपूर्णतः किंवा मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा होत असलेल्या कामाच्या ठिकाणच्या संबंधात, राज्य शासन, असा आहे;

(ii) उपखंड (i) खाली समाविष्ट नसणाऱ्या आणि त्याच्या राज्यक्षेत्रात न मोडणाऱ्या कोणत्याही कामाच्या ठिकाणाच्या संबंधात राज्य शासन, असा आहे.

(c) ''अध्यक्ष'' याचा अर्थ, कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये नामनिर्देशित केलेल्या स्थानिक तक्रार समितीचा अध्यक्ष, असा आहे;

(d) ''जिल्हा अधिकारी'' याचा अर्थ, कलम ५ अन्वये अधिसूचित केलेला अधिकारी, असा आहे;

(e) ''घरेलू कामगार'' याचा अर्थ, जी महिला एकतर तात्पुरत्या, कायमस्वरुपी, अंशकालिक किंवा पूर्णकालिक तत्त्वावर प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही एजन्सीमार्फत पारिश्रमिकासाठी- मग ते रोख स्वरूपात असो किंवा वस्तूच्या स्वरूपात असो- कोणत्याही कुटुंबात घरगुती काम करण्यासाठी नोकरी करीत असेल, ती महिला, असा आहे; परंतु यामध्ये मालकाच्या कुटुंबाच्या कोणत्याही सदस्याचा समावेश होणार नाही.

(f) ''कर्मचारी'' याचा अर्थ, नियमित, तात्पुरत्या, तदर्थ किंवा दैनिक रोजंदारीच्या तत्त्वावर, मूळ मालकास माहीत असताना किंवा नसताना, एकतर प्रत्यक्षपणे किंवा कंत्राटदारासह एजंटामार्फत- मग ते पारिश्रमिकासाठी असो किंवा नसो, कोणत्याही कामासाठी कामाच्या ठिकाणी नोकरी करीत असलेली किंवा स्वेच्छा तत्त्वावर किंवा अन्य प्रकारे काम करीत असलेली- मग तिच्या नोकरीच्या अटी व्यक्त असो किंवा अव्यक्त असो- व्यक्ती असा आहे आणि यामध्ये सहकामगाराचा, कंत्राटी कामगाराचा, परिवीक्षाधीन कर्मचाऱ्याचा, प्रशिक्षणार्थीचा, ॲप्रेंटिसचा (शिकाऊ उमेदवाराचा) किंवा अशा अन्य कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या कामगाराचा समावेश होतो.

(g) ''मालक'' याचा अर्थ,-

(i) समुचित शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागाच्या, संघटनेच्या, उपक्रमाच्या, आस्थापनेच्या, एंटरप्राइजच्या, संस्थेच्या, कार्यालाच्या, शाखेच्या किंवा युनिटाच्या संबंधात, ह्या विभागाचा,

संघटनेचा, उपक्रमाचा, आस्थापनेचा, एंटरप्राइजेसचा, संस्थेचा, कार्यालयाचा, शाखेचा, किंवा युनिटाचा प्रमुख अथवा, यथास्थिती समुचित शासन किंवा स्थानिक प्राधिकरण याबाबतीत आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील असा इतर कोणताही अधिकारी असा आहे;

(ii) उपखंड (i) मध्ये समाविष्ट नसलेल्या कोणत्याही कामाच्या ठिकाणामधील, त्या कामाच्या ठिकाणाचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याकरिता जबाबदार असलेली कोणतीही व्यक्ती असा आहे;

**स्पष्टीकरण.-** या उपखंडाच्या प्रयोजनार्थ, ''व्यवस्थापन'' यामध्ये, अशा संघटनेची धोरणे तयार करण्याकरिता व प्रशासन चालविण्याकरिता जबाबदार असलेल्या व्यक्तीचा किंवा मंडळाचा किंवा समितीचा समावेश होतो.

(iii) उपखंड (i) व (ii) मध्ये समावेश नसलेल्या कामाच्या ठिकाणच्या संबंधात, त्याच्या किंवा तिच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संविदाविषयक दायित्वे पार पाडणारी व्यक्ती, असा आहे;

(iv) निवासी ठिकाणाच्या किंवा घराच्या संबंधात, ज्या व्यक्तीने किंवा कुटुंबाने, कामावर ठेवलेल्या कामगाराची संख्या, मुदत, मर्यादा किंवा अशा कामगाराची संख्या किंवा घरेलू कामगाराच्या नोकरीचे किंवा त्याने पार पाडलेल्या कामांचे स्वरूप विचारात न घेता, घरेलू कामगाराला नोकरीवर ठेवलेले आहे किंवा त्याच्या नोकरीपासून जी व्यक्ती किंवा कुटुंब लाभ घेता आहे, अशी व्यक्ती किंवा कुटुंब, असा आहे;

(h) ''अंतर्गत समिती'' याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेली अंतर्गत तक्रार समिती, असा आहे.

(i) ''स्थानिक समिती'' याचा अर्थ, कलम ६ अन्वये घटित केलेली स्थानिक तक्रार समिती, असा आहे.

(j) ''सदस्य'' याचा अर्थ, अंतर्गत समितीचा, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीचा सदस्य असा आहे.

(k) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

(l) ''पीठासीन अधिकारी'' याचा अर्थ, कलम ४ च्या पोटकलम (२) अन्वये नामनिर्देशित केलेल्या अंतर्गत तक्रार समितीचा पीठासीन अधिकारी असा आहे.

(m) ''उत्तरवादी'' याचा अर्थ, जिच्याविरुदध पीडित महिलेने कलम ९ अन्वये तक्रार केलेली आहे, अशी व्यक्ती असा आहे.

(n) ''लैंगिक छळवणूक'' यामध्ये पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक अवांछनीय कृत्याचा किंवा वर्तणुकीचा (मग ते प्रत्यक्षपणे केलेले असो किंवा गर्भितपणे असो) समावेश होतो.

(i) अंगाला स्पर्श करणे किंवा अंगाशी लगट करणे; किंवा

(ii) लैंगिक पूर्ती करण्याची मागणी करणे किंवा विनंती करणे; किंवा

(iii) लैंगिकतायुक्त शेरेबाजी करणे; किंवा

(ix) संभोगचित्रण दाखविणे; किंवा

(v) लैंगिक स्वरुपाची अन्य कोणतीही अवांछनीय शारीरिक, शाब्दिक किंवा बिगरशाब्दिक वर्तणूक करणे.

(o) ''कामाचे ठिकाण'' यामध्ये,-

(i) समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने किंवा सरकारी कंपनीने किंवा महामंडळाने किंवा

सहकारी संस्थेने स्थापन केलेला त्याची मालकी असलेला, त्याच्या नियंत्रणात असलेला, किंवा त्याने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पुरविलेल्या निधीतून ज्याला संपूर्णतः किंवा अंशतः वित्तपुरवठा होत असलेला कोणताही विभाग, संघटना, उपक्रम, आस्थापना, एंटरप्राइज, संस्था, शाखा किंवा युनिट यांचा;

(ii) उत्पादन, पुरवठा, विक्री, वितरण किंवा सेवा यांसह वाणिज्यिक, व्यावसायिक, शैक्षणिक, मनोरंजनविषयक, औद्योगिक आरोग्य सेवा किंवा वित्तीय कार्य करणारी खाजगी क्षेत्रातील कोणतीही संघटना किंवा प्रायव्हेट व्हेंचर, उपक्रम, एंटरप्राइज, संस्था, आस्थापना, सोसायटी, ट्रस्ट, अशासकीय संघटना, युनिट किंवा सेवा पुरवठाकार यांचा;

(iii) रूग्णालये किंवा शुश्रुषागृहे यांचा;

(iv) कोणतीही क्रीडासंस्था, प्रेक्षागार (स्टेडियम), क्रीडासंकुल किंवा स्पर्धेचे किंवा खेळाचे ठिकाण- मग ते प्रशिक्षणासाठी, खेळांसाठी किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या इतर कामासाठी वापरलेले निवासस्थान असो किंवा नसो यांचा;

(v) राहण्याचे ठिकाण किंवा घर यांचा

समावेश होतो;

(p) कामाच्या ठिकाणच्या संबंधात ''असंघटित क्षेत्र'' याचा अर्थ व्यक्तीची किंवा स्वयंरोजगार कामगाराची मालकी असलेला आणि उत्पादन किंवा मालाची विक्री करीत असलेला किंवा कोणत्याही प्रकारची सेवा पुरविणारा उपक्रम, असा आहे आणि जेव्हा अशा उपक्रमात कामगार नोकरीला असतील तेव्हा अशा कामागाराची संख्या, दहापेक्षा कमी असेल.

**३. लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध.-** (१) कोणतीही महिला, कोणत्याही कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीस बळी पडणार नाही.

(२) इतर परिस्थितीबरोबरच पुढील परिस्थितीत, जर एखादी कृती लैंगिक छळवणुकीच्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात घडत असेल तर किंवा वर्तणुकीच्या संबंधात अस्तित्वात असेल तर ती कृती लैंगिक छळवणूक असल्याचे समजण्यात येऊ शकेलः-

(i) तिच्या नोकरीमध्ये विशेष वागणूक देण्याचे ध्वनित किंवा व्यक्त वचन; किंवा

(ii) तिच्या नोकरीमध्ये भेदभावकारी वागणूक देण्याची ध्वनित किंवा व्यक्त धमकी; किंवा

(iii) तिच्या सध्याच्या किंवा भावी नोकरीच्या स्थितीबद्दलची ध्वनित किंवा व्यक्त धमकी; किंवा

(iv) तिच्या कामात हस्तक्षेप करणे किंवा तिला धाकदपटशा दाखविणे किंवा प्रक्षोभक किंवा प्रतिकूल कामाचे वातावरण निर्माण करणे; किंवा

(v) तिचे आरोग्य किंवा सुरक्षा यांना बाधा होण्याचा संभव असणरी हीन वागणूक.

## प्रकरण दोन - अंतर्गत तक्रार समिती घटित करणे

**४. अंतर्गत तक्रार समिती घटित करणे.-** (१) कामाच्या ठिकाणचा प्रत्येक मालक, लेखी आदेशाद्वारे, ''अंतर्गत तक्रार समिती'' म्हणून ओळखण्यात येणारी एक समिती घटित करील :

परंतु, जेव्हा कामाच्या ठिकाणी कार्यालये किंवा प्रशासकीय एकक (युनिट) विविध ठिकाणी किंवा विभागीय किंवा उपविभागीय स्तरावर असतील तेव्हा, अशी अंतर्गत समिती सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये स्थापना करण्यात येईल.

(२) मालकाने नामनिर्देशित करावयाच्या पुढील सदस्यांचा अंतर्गत समितीमध्ये समावेश असेल :-

(a) कर्मचाऱ्यामध्ये कामाच्या ठिकाणी वरिष्ठ स्थानी असलेली नोकरी करणारी महिला, पीठासीन अधिकारी असेल :

परंतु, जर वरिष्ठ स्थानावरील महिला कर्मचारी उपलब्ध नसेल तर, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कामाच्या ठिकाणच्या इतर कार्यालयांमधून किंवा प्रशासकीय युनिटामधून प्रशासकीय अधिकारी, नामनिर्देशित करण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, कामाच्या ठिकाणच्या इतर कार्यालयामध्ये किंवा प्रशासकीय युनिटांमध्ये वरिष्ठ स्थानावरील महिला कर्मचारी काम करीत नसेल तर, त्याच मालकाच्या इतर कोणत्याही कामाच्या ठिकाणामधून किंवा अन्य विभागामधून किंवा संघटनेमधून पीठासीन अधिकारी नामनिर्देशित करण्यात येईल.

(b) महिलांच्या विवादाशी विशेष परिचित असलेला किंवा सामाजिक कामाचा अनुभव असलेल्या किंवा कायदेविषयक ज्ञान असलेल्या कर्मचाऱ्यांमधील दोनपेक्षा कमी नसलेले सदस्य;

(c) महिला विवादांशी परिचित असलेल्या अशासकीय संघटनांमधील किंवा असोसिएशनमधील किंवा लैंगिक छळवणुकीशी संबंधित असलेल्या प्रश्नांशी परिचित असलेल्या व्यक्तीमधील एक सदस्यः

परंतु, अशा प्रकारे नामनिर्देशित केलेल्या एकूण सदस्यांपैकी कमीत कमी निम्मे सदस्य, महिला असतील.

(३) अंतर्गत समितीचा पीठासीन अधिकारी व प्रत्येक सदस्य मालकाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल, त्याप्रमाणे त्यांना नामनिर्देशित केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता पद धारण करील.

(४) अशासकीय संघटनांमधून किंवा अधिसंघामधून नियुक्त केलेल्या सदस्यास, अंतर्गत समितीची कार्यवाही घेण्याकरिता, विहित करण्यात येईल असे शुल्क किंवा भत्ते मालकाद्वारे प्रदान करण्यात येतील.

(५) जेव्हा पीठासीन अधिकारी किंवा अंतर्गत समितीचा कोणताही सदस्य-

(a) कलम १६ च्या तरतुदीचे उल्लंघन करील तेव्हा; किंवा

(b) त्याला एखाद्या अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल तेव्हा किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये एखाद्या अपराधासाठी त्याच्याविरुद्ध चालू असलेली चौकशी प्रलंबित असेल तेव्हा; किंवा

(c) कोणत्याही शिस्तभंगविषयक कार्यवाहीमध्ये तो दोषी असल्याचे आढळून आले असेल किंवा त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवही प्रलंबित असेल तेव्हा; किंवा

(d) त्याने त्याच्या पदाचा अशा प्रकारे गैरवापर केला असेल की, ज्यामुळे त्याला पदावर नियमितपणे ठेवणे लोकहितास बाधक ठरेल तेव्हा,

अशा पीठासीन अधिकाऱ्याला, किंवा यथास्थिती, सदस्याला, समितीतून काढण्यात येईल आणि अशा प्रकारे तयार झालेले रिक्त पद किंवा कोणतेही नैमित्तिक रिक्त पद, या कलमाच्या तरतुदीनुसार नवीन नामनिर्देशनातून भरण्यात येईल.

## प्रकरण तीन- स्थानिक तक्रार समिती घटित करणे

**५. जिल्हा अधिकारी अधिसूचित करणे.–** समुचित शासन या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करण्याकरिता किंवा कामे पार पाडण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा अधिकारी म्हणून जिल्हा दंडाधिकाऱ्याला अधिसूचित करू शकेल.

**६. स्थानिक तक्रार समिती घटित करणे व तिची अधिकारिता.–** (१) ज्या आस्थापनेमध्ये दहापेक्षा कमी कामगार असल्यामुळे अंतर्गत तक्रार समिती घटित करण्यात आलेली नसेल तेव्हा किंवा तक्रार, स्वतः मालकाविरुद्ध असेल तर, जिल्हा अधिकारी अशा आस्थापनांमधील लैंगिक छळवणुकीच्या तक्रारी स्वीकारण्याकरिता स्थानिक तक्रार समिती म्हणून संबोधली जाणारी एक समिती, संबंधित जिल्ह्यामध्ये घटित करील.

(२) जिल्हा अधिकारी, तक्रारी प्राप्त करण्यासाठी सात दिवसांच्या कालावधीत त्या संबंधित स्थानिक तक्रार समितीकडे पाठविण्याकरिता ग्रामीण किंवा आदिवासी क्षेत्रामधील प्रत्येक गटामध्ये, तालुक्यामध्ये व तहसीलामध्ये आणि नागरी क्षेत्रामधील प्रभागामध्ये किंवा नगरपालिकेमध्ये एक नोडल अधिकारी पदनियुक्त करील.

(३) स्थानिक तक्रार समितीची अधिकारिता ज्या जिल्ह्यामध्ये ती घटित केली आहे, त्या जिल्ह्याच्या क्षेत्रास लागू असेल.

**७. स्थानिक तक्रार समितीची रचना, मुदत आणि अन्य अटी व शर्ती.–** (१) स्थानिक तक्रार समितीमध्ये जिल्हा अधिकाऱ्याकडून नामनिर्देशित केल्या जाणाऱ्या पुढील सदस्यांचा समावेश असेल :-

(a) सामाजिक कार्याच्या क्षेत्रातील व महिलांच्या विवादाशी परिचित असलेल्या पात्र महिलांमधून नामनिर्देशित करावयाचा अध्यक्ष;

(b) जिल्ह्यातील गटामध्ये, तालुक्यामध्ये किंवा तहसीलामध्ये किंवा प्रभागामध्ये किंवा नगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या महिलांमधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य;

(c) महिलांच्या विवादाशी परिचित असलेल्या अशासकीय संघटनांमधून किंवा असोसिएशनमधून किंवा लैंगिक छळवणुकीशी संबंधित असणाऱ्या विषयांशी परिचित असलेल्या व्यक्तीमधून नामनिर्देशित करावयाचे विहित करण्यात येतील असे दोन सदस्य, त्यापैकी एक महिला सदस्य असेल :

परंतु, नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींपैकी कमीत कमी एक नामनिर्देशित व्यक्तीस कायद्यामधील विशेष गती असेल किंवा कायदेविषयक ज्ञान असेलः

परंतु, आणखी असे की, नामनिर्देशित व्यक्तींपैकी, किमान एक नामनिर्देशित व्यक्ती, केंद्र सरकारने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या अनुसूचित जातीमधील किंवा अनुसूचित जमातीमधील किंवा इतर मागासवर्गातील किंवा अल्पसंख्याक समाजामधील महिला असेल.

(d) जिल्ह्यातील समाजकल्याण किंवा महिला बालविकास यांच्याशी संबंधित असणारा अधिकारी, पदसिद्ध सदस्य असेल.

(२) स्थानिक समितीचा अध्यक्ष किंवा प्रत्येक सदस्य, जिल्हा अधिकाऱ्याद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल, त्याप्रमाणे त्याच्या नियुक्तीच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता पद धारण करील.

(३) जेव्हा स्थानिक तक्रार समितीचा अध्यक्ष किंवा कोणताही सदस्य,-

(a) कलम १६ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तेव्हा; किंवा

(b) त्याला एखाद्या अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल तेव्हा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील एखाद्या अपराधाबद्दल त्याच्याविरुद्ध चालू असलेली चौकशी प्रलंबित असेल तेव्हा; किंवा

(c) कोणत्याही शिस्तभंगविषयक कार्यवाहीमध्ये तो दोषी असल्याचे आढळून आले असेल किंवा त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रलंबित असेल तेव्हा; किंवा

(d) त्याने त्याच्या पदाचा अशा प्रकारे गैरवापर केला असेल की, ज्यामुळे त्याला पदावर नियमितपणे ठेवणे लोकहितास बाधक ठरेल तेव्हा,

अशा अध्यक्षाला, किंवा यथास्थिती सदस्याला समितीतून काढण्यात येईल आणि अशा प्रकारे तयार झालेले रिक्त पद किंवा कोणतेही नैमित्तिक रिक्त पद, या कलमाच्या तरतुदीनुसार नवीन नामनिर्देशनातून भरण्यात येईल.

(४) पोटकलम (१) च्या खंड (b) व (d) याअन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांव्यतिरिक्त स्थानिक संस्थेचा अध्यक्ष व सदस्य स्थानिक समितीची कार्यवाही चालविण्यासाठी विहित करण्यात येईल, असे शुल्क किंवा भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

**८. अनुदाने व लेखापरीक्षा.-** (१) केंद्र सरकार, कलम ७च्या पोटकलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शुल्कांचे किंवा भत्त्यांचे प्रदान करण्याकरिता वापर करण्यासाठी, केंद्र सरकारला योग्य वाटेल अशा रकमेचे अनुदान यासंबंधात संसदेने कायद्याद्वारे योग्य विनियोजन केल्यानंतर राज्य शासनाला प्रदान करू शकेल.

(२) राज्य शासन, एक एजन्सी स्थापन करील आणि पोटकलम (१) अन्वये दिलेले अनुदान, त्या एजन्सीकडे हस्तांतरित करू शकेल.

(३) एजन्सी, कलम ७ च्या पोटकलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेले शुल्क व भत्ते प्रदान करण्याकरिता आवश्यक असेल अशी रक्कम, जिल्हा अधिकाऱ्यास प्रदान करील.

(४) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एजन्सीचे लेखे आणि राज्याच्या महालेखापालाशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येईल अशा रितीने ठेवण्यात येतील व त्याची लेखापरीक्षा करण्यात येईल आणि एजन्सीच्या लेख्यांचा ताबा धारण करणारी व्यक्ती तिच्या लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह विहित करण्यात येईल, अशा तारखेपूर्वी राज्य शासनाला सादर करील.

## प्रकरण चार

## तक्रार

**९. लैंगिक छळवणुकीची तक्रार.-** (१) कोणतीही पीडित महिला, कामाच्या ठिकाणच्या लैंगिक छळाची लेखी तक्रार, घटनेच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत आणि घटनांच्या मालिकेच्या बाबतीत, शेवटची घटना घडल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, जर अंतर्गत समिती स्थापन केली असेल तर, अंतर्गत समितीकडे किंवा जर अंतर्गत समिती स्थापन केलेली नसेल तर स्थानिक समितीकडे करील :

परंतु, जेव्हा तिला अशी तक्रार लेखी स्वरुपात करता येऊ शकत नसेल तेव्हा अंतर्गत समितीचा पीठासीन अधिकारी किंवा कोणताही सदस्य किंवा यथास्थिती, स्थानिक समितीचा अध्यक्ष किंवा कोणताही सदस्य, लेखी स्वरुपात तक्रार करण्याकरिता अशा महिलेस सर्व प्रकारचे वाजवी सहाय्य करील :

परंतु, आणखी असे की, अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती, परिस्थिती अशी होती की ज्यामुळे उक्त मुदतीत तक्रार दाखल करण्यास महिलेस प्रतिबंध झाला होता, याबद्दल तिची खात्री पटली असेल तर, लेखी कारणे नोंदवून तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी मुदत वाढवू शकेल.

(२) जेव्हा पीडित महिला, तिच्या शारीरिक किंवा मानसिक अक्षमतेमुळे किंवा तिचा मृत्यू झाल्यामुळे किंवा अन्यथा तक्रार करण्यास अक्षम ठरली असेल तेव्हा, तिचा कायदेशीर वारस किंवा विहित करण्यात येईल अशी अन्य व्यक्ती, या कलमान्वये तक्रार करू शकते.

**१०. समझोता.-** (१) अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती कलम ११ अन्वये चौकशी सुरू करण्यापूर्वी आणि पीडित महिलेच्या विनंतीवरून ती व उत्तरवादी यांच्यामधील प्रकरणाचा समझोता करण्याकरिता उपाययोजना करील:

परंतु, समझोत्याचा आधार म्हणून कोणतीही आर्थिक तडजोड करण्यात येणार नाही.

(२) जेव्हा पोटकलम (१) अन्वये समझोता घडून आला असेल तेव्हा, अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती, अशा प्रकारे केलेला समझोता अभिलिखित करील आणि शिफारशींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कारवाई करण्याकरिता तो मालकाकडे किंवा जिल्हा अधिकाऱ्याकडे पाठवील.

(३) अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती. स्थानिक समिती, पोटकलम (२) अन्वये अभिलिखित केल्याप्रमाणे समझोत्याच्या प्रती, पीडित महिलेस उत्तरवादीस देईल.

(४) जेव्हा पोटकलम (१) अन्वये समझोता घडून आला असेल तेव्हा, अंतर्गत समितीकडून किंवा स्थानिक समितीकडून आणखी कोणतीही चौकशी करण्यात येणार नाही.

**११. तक्रारीची चौकशी.-** (१) कलम १० च्या तरतुदीस अधीन राहून, अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती जेव्हा उत्तरवादी कर्मचारी असेल तेव्हा उत्तरवादीस लागू असलेल्या सेवा नियमांच्या तरतुदींनुसार तक्रारींची चौकशी करण्याची कार्यवाही करील आणि जेव्हा असे कोणतेही नियम अस्तित्वात नसतील तेव्हा, विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी करील किंवा घरेलू कामगाराच्या बाबतीत, स्थानिक समिती जर सकृतदर्शनी प्रकरण अस्तित्वात असेल तर, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ५०९ अन्वये किंवा जेव्हा लागू असेल तेव्हा, उक्त संहितेच्या अन्य कोणत्याही संबंधित तरतुदीन्वये, प्रकरण नोंदविण्यासाठी सात दिवसांच्या कालावधीत पोलिसांकडे तक्रार दाखल करील :

परंतु, जेव्हा पीडित महिला, अंतर्गत समितीस, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीस, कलम १० च्या पोटकलम (२) अन्वये केलेल्या समझोत्याच्या कोणत्याही अटींचे किंवा शर्तींचे उत्तरवादीने पालन केलेले नाही अशी माहिती देईल तेव्हा, अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती तक्रारीची चौकशी करील किंवा यथास्थिती तक्रार पोलिसांकडे पाठवील :

परंतु आणखी असे की, जेव्हा दोन्हीही पक्षकार कर्मचारी असतील तेव्हा, पक्षकारांना चौकशीच्या कालावधीमध्ये बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल आणि समितीसमोरील निष्कर्षांविरुद्ध अभिवेदन करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून निष्कर्षाची प्रत दोन्ही पक्षकारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

(२) भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ५०९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा उत्तरवादीस अपराधाबद्दल सिद्धदोषी ठरविण्यात येईल तेव्हा न्यायालय कलम १५ च्या तरतुदी विचारात घेऊन, त्यास योग्य वाटेल अशी रक्कम उत्तरवादीने पीडित महिलेस प्रदान करण्याचा आदेश देऊ शकेल.

(३) अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती पोटकलम (१) अन्वये चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, जेव्हा पुढील प्रकरणाच्या बाबतीत दाव्यांची न्यायचौकशी करीत असेल तेव्हा, तिला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याअन्वये दिवाणी न्यायालयामध्ये निहित असलेले अधिकार असतील;

(a) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढणे व उपस्थित राहण्यास फर्मावणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे;

(b) दस्तावेजांचा शोध घेण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे;

(c) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब;

(४) पोटकलम (१) खालील चौकशी नव्वद दिवसांच्या आत पूर्ण करण्यात येईल.

## प्रकरण पाच

## तक्रारीची चौकशी

**१२. चौकशी प्रलंबित असतानाच्या कालावधीत करावयाची कारवाई.-** (१) चौकशी प्रलंबित असताना पीडित महिलेने केलेल्या लेखी विनंतीवरून अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती मालकाला,-

(a) पीडित महिलेची किंवा प्रतिवादीची अन्य कोणत्याही कामाच्या ठिकाणी बदली करण्याची; किंवा

(b) तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत पीडित महिलेस रजा देण्याची; किंवा

(c) विहित करण्यात येईल असा अन्य दिलासा पीडित महिलेस देण्याची,

शिफारस करेल.

(२) या कलमान्वये, पीडित महिलेस दिलेल्या रजा, ती अन्यथा हक्कदार असलेल्या रजेशिवाय असेल.

(३) पोटकलम (१) खालील अंतर्गत समितीच्या किंवा यथास्थिती, स्थानिक समितीच्या शिफारशीवरून, मालक पोटकलम (१) अन्वये केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करील आणि अशा समितीचा अहवाल, अंतर्गत समितीस, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीस सादर करील.

**१३. चौकशीचा अहवाल.-** (१) या अधिनियमाखालील चौकशी पूर्ण झाल्यावर, अंतर्गत समिती किंवा यथास्थिती,

स्थानिक समिती, चौकशी पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत, तिच्या निष्कर्षाचा अहवाल मालकास, किंवा यथास्थिती, जिल्हा अधिकाऱ्यास सादर करील आणि असा अहवाल संबंधित पक्षकारांना उपलब्ध करून देईल.

(२) जेव्हा अंतर्गत समिती किंवा यथास्थिती, स्थानिक समिती उत्तरवादीविरुद्धचे आरोप सिद्ध झालेले नाही अशा निष्कर्षाप्रत आली असेल तेव्हा, ती मालकास व जिल्हा अधिकाऱ्यास या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्याची आवश्यकता नाही अशी शिफारस करील.

(३) जेव्हा अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती उत्तरवादीविरुद्धचा आरोप सिद्ध झाले आहे अशा निष्कर्षाप्रत येईल तेव्हा ती नियोक्त्यास, किंवा यथास्थिती, जिल्हा अधिकाऱ्यास अशी शिफारस करील की,-

(i) लैंगिक छळवणुकीसाठी उत्तरवादीस लागू असलेल्या सेवा नियमांच्या तरतुदींनुसार गैरवर्तणूक म्हणून कारवाई करावी किंवा जेव्हा असे सेवानियम केलेले नसतील तेव्हा, विहित करण्यात येईल अशा रीतीने कारवाई करावी;

(ii) उत्तरवादीस लागू असलेल्या सेवा नियमांमध्ये काहीही असले तरी, कलम १५ च्या तरतुदींनुसार निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे पीडित महिलेस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना प्रदान करावयाची तिला योग्य वाटेल अशी रक्कम उत्तरवादीच्या वेतनातून किंवा मंजुरीतून वजा करावी :

परंतु, मालक कर्तव्यावरील त्याच्या अनुपस्थितीमुळे किंवा नोकरी समाप्त झाल्यामुळे, उत्तरवादीच्या वेतनातून अशी रक्कम वजा करण्यास असमर्थ असेल तर, तो अशी रक्कम पीडित महिलेस प्रदान करण्यासाठी उत्तरवादीस आदेश देऊ शकेल :

परंतु, आणखी असे की, जर उत्तरवादीने, खंड (ii) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम प्रदान करण्यास कसूर केली असेल तर, अंतर्गत समिती किंवा यथास्थिती, स्थानिक समिती, जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे रक्कम वसूल करण्याकरिता आदेश, संबंधित जिल्हा अधिकाऱ्याकडे पाठवील.

(४) मालक किंवा जिल्हा अधिकारी, त्यांना शिफारशी मिळाल्यापासून साठ दिवसांच्या आत शिफारशीवर कृती करील.

**१४. खोट्या किंवा द्वेषपूर्ण तक्रारीबद्दल आणि खोट्या पुराव्याबद्दल शिक्षा.-** जेव्हा उत्तरवादीविरुद्ध केलेला आरोप द्वेषपूर्ण आहे किंवा पीडित महिलेने किंवा तक्रार करणाऱ्या व्यक्तीने, तक्रार खोटी असल्याचे माहिती असताना तक्रार केलेली आहे किंवा पीडित महिलेने किंवा तक्रार करणाऱ्या व्यक्तीने कोणताही बनावट किंवा दिशाभूल करणारा दस्तावेज सादर केला आहे अशा निष्कर्षाप्रत अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती येईल तेव्हा, ती कलम ९ च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये जिने तक्रार केलेली आहे, अशा महिलेविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध, तिला किंवा त्याला लागू असलेल्या सेवा नियमांच्या तरतुदींनुसार किंवा जेव्हा असे सेवानियम अस्तित्वात नसतील तेव्हा विहित करण्यात येईल, अशा रीतीने कारवाई करण्याकरिता मालकास, किंवा यथास्थिती, जिल्हा अधिकाऱ्यास शिफारस करील:

परंतु, केवळ साधार असल्याचे दाखविण्याच्या असमर्थतेमुळे किंवा अपूर्ण पुरावा दिल्यामुळे या कलमान्वये तक्रारदाराविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही कारवाईची शिफारस करण्यापूर्वी विहित कार्यपद्धतीनुसार चौकशी केल्यानंतर, तक्रारदाराच्या बाजूने द्वेषपूर्ण उद्देशाने तक्रार केली होती हे सिद्ध करण्यात येईल.

(२) जेव्हा कोणत्याही साक्षीदाराने खोटी साक्ष दिलेली आहे किंवा कोणताही बनावट किंवा दिशाभूल करणारा दस्तावेज सादर केला आहे, अशा निष्कर्षाप्रत अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती येईल तेव्हा ती उक्त साक्षीदाराला लागू असणाऱ्या सेवानियमांच्या तरतुदींनुसार किंवा जेव्हा असे सेवा नियम अस्तित्वात नसतील तेव्हा विहित करण्यात येईल अशा रीतीने कारवाई करण्याकरिता साक्षीदाराच्या मालकास, किंवा यथास्थिती, जिल्हा अधिकाऱ्यास शिफारस करील.

**१५. नुकसानभरपाई निश्चित करणे.–** कलम १३ च्या पोटकलम (३) च्या खंड (ii) अन्वये पीडित महिलेस प्रदान करावयाची रक्कम निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, अंतर्गत समितीने, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीने पुढील गोष्टी विचारात घेतल्या पाहिजे :-

(a) पीडित महिलेस झालेल्या मानसिक वेदना, यातना, क्लेष आणि भावनिक दुःख;

(b) लैंगिक छळवणुकीच्या घटनेमुळे नोकरीच्या संधीचे झालेले नुकसान;

(c) शारीरिक व मानसशास्त्रीय उपचारासाठी पीडित व्यक्तीने केलेला वैद्यकीय खर्च;

(d) उत्तरवादीचे उत्पन्न व आर्थिक स्थिती;

(e) एकरकमी किंवा हप्त्यांमध्ये असे प्रदान करण्याची संभाव्यता.

**१६. तक्रारीचा व चौकशी कार्यवाहीचा मजकूर प्रसिद्ध करण्यास किंवा कळविण्यास मनाई.–** महितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कलम ९ अन्वये केलेल्या तक्रारीचा मजकूर, पीडित महिलेची, उत्तरवादीची व साक्षीदारांची ओळख व पत्ते, समझोता व चौकशी कार्यवाही, अंतर्गत समितीच्या, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीच्या शिफारशी आणि, या अधिनियमान्वये मालकाने किंवा जिल्हा अधिकाऱ्याने केलेली कारवाई, कोणत्याही रीतीने प्रसिद्ध करण्यात येणार नाही, किंवा जनतेला वृत्तपत्रांना व माध्यमांना कळविण्यात येणार नाही किंवा माहीत करण्यात येणार नाही :

परंतु पीडित महिलेचे व साक्षीदारांचे नाव, पत्ते ओळख किंवा तिची ओळख पटण्यास भाग पाडील असा इतर कोणताही तपशील उघड न करता, या अधिनियमान्वये लैंगिक छळवणुकीची बळी पडलेल्या कोणत्याही पीडित व्यक्तीस न्याय मिळाल्यासंबंधातील माहिती प्रसारित करता येऊ शकेल.

**१७. तक्रारीचा किंवा चौकशी कार्यवाहीचा मजकूर प्रसिद्ध केल्याबद्दल किंवा माहिती केल्याबद्दल शिक्षा.–** जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये तक्रार हाताळण्याची किंवा त्यावर कार्यवाही करण्याची, चौकशी करण्याची किंवा कोणतीही शिफारस करण्याची किंवा कारवाई करण्याची कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, कलम १६ च्या तरतुदीचे उल्लंघन करील तेव्हा, ती व्यक्ती, उक्त व्यक्तीस लागू असलेल्या सेवा नियमांच्या तरतुदींनुसार किंवा जेव्हा असे सेवानियम अस्तित्वात नसतील तेव्हा, विहित करण्यात येईल अशा रीतीने शास्तीसाठी पात्र असेल.

**१८. अपील.–** (१) कलम १३ च्या पोटकलम (२) अन्वये किंवा कलम १३ च्या पोटकलम (३) च्या खंड (i) किंवा खंड (ii) अन्वये किंवा कलम १४ च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये किंवा कलम १७ अन्वये केलेल्या

शिफारशींमुळे किंवा अशा शिफारशींची अंमलबजावणी न केल्यामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, उक्त व्यक्तीस लागू असलेल्या सेवा नियमांच्या तरतुदींन्वये न्यायालयाकडे किंवा न्यायाधिकरणाकडे अपील करू शकेल किंवा जेव्हा असे सेवानियम अस्तित्वात नसतील तेव्हा, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाध न करता, व्यथित व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने अपील करू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील अपील, शिफारशी केल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत करण्यात येईल.

## प्रकरण सहा : मालकाची कर्तव्ये

**१९. मालकाची कर्तव्ये.-** (a) प्रत्येक मालक कामाच्या ठिकाणी कामाचे सुरक्षित वातावरण पुरवील, त्यात कामाच्या ठिकाणी संपर्कात येणाऱ्या व्यक्तीपासून सुरक्षितता मिळण्याचा अंतर्भाव असेल;

(b) कामाच्या ठिकाणामधील कोणत्याही ठळक जागी, लैंगिक छळवणुकीचे दंडनीय परिणाम; आणि कलम ४ च्या पोटकलम (१) अन्वये अंतर्गत समिती स्थापन करणारा आदेश लावील;

(c) या अधिनियमाच्या तरतुदीसंबंधी कर्मचाऱ्यांना सचेतन करण्याकरिता विहित करण्यात येईल अशा रीतीने, ठराविक कालांतराने कार्यशाळा व जनजागृती कार्यक्रम आणि अंतर्गत समितीच्या सदस्यांसाठी कार्याभिमुख कार्यक्रम आयोजित करील;

(d) तक्रारीसंबंधी कार्यवाही करण्याकरिता आणि चौकशी करण्याकरिता अंतर्गत समितीस, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीस आवश्यक सुविधा पुरवील;

(e) अंतर्गत समितीसमोरील, किंवा यथास्थिती, स्थानिक समितीसमोरील उत्तरवादीच्या व साक्षीदारांच्या उपस्थितीची खात्री करण्यामध्ये सहाय्य करील;

(f) कलम ९ च्या पोटकलम (१) अन्वये केलेल्या तक्रारीच्या संबंधात तिला आवश्यक असेल अशी माहिती अंतर्गत समितीस किंवा यथास्थिती, स्थानिक समितीस उपलब्ध करून देईल;

(g) जर महिलने भारतीय दंड संहितेन्वये (१९६० चा ४५) किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये अपराधाच्या संबंधात तक्रार दाखल करण्याचा पर्याय निवडला असेल तर, तिला सहाय्य करील;

(h) अपकृत्य करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध, भारतीय दंड संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये कारवाई सुरू करण्याची व्यवस्था करणे, किंवा जेव्हा अपकृत्य करणारा, जर पीडित महिलेस तसे वाटत असेल तर, लैंगिक छळाची घटना घडून आली त्या कामाच्या ठिकाणामधील कर्मचारी नसेल तेव्हा;

(i) लैंगिक छळवणुकीस, सेवा नियमांखालील गैरवर्तणूक समजेल अशी आणि अशा गैरवर्तणुकीसाठी कारवाई करील;

(j) अंतर्गत समितीने अहवाल वेळेवर सादर करण्याचे संनियंत्रण करील.

## प्रकरण सात : जिल्हा अधिकाऱ्याची कर्तव्ये व अधिकार

**२०. जिल्हा अधिकाऱ्याची कर्तव्ये व अधिकार.-** जिल्हा अधिकारी,-

(a) स्थानिक समितीने सादर केलेले अहवाल वेळेवर सादर करण्याचे संनियंत्रण करील;

(b) लैंगिक छळवणुकीबद्दल व महिलांच्या हक्काबद्दल जागृती निर्माण करण्याकरिता अशासकीय संघटनांना सहभागी करण्याच्या दृष्टीने, आवश्यक असतील, अशा उपाययोजना करील.

**प्रकरण आठ : संकीर्ण**

**२१. समितीने वार्षिक अहवाल सादर करणे.–** (१) अंतर्गत समिती, किंवा यथास्थिती, स्थानिक समिती, प्रत्येक कॅलेंडर वर्षामध्ये विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशावेळी, वार्षिक अहवाल तयार करील आणि तो मालकाला व जिल्हा अधिकाऱ्याला सादर करील.

(२) जिल्हा अधिकारी पोटकलम (१) अन्वये मिळालेल्या वार्षिक अहवालावरील संक्षिप्त अहवाल, राज्य शासनास सादर करील.

**२२. मालकाने वार्षिक अहवालामध्ये माहिती समाविष्ट करणे.–** मालक त्याच्या संघटनेच्या वार्षिक अहवालामध्ये या अधिनियमाखालील कोणत्याही असल्यास दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या आणि त्यांच्या निकालात काढल्याची संख्या, त्याच्या अहवालामध्ये समाविष्ट करील, किंवा जेव्हा असा अहवाल तयार करण्याची आवश्यकता नसेल तेव्हा, कोणत्याही असल्यास, अशा प्रकरणांची संख्या, जिल्हाधिकाऱ्यास कळवील.

**२३. समुचित शासनाने अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे व आधारसामग्री ठेवणे.–** समुचित शासन, या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करील आणि कामाच्या ठिकाणाच्या लैंगिक छळवणुकीच्या सर्व प्रकरणाच्या बाबतीत दाखल झालेल्या प्रकरणांच्या व निकालात काढलेल्या प्रकरणांच्या संख्येबाबतची आधारसामग्री ठेवील.

**२४. समुचित शासनाने, हा अधिनियम प्रसिद्ध करण्याकरिता उपाययोजना करणे.–** समुचित शासन, वित्तपुरवठ्याच्या व अन्य साधनसंपत्तीच्या उपलब्धतेस अधीन राहून,-

(a) कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळवणुकीविरुद्ध संरक्षणाची तरतूद करणाऱ्या या अधिनियमाच्या तरतुदीबद्दल जनतेस जाणीव करून देण्यासाठी संबंधित माहिती देईल, शिक्षण संसूचना करील व प्रशिक्षण साहित्य विकसित करील आणि जाणीवजागृती कार्यक्रम आयोजित करील.

(b) स्थानिक तक्रार समितीच्या सदस्यांकरिता दिशानिदेशक व प्रशिक्षण कार्यक्रम तयार करील.

**२५. माहिती मागविण्याचा व अभिलेखाचे निरीक्षण करण्याचा अधिकार.–** (१) समुचित शासन, तसे करणे लोकहितार्थ किंवा कामाच्या ठिकाणी असलेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या हितार्थ आवश्यक आहे, अशी खात्री पटल्यावर लेखी आदेशाद्वारे,-

(a) त्याला आवश्यक असेल अशी लैंगिक छळवणुकीशी संबंधित असणारी माहिती लेखी स्वरुपात सादर करण्यासाठी कोणत्याही मालकास किंवा जिल्हाधिकाऱ्यास बोलावील.

(b) लैंगिक छळवणुकीशी संबंधित असणाऱ्या अभिलेखाचे व कामाच्या ठिकाणाचे निरीक्षण करण्याकरिता कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करील, तो अशा निरीक्षणाचा अहवाल आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत सादर करील.

(२) प्रत्येक मालक व जिल्हा अधिकारी, अधिकाऱ्याने निरीक्षण करण्यापूर्वी मागणी केल्यावर अशा निरीक्षणाचा विषय असणारी त्याच्या ताब्यातील सर्व माहिती अभिलेख व अन्य दस्तऐवज सादर करील.

**२६. या अधिनियमाच्या तरतुदीचे पालन न केल्याबद्दल शास्ती.-** (१) जेव्हा मालक,-

(a) कलम ४ च्या पोटकलम (१) अन्वये अंतर्गत समिती गठित करण्यास कसूर करील तेव्हा;

(b) कलम १३, १४ व २२ अन्वये कारवाई करण्यास निष्फळ ठरेल तेव्हा; आणि

(c) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल तेव्हा,

तो पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) जर कोणत्याही मालकाने, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल पूर्वी दोषसिद्ध ठरविण्यात आल्यानंतर तसाच अपराध केला असेल तर व अशाच अपराधाबद्दल तो दोषसिद्ध ठरला असेल तर तो,-

(i) त्याच अपराधाकरिता तरतूद केलेल्या कमाल शिक्षेस अधीन राहून, पहिल्या दोषसिद्धीबद्दल जी लादण्यात येऊ शकेल अशा शिक्षेच्या दुप्पट शिक्षेस पात्र असेल :

परंतु, ज्या अपराधाकरिता आरोपीवर खटला दाखल करण्यात आला असेल अशा अपराधासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये, शिक्षा विहित केलेली असेल तर, न्यायालय शिक्षा देतेवेळी त्याची योग्य ती दखल घेईल.

(ii) सरकारकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून, त्याचा व्यवसाय किंवा कार्य करण्याकरिता आवश्यक असलेले लायसन रद्द करण्यास, किंवा काढून घेण्यास, किंवा त्याचे नूतनीकरण न करण्यास त्याची मान्यता रद्द करण्यास, किंवा त्याची नोंदणी रद्द करण्यास पात्र असेल.

**२७. न्यायालयांनी अपराधाची दखल घेणे.-** (१) कोणतेही न्यायालय पीडित महिलने किंवा याबाबतीत अंतर्गत समितीने किंवा स्थानिक समितीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेल्या तक्रारीवरून असेल त्याखेरीज, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

(२) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग नयायदंडाधिकाऱ्याच्या न्यायालयास कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

(३) या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध, अदखलपात्र असेल.

**२८. हा अधिनियम इतर कोणत्याही कायद्याचे अल्पीकरण करणार नाही.-** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींशिवाय असतील व त्यांचे अल्पीकरण करणार नाही.

**२९. नियम करण्याचा समुचित शासनाचा अधिकार.- (**१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा न करता अशा नियमांमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल.

(a) कलम ४ च्या पोटकलम (४) अन्वये सदस्यांना प्रदान करावयाचे शुल्क व भत्ते;

(b) कलम ७ च्या पोटकलम (१) च्या खंड (c) अन्वये सदस्याचे नामनिर्देशन;

(c) कलम ७ च्या पोटकलम (४) अन्वये अध्यक्षास व सदस्यांना प्रदान करावयाचे शुल्क व भत्ते;

(d) कलम ९ च्या पोटकलम (२) अन्वये तक्रार करू शकेल अशी व्यक्ती;

(e) कलम ११ च्या पोटकलम (१) खालील चौकशीची रीत;

(f) कलम ११ च्या पोटकलम (२) च्या खंड (c) अन्वये चौकशी करण्याचा अधिकार;

(g) कलम १२च्या पोटकलम (१) च्या खंड (c) अन्वये शिफारस करावयाचे सहाय्य;

(h) कलम १३ च्या पोटकलम (३) च्या खंड (i) अन्वये हाती घ्यावयाची कारवाईची रीत;

(i) कलम १४ च्या पोटकलम (१) व (२) अन्वये करावयाची कारवाईची रीत;

(j) कलम १७ अन्वये हाती घ्यावयाची कारवाईची रीत;

(k) कलम १८ च्या पोटकलम (१) अन्वये अपिलाची रीत;

(l) कलम १९ च्या खंड (c) अन्वये अंतर्गत समितीच्या कर्मचाऱ्यांना जागृत करण्यासाठी कार्यशाळा, जागृती कार्यक्रम आणि अंतर्गत समितीच्या सदस्यासाठी दिशानिर्देशक कार्यक्रम आयोजित करण्याची रीत; आणि

(m) कलम २१ च्या पोटकलम (१) अन्वये अंतर्गत समितीने व स्थानिक समितीने वार्षिक अहवाल तयार करण्याचा नमुना व वेळ.

(३) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर त्याचे अधिवेशन चालू असताना, एका अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी मांडण्यात येईल आणि जर उपरोक्तप्रमाणे त्या अधिवेशनाच्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या किंवा लागोपाठच्या अधिवेशनाच्या समाप्तीपूर्वी, दोन्ही सभागृह त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्यास एकमत झाले असतील किंवा असे नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येतील, किंवा यथास्थिती मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमांन्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाधा येणार नाही.

(४) राज्य शासनाने, कलम ८ च्या पोटकलम (४) अन्वये केलेला कोणताही नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, जेव्हा ते दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेव्हा राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर, किंवा जेव्हा ते एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेव्हा, अशा विधानमंडळाच्या त्या सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**३०. अडचणी दूर करण्याचा अधिकार.-** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उदभवली तर, केंद्र सरकार, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे अशी अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक वाटतील अशा या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यावर असा आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

----------

# ४९. भारतीय ध्वज संहिता

भारताचा राष्ट्रध्वज हा भारतीय लोकांच्या आशा आणि आकांक्षांचे प्रतिनिधित्व करतो. भारतीय राष्ट्रध्वज आपल्या राष्ट्राबद्दलच्या अभिमानाचं प्रतीक आहे. हा तिरंगा गेल्या पाच दशकांहून अधिक काळ पूर्ण तेजाने फडकत राहण्यासाठी सशस्त्र बलांच्या जवानांसह अनेक लोकांनी त्याचे रक्षण करण्याकरिता उदारपणाने आपले प्राण पणाला लावले आहेत.

डॉ. एस. राधाकृष्णन यांनी संविधान सभेमध्ये राष्ट्रध्वजामधील रंगांच्या व चक्राच्या अर्थसूचकतेबद्दल विस्तृतपणे वर्णन केलेले होते. संविधान सभेने एकमताने राष्ट्रीय ध्वज स्वीकृत केला. डॉ. एस. राधाकृष्णन यांनी असे स्पष्ट केले, की-''भगवा किंवा केशरी रंग हा स्वार्थनिरपेक्ष त्यागाचा दर्शक आहे. आपल्या नेत्यांनी देखील भौतिक लाभांपासून तटस्थ राहिले पाहिजे आणि आपल्या कामामध्ये स्वतःला वाहून घेतले पाहिजे. मध्यभागी असलेला पांढरा रंग हा प्रकाशाचा. आपल्या आचरणात मार्गदर्शन करणाऱ्या सत्याचा मार्ग आहे. हिरवा रंग हा आपले मातीशी असलेले नाते व ज्यावर इतर सर्वांचे जीवन अवलंबून आहे, अशा वनस्पती जीवनाशी असलेले आपले नाते दर्शवितो. पांढऱ्या रंगाच्या मध्यभागी असलेले अशोकचक्र हे धर्म नियमांचे चक्र आहे. जे या ध्वजाखाली काम करतात, त्यांची सत्य, धर्म किंवा सदाचार ही नियंत्रक तत्त्वे असली पाहिजेत. तसेच चक्र हे गतीचे दर्शक आहे. तेथे कुंठिततेत मृत्यू आहे. गतिमानतेत जीवन आहे. भारताने परिवर्तनाला कसलाही प्रतिरोध करू नये. त्याने गतिमान बनले पाहिजे व पुढे गेले पाहिजे. चक्र हे शांततापूर्ण परिवर्तनाच्या गतिशीलतेचे निदर्शक आहे.'

राष्ट्रध्वजाबद्दल सार्वत्रिक प्रेम व आदर आहे आणि त्याच्याप्रती सर्वांची निष्ठा आहे. तरीसुद्धा राष्ट्रध्वज लावण्याकरिता लागू असलेले कायदे, प्रथा व संकेत यासंबंधात केवळ लोकांमध्येच नव्हे, तर शासकीय संघटना/अभिकरणे यांमध्येसुद्धा कित्येकदा जाणिवेचा स्पष्ट अभाव दिसून आलेला आहे. राष्ट्रध्वज लावण्याबाबत शासनाने, वेळोवेळी जारी केलेल्या असांविधिक सूचनांव्यतिरिक्त बोधचिन्हे व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५० (१९५० चा अधिनियम क्रमांक १२) आणि राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ (१९७१ चा अधिनियम क्रमांक ६९) यांच्या तरतुदींद्वारे राष्ट्रध्वज लावण्याचे नियमन केले जात आहे. सर्व संबंधितांच्या मार्गदर्शनासाठी व हितासाठी, भारतीय ध्वज संहिता, २००२ मध्ये याबाबतचे सर्व कायदे, संकेत, प्रथा व सूचना एकत्रित करण्याचा एक प्रयत्न केला आहे.

सोयीसाठी भारतीय ध्वज संहिता, २००२ ची तीन भागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. संहितेच्या भाग-एक मध्ये राष्ट्रध्वजाच्या सर्वसाधारण वर्णनाचा समावेश आहे. संहितेच्या भाग-दोनमध्ये जनतेतील कोणतीही व्यक्ती, खाजगी संघटना, शैक्षणिक संस्था, इत्यादींना राष्ट्रध्वज लावण्याबाबत माहिती दिलेली आहे. संहितेचा भाग-तीन हा केंद्र सरकार व राज्य सरकारे आणि त्यांच्या संघटना व अभिकरणे यांनी राष्ट्रध्वज लावण्यासंबंधातील आहे.

भारतीय ध्वज संहिता, २००२ ही २६ जानेवारी २००२ पासून अमलात येत आहे आणि ती विद्यमान भारतीय ध्वज संहितेची जागा घेईल.

## भाग-एक : सर्वसाधारण

१.१ राष्ट्रध्वज तीन रंगांच्या पट्ट्यांचा असून तो समान रुंदीच्या तीन आयताकृती पट्ट्या किंवा जोड-पट्ट्या यांचा मिळून बनलेला असेल. सर्वात वरची पट्टी भारतीय केशरी रंगाची असेल तर खालची पट्टी भारतीय हिरव्या रंगाची असेल. मधली पट्टी पांढऱ्या रंगाची असेल व तिच्या मध्यभागी समान अंतराच्या २४ आऱ्यांचे नेव्ही ब्ल्यू रंगाचे (Navy Blue)) अशोकचक्राचे चिन्ह असेल. अशोकचक्र हे विशेषकरून स्क्रिन प्रिंट केलेले किंवा अन्य प्रकारे प्रिंट केलेले किंवा स्टेन्सिल केलेले अथवा योग्यरीतीने भरतकाम केलेले असेल आणि ते ध्वजाच्या दोन्ही बाजूंनी पांढऱ्या पट्टीच्या मध्यभागी पूर्णतः दिसेल असे असेल.

१.२ भारताचा राष्ट्रध्वज, हाताने कातलेल्या व हाताने विणलेल्या लोकर/सूत/सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल.

१.३ राष्ट्रध्वज आयताकृती आकाराचा असेल. ध्वजाची लांबी व उंची (रुंदी) याचे प्रमाण ३ : २ इतके असेल.

१.४ राष्ट्रध्वजाचे प्रमाणित आकार पुढीलप्रमाणे असतील:-

| ध्वजाचा आकाराचा क्रमांक | आकार (मि.मी.) |
|---|---|
| १ | ६,३०० x ४,२०० |
| २ | ३,६०० x २,४०० |
| ३ | २,७०० x १,८०० |
| ४ | १,८०० x १,२०० |
| ५ | १,३५० x ९०० |
| ६ | ९०० x ६०० |
| ७ | ४५० x ३०० |
| ८ | २२५ x १५० |
| ९ | १५० x १०० |

१.५ ध्वज लावण्यासाठी त्याचा योग्य तो आकार निवडण्यात यावा. ४५० x ३०० मि.मी. आकाराचे ध्वज अति विशेष मान्यवर व्यक्तींच्या विमानांकरिता आहेत. २२५ x १५० मि.मी. आकाराचे ध्वज मोटारगाड्यांवर लावण्याकरिता आहेत व १५०ˣ १०० मि.मी. आकाराचे ध्वज टेबलावर लावण्याकरिता आहेत.

## भाग-दोन

## जनतेतील कोणत्याही व्यक्ती, खाजगी संघटना, शैक्षणिक संस्था इत्यादींनी ध्वजारोहण करणे/राष्ट्रध्वज लावणे/राष्ट्रध्वजाचा उपयोग करणे.

### कलम एक

२.१ बोधचिन्हे व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५०* आणि राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१** आणि या विषयावर अधिनियमित केलेले इतर कोणताही कायदा यात तरतूद केलेल्या मर्यादांव्यतिरिक्त सर्वसाधारण जनतेतील कोणत्याही व्यक्ती, खाजगी संघटना, शैक्षणिक संस्था इत्यादींना राष्ट्रध्वज लावण्यावर कोणतेही

---

* बोधचिन्हे व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५०

**कलम २.–** या अधिनियममध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) ''बोधचिन्ह'' याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले असे कोणतेही बोधचिन्ह, मुद्रा, ध्वज, अधिचिन्ह, कुलचिन्ह किंवा चित्र प्रतिरुपण, असा आहे.

**कलम ३.–** त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार विहित करील अशी प्रकरणे व अशी परिस्थिती खेरीजकरुन एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही नाव किंवा बोधचिन्ह किंवा त्याची कोणतीही आभासी प्रतिकृती यांचा, केंद्र सरकारच्या किंवा शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय, कोणताही व्यापार, व्यवसाय, आजिविका किंवा पेशा यांच्या प्रयोजनार्थ, अथवा कोणत्याही स्वामित्व हक्काच्या शीर्षकात, अथवा कोणत्याही व्यापारचिन्हात किंवा चिन्हाकृतीत वापर करता येणार नाही किंवा वापर चालू ठेवता येणार नाही.

**टीप.–** भारताचा राष्ट्रीय ध्वज हा अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये बोधचिन्ह म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आला आहे.

** राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ (राष्ट्र प्रतिष्ठा अपमान प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम, २००३ द्वारे सुधारित)

**कलम २.–** जो कोणी, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा कोणत्याही अन्य ठिकाणी लोकांच्या देखत भारतीय राष्ट्रध्वज किंवा त्याचा कोणताही भाग जाळील, छिन्नविछिन्न करील, विरूप करील, त्याचे पावित्र्य विटाळील, तो विद्रुप करील, नष्ट करील, पायांखाली तुडवील किंवा अन्यथा त्याची बेअदबी करील (मग ती तोंडी किंवा लेखी शब्दाद्वारे असो वा कृतीद्वारे असो) त्याला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण १.–** कायदेशीर मार्गाने भारतीय राष्ट्रध्वजात बदल घडवून आणण्याच्या हेतूने, भारतीय राष्ट्रध्वजाबाबत किंवा शासनाच्या कोणत्याही उपाययोजनांबाबत नापसंती दर्शविणारे अभिप्राय व्यक्त करण्याने किंवा त्यावर टीकाटिप्पणी करण्याने या कलमान्वये कोणताही अपराध घडणार नाही.

**स्पष्टीकरण २.–** ''भारतीय राष्ट्रध्वज'' या शब्दप्रयोगात, कोणत्याही पदार्थापासून तयार केलेले किंवा कोणत्याही पदार्थावर चितारलेले भारतीय राष्ट्रध्वजाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे अगर भागांचे चित्र, रंगीत चित्र, रेखाटन किंवा छायाचित्र अथवा अन्य दृश्य प्रतिरुपण अंतर्भूत आहे.

**स्पष्टीकरण ३.–** ''सार्वजनिक ठिकाण'' या शब्दप्रयोगाचा अर्थ, जनतेने वापरावी हा हेतू असलेली किंवा जेथे त्यांना प्रवेश असेल अशी कोणतीही जागा आहे, व त्यात कोणत्याही सार्वजनिक वाहनाचा अंतर्भाव आहे.

**स्पष्टीकरण ४.–** ''भारतीय राष्ट्रध्वजाचा अनादर करणे'' याचा अर्थ आणि यात,–

(क) भारतीय राष्ट्रध्वजाची अक्षम्य मानहानी करणे किंवा अप्रतिष्ठा करणे; किंवा

(ख) एखाद्या व्यक्तीला किंवा वस्तूला मानवंदन देण्यासाठी भारतीय राष्ट्रध्वज खाली आणणे; किंवा

(ग) शासनाने दिलेल्या निदेशानुसार सरकारी इमारतींवरील ध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येतो त्या प्रसंगाखेरीज, राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविणे; किंवा

(घ) सरकारी अंत्यसंस्कार किंवा सेनादल किंवा अन्य निमलष्करी दलातील अंत्यसंस्कार याव्यतिरिक्त जे कोणतेही असेल अशा कोणत्याही स्वरूपात आच्छादन म्हणून वापर करणे;

(ङ) भारतीय राष्ट्रध्वजाचा,

(एक) कोणत्याही व्यक्तीच्या कमरेखाली घालण्याचा पोशाख, गणवेश किंवा कोणत्याही वर्णनाची उपसाधने म्हणून; किंवा

(दोन) उशा, हातरूमाल, हातपुसणे, अंतर्वस्त्रे किंवा कोणत्याही पोशाख साहित्यावर भरतकाम किंवा छपाई करणे,

-यासाठी वापर करणे; किंवा

(च) भारतीय राष्ट्रध्वजावर कोणत्याही प्रकारची अक्षरे लिहिणे; किंवा

(छ) भारतीय राष्ट्रध्वजाचा प्रजासत्ताकदिन व स्वातंत्र्यदिन यांसह विशेष प्रसंग साजरे करण्याचा एक भागम म्हणून भारतीय राष्ट्रध्वज फडकवण्यापूर्वी ध्वजाच्या आतील भागात फुलांच्या पाकळ्या ठेवण्याव्यतिरिक्त कोणतीही वस्तू घेण्याचे, देण्याचे, बांधण्याचे किंवा वाहून नेण्याचे साधन म्हणून वापर करणे; किंवा

(ज) भारतीय राष्ट्रध्वजाचा पुतळा किंवा स्मारकशिल्प किंवा वक्त्याचे टेबल (डेस्क) झाकण्यासाठी किंवा वक्त्याच्या व्यासपीठावर आच्छादण्यासाठी वापर करणे; किंवा

(झ) भारतीय राष्ट्रध्वजाचा जाणीवपूर्वक भूमीशी किंवा जमिनीशी स्पर्श करणे किंवा तो पाण्यावरून फरफटत नेणे; किंवा

(ञ) भारतीय राष्ट्रध्वज मोटारवाहन, रेल्वेगाडी, जहाज किंवा विमान किंवा कोणतीही इतर त्याच प्रकारची वाहने यांच्या छतावर, बाजूंवर किंवा पाठीमागच्या बाजूस आच्छादणे; किंवा

(ट) भारतीय राष्ट्रध्वजाचा एखाद्या इमारतीचे आच्छादन म्हणून वापर करणे; किंवा

(ठ) भारतीय राष्ट्रध्वजाचा ''केशरी'' रंगाचा पट्टा खालच्या बाजूस येईल अशाप्रकारे जाणीवपूर्वक ध्वज लावणे

यांचा समावेश होतो.

**३-क. दुसरा किंवा त्यानंतरच्या अपराधाला किमान शास्ती.–** जो कोणी, कलम २ किंवा कलम ३ अन्वये अपराधाची शिक्षा भोगलेली आहे त्याने पुन्हा असा कोणताही अपराध केल्यास, दुसरा किंवा त्यानंतरच्या प्रत्येक अपराधास एक वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा होईल.

निर्बंध असणार नाहीत. उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदी विचारात घेता-

(एक) बोधचिन्हे व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५० चा भंग करून वाणिज्यिक प्रयोजनासाठी ध्वजाचा वापर करता येणार नाही.

(दोन) कोणत्याही व्यक्तीस किंवा वस्तूस मानवंदना देण्यासाठी ध्वज खाली आणता येणार नाही.

(तीन) ज्या प्रसंगी, शासनाने दिलेल्या निदेशांनुसार सरकारी इमारतींवरील ध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येतो, त्या प्रसंगाखेरीज ध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येणार नाही;

(चार) खाजगी अंत्यसंस्कारासह जे कोणतेही असेल अशा कोणत्याही स्वरूपातील आच्छादन म्हणून ध्वजाचा वापर करता येणार नाही;

(पाच) ध्वजाचा कोणत्याही प्रकारच्या पोशाखाचा अथवा गणवेशाचा भाग म्हणून वापर करता येणार नाही किंवा त्याचे उशा, हातरुमाल, हातपुसणे यांवर किंवा कोणत्याही पोशाख साहित्यावर भरतकाम करता येणार नाही किंवा छपाई करता येणार नाही;

(सहा) ध्वजावर कोणत्याही प्रकारचे अक्षरे लिहिता येणार नाहीत;

(सात) ध्वजाचा कोणतीही वस्तू घेण्याचे, देण्याचे, बांधण्याचे किंवा वाहून नेण्याचे साधन म्हणून वापर करता येणार नाही :

परंतु, विशेष प्रसंगी आणि प्रजासत्ताकदिन व स्वातंत्र्यदिन यांसारख्या राष्ट्रीय दिनी तो साजरे करण्याचा एक भाग म्हणून ध्वज पडकविण्यापूर्वी ध्वजाच्या आतील भागात फुलांच्या पाकळया ठेवण्यास कोणतीही हरकत असणार नाही;

(आठ) एखाद्या पुतळयाचे अनावरण करण्यासारख्या प्रसंगी, ध्वजाचा वापर करण्यात येईल तेव्हा तो सुस्पष्टपणे व वेगळा दिसेल अशा प्रकारे लावण्यात यावा आणि त्याचा पुतळा किंवा स्मारकाचे आवरण म्हणून वापर करता येणार नाही;

(नऊ) ध्वजाचा वक्त्याचा टेबल (डेस्क) झाकण्यासाठी वापर करता येणार नाही किंवा वक्त्याच्या व्यासपीठावर आच्छादता येणार नाही;

(दहा) ध्वजाचा जाणीवपूर्वक भूमीशी किंवा जमिनीशी स्पर्श होऊ देऊ नये किंवा तो पाण्यावरून फरफटत नेऊ नये;

(अकरा) ध्वज मोटार वाहन, रेल्वे गाडी, जहाज किंवा विमान यांच्या झडपावर, छतावर, बाजूंवर किंवा पाठीमागच्या बाजूस आच्छादता येणार नाही;

(बारा) ध्वजाचा एखाद्या इमारतीचे आच्छादन म्हणून वापर करता येणार नाही; आणि

(तेरा) ध्वजाचा "केशरी" रंगाचा पट्टा खालच्या बाजूस येईल अशा प्रकारे जाणीवपूर्वक ध्वज लावता येणार नाही.

२.२ जनतेतील कोणतीही व्यक्ती, खाजगी संघटना किंवा शैक्षणिक संस्था यांना राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा व सन्मान राखून सर्व प्रसंगांच्या व समारंभाच्या दिवशी किंवा अन्यथा ध्वजारोहण करता येईल. राष्ट्रध्वज लावता येईल.

(एक) ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्यात येईल अशा प्रत्येक ठिकाणी त्याची प्रतिष्ठा राखून आणि तो स्पष्टपणे दिसेल अशा रीतीने लावला पाहिजे;

(दोन) फाटलेला अथवा चुरगळलेला ध्वज लावण्यात येऊ नये;

(तीन) ध्वज अन्य कोणत्याही, ध्वजासोबत किंवा ध्वजांसोबत एकाच वेळी एकाच काठीवर फडकवू नये;

(चार) या संहितेच्या भाग-तीनच्या कलम नऊ मध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींव्यतिरिक्त कोणत्याही वाहनांवर ध्वज लावण्यात येऊ नये;

(पाच) जेव्हा एखाद्या वक्त्याच्या व्यासपीठावर ध्वज लावायचा असेल, तेव्हा वक्त्याचे तोंड श्रोत्यांकडे असताना त्याच्या उजव्या बाजूकडे ध्वज लावण्यात यावा किंवा वक्त्याच्या पाठीमागे लावताना तो भिंतीवर वक्त्याच्या पाठीमागे वरच्या बाजूला लावावा;

(सहा) जेव्हा ध्वज भिंतीवर सपाट व आडवा लावण्यात आला असेल, तेव्हा ध्वजातील केशरी रंगाचा पट्टा सर्वात वर असावा आणि जेव्हा ध्वज उभा लावण्यात आला असेल तेव्हा ध्वजातील केशरी रंगाचा पट्टा त्याच्या (ध्वजाच्या) उजव्या बाजूस असावा (म्हणजे ध्वजाकडे तोंड करून उभ्या असलेल्या व्यक्तीच्या डाव्या बाजूस असावा);

(सात) राष्ट्रध्वज, या संहितेच्या भाग-एक मध्ये विहित केलेल्या प्रमाण विनिर्देशांशी शक्य तेवढ्या प्रमाणात अनुरूप असावा;

(आठ) राष्ट्रध्वजापेक्षा उंच किंवा राष्ट्रध्वजाच्या वर किंवा त्याच्या बरोबरीने अन्य कोणताही ध्वज किंवा पताका लावू नये; तसेच ज्या काठीवर ध्वज फडकत ठेवला असेल, त्या काठीवर किंवा त्या काठीच्या वरच्या टोकावर फुले किंवा हार यांसह कोणतीही वस्तू ठेवू नये अथवा बोधचिन्ह लावू नये;

(नऊ) ध्वजाचा तोरण, गुच्छ अथवा पताका म्हणून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे शोभेसाठी उपयोग करू नये;

(दहा) कागदापासून तयार केलेला ध्वज जनतेला महत्त्वपूर्ण अशा राष्ट्रीय, सांस्कृतिक व क्रीडाविषयक कार्यक्रमांच्या वेळी लावता येईल. तथापि, असे कागदी ध्वज अशा कार्यक्रमानंतर जमिनीवर टाकू नयेत किंवा फेकू नयेत. ध्वजाची प्रतिष्ठा राखून शक्यतोवर खाजगीरीत्या त्याची विल्हेवाट लावावी;

(अकरा) जेव्हा ध्वज मोकळया जागेत लावावयाचा असेल, तेव्हा हवामानाची स्थिती विचारात न घेता शक्यतोवर तो सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत लावण्यात यावा;

(बारा) ध्वज फाटेल अशा कोणत्याही रीतीने तो लावू नये किंवा बांधू नये; आणि

(तेरा) जेव्हा ध्वज फाटला असेल किंवा मळल्यामुळे खराब झाला असेल तेव्हा विशेषतः जाळून किंवा त्याची प्रतिष्ठा राखली जाईल अशा अन्य कोणत्याही पद्धतीने तो खाजगीरीत्या संपूर्णपणे नष्ट करावा.

**कलम दोन**

२.३ ध्वजाविषयीची आदरभावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने राष्ट्रध्वज शैक्षणिक संस्थांमध्ये (शाळा, महाविद्यालये, क्रीडा शिबिरे, बालवीरांची शिबिरे इत्यादी मध्ये) लावता येईल. याबाबत मार्गदर्शनपर अनुदेशांचा एक आदर्श संच खाली देण्यात आला आहेः-

(एक) शाळेतील विद्यार्थ्यांनी मोकळया चौरस जागेत शिस्तबद्ध रीतीने असे उभे राहावे की, या चौरस जागेच्या तीन बाजूस विद्यार्थी असतील आणि चौथ्या बाजूच्या मध्यभागी ध्वजस्तंभ असेल. मुख्याध्यापक, विद्यार्थिनेता आणि ध्वज फडकवणारी व्यक्ती (मुख्याध्यापकाव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असेल तर) हे ध्वजस्तंभाच्या मागे तीन पावले उभे राहतील.

(दोन) विद्यार्थी आपआपल्या वर्गानुसार व दहा-दहाच्या (किंवा विद्यार्थिसंख्येनुसार कमी-अधिक विद्यार्थिसंख्येच्या) तुकड्या करून रांगेत उभे राहतील. या तुकड्या एकामागे दुसरी अशा पद्धतीने उभ्या कराव्यात. वर्गाच्या

विद्यार्थिनेत्याने त्याच्या वर्गाची जी पहिली रांग असेल तिच्या उजवीकडे उभे रहावे आणि वर्गशिक्षकाने आपल्या वर्गाच्या शेवटच्या रांगेच्या मागे तीन पावले, मध्यभागी उभे राहावे. सर्वात वरचा वर्ग उजवीकडील टोकास याप्रमाणे वरिष्ठतम वर्गाच्या क्रमानुसार वर्गांची व्यवस्था करण्यात यावी.

(तीन) प्रत्येक रांगेमधील अंतर कमीत कमी एका पावलाइतके (३० इंच) असावे; आणि तुकड्या-तुकड्यांमधील अंतरही तेवढेच असावे.

(चार) जेव्हा प्रत्येक तुकडी किंवा वर्ग तयार असेल, तेव्हा वर्गनेता एक पाऊल पुढे टाकील आणि शाळेच्या निवडलेल्या विद्यार्थिनेत्याला सलामी देईल. सर्व तुकड्या तयार झाल्यावर लगेचच विद्यार्थिनेता मुख्याध्यापकांपाशी जाईल आणि त्यांना सलामी देईल. मुख्याध्यापक ही सलामी स्वीकारतील. यानंतर ध्वज फडकवण्यात येईल. या कामी विद्यार्थिनेता साहाय्य करील.

(पाच) ध्वज प्रत्यक्षपणे फडकवण्यापूर्वी संचलनाचा (किंवा विद्यार्थ्यांच्या समूहांचा) प्रमुख असलेला शाळेतील विद्यार्थ्यांचा नेता संचलनातील विद्यार्थ्यांना सावधान स्थितीमध्ये उभे राहण्याचा आदेश देईल आणि ध्वज फडकायला लागेल तेव्हा त्यांना ध्वजाला सलामी देण्याचा आदेश देईल. संचलनातील विद्यार्थ्यांनी थोडा वेळ सलामीच्या स्थितीत उभे राहावे आणि त्यानंतर ''पूर्ववत'' हा आदेश मिळाल्यानंतर परत सावधान स्थितीत उभे रहावे.

(सहा) ध्वजाला सलामी दिल्यानंतर राष्ट्रगीत होईल. राष्ट्रगीत चालू असेपर्यंत संचलनातील विद्यार्थ्यांनी सावधान स्थितीत उभे राहावे.

(सात) जेव्हा प्रतिज्ञा घ्यावयाची असेल अशा सर्व प्रसंगी, राष्ट्रगीत झाल्यानंतर प्रतिज्ञा घ्यावी. प्रतिज्ञा घेतली जात असेल तेव्हा विद्यार्थी समूहाने सावधान स्थितीत उभे राहावे आणि मुख्याध्यापक समारंभपूर्वक प्रतिज्ञा म्हणतील व विद्यार्थी समूह त्यांच्या मागोमाग प्रतिज्ञा म्हणेल.

(आठ) राष्ट्रध्वजाशी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा घेताना शाळांनी अनुसरावयाची पद्धती पुढीलप्रमाणे असेल :-

हात जोडून उभे राहून सर्वांनी पुन्हा एकत्रितपणे पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा म्हणावीः-

''मी राष्ट्रध्वजाशी आणि तो ज्याचे प्रतीक आहे त्या सर्वाभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताकाशी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करतो.''

## भाग-तीन

## केंद्र सरकार आणि राज्य शासने आणि त्यांच्या संघटना व अभिकरणे यांनी ध्वजारोहण करणे, राष्ट्रध्वज लावणे

### कलम एक

### संरक्षणविषयक आस्थापना/परदेशातील प्रतिनिधी मंडळाचे प्रमुख/चौक्या

३.१ राष्ट्रध्वज लावण्याबाबत स्वतःचे नियम असणाऱ्या संरक्षणविषयक आस्थापनांना या भागातील तरतुदी लागू असणार नाहीत.

३.२ ज्या देशांत राजनैतिक व वाणिज्यिक प्रतिनिधींनी आपापल्या मुख्यालयांवर व अधिकृत निवासस्थानांवर आपले राष्ट्रध्वज लावण्याची प्रथा आहे, अशा परदेशातील प्रतिनिधी मंडळाच्या प्रमुखांच्या मुख्यालयांवर/चौकीवर व निवासस्थानांवरसुद्धा राष्ट्रध्वज लावावा.

## कलम दोन : सरकारीरित्या ध्वज लावणे

३.३ वरील कलम एकमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींस अधीन राहून, या भागामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींचे अनुपालन करणे हे सर्व सरकारांना व त्यांच्या संघटनांना/अभिकरणांना अनिवार्य असेल.

३.४ सरकारीरित्या ध्वज लावण्याच्या सर्व प्रसंगी, भारतीय मानक संस्थेने (ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड) ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार आणि त्या संस्थेचे प्रमाणचिन्ह असलेला ध्वजच वापरण्यात यावा. इतर प्रसंगीसुद्धा केवळ अशाच प्रकारचे योग्य आकाराचे ध्वज लावले जाणे इष्ट आहे.

## कलम तीन : ध्वज लावण्याची योग्य पद्धत

३.५ ज्या ज्या ठिकाणी ध्वज लावण्यात येईल अशा प्रत्येक ठिकाणी त्याची प्रतिष्ठा राखून तो स्पष्टपणे दिसेल अशा रीतीने लावला पाहिजे.

३.६ जेथे कोणत्याही सरकारी इमारतींवर ध्वज लावण्याची प्रथा आहे, तेथे त्या इमारतींवर रविवार व सुट्टीचे दिवस धरून सर्व दिवशी ध्वज लावण्यात येईल आणि या संहितेमध्ये तरतूद केली असेल ती खेरीजकरून हवामान कसेही असले तरी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ध्वज लावण्यात येईल. अशा इमारतींवर रात्रीसुद्धा ध्वज लावता येईल. मात्र काही अगदी विशेष प्रसंगीच तो रात्री लावावा.

३.७ ध्वजारोहणाचे वेळी ध्वज नेहमी झर्रकन वर चढवावा आणि उतरविताना मात्र तो सावकाशपणे व विधिपूर्वक उतरविण्यात यावा. जेव्हा ध्वजारोहणाची व ध्वज उतरविण्याची क्रिया समर्पक बिगुलाच्या सुरांवर करावयाची असेल, तेव्हा ध्वजारोहणाची व ध्वज उतरविण्याची क्रिया त्या सुरांच्या बरोबरच झाली पाहिजे.

३.८ जेव्हा खिडकीची कड, सज्जा अगर इमारतीचा पुढील भाग अशा ठिकाणी आडव्या किंवा तिरक्या बसविलेल्या काठीवरून ध्वज फडकविण्यात येतो, तेव्हा ध्वजाची केशरी रंगाची बाजू काठीच्या वरच्या टोकाकडे असावी.

३.९ जेव्हा ध्वज भिंतीवर सपाट व आडवा लावण्यात आला असेल, तेव्हा ध्वजातील केशरी रंगाचा पट्टा सर्वात वर असावा आणि जेव्हा ध्वज उभा लावण्यात आला असेल, तेव्हा ध्वजातील केशरी रंगाचा पट्टा त्याच्या (ध्वजाच्या) उजव्या बाजूस असावा म्हणजे ध्वजाकडे तोंड करून उभ्या असलेल्या व्यक्तीच्या डाव्या बाजूस असावा.

३.१० जेव्हा एखाद्या वक्त्याच्या व्यासपीठावर ध्वज लावावयाचा असेल, तेव्हा वक्त्याचे तोंड श्रोत्यांकडे असताना त्याच्या उजवीकडे काठीवर ध्वज लावण्यात यावा अथवा वक्त्याच्या पाठीमागे लावताना तो भिंतीवर वक्त्याच्या पाठीमागे वरच्या बाजूस लावावा.

३.११ एखाद्या पुतळयाच्या अनावरण करण्यासारख्या प्रसंगी ध्वजाचा वापर करण्यात येईल, तेव्हा तो सुस्पष्टपणे व वेगळा दिसेल अशा प्रकारे लावण्यात यावा.

३.१२ जेव्हा ध्वज एखाद्या मोटार कारवर लावण्यात येईल, तेव्हा तो एकतर मोटारीच्या बॉनेटवर मध्यभागी मजबूतपणे बसविलेल्या सळईवर किंवा मोटारीच्या समोरील उजव्या बाजूस लावण्यात यावा.

३.१३ जेव्हा एखाद्या मिरवणुकीत अथवा संचलनाच्या वेळी ध्वज फडकत न्यावयाचा असेल, तेव्हा एकतर तो कवायतीने चालणाऱ्यांच्या उजव्या बाजूस म्हणजेच खुद्द ध्वजाच्या उजव्या बाजूस असावा किंवा जर अशा प्रसंगी इतर आणखी ध्वजांची रांग असेल तर तो त्या रांगेच्या मध्यभागी पुढे असावा.

**कलम चार : ध्वज लावण्याची चुकीची पद्धत**

३.१४ फाटलेला अथवा चुरगळलेल्या ध्वज लावता कामा नये.

३.१५ कोणत्याही व्यक्तीस किंवा वस्तूस मानवंदना देण्यासाठी ध्वज खाली आणू नये.

३.१६ दुसरा कोणताही ध्वज अगर पताका राष्ट्रध्वजापेक्षा उंच किंवा राष्ट्रध्वजावर आणि यात यापुढे तरतूद केली असेल ते खेरीजकरून त्याच्या बरोबरीने लावू नये; तसेच ज्या काठीवर ध्वज फडकत असेल, त्या काठीवर किंवा त्या काठीच्या वरच्या टोकावर फुले किंवा हार यांसह कोणतीही वस्तू ठेवू नये अथवा बोधचिन्ह लावू नये.

३.१७ ध्वजाचा तोरण, गुच्छ अथवा पताका म्हणून किंवा अन्य कोणत्याही प्रकारे शोभेसाठी उपयोग करू नये.

३.१८ ध्वजाचा वक्त्याचे टेबल (डेस्क) झाकण्यासाठी अथवा वक्त्याच्या व्यासपीठावर पडदा म्हणून राष्ट्रध्वजाचा वापर करू नये.

३.१९ ध्वजाचा "केशरी" रंगाचा पट्टा खालच्या बाजूस येईल अशा प्रकारे ध्वज लावू नये.

३.२० ध्वजाचा भूमीशी किंवा जमिनीशी स्पर्श होऊ देऊ नये अथवा तो पाण्यावरून फरफटत नेऊ नये.

३.२१ ध्वज फाटेल अशा पद्धतीने लावू नये अथवा बांधू नये.

**कलम पाच : गैरवापर**

३.२२ कोणत्याही स्वरूपात ध्वजाचा आच्छादन म्हणून वापर करता येणार नाही. सरकारमार्फत अथवा सेनादलांमार्फत तसेच केंद्रीय निमलष्करी दले यांच्यामार्फत काढण्यात येणाऱ्या अंत्ययात्रांचे प्रसंग यास अपवाद असतील. असे प्रसंग पुढे दिले आहेत.

३.२३ ध्वजाचा मोटार वाहन, रेल्वेगाडी किंवा जहाज यांच्या झडपांवर, छतांवर, बाजूंवर किंवा पाठीमागच्या बाजूस आच्छादन म्हणून वापर करता येणार नाही.

३.२४ ध्वज फाटेल किंवा तो मलिन होईल अशा प्रकारे त्याचा वापर येणार नाही किंवा तो ठेवता येणार नाही.

३.२५ ध्वज फाटला असेल अथवा मळल्यामुळे खराब झाला असेल, तर तो कोठेतरी फेकून देऊ नये अथवा त्याचा अवमान होईल अशा रीतीने त्याची विल्हेवाट लावू नये. परंतु अशा परिस्थितीत ध्वज खाजगीरीत्या शक्य तर जाळून किंवा त्याचा मान राखला जाईल अशा अन्य रीतीने तो संपूर्णतः नष्ट करावा.

३.२६ ध्वजाचा एखाद्या इमारतीचे आच्छादन म्हणून वापर करता येणार नाही.

३.२७ ध्वजाचा पोशाखाचा अथवा कोणत्याही प्रकारच्या गणवेशाचा भाग म्हणून वापर करता येणार नाही. तसेच त्याचे उशा, हातरुमाल, हातपुसणे किंवा पेट्या यावर भरतकाम करता येणार नाही, अगर छपाई करता येणार नाही.

३.२८ ध्वजावर कोणत्याही प्रकारची अक्षरे लिहिता येणार नाही.

३.२९ ध्वजाचा जाहिरातीच्या कोणत्याही स्वरूपात वापर करता येणार नाही. अथवा ध्वज फडकविण्यात आलेल्या ध्वजस्तंभाचा एखादे जाहिरात चिन्ह लावण्यासाठी वापर करता येणार नाही.

३.३० ध्वजाचा कोणतीही वस्तू घेण्याचे, देण्याचे, बांधण्याचे अगर वाहून नेण्याचे साधन म्हणून वापर करता येणार नाही :


परंतु, विशेष प्रसंग आणि प्रजासत्ताकदिन व स्वातंत्र्यदिन यांसारखे राष्ट्रीय सणांचे दिवस साजरा करण्याचा एक भाग म्हणून राष्ट्रध्वज फडकविण्यापूर्वी ध्वजाच्या आतील भागात फुलांच्या पाकळया ठेवण्यास कोणतीही हरकत असणार नाही.

## कलम सहा : सलामी

३.३१ ध्वजारोहण करण्याच्या अथवा ध्वजावतरणाच्या प्रसंगी अथवा एखाद्या संचलनामधून ध्वज नेण्यात येत असताना अथवा पाहणी करीत असताना उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तींनी ध्वजाकडे तोंड करून सावधान स्थितीत उभे राहावे. गणवेशात उपस्थित असलेल्या व्यक्तींनी त्याला उचित रीतीने सलामी द्यावी. जेव्हा ध्वज दलाबरोबर नेला जातो, तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या व्यक्ती, तो समोरून नेला जात असताना, सावधान स्थितीत उभ्या राहतील किंवा सलामी देतील. उच्चपदस्थ व्यक्तीला शिरोवस्त्र (head dress) न घालता सलामी घेतली तरी चालेल.

## कलम सात : इतर राष्ट्रे व संयुक्त राष्ट्रसंघ यांच्या ध्वजासमवेत राष्ट्रध्वज लावणे

३.३२ आपला राष्ट्रध्वज हा जेव्हा इतर देशांच्या ध्वजांबरोबर सरळ रांगेत उभारावयाचा असेल, तेव्हा तो उजवीकडे टोकाशी उभारावा. म्हणजे जर एखादा निरीक्षक ध्वजाच्या रांगेच्या मध्यभागी प्रेक्षकांकडे तोंड करून उभा राहिला, तर राष्ट्रध्वज त्याच्या उजव्या हाताला टोकाकडे असावा. ध्वजाचे स्थान पुढील आकृतीत दाखविल्याप्रमाणे असावेः-





३.३३ आपल्या राष्ट्रध्वजानंतर परदेशांचे राष्ट्रध्वज त्या त्या देशांच्या नावांच्या इंग्रजी पाठाच्या आधारे वर्णक्रमानुसार उभारावे. त्याशिवाय ध्वजाच्या रांगेत सुरुवातीला आणि शेवटीही आपला राष्ट्रध्वज उभारता येईल आणि देशांच्या नावांच्या इंग्रजी वर्णक्रमाप्रमाणे सामान्यपणे जेथे त्याचे स्थान येईल तेथेही तो उभारता येईल. आपला राष्ट्रध्वज सर्वात अगोदर उभारण्यात यावा आणि सर्वात शेवटी उतरविण्यात यावा.

३.३४ ध्वज जर खुल्या वर्तुळात म्हणजे एखाद्या कंसाकार अगर चापाकृति रचनेत वा अर्धवर्तुळात उभारावयाचे असतील, तर या कलमाच्या अगोदरच्या खंडात सांगितलेल्या पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. ध्वज जर बंद वर्तुळात म्हणजेच पूर्ण वर्तुळात उभारावयाचे असतील, तर राष्ट्रध्वज वर्तुळाच्या सुरुवातीस उभारावा आणि इतर देशांचे ध्वज घड्याळाच्या काट्याच्या दिशेने उजवीकडून डावीकडे उभारावेत की जेणेकरून शेवटचा ध्वज राष्ट्रध्वजाच्या शेजारी यावा. ध्वजाच्या वर्तुळाची सुरुवात किंवा अखेर दर्शविण्यासाठी वेगवेगळे राष्ट्रध्वज उभारण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारच्या बंद वर्तुळात राष्ट्रध्वजाचा त्याच्या वर्णक्रमानुसार येणाऱ्या जागी देखील समावेश करावा.

३.३५ भिंतीवर दोन काठ्या फुलीसारख्या एकावर एक ठेवून त्यावर राष्ट्रध्वज दुसऱ्या एखाद्या ध्वजाबरोबर लावावयाचा असेल, तर अशावेळी, राष्ट्रध्वज उजवीकडे म्हणजे ध्वजाच्या उजव्या बाजूला असावा आणि राष्ट्रध्वजाची काठी वरच्या बाजूस व दुसऱ्या ध्वजाची काठी मागे असावी. पुढील आकृतीत ध्वजाचे स्थान दर्शविले आहेः-



३.३६ जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजाबरोबर फडकवायचा असेल, तेव्हा राष्ट्रध्वजाच्या कोणत्याही बाजूला तो लावता येतो. याबाबत नेहमीची पद्धत अशी की, ध्वजाचे तोंड ज्या दिशेला असेल तिच्या उजवीकडच्या टोकाला (म्हणजे ध्वजाच्या काठ्यांकडे बघणाऱ्यांच्या अगदी डावीकडच्या टोकाकडे) राष्ट्रध्वज लावावा. ध्वजाचे स्थान खालील आकृतीत दाखविले आहेः-




३.३७ जेव्हा राष्ट्रध्वज इतर देशांच्या ध्वजाबरोबर फडकवायचा असेल, तेव्हा सर्व ध्वजांच्या काठ्या सारख्या आकाराच्या असाव्यात. शांततेच्या काळात एका राष्ट्राच्या ध्वजाच्या वर दुसऱ्या राष्ट्राचा ध्वज लावणे आंतरराष्ट्रीय परिपाठाप्रमाणे निषिद्ध आहे.

३.३८ राष्ट्रध्वज एकाच काठीवर एकाच वेळी अन्य कोणत्याही ध्वजाबरोबर किंवा ध्वजांबरोबर लावू नये. निरनिराळ्या ध्वजांसाठी निरनिराळ्या काठ्या असाव्यात.

### कलम आठ : सरकारी इमारतींवर/शासकीय निवासस्थानांवर ध्वज लावणे

३.३९ सामान्यतः उच्च न्यायालये, सचिवालये, आयुक्तांची कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये, तुरुंग व जिल्हा मंडळे, नगरपालिका व जिल्हा परिषदा व विभागीय/सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांची कार्यालये यांसारख्या इमारतींवरच ध्वज लावण्यात यावेत.

३.४० सीमा प्रदेशामध्ये सीमा जकात नाकी, तपासणी नाकी, चौक्या यांवर आणि इतर विशेष जागा जेथे ध्वज उभारण्याचे विशेष महत्त्व आहे, अशा जागी ध्वज लावता येतील. तसेच सीमेवर गस्त घालणाऱ्या सैनिकांच्या छावण्यांवरही ध्वज लावता येतील.

३.४१ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल व नायब राज्यपाल जेव्हा आपल्या मुख्यालयात असतात, तेव्हा त्यांच्या सरकारी निवासस्थानावर आणि जेव्हा ते आपल्या मुख्यालयाबाहेर दौऱ्यावर असतात, तेव्हा ते ज्या इमारतीमध्ये राहतात त्या इमारतीवर राष्ट्रध्वज लावण्यात यावा. तथापि, सरकारी निवासस्थानावर लावण्यात आलेला ध्वज, उच्चपदस्थ व्यक्तींनी मुख्यालय सोडताच खाली उतरवण्यात यावा आणि ते त्या मुख्यालयात परतताना इमारतीच्या मुख्य दाराशी येताच त्या इमारतीवर पुन्हा ध्वज चढवण्यात यावा. जेव्हा उच्चपदस्थ व्यक्ती मुख्यालयाबाहेरील ठिकाणी भेट देण्यास जातात, तेव्हा त्या व्यक्ती ज्या इमारतीमध्ये राहत असतील, त्या इमारतीच्या मुख्य दारात त्यांनी प्रवेश करताच त्या इमारतीवर ध्वज उभारण्यात यावा आणि त्यांनी ती जागा सोडताच ध्वज उतरवण्यात यावा. तथापि, प्रजासत्ताकदिन व स्वातंत्र्यदिन, महात्मा गांधी जयंती, राष्ट्रीय सप्ताह (६ ते १३ एप्रिल जालियनवाला बाग, हुतात्मा स्मृती सप्ताह) तसेच भारत सरकारने विनिर्दिष्ट केल्यानुसार राष्ट्रीय आनंदोत्सवाच्या कोणत्याही इतर विशिष्ट दिवशी किंवा एखाद्या राज्याच्या

त्या राज्याच्या बाबतीत स्थापनेच्या वर्धापन दिनी उच्चपदस्थ व्यक्ती मुख्यालयात असल्या किंवा नसल्या तरी अशा सरकारी निवासस्थानावर सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ध्वज लावण्यात यावा.

३.४२ जेव्हा राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा पंतप्रधान एखाद्या संस्थेला भेट देतील, त्या वेळी त्यांच्याविषयी आदर व्यक्त करण्याचे प्रतीक म्हणून संस्थेला तेथे राष्ट्रध्वज लावता येईल.

३.४३ जेव्हा राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्राध्यक्ष, सम्राट/राजा किंवा युवराज आणि पंतप्रधान यांसारख्या परदेशी उच्चपदस्थ व्यक्ती भारतास भेट देतात, तेव्हा परदेशी उच्चपदस्थ व्यक्तींचे स्वागत करणाऱ्या खाजगी संस्थांना कलम सातमध्ये अंतर्भूत केलेल्या नियमांप्रमाणे संबंधित परदेशी ध्वजासमवेत राष्ट्रध्वज लावता येईल आणि त्याचप्रमाणे अशा उच्चपदस्थ व्यक्ती त्या संस्थेस भेट द्यावयाच्या दिवशी ज्या ज्या सराकरी इमारतींना भेट देणार असतील, त्या इमारतींवरही अशा प्रकारे ध्वज लावता येईल.

**कलम नऊ : मोटार गाड्यांवर ध्वज लावणे.**

३.४४ मोटारगाड्यांवर ध्वज लावण्याचे विशेष अधिकार फक्त पुढील व्यक्तींपुरतेच मर्यादित राहतील :-

(१) राष्ट्रपती;

(२) उपराष्ट्रपती;

(३) राज्यपाल व नायब राज्यपाल;

(४) परराष्ट्रातील भारताच्या अधिस्वीकृत प्रतिनिधी मंडळाचे/चौकीचे प्रमुख

(५) पंतप्रधान आणि इतर कॅबिनेट मंत्री;
केंद्रीय राज्यमंत्री व उप मंत्री;
राज्याचे किंवा संघ राज्यक्षेत्राचे मुख्यमंत्री, इतर कॅबिनेट मंत्री;
राज्याचे किंवा संघ राज्यक्षेत्राचे राज्यमंत्री व उप मंत्री;

(६) लोकसभेचे अध्यक्ष;
राज्यसभेचे उपसभापती;
लोकसभेचे उपाध्यक्ष;
राज्यातील विधान परिषदेचे सभापती;
राज्य आणि संघ राज्यक्षेत्र विधानसभांचे अध्यक्ष;
राज्यातील विधान परिषदांचे उपसभापती
राज्य आणि संघ राज्यक्षेत्र विधानसभांचे उपाध्यक्ष;

(७) भारताचे मुख्य न्यायमूर्ती;
सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश;
उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती;
उच्च न्यायालयाचे न्यायाधीश.

३.४५ परिच्छेद ३.४४ च्या खंड (५) ते (७) मध्ये नमूद केलेल्या उच्चपदस्थ व्यक्तींना आवश्यक किंवा उचित वाटेल, तेव्हा त्यांना आपल्या मोटारीवर राष्ट्रध्वज लावता येईल;

३.४६ जेव्हा शासनाने पुरविलेल्या मोटारीतून परदेशी उच्चपदस्थ व्यक्ती प्रवास करीत असतील, तेव्हा राष्ट्रध्वज त्या मोटारीच्या उजव्या बाजूस लावण्यात येईल आणि परदेशी उच्चपदस्थ व्यक्तीच्या देशाचा ध्वज त्या मोटारीच्या डाव्या बाजूस लावण्यात येईल.

## कलम दहा : रेल्वे व विमानांवर ध्वज लावणे

३.४७ राष्ट्रपती जेव्हा देशात खास रेल्वेने प्रवास करीत असतील, तेव्हा गाडी जेथून सुटत असेल त्या स्थानकाच्या फलाटाभिमुख बाजूने चालकाच्या कक्षामधून राष्ट्रध्वज लावण्यात यावा. खास गाडी स्थिर असेल तेव्हाच केवळ किंवा जेथे ती थांबणार असेल त्या स्थानकावर येताना ध्वज लावण्यात येईल.

३.४८ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा पंतप्रधान यांना परदेशात घेऊन जाणाऱ्या विमानावर राष्ट्रध्वज लावण्यात येईल. ज्या देशात ते जाणार असतील त्या देशाचा ध्वजही राष्ट्रध्वजाबरोबर लावावा. तसेच विमान, मार्गात ज्या ज्या देशांमध्ये थांबेल, त्या त्या देशांचे राष्ट्रध्वजही मैत्रीसूचक सौजन्य व सदिच्छा यांचे निदर्शक म्हणून लावावेत.

३.४९ राष्ट्रपती भारतात दौऱ्यावर जाणार असतील, तेव्हा राष्ट्रपती ज्या बाजूने विमानात चढणार असतील किंवा उतरणार असतील त्या बाजूस राष्ट्रध्वज लावावा.

## कलम अकरा : ध्वज अर्ध्यावर उतरवणे

३.५० पुढील उच्चपदस्थ व्यक्तींच्या मृत्यूच्या प्रसंगी, त्या प्रत्येकासमोर दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी त्या उच्चपदस्थ व्यक्तीच्या निधनाच्या दिवशी ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येईल :

| उच्चपदस्थ व्यक्ती | ठिकाणी किंवा ठिकाणे |
|---|---|
| राष्ट्रपती<br>उप राष्ट्रपती<br>पंतप्रधान | भारतात सर्वत्र |
| लोकसभेचे अध्यक्ष<br>भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती | दिल्ली |
| केंद्रीय कॅबिनेट मंत्री | दिल्ली आणि राज्यांच्या राजधान्या |
| केंद्रीय राज्यमंत्री किंवा उप मंत्री | दिल्ली |
| राज्यपाल<br>नायब राज्यपाल<br>राज्याचे मुख्यमंत्री<br>संघ राज्यक्षेत्राचे मुख्यमंत्री | संबंधित राज्य किंवा संघ राज्यक्षेत्रे यांमध्ये सर्वत्र |
| राज्यातील कॅबिनेट मंत्री | संबंधित राज्याची राजधानी |

३.५१ कोणत्याही उच्चपदस्थ व्यक्तीच्या मृत्यूची माहिती दुपारी मिळाली असेल, तर अंत्यसंस्कार त्या दिवशी सूर्योदयापूर्वी करण्यात आले नसतील तरच केवळ, वर दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी नंतरच्या दिवशीसुद्धा ध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल.

३.५२ वर नमूद करण्यात आलेल्या उच्चपदस्थ व्यक्तीच्या अंत्यसंस्काराच्या दिवशी जेथे अंत्यसंस्कार करण्यात आले असतील, त्या ठिकाणी ध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येतील.

३.५३ कोणत्याही उच्चपदस्थ व्यक्तीच्या मृत्यूचा दुखवटा पाळावयाचा असेल, तर केंद्रीय उच्चपदस्थ व्यक्तींच्या बाबतीत भारतात सर्वत्र आणि राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या उच्चपदस्थ व्यक्तीच्या बाबतीत संबंधित राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात सर्वत्र दुखवट्याच्या संपूर्ण कालावधीत ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येतील.

३.५४ परदेशी उच्चपदस्थ व्यक्तीच्या मृत्यूमुळे ध्वज अर्ध्यावर उतरविण्याच्या किंवा आवश्यक असेल त्याबाबतीत दुखवट्याचे पालन करण्याच्या प्रत्येक प्रकरणी गृह मंत्रालयाकडून वेळोवेळी विशेष सूचना देण्यात येतील.

३.५५ उपरोक्त तरतुदी असतानासुद्धा, ध्वज अर्ध्यावर उतरवण्याचा दिवस प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्यदिन, महात्मा गांधी जयंती, राष्ट्रीय सप्ताह (६ एप्रिल ते १३ एप्रिल जालियनवाला बाग हुतात्मा स्मृती सप्ताह) तसेच भारत सरकारने विनिर्दिष्ट केल्यानुसार राष्ट्रीय आनंदोत्सवाच्या कोणत्याही इतर विशिष्ट दिवशी किंवा राज्यांच्या बाबतीत राज्य स्थापनेचा वर्धापनदिन या दिवशी येत असेल, तर ज्या इमारतीत मृतदेह ठेवण्यात आला असेल त्या इमारतीखेरीज इतर कोणत्याही इमारतींवरील ध्वज अर्ध्यावर फडकवता कामा नये. तसेच त्या इमारतीवरही मृतदेह तेथे आहे तोपर्यंतच ध्वज अर्ध्यावर ठेवावा व मृतदेह तेथून हलविल्यानंतर ध्वज पूर्ववत पूर्ण उंचीवर फडकवावा.

३.५६ जर दुखवट्यानिमित्त असलेल्या संचलनामध्ये किंवा मिरवणुकीबरोबर ध्वज न्यायचा असेल, तर ध्वजाच्या वरच्या टोकास काळ्या क्रेप कपड्याच्या दोन पट्ट्या स्वाभाविकपणे खाली लोंबत राहतील अशाप्रकारे लावाव्यात. काळ्या क्रेपच्या कापडाचा अशा पद्धतीने उपयोग फक्त सरकारच्या आदेशानेच करता येईल.

३.५७ जेव्हा ध्वज अर्ध्यावर फडकवायचा असेल, तेव्हा तो प्रथम क्षणभर वरच्या टोकास फडकवावा आणि नंतर अर्ध्यावर उतरवावा. तसेच त्या दिवशी ध्वज उतरवून घेण्यापूर्वी तो पुन्हा एकदा वरच्या टोकास नेऊन नंतरच खाली आणावा.

**टीप.–** ध्वज अर्ध्यावर आणणे याचा अर्थ ध्वजाचे वरचे टोक आणि दोरीचा आकडा (ुल्ब्त्ग्हा) यामधील अंतराच्या निम्म्यापर्यंत आणि जेथे असा दोरीचा आकडा नसेल, तेथे काठीच्या निम्म्यापर्यंत तो उतरविणे असा होय.

३.५८ सरकार/सेनादल/केंद्रीय निमलष्करी दले यांच्यामार्फत काढण्यात आलेल्या अंत्ययात्रा या प्रसंगी, ध्वज ताटीवर अगर शवपेटीवर आच्छादला पाहिजे. तसे करताना केशरी पट्टा हा ताटीच्या अगर शेवपेटीच्या डोक्याकडील बाजूस ठेवला पाहिजे. ध्वजाचे मृतदेहाबरोबर दहन वा दफन करता कामा नये.

३.५९ परदेशी राष्ट्रप्रमुख किंवा परदेशी सरकार प्रमुख यांच्या मृत्यूच्या प्रसंगी त्या देशाच्या अधिस्वीकृत भारतीय मंडळास जरी ती घटना प्रजासत्ताकदिन, स्वातंत्र्यदिन, महात्मा गांधी जयंती, राष्ट्रीय सप्ताह (६ एप्रिल ते १३ एप्रिल जालियनवाला बाग हुतात्मा स्मृती सप्ताह) किंवा भारत सरकारने विनिर्दिष्ट केल्यानुसार राष्ट्रीय आनंदोत्सवाच्या कोणत्याही इतर दिवशी घडली, तरी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवता येईल. त्या देशाच्या अन्य कोणत्याही उच्चपदस्थ व्यक्तीच्या मृत्यूच्या प्रसंगी, स्थानिक प्रथा किंवा शिष्टाचार (आवश्यक असेल त्याबाबतीत ती राजनैतिक सेनेच्या डीनकडून निश्चित करण्यात यावी.) यानुसार त्या देशातील विदेशी मंडळाचा राष्ट्रध्वजसुद्धा अर्ध्यावर उतरविणे आवश्यक असल्याशिवाय त्या मंडळाकडून राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येणार नाही.

----------

# 50. THE REGISTRATION OF FOREIGNERS ACT, 1939
# ACT NO. 16 OF 1939
## [8th April, 1939.]

An Act to provide for the registration of foreigners in British India.

WHEREAS it is expedient to provide for the registration of foreignersentering, being present in, and departing from, British India;

**1. Short title and extent.-** (1) This Act may be called the Registration of Foreigners Act, 1939.

(2) It extends to 2[the whole of India]

**2. Definitions.-** In this Act-

(a)" foreigner " means a person who is not a citizen of India;]

* * * *

* *

(b) "prescribed " means prescribed by rules made under this Act.

**3. Power to make rules.** - (1) The Central Government mayafter previous publication, by power to notification in the Official Gazette, make rules 6 with respect to make rules. foreigners for anyor all of the following purposes, that is to say-

(a) for requiring any foreigner entering, or being present in, India to report his presence to a prescribed authority within such time and in such manner and with such particulars as maybe prescribed;

(b) for requiring any foreigner moving from one place to another place in India to report, on arrival at such other place, his presence to a prescribed authority within such time and in such manner and with such particulars as may be prescribed;

(c) for requiring any foreigner who is about to leave India to report the date of his intended departure and such other particulars as may be prescribed to such authority. and within such period before departure as may. be prescribed;

(d) for requiring any foreigner entering, being present in, or departing from, India to produce, on demand by a prescribedauthority, such proof of his identity as may be prescribed;

(e) for requiring any person having the management of any hotel, boarding-house, sarai or

any other premises of like nature to report the name of any foreigner residing therein for whatever duration, to aprescribed authority, within such time and in such manner and with such particulars as may be prescribed;

(f) for requiring any person having the management or control of any vessel or aircraft to furnish to a prescribed authority such information as may be prescribed regarding any foreigner entering, or intending to depart from, India, in such vessel or aircraft, and to furnish to such authority such assistance as may be necessary or prescribed for giving effect to this Act;

(4) Every rule made under this section shall be laid as soon as may be after it is made, before each House of Parliament, while it is in session, for a total Period of thirty days which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session immediately following the session or the successive sessions aforesaid. both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made. The rule shall there after have effect only, in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done under that rule.

(g) for providing for such other incidental or supplementary matters as may appear to the Central Government necessary or expedient for giving effect to this Act.

**4. Burden of proof.**- If any question arises with reference to this Act or any rule made thereunder, whether any person is or is not a foreigner, or is or is not a foreigner of a particular class or description, the onus of proving that such person is not a foreigner or is not a foreigner of such particular class or description, as the case may be, shall, not withstanding anything contained in the Indian Evidence Act, 1872 (1 of 1872 ) lie upon such person.

**5. Penalties.-** Any person who contravenes, or attempts to contravene, or fails to comply with, any provision of any rule made under this Act shall be punished, if a foreigner, with imprisonmentfor a term which may extend to one year or with fine which may extend to one thousand rupees or with both, or if not a foreigner, with fine which may extend to five hundred rupees.

**6. Power to exempt from application of Act.-** The Central Government may, by order 1, declare that any or all of the provisions of the rules made under this Act shall not apply or shall apply only with such modifications or subject to such conditions as may be specified in the said order, to or in relation toany individual foreigner or any class or description of foreigner :

Provided that a copy of every such order shall be placed on the table of * * * Parliament as soon as may be after its promulgation.

**7. Protection to persons acting under this Act.-** No suit, prosecution or other legal

proceeding shall lie against any person foranything which is in good faith done or intended to be done under thisAct.

**8. Application of other laws not barred.-** The provisions of this Act shall be in addition to, and not in derogation of, the provisions of the Foreigners Act, 1946 (31 of 1946.) and any other law for the time being in force.

**9. Application of Act to Part B States.-** Application of Act to Part B States. Rep. by the Part B States (Laws) Act, 1951 (3 of 1951), s. 3 and Sch.

* * *